
ओंकार ट्रस्ट

कल्याणी २०१२

महाराष्ट्रातील स्त्रीसंत पंचक विशेषांक

(संत - मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई व वेणास्वामी)





नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ।।

ॐ

उद्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

ओंकार ट्रस्ट

(स्थापना २६ जुलै १९९१)

रजिस्टर्ड ऑफिस :

गुजरवाडी-निंबाळकरवाडी,
कात्रज, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४३.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

C/O **श्री. भा. वा. सातवळेकर**
७ चंद्रमा अर्पाटमेंट, नित्यानंद हॉल जवळ,
सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११०५१
☎ : ०२०-२४३४५०६१
9096038809

मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० अन्वये
नोंदणीकृत संस्था नोंदणी क्रमांक
ई १५०५ दिनांक १० ऑक्टोबर १९९१

कलम ८० ग खाली आयकर सवलत

ओंकार ट्रस्ट २०१२ चा **''महाराष्ट्रातील स्त्री संतपंचक''** विशेषांक, संपादक सौ. कल्याणी अशोक शिवले (उज्वला काळे), ट्रस्टी यांनी प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९ येथे छापून श्री. भालचंद्र वा. सातवळेकर, यांनी ७ चंद्रमा अर्पाटमेंट, नित्यानंद हॉल जवळ, सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११०५१ येथे प्रकाशित केला आहे.

टीप : १) सदरचा विशेषांक **फक्त खासगी वितरणासाठी** आहे.

२) या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनाशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

३) अंकातील 'नामयाची जनी' व 'महायोगिनी बहिणाबाई' लेखिका सौ. जयश्री नातू हे दोन्ही लेख जीवन विकास, ऑक्टोबर २००७ व जीवन विकास नोव्हेंबर २००७- नागपूर यांच्या पूर्वपरवानगीने पुनर्मुद्रित करण्यात आले आहेत.

४) अंकाचे मुखपृष्ठ तसेच संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई व संत वेणास्वामी यांची आतील चित्रे चित्रकार कै. मा. जि. भि. दिक्षित यांनी साकारलेली असून श्री. प्रकाश जि. दिक्षित यांचे सौजन्याने प्राप्त झालेली आहेत.

५) अंकातील संत कान्होपात्रेचे चित्र चित्रकार सचिन जोशी यांनी काढलेले आहे.

६) अंकातील काही लेखात आलेला शूद्र शब्द हा तत्कालीन वर्णव्यवस्थेनुसार आलेला आहे.

अक्षरजुळणी आणि छपाई : प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९. फोन : २५४६०२१६

अध्यक्षीय मनोगत

'महाराष्ट्रातील स्त्री संतपंचक' या २१ व्या 'कल्याणी' विशेषांकाद्वारे आपल्याशी संवाद साधताना मला आनंद होत आहे.

न्यासाची मुख्य कार्ये अशी आहेत.

१) शाळांमधून संस्कारवर्ग घेणे. गरीब लोकांसाठी नेत्रचिकित्सा शिबिरे, सर्वसाधारण रोग निदान शिबिरे घेणे. तसेच अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतील स्त्रियांना असाध्य रोगावर इलाज करण्यासाठी आर्थिक मदत करणे. वर्षातून किमान ५-६ वेळा तरी निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने/प्रवचने यांचे आयोजन करणे.

२) १९९२ पासून दरवर्षी एका संतावर 'कल्याणी' नावाने विशेषांक प्रकाशित करण्यात येतो. यात त्या त्या संताचे जीवन व वाङ्मयीन साहित्य यांची माहिती व शिकवण लोकांपर्यंत पोहोचविली जाते. अत्तापर्यंत असे २० अंक प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

३) १९९७ पासून सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेस 'वसुंधरा कृतज्ञता' पुरस्कार प्रदान करण्यात येतो. रोख रक्कम, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे याचे स्वरूप असते.

४) २००० साली न्यासाने सामाजिक गरज लक्षात घेऊन अनाथ मुले दत्तक घेण्याचे ठरविले व त्याकरिता गुजर निंबाळकर वाडी येथील न्यासच्या एक एकर जागेवर १६०० चौ. फुटांची स्वतंत्र इमारत बांधण्यात आली आहे.

सध्या आमच्या येथे ३॥ वर्षे ते १४ वर्षे या वयोगटांतील एकूण आठ मुले व मुली राहात आहेत. त्यांचे संगोपन, शिक्षण न्यासातर्फे केले जाते. न्यासाच्या विश्वस्त श्रीमती मालती निमोणकर या पूर्णवेळ न्यासाचे जागेवर मुलांबरोबर राहून बालकल्याणाची जबाबदारी पार पाडतात. मुलांच्या राहाण्याच्या जागेव्यतिरिक्त आणखी २४०० चौ. फूटांच्या दोन इमारती न्यासाच्या जागेवर बांधण्यात आलेल्या आहेत त्यांचा उपयोग शिबिरे घेणे, संस्कारवर्ग घेणे यासाठी केला जातो.

न्यासातील सर्व पदाधिकारी/विश्वस्त आपला वेळ, श्रम व धन न्यासासाठी खर्च करून कार्य करीत असतात यात विशेष काहीच नाही पण संस्कार वर्ग घेणाऱ्या शिक्षिका, लेखा परिक्षक, अंकात लेख लिहिणारे लेखक या सारखे आमचे हितचिंतकही आम्हाला विनामूल्य सर्वतोपरि मदत करीत असतात. 'प्रतिमा ऑफसेट'चे अजित ठोंबरे ना नफा ना तोटा या तत्त्वावर अंकाच्या छपाईचे काम करीत असतात. आपणही अशा प्रकारची मदत आम्हाला करावी असे मी आवाहन करतो.

अंकाबद्दलची माहिती आपणास अंकांतील 'संपादकीय मधे मिळेलच तर २०११-१२ मध्ये न्यासाने केलेल्या कार्याची माहिती वाटचाल मध्ये मिळू शकेल.

आम्ही हे जे काही थोडेफार करू शकलो व आणखी बरेच काही करण्याचा मानस आहे ते लोकाश्रयामुळेच शक्य झाले आहे याची आम्हाला जाणीव आहे. आपली अशीच यथाशक्ती सक्रीय मदत मिळत राहावी ही अपेक्षा हे मनोगत पुरे करताना करतो.

धन्यवाद !

म. वा. सरदेशपांडे
अध्यक्ष

***

॥ श्री रुक्मिणीदेवी प्रसन्न ॥

अकृत्वा परसंतापं अगत्वा खलमंदिरम्।
साधोर्मार्गमनुत्सज्य यद् स्वल्पमपि तद् बहु ॥

वा. ना. उत्पात

२९३०, राधानारायण पश्चिमद्वार
पंढरपूर जि. सोलापूर - ४१३ ३०४ (महाराष्ट्र)
दूरभाष : २३६७७, एस.टी.डी. - ०२१८६

बी.ए.(ऑ) एम.एड.
संपादक : सा. पंढरीप्रहार

माजी नगराध्यक्ष :
पंढरपूर १९९६

अध्यक्ष :
सावरकर साहित्य संमेलन
जालना १९९६

सदस्य :
पंढरपूर नगरपालिका
१९७४ ते १९९७

सदस्य :
दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक
१९७१ ते ८९

सदस्य :
श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदीर
व वाचनालय
१९८५ ते १९९०

सदस्य :
दासगणु प्रतिष्ठान गोरट

कार्यवाह :
सावरकर प्रेमी मंडळ
व वाचनालय पंढरपूर

प्रवचनकार, व्याख्याते,
भागवताचार्य
श्री. रुक्मिणी देवीचे पुजारी

जावक क्र. दि. १७/२/२०१२

सादर नमस्कार

आपण 'स्त्री संत' या विषयावर विशेषांक काढत आहात, हे ऐकून आनंद वाटला. आपल्या इतिहासात ब्रह्मवादिनी, तत्त्वज्ञा, विदुषी, साक्षात्कारी अशा पुष्कळ स्त्रिया होऊन गेल्या. गार्गी, मैत्रेयी, सुलभा, अशा अनेक स्त्रिया ब्रह्मज्ञानी होत्या. मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, मीरा, या संत होत्या साक्षात्कारी होत्या. त्यांचे वाङ्मय शेकडो वर्षे भक्तीचा सुगंध देत आहे. भारतीय संस्कृतीने अशा स्त्रियांचा गौरवच केला आहे.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्र ताः न पूज्यन्ते तत्र सर्वाः अफलाः क्रियाः।

जेथे स्त्रियांची पूजा होते, तेथे देवता रममाण होतात. जेथे त्या पूजिल्या जात नाहीत, तेथे सर्व क्रिया निष्फळ होतात.

अशा थोर स्त्रियांची आपण अक्षर-पूजा करीत आहात, म्हणून आपणास वंदन!

उत्पात वा.ना.

संपादकीय

संत आत्महिताबरोबरच जनहिताचा विचार प्रकर्षाने करतात. त्यांचे विचार जनता जनार्दनापर्यंत पोहोचविणे आवश्यक हा शुद्ध हेतू मनी ठेवून 'कल्याणी' विशेषांकाला सुरुवात केली, कै. सौ. वसुंधरा सातवळेकर या ओंकार ट्रस्टच्या संस्थापक कार्यवाह यांनी. शुद्ध बीजा पोटी। फळे रसाळ गोमटी ।। या संतवचनानुसार त्यांचा हेतू शुद्ध त्यामुळे त्यांच्या पश्चातही त्यांनी पेरलेलेल्या बीजाला फलद्रुपता आली आहे ती त्यांच्या पुण्याईने आणि ईश्वरी कृपेमुळेच. या वर्षीचा हा **एकविसावा 'कल्याणी' विशेषांक** आगळा वेगळा आहे. 'स्त्री संता' वरील हा पहिलाच अंक. दरवर्षी एकच संत व त्यांचे वाङ्मय यावर अंक प्रकाशित केला जातो. स्त्री संतांचे वाङ्मय हे प्रामुख्याने पद्य स्वरूपात व मर्यादित आहे त्यामुळे पाच स्त्री संतांचा एकत्रित अंक प्रकाशित करीत आहोत.

उपलब्ध वाङ्मयांतील विविध विषयांचा विचार येथे केला आहे. प्रयत्न करूनही काही ठिकाणी पुनरुक्ती टाळता आलेली नाही 'एकच' गोष्ट/बाब काही ठिकाणी पुन्हा आलेली असली तरी ती मांडणारे लेखक वेगवेगळे आहेत. त्यामुळे प्रत्येकांची विचारांची मांडणी, दृष्टीकोन यातून विविधतेचा अनुभव आपल्याला मिळतो, हेही निश्चित. उदाहरणार्थ - संत मुक्ताबाईंच्या जीवनाचा विचार करताना संत नामदेव, चांगदेव यांचा उल्लेख पुन्हा पुन्हा येणे अपरिहार्य आहे. संत जनाबाईंच्या अभंगाचा विचार करताना - 'विठु माझा लेकुरवाळा' हा अभंग वेगवेगळ्या संदर्भातून बऱ्याच ठिकाणी आला आहे. संत कान्होपात्रा यांचे जीवन चरित्र त्यातील घटना- मोजक्याच आहेत. त्यामुळे तिथेही पुन्हा तेच तेच असे वाटणे शक्य आहे. 'गाय वासरू' हे संत बहिणाबाईंच्या चरित्रातील अविभाज्य घटक आहेत आणि विविध अंगानी- त्यांच्या साहित्यातील विविध विषयांचा विचार करताना ही गोष्ट काहीना काही कारणांनी लेखात समाविष्ट करावी लागलेली आहे. संत वेणास्वामींच्या जीवनातील 'विषायाचा प्याला' ही घटना ही अशीच अत्यंत महत्त्वाची त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी, त्यामुळे त्यांच्या वाङ्मयाच्या विविध पैलूंचा विचार करताना त्याचा संदर्भ देणे अपरिहार्य झालेले आहे.

या पाचही स्त्री संतांना आपले जीवन अतिशय प्रतिकूल परिस्थितीत कंठावे लागले आहे. पण त्यांचा भगवत्‌भाव कुठेही डळमळीत झालेला नाही. श्रीगोंदवलेकर महाराज म्हणतात, पाणी गोठून बर्फ बनते, बर्फात आत-बाहेर सगळीकडे पाणीच पाणी भरलेले असते तसेच संतांच्या आत-बाहेर भगवंताचे प्रेम ओथंबलेले असते. जनाई काय किंवा कान्होपात्रा काय त्या विठ्ठलमय झालेल्या होत्या. त्यांच्या ध्यानी मनी विठाई शिवाय दुसरे काही नव्हतेच. संत बहिणाबाई प्रतिकूल परिस्थितीतून वाट काढत राहिल्या. प्रपंचाला बाधा न आणता आपल्या कृतीने त्यांनी आपल्या सद्‌गुरूंचे स्थान सर्वांना पटवून दिले. वेणास्वामींनी आपल्या जीवनाच्या पतंगाची दोरी श्रीसमर्थांच्या हाती दिली, सद्‌गुरू कृपेस पात्र होण्यासाठी श्रद्धा आणि निष्ठा यांना किती महत्त्व आहे हे दाखवून दिले. १४ वर्षांची मुक्ताई १४०० वर्षांच्या चांगदेवाची गुरूमाऊली झाली. प्रत्यक्ष आदिमातेचा अवतार असणाऱ्या मुक्ताईनी आपले श्रेष्ठत्व कृतीतून सिद्ध केले.

अंकातून या सर्व स्त्रीसंतांच्या - चरित्राचा आणि त्यांनी लिहिलेल्या विविध वाङ्मयाचा विचार वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

हा अंक यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन लाभले आहे ते श्रीसमर्थभक्त- श्री. सुनिल चिंचोळकर, डॉ. सौ. कल्याणी नामजोशी, डोंबिवलीच्या डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी आणि श्रीमती वीणाताई गोसावी यांचे. ओंकार ट्रस्ट त्यांचे ऋणी आहे. नेहमीप्रमाणे अंकांतील मान्यवर लेखकांनी लेख देऊन आम्हाला उपकृत केले आहे. जाहिरातदार, देणगीदार यांचे पाठबळ तर आहेच आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमचा या वर्षीचा एक वेगळा प्रयोग आपल्याला आवडेल असे वाटते. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.

सौ. कल्याणी शिवले
(उज्ज्वला काळे)

मुखपृष्ठाबाबत...

दरवर्षीचा आपला 'कल्याणी' अंक हा एकाच संताच्या जीवन व वाङ्मयावर प्रकाशित केला जातो, व त्या संतांचीच प्रतिमा मुखपृष्ठावर मुद्रित केलेली असते. यंदा **पाच स्त्री संतांवर 'कल्याणी'चा अंक आहे**. स्त्री ही आदिशक्तीचे रूप आहे. या आपल्या पाच स्त्रीसंत म्हणजे तर जणू आदिमाताच त्यामुळे या सर्वांचे प्रतिकात्मक रूप म्हणून आदिमातेचे मुखपृष्ठ या वेळी अंकावर साकारले आहे. असे म्हणतात की, देव जेव्हा आसुरी संकटांनी ग्रासले होते व त्या संकटाचे निवारण करण्यात अपयशी होत होते तेव्हा सर्व देव एकत्र आले व त्यांनी आदिमातेची निर्मिती केली. आपल्यातील इष्ट शक्ती प्रत्येकाने तिला बहाल केल्या. त्या सर्व शक्तींच्या एकत्रिकरणामुळे आदिमाता शक्तिमान झाली. दुष्टांचा संहार आणि सुष्टांचे रक्षण हे कार्य या माताने अंगीकारले. हातांतील आयुधांनी तिने आसुरी शक्तींचे निर्दालन केले आणि दैवी गुणांना फल दिले. अशा या देवीला, महादेवीला कल्याण कारिणीला सतत नमस्कार.

वाटचाल २०११-१२


ओंकार ट्रस्ट तर्फे चालविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती 'अध्यक्षीय मनोगत'मध्ये आपणास मिळेलच. २०११-१२ मध्ये झालेल्या वाटचालीचा मागोवा आता घेऊयात...

दि. १४ एप्रिल २०११ रोजी 'कल्याणी' दासगणु महाराज विशेषांकाचे प्रकाशन व पर्यावरणासाठी विशेष कार्य करणाऱ्या दिलीप कुलकर्णी यांना 'वसुंधरा कृतज्ञता' पुरस्कार



सौ. दीदी यांचे हस्ते सन २०११ चा **'वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार'** स्विकारताना **श्री. दिलीप कुलकर्णी** शेजारी सौ. कुलकर्णी

प्रदान करण्याचा समारंभ 'स्वाध्याय परिवाराच्या अध्वर्यु- मा. दिदी उर्फ सौ. धनश्री तळवळकर यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी दासगणुप्रतिष्ठान गोरटेचे अध्यक्ष श्री. महेश आठवले यांनीही आपले मनोगत व्यक्त करून ओंकार न्यासास धन्यवाद दिले. कार्यक्रमास स्वाध्याय परिवाराचे तसेच दासगणु परिवारातील लोकही मोठ्या संख्येने उपस्थित



कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत सत्कार स्विकारताना **श्री. सातवळेकर** (उपाध्यक्ष, ओंकार ट्रस्ट) आणि **सौ. प्रज्ञा केळकर** (संस्कारवर्ग चालक)

होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही १०वी च्या शालांत परिक्षेत संस्कृत व मराठीत प्रथम क्रमांक येणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थीनीस बक्षिस देण्यात आले. यंदाच्या या बक्षिसाचे मानकरी होते, कु. शैलेश रुईकर, बारामती व कु. मोनाली गणेश कामथे, शिवरी हे दोघेजण.

यंदा मांगडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींसाठी तसेच हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेतील मुलींसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात दोन्ही ठिकाणच्या मिळून २८० विद्यार्थी- विद्यार्थीनींनी भाग घेतला. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना पारितोषिके देण्यात आली.



'कल्याणी' २०११ 'आधुनिक महिपती श्रीदासगणु महाराज' विशेषांकाचे प्रकाशन
व्यासपीठावर डावीकडून - **सौ. कुलकर्णी, श्री. दिलीप कुलकर्णी, सौ. कल्याणी नामजोशी, सौ. दिदी (धनश्री तळवळकर), श्री. महेश आठवले** (अध्यक्ष, दासगणु प्रतिष्ठान गोरटे), **श्री. मधुसूदन सरदेशपांडे** (अध्यक्ष, ओंकार ट्रस्ट)

ओंकार ट्रस्ट व स्वरूप वर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपला गणपती आपणच बसवा' या उपक्रमाद्वारे ३ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर गणेश चतुर्थीचे आधी आयोजित करण्यात आले. प्रशिक्षण शिबीर सर्वांसाठी खुले होते. त्यात मान्यवर पुरोहितांनी मार्गदर्शन केले.

माहे डिसेंबर २०११ मध्ये 'सुखाचा शोध, बोध व वेध' या विषयावर डॉ. सौ. शैला काळकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

गेल्यावर्षी प्रमाणेच याही वर्षी संस्थेच्या काही हितचिंतकांनी आपले अथवा आपल्या नातेवाईकांचे वाढदिवस गुजर-निंबाळकरवाडी येथे संस्थेच्या मुलांबरोबर साजरे केले.



ओंकार ट्रस्टची निवासी मुले



ट्रस्टच्या मुलांनी व इतर मुलांसह रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा केला


गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही न्यासाच्या मुलांनी विविध स्पर्धात बक्षिसे मिळविली आहेत. भारती विद्यापीठ कन्या प्रशाळेत शिकणाऱ्या तिघींना पुढीलप्रमाणे पारितोषिके मिळाली - १) कु. रसिका कोरेगांवकर - खो-खो प्रथम क्रमांक. २) प्रणाली सुर्यवंशी - लंगडी, खो-खो व नारळी वस्तू बनविणे या तिन्हीत प्रथम क्रमांक व ३) कोमला खवले - पुष्प रचना प्रथम क्रमांक.

अशाप्रकारे न्यासाची वाटचाल चालू आहे. अर्थात या सर्वांत हस्ते परहस्ते आपलाही सहभाग आहेच आणि तो तसाच पुढेही चालू राहील याची खात्री आहे.

***

स्वरूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांची ३ निवासी शिबीरे गुजर-निंबाळकरवाडी येथे घेण्यात आली. या सर्व शिबिरांत मिळून ६० ते ७० कार्यकर्त्यांचा सहभाग होता. रक्षाबंधनाच्या दिवशी स्वरूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी ट्रस्टचे मुलांबरोबर हा सण साजरा केला.

यंदाची एक अत्यंत आनंदायी गोष्ट म्हणजे एक छोटी ३।। वर्षांची कुमारी सिद्धी आपल्या मुलांच्या परिवारात समाविष्ट झाली आहे. सर्व बालगोपाळांनी आपली सर्वांची नावे तीन अक्षरी म्हणून तिचे नाव सिद्धी बदलून नंदीनी ठेवले. तिचे बोरनहाणही करण्यात आले.



ट्रस्टची मुले वाढदिवस साजरा करताना...

''ओंकार'' न्यासातर्फे दरवर्षी ''वसुंधरा-कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात येतो.
सन २०१०-२०११ या वर्षासाठी **श्री. दिलीप कुलकर्णी- कुडावळे** यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.
त्यावेळी प्रदान करण्यात आलेले मानपत्र सर्वांच्या माहितीसाठी या अंकामध्ये प्रसिद्ध करत आहोत.

वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार २०१०-२०११
श्री. दिलीप कुलकर्णी- कुडावळे

गुणगौरव

दिनांक : १४/४/२०११

निसर्गाच्या ऐश्वर्याकडे पाहाताना होणारा आनंद अवर्णनीय असतो. विधात्याने केलेली उधळण माणसाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देत असते. निसर्गात प्रामुख्याने जाणवतो तो हिरवा रंग. **हा रंग सत्वगुणाचा द्योतक आहे.** सध्या चालू असलेली जंगलतोड म्हणजे जणू सत्वगुणावर घातलेला घावच आहे. 'निसर्ग वाचवा, पर्यावरण वाचवा' असे फलक लावण्याची वेळ यावी यासारखे दुर्दैव ते काय !

बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असे वागणाऱ्यांची संख्याच समाजात जास्त. आधी केले मग सांगितले असे वागणारे श्री. दिलीप कुलकर्णी सारखे अत्यल्प.

दिलीपजी गेली १७ वर्षे आपण कोकणात कुडावळे येथे पर्यावरण सुसंगत जीवनशैली जगत आहात. आपले बालपण पुण्यासारख्या शहरात गेले. मेकॅनिकल इंजिनियरींगची पदविका आपण पुण्यातून प्राप्त केलीत. १९७८ ते १९८४ या काळांत टेल्कोसारख्या नामांकित कंपनीत नोकरी केलीत. नोकरी सोडून पुण्यातील विवेकानंद केंद्राची (कन्याकुमारी) जबाबदारी सांभाळलीत. 'मराठी प्रकाशन विभागाचे' दायित्व पत्करून 'विवेक विचार' या नियतकालिकाचे संपादक म्हणून जबाबदारी पेललीत.

बोले तैसा चाले या उक्तीनुसार १९९३ साली शहर सोडून कोकणात गेलात. कुडावळे येथे १० गुंठे जागा भाडे तत्त्वावर घेऊन नैसर्गिक साधन संपत्तीवर जगणे सुरू केलेत. स्थानिक वाहतुकीसाठी सायकल, प्रवासासाठी सार्वजनिक वाहन व्यवस्था. घरात केवळ रेडिओ आणि चार दिव्यांची सोय. कोणतेही आधुनिक उपकरण नाही. एसी, एसी कार आणि ऐषोआरामाच्या या युगात हे ऋषितुल्य त्यागमय जीवन आपण आनंदाने जगत आहात. या आपल्या कार्यात आपल्याला आपल्या सुविद्य पत्नी सौ. पौर्णिमाताईंची साथ लाभली आहे. यालाच made for each other असे म्हणायचे का ?

१९८० सालापासून विविध सामाजिक विषयांवर आपण व्याख्याने देत आहात. ठिकठिकाणी निसर्गस्नेही जीवनशैलीच्या व्यावहारिक आणि वैचारिक अंगाने मार्गदर्शन करण्यासाठी शिबिरे आयोजित करीत आहात. आत्तापर्यंत अशी २० शिबिरे आपण आयोजित केली आहेत.

दादामहाराज नाटेकर मोरया ट्रस्ट पुरस्कार- पुणे, दधीची पुरस्कार- अंबरनाथ, नातू पुरस्कार- पुणे, वसंतराव नाईक पर्यावरण पुरस्कार- मुंबई इत्यादी सहा पुरस्कारांनी आपणास सन्मानित करण्यात आलेले आहे.

दहा वर्षांपूर्वी 'पर्यावरणाशी क्रियाशील नातं' हे ब्रीद वाक्य घेऊन आपण गतिमान संतुलन हे मासिक सुरू केलेत. देणगी अथवा जाहिरात याचा उपयोग न करता केवळ वर्गणीदारांच्या बळावर आपण हा प्रयोग यशस्वीरीतीने पार पाडत आहात. अणू विवेक, हसरे पर्यावरण, वेगळ्या विकासाचे वाटाडे, वैदिक गणिताचे चार भाग, जगदिशचंद्र बोस यांचे चरित्र इत्यादी २० पुस्तकांनी आपण आपले साहित्य भांडार संपन्न केले आहे. अतिशय माफक खर्चात साध्या पद्धतीने आपण पर्यावरण विषयक लेखन करणाऱ्यांचे 'पर्यावरण साहित्य संमेलन' नुकतेच (२०१० मध्ये) यशस्वी करून दाखविले आहे.

कोणाला आपले विचार पटोत वा न पटोत आपण निसर्गाच्या सान्निध्यात हेच शाश्वत असल्याचे सांगून एकला चलोरे या न्यायाने समृद्ध जीवन जगत आहात. आपले कार्य देवकार्य आहे. आपल्या या असामान्य देव आणि देश कार्याने ओंकार न्यासाचे विश्वस्त मंडळ प्रभावित झाले आहे. **सन २०१०-११ चा 'वसुंधरा कृतज्ञता' पुरस्कार** स्वाध्याय परिवाराच्या अध्वर्यू **सौ. धनश्री तळवलकर (दीदी)** यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक आपणास प्रदान करताना न्यासास अत्यंत आनंद व समाधान होत आहे.

आपणा उभयतांस आपल्या कार्यात सुयश लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

आपले

म. वा. सरदेशपांडे
अध्यक्ष, ओंकार न्यास

भा.वा. सातवळेकर
उपाध्यक्ष, ओंकार न्यास

दिनांक :- १४ एप्रिल २०११

॥ श्री ॥ शुक्र. २५/०४/२०११

............आपण पाठविलेल्या अंकातील लेखांची वर वर टाळाढाणी केली. त्यावरुन झालेले मत असे
१) अंकाची छपाई व एकंदर रचना अति उत्तम आहे
२) सर्व लेखक उच्च शिक्षण विभूषित व ~~[illegible]~~ अध्यात्मातील जाणकार व्यक्ती आहेत.
३) विषय "आधुनिक महिपती श्रीदासगणु महाराज" हा एकच असला तरी ~~प्रत्येक~~ लेखकांचे विवेचन विविध प्रकारचे आहे. तोच तोच पणा नाही.
४) या पूर्वीच्या विशेषांकाप्रमाणेच हा अंकही संग्रही ठेऊन अधून मधून वाचनीय आहे.

या सर्व परिश्रमामागे असलेल्या सर्व व्यक्तींना मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. →

......आपल्या सर्वांच्या परिश्रमामुळे "ओंकार ट्रस्टची व त्यांनी स्वीकारलेल्या कार्याची भरभराट होवो व गरजू जनतेची सेवा होवो ही सदिच्छा!

आपला स्नेहांकित,
दिगंबर माधव पांडितराव.



॥ श्रीरोल ॥ नों.क्र.अे-२०६४

श्रीमद् सद्गुरु श्रीदासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे.

ता.उमरी जि.नांदेड.(मराठवाडा) [illegible]

दासगणु

अध्यक्ष	सचिव/विश्वस्त	विश्वस्त
महेश अनंत आठवले	विनायक प्रभाकर [illegible]	[illegible]विंदराव मुक्काधार

विश्वस्त: मारुती नरहरी जवळेकर * विश्वस्त: [illegible]

* सहसचिव: कु. मार्गी (वसुमती) [illegible]

०२४६८०१२०२५१४ – ९८९२१९०१०९८

जा.क्र.

दि.
[illegible] २०-११

[illegible] नमस्कार.

कल्याणी आश्रिताच्या दासगणु [illegible] [illegible] समारंभा करिता तुम्ही सर्वांनी [illegible]पूर्वक [illegible] कार्यक्रमसूच [illegible] असतो. [illegible] व उपस्थित राहता आले नाही [illegible] झालो.
श्रीदासगणु विशेषांकही [illegible] झाला आहे.
....

[illegible]
[illegible]
[illegible]

जय जय रघुवीर समर्थ



दासबोध अभ्यास मंडळ, मिरज.

(संलग्न - श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड)

द्वारा - शाम रघुनाथ साखरे

'सुमन निवास', खणीवरील विठ्ठल मंदिर, ब्राह्मणपुरी, मिरज फोन : (०२३३) २२२३८४३ मो. ९८५०३८०५३८

शाम रघुनाथ साखरे
अध्यक्ष
संपर्क ०२३३ २२२३८४३
मोबाईल ९८५०३८०५३८

रामचंद्र यशवंत कांबळे
उपाध्यक्ष
मोबाईल ९२२६०७३२७०

सौ. मेघा अविनाश भिडे
कार्यवाह
संपर्क ०२३३ २२२४९७४
मोबाईल ९३७३७५८०००

॥ श्री ॥ २३-४-२०११

स.न.वि.वि.

............मुखपृष्ठ, आतील ....पानावरील दासगणु महाराजांचा फोटो व अन्य फोटो फारच आकर्षक आहेत.
सुशिक्षित, सुसंस्कृत, आणि अभ्यासू व विचारवंत अशा लेखकांचे लेखन एकापेक्षा एक असे सरस आहेत ....

आपला
[illegible]

वाचकांच्या प्रतिक्रिया

टीप – जागेअभावी वाचकांकडून आलेल्या पत्रातील आवश्यक तेवढाच मजकूर प्रसिद्ध केला आहे.

वाचकांच्या प्रतिक्रिया

॥ श्रीशंकर ॥

श्रीराधादामोदर प्रतिष्ठान

[नोंदणी क्र. : इ. ७९६, पुणे]

'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणे ४११ ०३०.

दूरध्वनी : (०२०) २४४९ २४९७

संदर्भ पत्र क्र. : दिनांक : ८/९ मे २०११

आदरणीया संपादिका

'कल्याणी' — संत दासगणू महाराज- विशेषांक

तथा- ओंकार ट्रस्टचे सर्व पदाधिकारी यांना-

सविनय सादर वंदन.

'कल्याणी' चा संतकवी श्री दासगणू महाराजांचा विशेषांक आपण प्रकाशित केलात याचा खूप खूप आनंद वाटला आणि आता स्वस्थतेने तो अवलोकन करून त्यासंबंधीची कृतज्ञता या पत्राने मी सर्व दासगणू परिवाराचा प्रतिनिधी म्हणून व्यक्त करीत आहे.

संतकवींचा जीवनपरिचय, वाङ्मयपरिचय आणि वाङ्मयाधारे त्यांचे सामाजिक-धार्मिक कार्य आपण पुन्हा एकदा समाजापुढे साकारलेत या बद्दल समाधान आहे. अनेक नवीन मंडळींचा संपर्क त्यामुळे घडला! यासर्वांमुळे अंक देखणा झाला आहे. ....

.............सौ. शैलाताईंची प्राथमिकी चंदना सुंदर आहे. 'असे घडविले' या लेखात मर्म श्लोकव्याख्यान आहे. सौ. नवाथे यांचा 'संगीतात्मकता' नरसा लेख ही अंकाची यावेळची विशेषता म्हणावी लागेल कारण मागे निघालेल्या अंकात या अंगाने विचार झालेला नव्हता. शंकराचार्यांच्यावरील उत्तम साधला आहे. त्या सिद्ध हस्तलेखिका आहेत यात शंका नाही. या निमित्ताने डॉ. सुकुंदवाटर, अद्भुतमती कुमारजे, शैला पटवर्धन आणि अन्य काही नव्या लेखकांनी भर घातली आपले स्वागत ते लेखनही मार्मिक आहे ....

.... एकूणच अंक छान झालाय आणि प्रकाशन समारंभही! श्री व सौ शिवदे यांच्या अथक परिश्रमांचा उल्लेख करणे नितांत आवश्यक आहे. ट्रस्टच्या सर्व कार्यकर्त्यांचे सहकार्य उत्तम होते. संदर्भग्रंथ म्हणूनही या अंकाचा उपयोग होईल यात शंका नाही. ....

आपला

ग. प्र. परांजपे

(डॉ. ग. प्र. परांजपे)

अध्यक्ष.

म.अ.कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद

■ भाग्यश्री को.ऑ.हौसींग सोसायटी लि., डी.१, २६२, ताराबाई पार्क, कोल्हापूर -३, फोन : २६५२०२५

■ सर्व्हे नं.१०१ / अ, महाडकर रेसिडेन्सी, बी-६, फ्लॅट नं.२०३, पौंड रस्ता, कोथरूड, पुणे-२९. फोन : २५२८३५४२

॥ श्रीस्वामी समर्थ ॥

कोल्हापूर

दिनांक २०/४/०११

......हा अंकही प्रतिवर्षाप्रमाणे सर्वांग-सुंदर झाला आहे. आपल्या संपादक मंडळाचे हार्दिक अभिनंदन! कळावे, लोभ असावा

आपला

स्वामी प्रज्ञानंद

ओंकार ट्रस्ट तर्फे प्रकाशित करण्यात आलेले कल्याणी विशेषांक

सन	विषय
१९९२	गुरुपौर्णिमा
१९९३	दासनवमी
१९९४	स्वामी विवेकानंद
१९९५	श्रीज्ञानेश्वर महाराज
१९९६	संत तुकाराम महाराज
१९९७	संत एकनाथ महाराज
१९९८	संत नामदेव महाराज
१९९९	श्रीगोंदवलेकर महाराज
२०००	श्री स्वामीस्वरूपानंद (पावस)
२००१	परमार्थपाणिनी श्री गुरुदेव रानडे
२००२	मधुराद्वैताचार्य श्री ज्ञानेश्वर कन्या श्री गुलाबराव महाराज
२००३	ब्रह्मीभूत परमहंस परिव्राजतकाचार्य स्वामी प्रज्ञानंद सरस्वती
२००४	परमहंस परिव्राजतकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज
२००५	परमपूज्य श्रीमंत बाबामहाराज आर्वीकर
२००६	परमहंस परिव्राजतकाचार्य श्री सद्गुरू भगवान श्रीधर स्वामी महाराज
२००७	परमपूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद
२००८	श्री समर्थ रामदास स्वामी
२००९	भगवन् पूज्यपाद जगद्गुरू आद्य शंकराचार्य
२०१०	भगवान श्रीरामकृष्ण परमहंस
२०११	आधुनिक महिपती श्री दासगणुमहाराज

वसुंधरा कृतज्ञता पुरस्काराचे मानकरी

सन	नाव		कार्य
१९९७	डॉ. स्वर्णलता चंद्रशेखर भिशीकर	–	पंजाबमध्ये दहशती परिस्थितीत सामंजस्याची वातावरण निर्मिती.
१९९८	प्रा. डॉ. अशोक प्रभाकर कामत	–	नामदेव अध्यासन (पुणे विद्यापीठ) द्वारे समाज प्रबोधन.
१९९९	श्री. सुनील गोपाळ चिंचोलकर	–	प्रवचन व व्याख्यानाद्वारे श्रीसमर्थ शिकवणीतून समाज प्रबोधन.
२०००	सौ. सिंधुताई श्रीहरी सपकाळ	–	अनाथ आश्रम- बालसंगोपन.
२००१	श्री. द्वा. वा. केळकर	–	पत्रद्वारा दासबोध अभ्यासक्रमाचे प्रवर्तक.
२००२	डॉ. सुनीलकुमार लवटे	–	अनाथ आश्रम मुलांचे संगोपन व शिक्षण.
२००३	डॉ. पारस कपूरचंद शहा	–	मोफत नेत्र चिकित्सा शिबिराद्वारे रुग्णसेवा.
२००४	श्री. श्रीकांत मुंदडा	–	हृदयमैत्री चळवळ.
२००५	श्री. गिरीष यशवंत प्रभुणे	–	भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानद्वारे लोकसेवा.
२००६	मानव्य संस्था (संस्थापक – कै. विजयाताई लवाटे)	–	एच्.आय्.व्ही. पिडीत मुलांसाठी कार्य.
२००७	श्री. राजा दांडेकर व रेणू दांडेकर	–	दुर्बल घटकाच्या उन्नतीसाठी शाळा व इतर उपक्रम.
२००८	श्री. विजय व सौ. साधनाताई फळणीकर	–	आपलं घर – अनाथ मुलांचे घर व वृद्धाश्रम
२००९	सौ. माधुरी प्रमोद अभ्यंकर (संचालिका- श्रीवत्स, सोफोश, पुणे.)	–	कुमारी माता व अनाथ मुलांचे पुनर्वसन.
२०१०	सौ. मृणालिनी भाटवडेकर	–	सावली सेवा ट्रस्ट, रेड लाईट एरियातील मुलांचे पुनर्वसनासाठी कार्य.
२०११	श्री. दिलीप कुलकर्णी	–	पर्यावरणासाठी कार्य.

अंतरंग

अंतरंग

संत बहिणाबाई

संत वेणास्वामी



आदिशक्ति मुक्ताई



आदिशक्ति मुक्ताई–दर्शन

शब्दांकन – सौ. शैला सुहास पटवर्धन

एम्.ए.बी.एड्.
आदर्श शिक्षक पुरस्कार, आंतर शालेय सांस्कृतिक-लेखन-पुरस्कार,
श्यामरंग – भक्तिगीतांची ध्वनिफीत (इ.स. २००४),
सेवानिवृत्तीनंतर पुण्यात कृष्णजन्माष्टमीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण.

वंदन ॐकारा वंदन श्रीकारा
द्यावे कृपादान संतवंदनार्थ
झरो शब्दधारा पूर्ण अभिषेक-
मानसपूजन माऊलीचे ।।

संत पंचकन्या दैवत स्त्रियांना –
गुणगानी त्यांच्या स्मृति-श्रुती ।।

मुक्ताई–माऊली वंद्य आदिशक्ती
बंधु-त्रिदेवांची सावली ती ।।

एकमेकां व्हावे गुरुस्थानी ऐसे
चार वेदांसम श्रेष्ठ चौघे ।।

'विठ्ठल-रुक्मिणी' मायतात दोन्ही
पुण्यशील परि एक उणे
संसारी-संन्यासी-पुनश्च संसारी
धर्म-रूढीबाह्य गोष्ट झाली ।।

विठ्ठलपंत-रुक्मिणी ब्राह्मणाचे बळी
त्रिवेणीसंगमी देह त्यागिला
अनाथ म्हणावे कैसे दैवीअंशा?
देव नित्य पाठी सत्याच्याच ।।

तिन्ही भाऊ झाले अकालीच प्रौढ
लहानगी मुक्ता पोक्त झाली
गोड तांबूस ते इवलाले हात
रांधिती, करीती झाडलोट ।।

आईची प्रतिमा भासे मूर्तिमंत
प्रेमा मुक्ताईचा अपरंपार
सर्व स्त्रीमनांची बेरीज मुक्ताई
भव्य साक्षात्कारी सृजनाची ।।

नवी क्रांतितीर्थे वृत्ति अध्यात्मिक
[illegible] [illegible] जीवनसंघर्ष
[illegible] [illegible] उपजत जाण
[illegible] सहज शक्य ।।

[illegible] 'ज्ञानाचा-सत्संग'
[illegible]-सत्यान्वेषी ।
[illegible] [illegible]तिबाह्य – वैर
अन्न-पाणी-[illegible] [illegible]
अव्हेर अपमा[illegible] [illegible]
ज्ञानदेवा – ऐस [illegible]
लावुनिया ताटी । [illegible]
मुक्ताई समजूत [illegible]

योगी पावन मनाचा साही अपराध जनाचा
विश्व रागे झाले वह्नि संत मुखे व्हावे पाणी
शब्दशस्त्रे झाले क्लेश संती मानावा उपदेश
विश्वपट ब्रह्म दोरा ताटी उघडा ज्ञानेश्वरा
चिंता क्रोध मागे सारा ताटी उघडा ज्ञानेश्वरा

विसोबा चाटी । मांडा-[illegible]
फजिती मुक्तेची । पाहे [illegible]
योग श्रेष्ठ ज्ञाना । पा[illegible]
मांडे अरुवार । मु[illegible]
सुग्रास भोजन । वि[illegible]
जाहला शरणाग[illegible]
झाले आत्मज्ञान [illegible]
हाच पुढे झाला [illegible]

नामदेवाचा 'अहं' [illegible]
सणकांडी मु[illegible]

औंढ्या नागनाथी । विसोबा खेचर ।
घाली ज्ञानांजना – नामदेवासी ।।

चांगा वटेश्वर चौदा शते कोरा
मुक्ताई गुरुमंत्रे उद्धरला
चांगदेव निमित्त! पुत्र जो मानिला
आनंदाचे लेणे लेववी ल्याली ।।

मुक्ताई चांगया गातसे अंगाई
अध्यात्माची उच्च पायरी ती
चांगा मुक्ताई – अद्‌भुत संवाद
कूट प्रश्नोत्तरे सीमा नाही ।।

चौदाशेचा पुत्र माय बारा वर्षे
ऐसे गुरुशिष्य पूर्वी ना पुढती ।।

मुक्ताई भावंडासमवेत नित्य
तीर्थाटन तीसही घडले जेव्हा
तापीतटी केले कार्य ते महान
'वैष्णव नि शैव ऐक्य' केले
मुक्ताई उत्तमा 'कीर्तन' 'निरूपणी'
गोदावरी– प्रवरा – साक्षी इंद्रायणी ।।

'आदि – मध्य – उर्ध्व हरी एक हरी '
भूवैकुंठ क्षेत्र भीवरेचे तीरी ।।:

हरिनामाचा छंद तोडी भवबंध
ज्ञेय–ज्ञाता–ज्ञान तोची विश्वंभर
नामस्मरण जोडी सर्वाभूती क्षमा
नामतेज खंडी दुराग्रहतमा ।।

'रामकृष्णहरी' मंत्र हा सौख्याचा
संगरी–संकटी आत्मबल ।।

मुक्ता–जनी संवाद । भक्ति प्रीती संग ।
पांडुरंगी दंग । संत मेळा –
नामा ज्ञाना ऐक्य । भक्तिरंग चढे ।
वैष्णवांची ध्वजा । वारकरी पंथ ।।

निवृत्तीने दिली शक्ति । चित्त पावले विश्रांति ।
विसाविया आले मन । मन जाहले उन्मन ।
धन्य जीविताची थोरी । एक विश्व चराचरी ।
भास मावळला ठायी । सुखी झाली मुक्ताबाई ।।

जीवन उभारी आपणा इतरा
नि:संग निर्द्वंद्व निर्भय वृत्ती

सत्य सत्त्व शील आभूषणे हीच
सूर्यमालिकेत हीच तारा ।।

'मोगरा फुलला' 'मोगरा फुलला'–
फुलांचा सुगंध गगनावेरी गेला ।।

'ज्ञानदेव'–'सोपाना' झाले समाधिस्थ
निवृत्तिश्री 'आज्ञा मुक्ताई मागे'

निवृत्तिने एकान्त केला मुक्ताईसी–
गमन कोणे एके दिवशी आरंभिले –
वद्य वैशाख मासी दशमीचे दिवशी –
गेले ते स्नानासी तापीतीरी ।।

झुंझाट सुटला वारा कापू लागे –
नभचि अंतरा कालावले –
कडाडली वीज निरंजनी जेव्हा
मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।।

वैकुंठी लक्षघंटा वाजती एक घाई ।
झाली मुक्ताबाई स्वरूपाकारा ।।

नामा म्हणे देवा उठवा ऋषिश्वरा ।
निवृत्तीचे करा समाधान ।

सूर्यचंद्र नभी आहे तोवरी
कीर्ती–भक्ति गजर त्रिभुवनी
वंदन त्रिवार आदिशक्ति तुज,
त्रैलोक्य स्त्रीशक्ति मुक्ताई तू ।।

।। ॐ तत् सत् । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

शब्दांकन – सौ. शैला सुहास पटवर्धन

आधारभूत ग्रंथ : १) नामदेव गाथा – सरकारी प्रकाशन
२) संत ज्ञानेश्वराची प्रभावल – श्री.ल.रा. पांगरकर

(बोल्ड अक्षरातील रचना संत मुक्ताबाई यांच्या आहेत)

***



सणकांडी मुक्ताई

सौ. प्रज्ञा विद्याधर कुलकर्णी

बी.ए., पूर्णवेळ लेखिका
श्री राघवेंद्रस्वामी आणि कोल्हापूरची महालक्ष्मी यांची नित्यपठणाची पोथी प्रसिद्ध. सार्थ चांगदेव-पासष्टी, अमृत-अष्टक आणि ज्ञानदेवांचे सार्थ-अभंग ही तीन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर. संत वाङ्मय आणि अध्यात्म हे अखंड चिंतनाचे विषय. कविता आणि ललित लेखन हे रविवार आवृत्त्यांमधून, मासिकांमधून आणि दिवाळी अंकांमधून वेळोवेळी प्रसिद्ध. बागकामाची आवड, संतसहवासाची विलक्षण ओढ.

आपल्या भारतीय वैदिक संस्कृतीत स्त्री ही देवतास्वरूप मानली जाते. देवी स्वरूपात तिचे पूजन केले जाते. आदिमाता, दुर्गामाता, महिषासुरमर्दिनी, महाकाली, महालक्ष्मी, पार्वती, महासरस्वती, महादेवी अशी या स्त्रीदेवतांची अनेक रूपे आणि अनेक नावे आहेत. स्त्री ही सृजनाची शक्ती आहे. सर्व विश्वाची जननी आहे. ती पूजनीय आणि प्रार्थनीय आहे. आपल्या प्राचीन पुरणकाळातील अहल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी या देवतास्वरूप स्त्रिया प्रात:स्मरणीय मानल्या जातात. त्याचप्रमाणे अलिकडच्या कालखंडातील म्हणजे सतराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील पाच संतस्वरूप स्त्रियादेखील वंदनीय आहेत. या पाच संतस्त्रिया आहेत, महानुभाव पंथातील चक्रधर स्वामींची शिष्या महादाइसा, संत निवृत्तीनाथांची धाकटी बहीण मुक्ताबाई, संत नामदेवांची दासी जनाबाई, संत तुकारामांची शिष्या बहिणाबाई आणि समर्थ रामदासस्वामींची शिष्या वेणाबाई. या पाच स्त्रियाही परमार्थ मार्गातील संतपदाला पोहोचलेल्या तितक्याच आदरणीय आणि वंदनीय अशा स्त्रिया आहेत. या स्त्री संतमालिकेत संत मुक्ताबाई मात्र सर्वश्रेष्ठ आणि अग्रणी आहे. मुक्ताई ही साक्षात आदिमायेचेच प्रगट रूप होती.

१२७७ ते १२९८ या कालखंडातील मुक्ताईचे एकूण आयुष्य अवघे १६-१७ वर्षांचेच होते. परंतु एवढ्या अल्प आयुष्यातही तिने ज्ञान प्राप्त करून घेतले आणि ती संतपदावर आरूढ झाली. इतक्या लहानवयातही तिची प्रतिभा आणि परमार्थमार्गातील तिने मिळविलेले ज्ञान आणि उच्चपद हे स्तिमित करणारे आहे. मुक्ताबाई ही निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान या अलौकिक संतत्रिमूर्तींची तशीच अद्वितीय धाकटी बहीण. भावंडांमध्ये सर्वात लहान. या भावंडांच्या आई-वडिलांनी म्हणजे विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांनी देहत्याग केला तेव्हा मुक्ताई अवघी तीन-चार वर्षांची होती. विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांच्या पोटी या चार अवतारी मुलांचा जन्म झाला, ती कथा देखील विलक्षणच आहे. वडील विठ्ठलपंत कुलकर्णी हे सद्गुरू गहिनीनाथांच्या कृपाप्रसादाचे फळ होते. गहिनाथांच्या आशीर्वादानेच विठ्ठलपंतांचा जन्म झाला होता. विठ्ठलपंत उपजतच कुशाग्रबुद्धीचे होते. लहानवयात पैठणला गुरुगृही राहून त्यांनी वेदउपनिषदे, ब्रह्मसूत्रे यांचा अभ्यास केला होता. वेदविद्येत पारंगत होऊन शिक्षण पूर्ण झाल्यावर ते तीर्थाटनास निघाले असता वाटेत आळंदीच्या सिद्धोपंत कुलकर्णी यांच्या घरी त्यांचा मुक्काम होता. सिद्धोपंतांना हा ज्ञानी, तेजस्वी मुलगा आपला जावई व्हावा असे वाटले. त्याप्रमाणे सिद्धोपंतांनी आपली सुलक्षणी आणि सुस्वरूप मुलगी रुक्मिणी हिच्याशी विवाह करण्याची विठ्ठलपंतांना विनंती केली. साक्षात् पांडुरंगानेच सिद्धोपंतांना दृष्टांत देऊन रुक्मिणीचा विठ्ठलपंतांशी विवाह करण्याची आज्ञा केली होती. सिद्धोपंतांनी हा स्वप्नदृष्टांत विठ्ठलपंतांना कथन केला.

विठ्ठलपंत हे मुळातच वैराग्यवृत्तीचे होते. विवाह करून प्रपंच थाटण्याचे विचारही त्यांच्या मनात कधी येत नसत. त्यांना केवळ परमार्थाचीच ओढ होती. सिद्धोपंतांची विनंती ऐकून ते नम्रपणे एव्हढेच म्हणाले की, मलाही पांडुरंगाने आज्ञा केली तरच मी विवाह करेन आणि आश्चर्य म्हणजे विठ्ठलपंतांनाही पांडुरंगाने दर्शन देऊन रुक्मिणीशी विवाह कर अशी आज्ञा केली. आणि सांगितले की, 'विठ्ठला तुझ्या पोटी साक्षात ब्रह्मा, विष्णू, महेश आणि आदिमाया यांचा जन्म होणार आहे. तुझ्या मुलांच्या हातून मोठे कार्य होणार आहे. त्यासाठी तुला लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारला पाहिजे.' पांडुरंगाची ही आज्ञा मान्य करून विठ्ठलपंतांनी सिद्धोपंताच्या मुलीशी, म्हणजेच रुक्मिणीशी विवाह केला. परंतु मुळातच विरागी वृत्तीच्या विठ्ठलपंतांचे मन संसारात रमेना. शिवाय मूलबाळही लवकर होईना. त्यामुळे दिवसेंदिवस विठ्ठलपंतांची वैराग्यवृत्ती वाढतच गेली आणि एक दिवस रुक्मिणीच्या नकळत ते काशीस निघून गेले. आपले गुरू श्री श्रीपादस्वामी यांचेकडून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली आणि चैतन्यानंद हे नाव धारण केले. परंतु कालांतराने विठ्ठलपंतानी विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकारला होता हे उघडकीस येऊन गुरूंच्या ते लक्षात आले. तेव्हा गुरूंनी विठ्ठलपंतांना पुन्हा संन्यासाश्रम सोडून गृहस्थाश्रमात जाण्याची आज्ञा केली. सिद्धोपंत आणि रुक्मिणीची भेट विठ्ठलपंतांशी घडवून पुनश्च संसार करण्यास सांगितले. गुर्वाज्ञा विठ्ठलपंतांना मान्य करावीच लागली आणि पुन्हा ते गृहस्थाश्रमात आले. रुक्मिणीसह आळंदीत संसार मांडला आणि लवकरच त्यांना पाठोपाठ चार अपत्ये झाली. ही सारी कथाच विलक्षण

आहे. त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई अशी चार अपत्ये झाली, परंतु आळंदीतील ब्रह्मवृंदाने या कुटुंबाला वाळीत टाकले. एकदा संन्यासाश्रम घेऊन पुन्हा गृहस्थाश्रमात येऊन प्रपंच करणे, अपत्यांना जन्म देणे हे धर्माच्या आणि शास्त्राच्या विरुद्ध आहे, हा गुन्हा आहे असे आळंदीतल्या पंडितांनी ठरवून विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्यावर धर्मभ्रष्ट आणि आश्रमभ्रष्ट असा आरोप केला. संपूर्ण कुटुंबावर बहिष्कार टाकला. आपल्या मुलांच्या मुंजी व्हाव्यात अशी विठ्ठलपंतांची इच्छा होती. मुंजी होऊन निदान मुलांना तरी ब्राह्मणत्व द्यावे अशी त्यांनी विनंती केली. त्यासाठी प्रायश्चित घेण्यासही ते तयार झाले. तेव्हा आळंदीतल्या शास्त्री-पंडितांनी विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांना देहान्ताचे प्रायश्चित घेण्यास सांगितले. विठ्ठलपंतानी ते मान्य केले आणि पत्नीसह प्रयाग इथे जाऊन जलसमाधी घेतली. त्यावेळी सर्वात मोठा निवृत्ती ११ वर्षांचा तर लहानगी मुक्ताई केवळ ४/५ वर्षांची होती. आईवडिलांनी घेतलेल्या जलसमाधीने ही चारही लहान भावंडे पोरकी, अनाथ झाली. त्यांना कुणीही जवळ केले नाही आणि इथूनच त्यांच्या विलक्षण अशा जीवनप्रवासाला सुरुवात झाली.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई या चारही भावंडांचा जन्म हा अवतारी होता. तिघे भाऊ हे साक्षात ब्रह्मा-विष्णू-महेशाचे तर मुक्ताबाई ही आदिमायेचा अवतार होते असे चरित्रकार नामदेवांनी म्हटले आहे. आयुष्यभर ही भावंडे सतत एकत्र राहिली. अगदी लहानवयातच निवृत्तीला गहिनीनाथांचा अनुग्रह मिळून नाथपंथाची दीक्षा मिळाली होती. पुढे निवृत्तिनाथांनी ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताईला मंत्रोपदेश दिला आणि ते नाथपंथी झाले. लहानपणापासूनच बहिष्कृत-जीवन त्यांच्या वाट्याला आले. अनेकदा लोकांकडून अपमानित व्हावे लागले. कोवळ्या वयातच त्यांना प्रौढपण आले. आईवडिलांच्या माघारी ही पोरकी झालेली भावंडे सतत एकमेकांना सांभाळून राहिली. मुक्ताई तर त्यावेळी अवघी पाचेक वर्षांची होती. नकळत्या वयातील तिच्या मनातल्या अव्यक्त भावभावना नामदेवांनी तिच्या 'समाधी' प्रकरणात व्यक्त केल्या त्या अशा,

तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा ।
निवृत्ती ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न । संभाळी सोपान मजलागी ।।

लहानग्या मुक्ताईच्या या भावना मन हेलावून टाकणाऱ्या आहेत. आईवडिलांच्या प्रेमाला पारखी झालेली मुक्ताई म्हणते, निवृत्ती आणि ज्ञानेश्वर भिक्षा मागून आमचा निर्वाह चालवत आहेत. मी सर्वात लहान म्हणून माझे तिन्ही भाऊ माझे कोडकौतुक करतात, आईवडिलांची उणीव भासू देत नाहीत आणि सोपान माझी काळजी घेतो, मला सांभाळतो. कोवळ्या वयातच परिस्थितीने तिला समंजस आणि समजूतदार बनवले आहे. घरात ती एकटीच मुलगी त्यामुळे तिच्या स्त्रीसुलभ भावना व्यक्त करण्यासाठी आई नाही की शेजारपाजारही नाही आणि कुणी सखीही नाही. अशावेळी ती कधीकधी एकाकी एकटी पडली असेल. परंतु बालपण संपतासंपताच निवृत्तिनाथांनी तिला दिलेल्या 'उपदेशा'ने मात्र तिचे एकाकीपण संपले आणि तिच्यासमोर ज्ञानसाधनेचा मार्ग खुला झाला. निवृत्तीने तिला ज्ञान दिले आणि मुक्ताईने आपले मन आत्मज्ञानात बुडवून टाकले. तिला जबाबदारीची जाणीव झाली. घरातली एकटीच मुलगी म्हणून तिला एका कर्तेपणाची आणि अधिकारी स्त्रीची जाणीव आली. घरातली कामे, स्वयंपाकपाणी ती सहजतेने करू लागली. आपले आणि आपल्या भावांचे जीवन जगावेगळे आहे ते सर्वसामान्यांसारखे नाही हे तिला कळाले होते. आपले तीनही भाऊ हे ज्ञानी, परमार्थी वृत्तीचे आणि अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे आहेत हे तिला माहीत होते. आणि स्वत: आपण कोण आहोत याचे आत्मभानही तिला प्राप्त झाले होते. लहान वयातील या जाणीवेनेच मुक्ताईचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी आणि धारदार झाले होते. तिचा स्वभाव संवेदनक्षम आणि तितकाच परखड झाला. याला तिच्या आजूबाजूची काळाची परिस्थितीच कारणीभूत होती.

वयाने लहान असली तरी मुक्ताई ही निवृत्ती आणि ज्ञानदेवांसारख्या वैराग्यशील आणि अधिकार संपन्न भावडांची बहीण शोभावी अशीच तिची आध्यात्मिक क्षेत्रातील योग्यता होती. चांगदेवासारखा परमार्थात पराकोटीची साधना करून अत्युच्च पदावर आरूढ झालेल्या पुरुषालाही मुक्ताईसमोर नतमस्तक व्हावे लागले यावरून मुक्ताईचा अधिकार काय होता याची प्रचीती येते. निवृत्तीनाथ आणि ज्ञानदेवांचा प्रभाव तिच्यावर होता. त्यांच्या रूपाने आध्यात्मच तिच्या अवतीभोवती वावरत होते. असामान्य बुद्धिमत्ता आणि अलौकिक प्रतिभा लाभलेल्या भावडांच्या सहवासात तिचे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले होते. आणि निवृत्तिनाथांनी तिला दिलेल्या अनुग्रहाने आणि उपदेशाने तर तिचे चिमुकले आयुष्य ज्ञानभारले झाले होते. आत्मज्ञानाची प्राप्ती झालेली लहानशी मुक्ताई जणू लखलखणाऱ्या सौदामिनीप्रमाणे होती. तेजस्वी, तळपणारी आणि प्रसंगी कडाडणारी जणूकाही वीजच होती. संत नामदेवांनी मुक्ताईच्या अशा या व्यक्तिमत्त्वाचे आणि स्वभावाचे वर्णन करताना म्हटले आहे,

लहानशी मुक्ताई जैसी सणकांडी । केले देशोधडी महान संत ।।
सगळेंची काखेसी घेई ब्रह्मांड । नामा म्हणे पाखांड दिसते मज ।।

संत नामदेव, चांगदेव, विसोबा खेचर अशा महान संतांचा देखील मुक्ताईने आपल्या अधिकाराने आणि परखड वाणीने त्यांच्या ठिकाणी असलेला अहंकार दूर केला. पंढरपूरात जेव्हा या चार भावंडांची नामदेवाशी भेट झाली तेव्हा या तीनही भावंडांनी नामदेवाला प्रदक्षिणा घालून नमस्कार केला होता. कारण प्रत्यक्ष पांडुरंगाला ज्याने घास भरवला तो किती श्रेष्ठ असेल याची कल्पना त्यांना होती. परंतु अशा थोर संतांनी आपल्याला नमस्कार करावा म्हणजे आपण खूपच श्रेष्ठ आहोत ही अहंकाराची भावना नामदेवाला झाली आणि त्या अहंकारातूनच त्याने उलट तिघा भावांना नमस्कार केला नाही हे मुक्ताईने जाणले. नामदेवाचे हे अहंकारी, उद्धट वागणे मुक्ताईला आवडले नाही. निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव हे नामदेवापेक्षाही [illegible] हे तिला माहीत होते. आपल्या [illegible] केला असे वाटून मुक्ताई कठोर [illegible]

अखंड ज्याला देवाचा शेजार । [illegible] ?
मान-अपमान वाढविसी हेवा । दिवस [illegible] हानी घेसी ?

मुक्ताईचे हे परखड बोलणे ऐकून निवृत्तिनाथांनी तिला नामदेवाची क्षमा मागण्यास सांगितले. परंतु मुक्ताईने ठामपणे नाही म्हणून सांगितले. नामदेवाने गुरूपदेश घेतल्याशिवाय आणि त्याची परीक्षा घेतल्याशिवाय त्याचे गर्वहरण होणार नाही असे ठणकावून सांगितले. मुक्ताईचा हा स्वाभिमान आणि आत्मविश्वास अद्वितीय होता. मुक्ताईने नामदेवाचा अहंकार दूर केला. त्याचे गर्वहरण केले आणि त्याला विसोबा खेचराकडून उपदेश घ्यायला लावले. नामदेवाप्रमाणेच मुक्ताईने चांगदेवा सारख्या योगीपुरुषाचेही गर्वहरण करून आपले शिष्यत्व पत्कारायला लावले. यावरून मुक्ताईची आध्यात्मिक उंची, तिचा अधिकार किती श्रेष्ठ होता हे दिसून येते. नामदेवाला आपल्या भक्तीचा अहंकार होता तर योगी चांगदेवाला प्राप्त झालेल्या सिद्धींचा अहंकार होता. निवृत्तीनाथ आणि ज्ञानदेवादी भावंडांची कीर्ती आणि त्यांनी केलेल्या चमत्कारांच्या कथा चांगदेवांपर्यंत पोहोचल्या होत्या. चांगदेवांना या भावंडांना पाहण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे चांगदेवानी ज्ञानदेवांना पत्र लिहिण्याचे ठरविले. परंतु ज्ञानदेव तर त्यांच्यापेक्षा वयाने लहान, त्यांना काय संबोधावे, मायना काय लिहावा असा प्रश्न चांगदेवांना पडला. शेवटी चांगदेवांनी आपल्या सेवककाकरवी कोराच कागद पाठवून दिला. तो कोरा कागद पाहून मुक्ताई हसली आणि म्हणाली, ''चांगदेव अजून कोराच राहिला!' चांगदेव वाघावर बसून, सर्पाचा चाबूक हातात घेऊन ज्ञानदेवांना भेटण्यास येतात तेव्हा सकाळच्या कोवळ्या उन्हात ही भावंडे भिंतीवर ऊन खात बसलेली असतात. चांगदेव आपल्या सिद्धींचे प्रदर्शन करीत येत असलेले पाहून त्यांचे स्वागत करण्यासाठी, त्यांना सामोरे जाण्यासाठी ज्ञानेश्वर त्या भिंतीलाच चालवत चांगदेवाला सामोरे जातात. ज्ञानेश्वरांचा निर्जीव सृष्टीवरही असलेला तो अधिकार पाहून चांगदेव वाघावरून खाली उतरतात आणि नतमस्तक होतात.

तेव्हा मुक्ताई म्हणते,

चौदाशे वरुषे शरीर केले जतन । बोधावीण क्षीण वाढवीला ।।
नाही गुरुमंत्र नाही उपदेश । परमार्थाशी दोष लावियेला ।।

योगबळावर चौदाशे वर्षांचे आयुष्य मिळविलेल्या चांगदेवाचे कोरेपण मुक्ताई ओळखते. 'हटयोगाच्या बळावर अनेक सिद्धी प्राप्त करून घेतल्या, परंतु चांगदेवा तुला आत्मज्ञान मात्र नाही झाले रे! तू कोराच राहिलास तेव्हा कशाला त्या सिद्धींचा अहंकार बाळगतोस? तुझी तपश्चर्या फोल आहे' मुक्ताईचे हे बोलणे ऐकून चांगदेवाचे डोळे उघडतात आणि ते मुक्ताईला शरण येऊन तिचे शिष्यत्व पत्करतात. चांगदेव म्हणतात,

वटेश्वर चांगामुळी लागला । पोसणा घेतला मुक्ताईने ।।
मुक्ताबाई करे लेईले अंजन । चांगया निधान उपदेशिले ।।

मुक्ताई आणि चांगदेव ही गुरु-शिष्य जोडी जगावेगळी आणि अद्‌भुत होती. अनेक वर्षे तपस्या केलेला सिद्ध-योगी चांगदेव आणि १५/१६ वर्षांची लहानशी मुक्ताई या गुरु-शिष्य जोडीचा हा संवाद म्हणजे अध्यात्मशास्त्रातला कळस आहे.

निवृत्तिनाथांनी लहानपणीच मुक्ताईला केलेल्या उपदेशाने आणि तिने स्वत: केलेल्या ज्ञानसाधनेने तिचे अवघे व्यक्तिमत्त्व झळाळून निघाले आहे. त्यातच आजूबाजूचा समाज, त्यांच्यावर झालेला अन्याय आणि त्यामुळे वाट्याला आलेले बहिष्कृतजीवन या साऱ्याचा तिच्या जडणघडणीवर परिणाम झाला. तिचे असे तेजस्वी व्यक्तिमत्त्व घडण्यास या गोष्टी पोषकच ठरल्या. त्यातून ती साक्षात आदिमायेचेच प्रगट रूप होती. तिचा जन्मही अवतारीच होता. ती जरी कठोर, कणखर, परखड आणि रोखठोक होती तशीच ती आतून मऊ मुलायम, संवेदनक्षम, हळवी आणि लडिवाळही होती. आपल्या तिन्ही भावांची ती बहीणही होती आणि प्रसंगी आईपण होती. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानदेवांना तिने केलेल्या उपदेशाचा प्रसंग होय. भिक्षा मागायला जाणाऱ्या ज्ञानदेवांच्या झोळीत जेव्हा विष्ठा टाकली जाते तेव्हा ज्ञानदेवांचा तोल सुटतो. ते विभोर होतात परंतु काहीही न बोलता खोलीत जाऊन दार लावून बसतात तेव्हा लहानगी मुक्ताई ज्ञानदेवांना समजावताना म्हणते,

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ।।
शब्दशस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।
विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

मुक्ताई रुसून बसलेल्या ज्ञानेश्वरांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन समजूत घालताना म्हणते, 'ज्ञानदेवा तू पवित्र मनाचा, शुद्ध अंत:करणाचा योगीपुरुष आहेस. आपल्यावर कितीही अन्याय झाले, आपली निर्भत्सना झाली तरीही योगीपुरुषाने ते सहन केले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आपला तोल न ढळता स्थितप्रज्ञ राहता आले पाहिजे. तू संतहृदयाचा आहेस. सारे विश्व जरी क्रोधाग्नीने आपल्याला जाळू लागले तरी तू शांत रहा, तू पाणी हो आणि हा वन्ही शांत कर. तू ज्ञानाचा सागर आहेस. कोणी काही बोलले तरी तू त्या शब्दशस्त्रांचा स्वत:ला त्रास करून घेऊ नकोस. उलटपक्षी तो उपदेशच समज. या अज्ञानी समाजाला माफ कर. तुझी शांती ढळू देऊ नकोस. रागलोभाच्या पलीकडे तू गेला आहेस हे तू जाणून घे. या मानवी विश्वातला हा अज्ञानाचा अंधकार तू दूर कर आणि संपूर्ण विश्व हे केवळ त्या एका परब्रह्माने व्यापलेले आहे हे तू सांग.' इतक्या लहान वयातला मुक्ताईचा हा समंजस, समजूतदारपणा विलक्षण आहे. यातून तिचे मातृहृदय, पोक्तपणा आणि ज्ञानसाधनेने आलेले वैचारिक गांभीर्य प्रगट होते. रोखठोक बोलणारी मुक्ताई प्रसंगी किती मृदु आणि लडिवाळ होते याचे येथे दर्शन घडते.

अत्यंत लहान वयात अशा आत्मज्ञानाचा साक्षात्कार झालेली मुक्ताई ही तेजस्विनी, लखलखत्या सौदामिनीसारखी होती आणि अनेक आघात, उपेक्षितता, अपमान झेलून सोशीक, समंजस आणि कणखर अशीही आहे. या सर्वातून तावून सुलाखून निघालेले तिचे व्यक्तिमत्त्व झळाळून उठले आहे. चारचौघींसारखे तिचे आयुष्य सुरळीत नव्हते. तरीदेखील त्यावर मात करून त्या सर्वांच्या पलीकडे ती गेली. बहिष्काराचा शाप तिच्या आयुष्याला वरदान देणाराच ठरला. या चारही भावंडांचा कल उपजतच परमार्थाकडे होता. ऐहिक सुखांचा त्यांनी कधी

विचार तर केला नाहीच परंतु त्यातील फोलपणा आणि त्यातील वैय्यर्थ मात्र समाजाला सिद्ध करून दाखविले. इतक्या लहान वयातले हे त्यांचे कर्तृत्व आणि मनाची ही अशी अवस्था प्राप्त होणे केवळ ते अवतारी सत्पुरुष होते म्हणूनच शक्य झाले. मुक्ताई तर खेळण्याबागडण्याच्या वयातली होती. परंतु परिस्थितीने तिला अकाली आलेली विरक्ती, प्रौढपण, पोक्तपण तिने सहज स्वीकारले. आपल्या स्त्रीसुलभ भावभावना, आशाआकांक्षा यांनाही तिने आपल्या मनातून हद्दपार करून टाकले आणि ती निर्विकार बनली. मुक्ताईची प्रखर ज्ञाननिष्ठा, तिला प्राप्त झालेले आत्मज्ञान, तिचे यौगिकसामर्थ्य, तिने रचलेल्या आणि स्वानुभवातून प्रगट झालेल्या तिच्या काव्यरचना, अभंग आणि त्यातून तिने प्रगट केलेले आत्मचिंतन, अध्यात्मज्ञान तिच्या सामर्थ्याची साक्ष देतात. नामदेव, चांगदेव यांच्यासारख्या श्रेष्ठ संतांचे देखील गर्वहरण करून, त्यांच्यातील ज्ञानाचा अहंकार दूर करून, त्यांना योग्य मार्ग दाखविणे आणि स्वत: गुरुमाऊलीपदावर आरूढ होऊन सर्वश्रेष्ठ स्त्री संतपद मिळविणे आणि हे सर्व कर्तृत्व केवळ अवघ्या १७ वर्षे वयाच्या हयातीत दाखविणे म्हणजे विलक्षण, अद्‌भुत आणि अलौकिकच आहे. या कार्यासाठीच तिचा अवतारी जन्म होता.

मुक्ताईच्या नावावर सर्वमान्य असे केवळ ४२ अभंग आहेत. त्यातील ज्ञानेश्वरांना उद्देशून लिहिलेले उपदेशात्मक असे 'ताटीचे अभंग', 'मुंगी उडाली आकाशी' सारखे कूट अभंग आणि चांगदेवांना उद्देशून लिहिलेले आध्यात्मिक अभंग प्रसिद्ध आहेत. मुक्ताईच्या अभंग रचनांमधून तिच्या जीवनातले तिचे दु:ख तिने कधीच उघड केले नाही. परंतु तिची वैचारिक प्रगल्भता, पारमार्थिकवृत्ती आणि आध्यात्मिकउंची यांचेच दर्शन घडते. विठ्ठलभक्तीचे तिचे अभंग तर तिला झालेल्या आत्मज्ञानाचे आणि परब्रह्म साक्षात्काराचे सर्वोत्तम अभंग आहेत. ते तिचे खरे आत्मचिंतन आहे. या अभंगांमधून मुक्ताई समस्त मानवी जीवांना मुक्तीचा मार्ग दाखविते आणि स्वत:ही विठ्ठलचरणी एकरूप होते.

वैशाख शुद्ध एकादशी, इ.स. १२९७ मधल्या ऐन वैशाखात, एदलाबादच्या तापीतीरावर भर माध्यान्ही एकाएकी झंझावात सुटला, आभाळ भरून आले. सर्व दिशा धुंद झाल्या, विजा चमकू लागल्या अणि त्या झंझावातात मुक्ताई एकाएकी दिसेनाशी झाली. विजेच्या लोळाबरोबर लुप्त झाली. आदिमाया पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात विलीन झाली. मुक्त झाली.

सौ. प्रज्ञा विद्याधर कुलकर्णी
आयएम - २१, रामदत्त, १०५, मिलापनगर, MIDC
(निवासी), डोंबिवली, (पूर्व) ४२१ २०१
फोन : (०२५१) २४३७९०० / ९९२०५१३८६६

***



योगिनी मुक्ताई

डॉ. सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी

एम्.ए., पीएच्.डी., प्रबंध विषय - मराठी संतांच्या विरहिणी व गौळणी.
पुस्तके - १) अमृताची अक्षरे, २) अमृतमंत्र, ३) पारमार्थिक शब्दकोश, ४) पंचतीर्थ (३ खंड), ५) स्तोत्रांच्या गाभाऱ्यात.
गीता, ज्ञानेश्वरी तसेच सर्वभाषिक संतवाङ्मयावर प्रवचने.

योग म्हणजे परमेश्वराशी जुळलेला संबंध. संसारबंधातून मुक्त होताच हा संबंध जुळून येतो. श्रीमुक्ताई या योगाने परिपूर्ण होत्या. त्यांनी परमेश्वराच्या अद्वय स्वरूपाचा साक्षात अनुभव घेतला होता, त्या स्वरूपाशी तादात्म्य पावल्या होत्या. आपल्या या आत्मस्थितीचे मुक्ताई वर्णन करतात,

आंतरबाह्य निके सर्व इंद्रियांचे चोज ।
निजी निजबीज एकतत्त्व।। १।।
आदि नाही अनादि नाही ।
ते रूप पाही अवीट बाईये ।।२।।
मुक्ताई संजीवन तत्त्वता निर्गुण ।
आकारसगुण प्रपंचीचा ।।३।।

अर्थ- अंत:करणात अखंड आत्मचिंतनातून श्रीहरीची अनुभूती घेतली. तसेच बाह्य जगतातील चराचरात हरीच भरला आहे, या श्रद्धेमुळे सर्व इंद्रियांनी आवडीने श्रीहरीचे निर्मळ रूप अनुभविले. आत्मतत्त्वाचे मूळ बीज असलेला एकतत्त्व श्रीहरी स्वत:तही पाहिला ।।१।। सर्व विश्वाला निर्माण करणारा परमात्मा स्वत: निर्माण झालेला नाही. तो आहेच. म्हणून तो आदी नाही. तसेच आदिसापेक्ष अनादीही नाही. असे त्याचे अवीट सुंदर रूप मी साक्षात् पाहिले ग बाई! ।।२।। मुक्ताई म्हणतात, अवघ्या ब्रह्मांडाला आत्मसंजीवन देणारा हा परमात्मा तत्त्वत: निर्गुण आहे. तो प्रपंचाच्या आकारात सगुण होतो. ।।३।।

मुक्ताई अशा ''शुचीनां श्रीमतां गेहे'' म्हणजे शुद्ध तसेच ज्ञानसंपन्न कुलात जन्माला आल्या होत्या की, त्यामुळे त्यांना ''बालपणीच सर्वज्ञता'' प्राप्त झाली होती. आपल्या लेकरांसाठी त्यागाची परिसीमा गाठणारे त्यांचे मायबाप होते. मुक्ताईंचे वडील विठ्ठलपंत यांच्या स्वभावातच विरक्ती होती तर त्यांच्या आई रुक्मिणीबाई यांचे अवघे जीवन समर्पितेचे होते. आत्मज्ञानाने विदेही बनलेले श्रीनिवृत्तिनाथ, ''योग्यांची माऊली'' झालेले श्रीज्ञानदेव तसेच प्रेमभक्तीची मूर्त असलेले सोपानदेव मुक्ताईचे वडीलबंधू होते. साक्षात आदिनाथ शंकरापासून उदयास आलेल्या नाथसंप्रदायाची दीक्षा श्रीनिवृत्तिनाथांकरवी त्यांच्या सर्व भावंडांना लाभली होती. त्यामुळे योगाचे बाळकडूच मुक्ताईंना मिळाले होते. मात्र त्यांची योगसाधना भक्तिशून्य नव्हती. परमेश्वराविषयीचा एकनिष्ठभाव त्यांना सर्वात मोलाचा वाटतो.

जीव मूलत: बद्ध नसतोच. तो अज, अमर, अद्वय, अपरिछिन्न अशा परमात्मस्वरूपापासून अलग नसतोच. म्हणजेच मुळात तो मुक्तच असतो. केवल मायेमुळे संसाराचे नसलेले बंध त्याला जाणवतात. या बंधांमुळे तो स्वत:ला जन्मणारा, मरणारा, भेदभावपूर्ण जगतातला मानतो आणि विषयवासनेत अडकतो. हे मायाबंध भासमय असले तरी त्यांच्या जाळ्यातून सुटण्यासाठी योगसाधनेची आवश्यकता आहे. अनन्य भक्तीने केलेल्या हरिनामस्मरणाने ही साधना होते. गाढ भक्तिरंगात देहाहंकार विरत जाईल आणि मुक्तीचा आनंद प्राप्त होईल, हा विचार मुक्ताईंनी आपल्या पुढील अंभगात मांडला आहे.

आधी तू मुक्तचि होतासि रे प्राणिया ।
परि वासने पापिणिया नाडलासी ।।१।।
आधीचे आठवी मग घेई परी ।
हरिनाम जिव्हारी मंत्रसार ।।२।।
आदि मध्य हरी ऊर्ध्व पै वैकुंठ ।
जाईल वासना हरी होईल प्रगट ।।३।।
एकतत्त्व धरी हरिनाम गोड ।
येर ते काबाड विषय ओढी ।।४।।
नानामते सांडी वासना पापिणी ।
एक नारायणी चाड धरी ।।५।।
नामाचेनि घोटे जळती पापराशी ।
न येती गर्भवासी अरे जना ।।६।।
मुक्ताई मुक्तलग सांडिली हे वासना ।
मुक्तामुक्ती राना हरिपाठ ।।७।।

मुक्ताई म्हणतात, जीवा, तू मूळचा मुक्तच आहेस रे, पण या पापिणी वासनेने तुला नाडले. स्वत:च्या अनादि, अनंत, विनिर्मुक्त स्वरूपाचे विसर पाडला. आपले आत्मस्वरूप आठव, समजून घे, मग या संसारजंजाळ्यातून सुटण्यासाठी हृदयात सर्व मंत्रसार असलेल्या

नामाचे विविध प्रकार जाणून घे. आपला आदी म्हणजे मूळ हरी आहे. आपल्या मध्यात म्हणजे, आताच्या जीवनात हरीच आहे. पण नंतर जीवनाच्या अंताकडे न जाता ऊर्ध्वगतीला जाशील तर वर वैकुंठ केवळ हरीचा निवास आहे. तेथे हरीशी एकरूप होऊन जाता येईल. ज्यावेळी वासना जातील त्यावेळी हरी प्रगट होईल. एकतत्त्व असलेले गोड हरिनाम तू घे. हरिनामाव्यतिरिक्त जे आत्मसुखास्तव इतर उपाय आहेत, ते अखेर विषयप्राप्तीकडे वळून केवळ काबाडकष्ट करून घेतात. अध्यात्माविषयी इतर मतमतांतरे सोडून त्याचप्रमाणे आधी पापी वासनेला त्यागून, केवळ नारायणाची इच्छा धर. अखंड हरिनामजपाचा घोट घेताच पूर्व संचितातल्या पापराशी जळून जातील. त्यामुळे संसारबंधन भोगण्याचे प्रारब्ध निर्माण न होता, तू जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटशील. यानंतर मुक्ताई स्वत:ची अवस्था सांगतात की, मी मोहमुक्त होऊन वासना टाकली. हरिपाठ मात्र मुक्त- अमुक्त या द्वन्द्वापलिकडचे आत्मसुखाचे रानच होय. त्यात ही मुक्ताई विमुक्तपणे विहरत आहे.

हरिपाठाचे सुख मुक्तपणे अनुभविणाऱ्या योगिनी मुक्ताईंच्या योगसाधनेला हरिभक्तीची किती दृढ बैठक होती, हे या वरील अभंगावरून लक्षात येते. मुक्ताईंची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणे सांगता येते- आदिनाथ (शिव)- मच्छेंद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - मुक्ताई. या परंपरेमुळे मुक्ताईंच्या तत्त्वविचारांना नाथ तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान मिळाले. नाथतत्त्वज्ञानाची सैद्धांतिक व प्रायोगिक ही दोन्ही महत्त्वाची अंगे आहेत. सद्गुरूंच्या शक्तिपात दीक्षेमुळे या दोन्ही स्तरांवर सत्‌शिष्य तत्काल प्रवीण होतो. अर्थात त्यासाठी शिष्य जन्मजन्मांतरीच्या तपश्चर्येने पात्र झालेला असतो. आपल्या श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाने आत्मस्वरूपाची साक्ष पटली, हे मुक्ताई आपल्या अभंगातून मोठ्या श्रद्धेने नमूद करतात.

पूर्णपणे सार अविट आचार ।
सारासार विचार निजतेजे ।।१।।
निर्गुणी आकार सर्वत्र साकार ।
एकरूपे विचार निजतेजे ।।२।।
मुक्ताई चैतन्य अवघे चिद्घन ।
आदि अंतु खूण निवृत्तीची ।।३।।

अर्थ - आत्म्याच्या निजतेजानेच सारासार विचार उद्भवतो आणि पूर्णसार अशा सच्चिदानंद श्रीहरीच्या भक्तीची गोडी जिवाला लागते. त्याला समर्पित होण्याचा आचार जिवाकडून घडतो. ।।१।। निर्गुण, निराकार ब्रह्मच सर्वत्र साकारलेले आहे. त्याच्याशी एकरूप होण्याचा विचार निजतेजामुळे येतो. आपल्यात ते आत्मतत्त्व आहे, त्याच्या तेजानेच आपल्याला परमात्मतत्त्वात लय पावण्याची ओढ लागते. ।।२।। मुक्ताईमधल्या चैतन्याला, जीवनाच्या आदि-अंतात भरून राहिलेल्या, ज्ञानमय, चैतन्यमय परमात्मास्वरूपाची सर्वात्मकता, निवृत्तिनाथांनी सांगितलेल्या मर्मामुळे अनुभवास आली. ।।३।। नाथ परंपरेची अद्वैत वेदान्तावर पूर्ण श्रद्धा आहे. त्याचबरोबर ही परंपरा शिव-शक्तीच्या सामरस्यावर भर देते. शिव म्हणजे प्रत्येकामधले आत्मचैतन्य, तर शक्ती म्हणजे आत्मशक्ती. याच आत्मशक्तीला कुंडलिनीशक्ती संबोधिले जाते. जीव बहिर्मुख असताना ही आत्मशक्ती सुप्तावस्थेत असते. जेव्हा साधक परमार्थाच्या तीव्र ओढीने अंतर्मुख होऊन साधना करू लागतो, तेव्हा त्याची आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होते आणि शरीरातील एकेका बंधांचा, चक्रांचा भेद करीत ऊर्ध्वगामी होते. योग्याच्या मस्तकातील सहस्रार चक्रापाशी येऊन अखेरीस ब्रह्मरंधातून बाहेरील चिदाकाशाशी म्हणजेच विश्वव्यापी आत्मचैतन्याशी एकरूप होते. हेच शिव-शक्तींचे सामरस्य होय. याला कुंडलिनीयोग किंवा हटयोग किंवा लययोग म्हणतात. याचे ज्ञानेश्वरीत साद्यंत वर्णन आहे. या साधनेला ज्ञानेश्वरांनी **''पिंडे पिंडाचा ग्रासू । तो हा नाथसंकेतीचा दंशु ।''** असे म्हटले आहे. म्हणजे शरीराच्याच साह्याने केलेल्या योगसाधनेने शरीरबंध दूर करणे, हे नाथपंथाचे मर्म असल्याचे सांगितले आहे. श्रीमुक्ताईसुद्धा या साधनेत पारंगत होत्या, याची साक्ष त्यांच्या अभंगातून मिळते.

सहस्रदळी हरि आत्मा हा कुसरी ।
नांदे देहा भीतरी अलिप्त सदा ।।१।।
रविबिंब बिंबे घटमठी सदा ।
ते नातळे पै कदा तैसा आम्हा ।।२।।
अलिप्त श्रीहरी सेवी का झडकरी ।
सेविता झडकरी हरिच होआल ।।३।।
चंदनाच्या दृती वेधल्या वनस्पती ।
तैसी आहे संगती या हरिपाठे ।।४।।
मुक्ताई चिंतित चिंतामणी चित्ती ।
इच्छिले पावती भक्त सदा ।।५।।

अर्थ - मुक्ताई साधकांना उपदेश करतात की मस्तकातील सहस्रदल कमलात हरी नांदत आहे. प्राणिमात्रांच्या देहात असूनही सदैव अलिप्त राहण्याचे त्याचे कौशल्य आहे. ।।१।। घटामठातल्या पाण्यात रविबिंब प्रतिबिंबित होते पण ते कदापि हाती लागत नाही, त्याप्रमाणे श्रीहरी संसारातल्या भेदभावात शोधू गेलात तर सापडणार नाही. ।।२।। त्या अलिप्त श्रीहरीला प्राप्त करण्यासाठी आपल्यालाही संसारातून अलिप्त व्हावे लागेल. नि:संग होऊन हरीला त्वरित भजा. हरीला भजता भजता तुम्हीही हरीच व्हाल ।।३।। चंदनाच्या वासाने त्याच्या आसपासच्या वनस्पतीही सुगंधित होतात, तसे हरिपाठाच्या संगतीने हरिपाठक हरी होतो ।।४।। मुक्ताई म्हणतात, 'जे चिंतावे ते देणाऱ्या हरिरूपी चिंतामणीचे चिंतन केले असता भक्तांना सदा इच्छित वस्तू प्राप्त होते।।५।।

नाथ तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत ''सूर्य, चंद्र, पूर्वमार्ग, पश्चिममार्ग'' या शब्दांना विवक्षित अर्थ आहे. जीवाची बहिर्मुखता पूर्वमार्गात असते तर अंतर्मुखता पश्चिममार्गात असते. मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंतच्या भागाला पूर्वमार्ग तर आज्ञाचक्रापासून ब्रह्मरंध्रापर्यंतच्या भागास पश्चिममार्ग म्हणतात. सूर्य उगविल्यावर जिवाला बाहेरील जगत दिसू

लागते, म्हणजेच जगताभास होऊ लागतो. त्यामुळे तो अज्ञानात अडकतो. म्हणून नाथतत्त्वात, शरीरातील सूर्याचे स्थान मूलाधार चक्रापाशी मानतात. जेथे कुंडलिनी प्राणशक्ती सुप्तावस्थेत असते. याउलट चंद्राचे स्थान सहस्रार चक्रापाशी मानतात. या चंद्रातून सतराव्या जीवनकलेचे अमृत सतत पाझरत असते. पण ते मूलाधारातल्या सूर्याकडून शोषले जाते. त्यामुळे जीव आत्मज्ञानामृताला वंचित राहतो. ज्ञान, भक्ती, ध्यानाने मूलाधारस्थ सूर्याचा प्रभाव दूर होऊन जीव सहस्रारातील चंद्रामृताने तृप्त होतो. पण येथेच न थांबता जेव्हा जीवाची आध्यात्मिक उपासना सुरू असते तेव्हा तो सूर्याच्या बारा कला तसेच चंद्राच्या सोळा कला या दोहोंनाही ओलांडून जातो. अर्थात् अज्ञानाला जसे सोडतो तसे ज्ञानाच्याही पार जातो. यावेळी योग्याच्या शरीरातील चंद्र-सूर्य एक होतात. नाथपंथाचे प्रवक्ते श्रीगोरक्षनाथ यांच्या गोरखबानी या ग्रंथात वरील तत्त्वप्रणाली स्पष्टपणे मांडलेली आहे.

द्वादस दल भीतरि रवि सक्ती, ससि षोडस सिब थान ।।
मूल संहार जीव सीव उनमनी अचल निधान ।।
नाद अनाहद गरजे गेणं, पछिम ऊग्या भांणं ।।

अर्थ - मूलाधारातील सूर्याच्या बारा कलांमध्ये शक्तीचा निवास आहे आणि सहस्रारातील चंद्राच्या सोळा कलांमध्ये शिवाचे स्थान आहे. मूलाधार सहस्रारात विलीन झाले. जीव उन्मनी अवस्थेमध्ये अचल ज्ञाननिधान असलेल्या शिवस्थानात ध्यानस्थ झाला. गगनात म्हणजे हृदयाकाशात अनाहत-नादाची गर्जना होत आहे. सूर्याचा प्रश्चिमेस उदय झाला आहे. म्हणजेच शिव आणि शक्तींचे सामरस्य झाले आहे.

हे नाथपंथाचे तत्त्व मुक्ताईंनीही आपल्या अभंगातून सुरसतेने विशद केले आहे.

निर्गुणाची सेज सगुणाची बाज ।
तेथे केशिराज पहुडले ।।१।।
कैसे याचे करणे दिवसा चांदणे ।
सबळे उठणे एक तत्त्वी ।।२।।
नाही या ममता अवघीच समता ।
आदि अंतु बिंबता नलगे वेळू ।।३।।
मुक्ताई सधन सर्वत्र नारायण ।
जीवशिव संपूर्ण एकातत्त्वे ।।४।।

अर्थ - सगुणाच्या बाजेवर निर्गुणाची शय्या आहे, त्यावर केशिराज पहुडले आहेत. अर्थात सगुण, निर्गुण ही दोन्ही रूपे अनंत परमात्म्याची आहेत. ।।१।। या परमात्म्याचे कार्य अघटित आहे. तो आपल्या भक्तांना दिवसा चांदण्याचा अनुभव देतो! दिवस हा आत्मप्रकाशाचा द्योतक मानला जातो. तर रात्र अज्ञान अंधकाराची समजली जाते. सहस्रार चक्र हे चंद्राचे स्थान आहे आणि मूलाधार चक्र हे सूर्याचे स्थान आहे. सहस्रारस्थ चंद्रातून सतराव्या जीवनकलेचे अमृत सतत स्रवत असते. ते मूलाधारस्थ सूर्य शोषून घेतो. त्यामुळे जीव अतिनाशित्वापासून वंचित राहतो. अर्थात सदैव बहिर्मुख राहून जगदाभास अनुभवतो. जन्माला आल्यापासून येणारा प्रत्येक क्षण त्याचे मृत्यूकडे जाणारे एकेक पाऊल ठरते. पण जेव्हा भगवंताची तीव्र ओढ लागून जीव अंतर्मुख होतो, तेव्हा ती त्याच्या ज्ञानोदयाची पहाट ठरते. भगवंतासाठी पंचप्राण एकवटणाऱ्या योगीभक्ताची कुंडलिनी जागृत होऊन ऊर्ध्वगामी होते, सहस्राराजवळ जाते. तेथील चंद्राचे अमृत प्राशन करून शिवसामरस्याचा पूर्णानुभव घेते. तोच ज्ञानाचा लखलखीत दिवस होय. हा दिवस असूनही चंद्राच्या शीतल चांदण्याचा अनुभव देतो. त्यासाठी श्रीहरीच्या एकतत्त्वावर पूर्ण निष्ठा ठेवून आत्मबळाने उठावे लागते. जागृत होऊन ऊर्ध्वगामी व्हावे लागते. ।।२।। भगवंताला मायाममतेचा स्पर्श नसून तो पूर्ण समतेने प्रत्येकात असतो. ज्यावेळी जिवाला आपल्या जीवनाच्या आदिमध्यअंतात भगवंतच बिंबला असल्याचे जाणवते, त्यावेळी त्याचा जगतभास मावळून जीवभाव विरण्यास वेळ लागत नाही ।।३।। सर्वत्र एक नारायणच आहे, या श्रद्धेने मुक्ताई सधन आहेत. ब्रह्मैक्यभावात जीवशिवांचे संपूर्ण एकतत्त्व होते. हे एकतत्त्व मुक्ताईंनी आपल्या यौगिकसाधनेमुळे तसेच भगवंतावरील एकनिष्ठ भक्तीमुळे साक्षात् अनुभवले. ।।४।।

मुक्ताईंच्या कूट अभंगातूनही वरील, ''दिवसा चांदणे रात्री ऊष्ण'' हे अलौकिक नाथपंथीय तत्त्व डोकावते.

देऊळाच्या कळशी नांदे एक ऋषी ।
तया घातली पुशी योगेश्वरी ।।१।।
दिवसा चांदणे रात्री पडे ऊष्ण ।
कैसेनि कठिण तत्त्व जाले ।।२।।
ऋषी म्हणे चापे कळिकाळा पै कापै ।
प्रकाश पिपे निघोन जाय ।।३।।
ठायीच्या ठायी असे पाहता न दिसे ।
मनाच्या धारसे एक होय ।।४।।
एकट एकले वायाचि पै गुंफले ।
मुक्त पै वरिले सहज असे ।।५।।
वैकुंठ अविट असोनि प्रकट ।
वायाचि अडवाट मुक्ताई म्हणे ।।६।।

अर्थ - देहमंदिराच्या कळसस्थानी म्हणजे ब्रह्मरंध्रापाशी गेलेल्या, म्हणजेच योगाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोचलेल्या एका ऋषीला योगेश्वराने प्रश्न विचारला. त्याची जणु परीक्षाच घेतली ।।१।। या तुझ्या अवस्थेत, दिवसा चांदणे आणि रात्री उन्ह पडते, असे विपरीत तत्त्व कसे काय झाले? आत्मज्ञानाचा दिवस उजाडल्याने जागृत झालेली कुंडलिनीशक्ती जेव्हा सहस्रार चक्रापाशी पोचते तेव्हा तेथील चंद्रातून पाझरणारे अमृत तिला मिळते, त्यामुळे जिवाला शीतल चांदण्याचा अनुभव येतो. याउलट अज्ञानाच्या रात्रीत मूलाधार चक्रापाशी असलेला सूर्य तप्त झालेला असतो. तो सहस्रारातल्या चंद्राचे अमृत शोषून घेतो, त्यामुळे त्या अमृतापासून जीव वंचित राहून अतृप्तीचे कडक ऊन पडते. ।।२।। ऋषी म्हणाला, मूलाधारात असलेल्या अज्ञान रात्रीच्या कडक उन्हातून सहस्रारात असलेल्या ज्ञानदिवसाच्या चांदण्यात प्राणशक्तीने मारलेली

उडी बघून कलिकाळ घाबरला, कारण अविनाशी तत्त्वापर्यंत पोचलेल्या या प्राणाचे आता कळिकाळाला हरण करता येणार नव्हते. यावेळी कुंडलिनीचे प्रकाशरूप जाऊन ती वायूरूप बनते.

हो का जे पवनाची पुतळी ।
पांघुरली होती सोनसळी ।
ते फेडुनिया वेगळी ।
ठेविली तिया ।।२८४।। ज्ञा. अ. ६

अर्थ - येथे कुंडलिनी आपली तेजरूप कांती टाकून वायुरूप बनली. त्यावेळी तिने जणु आपले सोनसळी वस्त्र फेडून बाजूला ठेवले, असे वाटले ।।३।। अत्यंत तेजस्वी अशी कुंडलिनी वायुरूप झाल्याने ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी असूनही दिसत नाही. हरिमीलनासाठी उन्मन झालेल्या, उचंबळून आलेल्या मनाच्या प्रवाहाने (धारसे) ब्रह्मरंध्रात आलेली प्राणशक्ती चिदाकाशात एकरूप होते. ।।४।। अशी कुंडलिनी प्राणशक्तीच्या उत्थानाची आणि तिने चिदाकाशात प्रभुमीलनासाठी घेतलेल्या उड्डाणाची कहाणी असली तरी मुळात जीवचैतन्य आणि ब्रह्मचैतन्य वेगळे होते कुठे? ते दोन्ही एकच आहेत. ब्रह्म एकटेच आहे. ही जिवाच्या संयोग - वियोगाची कहाणी उगाच गुंफली आहे. जी मुक्तता सहज होती, तिला वरिले गेले! ।।५।। मुक्तीचे अवीट वैकुंठ सर्वत्र प्रकट आहे. त्यापासून स्वत:ला वंचित समजून, त्याकडे जिवापाड प्रयत्नाने धावत येणे, ही खोटी आडवाट आहे, असे मुक्ताई म्हणतात।।६।।

मुक्ताईंचा पुढील अभंग म्हणजे त्यांचे स्वत:चे योगिक चरित्रच वाटते.

मुंगी उडाली आकाशी ।
तिने गिळिले सूर्यासी ।।१।।
थोर नवलाव जाला ।
वांझे पुत्र प्रसवला ।।२।।
विंचु पातळासी जाय ।
शेष माथा वंदी पाय ।।३।।
माशी व्याली घार जाली ।
देखोन मुक्ताई हासली ।।४।।

अर्थ - जीवभावाची मुंगी भक्तीच्या आकाशात उडाली. तिने ब्रह्मभाव प्राप्त करून ज्ञानसूर्याला गिळले. ती ज्ञानाच्याही पलीकडे पोचली ।।१।। जगताभास निर्माण होणे, ही खरेच मोठ्या नवलाईची गोष्ट आहे. कारण परब्रह्माच्या अद्वय स्वरूपात त्याच्याशिवाय दुसरे काही नाहीच. त्यात दुसरे काही निर्माणही होत नाही. असे असता हा जो जगताभास आहे, तो म्हणजे जणू वांझेला झालेला पुत्र होय, "अगा, जे घडलेचि नाही" असा अजातवाद होय ।।२।। सुप्त नागिणीला डिवचावयाला विंचू पातळात गेला. म्हणजे सुप्त प्राणशक्ती कुंडलिनीला जागृत करण्यासाठी प्राण, अपान एकवटून निर्माण होणारा उबारारूप विंचू पाताळात म्हणजे नाभिस्थानी गेला. ही जागृत शक्ती उत्थान पावून शिवाशी समरस होते. परब्रह्मात लीन होते. त्या परब्रह्माच्या चरणाला शेष आपला सहस्रफणी माथा लावून वंदन करतो ।।३।। विषयरूपी घाणीवर बसणारी जीवरूपी माशी व्याली, विशाल झाली आणि मूर्ध्नि आकाशात विहार करणारी घार बनली. हे तिच्यातले परिवर्तन बघून मुक्ताई समाधानाने हसल्या ।।४।।

या अभंगातील, "मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्यासी" या पंक्तीत, ज्ञानाची आकाशगंगा बनणाऱ्या चिमुकल्या मुक्ताईंचे अवघे जीवन साकारते! निवृत्तिनाथ गहिनीनाथाकडून योगदीक्षा घेऊन आले आणि त्यांनी ही योगदीक्षा आपल्या सर्व भावंडांत संक्रमित केली. त्या समयी मुक्ताई शिशुवयातच असतील. पण ज्या अनादिअनंत परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी ही योगसाधना केली जाते, त्याच्या ठायी लहान- मोठा, आपला- परका हे कुठलेच भेदभाव नाहीत. त्यामुळे मुक्ताईंच्या लहान वयाचा प्रश्न येथे गौण ठरतो. शिवाय जन्मजन्मांतरीच्या सुकृताने, साधनेने ही सर्व भावंडे योगदीक्षेस पात्रच होती, प्रगल्भ होती.

योगिनी मुक्ताईंच्या कळसाला पोचलेल्या योगप्रगल्भतेमुळे मन थक्क होते.

डॉ. सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी
२१, पूर्णायन सोसायटी, पं.दीनदयाळ पथ, डोंबिवली (प.),
मो. ९९२०२९१८२५

***



मुक्ताईंचे काव्यसौंदर्य

सौ. शुभांगी अ. देव

बी.ए./ व्यवसाय

दासबोध, सखोल-अभ्यास उपक्रमामध्ये गेल्या सहा वर्षांपासून समीक्षक.

संतसाहित्याची आवड त्यामुळे संतसाहित्यावर आधारित विविध परीक्षा उत्तीर्ण आहेत.

।। श्रीराम समर्थ ।।

महाराष्ट्राला खूप मोठी संतपरंपरा लाभली आहे. या परंपरेमध्ये स्त्रीसंतांची संख्या मोठी आहे. त्यापैकीच एक आहेत मुक्ताबाई. मुक्ताबाई सर्वत्र प्रामुख्याने ओळखल्या जातात त्या निवृत्तिनाथ व ज्ञानदेव या नाथसंप्रदायातील सद्‌गुरूपदी विराजमान असलेल्या भावंडांची छोटी बहीण म्हणून. पण यापेक्षा वेगळी मुक्ताबाईंची स्वत:ची अशी ओळख आहे. त्या 'ज्ञानी भक्त' आहेत, 'योगिनी' आहेत आणि यापेक्षा अधिक म्हणजे त्यांच्या ठिकाणी सहजपणे 'संतपण' आहे. मुक्ताबाई या 'संतकवी' आहेत. अर्थात् संतकवींची दिव्य आणि अखंड जागृत असणारी प्रतिभा मुक्ताईंच्या ठिकाणीही सहजपणे आहे. त्याचमुळे मुक्ताईंचे सहजशब्द देखील 'अभंग' होतात. मुक्ताईंच्या काव्याची प्रेरणा हे त्यांच्या ठायी सहजपणे असलेले 'संतपण'च आहे. सद्‌गुरूकृपेने साधनेच्या माध्यमातून मुक्ताईंना जे प्रचीतज्ञान प्राप्त झाले ते त्यांनी अभंग मौक्तिकांच्या रूपाने मुक्तहस्ताने सामान्यजनांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्याच्या हेतूने उधळले आहे. संतपणातून अभंगनिर्मितीमागे आलेला उदात्त हेतू आणि त्या हेतूला लाभलेला दिव्यप्रतिभेचा स्पर्श यामुळे मुक्ताईंचे अभंग काव्यसौंदर्याची सर्व लेणी सहजपणे लेवूनच प्रगट झाले आहेत.

मुक्ताईंच्या अभंगांच्या काव्यसौंदर्याचे भाषासौंदर्य, रससौंदर्य, भावसौंदर्य, अनुभूतिसौंदर्य, तत्वसौंदर्य असे विविध पैलू आहेत. काव्यसौंदर्याच्या या प्रत्येक पैलूचा क्रमाने विचार करू.

मुक्ताईंच्या अभंगांचे भाषासौंदर्य :

भाषेचे सौंदर्य खुलते ते शब्दालंकार व अर्थालंकारांनी. अनुप्रास, यमक, श्लेष, उपमा, रूपक, दृष्टांत इ. अलंकारांची मुक्ताईंच्या अभंगामध्ये लयलूटच आहे. काही उदाहरणांच्या आधारे या अलंकारांचा विचार करू...

मुक्तपणे मुक्त मुक्ताई पै रत ।
हरिनाम स्मरत सर्वकाळ ।।९।४ किंवा
मुक्ताई अद्वैत द्वैती द्वैतातीत ।
अवघाचि अनंत दिसे देही ।।२४।४ किंवा
मुक्ताई मुक्तता सर्वपणे पुरता ।
मुक्ता मुक्ती अपैता निजबोधे ।।३०।४.

अभंगांच्या या ओळींमध्ये अनुप्रासाचा छान उपयोग आहे. पण त्याचबरोबर तो अनुप्रास यमकामध्येही छान बांधला आहे. त्यामुळे या ओळींना आपोआपच स्वत:चा असा नाद व लय यांचा लाभ होतो. २९व्या अभंगामध्ये मुक्ताईंनी अशीच यमकाच्या आधारे लय साधली आहे.

उजिवडु कोडे । घेतसो निवाडे ।
आपुलिये चाडे । जीवनकला ।।१।।
एकरूप दिसे । सर्वापरी भासे ।
एक हृषिकेशे । व्यापियेले ।।२।।
त्रिपुरी भेदुनी । सर्वत्र गामिनी ।
एका रूपे मोहिनी । तेही सदा ।।३।।
नित्यता उन्मत्त । अवघेचि भरित ।
एकतत्वे दावित । सोहंभावे ।।४।।
मुक्ताई सांगती । कैसेनि गुंपति ।
माया देवी समाप्ति । निजतत्त्वाची ।५।।

साडेतीन चरणाच्या प्रत्येक ओवीमध्ये यमकाने छान ताल धरला आहे. त्याचवेळी शेवटच्या अर्ध्या चरणातील शब्दांची योजना लक्षात घेतली तर असे लक्षात येते की, त्या शेवटच्या शब्दामध्येच त्या संपूर्ण ओवीच्या अर्थाचे नाट्य शिगेला पोहोचून प्रगट होते. असा तो नाट्यमय अर्थगर्भ शब्द शेवटच्या अर्ध्या चरणात आल्याने आपण तेथे क्षणभर थांबतो आणि पूर्ण ओवीचा संपूर्ण अर्थ विजेसारखा आपल्या मनामध्ये चमकून जातो. आणि मुक्ताईंचा श्रोत्यांपर्यंत आपला विचार पोहोचविण्याचा हेतू सफल होतो.

२७ व्या अभंगामध्ये मुक्ताई आपल्या नाममुद्रेचा 'श्लेष' साधतात.

मुक्ति करि हरिश्रवण पाठ ।
तेणे मोक्षमार्ग नीट सकल साधे ।।२७।४

इथे 'मुक्ति करि' म्हणजे 'मुक्ताई हरिश्रवण पाठ करतात' असा एक

अर्थ होतो तर दुसरा अर्थ 'मुक्तीकरिता हरिश्रवण पाठ' करावा असा होतो.

३९ व्या अभंगामध्ये मुक्ताई अध्यात्मिक अवस्थेचे वर्णन अनुप्रासयुक्त शब्दांमध्ये फार सुंदर करतात–

'मुक्तलग मुक्त मुक्ताईचे तट ।

अवघेचि वैकुंठ निघोट रथा ।।३९।६

अर्थ : मुक्ताईच्या तटावर मुक्तीचे मौक्तिक मुक्तपणे असल्याने सर्वच दाट, गहिरे वैकुंठ झाले. या ओळींमध्ये अर्थचमत्कृतीही मुक्ताई सहजपणे साधतात. यमक, अनुप्रास, अर्थचमत्कृतीपूर्ण अशी ही रचना वैकुंठाची सुंदर अशी दृक्प्रतिमा आपल्या मनपटलावर उठवून जाते. तसेच तो 'मुक्तलग' शब्दही आपला आधी 'नातलग' होतो आणि मग 'जिवलग' होतो आणि भगवंतापासूनचे आपले 'अलग'पण संपविण्याची प्रेरणा देतो. आपल्या अभंगांमध्ये अनेक ठिकाणी मुक्ताईंनी 'मुक्तलग' हा शब्द वापरला आहे. मला तो शब्द फार भावला. मुक्ताबाईंचे शब्द आणि लय यांचे भान अलौकिक आहे. 'झोक्यावरील ओव्या' या ५५ व्या अभंगामध्ये याचा प्रत्यय येतो. ११ ओव्यांच्या या अभंगामध्ये प्रत्येक ओवीबरोबर झोक्याची लय वाढत जाते आहे असा भास होतो, आणि मुक्ताईंबरोबर आपणही त्या झोक्यावर झुलू लागतो. प्रत्येक ओवीबरोबर मुक्ताईंच्या अध्यात्मिक साधनेची कहाणी प्रगत होत जाते आणि शेवटच्या ओवीमध्ये 'सहस्रारातल्या चंद्राच्या अमृतमय किरणांमध्ये' भिजणाऱ्या मुक्ताईंचे चित्र आपल्या डोळ्यांमध्ये बंद होते. या 'झोक्यावरील ओव्यांमधील' मुक्ताईंची शब्दरचना केवळ अलौकिक आहे.

ज्ञानदेव-मुक्ताई या गुरुशिष्य-संवादाच्या अभंगांपैकी ७३ व्या अभंगामध्ये मुक्ताई योगसाधनेच्या मार्गावरून चालताना, साधना भरात येताना शरीराची कशी विकल अवस्था झाली हे एक सुंदर दृष्टांत योजून सांगतात–

'पूर्णिमेच्या दिवशी चंद्र झाला अस्त ।

देहाचीही गत तैशी होई ।।७३।१.

देह जो अध्यात्मिक साधनेचे साधन आहे तो जर साधनेच्या प्रवासात मधेच विकल झाला तर मोक्षापर्यंतची साधनेची वाटचाल कशी करायची या विचारांनी चिंतामग्न झालेल्या मुक्ताईंचे अंत:करण 'पूर्णिमेच्या दिवशी चंद्र झाला अस्त ।' या दृष्टांतामधून आपल्याला यथार्थतेने अवगत होते.

ताटीच्या अभंगातील ५२ व्या अभंगात 'रूपक' अलंकाराचा फार सुंदर उपयोग मुक्ताई करतात.

'गंगाजळ हृदय करा ।

ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५२।५.

आत्ममग्न होऊन समाधिसुखामध्ये सुखरूप झालेल्या आणि त्याचमुळे विश्वकल्याणाविषयी उदासीन झालेल्या ज्ञानदेवांना मुक्ताई गंगाजळाच्या रूपकाच्या माध्यमातून त्यांच्या अवतार कार्याचीच आठवण करून देताहेत असे वाटते.

मुक्ताईंच्या अभंगातून भाषासौंदर्याचे शब्दालंकार, अर्थालंकार चरणाचरणातून प्रत्ययाला येतात. पण हे अलंकार आपल्याला त्यांच्यामध्येच भुलवून ठेवीत नाही. तर त्यांच्या सौंदर्यदर्शनाने प्रसन्नचित्त झालेल्या आपल्याला ते त्या सौंदर्याच्या आधाराने हळूच त्या काव्याच्या अंतरंगामध्ये घेऊन जातात.

मुक्ताईंच्या अभंगातील रससौंदर्य –

मुक्ताईंच्या अभंगांमध्ये प्रामुख्याने भक्तिरस, वात्सल्यरस आणि अद्भुतरसाची प्रचीती येते. भक्ती आणि वात्सल्य हे मुक्ताईंचे स्थायीभाव आहेत. आणि त्यामुळे हे रस त्यांच्या अभंगातून मोठ्या प्रमाणात प्रत्ययास येतात. लेखनसीमेचा विचार करता प्रत्येक रसासाठी प्रातिनिधिक स्वरूपात एकेक अभंगाचा विचार करू. सर्वप्रथम भक्तिरसाचा विचार करू. अभंग क्र. ९.

मुक्तामुक्त दोन्ही नाइकतो कर्णी ।

हरिनामपर्वणी सदाकाळ ।।१।।

नाही काळ आम्हा वेळ कैची ।

हरिनामछंदाची गोडी थोरी ।।२।।

नाना विघ्न बाधा नाईको आम्ही कदा ।

निरंतर धंदा रामकृष्ण ।।३।।

मुक्तपणे मुक्त मुक्ताई पै रत ।

हरिनाम स्मरत सर्वकाळ ।।४।।

मुक्ताई या सर्वप्रथम भगवंताच्या अनन्यभक्त आहेत. भगवंताची भक्ती हेच त्यांचे साध्य आहे. भगवंताच्या भक्तीचा परिणाम काय होतो हे जाणून घेण्याची त्यांना गरजच वाटत नाही. भगवंताच्या नामजपाच्या आधारे अखंड त्याच्या अनुसंधानात राहण्याचेच प्रेम त्यांना आहे. त्या प्रेमापुढे त्यांना कोणतेही बंधन बंधन वाटत नाही. आणि त्याचमुळे अखंड मुक्तीचा, हरिनामामध्ये रंगून जाण्याचा आनंद त्या घेतात. हरिनाम हाच छंद आणि त्या छंदाचीच गोडी मुक्ताईंना आहे. या अभंगातून मुक्ताईंचे भक्तिरसाने ओथंबलेले आणि भक्तिसुखासाठी आसुसलेले अंत:करण आपल्याला प्रतीत होते.

वात्सल्य हा प्रत्येक स्त्रीचा सहजस्वभाव आहे. मुक्ताई या 'स्त्रीसंत' असल्याने त्यांचे ठायी हा वात्सल्याचा भाव विशेषत्वाने असणे आणि जाणवणे सहजच आहे. संतपणामुळे मुक्ताई सर्व जगाची माऊली बनतात. माऊलीच्या या वात्सल्यमय अंत:करणातूनच ताटीच्या अभंगांची प्रेरणा मिळाली असणार हे निश्चित. मुक्ताईंच्या वत्सलतेचा अनुभव त्यांच्या चांगदेवांशी झालेल्या संवादातून आणि ताटीच्या अभंगातून विशेषत्वाने प्रत्ययास येतो.

ज्ञानदेव मुक्ताईंना सर्वार्थाने वडील आहेत. आत्ममग्न होऊन समाधीसुखामध्ये बुडून गेलेल्या ज्ञानदेवांना समाधीतून जागवण्याचे धाडस मुक्ताई करू शकतात. कारण त्यांच्या वत्सल अंत:करणामध्ये सामान्यजनांविषयी अपत्यभाव आहे आणि म्हणनूच त्यांच्या उद्धाराची तळमळ त्यांना आहे.

''योगी पावन मनाचा ।

साही अपराध जनाचा ।।४३।१।।

विश्व रागे जाले वन्ही ।
संतमुखे व्हावे पाणी ।।४३।२।। किंवा
हात आपला आपणा लागे ।
त्या भरू नये रागे ।।४९।१।।
जीभ दातांनी चाविली ।
कोणे बत्तीशी तोडीली ।।४९।२।।

हे शब्द मुक्ताईंच्या तळमळीचेच व्यक्तरूप आहे असे वाटते. चांगदेवांना उपदेश केलेल्या अभंगातही मुक्ताईंचे वत्सलरूपच प्रतीत होते. पुढील चरणातून ते स्पष्ट होते –

'मी ते काई माझे ते काई ।
परियेसी चांगया बोले मुक्ताबाई ।।५९।३।। किंवा
मुक्ताबाई म्हणे चांगया तू बुझ ।
अंतरीचे गुज सांगितले ।।६१।१।।

येथील परियेसी चांगया, चांगया पाहे; चांगया तू बुझ या शब्दातून आई मुलाशी बोलते आहे असेच वाटते. गुरुशिष्यसंबंधाला वत्सलतेची अशी सुंदर किनार लाभलेली आहे. मुक्ताईंच्या कूट अभंगातून त्यांच्या अद्‌भुतरम्य कल्पनांचे प्रत्यंतर येते. सर्वश्रुत अशा 'मुंगी उडाली आकाशी।' या कूट अभंगातून मुक्ताई योगिक अनुभवाचे मोठे अद्‌भुत वर्णन करतात. प्रथम तो अभंग पाहू – अभंग क्र. ४२.

मुंगी उडाली आकाशी ।
तिने गिळिले सूर्यासी ।।१।।
थोर नवलावू जाला ।
वांझे पुत्र प्रसवला ।।२।।
विंचु पाताळासी जाय ।
शेष माथा वंदी पाय ।।३।।
माशी व्याली घार जाली ।
देखोन मुक्ताई हासली ।।४।।

मुळात योगिक अनुभव मोठेच अद्‌भुत असतात. सामान्यजनांच्या कल्पनेच्याही पलिकडचे ते असतात. अशा त्या अद्‌भुत अनुभवांचे मुक्ताई अधिकच अद्‌भुत पद्धतीने वर्णन करतात. इथे मुंगी म्हणजे जीवभाव आहे. ही जीवभावाची मुंगी भक्तीच्या आकाशात उडाली. ती परब्रह्माशी तादात्म्य पावली आणि तिने ज्ञानसूर्याला गिळले म्हणजे ती ज्ञानाच्याही पलिकडे पोहोचली. दुसऱ्या ओवीत दुसरी अद्‌भुत कल्पना मुक्ताई मांडतात. 'वांझे पुत्र प्रसवला ।' खरेतर हे संपूर्ण विश्व हे परब्रह्मस्वरूपच आहे. पण तरीही जगदाभास आहे. ही मोठी नवलाची गोष्ट मुक्ताईंना वाटते. जगदाभासाचे मिथ्यापण त्या 'वांझे पुत्र प्रसवला।' या यथार्थ पण अद्‌भुत कल्पनेतून मांडतात. तिसऱ्या ओवीतला विंचू म्हणजे प्राणअपान एकवटून निर्माण होणारा उबारा. हा उबारारूप विंचू पातळात म्हणजे नाभिस्थानी जातो आणि तिथे सुप्तावस्थेत असलेल्या कुंडलिनीला जागृत करतो. जागृत झालेली कुंडलिनीशक्ती उर्ध्वगामी होऊन ब्रह्मरंध्रापाशी असलेल्या सहस्रारचक्रापाशी जाते व तिथे ती परब्रह्मामध्ये लीन होते. त्या परब्रह्माच्या चरणाला शेष आपला माथा लावून वंदन करतो. ४थ्या ओवीतील, 'माशी व्याली घार झाली।' ही कल्पना तर खूपच गूढ, अद्‌भुत अशी आहे. इथे माशी म्हणजे विषयरूपी घाणीवर बसणारा जीव आहे. ही माशी म्हणजेच हा जीव विशाल झाला, व्यापक झाला आणि तो मूर्ध्नि आकाशात विहार करणारी घार झाला. जीवामधील हे परिवर्तन पाहून मुक्ताई हसल्या. या संपूर्ण अभंगामध्ये रूपकांची गूढता मुक्ताईंनी राखली आहे. प्रथम या गूढ कोड्याची उकल करण्यातच आपण गढून जातो आणि मग कोडे उकलते आणि कुंडलिनीशक्ती जागृत होऊन तिचा परब्रह्मामध्ये लय पावण्यापर्यंतचा पूर्ण अद्‌भुत असा प्रवास आपल्याला अवगत होतो. मुक्ताईचा हा अभंग वाचून, जाणून आपण केवळ नि:शब्दच होतो.

मुक्ताईंचे अभंगातील भावसौंदर्य –

अत्यंत ज्ञानी असलेल्या आणि आपल्या ज्ञातेपणाची यथार्थ जाणीव असलेल्या मुक्ताईंचा आत्मविश्वास त्यांच्या सर्वच रचनांमधून प्रत्ययाला येतो. पण त्यांचा आत्मविश्वास निरहंकार आहे. त्यांची ही निरहंकारिता, त्यांच्या अंत:करणाचे नितळपण, त्यांचे पवित्र, शुद्ध अंत:करण त्यांच्या रचनांमधून स्वच्छ दिसते. किंबहुना मुक्ताई अशा निरहंकार, शुद्ध, पवित्र आहेत म्हणूनच त्या प्रत्येक अनुभवाशी तदाकार होऊ शकतात. त्यांच्या भावसौंदर्याचे काही नमुने असे –

'सर्वतीर्थ हरि दुभाळू धेनुवा ।
वोळला कणवा चातकाचा ।।१३।३।
सर्वोसर्व सुख अहं तेचि दु:ख ।
मोहममता विष त्यजियेले ।।१३।१।

येथे मुक्ताईंचा भाव केवढा विशाल झाला आहे. सर्व विश्वाला आपले म्हणणाऱ्या मुक्ताई मोहममतारहित होऊन विश्वावर प्रेम करू शकतात.

'पूजा पूज्य वीते पूजक पै चित्ते ।
घाली दंडवते भावशीला ।।१४।१.

या ओळीतील मुक्ताईंचा समर्पणभाव आपल्या अंतरंगाला जाऊन भिडतो. १९ व्या अभंगामध्ये मुक्ताई साधनेच्या पूर्वीच्या त्यांच्या अवस्थेचे, अज्ञानावस्थेचे वर्णन अगदी प्रांजळपणे करतात–

'उर्णाचिया गळा बांधिली दोरी ।
पाहो जाय घरी तव तंतु नाही ।।१९।१।
तैसे जाले बाई जंव एकतत्त्व नाही ।
दुजी जंव साई तंव हे अंध ।।१९।२।।
ऐसी मी हो अंध जात होते वाया ।।१९।३।।'

'उर्ण म्हणजे मेंढ्याचा दृष्टांत देऊन मुक्ताई आपल्या अज्ञानावस्थेचे वर्णन करतात. मेंढा हा मंदबुद्धीचे प्रतीक आहे. मेंढ्याला दोरी आणि गवतातील फरकच कळत नाही व तो गवताबरोबर गळ्यातील दोरीही खाऊन टाकतो. मुक्ताई म्हणतात की, त्या मेंढ्याप्रमाणे मलाही ब्रह्म आणि माया यांचे स्वरूप कळत नव्हते. श्रीहरीची सर्वव्यापकता कळत नव्हती म्हणून द्वैतभाव होता. ज्ञानाचा डोळा नसल्याने मी अंधच होते. स्वार्थी होते आणि माझे आयुष्य वाया जात होते. या रचनेमध्ये मुक्ताईंचा

प्रामाणिक, शुद्ध भाव पाहून आपण चकित होतो आणि अंतर्मुख होतो.

मुक्ताईंच्या अंभगांचे अनुभूतीसौंदर्य –

मुक्ताईंचे अभंग हे त्यांच्या अनुभूतींचे शब्दरूपच आहेत. किंबहुना ते अनुभूतींचे साररूप आहेत. मुक्ताईंनी अनुभूती नुसतीच अनुभवली नाही तर ती आत्मसातही केली आहे. मुक्ताईंनी अनुभूतींच्या आधारे केलेल्या अभंगातील विवेचनात त्यांचे अद्वैतानुभवाचे आणि योगिक अनुभवांचे विवेचन अधिक लक्षात राहण्यासारखे आहे. आपले हे शब्दातीत अनुभव त्या किती सहजपणे शब्दबद्ध करतात! आणि त्या शब्दांच्या आधारे त्या आपल्यालाही अलगद त्या अनुभूतींच्या जवळ नेतात! अत्यंत अवघड गोष्ट अत्यंत सोप्या शब्दात मांडणे ही अत्यंत अवघड गोष्ट मुक्ताई आपल्या दिव्य प्रतिभेच्या साहाय्याने अगदी सहजपणे करतात. मुक्ताईंच्या अनुभूतिसौंदर्याचे काही दाखले असे –

१) अंतरबाह्य निके सर्व इंद्रियांचे चोज ।
निजी निजवीत एकतत्व ।।२५।१।
आदी नाही अनादि नाही ।
ते रूप पाही अवीट बाईचे ।।२५।२।
मुक्ताई संजीवन तत्वता निर्गुण ।
आकारसगुण प्रपंचीचा ।।२५।३।

२) सहस्रदळी हरि आत्मा हा कुसरी ।
नांदे देहा भीतरी अलिप्त सदा ।।२०।१।
रविबिंब बिंबे घटमठी सदा ।
ते नातळे पै कदा तैसा आम्हा ।।२०।२।
अलिप्त श्रीहरी सेवी का झडकरी ।
सेविता झडकरी हरिच हो आला ।।२०।३।

३) विटेवरी मूर्ती दिसते सगुण ।
सगुण का निर्गुण म्हणू दादा ।।६५।१।
वचन बुडाले स्तब्ध झाले मन ।
सगुण निर्गुण दोन्ही नाही ।।६५।३।

२५ व्या अभंगामध्ये मुक्ताई आपल्या अंतर्बाह्य मूळबीज असलेल्या एकतत्त्व श्रीहरीची अनुभूती घेतात. ब्रह्मांडाला आत्मसंजीवन देणारा तो निर्गुणच प्रपंचाच्या रूपाने सगुण झाला आहे हे त्यांचे बोल त्यांच्या प्रत्यक्ष अनुभूतीचेच साक्षी आहेत. २० व्या अभंगामध्ये देहात राहूनही ते आत्मतत्त्व तो श्रीहरी कसा अलिप्त करतो हे सांगून 'सेविता झडकरी हरीचे होआल' ही खात्री त्या स्वानुभवातूनच देत आहेत. ६५ व्या अभंगामध्ये ध्यानामध्ये होणाऱ्या आत्मज्योतिरूप विठ्ठलाचे दर्शन मुक्ताई किती सहजपणे करीत आहेत. चारही वाचांच्या पलीकडे गेल्यावर त्यांना त्या पुरुषोत्तमाचे दर्शन झाले आणि सगुण आणि सगुणसापेक्ष निर्गुण याही पलीकडचे ते रूप आहे ही त्यांची अनुभूती त्या किती सहज, स्वच्छ शब्दांमध्ये सांगून जातात की त्यांची ती अनुभूती आपल्यालाही कल्पनेने त्या अनुभूतीपर्यंत घेऊन जाते.

मुक्ताईंचे अभंगातील तत्त्वसौंदर्य –

ज्ञान, भक्ती, योग या तिन्हींचा समन्वय मुक्ताईंचे ठायी आहे. आणि या समन्वयातूनच त्यांनी परब्रह्माशी तादात्म्यता साधली आहे. स्वरूप आणि विश्व; दोन्ही ठिकाणी त्या परमात्मतत्त्वाची प्रचीती घेतात. शब्दातीत, कल्पनातीत अनुभवाला त्या उत्तमप्रकारे शब्दबद्ध करतात. कल्पनेच्या कक्षेत आणतात. अगम्य असे ते परमात्मतत्त्व मुक्ताई शब्दांच्या माध्यमातून आपल्यासमोर साकार करतात. उदाहरणदाखल ३६ व्या अभंगातील काही ओव्या पाहू.

आदि मध्य अंतु न कळोनि भ्रांतु ।
असे जो सततु निजतत्वे ।।३६।१।।
कैसेनि तत्त्वता तत्व पै अनंता ।
एकतत्वे समता आपेआप ।।३६।२।।
आप जंव नाही पर पाहासी काई ।
विश्वपणे होई निजतत्वी ।।३६।३।।

'अहं ब्रह्माऽस्मि' आणि 'सर्वं खलु इदं ब्रह्म' हा महावाक्यांचा परमात्मतत्त्वाचा विचार मुक्ताई पहिल्या दाने ओव्यांमध्ये मांडतात. तर 'तत् त्वम् असि' हा सिद्धांत व्यतिरेकाने त्या तिसऱ्या ओवीमध्ये सांगतात व विश्वरूप निजतत्त्वाशी एकरूप होण्याचा बोध करतात. 'आप जंव नाही पर पाहासी काई ।' या चरणातून मुक्ताई बिनतोड तत्त्वमांडणी करतात.

सर्वत्र रूपडे भरलेसे दृश्य ।
ज्ञाता ज्ञेय भास हरिमाजी ।।३७।३।।
नाही या शेवट अवघाचि निघोट ।
गुरुतत्वे वाट चैतन्यासी ।।३८।३।।
आत्मयाचे ठायी । सर्व येकाकार ।
नाही नारीनर । भेदाभेद ।।७९।१।।

उपरोक्त ओवीचरणातून परमात्मतत्त्वाचे सर्वसमत्व व सर्वव्यापकत्व मुक्ताई दाखवीत आहेत. मुक्ताईंची प्रतिभा सूर्याप्रमाणे लखलखीत प्रकाशमान आहे. त्यांच्या प्रतिभेचे ते तेजस्वी सौंदर्य जाणून घ्यायला तशीच तेजस्वी ज्ञानदृष्टी हवी. मी ते तेजस्वी सौंदर्य चर्मचक्षूंनी पाहण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्यांच्या प्रतिभेच्या तेजकिरणांनी माझ्या ठिकाणचा अज्ञानाचा अंधार दूर झाला आणि माझ्या चर्मचक्षूंच्या क्षमतेने मला जे त्यांच्या काव्याचे सौंदर्य दिसले ते मी येथे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये 'अधिक ते सरते, उणे ते पुरते करून घेयावे हो।' अशी अंत:करणपूर्वक विनंती करून माझे लेखन थांबविते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. शुभांगी अश्विनीकुमार देव
जे/२, चेतनानगर, औरंगाबाद ४३१००५.
फोन : (घर) ०२४०-२३६०६९८
मो. ९४२३७८१५२८

(या लेखातील मुक्ताईंच्या सर्व अभंगांचा आधार सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी यांच्या 'पंचतीर्थ' या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडातील मुक्ताईंच्या अभंगगाथा यातून घेतला आहे. कृपया याची नोंद घ्यावी)

***



मुक्ताबाईंच्या अभंगातून डोकावणारे स्त्रीत्व

डॉ. सौ. अंशुमती अरविंद दुनाखे

पीच्.डी., एम.ए. (हिंदी) एम्.ए. (इंग्रजी), टिळक विद्यापीठाच्या संस्कृतच्या तीन परीक्षा, बंगालीची एक परीक्षा. निवृत्त सरकारी अधिकारी.
उपनिषदे, संतसाहित्य आदींचे अध्ययन, अध्यापन (उपनिषदांवर पुस्तके, उपनिषदांतील गोष्टी, श्रीरामनामावली, माऊलींचा हरिपाठ, दोन कवितासंग्रह, सूरदासांच्या दृष्टिकोनांतून बालकृष्ण वर्णन- आदि पुस्तकांचे लेखन, स्फुट लेखन- विविध पुस्तके व मासिकांतून...

महाराष्ट्राने पाहिलेला सर्वात मोठा चमत्कार म्हणजे परमब्रह्माने चार मूर्तींमधून घेतलेला अवतार. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई. अध्यात्म मार्गच जणू मूर्त होऊन आला. प्रपंचातून निवृत्त व्हावे तेव्हा ज्ञानोदय होतो. त्याच्या आधाराने अध्यात्माचा सोपान चढावा व गंतव्य स्थान म्हणजे मुक्तदशेला प्राप्त करावे! या अलौकिक चार भावंडांत मुक्ताबाई सर्वांत लहान. सकल संतगाथाकार म्हणतात, ''निवृत्तिनाथांचे वैराग्य, ज्ञानदेवांची तेजस्विता व सोपानदेवांची चिंतनशीलता त्यांच्या ठायी एकवटल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विद्युल्लतेची तेजस्विता प्राप्त झाली होती.'' संत त्यांचे वर्णन 'ब्रह्मचित्कला', 'ज्ञानदीप्ति-कला', 'परमसुकुमार चिद्रत्न कलिका', 'अमृत संजीवनी' आदि शब्दांत करतात. नामदेव म्हणतात,

'लहानशी मुक्ताबाई जैशी सणकांडी,
केले देशोधडी महान संत ।'

एकनाथ म्हणतात,

नमो मुक्ताबाई । त्रिभुवन पावनी ।
जगत्रय जननी । मुक्ताबाई माते ।।
आदिशक्ती म्हणती । तुम्हांलागी ।।

अशा या मुक्ताबाईंचा जन्म शके १२०१ मध्ये अश्विन शुद्ध प्रतिपदेला शुक्रवारी झाला. घटस्थापनेचा दिवस व त्यांतूनही शुक्रवार देवीचा आवडता वार. चित्कलेला प्रगट होण्यासाठी याहून चांगला मुहूर्त कुठला मिळणार? चौघा भावंडांत धाकटी व एकुलती एक बहीण म्हणून आईवडिलांनी व भावंडांनी खूप प्रेम दिले, लाडकोड केले. पण अगदी लहानवयात- बहुधा त्या तीन-चार वर्षांच्या असताना आईवडिलांचा विरह त्यांना सहन करावा लागला. कदाचित् त्या चार-पाच वर्षांच्या असतील. पण घरातील बाईमाणूस म्हणून घराची जबाबदारी त्यांच्यावर पडली.

या चारही भावंडांचा कल पारमार्थिक होता. निवृत्तिनाथांना गहिनीनाथांकडून नाथसंप्रदायाची दीक्षा मिळाल्यानंतर ती त्यांनी आपल्या भावंडांना दिली. मुक्ताबाईंचा योगाचा अधिकार खूप मोठा आहे. योगसाधनेत त्यांना जेव्हा भ्रूचक्रातून वर जाता येईना तेव्हा ज्ञानदेवांनी त्यांची मदत केली. सनदीचे अभंग त्या दोघांचा संवाद वर्णन करणारे आहेत. योगासाठी त्यात उत्कृष्ट मार्गदर्शन मिळते. साधकांना ते फारच उपयोगी आहेत. मुक्ताबाई महान् योगिनी होत्या. त्या ब्रह्मसाक्षात्कारी होत्या.

त्यांचे काव्य अत्यंत उच्चस्तरावरून केलेले काव्य आहे. सामान्य माणसांना तिथपर्यंत पोचणेही फार अवघड वाटते. डॉ. विजया संगवई वर्णन करतात, 'अंतर्बाह्य अध्यात्माधिकाराने पाझरती, योगसामर्थ्याने लखलखती, सद्गुरूंच्या करुणामय व कल्याणमय वात्सल्याने अज्ञान-निद्रेतून जागवीत, आत्मज्ञानीविराजित व स्थिर करती मुक्ताईची अभंगवाणी म्हणजे आत्मानंदाचे कल्लोळ! योगानुभवाचे पुंजाळ!''

सकलसंतगाथाकार म्हणतात, ''स्त्री आणि पुरुष हे द्वंद्व विसरून त्यापलीकडचे देहात्मभाव विसरून गेलेले उत्तुंग व्यक्तित्व तिला प्राप्त झाले होते. तिच्या अभंगात कुठेही स्त्री म्हणून दिसत नाही. ती पराकोटीची निर्गुणोपासक होती. योग, अध्यात्म आणि कवित्व या त्रयींचा संगम तिच्या व्यक्तित्वात झालेला होता. ती ज्ञानदेव-भगिनी शोभते.''

डॉ. संगवई म्हणतात, ''अंतर्बाह्य आत्मानंदी रंगून गेलेल्या या ब्रह्मवादिनीचे अंतर्मुख ज्ञानविश्व, द्वंद्वाधिष्ठित-जीवन, व्यवहारांनी यत्किंचित्देखील कंपित झालेले तिच्या अभंगातून दिसून येत नाही. अनेकरंगी, अनेक पदरी लौकिक व्यवहारांनी मुक्ताईच्या आत्मनिष्ठेवर पुसटसादेखील आघात-प्रत्याघात झाल्याचे जाणवत नाही. अध्यात्मज्ञान हेच तिचे जीवनसार आहे. आत्मज्ञानाच्या धगधगत्या यज्ञकुंडात मुक्ताईने आपल्या सर्व बालसुलभ, स्त्रीसुलभ, सुकुमार भावसुमनांची आहुती देऊन टाकली आहे. आणि म्हणूनच तिच्या परतत्त्वस्पर्शी अभंगवाणीतून चुकूनही कोठे तिळमात्र देखील पार्थिवत्व चिकटलेले नाही. अखंड आत्मजागृत अवस्थेत विहरलेल्या या ज्ञानयोगिनीच्या अभंगातून. म्हणूनच 'नित्य मुक्त', 'जीवन मुक्त', मुक्त मुक्तातीत' हे शब्द अविरतपणे आद्यन्त, अनाहतनादाप्रमाणे घुमत राहतात. ॐकार स्वराप्रमाणे निनादत राहतात.''

त्यामुळे मुक्ताबाई म्हणजे अपार्थिव, अलौकिक लखलखती ज्योती, असेच चित्र पुढे येते. मराठीच्या आद्य कवियत्रीचा मान चक्रधर स्वामींची शिष्या महदाइसा अथवा महदंबेचा आहे. पण आत्मज्ञानाने लखलखणारे चिरंतन काव्य लिहिणाऱ्या मुक्ताबाई या पहिल्या कवियत्री.

असे असताना त्यांच्या कवितेत स्त्रीत्वाचे दर्शन होते का? हा प्रश्न काहीसा अप्रासंगिक वाटू शकतो. माझ्या मते स्त्रीत्वाचे दर्शन म्हणजे स्त्रीचा देह प्राप्त झाल्यामुळे त्यानुसार विकार- विचारांचे दर्शन, असा जर असेल तर तसे इथे काही सापडणार नाही. महदाइसेच्या धवळ्यांमध्ये, मातृकीरुक्मिणी स्वयंवरात वा गर्भकांड ओव्यांमध्ये स्त्रीसुलभ विषय आहेत. मुळात धवळे चक्रधरस्वामींच्या गुरू गोविंदप्रभूंच्या विवाह सोहळ्यासाठी रचलेले आहेत. त्या अर्थाने मुक्ताबाईंच्या काव्याचे विषय आत्मज्ञान, उपदेश वगैरे आहे.

स्त्री ही माता असते. आदिशक्ती या विश्वाची माता आहे. मातेच्या मनात आपल्या सर्व अपत्यांबद्दल प्रेम असतेच, करुणा असते. त्यांच्या हिताची कळकळ असते. म्हणून तर आपण विठूमाऊली, गुरुमाऊली, ज्ञानेश्वरमाऊली म्हणतो. ते वात्सल्य, ती करुणा, ती कळकळ मुक्ताबाईंमध्ये आहेच आहे. मुक्ताबाईंना जसे आपल्या नित्यमुक्त ज्ञानावस्थेचे लखलखित भान आहे त्याप्रमाणेच हा मातृभावही त्यांच्यामध्ये अखंड जागृत आहे.

लहानवयात ज्यावेळी आईवडील सोडून गेले तेव्हा काही काळ बावरलेल्या लहानगीला तीनही भावांनी जपले असेल. पण नंतर आई बनून याच लहानगीने पाटपाणी केलं असेल, अन्न वाढले असेल. ज्यावेळी लोकांच्या अवहेलनेने, कुत्सित बोलण्याने ज्ञानदेवदादा व्यथित होऊन दार लावून बसले होते तेव्हा नऊ वर्षांच्या मुक्ताबाईंनी ज्ञानदेवांची आई होऊनच त्यांना समजावले आहे.

योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ।।
विश्व रागे झाले वन्ही । संतीं सुखें व्हावें पाणी ।।
शब्दशस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।
विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

हा अभंग डोळे मिटून ऐकला तर मांडीवर डोके ठेवून मुसमुसणाऱ्या लेकराच्या पाठीवरून हात फिरवीत, डोळ्यातील अश्रूंनी त्याला शांत करीत असलेली व्याकुळ आई दिसू लागते. ''अरे लोकं बोलायचीच. पण आपण त्याचा राग मानायचा नाही. आपण शांत रहायला हवे. बाळा, आपण असे दुःखी झालो- विकारांच्या आधीन झालो तर त्यांच्यात आणि आपल्यात काय बरे फरक राहिला?''

संत जेणे व्हावे । जग बोलणे साहावें ।।
तरीच अंगीं थोरपण । जया नाही अभिमान ।।
थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे ।।
रागे भरावे कवणाशी । आपण ब्रह्म सर्व देशी ।।
ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

दाताने ओठ चावला म्हणून दात पाडते कां कुणी? आपलेच दात व आपलेच ओठ. सर्व जग हे वस्त्राप्रमाणे आहे. ब्रह्म हे त्यातील सूत आहे. एका हाताने दुसऱ्या हाताला मारले. पण दोन्ही हात एकाचेच आहेत ना?

शहाणपणाच्या गोष्टी आईच्या मायेने सांगितल्या. शेवटी भगिनीपणाचाही सहारा घेतला. बहिणीचा लडिवाळ हट्ट तुम्ही पुरवा व 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा'. लडिवाळ मुक्ताईची आळ (हट्ट) पुरविण्यासाठी शेवटी ज्ञानेश्वरांनी ताटी उघडली. हे काम गुरू किंवा बंधू करू शकत नव्हते. पण आई व लहान बहीण करू शकत होती. हळूवार फुंकर, विनंतीवजा बोध व शेवटी लडिवाळ हट्ट, हेच मार्ग शोकसंतप्त मनाला शांत करू शकत होते आणि ते काम मुक्ताबाईंनी दोन्हीही भूमिका निभावून केले आहे.

त्यांना नामदेव 'सणकांडी' म्हणतात. विसोबा चाटींनाही त्यांनी सुनावले होते. हा त्यांचा परखडपणा प्रसिद्ध आहे. या परखडपणाच्या पाठी मातेचा अधिकार आहे. असे मला फार वाटते. मुलाने वेडेवाकडे केले तर आई नाही म्हणत 'रमेऽऽश, मी बघतीय बरंका. टाक खाली. लोकांच्या वस्तूला हात नाही लावायचा!' त्याच अधिकाराने मुक्ताबाईंनी त्या दोघांना ठिकाणावर आणले असेल. याच विसोबा चाटीने परळ मिळू दिले नव्हते. संन्याशाच्या पोरांना हवेत कशाला जिभेचे चोचले? असे सुनावले होते. कर्मकांडाचे थोतांड माजवून माणुसकीला विसरलेल्या मुलाला थोडे दटावायला हवेच. निवृत्तिनाथांसारख्या ब्रह्मस्वरूप संताचे पाय न धरणाऱ्या अहंमन्य पोराला चापट नको का मारायला?

'नित्य देवाचा शेजार । नाही गेला अहंकार!'

कुठेशी या दोघांची एक कथा मी ऐकली होती. सकाळच्या वेळी जप आटोपून नामदेवांनी जपमाळ आवरून ठेवली. मुक्ताबाई कुठेतरी झाडाच्या फांदीवर बसून ते पहात होत्या. त्या खुदकन् हसल्या. नामदेवांनी विचारले, ''मुक्ते, का ग हसतेस? झालंय तरी काय?'

'काही नाही' म्हणत मुक्ताबाईंनी तिथून पळ काढला.

पुढे नामदेव नदीवर गेले असता पाणी भरायला आलेल्या दोघींचा संवाद त्यांच्या कानावर पडला. एक जण आपल्या सखीला विचारीत होती, ''कां ग, तुझ्या नवऱ्याचे नाव किती वेळा जपतेस?'' दुसरी म्हणाली, ''काहीतरीच काय विचारतेस? रात्रंदिवस जे नाव मी जपते त्याची मोजदाद कोण ठेवणार?'' तेव्हा नामदेवांना मुक्ताबाईंच्या हसण्याचा अर्थ उलगडला.

या रागात व या चपराकीतही मातेचे वात्सल्यच दिसून येते. हे त्यांनी निंदा करण्यासाठी केलेले नसते, लेकराच्या हितासाठी केलेले असते. त्यामुळे यात सणकांडीपणा ऐवजी मला लेकराच्या हितासाठी दक्ष असलेली माताच दिसते.

१४०० वर्षे तप करणाऱ्या तापी नदीच्या तीरावरील चांगदेवाला असेच त्यांनी 'कोरा' म्हटले होते. निवृत्तिनाथांनी लगेच तिला सावरले होते, 'वेडेवाकडे लिहिण्याऐवजी कोरा असणे चांगले. त्यावर चांगले लिहिता येते' आणि त्यामुळे त्या कोऱ्यावर चांगले लिहिण्याचे काम त्यांच्यावरच सोपवले गेले.

तेरा वर्षे वयाच्या सुकुमार बालिकेने करुणामयी, वात्सल्यरूपी

गुरूमाऊलीच्या विमल- ज्ञानाधिकार-सिद्ध भूमिकेवरून वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, हठयोगसंपन्न चांगदेवास 'आत्मज्ञानप्राप्तीचा' उपदेश दिला.

'चतुर्दश शत वयाते लोटती । परी नाही गेली मनोभ्रांती'

अशी चांगदेवांची स्थिती होती. मुक्ताबाईंनी त्यांना पाळणा म्हटला आहे,

निर्गुणाचे डहाळी पाळणा लाविला । तेथे सुत पहुडला मुक्ताईचा ।।
निज निजबाळा न करी पै आळी । अनुहात टाळी वाजविते ।।
तेथे निद्रा ना जागृती भोगी पै उन्मनी । लक्ष तो भेदूनी निजणा तो ।।
निभ्रांतपाळी पाळणा विनवूनी । मन हे बांधोनि पवन दोरा ।।
एकविस सहस्र सहाशे वेळा बाळा । तोही डोळा स्थिर करी ।।
निद्रा ना जागृती निजसी काई । परियेसी चांगया बोले मुक्ताबाई ।।

चांगदेवांना सिद्धी प्राप्त होत्या पण त्यातच ते अडकले होते. सिद्धी देण्याऱ्यापर्यंत ते पोचू शकले नव्हते. मुक्ताबाईंनी त्यांना त्या सिद्धींच्या अडथळ्यांच्या पुढे नेले. त्यांची बालबुद्धी गेली. त्या बालबुद्धीला पाहूनच त्यांनी चांगदेवांना पाळण्यात घातले. पण हा पाळणा निर्गुणाच्या डहाळीला लटकविला आहे. त्यांना अनाहत टाळी वाजवून त्या झोपवताहेत. बाळाला हट्ट नको म्हणून सांगतात. जिथे निद्राही नाही, जागृतीही नाही अशा उन्मनी अवस्थेत त्या शिष्याला घेऊन जातात. त्यासाठी मन स्थिर करायला हवे. एकवीस सहस्र सहाशे वेळा आपण श्वास घेतो व सोडतो. त्या श्वासांवर मन केंद्रित करावयाचे. हळूहळू मन अमन होईल. तसे झाले की, परब्रह्म प्रकटेल.

'गुण ना निर्गुण शब्दातीत । तेथे तू निश्चिंत बाळा निज ।।
पाळणा लावीला हृदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते ।।
शांति क्षमा विरेह पैं वर्णिती । नाव पै ठेविती अद्वैतासी ।।
वटेश्वर चांगा अवधूत । मुक्ताई शांतावीत ज्ञानदृष्टी ।।

तसाच आणखी एक अभंग-

बाळक चुकले सुकुमार तान्हुलें । त्याने पैं सांडिलें मायाजाळ ।।
जो जो जो जो पुत्रातें निजवी । अनुहात वोवी नि:शब्दाची ।।
मावळली दिशा वाचा पै खुंटली । माया पै भेटली मुक्ताबाई ।।
मुक्ताई म्हणे नांव पैं ठेवीन । सुता बोलाविन वटेश्वरा ।।

दिक्कालातीत नेऊन ठेवले शिष्याला!

हे पाळणे निश्चितच अध्यात्मिक आहेत. पण हे प्रतीक घ्यावेसे वाटले, हे तिच्यातील आईमुळे. आदिशक्तीची ही समदृष्टी आहे. सर्वांना त्या मूळपुरुषापर्यंत पोचवण्याची तिला तळमळ आहे. निवृत्तिनाथांना मांडे खावेसे वाटले व मुक्ताबाईंनी ज्ञानदेवांच्या पाठीवर मांडे केले. त्यातही ही मातृभावनाच दिसून येते. घरातील सर्वांस खाऊ-पिऊ घालून तृप्त करावे ही घरांतील कर्त्या मातेची इच्छाच त्यापाठी आहे.

''निर्गुणाची सेज सगुणाची बाज! तेथे केशीराज पहुडले ।।''
''भावातीत भावो वोगरी अरावो । पाहुणा पंढरीरावो हरि माझा ।।
मुक्ताई संपन्न विस्तारूनि अन्न । सेवी नारायण हरि माझा ।।''
''मन हे वोगरू आदि हरिहरू । करी पाहुणेरु आदिरूपा ।।''

भावातीत भक्ती पंढरीरायाला वाढणारी किंवा मन वाढून-खायला देऊन पाहुणेर करणारी स्त्रीच असू शकते. बाकीचे संत मनाचा लय करतात. ते हरीला खाण्यासाठी देतात. आपले मन त्याने खाऊन टाकले की आपण अमन होऊ, हरीचे मन तेच आपले मन, हरीची इच्छा तीच आपली इच्छा!

अशा रीतीने आपण ज्याला स्त्रीसुलभ वासना म्हणू त्या त्यांच्या ठायी नव्हत्या. त्यामुळे त्यांच्या काव्यात त्या दिसणे शक्य नाही. पण स्त्रीचा मुख्य विशेष म्हणजे तिचे मातृत्व. तिचे वात्सल्य, तिची दुसऱ्याला तृप्त, समाधान करण्याची वृत्ती. इतरांच्या हिताची कळकळ ती मुक्ताबाईंमध्ये ओतप्रोत भरलेली आहे. व खऱ्या संतात ही भावना असते म्हणूनच ते माऊली असतात.


त्या आदिमायेला त्रिवार दंडवत!


डॉ. सौ. अंशुमती अ. दुनाखे
'विन्दांशु' प्लॉट नं. १३, तेजस सहकारी गृहरचना म.,
तेजसनगर, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन : २५३८५०२३


***


'महाराष्ट्रातील स्त्रीसंत पंचक' कल्याणी विशेषांकास **हार्दिक शुभेच्छा!**

सीईटी परीक्षेचे यश तुमच्या 'हातात'









techVentures

exploring business - friendly solutions

सीईटी फॉर्म्युला **(CET Formula)** – सीईटी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठीचे तुमच्या मोबाईलवर एक प्रभावी साधन **(Mobile Application)**

आजकाल विद्यार्थी त्यांच्या मोबाईलचा उपयोग जास्त करून **SMS** करणे किंवा गेम्स खेळण्यासाठी करतात. मोबाईल चा उपयुक्त वापर कसा करता येईल याचा विचा करताना 'सीईटीफॉर्म्युला' ची कल्पना सुचली. सीईटी परीक्षेत प्रत्येक सेकंद हा महत्त्वाचा असतो. एक प्रश्न सोडवायला एक मिनिटापेक्षा कमी वेळ असतो. त्यामुळे **Formulae, definitions** अगदी तोंडपाठ असणे अत्यावश्यक असते. हे लक्षात घेऊन 'सीईटीफॉर्म्युला' विकसित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी जाता-येता, मोकळ्या वेळेत किंवा प्रवासात मोबाईलवरून उजळणी केली तर नक्की फायदा होऊ शकेल. तसेच १२ वी चा अभ्यासक्रम हा पुढच्या शिक्षणासाठी पाया असतो. त्यामुळे हे **Application** सीईटी नंतरही संदर्भ म्हणून वापरता येईल.

विशेष म्हणजे, या **Application** साठी स्मार्टफोन किंवा तत्सम महागड्या मोबाईलची अजिबात आवश्यकता नाही, साधारण मोबाईलवर देखिल हे चालू शकते. आणि विद्यार्थ्यांसाठी म्हणून किंमतही माफक ठेवली आहे.

खास वैशिष्ट्ये :

१. प्रत्येक **Application** मध्ये २०० हून अधिक **formulae/definitions.**

२. एखादा विशिष्ट **Formula** किंवा **definition** पटकन 'सर्च' करण्याची सोय.

३. **Application install** झाल्यावर **GPRS** ची आवश्यकता नाही! सर्व **Formulas / definitions** कायम तुमच्या हाताशी तयार.

उपलब्ध **Applicatoins :**

1. Physics Formulae **2. Physics Definitions**
3. Maths Formulae **4. Chemistry Definitions**

Applications खालील वेबसाईटवरून डाउनलोड आणि खरेदी करू शकता :

www.cetformula.com

Concept and developed by
www.techvsolutions.com
9881094601, 9850664955



मुक्ताईचे ताटीचे अभंग

डॉ. सुधीर पुंडलिक कुलकर्णी

एम्.बी.बी.एस्., डिप्लोमा इन आर्थो., वैद्यकीय व्यवसाय
'सुंदर सहल युरोपची' व मोहोळ काव्यसंग्रह प्रसिद्ध. गीता, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, मनुस्मृती या विषयांवर तसेच वैद्यकीय विषयांवर व्याख्याने.

प्रास्ताविक : ताटी म्हणजे दरवाजा. रूढ अर्थाने घराचा दरवाजा. या अर्थाने ताटीच्या अभंगांची पार्श्वभूमी सर्वांना ज्ञात आहे. पण साकल्याने विचार करता, ज्ञानेश्वर फुरंगटून बसले आहेत आणि मुक्ताई त्यांना दार उघडण्याची विनंती करते आहे, असे दृश्य आपल्या डोळ्यासमोर आणणे जरा जडच जाते. आपल्या साध्या भाषेत सांगायचे तर दोघेही ''पोहचलेली'' माणसे. मग याला ताटीचे अभंग का म्हणतात? थोडा विचार केला तेव्हा लक्षात आले की, ताटी म्हणजे दरवाजा हे जरी खरे असले, तरी तो कोणता दरवाजा? तर तो मनरूपी दरवाजा होय.

ज्ञानदेव विरक्त, उदास (पारमार्थिक अर्थाने) झाले असावेत. त्यांना सम्पृक्तता आली असावी. मनाचा लय झाला असावा. ब्रह्मस्वरूप झाल्याने ते निर्विकार, निर्विचार- स्तब्ध झाले असावेत पण मुक्ताईला जाणीव होती की, ज्ञानदेवांचा जन्म फक्त योगिराज होण्यासाठी नाही तर समाजाला मार्गदर्शन करण्यासाठीही आहे.

दुसरा विचार असा की, ज्ञानदेव संपूर्ण विश्वाच्या काळजीत मग्न झाले. सद्-असद्च्या द्वंद्वात त्यांना असद्विषयी क्रोध वाटू लागला. सद्ची चिंता लागली. जरी या द्वंद्वाचा केंद्रबिंदू सारे विश्व असले तरी द्वंद्व ते द्वंद्वच. मुक्ताईला तेही नको होते. म्हणून तिने ज्ञानदेवाला अधिकाराने चार गोष्टी सांगितल्या.

तिसरा विचार असा की, ज्ञानदेव - मुक्ताई व तद्प्रसंग हे फक्त निमित्त. या निमित्ताने तिने आपल्यासारख्या सामान्यजनांचे प्रबोधन केले. अन्यथा या पोहोचलेल्या व्यक्तींना, सांगणारा कोण- ऐकणारा कोण आणि ऐकणे तरी काय. ती त्रिपुटीच येथे संपून जाते.

मुक्ताईचा अधिकार : चार भावंडांत मुक्ताई धाकटी. सगळेच ब्रह्मरूप. सर्वत्र अभेद. तरी ती मनुष्ययोनीत होती. समाजात वावरताना पदोपदी भेद जाणवल्याने, प्रत्येकाने आपापल्या परीने त्याचे निवारण करण्याचा प्रयत्न केला. तसे करताना प्रत्येकाचे स्वभाव-वैशिष्ट्य कायम राहिले. मुक्ताई निर्भीड, स्पष्टवक्ती, ज्ञानी तर ती होतीच तसेच नम्र, निरहंकारीही होती. साक्षात् निवृत्तिनाथ तिचे गुरू. ती सांगते,

उर्णाचिया गळा बांधिली दोरी । पाहो जाय घरी तंव तंतु नाही ।।१।।
तैसे जाले बाई जंव एकतत्त्व नाही । दुजी जंव साई तंव हे अंध ।।२।।
ऐसी मी हो अंध जात होते वाया । प्रकृति सावया पावली तेथे ।।३।।
मुक्ताई सावध करी निवृत्तिराज । हरिप्रेमे उमज एकतत्त्वे ।।४।।

मी बकरीसारखी होते. गळ्यातली दोरी व खाण्याचे गवत यातील फरक मला ठाऊक नव्हता. मायेलाच मी ब्रह्मस्वरूप मानले. निवृत्तीगुरूंनी मला ज्ञान दिले. इतर अनेक अभंगातही तिने, ज्ञानदेवाने मला कसे मार्गदर्शन केले याचे विवेचन केले आहे.

गुरूकृपा झाली प्रत्ययासी आली ।
कैशी ते कळली सांगा दादा ।।१।।
लेखा नाही आला साधना करता ।
तो कैसा हाता येईल सांगा ।।२।।
व्यास ते वाल्मिकी वर्णिती अपार ।
तयासी हा पार कळला नाही ।।३।।
वेदासी ना कळे, श्रुती वेडावले ।
ते कैसे हाता आले सांगा दादा ।।४।।
इंद्रिया वेगळा मन बुद्धी निराळा ।
सर्वात व्यापला कळे कैसा ।।५।।
मुक्ताबाई म्हणे कैसे ज्ञानराजा ।
संदेह हा माझा फेडोनिया ।।६।।

ज्ञानदेवा, अरे जे वेदांना कळले नाही, व्यास-वाल्मिकींनाही आकळले नाही, सर्वव्यापी असूनही इंद्रियांच्या कक्षेत नाही, ते ज्ञान तुला गुरूकृपेने मिळाले ते मला सांग ना.

अशा रीतीने गुरू निवृत्तींची कृपा, ज्ञानदेवाचे मार्गदर्शन व अखंड साधना यांच्या बळावर मुक्ताईने अधिकार मिळविला होता. तिच्या अभंगात याचा ठसा उमटलेला दिसतो.

जेथे जे पाहे तेथे आहे । उभारूनी बाहे वेद सांगे ।।१।।
सोमकांती झरा कोठील दुसरा । तत्त्वी तत्त्व धरा निजदृष्टी ।।२।।
हेतु मातु आम्हा अवघाचि परमात्मा ।
सोहंभावे सोहं आत्मा सर्वी असे ।।३।।

मुक्तलग खूण मुक्ताई प्रमाण ।
देही देहो सौजन्य निजतेजे ।।४।।

सर्वत्र आत्मतत्त्वस्वरूप श्रीहरीच आहे. वेदातील तत्त्व, देहातील चैतन्य, त्या निजतत्त्वामुळे आहे ही मुक्ततेची खूण मुक्ताईला प्रमाण आहे.

या आत्मतत्त्वाच्या बळावर **तिने नामदेवांना खडसावले –**

झालासी हरिभक्त तरी आम्हा काय ।
आतली ती सोय न ठाऊकी ।।

अरे तू हरिभक्त म्हणवतोस पण स्वअहंकार सोडला नाहीस.

आत्मतत्वी दृष्टी नाहीच पा केली ।
तववरी ब्रह्मबोली बोलुनी काय ।।

सर्वत्र असलेले आत्मस्वरूप ओळखत नाहीस आणि ब्रह्मनिरूपण करतोस हे काही बरे नाही.

चौदाशे वर्षांच्या चांगदेवांना परखडपणे सांगितले,

सांडी ते मांडी मांडी ते सांडी । सांडणे मांडणे दोन्ही नाही ।।१।।
सोहं शून्य बुझा रे भाई । सांगते ऐकते दोन्ही नाही ।।२।।
मी ते काई माझे ते काई । परियेसी चांगया बोले मुक्ताबाई ।।३।।

अरे तू आत्मतत्त्वाला विसरलास. अहंकार अंगिकारलास. तू देहधारी नाहीस. ब्रह्मचैतन्य मिळविणे वा ब्रह्मचैतन्याला मिळणे असे काही नसतेच.

विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाइकु ।
तयाचा विवेकु जाळी परता ।।१।।
षट्शास्त्रवक्ता आणि वितंडवादकु ।
तयाचा विवेकु जाळी परता ।।२।।
योगिया म्हणवी आणि इंद्रियांचा रंकु ।
तयाचा विवेकु जाळी परता ।।३।।
मुक्ताई म्हणे ज्याचा परमार्थ माइकु ।
तयाचा विवेकु जाळी परता ।।४।।

विरक्त होऊन, षट्शास्त्र अभ्यासून, योगासने करून काही होत नाही. अशा व्यक्तीचे ज्ञान खोटे आहे. त्याचा विवेक जाळून टाकावा.

मला सांगा, अशा या मुक्ताईने ज्ञानदेवांना अधिकाराने चार शब्द सुनावले तर ते वावगे ठरेल का? या पार्श्वभूमीवर आपण मुक्ताईचे ताटीचे अभंग अभ्यासण्याचा प्रयत्न करू या !

ताटीचे अभंग

मुक्ताईचे एकूण बारा अभंग ताटीचे म्हणून ओळखले जातात. विद्यावाचस्पती डॉ. अनुराधा कुलकर्णी यांच्या पंचतीर्थ या ग्रंथाला प्रमाण मानून आपण त्यांचा मागोवा घेणार आहोत.

अभंग १

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।१।।
विश्व रागे जाले वन्ही । संतमुखे व्हावे पाणी ।।२।।
शब्द शस्त्रे जाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।३।।
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।

मुक्ताई म्हणते, अरे ज्ञानदेवा, तू योगीराज! विश्वाच्या पसाऱ्यात अणुरेणुसकट सर्व ब्रह्म भरले आहे हे तू जाणतोस. तू पराकोटीचा सहनशील आहेस. चुकलेल्यांना क्षमा करावी, कठोर शब्द उपदेशाप्रमाणे मानावे, तापल्या रागाला शीतल बोलाने शांत करावे, हे तुला माहीत आहे. तेव्हा दार उघडा आता!

अभंग २ :

संत जेणे व्हावे । जग बोलणे सहावे ।।१।।
तरिच अंगी थोरपण । जया नाही अभिमान ।।२।।
थोरपण तेथे वसे । जेथे भूतदया असे ।।३।।
रागे भरावे कवणासी । आपण ब्रह्म सर्व देशी ।।४।।
ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

जे जे भेटे भूत, ते ते भगवंत... असे तूच म्हणतोस ना? येथे रागावणे, राग, रागावून घेणारा – कोणी वेगळा उरतो का? तुला गर्व नाही. अभिमान नाही म्हणून तुला सर्व थोर समजतात. सर्वांप्रती ब्रह्म जाणणारा तू, तेव्हा दार उघड बरे!

अभंग ३ :

संत तेचि जाणा जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ।।१।।
लोभ अहंता नये मना । जगी विरक्त तेचि जाणा ।।२।।
इह पर लोकी सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ।।३।।
मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।

तुला लोभ नाही. शुद्ध ज्ञान तुला आहे. ब्रह्म सत्य, जग मिथ्या, दया-क्षमा, शांती-संतपण, हे तुला चांगलेच ठाऊक आहे. ज्ञानदेवा इहलोक परलोक याविषयी तुझे विचार स्पष्ट आहेत. थोडा विरक्त हो आणि मनाचे दार उघड!

अभंग ४ :

सुखसागरी ठाव झाला । उंच नीच काय त्याला ।।१।।
आपण जैसे व्हावे । देवे तैसेचि करावे ।।२।।
ऐसा नटनाट्य खेळ । स्थिर नाही एक पळ ।।३।।
एकापासूनी अनेक । त्यात आपपर लोक ।।४।।
शून्य साक्षित्वे समजावे । वेद ओंकाराच्या नावे ।।५।।
एके उंचपण केले । घर अभिमानाने गेले ।।६।।
द्वैत टाकून शांती धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।७।।

अरे! सागरात लाटा उसळतात. त्यात छोटी-मोठी, हा प्रकारच खरे तर नसतो. सागर, पाणी, लाटा, त्यांचे विविध आकार, हे क्षणोक्षणी बदलल्यासारखे वाटतात. शून्यातून निर्माण होणारे विश्व शून्यच असते. ते परत शून्यातच लय पावते. आपण किनारी, तटस्थपणे हा दैवी खेळ पहावा. ओंकारसाधनेने हे सहज शक्य होते. मलाच हे कळते असा अभिमान धरून ती तटस्थता घालवू नका. स्व – ब्रह्म-लाटा-तटस्थता हे वेगळे नाही. हो ना? मग शांत व्हा आणि ज्ञानदेवा ताटी उघडा!

अभंग ५ :

वरी जाला भगवा जाण । अंतरी वश्य नाही मन ।।१।।
त्याला म्हणू नये साधू । जगी विटंबना बाधू ।।२।।
आपआपणा शोधुनि घ्यावे । जगी तैसे विरक्त व्हावे ।।३।।
विष ग्रासोग्रासी प्यावे । विवेक नांदे त्याच्या सवे ।।४।।
आशा दंभ दूर करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

ज्ञानदेवा! भगवी वस्त्रे परिधान केल्याने कोणी साधू होत नाही. मन शुद्ध हवे. नाही तर ती साधुत्वाची थट्टा होते. प्रत्येक क्षणी जगाकडे तटस्थतेने पहावे. आत्मपरीक्षण करावे. परिस्थितीचे हलाहल पचवावे. खोटी आशा सोडावी. तेव्हा विवेक जागा होतो. हा सारासार विचार तुम्ही करू शकता. म्हणून सांगते, ज्ञानेश्वरा- दार उघडा!

अभंग ६ :

एक आपण साधू जाले । येर कोण वाया गेले ।।१।।
उठे विकार ब्रह्मी मूळ । अवघे मायेचे गबाळ ।।२।।
माया समूळ नुरे जेव्हा । विश्व ब्रह्म होइल तेव्हा ।।३।।
ऐसा उमज आदि अंती । मग सुखे व्हावे संती ।।४।।
चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

अरे! आपण परिपूर्ण आहोत हे जरी खरे असले तरी इतर काही अगदीच ''हे'' नसतात. मायेमुळे हा जगाचा पसारा भेदमय वाटतो, हे तू जाणतोस. तेव्हा विश्व आणि तू वेगळे उरलेच कुठे? मग असतूक्रोध अन् विश्वचिंता सोडा. दादा आता मन बुद्धी अहंकारापलीकडील दार उघडून मोकळे व्हा!

अभंग ७ :

ब्रह्म जैसे तैशापरी । आम्हा वडील भूते सारी ।।१।।
हात आपला आपणा लागे । त्याला भरू नये रागे ।।२।।
जीभ दातांनी चाविली । कोणे बत्तीशी तोडीली ।।३।।
चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदी नाचे ।।४।।
मन मारुनि उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

या सर्वव्यापी परब्रह्माचा आपण अंशमात्र आहोत. त्याचेच रूप असलेले हे विश्व आपल्यापेक्षा नक्कीच मोठे आहे. दादा, तुला एक सांगू? अरे, आपल्या एका हाताने दुसऱ्या हाताला इजा झाली, आपलीच जीभ आपल्या दाताखाली चावली गेली म्हणून काय आपण त्याला शिक्षा करतो का? लोखंडासारखे कठीण प्रसंगही आपण पचवले आहेत व या उन्मनी अवस्थेपर्यंत आलो आहोत. आता ''स्व'' उरलाच कुठे? ज्ञानदेवा मुक्तीसाठी दार उघडा!

अभंग ८ :

सुखसागर आपण व्हावे । जग बोधे निववावे ।।१।।
बोधा करू नये अंतर । साधूस नाही आपपर ।।२।।
जीव जीवासी पै द्यावा । मागे करू नये हेवा ।।३।।
तरुणोपाय चित्ती धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।

ज्ञानदेवा! साधुत्वाच्या सर्व पायऱ्या ओलांडून आपण आत्मबोध-आत्मज्ञान, प्राप्त केले आहे. हा आत्मबोध समाजाला वाटून द्या. आत्मसुखाच्या सुखसागरात डुंबताना, या इहलोकात राहूनच स्वत: सुखसागर होता येते. आपपर न करता, समष्टीला धरून परमेष्टी होता येते. जिवाला शिव होण्यासाठी हाच तरुणोपाय आहे. हे जाणून ज्ञानेश्वरा, ताटी उघडा!

अभंग ९ :

सांडी कल्पना उपाधी । तिच साधूला समाधी ।।१।।
वाद घालावा कवणाला । अवघा द्वैताचा घाला ।।२।।
पुढे उमजेना काय । बुडत्याचे खोल पाय ।।३।।
एक मन चेष्टा करी । भूते बापुडी संसारी ।।४।।
अवघी ईश्वराची करणी । काय तेथे केले कोणी ।।५।।
पुन्हा शुद्ध मार्ग धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।६।।

अरे, सर्वप्रकारचे भेद अथवा द्वंद्व आणि वाद याच्या पलिकडे आपण आलो आहोत. हे जगत् ईश्वर-इच्छेने साकार झाले आहे. त्यात आपणही आहोतच. मग वाद येतो कुठे? हां, ज्यांनी अजून विश्व व ब्रह्म वेगळे मानले, त्यांचा काहीच दोष नाही. या द्वैताचे निराकरण होईपर्यंत या संसारातच ते रमणार. त्यांचा पाय अधिकच खोलात जाणार. ही सुद्धा ईश्वरेच्छा मानली तर कोणीच काही करणार नाही. तेव्हा सारासार विवेकाची कास धरा अन् ज्ञानदेवा, स्वत:ला आणि त्यांनाही मोकळे करण्याचा दरवाजा उघडा. हीच खरी साधुपुरुषाची समाधी असते.

अभंग १० :

गिरी गव्हर कशासाठी । रागे पुरविली पाठी ।।१।।
ऐसा नसावा संन्यासी । परमार्थाचा होय द्वेषी ।।२।।
घर बांधिले डोंगरी । विषय हिंडे दारोदारी ।।३।।
काय केला योगधर्म । नाही अंतरी निष्काम ।।४।।
गंगाजळ हृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

दादा, संन्यासाने 'एकांतातच' रहावे, 'लोकांतात' नाही, असे नाही. ज्यांचे मन निष्काम व हृदय गंगाजळाप्रमाणे निर्मळ असते, त्यांना राग-लोभ-द्वेष, अर्थ-परमार्थ, घरदार - डोंगर - दऱ्या, सर्व सारखेच असते. फळाची आशा करणारा योगी, विषयांच्या दारोदारी हिंडणारा साधू, काय कामाचा? गंगाजलाप्रमाणे उगमापासून, याच शुद्ध विचारधारेने आपण येथपर्यंत आलो आहोत. आता ब्रह्मसागरात झोकून द्या! दादा, ज्ञानाचा दरवाजा उघडा.

अंभग ११ :

अहो क्रोधे यावे कोठे । अवघे आपण निघोटे ।।१।।
ऐसे कळले ज्याला पूर्ण । जनी तोची जनार्दन ।।२।।
ब्रीद बांधले चरणी । नीच दाविता करणी ।।३।।
वेग क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल जाला ।।४।।
ऐसी दूर दृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

या जनसागराचाच मी अंश आहे, हे ज्याला कळले, तोच जनार्दन होतो. या अवस्थेत क्षणिक क्रोधाची जाणीवही, आत्मस्वरूप होण्यापासून परावृत्त करते. साऱ्या कर्मयोगावर पाणी फिरविते. या आत्मबोधाने जो बांधला जातो, त्याच्याकडून कुकर्म कधीही घडत नाही. आपण या आत्मज्ञानाच्या उंबरठ्याजवळ आहोत. बस – आता समदृष्टी ठेवा आणि दार उघडा!

अभंग १२ :

शुद्ध ज्याचा भाव जाला । दुरी नाही देव त्याला ।।१।।
अवघी साधन हातवटी । मोले मिळत नाही हाटी ।।२।।
अहो आपण तैसे व्हावे । अवघे अनुमानुनी घ्यावे ।।३।।
कोणी कोणा शिकवावे । सार साधूनिया घ्यावे ।।४।।
ऐसे केले सद्‌गुरुनाथे । बापरखुमादेवीकांते ।।५।।
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुदल ठायीचे ठायी ।।६।।
तुम्ही तरुनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।७।।

शुद्ध भावनेने देव पूजला तर देव व आपण वेगळे रहात नाही. हे ज्ञान कोणी कोणाला देत नाही. दिले तरी अनुभवता येत नाही. बाजारात विकत तर अजिबात मिळत नाही. साधना आणि गुरुकृपा या आधारेच ते प्राप्त होते. आपल्या भाग्याने तीर्थस्वरूप व विठ्ठलासमान अशा सद्‌गुरू निवृत्तिनाथांनी हे सार आपल्याला दिले. जीवाचे मुद्दलरूप ब्रह्म, जीवाजवळ असतेच. तुम्हाला हे सारे ज्ञान आहेच. तरी ही मुक्ताई, लडिवाळपणे आणि हक्काने सांगते आहे. हा ज्ञानदरवाजा, सर्वांकरिता उघडा! ब्रह्मस्वरूपाचे दार उघडा!! तुम्ही तरून गेलात, विश्वालाही तारून न्या!!! ज्ञानदेवा, आता या मुक्तासाठी तरी ताटी उघडा !!!

उपसंहार : या अभंगांचे परिशीलन केल्यावर लक्षात येते की, यात या कुटुंबाचा प्रवास वर्णन केला आहे. व्यावहारिक व आध्यात्मिक, दोन्ही अर्थाने. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांचे भोग आणि क्लेश. त्याला त्यांनी दिलेले तोंड, जीवनप्रवासात व आध्यात्मिक वाटचालीत लागणारे खाचखळगे. त्यावर मात करून, व्यक्तीने, समष्टीच्या साह्याने परमेष्टीपर्यंत कसे जावे, याचे विवेचन आहे. मुक्ताईने ज्ञानदेवांना उद्देशून जरी याची रचना केली असली तरी सर्वसामान्यांनीच, आत्मज्ञान कसे मिळवावे व ब्रह्मस्वरूप कसे व्हावे, याचे मार्गदर्शन आहे. मला हे जाणवले की, वस्तुत: मुक्ताईने आपल्यासारख्या सामान्य जनांनाच आपल्या मनाचा दरवाजा उघडायला सांगितले आहे. दंभ-गर्व-आशा-निराशा, आप-पर, ज्येष्ठ-कनिष्ठ, आदि ''सातशे खिडक्या, नऊशे दार'' असलेल्या या मनाच्या चिरेबंदी वाड्याचा दरवाजा, आता उघडा, अशी प्रेमाची विनंती, मुक्ताई करते आहे.

आपण तो, निदान किलकिला करायला काय हरकत आहे?

डॉ. सुधीर कुलकर्णी
२१, पूर्णायन सोसायटी, पं.दीनदयाळ पथ,
डोंबिवली (प.)पी.को.नं. – ४२१२०२. मो. : ९८६९०५४२४७

***



मुक्ताबाई व चांगदेव : गुरू-शिष्य नाते

वामन अच्युत देशपांडे

एम्.ए. (मराठी/सौंदर्यशास्त्र), रिझर्व बँकेत ४१ वर्षे नोकरी
लेखन/प्रवचनं, सुमारे ९१ पुस्तके प्रकाशित. अध्यात्म हा चिंतनाचा विषय. ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध, संतवाङ्मय, गुरुचरित्र, अमृतानुभव, अभिजात मराठी कविता, या विषयांवर बोलायला मला विशेष आवडते.

श्रीसंत निवृत्तीनाथ-ज्ञानदेव-सोपानदेव या अलौकिक, अत्यंत प्रतिभासंपन्न, वैराग्यसंपन्न आणि विवेकसंपन्न भावंडांची अत्यंत लाडकी, त्यांच्या सारखीच अद्वितीय प्रतिभा लाभलेली, तेजस्विनी मुक्ताई ही धाकटी बहीण. संत नामदेव हे सर्वांत भाग्यवान, कारण त्यांना या चारही लोकोत्तर भावंडांचा प्रत्यक्ष सहवास लाभला. मुक्ताई ही आदिमायेचे प्रकट रूप होते असे नामदेवमहाराजांनी ज्ञानदेवांचे चरित्र लिहिताना एका अभंगात म्हटले आहे. मुक्ताई ही पाच संत-कवयित्रींमधली दुसरी संत कवयित्री होती. अवघे सतरा-अठरा वर्षांचे आयुष्य लाभलेल्या मुक्ताईचा अधिकार मात्र अवकाशव्यापी होता. याची तीव्र जाणीव, तिच्या चरित्रावरून जाणवते. जन्मल्या क्षणापासून बहिष्कृत आयुष्य जगलेल्या आणि ताणलेल्या अनुभवांमुळे, अगदी लहान वयात ताणतणांवापलिकडली स्थितप्रज्ञ अवस्था ती प्रत्यक्ष जगत होती. मुक्ताई ही पारदर्शक स्वभावाची होती. मनातला प्रत्येक भाव तिने त्वरित प्रकट केला. वयाने मुक्ताईपेक्षा जवळ जवळ दहा वर्षांनी मोठ्या असणाऱ्या, प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाला भक्तीघास भरवणाऱ्या, श्रीविठ्ठलाशी संवाद साधणाऱ्या नामदेवाचा अहंकार ठेचून काढणाऱ्या छोट्या मुक्ताईचे वर्णन नामदेवमहाराजांनी करताना म्हटले की,

लहानशी मुक्ताई जैसा सणकांडी । केले देशोधडी महान संत ।।
सगळेंची काखेसी घेई ब्रह्मांड । नामा म्हणे पाखांड दिसते मज ।।

मुक्ताईची पारमार्थिक ताकद अक्षरश: आश्चर्यकारक होती. आकाशीची तळपणारी, प्रसंगी भाजून काढणारी जणू ती वीज होती. त्याचा अनुभव सुरुवातीला विसोबा खेचराने घेतला. नंतर नामदेव महाराजांनी घेतला. चौदाशे वर्षे आयुष्य लाभलेल्या योगी चांगदेवाने हा सर्वांग भाजून काढणारा अनुभव घेतला. हटयोगाच्या बळावर चौदाशे वर्षे योगसाधना करूनही आत्मज्ञान प्राप्त झाले नाही म्हणून चांगदेव महाराज प्रथम ज्ञानदेवांना शरण गेले आणि ज्ञानदेवांच्याच सांगण्यावरून चिमुकल्या, सणकांडी मुक्ताईकडून त्यांनी गुरूपदेश घेतला, तेव्हा मुक्ताईचं वय अवघं चौदा वर्षांचं होतं. मुक्ताईला जेव्हा चांगदेव, शिष्य म्हणून शरण गेले, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया काय होती, तर नामदेव म्हणतात,

चौदाशें वरूषें शरीर केलें जतन । बोधाविण शिण वाढविला ।।
नाहीं गुरुमंत्र नाही उपदेश । परमार्थासि दोष लावियेला ।।

स्वत: चांगदेवांनी स्वत:च्या चौदाशे वर्षे योगबळावर जगलेल्या आयुष्याची कुंडली मांडताना उद्गार काढले की,

चौदाशें वर्षें शरीर केले जतन । नाहीं अज्ञानपण गेले माझे ।।

सकल संतगाथेत चांगदेव महाराजांचे सत्त्याहत्तर अभंग आहेत. शिवाय 'तत्त्वसार' नावाचा एक ग्रंथ त्यांनी लिहिला असा एक उल्लेख आढळतो. त्या ग्रंथामधून चांगदेवांनी ज्ञानोपदेश केला. मुक्ताई आणि चांगदेव या गुरु-शिष्य असलेल्या अनोख्या जोडीचा संवाद हा अध्यात्मशास्त्रातला एक परमोच्च बिंदू आहे. स्वत: चांगदेवांनी एका आपल्या अभंगात, गुरूपद बहाल केलेल्या छोट्या मुक्ताईचा अध्यात्म-अधिकार प्रगट करताना म्हटले की,

चांगा म्हणे मुक्ताईची आण । सांगितली खूण वटेश्वरी ।।

चौदा वर्षांच्या मुक्ताईचा ज्ञानाचा अध्यात्मभारला अधिकार ज्ञानदेवांनी स्वत: अनुभवला होता. ज्ञानदेवांनी जेव्हा ताटीचा दरवाजा लावून नामसमाधी लावली तेव्हा मुक्ताईने ज्ञानदेवांना जे साकडे घातले होते ते 'ताटीचे अभंग'. पहिल्याच अभंगातून मुक्ताई ज्ञानदेवांना म्हणते की, ''ज्ञानदेवा, तू योगसिद्ध तर आहेसच, परंतु तू पवित्र अंत:करणाचा, मृदुतम वृत्तीचा संतपुरुष आहेस. सामान्य आणि हीन दर्जाच्या अज्ञानी लोकांनी जरी तुझा अपमान केलेला असला तरी तू तो सहन करायला नको का? तू श्रेष्ठ योगीपुरुष आहेस...''

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ।।
शब्दशस्त्रें झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।
विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

''ज्ञानदेवा, योगी पुरुषापाशी सर्व अपराध सहन करण्याची विश्वताकद हवी. तू या अज्ञ माणसांना क्षमा कर. संपूर्ण विश्व जरी वन्ही होऊन आपल्या ज्ञान अस्तित्वाला जाळू लागले तरी तू पाणी हो आणि ही अज्ञानाची आग आटोक्यात आण. तू संत आहेस. तुझे चित्त शांत-शीतल आहे. या वन्हीच्या ज्वाळा तू सहजपणे आटोक्यात आणू

शकशील. ज्वालाग्राही शब्दांनी सत्पुरुषांनी का बरे स्वत:ला क्लेश करून घ्यायचे. ते शब्द हा उपदेश आहे असे तू मान. कारण तू ज्ञानाचा सागर आहेस. तुला या ज्ञान-अज्ञानाचे खंडण करून सच्चिदानंद अनुभव प्रगट करण्याची विलक्षण ताकद प्राप्त झाली आहे. हे संपूर्ण विश्व परब्रह्माने व्यापलेले आहे हे तूच या मानवी विश्वाला सांग...''

मुक्ताईला लहान वयातच श्रीनिवृत्तीनाथांच्या कृपेने श्रेष्ठ असा ज्ञानाधिकार लाभला होता. म्हणून तर अवघ्या दहाव्या वर्षी, मुक्ताईने ज्ञानदेवांना ताटीच्या अभंगांमधून उपेदश करताना सर्वोत्तम आध्यात्मिक संदेश दिला होता की,

तुम्ही तरोनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

ज्ञानदेवांनी मुक्ताईची ज्ञानभारली उपदेश देण्याची ताकद स्वत: प्रथम अनुभवली आणि म्हणूनच चिमुकल्या मुक्ताईला योगसंपन्न चांगदेवाचे गुरूपद घ्यायला विनंती केली. मुक्ताई-चांगदेव संवादातून मुक्ताबाईची ज्ञानताकद सूर्यप्रकाशासारखी तेजाळून उठली आहे. मुक्ताईची कूट-अभंग-रचना, गूढ योगानुभव प्रकट करते. मुक्ताई या संवादी भाषेतून चांगदेवाची गुरुमाऊली झाली आहे. मुक्ताई या आपल्या संवादी अभंगांमधून चौदाशे वर्षांच्या चांगदेवाला योगिक साक्षात्कार काय झाला, या योगप्रक्रियेतून आध्यात्मिक अनुभव काय आले हे विचारते आहे. या संवादातून चांगदेवाने आपल्या योगिक अनुभवातल्या कूट प्रश्नांना वाणीचे रूप दिले आणि मुक्ताईने गुरुमाऊली होऊन चौदाशे वर्षांच्या चांगदेव बाळाला आपल्या कुशीत घेतले आहे. मुक्ताईने या उत्तरांच्या माध्यमातून आपला योगिक अनुभव योगसंपन्न चांगदेवाला गूढ भाषेत सांगितला आहे. मुक्ताई चांगदेवाशी अनुभवसंपन्न भाषेत बोलली आहे. त्या बोलण्यात मातेच्या भावविश्वाचा ओलावा आहे. चांगदेवाशी संवाद साधताना मुक्ताईचे स्त्रीमन मातेच्या ममतेने सहजपणे फुलातल्या गंधासारखे उमलून आले आहे. चांगदेवाचे गुरू म्हणून तिने जी भूमिका घेतली, त्यातून प्रबोधन केले. मुक्ताईने शुद्ध ज्ञान शब्दांमधून प्रगट केले. मुक्ताई निश्चितपणे ज्ञानसंपन्न आहे, प्रतिभासंपन्न आहे. इतकेच नव्हे तर ती अत्यंत तडफदार आहे. सडेतोडपणा तर तिचे अवघे आयुष्य व्यापून बसलेला आहे. तिच्या वयाचा विचार करता, खूप वेळेला तिचे आपल्याला कौतुकसुद्धा वाटते. परंतु नामदेवांच्या अहंकारी वृत्तीचा तिने ज्या तीव्रपणे धिक्कार केला, नामदेव आपल्यापेक्षा वयाने वडील आहेत, भगवंतभेटीचा अनुभव त्यांनी वारंवार घेतला आहे, मुख्य म्हणजे नामदेव हे भक्तिमार्गातले परमोच्च शिखर आहे हे ठाऊक असूनही मुक्ताईने ज्या पद्धतीने भक्तश्रेष्ठ नामदेवाला धडा शिकवला, तो प्रत्यक्ष अनुभवला तेव्हा नामदेव अक्षरश: गर्भगळीत झाला आणि अक्षरश: त्याने तेथून पळ काढला आणि पंढरीतल्या विठूरायाकडे तो धावत आला. मुक्ताईपाशी आपल्या भावंडांसारखा विवेक म्हणावा तेवढा नव्हता की तिच्या अवतारी जन्माचे रहस्य याविषयी आपले मन विचार करू लागते. कारण मुक्ताईचे सद्गुरू, तिचे नात्याने वडीलबंधू असलेल्या, स्थितप्रज्ञवृत्तीच्या निवृत्तीनाथांनीसुद्धा म्हटले की,

निवृत्तिदेव म्हणे ऐसें म्हणोनये । धन्य भाग्यें पाहे संत आले ।।
आपुले स्वहित करावें आपण । संतांच्या सन्माना चुकों नये ।।
धन्य हो ते नर राहाती पंढरी । श्वान त्यांचे घरीं सुखीं व्हावें ।।
नामदेवा संगे देवाचा हो वोढा । प्रेमें केला वेडा पांडुरंग ।।
निवृत्ति म्हणे, त्यांसी न म्हणे आरे तुरे । बाई ठेवितां बरें डोई माते ।।

निवृत्तिनाथांनी मुक्ताईला संतपुरुषांशी, वडिलधाऱ्यांशी कसे वर्तन करावे, त्यांचा आदरसत्कार कसा करावा हे समजावून सांगितले. परंतु सद्गुरूंच्या या उपदेशाला मुक्ताईने सडेतोड उत्तर दिले की,

म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण । आपणां दर्शन न लगे त्यांचें ।।

या प्रकारची तीव्र प्रतिक्रिया मुक्ताई सहजपणे नोंदवते. शांत चित्त, परब्रह्मस्वरूप भावांसमोर नामदेवांसारख्या श्रेष्ठ संताला ती वठणीवर विनासंकोच आणते. वास्तविक आत्यंतिक ज्ञानाला शांतीचे वज्रकवच लाभले तरच ते ज्ञान लखलखायला लागते. मुक्ताई अतिशय ज्ञानी आहे, परंतु स्वभावाने ती शांत चित्त नाही. तिच्या ज्ञानाला रोखठोकपणे काहीसे बोचरे कंगोरे प्राप्त झालेले आहेत. त्याची भाजणारी तीव्रता जशी नामदेव महाराजांनी अनुभवली तशीच ती चांगदेव महाराजांनीसुद्धा अनुभवली. नामदेव हे भक्तिमार्गी होते तर चांगदेव महाराज योगमार्गी होते. दोघांपाशी प्राप्त झालेल्या शक्तीचा सूक्ष्म अहंकार निश्चित होता. मुक्ताईच्या तीनही भावांना हा सूक्ष्म अहंकार सहजपणे उतरवता आला असता. परंतु हे अवतारी कार्य त्यांचे नव्हते तर ते योगमाया मुक्ताईचे होते. पुरुषी अहंकार स्त्रीशक्तीपुढे नेहमीच लुळापांगळा पडतो. मुक्ताईने हे कार्य सहजपणे पार पाडले. मुक्ताईचे वेगळेपण या भावंडांमध्ये निश्चितपणे जाणवते. जातिव्यवस्था अत्यंत तीव्रपणे समाज अनुभवत असताना, मुक्ताई ब्राह्मण जातीत जन्माला येऊनसुद्धा बहिष्कृत म्हणून आपले आयुष्य, आपल्या अवकाशव्यापी प्रज्ञा लाभलेल्या तीन भावंडांबरोबर प्रत्यक्ष जगत होती. जशा तिच्या तीनही भावांच्या मुंजी करण्याचे ब्राह्मणांनीच नाकारले होते, त्याप्रमाणे मुक्ताईच्या लग्नाचा विचारही कुणाकडूनच केला गेला नव्हता. मुक्ताई अवघी सहा वर्षांची असतानाच त्यावेळच्या ब्राह्मणांनी तिच्या आई-वडिलांना, म्हणजेच देवस्वरूप विठ्ठलपंत आणि रुक्मिणी या दोघांना देहांत प्रायश्चिताची शिक्षा सुनावली होती. लहान वयातच प्रौढत्व प्राप्त झालेल्या मुक्ताईने या तीन संन्यासी भावांचा संसार जिद्दीने आपल्या खांद्यावर उचलला आणि या तिघांचे मातृत्व स्वत:च स्वीकारले. आयुष्यातल्या अनेक संकटांना हीच चिमुकली मुक्ताई आनंदाने सामोरी गेली. मुक्ताईच्या स्वभावातला बोचरेपणा हा परिस्थितिजन्य होता हे आपण तिचे चरित्र अनुभवताना प्रथम लक्षात घ्यायला हवे. तरच मुक्ताई-चांगदेव संवाद हा आपल्या आकलनाचा विषय होईल. मुक्ताईने या अभंग-संवादातून चांगदेवाचा उद्धारच केला आहे. मुक्ताईची भूमिका उद्धारकाची होती. कारण मुक्ताईला तिच्या वृत्ती-प्रवृत्तीला, दुसऱ्याला उपदेश करायला आवडतो. नामदेव-चांगदेवाला उपदेश केला यात फारसे नवल नाही, परंतु तिने ज्ञानदेवांनासुद्धा ताटीच्या अभंगांमधून उपदेशच केला आहे. आपण सर्व मर्त्य प्रापंचिक संदर्भातच वावरत असतो. आपल्यापाशी जरी कितीही ज्ञान असले, आत्म्याच्या साक्षीने जगण्याची क्षमता असली तरी आपल्या भोवतीचा समाज हा सर्वसामान्यच असतो. त्याला टक्कर देत साधु-पुरुषांना जगायचे असते.

याचे अप्रतिम भान मुक्ताईच्या उपदेशपर अभंगांमधून सतत डोकावत असते. त्यामुळे मुक्ताईचे मन या अभंगांमधून डोकावताना त्यातला भाव अतिशय स्पष्ट आणि रेखीव असतो. मुक्ताईच्या वृत्ती या ज्ञानगर्भ जरी असल्या तरी प्रगटीकरणाच्या वेळी या ज्ञानगर्भ वृत्ती उपदेशक होऊनच प्रगट होतात. हा तिच्या अभंगांचा विशेष आहे. चांगदेवांच्या संदर्भात काही अभंगांमधून मुक्ताई सहजपणे आपला प्रामाणिक भाव प्रगट करते. यात ती फक्त जाणीव करून देत असते की, तू चौदाशे वर्षांचा योगी पुरुष असलास तरी अंतरी अजून कोराच आहेस. ते चौदाशे वर्षांचे जणू तान्हे बाळच आहे. योगविद्येच्या जंगलात हे चुकले आणि ज्ञानप्राप्तीचा रस्ता जणू हरवूनच बसले. मुक्ताई म्हणते,

बाळक चुकले सुकुमार तान्हुले । त्यानें पैं सांडिले मायाजाळ ।।
जो जो जो जो पुत्रातें निजवी । अनुहात वोवी नि:शब्दाची ।।
मावळली दिशा वाचा पै खुंटली । माया पैं भेटली मुक्ताबाई ।।
मुक्ताई म्हणे नांव पै ठेवीन । सुता बोलाविन वटेश्वरा ।।

मुक्ताईने आपल्या शिष्य झालेल्या चौदाशे वर्षांच्या बाळाचे नाव वटेश्वर ठेवले. वटेश्वर म्हणजे साक्षात शिवशंकर... मुक्ताईने या आपल्या बाळाला जणू ज्ञानपाळण्यात झोपवले आणि त्याला उपदेशपर झोके देऊ लागली. अनाहत नादातून तिने नि:शब्दाच्या ओव्या गायल्या आहेत. अनाहुत म्हणजे अखंड, निरंतर. अनाहत म्हणजे योगशास्त्रात वर्णन केलेल्या षड्चक्रापैकी हृदयस्थानी असलेल्या चौथ्या चक्रातून, आघात न होता जो नाद उमटतो, जे शब्द उमटतात, त्या हृदयस्थ शब्दांमधून जणू मुक्ताई चांगदेवाला ज्ञानामृत पाजते. स्वत: चांगदेव आणि चिमुकली मुक्ताई हे दोघही योगी आहेत. त्या दोघांमधला हा जो हृदय संवाद आहे, हा मुळात गूढ योगानुभव प्रगट करणारा आहे. हृदयस्थ या चौथ्या चक्राला अनाहतचक्र म्हणतात. जेव्हा प्राणशक्ती या अनाहत चक्रापाशी येऊन पोहोचते तेव्हा मन आणि प्राण एकरूप होऊन जातात. मौखिक शब्दांचा येथे लय होतो. हा क्षण असा आहे की, आपल्या श्रवणेंद्रियांना मग अज्ञानात उमटणारे शब्दही ऐकू येऊ लागतात. जेव्हा साधकाची योगावस्था पूर्ण होते तेव्हा तो सिद्ध होतो. तेव्हा दोन सिद्धांमधला संवाद गूढ भाषेचा आश्रय घेतो. हा जो अनाहतनाद आहे तो योग्याच्या हृदयगाभाऱ्यातच उमटणारा आणि तेथेच पुन्हा लय पावणारा नाद फक्त तो योगीपुरुष स्वत:च अनुभवू शकतो. तो ध्वनी तो स्वत:च ऐकतो. चांगदेव-मुक्ताई संवादातला हा अनाहतनाद संवादातून प्रगट झाला याचा सोपा अर्थ असा की दोघांच्याही श्रद्धेय, पारमार्थिक उच्चावस्थेतला हा जो गूढ भाषाप्रवाह आहे तो त्या दोघांपुरताच मर्यादित होता. किंबहुना असेही म्हणता येईल की, गुरु-शिष्य जेव्हा आध्यात्मिक उच्चतम पातळीवर एकरूप होतात तेव्हाच मौनाची भाषा सुरू होते. त्यावर भाष्य करणे म्हणूनच काहीसे धाष्ट्यीचे ठरते. गूढानुभव शब्द पातळीवर सहसा प्रगट होण्याचे नाकारतात. जोपर्यंत मुक्ताई चांगदेवाचे गुरूपद स्वीकारत नाही तोपर्यंतची तिची भाषा रोखठोक आहे. वागणे रोखठोक आहे. त्या क्षणापर्यंतची मुक्ताई ही चांगदेवाच्या योगसंपन्न वयाचे भान न ठेवता स्पष्टपणे बोलते. परंतु गुरु-शिष्याचे नाते जेव्हा फुलासारखे उमलून येते तेव्हा हृदयस्थ संवाद अनाहतचक्रातून उमलून आलेल्या प्रकाशदायी शब्दांमधून उमलून येतो. त्या दिव्य संवादालाच 'चांगदेव-मुक्ताई' संवाद म्हणतात. या संवादात एकूण सेहेचाळीस अभंग आहेत. तो अत्युच्च असा कूट, गूढ अनुभव आहे. हे अभंग वाचत असताना, आपल्या लक्षात येते की, या गूढ योगानुभावाला अर्थाच्या खोलीत बांधता येत नाही. कारण आपण त्या उंचीपर्यंत पोहोचलेलो नाही. वाचता वाचता त्यातला गूढार्थ आपल्या हृदयाकाशात चांदणे पसरावे तसा शीतल होऊन पसरतो, परंतु अर्थाची ध्रुवदिशा निश्चित करणे खूप कठीण आहे. एका ठिकाणी मुक्ताई चांगदेवाला जो उपदेश करते, ते प्रत्येक साधकभक्ताने मनाशी सतत निनादत ठेवून स्वत: परमेश्वराला सतत शरण जायला पाहिजे. चौदाशे वर्षांच्या योगाने समृद्धावस्थेपर्यंत पोहोचलेल्या चांगदेवाला जन्ममुक्त मुक्ताई मुक्त आयुष्याची बंधरहित ध्रुवदिशा दाखवते.

मुक्त होतासि तो बंध पावसी । आपल्या दोरीं आपण बांधिलासी ।।
सोय धरी मूळ स्थान न सोडी । बंधन तोडी आलियारे ।।
चांगा वटेश्वरी विनवितो दातारा । वायांची संसारा आणियलें ।।

प्रत्येक जीव हा जन्मक्षणी मुक्तच असतो. आपण त्या जीवाला बंधनात टाकतो. विचारांच्या दोऱ्यांनी त्या शुद्ध आत्म्याला करकचून दाबून ठेवतो आणि शरीर भावनेने जगू लागतो. या आत्म्याच्या साक्षीने जगण्याची सोय परमेश्वराने जन्मक्षणी दिली असताना आपणच आपले बंधन लादून घेतो आणि या प्रपंचात आपण ढवळाढवळ करतो. मुक्ताईच्या गुरूपदेशानंतर, ज्ञानयोगी मुक्ताईच्या मातृभावनेतून प्रगट झालेल्या भावाविष्काराच्या भारावलेल्या शब्दांमधून जे अध्यात्मज्ञान चांगदेवाने अनुभवले त्यानंतर चांगदेवाचे हृदयकमळ उमलले हे त्याचे त्यालाच कळून चुकते. आपली ही भावावस्था चांगदेवांनी फार उत्कटपणे प्रगट केलेली आहे.

निरंजन वनीं केशव फुलला । डोंगर शोभला ब्रह्मगिरी ।।
तेथें सुमन झाडीन अनुहातें । शिष्ट अनुभवुनि बुद्धि तोचि जाला ।।
चांगा वटेश्वरीं केशव फुलला । भ्रमर जाला रस घ्यावया ।।

चांगदेव-मुक्ताई संवादाचा आपण जेव्हा वेध घ्यायला जातो तेव्हा एक गोष्ट तीव्रतेने जाणवते की, या अभंगांमधून मुक्ताईने आपले जे योगिक अनुभवविश्व प्रगट केले आहे, तो तिच्या या छोट्या आयुष्यातला परमोच्च अनुभवबिंदू आहे. तो श्रेष्ठ योगिक आविष्कार आहे. भाषा जरी गूढ असली तरी चौदा वर्षांची मुक्ताई चौदाशे वर्षांच्या योगसिद्ध, तपस्वी अशा ऋषितुल्य चांगदेवापेक्षा खूपच मोठी आहे. चांगदेव जर योगसिद्धीमधले आकाश मानले तर मुक्ताई त्यावरले पसरलेले अनंत अवकाश आहे. नामदेवांशी बोलणारी मुक्ताई सणकांडी वाटते तर चांगदेवांशी बोलणारी मुक्ताई प्रत्यक्ष योगमायाच वाटते. संपूर्ण संतवाङ्मयात, विशेषत: स्त्री संतांमध्ये मुक्ताई आपला अनुभवाविष्कार फार उत्कट अशा कूट भाषेत मांडते. या अभंगांमधून प्रगट होणारी मुक्ताई हे एक विलक्षण आश्चर्य आहे. ही भाषा भगवान् श्रीकृष्णासारखी अवतारी पुरुषाची वाटते. मुक्ताईने चांगदेवाचे एकूणच व्यक्तिमत्त्व प्रगट करताना जे अनुभवसिद्ध भाषेत व्यक्त केले आहे ते वाचताना तर आपण आश्चर्यमुग्ध होतो.

देऊळाच्या कळशी नांदे एक ऋषी । तया घातली पुशी योगेश्वरी ।।
दिवसा चांदिणें रात्रीं पडे उष्ण । कैसेनि कठीण तत्त्व जालें ।।
ऋषीं म्हणे चापे कळिंकाळ पैं कांपे ।
प्रकाश पिसे मनाच्या धारसे एक होय ।।
एकट एकलें वायांचि पै गुंफलें । मुक्त पैं विठ्ठलें सहज असे ।।
वैकुंठ अविट असोनि प्रगट । वायांचि आडवाट मुक्ताई म्हणे ।।

योगानुभव आपल्या अनुभवाच्या चिमटीत सहजपणे पकडणारी मुक्ताई हा एक फार मोठा चमत्कार होता. ती कशी होती, तर मुक्ताईच्याच अनुभवसिद्ध भाषेत सांगायचे झाले तर,

मुंगी उडाली आकाशीं । तिनें गिळिले सूर्यासी ।।

चांगदेवांसारख्या श्रेष्ठ योगीपुरुषाला चिमुकल्या मुक्ताईने अक्षरश: या 'चांगदेव-मुक्ताई' संवादातून अक्षरश: गिळून टाकला. अशक्य गोष्ट मुक्ताईने करून दाखवली, ती कशी तर मुक्ताई म्हणते,

थोर नवलाव जाहला । वांझे पुत्र प्रसवला ।।

चांगदेवांसारख्या वयोवृद्ध योगी पुरुषाने चौदा वर्षांच्या मुक्ताईचे शिष्यत्व पत्करणे म्हणजे काय तर, अहंकारीवृत्तीने ज्ञानमंडित सौदामिनीला शरण जाणे. योगाच्या बळावर चौदाशे वर्षे शरीर जगवून ठेवणाऱ्या चांगदेवाच्या लक्षात आले होते की, ही छोटी मुक्ताई लवकरच योगबळावर वीज होऊन योगाचे आकाशच प्रकाशित करणार... मुक्ताई हा अनुभव सांगताना म्हणते,

विंचु पाताळाशीं जाय । शेष माथां वंदी पाय ।।

मुक्ताईने आपली जीवनमुक्तावस्था शेवटी प्रगट करताना म्हटले,

माझी व्याली घार झाली । देखोनी मुक्ताई हांसली ।।

मुक्ताईने आपले श्रेष्ठ असे आध्यात्मिक अनुभवविश्व चांगदेवापुढे प्रगट केले आणि नंतर आलेली श्रेष्ठ अनुभूती या अभंगातून प्रगट केली. तर्कातीत अनुभव तर्कशुद्ध भाषेत मांडला.

मुक्ताईनं चांगदेवांबरोबर जो संवाद केला तो गुरु-शिष्य नात्याचा एक उत्कट आविष्कार होता. हा संवाद साधताना मुक्ताईमधले सुप्त, अव्यक्त मातृत्व प्रगट झाले. चौदाशे वर्षांचे बाळ, त्याचा पाळणा चिमुकल्या मुक्ताईने जोजवला.

अविनाश पाळणा अव्यक्तें विणीला । तेथें पहुडला योगीराज ।।
जो जो जो जो म्हणतसे माया । साकारतीत विजरे चांगया ।।
सोहं सोहं षट्चक्रन्यासे । तुज परिये देता मीच न दिसे ।।
ऐशी निद्रा तुज लागो दे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशा मंत्रा ।।

योगभाषेच्या अभ्यासाशिवाय मुक्ताईची भाषा समजणे केवळ अशक्यप्राय आहे. शब्दांचा अर्थ कळला तरी मुक्ताईच्या योगसमृद्धतेचा अनुभव आपल्याला दूरान्वयाने आलेला नसल्यामुळे मुक्ताईच्या कूट अभंगांमधला गूढार्थ जाणिवेच्या पातळीवर येणे केवळ अशक्यप्राय आहे. एखादे ज्ञानदेव की ज्यांनी चांगदेवाशी आपल्या 'चांगदेव-पासष्टी'तून मित्रसंवाद साधत मुक्ताईच्या गूढ योगअनुभवाला ब्रह्मांडाचा प्रकाश अर्पण केला. मुक्ताई-चांगदेव संवाद ही योगानुभव प्रगट करण्याची सुरुवात आहे. तर चांगदेव-पासष्टी ही त्या अनुभवाचे सर्वोच्च शिखर आहे. मुक्ताई-चांगदेव संवाद समजून घ्यायचा असेल तर चांगदेव-पासष्टीचा प्रथम सखोल अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. विशेषत: मुक्ताई जेव्हा योगी चांगदेवाला म्हणते की,

रूप ना छाया त्रिगुणरहित । ज्योतिस्वरूप हे पा नित्य ।।
जाणे येणे नाहीं निर्गुण पाही । चैतन्य होई शुद्धबुद्ध ।।
मुक्ताई म्हणे चांगयावटेश्वरा । निरूता पाहे स्वयें साकारा ।।

या अभंगामधला गूढार्थ समजून घेण्यासाठी मानसिक पातळीवर त्रिगुणातीत होऊन ब्रह्मअनुभव प्रथम प्रत्यक्ष भोगायची उपासनेची ताकद मिळवणे, सिद्धपुरुष होऊन तो अनुभव नित्य चाखणे हे फार कठीण काम आहे. ज्ञानदेवांसारखे लोकोत्तर संतपुरुषच हा अनुभव अष्टौप्रहर चाखत होते म्हणून ते चांगदेवाशी मित्रासारखे उपदेश करून गेले. परंतु त्या अगोदर मुक्ताईला चांगदेवाला अहंकारमुक्त योगविद्येचा प्रखर अनुभव प्रत्यक्ष शिकवावा लागला. योगमायेलाच हे फक्त शक्य होते. मुक्ताई-चांगदेव-संवाद हा कोशातले शब्द तपासून उलगडण्याइतका सोपा नाही हे मात्र निश्चित...

वामन देशपांडे
१३, प्रियदर्शिनी, अग्रवाल हॉल लेन,
मानपाडा रोड, अयोध्यानगरी जवळ, डोंबिवली, पूर्व ४२१२०१
फोन : ०२५१-२४४०३५६
मो. ९३२४६१५०७७

***



मुक्ताई आणि ज्ञानदेव संवाद

सौ. अनुराधा श्रीकृष्ण कुलकर्णी

बी.ए., व्यवसाय

'सखोल दासबोध अभ्यास' उपक्रमात प्रवेश घेतला आहे.

।। श्रीराम समर्थ ।।

मुक्ताई आणि ज्ञानदेव संवाद

''गुरूकृपेने माझ्या चित्तात रुजलेले ज्ञानाचे बीज आज मी शब्दरूपाने श्रोत्यांच्या मनोभूमीत पेरण्याचा प्रयत्न केला. तेथे ते निश्चितच रुजेल व श्रोत्यांच्या मनात आनंदाचे, आत्मसुखाचे मळे फुलतील. तुम्ही मला जणू एकाग्र चित्ताचा आहेरच केला आहे.'' असे म्हणून ज्ञानदेवांनी सर्वांना वंदन केले. प्रवचन संपले आणि चारही भावंडे घराकडे चालू लागली. अधोवदन मुक्ताईच्या चर्येवर आपल्या दादाबद्दलचा कौतुकमिश्रित अभिमान तरळत होता. तर तिन्हीसांजेच्या प्रकाशातही ज्ञानदेवांचे मुख अधिकच तेजस्वी दिसत होते. मुक्ताईने ज्ञानाची शांत, सुलक्षण, सुहास्य करणारी चर्या हळूच न्याहळली अन् तिने मनोमन आजच आपले प्रश्न दादापुढे मांडण्याचे ठरविले. सर्वजण विसावले पण मुक्ताबाईच्या मनीची अस्वस्थता ज्ञानदेवाने अचूक टिपली.

ज्ञानदेव म्हणाले, ''काय ग ताई? कसला विचार करत आहेस?''

मुक्ताई : ''हे रे काय दादा! मी धाकटी ना तुझ्याहून? मग मला 'ताई' म्हणून चिडवतोस का?''

ज्ञानदेव : ''मुक्ता! अग ताईच काय, तू तर माझी आईच झाली होतीस ना त्या दिवशी? मी रागावून ताटी बंद करून घेतली. अन् तूच कासावीस झालीस. मला समजावत म्हणालीस,

'चिंता क्रोध मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'

तुझ्या या शब्दांनी ताटी तर मी उघडलीच पण माझ्या मनाचे कवाडही मी मोकळे केले. आता मुक्त चित्ताने परमानंद अनुभवू शकलो.''

मुक्ताई : ते तर त्या दिवसापुरतं होतं रे! मी तुला समजावले खरे! पण 'ताटी' तर तूच उघडलीस ना? तू तर आम्हा सर्वांची आता 'माऊली' झाला आहेस. म्हणूनच माझ्या मनाची अस्वस्थता तुलाच जाणवली ना रे !''

ज्ञानदेव : ''होय. ते खरे. पण तुझ्या मनीचे संदेह कोणते ते तर सांगशील?''

मुक्ताई : ''दादा! तू म्हणतोस 'ज्योतीची ही निजज्योती। ती ही मूर्ती उभी विटेवरी।' हे अगदी खरे आहे. ती सावली, मनोहर विठ्ठलमूर्ती पाहिली की, तिच्या अनुपम तेजाने मन कसे आनंदाने भरून जाते. पण आजच्या 'आत्मसंयम योग' प्रवचनात तू म्हणालास की, योगसाधना करताना भ्रूमध्यावर अंतर्दृष्टी स्थिर करून आत्मज्योतिरूप ईश्वराला पहावे. मला अशी ध्यान-धारणा करताना तो विठ्ठल तर तेजरूपच भासतो. त्याला ना रूप ना आकार! आणि मग माझ्या मनात येते,

'विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणू दादा ।
सगुण जरी म्हणू दिसते निर्गुण । वाचेचे भिंग पडले दादा ।
वचन बुडाले स्तब्ध झाले मन । सगुण निर्गुण दोन्ही नाही ।
म्हणे मुक्ताई सांग ज्ञानदेवा । विचार हा बरवा करुनिया ।।''

पांडुरंगाच्या सुंदर सगुण दर्शनात अनुपम तेज अनुभवाला येते. म्हणून त्या निर्गुणाला काही वर्णावे म्हटले तर माझी वाचा कुंठितच होते. म्हणून ज्ञानदेवा! त्या श्रीहरीचे स्वरूप नेमके कसे? ते सुलभ, साजिरे करून तूच सांग कसा!''

ज्ञानदेव : ''मला ठाऊक आहे. आमची सानुली मुक्ता सुजाणही आहे. 'सगुण निर्गुण दोन्ही नाही' असे म्हणणाऱ्या तुला आता मी काय सांगावे? पण तरीही तुझे कोडकौतुक पुरवायचे ना! म्हणून सांगतो झाले! पण माझे सांगणे म्हणजे कसे? तर,

''निवृत्ती प्रसादे ज्ञानदेव लाधला । सुखाचा पै झाला तेणे सुखे ।''

निवृत्तीदादाच्या अनुज्ञेने केलेले हे कथन आहे. गुरूपरंपरेने जे ज्ञान मला प्राप्त झाले ते प्रवाहित करणे माझा स्वधर्म आहे. तत्त्वचिंतनाचा मी वाहक आहे, केवळ निरोप्या आहे.

मुक्ता, अखंड ब्रह्मांडात ओतप्रोत भरूनही उरलेला तो परमेश्वर खरोखरच मन, बुद्धीच्या आकलना पलिकडचा आहे. संकुचित देहबुद्धीने आणि मनाने त्याला कधीच पाहता येत नाही. देहबुद्धीने तो सगुण भासतो. तर आत्मबुद्धीने निर्गुण भासतो. सद्गुरू निवृत्तिदादा म्हणतात,

''निराकार वस्तु आकारासी आली । विश्रांती पै जाली भक्तजना।
भिवरा संगमी निरंतर समी । तल्लीनता ब्रह्मी उभी असे ।।''

निराकार ब्रह्मवस्तू विठ्ठलाच्या रूपात आकाराला आली. त्यांच्या चरणी भक्तजनांच्या तनामनाला विश्रांती मिळेल.

मुक्ताई तो कसा आहे? तर असा.

सत्य ज्ञान अनंत तेचि गगनाचे प्रापर्ण । नाही रूप गुण वर्ण जेथे ।
तो हा गे श्रीहरी पाहिला डोळेभरी । पाहाते पहाणे दूरि करोनिया ।।

अग, तो श्रीहरी, परमात्मा सत्यस्वरूप आहे. आणि सत्य म्हणजे तरी काय? म्हणजे ज्याला अखंड, कायम अस्तित्व आहेच असे ते सत्य! स्थल काल व्यक्ति सापेक्ष नाही असे ते सत्य. जे सृष्टीच्या आरंभी होते. आताही आहेच आणि कल्पान्तानंतरही जे राहणार आहे ते सत्य. परमात्मा असा सत्यस्वरूप आहे. तो काळाच्या चक्रात बद्ध नाही आणि सृष्टीच्या सीमेत सीमितही नाही. तो परमात्मा नाही, असा एक क्षणही नाही अन् अशी जागाही नाही. तो ज्ञानमय, अनंत, अथांग, असीम, अचिंत्य असून त्याच्यात गगनही सामावले आहे. आणि तरीही तो दशांगुळे उरला आहे. असे त्याचे पुरुषसूक्तातील वर्णन तुला स्मरते ना. मुक्ता! अग त्याला पाहण्यासाठी आपले माझेपण आणि बोलतेपणही विसरावे लागते बरे! 'मी त्याला पहातो' असे म्हटले तर तो दृष्टीआड होतो. 'मी' व 'तो' असा द्वैतभाव जेथे संपतो ना तेथेच तो निर्गुण, निराकार, परमात्मा पाहता येतो. अनुभवता येतो.

''एक नाम हरी द्वैत नाम दूरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।''

मुक्ताई : ज्ञानदेवा! म्हणजे हा परमात्मा सगुण तर नाही. तो ज्ञानमय, तेजोमय आहे. मग त्याच्या ठायी ही भ्रममूलक माया कशी आली?

''मूळ द्वारी स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ती कैशी झाली ।
मायेचा बंबाळा माये एकसरा । इच्याही आधारा सांग दादा ।
ब्रह्मांड व्यापिले आकाश कवळिले । सर्व काही व्यापिले मायेचेनि।
माया कैशी दादा सांगता निर्गुण । मुक्ताबाई म्हणे भ्रांती मिळा ।।''

या मायेचा पसारा इतका वाढला कसा? ही माया कोणाच्या आधाराने वाढली? ती सत्य असल्यासारखी का वाटते? दादा! या मायेचा पसारा बाजूला सारून त्यातून परमात्मतत्त्व कसे रे ओळखावे?

ज्ञानदेव :

''ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्तबाई । सांगेन ते पाही गुरुमुखे ।
निर्गुणाचा बुंद सगुणी उतरला । कर्दम तो झाला एकाएकी ।।''

तुझी शंका अगदी रास्त आहे मुक्ता! वास्तविक परमात्मा हा जाणीव- नेणीवरहित, निर्गुण, निराकार आहे. हे खरे. पण त्याच्या ठायी 'एक: अहं बहुस्याम' असा संकल्प होताच जणु काही त्या तेजोमय परमात्म्याच्या असीम तेजातून एक 'बूंद' तयार झाला. अगदी दवबिंदूच म्हण ना! क्षणिक दिसणारा, अत्यंत मोहक तरीही नश्वर! त्याचप्रमाणे या परमात्म्याच्या तेजोबिंदूतून पंचमहाभूते आणि त्रिगुणासहित अष्टधा प्रकृति निर्माण झाली. पंचकिरणातून जणू काही कर्दम- चिखल तयार झाला. आणि त्या कर्दमाच्या गोळ्यातून सगुण, साकारता आकारास आली. परमात्म्याचा अंशात्मक बूंद सगुणाच्या चौकटीत आला. त्यातूनच चारी खाणीतील जीवमात्र वस्तूमात्र निर्माण झाले. प्रत्यक्ष भगवंत 'गुणत्रय विभाग' विशद करताना म्हणतात,

''मम योनिर्भद्ब्रह्म तस्मिञ्गर्भं दधाम्यहम् ।
संभव: सर्वभूतानां ततो भवति भारत ।।अ. १४/३

प्रकृतिच्या योनीत भगवंतांनी आपले बीज पेरले आहे. आणि विभूतियोग सांगताना ते म्हणतात,

''विष्टभ्याहमिदं कृत्स्नं एकांशेन स्थितो जगत् ।''

हे सर्व विश्व मी माझ्या एका अंशाने धारण करून राहिलो आहे.

म्हणजे असे बघ मुक्ताई! की, प्रत्येक जीवमात्राच्या ब्रह्मरंध्रातून हा तेजोमय, चैतन्यमय बूंद जणू काही मूलाधारचक्रातून प्रवेश करतो व तेथे आत्मशक्तीच्या रूपाने सुप्तावस्थेत वास करतो. म्हणून मला वाटते, ज्याप्रमाणे एकच सूर्य आपल्या तेजोमय किरणांनी सर्व सृष्टीला प्रकाशित करतो, त्याप्रमाणे एकच निर्गुण परमात्मा स्वत:च निर्माण केलेल्या मायेच्या संगाने सगुण रूपात साकार होतो. म्हणून आपण सतत म्हणावे,

''कोणाचे हे घर हा देह कोणाचा ।
आत्माराम त्याचा तोचि जाणे ।''

खरं सांगू मुक्ताई,

रेणू ते निरंजन अणू तेचि माया । माये वचनी देह निपजला ।।

रेणू म्हणजे निरंजन ब्रह्म आणि अणू म्हणजे माया. मायेनेच देह निपजतो. देह हा अशाश्वत पंचमहाभूतांचा बनला असला तरी त्याच देहातील नाभिस्थानी असलेल्या मणिपूरचक्रात आत्मतत्त्वाची वस्ती असते. त्यामुळे जीवाला ब्रह्मस्वरूप रेणूशी एकरूप होण्याची ओढ ही स्वभावत:च असते. पण जेव्हा तो जीव अंतर्मुख होतो, परब्रह्माशी तदाकार होण्याची त्याला इच्छा होते तेव्हाच! अन्यथा तो जीव मायेतच गुंतून पडतो. आणि मायेचा पसारा वाढतच जातो.

मुक्ताई : ''पण बन्धुराज! मला वाटते की,

''सर्वांतुनी वेगळा हाती कैसा येई । म्हणे, मुक्ताबाई सांगा दादा ।
दहा पवनाचा खेळ योगी खेळती । ओढोनिया नेती ब्रह्मांडात ।
कुंडलिनी विवटोनि करिती आकर्षण । रेणूचे दर्शन झाले की नाही।
म्हणे मुक्ताई सांगा ज्ञानेश्वरा । चुके येरझारा चौऱ्यांशीचा ।।''

रेणूरूप निर्गुण परब्रह्म हे शरीरतत्त्वाहून निराळे आहे. आणि जीवाचे अनुभवविश्व तर सर्व ३६ तत्त्वांवरच आधारलेले आहे. मग असे असता त्यापेक्षा वेगळ्या परमात्मतत्त्वाची अनुभूती जीवाला कशी येणार?

दहा वायूंना एकवटून, कुंडलिनी जागृत करून परब्रह्माचे दर्शन घडते का? मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंतची योग्याची साधना सतत अभ्यासाने संभवते. हे खरे. पण त्यापुढे ब्रह्मांडा पल्याड जाणे, शिवशक्तीला सन्मुख होणे केवळ योगाभ्यासाने साधेल का रे दादा? त्यासाठी सद्गुरूंची कृपा हवीच ना?

दादा! ज्या योगे चौऱ्यांशी योनीतील जन्म-मृत्यूच्या येरझाऱ्या चुकतील असा मुक्तीचा मार्ग मला दाखव ना!''

ज्ञानदेव : ''मुक्ता तुझ्या अंतरीची तळमळ नितळ स्वच्छ जिव्हाळ्यासारखी उपजत आहे. म्हणूनच नेमके तेच पुसतेस! तुझ्या सर्व प्रश्नांची उकल आपण सावकाश करू या. मुक्ताई! या परमात्म्याला

जाणण्याचे विविध मार्ग आहेत. कर्ममार्ग. तो प्रत्येकाला आचरण करावाच लागतो. पण निष्काम कर्म केल्याखेरीज आत्मसन्मुखता येत नाही. दुसरा योगमार्ग. जो आजच आपण गीतेच्या ६व्या अध्यायाचे प्रवचन करताना जाणून घेतला. तोच तुला सारांशाने सांगतो. हा मार्ग तसा कठीण आहे. यासाठी मूलबंध, जालंधर बंध व उडियान बंध लावून शरीरातील मुख्य पंचप्राण व उपप्राण रोखून कुंडलिनी जागृत करावी लागते. आधारचक्रात जणू काही सर्पासारखी वेटोळे घालून बसलेली कुंडलिनीशक्ती जागृत करून स्वाधिष्ठान चक्र, मणिपूर चक्र, अनाहत चक्र, विशुद्ध चक्र भेदून ती जेव्हा आज्ञाचक्रात प्रवेश करते त्या वेळी तेथे फक्त ओंकाररूपी अनाहत नाद शिल्लक राहतो व तेजोमय आत्मस्वरूपाची, परमात्म्याची अनुभूती येते. ही साधना अत्यंत खडतर व क्लेशदायक आहेच तसेच ती सद्गुरूकृपेशिवाय फळाला येत नाही.

सद्गुरूंचे आशीर्वाद लाभले की, साधना सुलभ होते. सद्गुरूंना शरण गेलेल्या साधकाचा देहाहंकार पूर्ण लयाला जातो. चित्त शुद्ध होते आणि तो साधनेसाठी समर्थ होतो. मग अशा साधकाला वज्रासन घालून बंध लावणे, दहा पवनांना एकवटणे असे सायास करावे लागत नाही. गुरूकृपेने देहबुद्धीच नष्ट झाली की, रेणूच्या अनंतरूपाचे दर्शन होते. त्याची साधना सहजपणे घडते. कारण मुक्ता! अग सहस्रारात रेणूब्रह्माचा निवास तर अखंड अविरत आहेच. सोऽहं साधनेमुळे त्याच्याशी तदाकार होता येते. वायूमुळेच शब्दोच्चार होतो. आणि सोऽहं उच्चारण हे दहा पवनांहून आगळे आहे. कारण तो आत्म्याचा परमात्म्याकडे होणाऱ्या प्रवासातील एक अनिवार्य, अविरत असा भाव आहे.

मुक्ताई : ''पण दादा, गुरूकृपेचा प्रत्यय आपणास कसा रे येईल?''

''गुरूकृपा झाली प्रत्ययासी आली ।
कैशी ते कळली सांगा दादा।
लेखा नाही आला साधना करता ।
तो कैसा हाता येईल सांगा ।।''

ज्ञानदेव : ''मुक्ता, अग ज्या वेळी ज्ञानप्राप्तीची आंतरिक ओढ निर्माण होते, वाढू लागते. त्यावेळी गुरू अवचितपणे भेटतात. ते आपल्या मुमुक्षू शिष्यावर कृपा करतात. त्यामुळे शिष्याचे सर्व मायाबंध पूर्णपणे सुटतात, तुटतात व शिष्य आपल्या आत्मस्वरूपाशी एकरूप होतो.

तैसा प्राणी असता मायेमाजी भ्रांत । भेटला अवचित गुरुराज ।
केली त्यांनी दया हरपली माया । मुळीचिया ठाया बैसविली ।
ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । गुरूकृपा बाई ऐसी आहे ।

मुक्ता, गुरूकृपेने साधनेचा मार्ग सापडतो.

अखेर देह हे एक साधन आहे. त्यामुळे देहबुद्धीचा त्याग करून 'मी ब्रह्म' असा दृढ संकल्प केल्यावरच साधना ही सुलभ होते. श्रद्धायुक्त अंत:करणाने गुरूवर पूर्ण निष्ठा ठेवली तर जणू काही विहंगम मार्गच सापडतो. आणि मग,

सच्चिदानंद भरला जाले महाशून्य । तया माजी लीन होणे बाई ।
लीन जाले म्हणणे नाही आपपर । म्हणे ज्ञानेश्वर पूर्ण कृपा ।।

मुक्ता अग तुला आता मी आणखी काय सांगू?
ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । या परता नाही उपदेश आता ।।

मुक्ताई : ''ज्ञानदेवा, आज मी खरोखर धन्य झाले.
भावेवीण देव न कळे नि:संदेह । गुरूवीण अनुभव कैसा कळे ।

तुम्हीच माझे गुरू आहात. तुमच्या कृपेने माझी साधना पूर्ण होवो हीच आशा मनी बाळगते. पण दादा! आणखी एक विचारू? तिसरा साधना प्रकार 'भक्तियोग' हा खरोखर वेगळा मार्ग आहे का?''

ज्ञानदेव : ''मुक्ता! अग हा वेगळा प्रकार तर नव्हेच किंबहुना भक्ति शिवाय कर्ममार्ग अथवा योगमार्ग दोन्हीही अपूर्ण आहेत. ज्ञान, कर्म, योग हे मार्ग साधनेचे आहेत तर भक्ती स्वयंफलरूप अशी साक्षात् साध्य आहे. कर्तेपणाचे भान विसरवणारी भक्ती मधुर, अमृतमय आहे.

हरीमुखे म्हणा हरीमुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।
जाणीव नेणीव भगवंती नाही । हरी उच्चारणी पाही मोक्ष सदा ।
सगुण निर्गुण गुणांचे अगुण । हरीवीणे मन व्यर्थ जाय ।।

मुक्ताई : दादा! माझ्यासाठी तर तुझा वाक्प्रवाह अमृतमय आहे. तूच वर्णन केलेल्या गोवत्सासारखी माझी स्थिती झाली आहे.

''वत्स घालयाही वरी । धेनू न वचावी दूरी ।
अनन्य प्रीतीची परी । ऐसीच आहे ।।

वासरू दूध पिऊन तृप्त झाले तरी, त्याला आपली माता आपल्या पासून दूर जाऊ नये असे वाटते. त्याप्रमाणे तुम्ही सतत उपदेश करावा आणि मी सर्वांगाचे कान भरून ऐकत रहावे असे वाटते.''

ज्ञानेदव : ''मुक्ताताई! तुमच्यासारखी भगिनी, शिष्या मिळायला खूप भाग्य लागते बरं! तू योगिनी मुक्ता आहेस. म्हणून आपल्या नावाप्रमाणेच देहात असूनही मुक्तावस्था प्राप्त करून घेण्याचा आदर्श जगासमोर निर्माण कर.

म्हणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई ।
उघडी समाधी होई जगी ।।

ज्यात देह असूनही देहभाव रहात नाही. अशी परमात्म्याशी पूर्ण एकरूपता पावणारी उघडी समाधी घेऊन तू या जगासमोर खऱ्या मुक्तावस्थेचा आदर्श निर्माण कर.''

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. अनुराधा श्री. कुलकर्णी
बी ८, मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स, पुणे-सातारा रोड,
पुणे ४११००९. फोन : २४३७८३८४

मार्गदर्शन : **सौ. अर्चना वैद्य**

(संदर्भ ग्रंथ : डॉ. सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी यांच्या 'पंचतीर्थ' या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात प्रस्तुत लेखातील अभंग आहेत. तसेच श्रीज्ञानदेवांच्या 'ज्ञानेश्वरी' आणि 'हरिपाठाचे अभंग' यातील काही ओव्यांचा, चरणांचा आधार घेतला आहे.)

***



नामदेवाची परीक्षा घेतली मुक्ताईने!

डॉ. ग. वा. करंदीकर

एम.ए. पीएच्डी., पुसद येथे २० वर्षे मराठीचे प्राध्यापक.
गीताधर्म मंडळ पुणे येथे सहकार्यवाह म्हणून कार्यरत.

भातुकलीचे खेळ खेळण्याचे वय असलेल्या मुक्ताईला तिच्या मोठ्या भावंडांच्या स्वाधीन करून, तिच्या आईवडिलांनी या जगाचा निरोप घेतला. तिचे तिघेही मोठे भाऊ आपापल्या विद्येच्या क्षेत्रात रममाण झालेले! ते माधुकरी मागून आणतील, तेव्हा कशीबशी भूक भागवायची. अशा परिस्थितीत मुक्ताई जगाचे व्यवहार मुक्तपणे पाहात होती. तिला सारे समजायचे, पण त्यावर अभिप्राय व्यक्त करावा अशा वयाची ती नव्हती. बहुतेक प्रसंगी ती अबोल राही. अध्यात्माच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे साधन जे 'मौन', ते बालपणीच तिला सहजपणे साध्य झाले. मौनव्रताचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीला एक वेगळी सिद्धी प्राप्त होते. मौन धारण करणारी व्यक्ती बोलते तेव्हा त्या बोलण्यातील सूचक शब्दात अमर्याद सामर्थ्य साठवलेले असते! मुक्ताईच्या वेचक शब्दांच्या प्रभावाने अनेकांच्या जीवनात अनुकूल परिवर्तने घडली आहेत.

असेच केव्हातरी अस्वस्थ झालेले श्रीज्ञानदेव आपल्या झोपडीचे दार बंद करून, उद्विग्न मनाने झोपडीतच बसून राहिले. त्यांची मनधरणी करताना मुक्ताई आपल्या मोठ्या भावाला म्हणाली,

''विश्वरागे झाले वन्ही । संत सुखे व्हावे पाणी ।।
शब्दशस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

(ताटीचे अभंग ३७९५) (१)

मुक्ताईच्या बोलण्याने श्रीज्ञानदेवांचा राग कायमचाच शांत झाला. आपल्या वाग्यज्ञाच्या शेवटी मागितलेल्या 'पसायदानात' श्रीज्ञानदेव म्हणाले,

''जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूतां परस्परे जडो । मैत्र जीवाचे ।।

योगेश्वर चांगदेवाने पाठविलेले कोरे पत्र पाहून, त्यावेळी मुक्ताई म्हणाली, 'या कोऱ्या पत्राप्रमाणेच तो 'कोरा' आहे! पुढे चांगदेवांनी मुक्ताईचे शिष्यत्व पत्करले! भक्तराज श्रीनामदेव या भावंडांना भेटण्याची अशीच एक मनोज्ञ कथा आहे. ती आपण समजावून घेऊ.

त्या दिवशी पंढरपूरच्या श्रीविठ्ठलमंदिरात दुपारची आरती झाली. नेहमीप्रमाणे श्रीनामदेव नैवेद्याचे ताट घेऊन मंदिरातील श्रीविठ्ठलाच्या मूर्तीजवळ आले. गाभाऱ्याचा दरवाजा बंद झाला. मूर्तीच्या मनात आले, ''श्रीनामदेवांनी आणलेला नैवेद्य आपणाला खावाच लागणार. त्याच्या बालपणापासूनचा त्याचा हा हट्ट आपण पुरवीत आहोत. श्रीनामदेवांचे अनुकरण करणारे अनेक शिष्य आहेत. त्यांच्या उपासनेची ही प्रथा पडू लागली तर, आपली किती पंचाईत होईल! 'मानवी आकारात असलेल्या सगुण मूर्तीपुरतेच ईश्वराचे अस्तित्व आहे', असे मानणारे भक्त भाबडे असतात. ईश्वरी अस्तित्वाचा, त्या चैतन्याचा तेजाचा, सर्वात्मकतेचा त्यांना बोध झालेला नसतो.'' आता श्रीनामदेवालाच याची जाणीव करून द्यावी, असे पंढरीच्या श्रीविठ्ठलाने ठरविले.

श्रीनामदेव आणि पंढरीनाथ नैवेद्याचा प्रसाद खाताना आपापली मनोगते बोलत असत. त्यादिवशी पंढरीनाथ श्रीविठ्ठल श्रीनामदेवांना म्हणाले, ''नामदेवा, तुला आळंदीची ती चार भावंडे माहीत आहेत ना? चौदाशे वर्षांचे आयुष्य असलेला योगेश्वर चांगदेव, त्या भावंडांना शरण गेला. आळंदीला जाऊन त्या चारही भावंडांना तू कधी भेटणार?'' श्रीनामदेव म्हणाले, ''पंढरीनाथा, पांडुरंगा, तुला वाटत असेल तर मी आजच आळंदीला जाऊन त्या चारही भावंडांना भेटून येतो.'' श्रीविठ्ठलाने त्याच्या या विचाराला लगेच संमती दिली. ठरल्याप्रमाणे श्रीनामदेव त्या चारही भावंडांना भेटण्यासाठी आळंदीला गेले. ''श्रीनामदेव व श्रीज्ञानदेवादी संतांची भेट'' अर्थात 'भक्ति-गर्व परिहार' या उपशीर्षकाने श्रीनामदेवांनी स्वत: सुमारे तीस अभंगात या भेटीचे सविस्तर वर्णन केले आहे. (२)

संत श्रीनामदेव हे मराठी भाषेतील पहिले चरित्रकार आहेत, तसेच आत्मचरित्रकारही आहेत. त्यांच्या जीवनातील हा महत्त्वपूर्ण योग आहे. जिज्ञासूंनी तो श्रीनामदेव गाथ्यातून अवश्य वाचावा. या लेखात श्रीनामदेवांच्या अभंगाचे संक्षेपाने स्पष्टीकरण केलेले आहे.

श्रीनामदेव आपणाकडे येत आहेत असे श्रीनिवृत्तिनाथांनी पाहिले. सिद्धबेटातील आपल्या झोपडीत 'पंढरीचा प्रेमा घरा आला।' या भावनेने त्यांनी श्रीनामदेवांचे स्वागत केले. त्यांनी श्रीनामदेवांना प्रदक्षिणा

घातली. त्यांना चरणस्पर्श करून वंदन केले. 'देवाचे जवळी आम्ही निरंतर।' 'अंगे परब्रह्म मजपाशी।' असा विचार करून श्रीनामदेवांनी प्रतिनमस्कार केला नाही (अभंग १३३४) पाठोपाठ श्रीज्ञानेश्वरही जागेवरून उठले. त्यांनीही श्रीनामदेवांच्या चरणावर आपले मस्तक ठेवले. श्रीनामदेव मनात म्हणाले, 'आम्हां वडील अधिकारु । यासाठी नमस्कार योग्य आहे।' 'आम्ही देवापाशी असतो सर्वकाळ । येऊन सकळ वंदिताती ।।' आपण या भावंडांना भेटलो याचे श्रीनामदेवांनाही समाधान वाटले. यांना भेटण्याची तळमळ श्रीविठ्ठललाही असते. (अभंग १३३५) त्यानंतर श्रीसोपानदेवही उठले. त्यांनी श्रीनामदेवांना वंदन केले. आपले मातापिता भेटल्याएवढे समाधान श्रीसोपानदेवाला वाटले! (अभंग १३३६)

''आपणापेक्षा मोठे असलेले तीनही भाऊ श्रीनामदेवांना मनापासून नमस्कार करीत आहेत. अभिमानाने त्या नमस्काराचा स्वीकार होत आहे. प्रतिनमस्कार करण्याचे सौजन्य का नसावे? श्रीनामदेवांचा अहंकार एवढा जागृत कसा?'' हे मुक्ताईला कळेना. तिने उद्‌गार काढले-

''अखंड जयाला देवाचा शेजार ।
कां रे अहंकार गेला नाही ।।१।।
मान अपमान वाढविसी हेवा ।
दिवस असता दिवा हाती घेसी ।।२।।
परब्रह्मसंगे नित्य तुझा खेळ ।
आंधळ्या डोळे डोहळे कां बा झाले ।।३।।
कल्पतरूतळवटी इच्छिली ते गोष्टी ।
अद्यापि नरोटी राहिली का ?।।४।।
घरी कामधेनू ताक मागू जाय ।
ऐसा द्वाड आहे जगामाजी ।।५।।
***म्हणे मुक्ताबाई जाई ना दर्शना ।**
आधी अभिमान दूर करा ।।६।। (अभंग १३३७)

(*मुक्ताईचे हे बोलणे नामदेवानीच अभंग रूपाने कथन केले आहे.) असा हा अभंग म्हणून मुक्ताईने श्रीनामदेवाकडे पूर्णपणे पाठ फिरविली.

श्रीनामदेवांनी तिच्या या कृतीकडे रोषाने पाहिले. 'निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताई' अशी केवळ नावे असली तरी खरे आत्मज्ञान भक्तीनेच मिळते. अनेक संत भक्तिबळाने उद्धरून गेले. त्यांची पायधूळ जर मस्तकाला लागली तर आपल्या वंशाचा मुळापासून उद्धार होतो.

''नामा म्हणे मुक्ताबाई ऐका स्पष्ट ।
भक्तिहूनि श्रेष्ठ आणिक नाही ।।६।। अभंग १३३८

श्रीनामदेवांचा भक्तिविषयक हा ताठा, वयाने लहान असलेल्या मुक्ताईच्या पूर्णपणे ध्यानात आला. मुक्ताईने तितक्याच कठोरतेने जे उत्तर दिले, ते तिच्याच शब्दांतून* समजून घेता येईल.

''झालासी हरिभक्त तरी आम्हां काय ।
आतली ती सोय न ठाऊकी ।।१।।
घेऊनि टाळ दिंडी हरिकथा करिसी ।।
हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणे ।।२।।
गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष ।
होशील मुमुक्षू साधक तू ।।३।।
आत्मतत्त्वी दृष्टी नाहीच पा केली ।
तंववरी ब्रह्मबोळी बोलूनि काय ।।४।।
तुझे रूप तुवा नाही ओळखिले ।
अहंतेते धरिले कासयासी ।।५।।
आमुचे तू मूळ जरी पुसतोसी ।
तुझे तू आपैसे पाहूनि घेई ।।६।।
ऐक रे नामया होई आत्मनिष्ठ ।
तरीच तू श्रेष्ठ ज्ञानी म्हणे ।।७।। (अभंग १३३९)

(*मुक्ताई बोल. कथन नामदेवाचे)

'भक्तीने वंशाचा समूळ उद्धार होतो', या श्रीनामदेवाच्या बोलण्यातील खोचकपणा लक्षात घेऊन 'आमच्या मुळाचा तू विचार करू नकोस, तुझे तू पाहावे ।' असे म्हणून पुढे मुक्ताई म्हणते 'तू आत्मनिष्ठ हो.'

'बोलोनिया येणे वाढविला डांगोरा ।
अंतरीचा कोरा गुरुवीण ।।१।।'

संताचा सन्मान कसा करावा हे याला माहीत नाही. देवाच्या मूर्तीजवळ नुसते असून श्रेष्ठत्व येत नाही. 'परिस' सांभाळण्यासाठी मडक्यात ठेवला, त्यावर झाकण घातले तरी परिसाच्या सान्निध्यात असूनही त्या खापराचे सोने होणार नाही. सर्पाला दूध पाजले तरी त्याचे विषच होत असते. तुझ्या ठिकाणी अहंकाराचे विष आहे. (अभंग १३४०)

पुन्हा मुक्ताई म्हणते, 'अमृत टाकून कांजीची आवड धरणाऱ्याला झोपडीची अवहेलना करावीशी कशी वाटते?'

''खरासी अखंड गंगेचे स्नान।
गेले वायाविण जिणे त्याचे।।२।।''

रानगुंजा या पोवळ्यापेक्षा सुंदर दिसल्या तरी अलंकारात त्या शोभून दिसणार नाहीत. 'इंद्रावन' असे फळाचे नाव असले तरी त्याची चव कडूच असते. आकर्षक रंग असली तरी बाहुली बेगडाचीच केलेली असते. बाह्यात्कारी डांगोरा पिटणाऱ्या भक्ताचे दर्शनही मला नकोसे होते. सद्‌गुरू लाभल्याशिवाय संतत्व येत नाही.'' (अभंग १३४१)

''उसाचे शेजारी एरंडाची झाडे । नाही त्या चिपाडे गोडी आली।।१।।
कर्पुरासी झाली दीपाचा शेजार । काय गुणे हरि राहील त्याचा ।।२।।
सागरी लवण टाकिले नेऊन । काय गुण खडेपण उरले त्याचे ।।३।।
तैसा नामदेव विठोबाच्या जागा । काय गुणे या गा कोरेपण ।।४।।
म्हणे मुक्ताबाई* चंदनाचे झाड । अहंता सर्प वेढे गुंडाळिले ।।५।।

(अभंग १३४२)

(* मुक्ताईचे बोल - कथन नामदेवाचे)

संत पाहुणेरा सज्जनाचे घरी । पूजा करिता वरी डोई काढी ।।१।।
करिता सन्मान अंगी भरे ताठा । देवा पै करंटा असूनी काय ।।२।।
अहंता हा खुंट वाढविला चित्ती । न साहे संगती सज्जनांची ।।३।।
पंढरीचे भूषण सांगतो जनासी । नाही या मनाशी तीळ बोध ।।४।।
म्हणे मुक्ताबाई* चांगदेवा वाणी । भजावा सज्जनी नामदेवा ।।५।।
(अभंग १३४३)
(* मुक्ताईचे बोल - कथन नामदेवाचे)

चौदाशे वरुषे शरीर केले जतन ।
बोधावीण शीण वाढविला ।।१।।
नाही गुरुमंत्र नाही उपदेश ।
परमार्थासी दोष लावियेला ।।२।।
स्वहिताचे कारण पडियेले जेव्हा ।
शरण आला तेव्हा अलंकापुरी ।।३।।
गैनीनाथे गुज दिले निवृत्तीला ।
निवृत्तीचा झाला ज्ञानदेवा ।।४।।
ज्ञानदेवी बीज वाढविले जनी ।
तेचि आम्ही तुम्ही संपादिले ।।५।।
म्हणे मुक्ताबाई* तिही लोंकी ठसा ।
नामदेवा ऐसा राहिला का? ।।६।। (अभंग १३४४)
(* मुक्ताईचे बोल - कथन नामदेवाचे)

''**भक्ताची पायधुळी वंदिता कपाळी । वंशही समुळी उद्धरती ।।**'' या संत श्रीनामदेवाच्या उद्गारांनी (अभंग १३३८) मुक्ताईला सात्त्विक संताप आला. त्यामुळे तिने वरील अभंगातून आपले स्पष्टपणे मत सांगितले. श्रीनिवृत्तिनाथांना मुक्ताईच्या संतापाचे कारण समजले, असले तरी ''घरी आलेल्या अतिथीचा असा पाणउतारा करणे बरे नाही, आपले भाग्य थोर म्हणून असे संत आपल्या घरी येतात. पंढरपुरात देवाच्या सान्निध्यात राहणाऱ्याच्या घरी कुत्रे म्हणून राहावे लागले तरी राहावे. श्रीनामदेवांनी आपल्या प्रेमाने श्रीपांडुरंगालाही वेडा केला आहे. त्याला असे 'अरे-तुरे' म्हणू नये'' असे श्रीनिवृत्तिनाथांनी मुक्ताईला सांगितले. पण '**म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण । आपणा दर्शन नलगे त्याचे ।।६।।** (अभंग १३४५) मुक्ताईच्या या रागात श्रीनामदेवाच्या खऱ्या हिताचा कळवळा होता. म्हणून पुढे ती म्हणते,

''**कुळाळाचे कुंभ भाजल्याविण माती ।**
काय आहे संगती पाणियाची ।।१।।
मेणाची पुतळी घेता करी बरी ।
अग्नीचे शेजारी राहे कैशी ।।२।।
तैसा अधीराशी काय संतसंग ।
मृगजळा तरंग येतील कैसे ।।३।।
ते आजि नवल देखिले डोळा ।
दगड जैसा जळा वेगळेपणे ।।४।।
म्हणे मुक्ताबाई* जाऊ देऊ नये ।
ऐसे सरिसे काय भांडे करा ।।५।। (अभंग १३४६)
(* मुक्ताईचे बोल - कथन नामदेवाचे)

कुलाल आपुल्या घरी भाजवी भाचरी ।
म्हणे जै होईल हरि कृपावंत ।।१।।
हरीसी वरदळ लावितो निशिदिनी ।
धाडिला म्हणोनि तुम्हांपाशी ।।२।।
तुम्ही संतजन उद्धराल तत्काळ ।
नामा लडिवाळ विठोबाचा ।।३।।
राखावे ते ब्रीद करावे पावन ।
धाडा बोलावणे गोरोबाला * ।।४।।
म्हणे मुक्ताबाई भाजले की कोरे ।
काकांचे उत्तर सत्य मानू ।।५।। (अभंग १३४७)
* 'धाडा बोलावणे गोरोबाला'

या चरणातील गोरोबा कोण? यासंबंधी डॉ. केतकी मोडक यांनी आपल्या 'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं ।' या नावाच्या 'संत मुक्ताबाई' व्यक्ती आणि वाङ्मय (३) या आपल्या संशोधनपर ग्रंथात, पृष्ठ ४६ ते ५३ यामध्ये साधार विवेचन करून 'गोरोबा' म्हणजे श्रीगोरक्षनाथ असे सिद्ध केले आहे. जिज्ञासूंनी तो ग्रंथ मिळवून मुद्दाम त्याचे संशोधन घ्यावे. नाथपरंपरेतील एक ग्रंथकार शिवकल्याण यांच्या 'नित्यानंदैक्यदीपिका' या ग्रंथात पुढील ओव्या आलेल्या आहेत.

असो हे एकाठेलावयाचिमातु । आता तोचि श्रीगोरक्षनाथु ।
जो श्रीआदिनाथाचा नातू । मच्छेंद्रद्वारा ।।
तो तैसाचि रसु वोसंडला । तव मुक्ताबाईया प्राशिला ।
प्राशुन हौसाचि उरला । तो श्रवटेश्वरा दिधला ।।

या ओव्यांच्या आधारे श्रीगोरक्षनाथांचा आणि मुक्ताईचा नाथपंथीय संप्रदायाचा संबंध स्पष्ट दिसतो. श्रीनामदेवांच्या निवेदनपर अभंगातील १३४८ वा पुढील अभंग हा गोराकुंभार या भक्तापेक्षा श्रीगोरक्षनाथांनाच उद्देशून असावा, असे लक्षात येते - मुक्ताई म्हणते -

''**गोरा जुनाट पै जुने ।**
हाती थापटणे अनुभवाचे ।।१।।
परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी ।
वैराग्याचे वरी पाल्हाळला ।।२।।
सोऽहं शब्दे विरक्ती उरली अंबरी ।
पाती अणुभरी पाहिले पण ।।३।।
म्हणे मुक्ताबाई घालू द्या लोटांगण ।
जाऊ द्या शरण अव्यक्तासी ।।४४।। (अभंग १३४८)

हे मुक्ताईचे शब्द श्रीनामदेव आपल्या कथनात सांगतात 'अव्यक्तासी' हा शब्द संत गोराकुंभार यांना शोभत नाही! त्या अव्यक्ताला हातोहात शरण जाण्याची पात्रता मुक्ताईचीच आहे. हे तिच्या तीनही बंधूंना माहीत होते. 'तूच श्रीगोरक्षनाथांना बोलवावे' असे त्यांनी सूचित केले. विजेच्या वेगाने ती आकाशात स्थिरावलेल्या

श्रीगोरक्षनाथांना घेऊन आली. ते कथन यौगिक अनुभवाचे आहे.
मोरीयांचा चुरा फेकिला अंबरी ।
विजूचिया परी कीळ झाले ।।१।।
जरी पितांबरे नेसविली नभा ।
चैतन्याचा गाभा नीळबिंदू ।।२।।
तळीपरी परसे शून्याकार झाले ।
सर्पाचीहि पिले नाचू लागे ।।३।।
कडकडोनी वीज निभाली ठांयीचे ठायी ।
भेटली मुक्ताबाई गोरोबाला ।।४।।
ज्ञानदेव* म्हणे कैसी झाली भेट ।
ओळखिले अविट आपुलेपण ।।५।। (अभंग १३४९)

(***बोल** ज्ञानदेव-मुक्ताईचे - कथन नामदेवाचे)

मूलाधार चक्रापासून जागृत झालेली कुंडलिनी सहस्रारचक्रापर्यंत जाते. त्या योगसमाधीतच विजेच्या वेगाने जाऊन मुक्ताईने ठायीच्या 'ठायीच' श्रीगोरक्षनाथांची भेट घेतली. श्रीज्ञानदेवांनी मुक्ताईला भेटीसंबंधी विचारले, ती म्हणाली अंत्यत आपुलकीने त्यांनी 'ओळखिले अविट आपुलेपण'' योगानुभवाची या चारही भावंडांना अनुभूती होती. सर्वजण अचल समाधीस्थितीत सुखावले. पण गुह्य गुंफेत श्रीनामदेव दिसत नाहीत म्हणून, मुक्ताईचा जीव हळहळतो. श्रीनामदेवांची योग्यता पक्की आहे की, कच्ची आहे, हे कसे ओळखावे ?
''श्रीनिवृत्तिदेव म्हणे मुक्ताईच्या उत्तरे ।
भाजले की कोरे कळो नेदी ।।६।। (अभंग १३५०)
''परस्परे गुह्य करिती भाषण ।
म्हणती महाधन गावा आला ।।१।। (अभंग १३५१)

श्रीसोपानदेवांनीही या गुह्य संवादात भाग घेतला. 'श्रीनामदेव या ठिकाणी पाहुणा आला आहे.
''निर्गुणापासोनि सगुणाची संगती ।
नाही स्वरूपस्थिती अंगा आली ।।५।। (अभंग १३५२)

रत्नाची पारख करणाऱ्या जव्हारियाच्या नजरेने श्रीगोरक्षनाथांनीच पारख करावी असे मुक्ताईने सुचविले.
''प्रथम थापटणे हाणिले निवृत्तीच्या माथा ।
डेरा झाला निका परब्रह्म ।।३।।
तेचि थापटणे ज्ञानेश्वरावर ।
आता कैचे कोरे उरे येथे ।।४।।
तेचि थापटणे सोपानाचे डोई ।
यात लेश नाही कोरे कोठे ।।५।।
तेचि थापटणे मुक्ताबाईला हाणी ।
अमृत संजीवनी उतो आली ।।६।।
तेचि थापटणे नामदेवावर ।
डोई चोळू मोहरे रडो लागे ।।७।।
गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई ।
शून्यभर नाही भाजिला कोठे ।।८।। (अभंग १३५३)

हे 'थापटणे' म्हणजे शिष्याला पात्र झालेली सद्‌गुरूची शक्ती!

श्रीनामदेवाला ते सहन झाले नाही. तो तेथून कसातरी निसटला आणि पंढरपूरला येऊन श्रीविठ्ठलाजवळ आपले गाऱ्हाणे सांगू लागला. श्रीनामदेव म्हणाला, **''आतिथी आदर केला मुक्ताबाई । लाकडा ते डोई फोडिली माझी ।।२।।''** (अभंग १३५४) **''म्हणे मुक्ताबाई चैतन्याचा केर ब्रह्म-अग्नीवर चेतवावा ।।५।।''** (अभंग १३५५) **अंतर बाहेर भाजू आम्ही कुंभ । भरू नियलंब सगळेची ।।१।।'' ''म्हणे मुक्ताबाई पळायाचा पाही । आसन स्थिर नाही नामयाचे''** ।।४।। (अभंग १३५६) **''मुक्ताबाईने तेथे माजविली कळी । हे संतमंडळी कपटी तुझी ।।५।। नामा म्हणे देवा आणिले पूर्व दैवे । गेलो असतो जीवें सगळाची ।।६।।** (अभंग १३५७) **न जाणो माझ्या येतील पाठोपाठी । घालतील मिठी भिडे तुला ।।५।।** (अभंग १३५८) असे गाऱ्हाणे सांगत श्रीनामदेवांनी त्या भावंडाच्या दारिद्र्याचा उल्लेख केला. **''कैकाड्याचे वाणी करिती गुडगुड । मजला हे गूढ उमजेना ।।४।। नामा म्हणे गाती प्रकाशाचे गाणे (आम्हा अघोरवाणे दिसतसे ।।५।।** (अभंग १३५९) त्या भावंडांच्या बद्दल तक्रार करताना श्रीनामदेव श्रीविठ्ठलाला सांगतो की,
''हासती रडती उडती एकमेकांवर ।
आनंदाला पार नाही म्हणती ।।२।।
काय गुणे देव रिझाला त्यावरी । नेसाया फटकुरी जन्म गेला ।।३।।
लहानशी मुक्ताई जैसी सनकांडी । केले देशोधडी महान संत ।।५।।
सनळेची कारवेसी घेई ब्रह्मांडे । नामा म्हणे पाखांड दिसते मज ।।६।।
(अभंग १३६०)

या एकूण प्रसंगात सर्वात लहान असलेल्या मुक्ताईच्या धिटाईचा श्रीनामदेवाला मोठा राग आला. तिनेच 'कळ लावली' ती म्हणजे 'जैसी सनकांडी', अशी तक्रार त्यांनी श्रीविठ्ठलाकडे केली. ताडाची पाती काढल्यानंतर आत जी कांडी असते तिचा काहीच उपयोग नसतो. सरपण म्हणूनच तिचा उपयोग झाला तर झाला! 'सनकांडी' अशा शब्दातून व्यक्त झालेला श्रीनामदेवाचा राग एखाद्या शिवीसारखा वाटतो. ''आपल्या काखेतील झोळीत जणू ब्रह्मांड घेतले आहे, अशा स्थितीत ती वावरते. हे सर्व पाखंड आहे!'' असा श्रीनामदेवाच्या तक्रारीचा रोख आहे. 'आपण श्रीविठ्ठलाच्या नित्य सहवासात असताना, 'तो जमा केलेला केर आहे', 'तो जाळला पाहिजे' असा धाक ते सारेजण मला दाखवित होते. अशी श्रीनामदेवाने तक्रार केली. (अभंग १३६१) 'श्रीविठ्ठला तू माझ्या हातून नैवेद्य घेतोस, त्याची आठवण ठेव. मला पुन्हा त्यांच्या स्वाधीन करू नकोस. माझ्यामागे ते येथे येतील. त्यांच्याकडे मला पुन्हा पाठवू नकोस अशी श्रीनामदेव श्रीविठ्ठलाला विनवणी करतो (अभंग १३६२) त्या साऱ्यांचे वटारलेले डोळे माझाच शोध घेत आहेत असा मला भास होतो आहे. 'भाजा' 'भाजा' असे म्हणत ते माझ्या मागे लागले आहेत. मी कसाबसा जीव वाचवून येथपर्यंत आलो. तू 'पतितपावन' आहेस. त्या शब्दाला जागून तू माझे रक्षण कर. (अभंग १३६३) श्रीनामदेवाचे हे म्हणणे सर्व ऐकल्यावर श्रीविठ्ठल त्याला

म्हणाले, ''तू त्या संतांना विन्मुख करून, फार मोठी संधी गमावलीस. तू 'गव्हार' आहेस. तुझ्या डोक्यावर अज्ञानाची झोप आहे. ''भ्रांतीने तुझी पुरविली पाठी', म्हणून 'तुला सज्जनांच्या गोष्टी कडू वाटत्या' (अभंग १३६४) श्रीविठ्ठलाने त्या चारी भावंडांचीच भलावण केली, आणि श्रीनामदेवाला आज्ञा केली की, ''दीनाहून अति दीन होऊन', त्या संत सज्जनांना शरण जा. त्यांच्या कृपेनेच तुला सर्वत्र माझाच प्रकाश दिसेल.'' त्या सज्जनांचे सांगणे ऐक. सद्गुरूंचा शोध घे. सद्गुरूला शरण जा.'' तेव्हा श्रीनामदेव श्रीविठ्ठलाला म्हणाला की, प्रत्यक्ष तू माझ्या पाठीशी असताना, आता सद्गुरू कशासाठी करू?'' त्यावर श्रीविठ्ठलांनी त्याची समजूत घातली.

''अज्ञान सांडून सेविजे सद्गुरूचरण ।
तुझ्या प्रेमे माया सोंग धरून । लटिका मी तुजपाशी खेळे ।।५।।
जव सद्गुरूंचे नाही सेवन । तंव मी जैसे स्वप्नीचे धन ।।
माझेन न तुटे भवबंधन । सद्गुरू आज्ञेवाचूनि ।।६।।
तेणे नामा सद्गदित झाला । विठोबाच्या चरणी लागला ।।
कोण गुरू पाहिजे केला । ते सांगिजे स्वामिया ।।७।।

तेव्हा श्रीनामदेवाची समजूत काढून, श्रीविठ्ठलाने त्याला सद्गुरूंचा महिमा सांगितला. शेवटी,

कळवळोनि श्रीहरी । नामयाने पोटासी धरी ।
जाय पावशील झडकरी । हस्त विसा खेचराया ।। ६०

(अभंग १३६५)

....या सर्व कहाणीत श्रीनामदेवांनी जे प्रसंग शब्दबद्ध केले आहेत, त्यांतून ते, ते प्रसंग 'शब्दचित्रे' होऊन आपल्यासमोर येतात. श्रीनामदेवाचा बालसुलभ हट्टीपणा आणि आदिमायेचा अवतार असलेल्या मुक्ताईची 'आईपणाची भावना', आपणाला जाणवते! श्रीविठ्ठलाच्या लाडक्या भक्ताचे 'आत्मभान' जागे करण्यासाठी, या चारी भावंडांनी जे प्रयत्न केले, ते अलौकिक आहेत. 'सद्गुरूवाचोनि सापडेना सोय' हेच खरे!

डॉ. ग. वा. करंदीकर
६ब९/१० राहुलनगर, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन : ०२०-२५४५८७१४

संदर्भ :

१) ओळीचे अभंगाची श्री सकल संतगाथा
संपादक, गो. शं. राहिरकर, (आवृत्ती ५वी)
२) श्री सकल संत गाथा, खंड पहिला
संपादक काशिनाथ अनंत जोशी, श्रीनामदेवांचे अभंग
आवृत्ती २ री १९६७ (पृष्ठे २२९ ते २३३)
३) कडकडोनि वीज निमाली ठायीचे ठायी
(संत मुक्ताबाई : व्यक्ती आणि वाङ्मय (पृष्ठे ४६ ते ५३)
प्रा. डॉ. केतकी मोडक (आवृत्ती पहिली, २००५)

***



मुक्ताबाईस सनद

डॉ. श्री. अजित कुलकर्णी

बी.ए.एम.अे.पी.एच.डी. (श्रीमत्‌भगवद्‌गीता एक जीवनप्रणाली) निवृत्त रजिस्टार बी.अेम.सी.सी.पुणे. पुस्तके व लेखमाला प्रकाशित. गेली ३० वर्षे दासबोध, भागवत, ज्ञानेश्वरी, भगवान रामकृष्ण व स्वामी विवेकानंद यावर व्याख्याने व प्रवचने. आदर्श शिक्षक पुरस्कार पुणे महानगरपालिका, धर्मभूषण पदवी प्राप्त.

श्री निवृत्तीनाथ, श्री ज्ञानदेव, श्री सोपानदेव आणि यांची बहीण म्हणजे थोर चिन्मयस्वरूपी असलेल्या मुक्ताबाई या होत. जीवनातून सर्वार्थाने मुक्त झाल्याशिवाय शाश्वत ज्ञानाची प्राप्ती होते नाही, शाश्वत ज्ञानानंतर सोपान हाती येतो आणि मुक्तावस्थेत जीव विराजमान होतो. हीच प्रत्यक्ष मुक्ती आपणास (साधक-उपासकांस) खुणावित असते. परमार्थाच्या आनंदाचा झरा अखंडपणे वाहणारा, मुक्तपणे खळखळणारा, मुक्तीचा जीवनप्रवाह आहे. मुक्ताबाई म्हणतात -

१) **मुक्तलगे चित्ते मुक्त पै सर्वदा ।**
रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य ।। मु. गा. १३.१ ।।

२) **मुक्त जीव सदा होती पै रत ।**
हरिनाम सेवित सर्वकाळ ।। ३७.४ ।।

असे असते की, एक तर ज्ञान शाब्दिक आणि अनुभवावर आधारलेले असते. शब्दांतून ज्ञान झाले असे वाटत असते पण त्याचे रूपांतर वा परिणती ही अनुभवात होणे नितांत गरजेचे असते. तेव्हा त्यास परतत्त्वाचा स्पर्श असतो. या परतत्त्व-स्पर्शातून मुक्ताबाईंनी अभंग रचना केली आहे. यात काही 'कूट' अभंग आहेत. तसेच, यात एक ज्ञानदेव - मुक्ताबाई यांचा संवाद आहे. त्यास ''श्री ज्ञानेश्वर महाराजांची मुक्ताबाईस सनद'' असे म्हणतात.

मुक्ताबाईस सनद याचे बहिरंग :

या सनदेत एकूण अठरा अभंग आहे. सनदेतील काही अभंगात कूटस्थले आली आहेत ती प्राधान्याने अनुभवजन्य ज्ञानातून प्रकट झालेली आहेत. यात ज्ञानदेव-मुक्ताई पारमार्थिक संवाद आहे. एक अभंगात गुरुपरंपरा सांगितली आहे. ज्ञानदेवांनी दोन अभंगात परंपरेतून योगाचे मार्गदर्शन व पांडुरंगाचे स्वरूप सांगितले असून, याविषयी मुक्ताईनी ६ प्रश्न विचारले असून ९ अभंगातून ज्ञानेदवांनी उत्तर दिले आहे. परंपरेत १८वा अभंग हा प्रक्षिप्त समजतात. तथापि यातील विचार हे १७ अभंगास धरून आहेत. यात ज्ञान, योग व भक्तीची त्रिवेणी प्रकट झाली आहे. तसेच या सर्वांचे मधुर मीलन समाधी-अवस्थेत व्यक्त होते हा याचा भावार्थ आहे.

योग-साधनेची परंपरा :

श्री ज्ञानदेव हे भगवान विष्णूस्वरूप आहेत, हे समजल्यावर मुक्ताबाईंनी ज्ञानदेवांना उपदेश करण्याची विनंती केली असावी, तेव्हा ज्ञानदेवांनी प्रथम गुरुपरंपरा सांगितली आहे. या अभंगातून आपला नाथ सांप्रदाय असल्याचे सांगितले आहे. मूळ उगमस्थान हे श्री आदिनाथ, उमा महेश्वर, मच्छिंद्रनाथ- गोरस-गहिनी निवृत्ती ही गुरुपरंपरा सांगितली आहे. ''तेथुनि तारक निवृत्ति आम्हांसी।'' 'निवृत्ती' दोन अर्थांनी आहे. एक आपल्याला गुरूस्थानी निवृत्तीनाथ आहेत. तेच तारक आहे. या शिवाय दुसरा अर्थ, ''निवृत्ति तत्त्व हेच तारक आहे. ता म्हणजे तत् - हे शिव बीज र हे विष्णू बीज व क म्हणजे ब्रह्मा बीज आहे. तेव्हा या निवृत्ती तत्त्वांनी आपण तरणार आहे. म्हणजेच उद्धार होणार आहे. उद्धार म्हणजे जीवन विकास (पारमार्थिक) आहे. दुसरा अर्थ उद्धार म्हणजे उत् + धार = प्राण, मन, बुद्धि चित्त १ अहंकार तत्त्व (साम्यावस्था) या प्रवाहाची धार ऊर्ध्वगामी होऊन ब्रह्मरंध्रात परब्रह्माची प्रत्यक्ष अनुभूती येते. हा विचार दिसतो. (अ. १)

परब्रह्म सोहळा दर्शनासाठी साधना :

यातील दुसऱ्या व तिसऱ्या अभंगातून ज्ञानदेव स्वस्वरूपाचा बोध घेण्यासाठी मार्गदर्शन करतात.

डोळ्याचे अग्रभागी म्हणजे साधकांनी स्वस्वरूप पाहावे. ज्ञानदेवांनी नासाग्री म्हणजे,

''सहजे तिही संधी भेट ।
जेथ पल्लवा पडे गाठी ।।'' (ज्ञा. ५.१५२)

ज्या ठिकाणी निसर्गत: दोन्ही भुवयांची भेट होते त्या भ्रूकुटीमध्यात अर्धोन्मीलित स्थितीत अनुभव घ्यावयाचा आहे. हा अनुभव येतो तेव्हा, डोळ्यांतील आत्मप्रभा तेज नित्य नूतनपणाने सतेज होत होत काही कालावधीत प्रखर व्यापक तेजाने जणुकाही दाहीदिशा उजळून संपूर्ण गगनच शोभायमान दिसू लागते.

तेव्हा काय दिसते हे पुढे ज्ञानदेव सांगतात. हा श्रीहरि सत्य ज्ञान स्वरूप असून यानीच गगनही सर्व काही व्यापलेले आहे. त्याला

पाहण्यासाठी त्रिपुटी दृश्य, दर्शन व द्रष्टा हे दूर डोळाभरून पाहावे लागते. द्वैत दूर सारून पहावे लागते. तेव्हा वाचेने याचे वर्णन करता येत नाही. सर्वत्र तो निर्विकार स्वरूपाने भरलेलाच अनुभवायला येतो. ज्ञानदेव अखेरीस सांगतात, ज्याच्या तेजाने सूर्यादि तेजोमय गोल तेजस्वी होतात तीच ही तेजोमय मूर्ती विटेवर उभी आहे. हे तू ध्यानात घे. (अ. २, ३)

मुक्ताईचा प्रश्न पहिला :

विटेवर मूर्ती सगुण रूपात दिसते. मग हिला सगुण म्हणू का निर्गुण म्हणू?

हे तुमचे बोल ऐकून मला संभ्रम झाला आहे. तेव्हा ज्ञानदेवा मला तुम्ही हे विचार करून सांगा.

याला उत्तर ज्ञानदेव देतात, मी जे गुरुमुखातून ऐकले ते असे की, हा पांडुरंग म्हणजे निर्गुणच! पण निर्गुणाचा एक बुंद हा साकार झाला आहे. या सगुणाचा आधार हे केवळ निर्गुण आहे. यातून निर्गुणातून तो गुणमयी बनला आणि पंचमहाभूते, त्रिगुण यांच्या ऐक्यातून हा कर्दम तयार झाला. त्यातून स्थिर चरा-चर सृष्टी निर्माण झाली यात प्राण (चैतन्य-गणपती) प्रविष्ट झाला यातून क्रिया सुरू झाल्या परंतु या सर्वांचा आधार एकच आहे तो म्हणजे निर्गुण ब्रह्माचा! रेणु म्हणजे अणु रेणुत त्याचेच प्रतिबिंब उमटलेले आहे. ही एक दर्शनाची अवस्था आहे. (अ. ४ व ५)

मुक्ताईचा प्रश्न दुसरा :

ज्ञानदेव दादा, मूळद्वारी जर गणपती (चैतन्य) दिसते तर, माया कशी उत्पन्न झाली. या मायेने सर्व निर्माण कसे केले? तिने हे ब्रह्मांड, आकाश कसे व्यापले. मग ही माया निर्गुण कशी म्हणावी? हे जरा सविस्तर सांगावे.

ज्ञानदेव म्हणतात - एकदा का योगसाधनेला लागले की येणारे अनुभव दिव्य असतात. त्यात येणारा अनुभव म्हणजे, रेणु म्हणजे परब्रह्मस्वरूप असून ते निरंजन आहे. रेणु हा कण कण अतिसूक्ष्मात सूक्ष्म कण ते निरंजन रूपात असते. येथे ते गतिमान तेज असते. येथूनच सर्वांची उत्पत्ती झाली आहे. दहा पवन (वायू) निर्माण झाले. म्हणजे या मायेपासूनच आकाशतत्व वायुतत्व, तेजतत्व, आपतत्व, पृथ्वी स्वाभाविक क्रियेतून प्रकट झाले. यातून त्रिगुण मिश्रणांनी जीवसृष्टी निर्माण झाली. तरी सर्वांत अणु-रेणु असूनही तो त्यात निराळा राहिला आहे. हे तू जाणून घे असे ज्ञानदेव सांगतात. अ. ६ व ७)

मुक्ताईचा प्रश्न तिसरा :

ज्ञानदेवा मग हे रेणुस्वरूप ब्रह्म जर सर्वांहुनी वेगळे अलिप्त आहे तर, त्याचे स्वरूप हाती लागते की नाही? ते हस्तगत होऊ शकते की नाही? योगी पवना (वायु)चा खेळ खेळता, कुंडलिनीचा अभ्यास करतात मग त्यांना या ब्रह्माचे (रेणुचे) दर्शन होते की नाही? ते ज्ञानदेवा चौऱ्यांऐशीचा फेरा कशाने चुकेल हे सांगावे.

ज्ञानदेव म्हणतात, योगी लोक प्राणायामाचा (पवनाचा) अभ्यास करून कुंडलिनी शक्ती (अतिइंद्रिय शक्तीचे जागरण - जागृती) जरी केली तरी परब्रह्माचे दर्शन होईल असे होणार नाही. यासाठी गुरुकृपा असावी लागते. त्याशिवाय रेणु (ब्रह्म) चे ज्ञान होत नाही. ब्रह्मरंध्रस्थानी अंतरहित रेणुची दर्शनानुभूती येते. येथे सर्वांचा जो प्राण (सः) तो मीच (अहं) आहे. सोऽहं, अशा सूक्ष्मध्वनीने तो रेणु श्वसनाच्या माध्यमातून ब्रह्मरंध्रात प्रवेश करतो. तेथे निःशब्द स्थिती होते. हे सूक्ष्म असे प्राणतत्व वेगळे आहे. मन, बुद्धि, चित्त ही अतींद्रिय असून, परमात्मा याहून वेगळा आहे. हे गुरुमुळेच समजू शकते. (अ. ८ व ९)

मुक्ताईचा प्रश्न चौथा :

मुक्ताई म्हणतात, श्रीगुरूकृपा झाली याचा अनुभव कसा येणार. हे सांगा. जर साधना न करता ते केवळ कृपेने कसे समजेल? व्यासांपासून वाल्मिकी आदिंनी जरी वर्णन केले तरी त्यांनाही जे समजले नाही. वेदांना श्रुतींनाही हे समजले नाही ते कसे प्राप्त होईल. हा तर इंद्रियाहून वेगळा, मन बुद्धिहून वेगळा असून तो सर्व व्यापी कसा हे कळत नाही. मुक्ताई म्हणते, ज्ञानदेवा हा माझा संदेह दूर करा.

ज्ञानदेव म्हणतात, गुरूकृपा झाली हे कसे ओळखावे तर आकाशात आमावस्येला चंद्र गुप्त होतो ही त्याची एक कला असते. कारण चंद्र असूनही दिसत नाही. याप्रमाणे प्रत्येक प्राणिमात्रात माया असते. यांनी अज्ञान, विस्मरण, भ्रांती निर्माण होते. पण बीजेच्या दिवशी जसा चंद्र दिसतो तसे गुरूकृपेने शरण जाताच मंत्र अनुग्रह, कुंडलिनी शक्तिपात दीक्षा झाल्यावर अंतःचक्षु समान स्वयंभू प्रकाशाचा उदय झालेला स्पष्ट दिसतो. हेच आत्मप्रकाशाचे कोवळे किरण होत. जेव्हा गुरूकृपा होते. मायापाशातून सुटका होते. दया म्हणजे जिव्हाळ्याची भक्ती निर्माण होते. गुरूकृपा होणे म्हणजेच अज्ञान जाऊन ज्ञानप्रकाश प्रज्वलित होतो. म्हणजेच ही मूळठायी म्हणजे अभ्यासाचे योगे ही कुंडलिनी शक्ती. टप्प्याटप्प्याने ब्रह्मरंध्र स्थानाच्या सहस्रदल कमलात असणाऱ्या तेजोरूपात प्रकट होते. यालाच गुरूकृपा झाली हे समजावे. असे ज्ञानदेव सांगतात (अ. १० व ११)

मुक्ताईचा प्रश्न पाचवा :

मुक्ताई म्हणतात, दृष्टांतातील पौर्णिमा म्हणजे आत्मरूपदर्शन हे लक्षात आले आहे. परंतु देहातील देही जो आत्मा जो प्रगट असावयास हवा तो अप्रगट आहे. (अस्त) म्हणजे देहात ज्ञानाची पौर्णिमा असून आत्मचैतन्याचा अस्त असल्यासारखे असते हे कसे? वास्तविक आत्मसाक्षात्कारार्थ मी जे साधन केले, प्रथम कान व नेत्र झाकून, ध्वनिकडे लक्ष दिले तर देहास्थिती कशी होईल?

तेव्हा देह विकल, जड होणे, त्याचे विस्मरण होणे अनिवार्य आहे. वाणी कुंठित झाली. ते दशप्राणाची गडबड झाली ते गुरूंनी युक्ती सांगितली. खरी पण मोक्षगती कशी प्राप्त होणार? तेव्हा दादा माझी शंका दूर करून मी कोणते साधन करू ते सांगा.

ज्ञानदेव म्हणतात, हे मुक्ताई देहात असतानाच देहालाच मुक्ती मिळू शकते हे गुरूगम्य साधन मी तुला सांगणार आहे. तेव्हा देहास मुक्ती मिळण्यासाठी साधन म्हणजे सर्वप्रथम मायेचा संकल्प कर. माया म्हणजे अविद्या, अज्ञान, प्रकृती इ. आहे. यासाठी साधन एक कर - प्रथम

व्रजासन घालावे. मनन करावे. अंतर्ध्वनि ऐकावा. तेव्हा सद्गुरू चैतन्य शक्ती जागृत करतात. मग शक्तीस्वरूपाने ध्यान करावे. नासाग्री दृष्टी ठेवून सोऽहंम्‌ची साधना करावी. असा अभ्यास करू लागले की, रेणु म्हणजे व्यापक प्रकाश ब्रह्मस्वरूप संपूर्ण विश्वभर असून मागेपुढे सर्वत्र तो भरून असल्याचे दिसते. या अनुभवाला सुखसोहळा म्हणता येते. तेव्हा महाशून्य अवस्था म्हणजे या अवकाशात सच्चिदानंद भरल्याची जाणीव होते. त्याच बिंदूशी लीन व्हावे. लीन होणे म्हणजे भेदरहित होणे ऐक्यभाव प्रकट होणे. हीच पूर्णकृपा स्थिती होय असे ज्ञानदेव सांगतात (अ. १२ व १३)

मुक्ताईचा प्रश्न सहावा :

हे ज्ञानदेवा, मजवर गुरूकृपा झाली याचा प्रत्यक्ष अनुभव आला तरी या मनाला काय करू? व्रजासन कसे करावे? मनन कसे करावे? इंद्रियदमन कसे करावे? सोऽहंम्‌ साधना कशी करू? नासाग्री दृष्टी कशी ठेवू? या रेणुत (ब्रह्म) कसे मिसळावे? याबद्दल कृपाकरून सांगावे. मी धाकटी बहिण हे लक्षात घेऊन माझा हट्ट पुरवावा ही विनंती दादा मी करीत आहे.

आत्तापर्यंत सर्व बोधात साधनेच्या दृष्टीने ज्ञानदेवांनी वर्म प्रकट केले असूनही मुक्ताई हा बोध पक्का अंतर्मनावर ठसावा म्हणून विचारीत असाव्यात असे वाटत आहे. ज्ञानदेव म्हणतात, मुक्ताई एक कर सद्गुरू चरणी मन ठेव. म्हणजे सद्गुरूंनी जो उपदेश केलाय, आत्मबोध केलाय, त्याचे स्मरण कर. तेव्हा साधनाही दृढतेने करावीस. सोऽहंची साधना करावीस. इंद्रियाचे अस्तित्व विसरले जावे आणि या अभ्यासातून जी नादाची उत्पत्ती होते, ती एकातून दुसऱ्यात, मग तिसऱ्यात प्रवेश करीत असते. अशा प्रकारे नऊ नादापर्यंत जाता येते. (अनाहत वाजती टाळ। संत म्हणतात) म्हणजे अशा ध्वनि-नादावर लक्ष केंद्रित झाले की, एकासर ब्रह्माचे ज्ञान होते. यासाठी प्रथम उपोषण करून (रिक्त पोटांनी) उजव्या पायाची टाच गुद व शिश्न यामधील शिवणीभागी रेटून बसवून, डाव्या पायाची टाच नाभीखाली दोन-तीन बोटे असलेल्या स्वाधिष्ठान चक्रावर रेटून बसवून पुढील अभ्यासाची तयारी करावी. ही आसन बैठक म्हणजे मूळबंध साधणे होय. मग प्राणायामाच्या अभ्यासाने त्रिवेणी आसन म्हणजे मूळबंध, उड्डीयान जालंदर असे त्रिबंध तयार होतात तेव्हा ॐकाराचा नाद मस्तकात निनादू लागतो. अशी चैतन्यशक्ती शरीरात संचारू लागते. तेव्हा ॐ हाच गुरू, सोऽहं हाच शिव याचा अनुभव घेऊन या दोन्हीचा वेध घेत तादात्म्य व्हावे. मग कोटी सूर्याच्या प्रभेने तेज प्रकाशित होते. तेव्हा खेचरीमुद्रा करून नासाग्री दृष्टी ठेऊन मूळ महातेजाची अनुभूती येते. यावेळी साधकांनी सावध राहावे व याची आत्मानुभूती घ्यावी याशिवाय काय सांगू आता.

तरी पुढे ज्ञानदेव म्हणतात, हे मुक्ताबाई ब्रह्म म्हणजे निर्गुण निराकार आहे. हे समाधी अवस्थेत समजेल पण याचे वर्णन वाणीला करता येत नाही. तेव्हा समाधी अवस्थेत म्हणजे स्वरूप स्थितीत विलीन होते. तेथे वाणी धाव संपते. येथे खुंटला शब्द म्हणजे ही परमोच्च अवस्था असून सर्व शब्द नि:शब्द होतात (खुंटणे = मावळणे) तेव्हा सहज समाधीत मन, बुद्धि, चित्त हे गतिरूप असूनही स्थिर होतात. म्हणतात हाच त्यांचा व्यवहार स्तब्ध होतो. तेव्हा ईश्वरी सामर्थ्य शरीरभर प्रकट झालेले असते. अशावेळी सर्व इंद्रियशक्ती या मन स्वरूपात लीन झाल्याचे अनुभवास येते. त्यावेळी प्राणशक्ती ही स्वस्वरूपात विलीन होते म्हणजे ती निवृत्त होते. मग उरते ती ब्रह्मस्थिती असते. त्यातच अखंड राहिले हेच तेव्हढे राहते. तेव्हा हे मुक्ताई अशाप्रकारे स्वस्वरूपी अखंड राहून जो प्रारब्ध गतीने व्यवहार घडत असतो तोच केला जातो. त्यालाच उघडी समाधी घेऊन जगात वावरणे असे म्हणतात. हीच सहज समाधी होय. असा विचार ज्ञानदेव सांगतात.

यापुढे ज्ञानदेव मुक्ताईस सांगतात - एकूणच ज्ञानदेवांनी यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या अंगाचा विचार क्रमाने सांगत आठवे म्हणजे समाधीची स्थिती तुला सांगितली आहे. यांना सांगण्यासारखे काही नाही. हेच गुह्यज्ञान पूर्वी शंकरांनी पार्वतीला दिले होते. तेच मच्छिंद्रतेला प्राप्त झाले. तेच चौरंगीनाथाला सांगितले. तेच पुढे भर्तुरीला मिळाले मग गहनीनाथांना प्राप्त झाले. मग या निवृत्तीनाथांना प्राप्त झाले. त्यांनी हेच ज्ञान आपणास देऊन आपला उद्धार केला आहे. तेव्हा एकच मुक्ताई लक्षात घे, गुरु निवृत्तीचे चरणीच सर्व सुख आहे. हीच सर्वसुख स्वरूपस्थिती यातच समरस होऊन राहणे हे जीवनाचे कर्तव्य आहे.

नाथसंप्रदायात समाधीचा अनुभव केवळ शक्ती संक्रमातून क्रमाक्रमांनी येत असतो. तेव्हा स्वस्वरूपाशी ऐक्य होऊन ही आत्मानुभूती राहणे महत्त्वाचे आहे. शेवटी ज्ञानदेव म्हणतात, तुला माझ्या सद्गुरूंची श्रीनिवृत्तीनाथांची शपथ आहे की या अठरा अभंगातील अनुभवजन्य गुह्यज्ञान कोणाही अनाधिकारास सांगू नको (अ. १४ ते १८)


अशा प्रमाणे उपदेशप्रणाली, स्वरूपाचे दर्शन, परमात्मास्वरूप, सगुण-निर्गुणाचे ज्ञान, गणेश मूलाधार, माया (अणु) उत्पत्ती, ब्रह्म हा रेणु, त्रिगुणातून विश्वनिर्मिती, कुंडलिनी शक्तीचा अभ्यास, यासाठी गुरूकृपेचे महत्त्व, यातून प्राप्त होणारी पूर्णावस्था, ध्यानाचा अभ्यास, विकलांगता, मोक्षप्राप्ती, इंद्रियदमन, भक्तीयोगून सोऽहं ध्यान, षट्सामर्थ्य, महायोग व समारोप अशा एकूण क्रमाने समाधीयोगाचा एकूण विचार यातून प्रकट होतो. लेखन भय विस्तारापोटी मूळ अभंग यात नसले तरी जिज्ञासूनी मूळ अभंग पाहून, याचा आस्वाद घ्यावा ही एक विनंती.

विद्यावाचस्पती अजित कुलकर्णी
३४६, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
फोन नंबर - ०२०-२४३५६०६१

***



संत जनाबाई



संत जनाबाई वंदन

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम.ए. बी.एड., निवृत्त शिक्षिका, पार्लेटिळक विद्यालय, मुंबई
कविता करण्याची आवड, श्यामरंग- भक्तिगीतांची ध्वनिफित (इ.स. २००४),
सेवानिवृत्तीनंतर पुण्यात कृष्णजन्माष्टीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण.

।। स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास । ठेवावा आदर्श संत जनाबाईंचा ।।
दगडाची दीपमाळ देवाद्वारी उंच खडी
ज्योतीज्योतीत तेवते, भक्तिकथा ग भाबडी ।।
कथा संत जनाईची, शून्यातून विश्वाकारी
देव कोणाचा कैवारी? ज्याची भिस्त देवावरी ।।
गंगाखेडी 'दमा'करुंड, हीन ज्ञाती परी देवभक्त
नित्य पंढरीची वारी, मनी होता एक हेत
''किती भाकावी करुणा? कोंब दे वठल्या वृक्षाला''
'मूल व्हावे' नवस केला। पतीपत्नींनी विठ्ठला ।।
'दमा'च्या स्वप्नात। आला 'विठूराव'
कुळ उद्धरील कन्या। 'दामा शेटी'कडे ठेव ।।
नाव 'जनाबाई' ठेवा। करो दामाघरी सेवा
दृष्टांताची प्रचिती आली। पोर गोडुली जन्मली ।।
घरभरी हर्ष फिरे - पोर हासरी नाचरी
मायबापासंगे घडे - तिला पंढरीची वारी ।।
पाचव्या वर्षीच झाली आई स्वर्गवासी,
'दमा' 'दामा शेटीं'कडे - सोपवी जनीसी ।।
पुढील वृत्तांत सारा जनीच्याच गीती
आत्मकथा सांगणारी 'जनी पहिली संतस्त्री'
''स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास''
साधुसंतांचा संदेश - उद्धरी स्त्रियांस ।।
''आई गेली बाप मेला। आता सांभाळी विठ्ठला।
मतिमंद मी तुझी दासी। ठाव द्यावा पायापाशी।
तुजवीण सखे कोण माझे करील रक्षण?
सकल जीवाच्या जीवना, म्हणे जनी नारायणा ।।''
नामदेव सेवा, हेचि जीवितकार्य। जन्मोजन्मी भक्तिलाभ, त्याच्यामुळे ।।
'प्रल्हाद' 'अंगद' 'उद्धव' रूपे नामा।
'पद्मिणी' 'मंथरा' 'कुब्जा' रूपे जनी।
भक्तियोग घडे, पूर्वजन्मी जैसा। जन्मोजन्मी तैसा, घडो म्हणे ।।
धर्मपिता 'विठू' त्याची धर्मकन्या 'जनी'।
नामदेवाघरी सेवा' त्याचीच ही 'सांगी' ।।
चौदाजण घरचे, जनी पंधरावी गणे।
विठोबाचा संग जनी, नामामुळे म्हणे ।।
तिला सामावून घेती, जरी घरातली।
तरी पायरी दासीची, नाही ओलांडली ।।
ओटी परसू अंगणात, तिची येरझार।
पहाटेपासून राबे, कामे भारंभार ।।
झाडलोट, शेणगोठा, धुणी नदीवरी।
रोज दळणकांडण, भांडी डोणीभरी ।।
जाडेभरडे नेसूचे, शिळेपाके अन्न।
जीर्ण वाकळ पथारी, तरी नाही खिन्न ।।
मुळात जाण पोक्त, तक्रार हाव नाही।
देवां बाहेरून पाही जीवा घालमेल होई ।।
त्यांतही शोधे शांती, नामस्मरणाची ज्योत,
दीनवाण्या अंधारात, तीच प्रकाशाची वाट ।।
तिचा सखा विठुराणा। हिने बोलावे तयाशी,
ओवी दळिता कांडिता, गावी तयाच्या नावाशी ।।
मनातली तळमळ - तया सांगता सांगता
मूर्तिमंत विठुराया झाला 'सांगाती' कांडता ।।
धान्य काढिते जनाई। 'विठू' उखळ झाडितो
थक्क आनंदाने जनी। डोळा पाऊस दाटतो ।।
''फोड आले की रे हातां। नको श्रमू माझ्यासाठी
कशी होऊ उतराई? माय तूचि जगजेठी ।।''
फुले फुलता सुगंधी, मातीलाही वास लागे,
नामयाचे उभे कूळ, विठ्ठलभक्तीमधी रंगे ।।
जनीमध्ये अध्यात्माचे, जुळू आले सत्त्व-धागे,
येणे जाणे भक्तगणी - किती खळाळ ज्ञान संगे ।।
श्रद्धास्थान 'ज्ञानदेव' म्हणे 'ज्ञानाच्या सागरा'
''मरोनिया जावे माझ्या पोटी यावे''
''भाव अक्षरांची गाठी, ब्रह्मज्ञानाने गोमटी

तेहे माय ज्ञानेश्वरी, संतजना माहेश्वरी
'ज्ञानेश्वर' मंगळ मुनी। सेवा करी दासी जनी।।
शिव-विष्णु-ब्रह्म-माया तीर्थ जणू इंद्रायणी।।
'वारकरी पंथ' ध्वजा, नामदेवामुळे लाभ
संतमंडळींशी स्नेह-गुरुबंधुभगिनी संग।
नामदेवांची कीर्तने, जनी दंग श्रवणात
भावविभोर भक्तीचे, हृदी अभंग-तरंग।।
संतमंडळी एकेक 'विठुबापाची लेकुरे'
त्यांना कडेखांद्यावरी विठुमाऊली सावरे
तोचि 'निवृत्तीला मोक्षपद देई' सुचविते
'ज्ञानेश्वर पुढे चाले' मार्गदर्शन सांगते
'चोखा जीवा कवटाळिता' जातिभेद संपविते
'बंका कडेवरी' डंका सर्वसमभाव येथे
विठु जनीचा 'लेकुरवाळा' भागवतधर्माची पताका
संघटन, दूरदृष्टी 'जनी' ज्योत क्रांतिरेखा।।
कधी आत्मबोधे जनीने तत्त्वज्ञानी
योगभाषेची मौक्तिके गुंफिली चिंतनी
''श्वेतवर्ण त्रिकुट स्थान....दशमद्वारी गेली जनी''
''शून्यावरी शून्य पाहे....ऐकुनी विस्मित जाहली जनी''
''ज्योत पहा चमकली.....जनी म्हणे निरंजना''
''ज्योत परब्रह्म होय......जनी म्हणे मुक्त होयी''
'नामदेवगाथा – आत्मस्वरूपस्थिती' अभंग अठ्ठावीस साक्ष देती
''जनीचे बोल जसे ब्रह्मरस।'' विठू म्हणे
'देव लिहून ठेवतो' 'ज्ञाना उघडी चांदणे'
''जनीचे अभंग लिहीत नारायण। करिती श्रवण साधुसंत
धन्यतेची जनी। धन्य तिची भक्ति। नामदेव स्तुती। करीतसे।।''
नामदेवही सांगती ''जेव्हा गाते ओवी जनी
जात्यासंगती आवाज साथ देई अन्य कोणी''
एके रात्री विठोबाचे गेले पदक चोरीला
जनीसंगे दळताना देव तिथेच झोपला।।
झाली वेळ 'काकड्या'ची, वाकळ पांघरु जनीचे
जनीच्या घरी पडे, 'रत्नपदक' देवाचे।।
आळ आला जनीवरी, नेले सुळी द्यावयाला
तिच्या आणाभाका कैशा नाम्याने नाही ऐकिल्या?
''अगे शिंपियाचे जनी, पदक नेले दे आणोनि
'म्या नाही नेले जाण, सख्या विठोबाची आण''
संतापली जनी तेव्हा त्रागा केला देवासंगे।
विठोबाला घाम सुटे – ऐशा शब्दे धगधगे।।
''दंडी लावल्या काढण्या। विठू धाव रे धावण्या।
ऐसा येळकोट केला। जनी म्हणे विठो मेला।।''
''जाते सांभाळा नामाला'' सांगे देवा विनवून
देव जागला सत्त्वाला – सूळ गेला विरघळून।।

जनाबाईचे हृदय, सख्यभक्तीचा सागर
भरतीच्या लाटा तैसे, शब्दशब्द अपरंपार।
नामदेवाच्या कीर्तनी, रंगी रंगला श्रीरंगी,
कथाकाव्ये हृदयंगम। जनी सांगे निरूपणी।
'हरिश्चंद्राख्यान' रंगे 'थालीपाक' भोग घ्यावा
चंद्रभागे वाळवंटी विठू रिंगणी नाचावा।।
तिचं अछडं बछडं छकुलं गं
जनी पांघरु पाहते कुंचडं गं।।
'माथा जावळाची वेणी'। वर मोती ग।
कान्हा यशोदेचा रांगे, खाई माती ग।।
रागेजली येशवदा, हाते कवळीले,
गाल हलकेच दाबुन, मुख उघडिले।।
'चौदा भुवने देखिली', डोळे आले भरूनी
देवा, काय मी पाहते? बोले गहिवरूनी।।
भोळी यशोदा! वैकुंठपति खेळे भुवनी।।
देवा, लीला तुझी अगाध। गुण गावे गुंगुनी।।
ओवी अभंगी आजही, पूर भक्तिरसा यावा,
जनाबाई सर्वमुखी, वंद्य रंक आणि रावा।।
तिची असंख्य आख्याने, कूटे-भारुडे-पाळणे
हाती काम – मुखे नाम – बोल तिचे होती गाणे
''दळिता मी कांडिता, तुज गाईन अनंता।
न विसंबे क्षणभरी, तुझे नाम गा मुरारी''
हृदयंगम स्त्रीत्व तेच। दृश्य मनी, 'शब्दझुले'
शब्द शब्द साकारती। भावचित्र रम्य झाले।।
तिची 'चिंतनशीलता' – 'परमार्थी अधिकार'
'शुद्ध भक्तिभाव' सांगे – 'देव भक्त। भक्त देव।।'
लाखातून एखाद्याला आत्मसाक्षात्कार होतो।
निरंजनाच्या माहेरी विठू जनाईला नेतो।।
''बाई मी लिहिणे शिकले, सद्गुरुरायापाशी
जनी म्हणे केली मात। पुसा ज्ञानेश्वरासी''
''माझ्या मनी जे जे होते। ते ते दिधले भगवंते'
देह नेऊनि विदेही केले। शांति देऊनि मीपण नेले
मूळ नेले हे क्रोधाचे। ठाणे केले विवेकाचे
निजपदी दिधला ठाव। जनी म्हणे दाता देव''
जन्म नाही अपुल्या हाती, सत्त्व-धृति-कृति-हाती!
'नामसाधन' करू या भक्ति, ''हीच स्त्रीशक्ति! प्रचीती।।''
।। ॐ तत् सत्।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

आधारभूत ग्रंथ : १) नामदेवगाथा (सरकारी प्रकाशन)
२) निरंजनाचे माहेर (यशवंत पाठक)

सौ. शैला सुहास पटवर्धन
डी-३, प्राजक्ता, कर्वेनगर, पुणे
फोन : ०२०-६५२१८५३१

टीप – बोल्ड अक्षरांतील रचना संत जनाबाई यांच्या आहेत.



नामयाची जनी

सौ. जयश्री नातू

एम्.अे. बीएड.

प्रथमपासून घराच्या आजूबाजूला असलेल्या झोपडपट्टीतील मुलांच्या शिकवण्या घेत. १९८९ व २००५ 'श्रीशारदा मठ'च्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिरमध्ये सेवाभावी शिक्षिका. रामकृष्णमठात कार्यरत. 'प्रज्ञावर्धिनी' उपक्रमांतर्गत १०वीच्या मुलांना इंग्रजी प्रशिक्षण. 'जीवनविकास' नागपूर मासिकात संत साहित्यावर लेखमाला.

(पुनर्मुद्रण : जीवन-विकास, नोव्हेंबर २००७ यांच्या सौजन्याने...)

जनाबाईंच्या चरित्राकडे आल्यावर पणतीच्या मंद आणि स्नेहशील प्रकाशात आल्यासारखे वाचकांना वाटेल. महाराष्ट्रातील थोरामोठ्यांच्या आणि सामान्य-असामान्यांच्याही तोंडी जनाबाईंचे अभंग आज ७०० वर्षे लोकप्रिय होऊन राहिले आहेत.

अतिशय सामान्य कुटुंबात जन्मलेली व असामान्य कोटीत जाऊन बसलेली जनाबाई ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत कवयित्री. तिच्या अभंगातील रसाळपणा, मनमोकळेपणा, उत्कटता हे सर्व गुण दैवी म्हणावे लागतील. तिने जो योगाचा अनुभव चाखला, तो आपल्या साध्या-भोळ्या अभंगांतून वाचकांपर्यंत पोहचवला. जनाबाई अभंगांमधून आपल्याशी जो संवाद साधते ते शब्द जाई-जुईच्या फुलांसारखे कधीकधी हळुवार व मधुर होतात. तिच्या अभंगांचे अंतरंग नवनीतासारखे मृदु आहे. तिच्या प्रत्येक रचनेतून विठ्ठलाच्या भक्तीचे पाट वाहताना दिसतात. अशा या प्रज्ञावंत कवयित्रीचे चरित्र सांगणारे तत्कालीन साहित्य मात्र फारच कमी आहे.

विख्यात संतचरित्रकार महिपती यांनी संत नामदेवांच्या चरित्राच्या अनुषंगाने जाता जाता जनाबाईंचे चरित्र आपल्याला सांगितले आहे. महिपतींच्या सांगण्याप्रमाणे गोदावरीच्या तीरावर मराठवाड्यात श्रीक्षेत्र पैठणच्या जवळ गंगाखेड नावाचे एक गाव आहे. त्या गावी दामाजी व करूंड या दांपत्याच्या पोटी जनाबाईंचा जन्म झाला. तिच्या जन्मसालाबद्दल मात्र बराच वाद आहे. ती नामदेवांपेक्षा १०-१२ वर्षांनी मोठी असावी, असे काही संशोधकांचे म्हणणे आहे; तर नामदेवांपेक्षा ती लहान असावी असेही काही जणांचे म्हणणे आहे. ते काहीही असले तरी जनाबाईंचा जन्म इ.स. १२५० ते १२६० या दरम्यान झाला असावा. कारण खालील ओव्यांवरून नामदेवांचा जन्म जनाबाईंसमोर झाल्याचे कळते.

गोणाईने नवस केला, देवा पुत्र देई मला ।
शुद्ध देखोनिया भाव, पोटी आले नामदेव ।।
दामाशेटी हरूखला, दासी जनीस आनंद झाला ।

यावरून तिचा जन्मकाळ नामदेवांच्या जन्माच्या पूर्वी १२-१४ वर्षे असावा असा अंदाज करता येतो. दामाजी आणि करूंड हे दोघेही विठ्ठलभक्त होते. शूद्र जातीचे हे दाम्पत्य मोठे सत्शील व पवित्र होते. बरेच दिवस संतान नसल्यामुळे त्यासाठी ते विठ्ठलाची करुणा भाकत असत. दामाजीला एकदा असा दृष्टांत झाला की, 'तुझ्यापोटी कुळाचा उद्धार करणारी कन्या जन्म घेईल. परंतु पुढे नामदेवांशी तिचा संपर्क येणार असल्याकारणाने तिला दामाशेट्टीकडे नेऊन त्याला अर्पण कर.' यथावकाश करूंडेला कन्यारत्नाची प्राप्ती झाली. ५-६ वर्षांची झाल्यावर तिचे मातृछत्र हरपले. दामाजीने, आता आपल्याला हिचे पालनपोषण जमणार नाही, असा विचार करून तिला दामाशेट्टींच्या स्वाधीन केले. पुढे लवकरच दामाजींनाही देवाज्ञा झाली.

अशी ही अनाथ जनी दामाशेट्टींच्या घरी वाढू लागली. अर्थात त्या घरातील दासीचे स्थान तिच्याकडे आले. ती स्वतःच आपल्या अभंगात म्हणते,

माय मेली, बाप मेला; आता सांभाळी विठ्ठला ।
मी तुझे गा लेकरू; नको मजसी अव्हेरू ।।

जनाबाईंची भगवद्भक्ती

दामाशेट्टीचे कुटुंब हे भगवद्भक्त होते. पांडुरंगाची भक्ती त्यांच्या घरात पूर्वापार चालत आलेली होती. याच घरात लहानाची मोठी झाल्यामुळे जनाबाईवर तेच संस्कार झाले. दामाशेट्टीचा मुलगा नामदेव हा श्रेष्ठ भगवद्भक्त झाला. तो प्रत्यक्ष विठोबाशी बोलत असे आणि त्याच्याच चिंतनात सदैव गढून गेलेला असे. हे सर्व जनाबाई नित्य पाहत असे. नामदेवांच्या या भावविश्वाचे जनाबाईंच्या मनावर फार खोल संस्कार झाले. तिलाही नामदेवांप्रमाणे त्या सावळ्या भुवनसुंदराची ओढ वाटू लागली. आपलं अनाथपण, विलक्षण शारीरिक कष्ट या सगळ्याचा विठ्ठलचरणी आल्यावर तिला विसर पडू लागला. त्या सावळ्या रूपाने तिच्यावर एक विलक्षण मोहिनी घातली. तोच आपला सांगाती, तोच आपला आप्त आणि तोच सारं काही ही तिच्या मनाची धारणाच होऊन बसली. तिला घरीदारी, अष्टौप्रहर शेजारी विठुराया दिसू लागला. ती त्याला अहर्निश सादावू लागली

मुके मी पाडस । चुकले भोवे पाहे वास ।।
तुजविण काय करू । प्राण किती कंठी धरू ।।

आता जीव जाऊ पाहे । धाव घाली माझे माये ।।
माझी भेटवा जननी । संता विनवी दासी जनी ।।

आपण अज्ञानी आहोत, हीन आहोत याची जनीला जाणीव होती. परंतु नामदेवांच्या रूपाने विटेवरला विठुराया भक्तांवर आईची माया करतो हे तिने पाहिले होते आणि नामदेवांनी त्यांच्या उदंड भक्तिपूर्वक दिलेल्या आधारामुळे ती विठुमाऊलीला वत्सल होण्यासाठी विनवत होती. कारण नाममंत्र आणि वत्सलभक्ती यांची पहिली दीक्षा नामदेवांनीच जनीला दिली. ह्या बीजाचा पुढे महाराष्ट्रीय संत मंडळात विशाल वृक्ष झाला. कारण अख्खा वारकरी संप्रदाय विठुरायाकडे विठुमाऊली म्हणूनच पाहू लागला. भक्तीला मिळालेल्या या वात्सल्यभावामुळे महाराष्ट्रातील भक्तिभावना निरतिशय शुद्ध आणि पवित्र राहिली. उत्तर भारतातील मधुरा भक्तीची परंपरा पाहता महाराष्ट्राचे हे वेगळेपण जास्त ठसठशीतपणे नजरेत भरणारे आहे.

गुरू नामदेव व जनाबाईची रचना

जनाबाईचे जवळजवळ ३५० अभंग आज उपलब्ध आहेत. नामदेवांनी गुरू या नात्याने जनाबाईच्या जीवनगाभाऱ्यात विठ्ठलाची प्राणप्रतिष्ठा ज्याप्रमाणे केली त्याचप्रमाणे तिच्या मनातील काव्यप्रेरणेला त्यांनी चेतना व दिशा दिली. नामदेवांच्या कुटुंबामध्ये ती नुसतीच महत्त्वाची घटक नव्हती तर नामदेवांच्या आध्यात्मिक जीवनविश्वाची ती एक सुजाण साक्षीदारही होती. नामदेवांचे भक्तिरसपूर्ण आणि अध्यात्माचे अनुभव कथन करणारे अभंग तिने रचनेच्या प्रवासातही पाहिले होते. म्हणूनच तिच्या काही अभंगांवर नामदेवांची छाया स्पष्ट दिसते. तरीही पुढे चालून तिने स्वत:चे आध्यात्मिक अनुभव आणि त्यावरच्या तिच्या प्रतिक्रिया पाहिल्या असता तिची वाट स्वतंत्र झाल्याचे आपल्या लक्षात येते. उदा. :-

तू माझे वो माहेर । काय पाहतोसी अंतर ।
ओवाळुनिया पाया । जीवे भावे पंढरीया ।
धर्ममाता धर्मलेकी । म्हणे जनी हे विलोकी ।

या अभंगात नामदेवांच्या अभंगाची खूपच छाया पडलेली दिसते. परंतु पुढे मात्र ती -

एका बीजाचा अंकूर । होय वृक्षासी विस्तार ।
शाखापत्रे फळफुल भार । बीजापोटी सामावे ।।
वेदशास्त्र आणि पुराणा । याचा अर्थ जाणिता मना ।
कनकी नगाच्या भूषणा । अनुभव वाटे जीवासी ।। किंवा
दळणाच्या मिषे । विठ्ठल आला सावकाशे ।।
देहबुद्धीचे वैरण । द्वैत खंडारे निसून ।।
एकलीच गाणे गाता । दुजा साद उमटता ।।
कोण गे तुझे बरोबरी । गाणे गातो निरंतरी ।।
अंतरीच विचारता । देव दिसे तया भक्ता ।।
खूण कळली नामदेवा । विठ्ठल भुले जनीच्या भावा ।।

या व अशा रचनांमधून तिची साधना व त्यातील अनुभव बोलके झाले आहेत. परंतु या रचनांचे थोरपण मात्र अचंबा करायला लावणारे आहे. दासी जनी रूढ अर्थाने अशिक्षित, गोवऱ्या थापणारी, शेणगोठा, दळणकांडण करणारी एक अतिसामान्य स्त्री! पण परब्रह्म बीजाच्या पोटी मायेचा सारा विश्वपसारा सूक्ष्म रूपात सामावलेला आहे, वेदशास्त्र हा आपल्याला तसा अनुभव देणारा पुरावा आहे, असे जेव्हा दासी जनी ठामपणे म्हणते, तेव्हा ती उच्चकोटीच्या अनुभवसंपन्न ऋषींच्या मालिकेत बसलेली दिसते व आपण थक्क होऊन जातो.

जनाबाईचे स्त्रीत्व

जनाबाईच्या रचनांमधून आणखी एक जाणवणारा विशेष म्हणजे तिचे स्त्री-मन, तिच्या अभंगांमधून वारंवार तिच्यातील मुलगी, बहीण, वत्सल माता तसेच स्वत:चा संसार नसलेली एक समर्पिता कायम डोकावताना दिसते. तिचे अनाथपण तिने सानंद स्वीकारलेले आहे. नामदेवांच्या घरचं दासीपणही तिने नाममंत्रात जिरवून टाकलेलं आहे. नामदेवांच्या घरामध्ये १२ माणसांचे कुटुंब होते. दासी जनीच एका ठिकाणी म्हणते-

गोणाई राजाई दोघी सासुसून । दामा नामा जाण बापलेक ।
नारा महादा गोंदा विठा चौघे पुत्र । जन्मले पवित्र त्यांचे वंशी ।
लाडाई गोडाई येसु साखराई । चौघी सुना पाही नामयाच्या ।
लिंबाई ती लेक आऊबाई बहिणी । दासी वेडी जनी नामयाची ।

या दासीपदामुळे आणि अनाथ अवस्थेमध्ये या कुटुंबाने दिलेल्या आश्रयामुळे दिवस उजाडल्यापासून मावळेपर्यंत दासी जनी नामयाच्या घरी सतत कष्ट करत असे. दळणकांडण, धुणी-भांडी, सारवण, गोवऱ्या थापणं, गोवऱ्या वेचणं, शेण-गोठा या सगळ्या कामांमध्ये तिचे हात सतत गुंतलेले असले तरी भक्तीत बुडालेल्या तिच्या मनाला आपल्या अवतीभोवती सतत विठुराया वावरतो, तोच आपल्या या गाडाभर कष्टातील भार उचलून आपले काम हलके करतो असेच तिचे साक्षात्कारी मन ठामपणे सांगते. ती म्हणते -

झाडलोट करि जनी । केर भरी चक्रपाणी ।।
येऊनिया देव । दळू लागे ।।
तैसाचि पैं संगे । येवोनी बाहेरी ।।
वैचुनिया भरी । शेणी संगे ।।
साळी कांडायासि काढी । चक्रपाणी उखळ झाली ।।

प्रत्येक कामात तो तिला हातभार लावतो. तिला मदत करतो. विठुरायाचा तिला होत असलेला नित्य सहवास तिच्या ओव्याओव्यांमधून आपल्यापुढे साकारत राहतो. आपल्या शास्त्रात सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता अशी चतुर्विधा मुक्ती सांगितलेली आहे. जनाबाईंच्या बाबत तिला समीपता या प्रकारातील मुक्ती 'याचि देही' मिळाली असे म्हणता येईल का? कारण ती म्हणते,

देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते ।।
देव येथे देव तेथे । देवावीण नाही रिते ।।
जनी म्हणे विठाबाई । भरून उरली अंतर्बाही ।।

अशा या नित्य सोबतीला असणाऱ्या विठुरायाला ती जी शपथ

घालते त्यावरून तिच्या स्त्रीसुलभ भावनात्मकतेचे दर्शन घडते. ती म्हणते-

जनी म्हणे तुज । रखुमाईची आण ।।
जरी मज क्षण । विसंबसि ।।

संत नामदेवांच्या कुटुंबात राहिल्याने तिची ज्ञानेश्वरादी संत मंडळींशी भेट घडली हा जीवनातील एक सुर्वणयोगच म्हटला पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाचा तिच्यावर फार खोल असा प्रभाव पडला. ज्ञानेश्वरांबद्दल तिच्या मनात उदंड प्रेमादर होता. तिचे स्त्रीमन ज्ञानेश्वरांना कधी साजणी, कधी आई तर कधी बहिणी असे मायेने संबोधिते.

बाळकृष्णाच्या लीला वर्णन करताना तिच्यातील मातृहृदय वात्सल्याच्या हिंदोळ्यावर डोलू लागते.

वैकुंठीचा हरि । तान्हा यशोदेच्या घरी ।।
रांगतसे हा अंगणी । माथा जावळाची वेणी ।।
पायी पैंजण वाळे । हाती नवनीताचे गोळे ।।
धन्य यशोदा ती माय । दासी जनी वंदी पाय ।।

जनाबाईच्या अभंगांतून स्त्रीमनाच्या नैसर्गिक वृत्तींची अशी श्रीमंती वारंवार दिसते. तिला स्वत:चा संसार नसला तरी ती नामदेवांचा प्रपंच मोठ्या हौसेने करते आहे. नामदेवांना पुत्र होताच आनंदविभोर होऊन तिने पांडुरंगालाच विचारले-

जनी म्हणे पांडुरंगा । नाव काय ठेवू सांगा ।।

सुखदु:खाचे क्षणभंगुरत्व तिला माहीत होते. तरी त्या कुटुंबाच्या सुखदु:खांशी ती एकरूप झाली होती. एवढेच नव्हे तर स्वत:ची सुखदु:खेही आपल्या रचनेतून मोकळेपणाने मांडत होती. विलक्षण काबाडकष्ट करताकरता तिला स्वत:कडे लक्ष द्यायला मात्र अजिबात सवड होत नाही, इतकी की तिच्या केसांची दुर्दशा होऊन त्यांत उवा होतात तेव्हा ती म्हणते,

जनी डोईने गांजली । विठाबाई धाविन्नली ।।
देव हाते बुचडा सोडी । उवा मारितसे तातडी ।।
केश विंचरूनि मोकळे केले । जना म्हणे निर्मळ झाले ।।

आपले न्हाणे-धुणे करण्यासाठी ती जेव्हा देवाला बोलाविते तेव्हा एका अनाथ मुलीची ही आर्त हाक आपले काळीज हालविते. परंतु त्याचबरोबर तिचे अहर्निश जागे असलेले स्त्री-सुलभ सलज्जपणही आपल्याला मुग्ध करते. ती म्हणते -

नारी रूप धरूनि हरि । माझे न्हाणे-धुणे करी ।।
माझे जनीला नाही कोणी । म्हणुनि देव घाली पाणी ।।

जनाबाईला सासर माहेर नसले तरी नामदेवांघरचे तिचे राबणे सासरसारखेच होते. म्हणूनच पांडुरंगाला तिने आपले माहेर बनविले. म्हणूनच ओळी-ओळीत डोकावणारे तिचे स्त्रीमन पांडुरंगाला म्हणते -

रुक्मिणीच्या कुंका । सुरा-असुरा प्रियलेका ।।
तू धाव माझे आई । सखे साजणी विठाबाई ।।

ज्ञानमार्गावरील अनुभव

नामदेवांकडून जनाबाईला नाममंत्र आणि सगुण भक्तीचा वारसा मिळाला. या सगुण भक्तीमध्ये तिचे रसपूर्ण मन मनोभावे रंगून गेले. देवाच्या या रूपाचा तिच्या अंत:करणाने एवढा ध्यास घेतला की तिने त्याच्या सगुण रूपाचा अनुभव साक्षात्काराच्या रूपाने घेतला. ती म्हणते-

देहाचा पालट विठोबाचे भेटी ।
जल लवणा गाठी पडोनी गेली ।।

परंतु या सगुण भक्तीमध्ये, त्या भावावस्थेमध्ये ती फार काळ घुटमळली नाही. ज्ञानेश्वरादी भावंडांची नामदेव परिवाराशी भेट झाल्यानंतर नामदेव स्वत: निर्गुण भक्तीकडे वळले. या परिचयाचा जनीला खूपच लाभ झाला. समव्यसनी व्यक्ती जशा एकमेकींकडे आकर्षित होतात, तसेच जनाबाईला ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाने निश्चितच आपल्याकडे खेचून घेतले असणार. त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या निर्गुण उपासना मार्गावर जनाबाई सुद्धा नकळत भारल्यासारखी चालू लागली. या मार्गावर असताना तिने आपले जे अनुभव सांगितले आहेत त्यांमध्ये तिने योगाची परिभाषा वापरली आहे. ती म्हणते -

१) नामयाची जनी सागरी मिळाली । परतोनि मुळी केवि जाय ।।
चारी वाचा कुंठित झाली । सोहम् ज्योती प्रकाशली ।।
२) ब्रह्मी झाला जो उल्लेख । तोचि नादाकार देख ।।
पुढे ओंकाराची रेख । तुर्या म्हणलि तिशी ।।
३) माया महत्त्वाचे सूत्र । तीन पाचांचा प्रकार ।।
पुढे पंचविसाचा भार । गणती केली छत्तीशी ।।
४) चार खोल्या चार घरी । चार पुरुष चार नारी ।।
करुनि चौघांचा अव्हेरी । बसले पाचव्या पाशी ।।
पाच शहाणे पाच मूर्ख । पाच चालक असती देख ।।
पाच कळंभखोर आणिक । मी वळखे दोघासी ।।

- १) मिठाची बाहुली जशी समुद्रात गेल्यावर परत येणार नाही, तशीच जनी परब्रह्माला भेटल्यावर उरणार कुठे? जे तत्त्व चराचरात भरून राहिलेले आहे, ते म्हणजेच मी! हे असं उजाडल्यावर मग अंधार कुठे? हे सुख एवढे अनिर्वचनीय की, ते बोलायला चारी वाणी (परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी) असमर्थ आहेत.

- २) जे एक ब्रह्म आहे तेच आकार घेऊन नटले आहे. तेच ॐ चे स्वरूप नादब्रह्म होऊन राहिले आहे.

- ३) माया हे महत् तत्त्व आहे. तिच्यापासून सत्त्व, रज, तम ही त्रिगुणात्मक सृष्टी जन्मली. ती सृष्टी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांत आकाराला आली. या पंचमहाभूतांपासून पंचवीस तत्त्वे निर्माण झाली - प्रकृती, पुरुष, बुद्धी, अहंकार, मन, पंचज्ञानेंद्रिये (६ ते १०), पचकर्मेंद्रिये (११ ते १५), पंचतन्मात्रा (१६ ते २०) - शब्द - तन्मात्रा, स्पर्श तन्मात्रा, रूप तन्मात्रा, रस तन्मात्रा, गंध तन्मात्रा, पंचमहाभूते (२१ ते २५)

या पंचवीस गुणांमध्ये पुढील गुण मिळवले की शरीराचे छत्तीस गुण

होतात. चालणे, बोलणे, देणे, घेणे, मल-मूत्र विसर्जन, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, चेतना, धृती आणि संघात.

- ४) चार योनी - जारज, अंडज, स्वेदज, उद्‌भिज; चार खोल्या म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे वर्ण. चार पुरुष म्हणजे प्राज्ञ, तैजस, विश्व आणि प्रत्यगात्मा. चार नारी म्हणजे जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या. चौघांचा अव्हेर म्हणजे चार अभिमान सोडून दिले आणि पाचवा म्हणजे जे ब्रह्म आहे त्याच्याजवळ जाऊन बसले. पाच शहाणे म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये. पाच मूर्ख म्हणजे पाच कर्मेंद्रिये, पाच चालक म्हणजे पंचप्राण- प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान. पाच कळंभखोर म्हणजे कलह करणारे पाच विषय - शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध. हे सर्व जरी असले तरी या कोणालाही मी ओळखत नसून मी फक्त यांतल्या दोघांना ओळखते ते म्हणजे प्रकृती आणि पुरुष.

जनाबाईंच्या वरील अभंगांतून ज्ञानमार्गावरील त्यांचा प्रवास निर्गुणाची ओळख, निर्गुणाची उपासना आणि या चराचर विश्वातून तिला झालेली निर्गुणाची अनुभूती इथपर्यंत येऊन पोहोचल्याचे स्पष्टपणे कळते. त्या एकाच चिरंतन सत्यापासून माया उत्पन्न झाली. म्हणजे जे निर्गुण निराकार होते त्यापासून सगुण साकार वेगळे झाले. आधी नुसतीच गुणात्मक होऊन नंतर तिने पंचमहाभूतांचा आकार घेतला. त्यातून ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये वगैरे तत्त्वे वाढत जाऊन आजची ही सृष्टी आकाराला आली.

परंतु हे माहीत असले तरी जनाबाईने मात्र या जड देहातून ही छत्तीस तत्त्वे ओलांडत ब्रह्मापर्यंतचा प्रवास पूर्ण केला आहे. कारण ती स्पष्टच म्हणते, ''**नामयाची जनी सागरी बुडाली ।।**''

हे सारे काही केवळ शक्तीचा एक पुंज आहे असे मानले तरी त्यापासून जड सृष्टी कशी आकाराला आली याचे जनाबाईने केलेले हे वर्णन तोंडात बोट घालायला लावणारे आहे. गोठ्यात बसून गोवऱ्या थापणाऱ्या या स्त्रीच्या ठायी हे वेदान्तज्ञान कसे उमलले असेल? शाश्वत ज्ञान हे अंत:स्फूर्तच असते. त्याला वय, लिंग, परिस्थिती या कशाचीही अट नाही, हे जनाबाई या ठिकाणी ठसठशीतपणे सिद्ध करते.

जनाबाईचे उपदेश

जनाबाईने आहे ती परिस्थिती समंजसपणे, शांतपणे आणि मन मोठे करून स्वीकारली होती. समाजामध्ये असलेले तिचे स्थान आणि नामदेवांच्या घरातील दासीपणाची भूमिका ती आनंदात पार पाडत होती. सामाजिक वास्तवाचे एक लोकविलक्षण भान तिला सतत असे. या तिच्या प्रगल्भ अवस्थेमुळे तिच्या उपदेशाची भाषा उपरोधाची किंवा आक्रस्ताळेपणाची नाही. याउलट आयुष्याला चिंतनशील आणि समाधानी वृत्तीने तोंड दिल्यामुळे तिचे उपदेश म्हणजे वास्तवदर्शी आणि सतेज होतात. उदाहरणार्थ - प्रत्येक वस्तुजातामध्ये आपल्याला ईश्वर दिसावा. हे घडले तरच ईश्वरी साक्षात्काराला सर्व साह्यभूत होणार आहे, हा अत्युच्च आध्यात्मिक विचारही जनाबाई सांगते. ती म्हणते -

सर्वांठायी तुज पाहे । ऐसे देऊनी करी साहे ।।
धावा करीता रात्र झाली । दासी जनीसी भेटी दिली ।।

सर्वसामान्य माणसाला जनाबाई अत्यंत साधा पण तितकाच महत्त्वपूर्ण उपदेश देते. ती सांगते,

सुखे संसार करावा । माजी विठ्ठल आठवावा ।।
असोनिया देही । छायापुरुष जैसा पाही ।।
जैसा सूर्य घटकाशी । तैसी देही जनी दासी ।।

शेवटी ईश्वरप्राप्तीसाठी कोणते टोक गाठावे लागते हे सांगताना जनाबाई म्हणते -

शूराचे ते शस्त्र । कृपणाचे धन ।।
वेचिलिया प्राण । हाता न ये ।।
गजमाथा मोती । सर्पाचा तो मणी ।।
वेचिलिया प्राण । हाता न ये ।।
विराल्यापासून । देही देहभाव ।।
जनी म्हणे देव । हाता न ये ।।

संपूर्ण अहंकाराचा त्याग करून स्वत:चे सर्व काही विठ्ठलाच्या चरणी अर्पण केल्याशिवाय त्याची प्राप्ती होणार नाही हे जे जनाबाईने स्वत: अनुभवले होते तेच ती आपल्या अभंगांतून वारंवार सांगत राहिली. तिचे अभंग म्हणजे अनुभूतींची साखळीच आहे. त्यांमध्ये उपदेश आहे. पण त्यापेक्षाही त्यामध्ये जो एक जिवंतपणा आहे, रसरसलेपणा आहे आणि आपल्याबरोबर वाचकाला त्या प्रतिमासृष्टीत नेण्याचे जे सामर्थ्य आहे त्यामुळे जनाबाईंचे अभंग हे केवळ उपदेश न राहता तिच्या जीवनात आपल्याला भागीदारी करायला लावतात.

अशी ही सामर्थ्यशाली आणि ईश्वरात मग्न होऊन गेलेली संत कवयित्री ज्या नामयाचे बोट धरून अध्यात्माच्या क्षेत्रात पाऊल ठेवून आली त्याच नामयाच्या प्राणहीन चरणावर मस्तक ठेवून वाकली ती पुन्हा उठली नाही. आपल्या गुरूचे चैतन्यविहीन शरीर पाहताच या जगावेगळ्या शिष्येचे प्राण देहाच्या पिंजऱ्यातून उडून गेले. ज्या क्षणी ह्या एकमेवाद्वितीय गुरुशिष्येने महासमाधी घेतली तो दिवस होता आषाढ कृष्ण १३ इ.स. १३४८.

जनाबाई अनंतात विलीन होऊन सहाशे पेक्षा जास्त वर्षे उलटून गेली परंतु आजही तिचे अभंग महाराष्ट्रामध्ये गोड गळ्याने गायिले जातात. घरोघरी गायिले जाणारे ते अभंग हीच या थोर संत कवयित्रीला वाहिलेली भावपूर्ण श्रद्धांजली!

सौ. जयश्री नातू
अे-१२, अनुबंध सोसायटी, रामकृष्ण मठाजवळ,
सिंहगड रोड, पुणे - ४११ ०३०.
फोन - ०२०-२४३२१९७२, मो. ९८८१७९४०९०

संदर्भ ग्रंथ :

१) संत कवयित्री - पी. आनंदकर
२) संत कवयित्री - इंदुमती शेवडे
३) प्राचीन मराठी कवयित्रींचे वाङ्‌मयीन कार्य - सुहासिनी इर्लेकर
४) जनाबाईंचे अभंग - संपादित
५) दासबोध - श्रीसंत रामदास

***



साक्षात्कारी संत जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास

डॉ. श्रीकांत सबनीस

एम्.एस्सी.पीएच्.डी. निवृत्त प्राचार्य, शिक्षण मंडळ, कराड येथे जॉईंट सेक्रेटरी म्हणून कार्यरत.
शिवाजी विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शक.
३ शोध निबंध प्रसिद्ध. धार्मिक व शास्त्रीय विषयावर विविध मासिकांतून लिखाण.
श्रद्धानंद व इतर दोन पुरस्कारांनी सन्मानित.

ज्ञानदेव-नामदेव यांच्या प्रभावळीत अनेक साक्षात्कारी संत होऊन गेले. संतांच्या या मांदीयाळीत विविध जाती-जमातीतील संत होते. त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवत ठेवली. या धर्मकार्यात संत जनाबाईचे योगदान लक्षणीय आहे. तिचा जन्म मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात गोदातीरी, गंगाखेड नामक छोट्या गावात झाला. तेथे दमा आणि करुंड हे शूद्र जातीतील पण सत्त्वसंपन्न दांपत्य रहात होते. पंढरीचे ते निष्ठावंत वारकरी होते. बरीच वर्षे अपत्यप्राप्ती नाही म्हणून त्यांनी पांडुरंगाला साकडे घातले. त्या रात्री दमाला स्वप्नदृष्टांत झाला. पांडुरंगाने सांगितले, ''तुला जी मुलगी होईल ती तुमच्या कुळाचा उद्धार करेल, तिला दामाशेटींच्या स्वाधीन कर, नामदेवांच्या सहवासात, ती थोर भगवद्‌भक्त होईल.'' काही काळानंतर या दांपत्याला इ.स. १२६३च्या दरम्यान मुलगी झाली. पांडुरंगाची आज्ञा शिरसावंद्य मानून दामाशेटींकडे या मुलीला दमाने सुपूर्त केली. संत नामदेवांच्या घरातील भक्तिमय वातावरणात साक्षात्कारी संत म्हणून नावारूपाला आलेली हीच ती संत जनाबाई.

दामाशेटींच्या घरात येतेवेळी जनाबाईचे वय अवघे सहा वर्षांचे होते. अल्पावधीतच तिचे आई-वडील स्वर्गवासी झाल्याचे तिला समजले. जनाबाईवर दु:खाचा डोंगर कोसळला, या जगात आपले म्हणावे असे कोणी राहिले नाही या विचाराने ती गहिवरली. पांडुरंगाच्या मूर्तीपुढे येऊन भावविवश अवस्थेत म्हणाली,

''माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।
मी तुझे गा लेकरू । नकोस मज अव्हेरू ।''

अशा या भावविवश अवस्थेतून विठ्ठलाने तिच्या अंत:करणात प्रवेश केला आणि तिचे पोरकेपण भरून काढले.

नामदेवांच्या घरी एकूण चौदा माणसे होती. त्यांच्या घरातील आपलं स्थान जनाबाई ओळखून होती. आपण शूद्र व निराधार आहोत याचे भान तिला कायम होते. त्यामुळे पडेल ते काम विनातक्रार करायचे असा तिचा स्वभाव बनला होता. ''भल्या पहाटे उठावं, ऊर फाटेतो दळण-कांडण करावं, त्यानंतर धुणी-भांडी-झाडलोट-पाणी भरणे अशी कष्टाची कामे करत-करत जनाबाईचा रोजचा दिवस मावळायचा. दिवसभराच्या कामाने थकून जायची. मन मोकळं करावं म्हणून विठू माऊलीला म्हणायची ,

''शिणल्या बाह्या बा आता । येऊनिया लावी हाता ।''

'विठ्ठला तूच माझी माता आणि पिता' असे म्हणताना तिचा कंठ दाटून यायचा. विठ्ठलाला म्हणायचे, 'आपले हे नाते केवळ या एका जन्माचे नाही, तर जन्मोजन्मीचे आहे.' असा विठ्ठलाशी आत्मसंवाद झाला की तिला हलकं वाटायचं. जनाबाईचे जीवन आता विठ्ठलमय झाले होते. 'कर्मे ईशु भजावा' हे जीवनसूत्र अंगिकारल्यामुळे दिवसभराच्या कष्टाचे तिला काही वाटेनासे झाले. 'कर्ता करविता पांडुरंग आहे, वाट्याला आलेले भोग' हे त्याच्या इच्छेनेच आलेले आहेत अशी मनोधारणा तिने करून घेतली होती. दिवसभरातील कामात एक क्षणभरही ती विठ्ठलाला विसरत नव्हती. तोच तिचा एकमेव आधार होता. ती स्वत:ला विठ्ठलाची दासी म्हणवून घ्यायची. तिच्या या दास्यभक्तीची ही एक परिसीमा होती.

संत नामदेवांचा सततचा सहवास मिळणं ही तिची पूर्वजन्माची पुण्याई होती. नामदेवांमुळेच तिच्या भावभक्तीला उत्कटतेचे कोंदण मिळाले होते. ती त्यांना गुरू मानत होती. नामदेवांच्याच कृपेने 'हाताने काम व मुखाने नाम' हे भक्तिसूत्र तिला गवसले होते. त्यामुळे तिच्या वैखरी वाणीतील नामजप हळू-हळू अंतरंगात मुरत गेला आणि शेवटी त्याचे रूपांतर 'अजपा जपात' केव्हा झालं हे जनाबाईला कळलंच नाही. त्यामुळे नाम श्वासात गुंफलं गेलं. म्हणून जागृती- स्वप्न- सुषुप्ती या देहाच्या तिन्ही अवस्थेत विठ्ठलाचं अखंड अनुसंधान रहात गेलं. ही सगळी प्रक्रिया घडली कशी हे सांगताना जनाबाई म्हणते,

''सोऽहं शब्दाचा केला मारा । विठ्ठल काकुळती आला ।
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवे न सोडी मी तुला ।।''

जनाबाईची व विठ्ठलाची भेट सोऽहं साधनेतून झाली. तिने केलेल्या उत्कट भक्तीची ही फलश्रुती होती. जीवनात आलेल्या या दिव्य अनुभूतीमुळे जनाबाईची जगाकडे पहाण्याची दृष्टी बदलून गेली. श्रीहरी सर्वत्र घनदाट भरला आहे हे तिला पदोपदी जाणवत होतं. आपल्या प्रत्येक कृतीचं ती विठ्ठलाशी नातं जोडत होती. म्हणून जनाबाई म्हणते,

''देव खाते, देव पिते । देवावर मी निजते ।
देव देते, देव घेते । देवासवे व्यवहारी ते ।।
देव येथे, देव तेथे । देवाविण नाही रिते ।
जनी म्हणे विठाबाई । भरून उरली आंतरबाही ।।''

दिवसभराच्या प्रत्येक व्यवहारात देवाचं अस्तित्व जाणवणं ही फार भाग्याची गोष्ट आहे. त्यामुळे जेवणे, पाणी पिणे, झोपणे अशा सर्व क्रिया ईश्वरमय झाल्या होत्या. अन्न, पाणी, पृथ्वी किंबहूना दिसणारी प्रत्येक वस्तू जनाबाईला ब्रह्मस्वरूप वाटत होती. 'सर्वं खलु इदं ब्रह्म' ही उच्च कोटीतील अनुभूती येण्याचं भाग्य जनाबाईला लाभलं.

जनाबाईचा एकूण अध्यात्मिक प्रवास लक्षात घेण्यासारखा आहे. साधनेच्या प्राथमिक अवस्थेत ती स्वत:ला विठ्ठलाची दासी म्हणवून घ्यायची. नंतरच्या काळात अंतरंग भक्तीच्या बळावर दास्यभक्तीचे रूपांतर सख्यभक्तीत झाले. त्यामुळे सखा विठ्ठल प्रत्येक कामात तिला मदत करू लागला. हा अनुभव शब्दबद्ध करताना जनाबाई म्हणते,

''झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।
पाटी घेऊनिया शिरी । केर नेऊन टाकी दूरी ।।''

झाडलोट किंवा दळण-कांडणासारखी कामे करताना विठ्ठल आपल्याला मदत करतो असे म्हणण्यात कोणत्याही चमत्काराचा भाग नाही. अंधश्रद्धेचा तर मुळीच नाही. एकूणच हा अनुभव सामान्य माणसाच्या जाणीव शक्तीच्या पलीकडचा आहे. कारण जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीन अवस्थांतील अनुभव सामान्य माणसाला असतो. त्याच्याही पुढे उन्मनी अवस्था आहे. या अवस्थेतील दिव्य अनुभव जनाबाईला सतत येत असत. म्हणून ती म्हणते,

''उन्मनीच्या मुखा आत । पांडुरंग भेटी देत ।''

देहाच्या या अवस्थेत मन उन्मन होते, हृदयस्थ ईश्वर जागा होतो. आत्मज्योत प्रज्वलित होते. मग आंतरबाह्य परमात्मरूप जाणवू लागते. प्रत्येक क्रियेत ईश्वरीय प्रेरणा जाणवू लागते. या गूढ अनुभूतीचे वर्णन करताना जनाबाई म्हणते,

''भक्त जे जे कर्म करिती । ते तू होशी कृपामूर्ती ।
हे तो नवल नव्हे देवा । भुललासी भक्ती भावा ।।''

उन्मनी अवस्थेचा देहावरही परीणाम होतो. हे सांगताना ती म्हणते,

''देह नेऊनी विदेही केले । शांती देऊन मीपण नेले ।
मूळ नेले हे क्रोधाचे । ठाणे केले विवेकाचे ।।''

एकदा देहभाव गळून पडला की त्यामुळे आलेला मीपणा, अशांती आपोआप नाहीशी होते आणि अंत:करणात विवेकाचा उदय होतो. पुढे प्रत्येक काम देवच करतो आहे असे वाटते. हा अनुभव व्यक्त करताना जनाबाई म्हणते, **''देव भक्तांचा अंकित । कामे त्याची सदा करीत ।**
त्याचे पडो नेदी उणे । होय रक्षिता आपण ।।''

उन्मनी अवस्थेत आणखीही काही अनुभव येत असतात. ते कथन करताना जनाबाई म्हणते,

''जोड झाली रे शिवाची । भ्रांती फिटली जिवाची ।
आनंदची आनंदला । आनंद बोधची बोधला ।।''

जीव हा शिवरूप आहे याची प्रचिती येणे ही अत्युच्च कोटीची अनुभूती आहे. जीवाचे सत्-चित्-आनंदस्वरूप कळणे हा अध्यात्म क्षेत्रातील अंतिम टप्पा आहे. तो टप्पा गाठून जनाबाई संतत्व पदाला पोचली.

संत जनाबाईंच्या अभंग वाङ्मयात समकालीन संतांची स्तुती करणारे काही अभंग आहेत. नामदेवांच्यामुळे आत्मसाक्षात्काराचा पल्ला आपण गाठू शकलो म्हणून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना ती म्हणते, **''जनी म्हणे जोड झाली विठोबाशी ।**
दासी नामयाची म्हणोनिया।।''

संत चोखोबांच्या विषयी तिला विशेष आपुलकी वाटते. म्हणून म्हणते, **''चोखामेळा अनामिक । भक्तराज तोचि एक ।**
परब्रह्म त्याचे घरी । न सांगता काम करी ।।''

ज्ञानदेवादि चारी भावंडांविषयी तिच्या मनात नितांत आदर आहे. निवृत्ती-ज्ञानदेव-सोपानदेव यांना तर ती ब्रह्मा-विष्णू-महेशाचे अवतार मानायची. मुक्ताबाईंच्या विभूतिमत्वाचे वर्णन करताना जनाबाई म्हणते,

''आदिशक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी ।।''

ज्ञानदेव-नामदेवादि तत्कालीन सर्व संतांना जनाबाईंनी विठू माऊलीच्या अंगाखांद्यावर खेळवले आहे. म्हणून म्हणते,

''विठु माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।''

प्रस्तुत अभंगात अशी कल्पना केली आहे की, विठु माऊली आपल्या परमप्रिय भक्तांना मोक्ष मंदिराकडे घेऊन निघाली आहे. भक्तांच्या या मेळाव्यात ज्ञानदेवादि चारी भावंडे, नामदेव, गोरा कुंभार, चोखामेळा, जीवा, बंका यांचा समावेश आहे. कुणाला खांद्यावर घ्यायचे, कुणाला मांडीवर, कुणाला कडेवर, कुणाला करांगुली धरायला लावायची आणि कुणाला मागे- पुढे ठेवायचे असे वर्णन करण्यात जनाबाईंचा आध्यात्मिक विचार आहे. हे जाणून घेतले की जनाबाईंची आध्यात्मिक उंची लक्षात येते. जनाबाईंचे काही अभंग योगशास्त्रातील अनुभूती व्यक्त करणारे आहेत. उत्कट भक्तीच्या जोरावर तिने उन्मनी अवस्था अनुभवली होती. तीच अवस्था योगमार्गानेही तिला प्राप्त झाली. म्हणून ती म्हणते,

''अनुहत घंटा श्रवणी । ऐकोनी विस्मित झाली जनी ।''

यावरून असे दिसते की, संत जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात योगमार्ग आणि भक्तिमार्ग यांचा सुरेल संगम आहे.

सकल संतगाथेत जनाबाईंचे एकूण तीनशे चाळीस अभंग उपलब्ध आहेत. त्यातील काही आत्मकथनपर अभंगातून जनाबाईंचे अध्यात्मिक चरित्र आपल्या डोळ्यांपुढे साक्षात् उभे रहाते. एका शूद्र घराण्यात जन्माला आलेला सामान्य जीव, प्रतिकूल परिस्थितीतही उत्कट भक्तीच्या बळावर 'कैवल्यपद प्राप्त करून घेतो हाच एक मोठा दैवी चमत्कार आहे. अशा या अलौकिक कर्मयोगिनीचा अस्त इ.स. १३५०ला झाला. गंगाखेड येथील संत जनाबाईंची समाधी समस्त भक्तजनांना हजारो वर्षे प्रेरणा देत राहील.

* प्रस्तुत लेखातील अभंग हे 'सकलसंतगाथा' यातील आहेत. (संपादक - काशिनाथ अनंत जोशी)

डॉ. एस्. जी. सबनीस, माजी प्राचार्य
यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड
माऊली बंगला, कृष्णा कॅनॉल, कराड.
फोन : ०२१६४-२७१२५२, मो. ९४२११७७६७०



श्री नामदेव शिष्या – जनाबाई

कु. गार्गी (वसुमती) देशपांडे

एम.ए. संस्कृत, दासगणु प्रतिष्ठान, गोरटे येथे सहसचिव.
प.पू. स्वामी वरदानंद भारतींच्या लेखनिका म्हणून काम केले आहे.

।। श्रीशंकर ।।

श्रीमद्‌भागवताच्या एकादशस्कंधात स्वत: भगवंतांनी उद्धवाला ज्ञान सांगितले. त्यातील एका प्रसंगाचे वर्णन करताना श्री ब्रह्मानंद म्हणतात –

ऊधो मुझे संत सदा अति प्यारे ।
जांकी महिमा वेद उचारे ।।
मेरे कारण छोड जगतके भोग पदारथ सारे ।
निसिदिन ध्यान धेरे हिरदेमे सब घर काज बिसारे ।
मै संतनके पीछे जाऊँ जहाँ जहाँ संत सिधारे ।।

स्वत: भगवंतच संतांचा महिमा गातात. आपली भारतभूमि त्यातही महाराष्ट्रप्रांत संतांची भूमी म्हणूनच ओळखला जातो. कारण अनेक संतांचा जन्म या भूमीत झाला. अनेक संतांची ही कर्मभूमी ठरली. अनेक संतांनी या भूमीत जनजागृतीचे कार्य केले. अनेक संतांच्या वास्तव्याने ही भूमी पावन झालेली आहे. त्या संतांमध्ये जातिभेदाला थारा नव्हता. कारण

जात पात गोत असो कांही कां ना ।
रामकृष्णहरि जयजय भावाने म्हणा ।।

हे तत्त्व ते यथार्थपणे जाणत होते व त्याप्रमाणे ते जगत होते. ''ज्ञानदेवो भगवान विष्णु:'' असे श्री ज्ञानेश्वर महाराज येथेच झाले. भक्तिमंदिराला कळसाप्रमाणे शोभणारे श्री तुकाराम महाराज येथेच झाले. ''यत्नाचा लोक भाग्याचा। यत्नेवीण दरिद्रता।।'' हा संदेश घरोघर पोचविणारे श्री समर्थ रामदासस्वामी याच भूमीत झाले. आपल्या उत्कट भक्तीच्या बळावर पांडुरंगालाही स्त्रीवेष धारण करण्यास भाग पाडणारी संत सखुबाई याच पावनभूमीत जन्मास आल्या. ''कांदा मुळा भाजी। हीच विठाबाई माझी।।'' असा सर्वव्यापक पांडुरंगाचा साक्षात्कार झालेले सावतामाळी याच महाराष्ट्राच्या भूमीतले. श्री ज्ञानेश्वरीतील आचार्योपासनेचे – गुरुसेवेचे मूर्तरूप म्हणून ज्यांचे वर्णन करता येईल असे एकनाथ महाराज याच महाराष्ट्रातले. अशा संतांचे वर्णन करताना श्री तुकाराम महाराज म्हणतात –

त्यांच्या चरणां माझे दंडवत । ज्यांचे धनवित्त पांडुरंग ।।

श्री तुकाराम महाराजांचेच शिष्य निळोबाराय म्हणतात –

काळ सार्थक केला त्यांनी । धरिला मनी विठ्ठल ।।

श्री एकनाथ महाराज म्हणतात –

संत मायबाप म्हणता । लाज वाटे बहु चित्ता ।
मायबाप जन्म देती । संत चुकविती जन्मपंक्ति ।।

अशा संतांच्या कुळामध्ये मोलमजुरी करून चरितार्थ चालविणारी जनाबाई इ.स. सुमारे १२६० ते १३५३ या काळात होऊन गेली. श्री दासगणु महाराज तिचे वर्णन करताना म्हणतात –

गंगाखेडामाजी पुनित अशा गौतमी तटा झाली ।
भगवद्भक्त जनी ती ख्याति जियेने जगत्रयीं केली

श्री. दमा व सौ. कुरुंडबाई या दांपत्याच्या पोटी जनाबाईंचा जन्म झाला.

एक आख्यायिका सांगते, की या दांपत्याला बराच काळ अपत्य नव्हते. त्यांनी पुत्रप्राप्तिसाठी पांडुरंगाची उपासना केली. तेव्हा पांडुरंगाने स्वप्नात येऊन सांगितले की, ''तुला एक मुलगी होईल ती पाच वर्षांची होताच पंढरपूरच्या दामाजी शिंप्याच्या स्वाधीन कर.'' मग ती नामदेवाच्या संगतीतच लहानाची मोठी झाली.

दुसरी आख्यायिका आहे की पांडुरंगाच्या प्रसादाने झालेल्या मुलीच्या ठिकाणी पांडुरंग दर्शनाची ओढ निर्माण झाली. तिने आई-वडिलांकडे हट्ट केला म्हणून आषाढी वारीच्या वेळी आईवडील जनाबाईला घेऊन पंढरपूरला आले. तेथील पटकीच्या साथीत दोघेही मरण पावले व जनाबाई अनाथ झाली. ती पांडुरंगाच्या भरवशावर मंदिरातच राहू लागली. तेव्हा भगवंतांनी नामदेवाला सांगितले की अरे! तुझ्या कीर्तीची पताका आहे ही जनी! तिला घरी घेऊन जा व उपदेश देऊन कृतार्थ कर. नामदेवांनी त्याप्रमाणे केले व जनाबाईचे जीवन धन्य झाले.

श्री दासगणु महाराजांनी याच कथेच्या आधाराने आख्यान रचले आहे. पांडुरंगासाठी कासावीस होणारे भक्त पुष्कळ आहेत पण ज्या भक्तांच्या भेटीसाठी पांडुरंग उतावीळ होतो असे भक्त फारच थोडे आहेत. त्यात त्या जनाबाईंचा क्रमांक वरचाच मानावा लागेल.

जनाबाईंना नामदेवांनी घरी आणले पण तिथे तर एकादशीच्या घरी शिवरात्र! नामदेवांची आई-गोणाबाई त्यावरून नामदेवांनाच बोल लावू लागली. तेव्हा जनाबाईंनी सांगितले - ''माय! मी कोणाचे दळण दळेन. लोकांचे भांडीधुणे करीन पण माझा भार तुमच्यावर टाकणार नाही. ज्या पांडुरंगाने मला इथवर आणले, तो माझी काहीतरी सोय करीलच की.'' जनाबाईंच्या या ठाम विश्वासानेच

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

ही प्रतिज्ञा करणाऱ्या भगवंतांनी जनाबाईंची सोय लावून दिली. नामदेवांच्या अंगणातच तिने झोपडी बांधली. नामदेवांच्या घरचे सर्व काम करावे व उरलेल्या वेळात लोकांची कामे करावीत. हे सर्व करीत असताना देवाच्या नावाला क्षणभरही विसरू नये. पांडुरंगाची व नामदेवांची जवळीक तर अत्यंत सलगीची होती.

नामदेवांच्या चरित्रातील एक प्रसंग आहे की - दामाशेटी, नामदेवांचे वडील प्रतिदिनी मंदिरात जाऊन पांडुरंगाला दुधाचा नैवेद्य दाखवीत व दर्शन करून परत येत. एकदा काही कामानिमित्त ते बाहेरगावी जाणार होते म्हणून नामदेवांना म्हणाले - ''नाम्या! मी गावाला चाललो आहे. उद्या पांडुरंगासाठी तूच दूध घेऊन जा बरं!'' वडिलांच्या आज्ञेप्रमाणे नामदेव दूध घेऊन गेले. काही केल्या देव दूध पिईना. नामदेव हट्टाला पेटले व म्हणाले - ''देवा! मला माझे बाबा सांगून गेले आहेत की तुला दूध दे म्हणून. तू दूध प्यायलाशिवाय मी घरी जाणार नाही.'' भावाचाच भुकेला असलेला देव नामदेवांच्या हातून दूध पिऊन गेला. असा नामदेवांचा अधिकार होता. एकदा देव नामदेवांच्या घरी जेवायला बसले. देवभक्तांच्या अलौकिक भोजनाचा तो सोहळा जनाबाईंनी पाहिला व त्यांच्या मनामध्ये आले आपल्यालाही हा आनंद मिळावा. पण गोणाबाईंनी फटकारल्यामुळे दर्शनसुखासहि अंतरलेली जनाबाई आपल्या झोपडीत येऊन दु:खी कष्टी अंतराने निजून गेली. देव ठसका लागल्याच्या निमित्ताने जे उठले ते थेट जनाबाईंच्या झोपडीत गेले व म्हणाले, ''जने! मला खूप भूक लागली आहे. काहीतरी खायला दे. नामदेवाकडे जेवायला गेलो होतो पण गोणाबाईंच्या वसवस करण्याने मला जेवणच गेले नाही गं!'' तेव्हा जनाबाई म्हणते -

''तुज काय देऊ सावळ्या मी खाया तरी ।
मी दुबळि बटिक नाम्याची जाण श्रीहरी ।।
उच्छिष्ट तुला देणे ही गोष्ट ना बरी ।
तू जगन्नाथ तुज घालु कशी भाकरी ।।''

(श्रीदासगणुमहाराजांचे हे पद श्री शिर्डी संस्थानमध्ये अनंत कोटी ब्रह्मांडनायक साईबाबांना नैवेद्य दाखविल्यावर प्रतिदिनी म्हटले जाते.)

मग पांडुरंगानी जनाबाईच्या टोपल्याखाली झाकून ठेवलेली शिळी भाकरी तिच्यासवे खाल्ली व उच्छिष्ट सेवनाचा आनंद जनाबाईला दिला. एवढेच नव्हे तर पांडुरंगाने तिच्यासवे जात्यावर दळणहि दळले. मंदिरात घातलेले अंगावरचे दागिने व भरजरीची शाल खराब होऊ नये म्हणून जनाबाईच्या अंथरुणावर काढून ठेवले. मंदिरातील काकड्यासाठी चौघडा वाजू लागताच देव लगबगीने जनाबाईचीच वाकळ पांघरून देवळात गेले. त्यामुळे जनाबाईवर देवाचे दागिने चोरल्याचा आळ आला. राजाने जनाबाईला सुळावर देण्याचे ठरविले. पण पांडुरंगाच्या कृपेने त्या सुळाचे पाणी होऊन गेले व जनाबाईचा अधिकार सर्वांना समजला.

संतांच्या जीवनात अनेक चमत्कार घडलेले आपण पाहतो पण ते चमत्कार संतांनी घडविलेले नसतात तर त्यांचा अधिकार समाजाला कळावा म्हणून भगवंतच ते चमत्कार घडवीत असतो.

जनाबाई ही नुसती मोलमजुरी करणारी स्त्री नव्हती तर आपले भाव काव्यात प्रगट करणारी वेदांत जाणणारी, भगवंताची स्त्रीभक्त होती. म्हणून तिच्याविषयी आदरभाव, म्हणून तिच्या चरणी वंदन.

जनाबाईंचे स्वत:चे तीनशेच्यावर अभंग आहेत. एका अभंगात जनाबाई म्हणते -

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणि चारा ।।
घार हिंडते आकाशी । लक्ष तिचे पिलापाशी ।।
माता गुंतली कामासी । चित्त तिचे बाळापाशी ।।
तैसी आम्हा विठ्ठलमाये । जनी वेळोवेळा पाहे ।।

उंच आकाशात झेप घेणाऱ्या पक्षाचे लक्ष जसे घरट्यातील आपल्या पिलाकडेच असते, आई जशी घरात कोणत्याही कामात असली तरी पाळण्यातील लेकराने केलेले टॅंहा तिलाच ऐकू येते. जनाबाई म्हणतात - जो अनंतकोटी ब्रह्मांड नायक आहे, सर्व सृष्टीचा भार ज्याच्यावर आहे, त्या पांडुरंगाचे लक्ष माझ्यावर आहे असे मी अनुभविते आहे.

खरोखरीच देवावरचा हा उत्कट विश्वासच संतांना तारतो - पैलतीरावर नेतो. एका अभंगात तर जनाबाईंनी पांडुरंगाला लेकुरवाळी आईच बनविले आहे.

'विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।।' हा अभंग वाचता वाचताच पांडुरंगाच्या खांद्यावर निवृत्तिनाथ दोन्हीकडे पाय सोडून बसले आहेत. सोपानदेवांनी देवाचा एक हात धरला आहे. बंका कडेवर बसले आहेत. नामदेव दुसऱ्या हाताचे बोट धरून चालताहेत. ज्ञानेश्वर दोन पाऊले पुढेच आहेत असे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते असे सामर्थ्य जनाबाईंच्या शब्दामध्ये आहे.

काय मेला बायकांचा जन्म! म्हणून जनाबाई निराश, निरुत्साही झाल्याचे दिसत नाही. एका अभंगात त्या म्हणतात -

स्त्री जन्म म्हणवूनि न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले मज ।।

माझा पांडुरंग उच्चनीच मानीत नाही, जातिभेद जाणत नाही. लहानमोठे म्हणत नाही, स्त्री-पुरुष भाव राखीत नाही. तो सर्वांचाच अंगीकार करतो. म्हणून मी त्यालाच धरून ठेवले आहे.

एका अभंगात जनाबाई म्हणतात -

धरिला पंढरिचा चोर । प्रेमेबांधुनिया दोर ।
हृदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडिला ।
शब्दे केली जवाजुडी । विठ्ठल पायी घातिली बेडी ।
सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवे न सोडी मी तुला ।।

"त्या पंढरपूरच्या चोराला मी माझ्या प्रेमाने बांधून हृदयाच्या तुरुंगात कोंडून ठेवला आहे. सोऽहं - तोच मी" या वृत्तीने देवहि व्याकुळ झाला - जनाबाई म्हणतात - "मी देवाला निक्षून सांगितले की जीवात जीव असेपर्यंत मी तुला सोडणार नाही." या अभंगात जनाबाईंचा निर्धारच स्पष्ट होतो आहे. श्रीदासगणु महाराजांनी निश्चय ज्याचा कधी न ढळे की जैसा अचलगिरी असे भक्तीचे लक्षण सांगितले आहे. जनाबाईंच्या या अभंगातून हीच भक्ती प्रगट होते आहे.

एकदा मी उत्तरकाशीला असताना काही संन्यासी साधकांशी संवाद झाला. तेव्हा ते म्हणाले - हरियाणामे घर-गृहस्थी संभालनेवाली स्त्री भी विचार सागर-वृत्ति प्रभाकर-पंचदशी ऐसे गहन ग्रंथोंका अध्ययन करती है। महाराष्ट्रके संतोंने वेदांत की प्रक्रियाका अध्ययनही नही किया। केवळ भोलीभाली भक्तीके माध्यमसे जनजागृतीका कार्य किया। मी त्यांना म्हटले - महाराष्ट्रीय संतांची ओळखच आपल्याला नाही असे वाटते. किती संतांची नावे आपल्याला सांगू? जे निर्गुण निराकार आहे, जो सर्वं खलु इदं ब्रह्म आहे तोच पांडुरंग आहे अशा अर्थाचे कितीतरी अभंग संत वाङ्मयात मिळतात.

अद्वय अनंत नित्य निरामय।
जे का निजध्येय योगियांचे।
ते हे समचरण उभे विटेवरी।।

असे श्री तुकाराम महाराज म्हणतात -

या संतमांदियाळीतील मोलमजुरी करणारी जनाबाई ही उत्तम वेदांत जाणते.

तिचा एक अभंगच आहे -

अरे विठ्या विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या।
तुझी रांड रंडकी झाली। जन्मसावित्री चुडाल्याली।
काळ्या तुझे गेले मढे। तुला काळ पाहून रडे।
उभी राहून अंगणी। शिव्या देत दासी जनी।।

हा अभंग ऐकून ती संन्यासी मंडळी आश्चर्यचकित झाली.

खरोखर असे वाटायचे की जनाबाई स्वत:ला देवाचा भक्त म्हणविते, माझ्या प्रेमाने त्याला बांधून ठेवले आहे म्हणते तर अशा शिव्या तिने का बरे द्याव्या? पण प.पू. अप्पांच्याकडून स्वामी वरदानंद भारती यांच्याकडून या अभंगाचा गूढार्थ समजावून घेतला तेव्हा खरोखरीच जनाबाईंचा अधिकार केवढा होता हे लक्षात आले.

वास्तविक जीव हा प्रकृतिगुणाने बांधलेला आहे. त्यामुळेच ब्रह्म असून त्याला जीवपणा प्राप्त झाला. सुख-दु:ख, शीत-उष्ण, मान-अपमान ही द्वंद्वेही त्यामुळेच जिवाच्या मागे लागली. साधकाला काही वेळा ही द्वंद्वे वैताग आणतात. वास्तविक ईश्वराविषयी त्याला आत्मीयता असते पण ईश्वरी मायेमुळे त्याला त्रास वाटतो व मग साधकाला दु:ख होते. तो संतापतो व आपला राग कधीकधी देवावरच काढतो. त्या भूमिकेतून जनाबाई देवाला शिव्या देताना दिसते.

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका: जना:।
भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत्।।

या सिद्धांताप्रमाणे ईश्वरहि पारमार्थिक सत्तेच्या पातळीवर मायाकार्यच आहे. माया हीच ईश्वराला कारण असल्याने ती ईश्वराची - विठ्ठलाची आई झाली आणि तो तिचे मूल (कारटे) झाला.

वेदांतामध्ये माया व अविद्या हे शब्द एकार्थक न मानता भिन्नार्थक मानतात. अविद्याही जिवाच्या आश्रयाने राहते. जीव हा ईश्वराचा अंशच आहे म्हणून अविद्या ही त्याची पत्नी झाली. सर्व कारभार ही अविद्याच करते. तिला तुच्छतेने रांड म्हटले आहे. साधक प्रयत्नाच्या बळावर जीवभावावर विजय मिळवितो म्हणजे त्याचा जीवभाव संपतो. जीव मेला म्हणजे अविद्या रंडकी झाली, विधवा झाली. पण प्रत्यक्षात प्रारब्ध असेपर्यंत जीवभाव नष्ट होत नाही. त्यामुळे परमार्थत: अविद्या ही जन्मसावित्री ठरते. त्यामुळे सौभाग्यवतीचा चुडा ती धारण करते.

यावत् जीवेत् त्वया वंद्या वेदान्ते गुरुरीश्वर: असे असल्यामुळे जीवभाव व द्वैतभावना जागृत ठेवणारी अविद्या गृहीत धरावीच लागते. म्हणून तिला जन्मसावित्री म्हटले आहे.

मृत्यू हा काळाच्या स्वाधीन असतो. म्हणून कोणाचेही मरण ओढवताच काळाला आपली सत्ता सिद्ध झाली असे वाटते व तो अहंकाराने सुखावतो. पण हा जीवभाव नष्ट झालेला साधक उच्च पातळीवरचा आहे. त्याचे हे मरणे साधनेच्या अपेक्षित परिणामामुळे असते. तो काही काळाचा प्रभाव नाही. म्हणून निर्विष सापाप्रमाणे काळ हा या जीवन्मुक्ताच्या हातातील खेळणे झाला. जो सर्वांवर सत्ता गाजवितो त्याची अशी दशा झाल्यामुळे त्याला दु:ख होऊन तो रडणारच.

साधनेच्या महत्प्रयासानंतर जीवनमुक्त झालेली जनाबाई आता केवळ प्रारब्धाच्या अंगणात उभी आहे. ज्या भोगांविषयी पराधीनता असते ते संचित वा क्रियमाणाचे भोग आता उरलेले नाहीत. शिव्या देण्यामुळे त्यात काही बिघडणार नाही. कारण नारदानीच सांगून ठेवले आहे की - "कामक्रोधादिकं तस्मिन्नेव करणीयम्". देह आहे तोवर भोग वाट्याला येतातच. त्यामागची सत्ता ईश्वराची म्हणजे विठ्ठलाची आहे. म्हणून जो प्रत्यक्ष कारण त्यालाच जनाबाई शिव्या देते आहे. अर्थात हा न्याय फार वरच्या पातळीवरचा आहे. तो जनाबाईंसारखी श्रेष्ठ भक्तच करू जाणे!

इतरांप्रमाणे आपणही कवी बनावे व त्यासाठी काव्य रचावे या भूमिकेतून जनाबाईंची अभंगरचना नाही. तर अनेकविध भावनांनी भरलेले अंत:करण काव्यरूपाने प्रगट झाले आहे. मातापित्यांचे छत्र नाहीसे झाल्यामुळे आलेल्या पोरकेपणाची जाणीव, सोसाव्या लागणाऱ्या कष्टांचा परिहार होण्यासाठी पांडुरंगाला केलेले आवाहन, कधी देवदर्शनाविषयी झालेली कासाविशी, कधी संतांचे वर्णिलेले माहात्म्य, कधी देवाला घातलेल्या शिव्या, कधी नामदेवांविषयी गुरूविषयीची व्यक्त होणारी कृतज्ञता, कधी श्री ज्ञानेश्वरांविषयीचा आदरभाव, कधी चोखामेळ्याची भगवद्भक्ति इत्यादी भाव व्यक्त करणारे सुमारे तीनशेच्यावर अभंग जनाबाईंचे आहेत. देवा! तुझ्या प्राप्तीसाठी मी काही केले नाही. किती मी अभागी! हा भाव वर्णन करताना जनाबाई म्हणतात-

नाही केली तुझी सेवा। दु:ख वाटतसे जीवा।
नष्ट पापीण मी हीन। नाही केले तुझे ध्यान

अहो नारायणा । कृपा का कराना ।।
मी तो अज्ञानाची राशी । म्हणोनि आले पायापाशी ।।
काय करू या कर्मासी । धाव पाव हृषिकेशी ।।
नाश होतो आयुष्याचा । तुझे नाव न ये वाचा ।।

या अभंगाच्या शब्दांतून जनाबाईंची आर्तताच प्रगट होते आहे. नामदेवांचे जसे पूर्वजन्माचे वर्णन आहे तसे श्रीजनाबाईंनीही आपल्या पूर्वजन्माचा वृत्तांत एका अभंगात दिला आहे. त्या म्हणतात –

हिरण्यकश्यपाचे कुळी नामा प्रल्हाद ।
पद्मिनी नामे माझे श्रेष्ठदासीचे पद ।।
दुसरा जन्म त्यांचा अंगद रामभक्त ।
मंथरा नाम माझे माथा दिधली लाथ ।।
गोकुळी कृष्णासवे जन्मला उद्धव ।
कुब्जा नाम माझे उद्धरिले स्वभाव ।।
कलीत नामदेव विठ्ठल चिंतनी ।
त्याचे सेवेसाठी दासी जन्मली जनी ।।

हे सर्व वर्णन करण्याचे कारण एवढेच की जनाबाईंचा अधिकार किती होता हे समजावे.

प्रसिद्ध साहित्यिक श्री. रा. चिं. ढेरे आपल्या एका लेखात म्हणतात –

''जनीच्या कवितेत गंगेचा गंभीर जीवनौघ नसला तरी निर्झरिणीचे संगीत आहे. उद्यानपुष्पांचा धुंद सुगंध नसला तरी जाईजुईचा मंदमधुर परिमल आहे. प्रभाकराचे प्रखर तेज नसले तरी पहाटेच्या वेळी प्रकाशणाऱ्या शुक्राच्या चांदणीची सुखशीलत प्रभा आहे. केतकीचा घमघमाट नसला तरी तुळशीमंजिरीचे पावित्र्य आहे.'' किती यथार्थ वर्णन आहे ना!

प्रपंच व परमार्थ या दोन्हींचा उत्कृष्ट समन्वय संतांनी आपल्या जीवनात साधला आहे.

''**कांदा मुळा भाजी। हीच विठाबाई माझी।।**'' असे सावतामाळी म्हणतात.

देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने ।

असा अनुभव नरहरी सोनारांचा आहे. तसेच जनाबाईंनीही म्हटले आहे –

दळितां कांडिता तुज गाईन अनंता ।
दळू कांडू खेळू । सर्व पाप ताप जाळू ।।
देव खाते देव पिते । देवावरीच मी निजते ।
देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते ।।
देव येथे देव तेथे । देवावीण नाही रिते ।
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरले अंतरबाही ।।

जीवन्मुक्तदशा ही संतांच्या जीवनातील परमोच्च अवस्था. शेतात मळणी झाल्यानंतर दाणे कोंड्यापासून वेगळे काढले जातात. त्याप्रमाणे जो गुणातीत आहे तो देहतादात्म्य टाकून आत्मस्वरूपामध्ये स्थिर होतो. प्रा. रा. द. रानडे म्हणतात – ईश्वरदर्शनाने मन मस्त झाले की वृत्तीला पूर्ण साम्यावस्था प्राप्त होते. तो केवळ आनंदमयी होऊन जातो. प.पू. स्वामी वरदानंद भारतीनीही एके ठिकाणी म्हटले आहे –

मीलनी धुंद मन झाले कुणाला काय सांगावे ।
कशाला व्याप हा सारा निवांती मत्त डोलावे ।।
समेसी पारडी दोन्ही प्रयासे ही पहा आली ।
स्थिरावे पूर्ण हा काटा पुन्हा ते काय तोलावे ।।

ही अवस्था जनाबाईंनी अनुभविली आहे. असोनिया देही । छाया पुरुष जैसा पाही ।

सूर्य जैसा घटकेशी । तैसी देही जनी दासी ।।

इतक्या अधिकारसंपन्न जनाबाईंची जन्मतिथी कोणती होती? त्यांचा विवाह झाला होता का नाही? त्यांना मुलेबाळे किती होती? जनाबाईंच्या माहेरच्या किंवा सासरच्या वंशाचे इतिवृत्त काय? जनाबाईंना आयुर्मर्यादा किती लाभली होती? त्यांचा अंत कोठे व केव्हा झाला? त्यांना नैसर्गिक मृत्यू आला की त्यांनी समाधि घेतली. इत्यादि लौकिक माहिती मात्र उपलब्ध झालेली नाही. पण तरीही मराठी साहित्यात संत जनाबाई आपल्या काव्याने जनमानसावर एक न मिटणारा ठसा उमटवून गेल्या हे निश्चित.

त्यांच्या चरणी सादराभिवादन.

कु. गार्गी (वसुमती) देशपांडे
श्री. दासगणु प्रतिष्ठान, गोरटे, जि. नांदेड ४३१८०७
फोन – (०२४६७) २०२५१४, मोबा. – ९४२१९०१०९८



स्त्री संत जनाबाई (नाम महात्म्य)

श्रीमती पुष्पा पांडुरंग नाईक

B.A., B.Ed., माजी मुख्याध्यापिका - जि.प.कन्या प्रशाला, ठाणे
'पखरण' काव्यसंग्रह, विद्यार्थ्यांसाठी विविध कथांद्वारे, चित्रांद्वारे 'पसायदान'चा अर्थ सांगणे तसेच निबंधलेखन क्षमता वाढविण्यासाठी प्रबंध लेखन. या प्रबंधास जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पारितोषिक, जयेंद्र सरस्वती शंकराचार्यांच्या हस्ते सुवर्णपदक. 'आदर्श शिक्षक' जिल्हा पुरस्कार, औरंगाबाद.

'नामयाची जनी' म्हणून सर्वत्र ओळखल्या जाणाऱ्या संत जनाबाई या स्वत:च खर तर पांडुरंगमय, नाममय झालेल्या होत्या. त्यांची प्रत्येक कृती नाममय असल्यानेच त्यांची जीवन यात्रा आनंददायी झाली.

परमेश्वराचे नाममहात्म्य त्यांनी अनेक पौराणिक दृष्टांत, अध्यात्मिक स्वानुभव याद्वारे जनमानसासमोर जणू प्रत्यक्षच उभे केले आहेत. त्यांच्या नाममहात्म्याच्या अभंगातून भक्तिरस अखंड पाझरत असून त्याचा रसास्वाद जेवढा आपल्याला घेता येईल तेवढा घेण्याचा आपण प्रयत्न करूया.

(१)

गाता विठोबाची कीर्ती । महापातके जळती ।।१।।
सर्व सुखाचा आगर । उभा असे विटेवर ।।२।।
आठवितां पाय त्याचे । मग तुम्हा भय कैचें ।।३।।
काया वाचा मने भाव । जनी म्हणे गावा देव ।।४।।

निर्देशित अभंगातून परमेश्वराचे नाममहात्म्य वर्णन करताना संत जनाबाई म्हणतात की, विठोबाची कीर्ती गायल्याने मनुष्याची सर्व पापे नाहीशी होतात. सुखाचा सागर असलेला विठोबा भक्तासाठी विटेवर उभा आहे. स्वत:च्या अंत:चक्षुपढे विठोबाचे चरण दिसताच भय वाटतच नाही. मात्र यासाठी विठोबाला कायावाचामने म्हणजेच त्याची कीर्ती सगुण-निर्गुण, साकार-निराकार, चेतन-अचेतन अशा विविध स्वरूपात व चितनांत अनेक जन्म गायली पाहिजे. यामुळे आपली महापापं तर नष्ट होतातच पण सत् चित् आनंदाची प्राप्ती होते ती निराळीच.

(२)

जन्म येऊनिया देख । करा देहाचे सार्थक ।।१।।
वाचें नाम विठ्ठलाचे । तेणें सार्थक देहाचे ।।२।।
ऐसा नामाचा महिमा । शेष वर्णिता झाली सीमा ।।३।।
नाम तारक त्रिभुवनी । म्हणे नामयाची जनी ।।४।।

या अभंगातून या नरदेहाचे सार्थक कशात आहे. हे आपल्याला जनाबाई सांगत आहेत. आपल्याकडे असं म्हटलं जातं की चौऱ्यांशी लक्ष योनी नंतर माणसाचा जन्म मिळतो. अन् या नरदेहातच फक्त मोक्ष-प्राप्ती होऊ शकते. या मानवी देहातच आत्मानुभूती घेता येऊ शकते. स्वरूप पाहता येणे शक्य असते. वाचेने सतत विठ्ठलाचे नाम घेतल्यानेच या देहाचे सार्थक होते. 'नाममहिमा' वेदांनी वर्णिला आहे. प्रत्यक्ष शेषानेही वर्णन केला आहे. त्रिभुवनाला तारणारे, वाचवणारे, जर कुणी असेल तर ते देवाचे नामच होय. आपल्या या कलियुगात तर नाम म्हणजेच परमेश्वर होय.

(३)

नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट ।।१।।
जड शिळा ज्या सागरी । आत्मारामें नामे तारी ।।२।।
पुत्रभाव स्मरण केले । तया वैकुंठासी नेले ।।३।।
नाममहिमा जनी जाणे । ध्याता विठ्ठलची होणे ।।४।।

पुढे जनाबाई म्हणतात अहो, नाम फुकट आहे. ते घ्यायला पैसे मोजावे लागत नाहीत आणि नाम घेताना कंटाळा ही येत नाही. जरा विचार केला तर आपल्याच लक्षात येईल की, किंतीतरी वेळ आपण वाया घालवत असतो. हाच वेळ नाम घेण्यात कारणी लावला तर? अहो केवढा अगाध महिमा नामांचा? लंकेत जाण्यासाठी सागरावर पूल बांधला गेला तो फक्त रामनाम लिहलेल्या हनुमानाच्या दगडामुळेच ना?

अजामिळाने मरणसमयी स्वत:च्या मुलाचे नाव 'नारायण' हे आर्ततेने घेतल्याने जरी तो अभक्त होता तरी प्रत्यक्ष नारायणाने त्याला मुक्त केले होते. कारण अजामिळाच्या मरणसमयी जसे यमदूत आले तसे विष्णूदूत सुद्धा आले. त्या दोन्ही दूतांमधील संवाद अजामिळाने ऐकला. त्याच क्षणी त्याला उपरती आली. तो परमभक्त झाला. आर्ततेने हाक मारली व तरून गेला.

असा हा नामाचा महिमा. 'द्रौपदी वस्त्रहरण' यातून द्रौपदीच्या हाकेला श्रीकृष्ण धावले. तिला वस्त्रे पुरविली. हे आपल्याला विदित आहेच. भक्त-विठ्ठल असे द्वैत न राहता दोघे अद्वैतच होऊन जातात.

(५)

काय हे करावें । धनवंतादि अवघे ।।१।।
तुझे नाम नाही जेथे । नको माझी आंस तेथे ।।२।।
तुझविण बोल न मानी । करी ऐसे म्हणे जनी ।।३।।

जे अभक्त आहेत परमेश्वराचे नाम कधी घेतच नाहीत त्यांच्या बद्दल जनाबाई या अभंगातून सांगतात की, अवघ्या धनवंतांचं, एश्वर्यवंताचं काय करावं? नुसत्या धनदौलतीला काय अर्थ? धनाने धनवंत असले तरी, तुझ नाम जर ते घेत नसतील तर ते निर्धनच, भिकारीच आहेत. जेथे, जेथे तुझे नाम नाही, तुझे अधिष्ठानच नाही. तेथे, तेथे, माझे मन जाऊ देऊ नकोस. त्यांचा संपर्क माझ्या मनाला सुद्धा होऊ देऊ नकोस. जेथे तू आहेस तेथेच श्री, लक्ष्मी, विजय सर्व काही आहे. तुझ्या नामातच मला रममाण होऊ दे. तल्लीन होऊ दे. तुझ्याशिवाय कोणते ही बोल, बोलणं म्हणजे निरर्थकच. म्हणून बोलताना फक्त तुझाच विषय माझ्या बोलण्यात असावा.

(६)

विठ्ठल नामाची नाही गोडी । काळ हाणोनि तोंड फोडी ।।१।।
गळा बांधोनि खांबासी । विंचू लाविती जिव्हेसी ।।२।।
ऐसा अभिमानी मेला । नर्क कुंडी थारा त्याला ।।३।।
नामा बोध करी मना । दासी जनी लागे चरणा ।।४।।

बोलताना तुझा विषय माझ्या तोंडी सतत हवाच हवा. जनाबाई म्हणतात, की, ज्या मुखाने कधी परमेश्वराचे गुणगानच केले नाही ते मुख काय कामाचे? काळ ही त्याला क्षमा करीत नाही. एवढं काय पण यमपुरीतील जी अनेक कुंडं आहेत, त्यातील नर्क कुंडात यम त्या अभक्ताला टाकतो. तेच त्याचे वसतिस्थान होते. तेथे त्याला अनेक यातना सहन कराव्या लागतात. गळा बांधून त्याला तेथे खांबास बांधले जाते. एवढेच नाहीतर विंचू त्याच्या जीभेवर सोडतात. जी नामे घेण्यासाठी आहे, ती जीभ. तिने कधी देवाचे नाव घेतले नाही, त्यामुळे शेवटी अशा नरक यातना भोगताना त्याचा अभिमान, ताठा गळून पडतो.

म्हणून मला असं वाटतं की, परमेश्वराने आपल्याला जी बुद्धी दिली ती सत् असद् विवेक करण्यासाठी. डोळे दिले ते ईश्वराचे सुंदर, सगुण रूप बघण्यासाठी, कान दिले आहेत ते त्याचे गुणकीर्तन ऐकण्यासाठी, मुख दिले ते त्याची कीर्ती गाण्यासाठीच.

(८)

नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।१।।
नाम तारक हे थोर । नामे तारिले अपार ।।२।।
अजामेळ उद्धरिला । चोखामेळा । मुक्तीस नेला ।।३।।
नामदळणी कांडणी । म्हणे नामयाची जनी ।।४।।

परमेश्वराची कीर्ती गाण्यासाठी रात्र असो की दिवस याचा विचार न करता आपल्या रोजच्याच दैनंदिन जीवनात कर्तव्य कर्म करीत असताना विठोबाचे नाम घ्यावे. आणि मगच कर्तव्य कर्माला सुरुवात करावी. कारण नाम हे भवतारक आहे. नामानेच कित्येकांचा उद्धार झाला आहे. नामामुळेच कित्येकजण हा भवसागर तरून गेले. आर्ततेने मुलाचे नाव 'नारायण' घेतल्याने अजामिळ उद्धरून गेला. एकनिष्ठ भक्ती चोखामेळ्याची होती म्हणून तो तरला. त्या चोखामेळ्याला मुक्ती मिळाली. नामयाची जनी तर दळण दळीत असता, कांडण करीत असता, गोवऱ्या वेचीत असता पांडुरंगाचे नाव घेत असे. जनाबाईंनी थापलेल्या गोवऱ्या कानाला लावून बघितल्या तर त्यातून 'विठ्ठल, विठ्ठल' असा ध्वनी येत असे, असे म्हणतात.

(१०)

माझा शिणभाग गेला । तुझ पाहता विठ्ठला ।।१।।
पाप ताप जाती । तुझे नाम ज्याचे चित्ती ।।२।।
अखंडित नामस्मरण । बांधू न शके तया विघ्न ।।३।।
जनी म्हणे हरिहर । भजता वैकुंठी त्या घर ।।४।।

पांडुरंगमय झालेल्या जनाबाईंना पांडुरंगाचे सगुण रूप दिसता क्षणीच त्यांच्या जीवनातील शीणभाग संपुष्टात आला. देहाने जनाबाई म्हणून त्या जगत होत्या पण अंत:करणाने त्या विठ्ठलमय झाल्या होत्या. देहाने कर्म करीत असल्या तरी विठ्ठल नामात सतत तल्लीन असायच्या. परमेश्वराचे नाम ज्याच्या सदैव चित्तात असते. त्याच्या पापतापाचे हरण तोच करीत असतो. त्याच्या जीवनात किती ही विघ्ने आली. एवढंच काय पण संकटाचे पहाडच्या पहाड जरी उभे राहिले तरी समर्थपणे ते, तो परमेश्वर पार करतो. कशाची ही बाधा त्याला होत नाही. एवढंच नाही तर वैकुंठाला परमेश्वर त्याला घेऊन जातो.

संत तुकाराम कीर्तन करता करताच सदेह वैकुंठास गेले. हे आपणास माहित आहेच.

(११)

नाम विठोबाचे थोर । तरला कोळी आणि कुंभार ।।१।।
ऐसी नामाची आवडी । तुटे संसाराची बेडी ।।२।।
नामगाय वेळोवेळा । दासी जनीसी नित्य चाळा ।।३।।

विठ्ठल नामाची थोरवी वर्णन करीत असता वाल्या कोळी तरला आणि गोरा कुंभार ही तरला, असं त्या म्हणत आहेत. वाल्या कोळीचा (दरोडेखोर) वाल्मिकी ऋषी कसे झाले? त्यांच्या तपश्चर्येची ('राम राम' म्हणण्याऐवजी मरा मरा मरा म्हणून सुद्धा) परिणती वाल्याचा ते वाल्मिकी ऋषी झाले. ज्यांनी जगाला 'रामायण' ही अजरामर भेट महाकाव्यरूपाने दिली. तसेच गोराकुंभाराची भक्ती गोराकुंभारासाठी नामदेवाने परमेश्वराला आवाहन केले व त्यामुळे गोराकुंभारला हात मिळाले. संसार रूपी बेडी जर तोडायची असेल तर त्यासाठी परमेश्वराच्या अनुसंधानाची, नामाची आवड कायमची देहात प्राण असेपर्यंत असली पाहिजे. सतत विठ्ठल–नामाचे गान करणं हा जनाबाईंचा नित्याचा आवडीचा चाळा (छंद) होता. बाहेरच्या विषयात, लौकिकात न रमता प्रभुचिंतनातच त्या रमल्या.

(१३)

येऊं ऐसें जाऊं । जनासंगे हेंचि दाऊं ।।१।।
आपण करूं हरिकीर्तन । जाणोनी भक्तीचे जीवन ।।२।।
नाम संशय छेदन । भावपाशाचे मोचन ।।३।।
जनी म्हणे हो देवासी । होईल त्याला कसणी ।।४।।

येथे जन्म घेतल्यानंतर येथून जाणे क्रमप्राप्तच आहे. पण जायचे कसे? तर जनाबाई म्हणतात की, लोकांच्या सहवासात राहून लोकांना दाखवून देऊ. काय दाखवून देऊ? तर आपण म्हणजे सर्व जनता, सर्वजण हरिकीर्तन करू. नाममहात्म्य विठ्ठलाचे जाणून रात्रंदिवस त्याची भावभक्ती करू. त्याच्या नामस्मरणाने कोणताही किंतू मनात रहात नाही. नामनौकेत जर आपण बसलेलो आहोत तर भवपाशातून मुक्ती होतेच होते. 'मी म्हणजे देहच' हाच खरा संशय असतो. असा भ्रम असतो. देहभावाचा आणि जगतभासाचा संशय नामस्मरणाने विरून जातो. 'मीपणा' नाहीसा होतो. नामाच्या धाग्याने हरिभक्त आत्मभावाशी पक्का बांधला जातो.

(१४)

हहिहर ब्रह्मादिक । नामें तरले तिन्ही लोक ।।१।।
ऐसा कथेचा महिमा । झाली बोलायाची सीमा ।।२।।
जपें तपें लाजविली । तीर्थे शरणागत आलीं ।।३।।
नामदेवा कीर्तनी । ध्वजा आलया स्वर्गाहुनी ।।४।।
देवश्रुती देती ग्वाही । जनी म्हणे सांगू कायी ।।५।।

महिमा महान आहे. हे सांगत असताना जनाबाई म्हणतात की, ब्रह्मा, विष्णू, महेश इ. देव आणि अनेक देवाधिदेव परमेश्वराच्या नामस्मरणाने तरून गेले. तिन्ही लोक (स्वर्ग-मृत्यू-पाताळ) तरलेत. अनेक देवांच्या अनेक कथा. त्या कथांचा महिमा ही महानच. किती ही बोलले, वर्णन केले तरी ते कमीच. कारण बोलण्याला ही सीमा आहेच. जपाला, तपाला लाजविणारी एवढेच नाही तर तीर्थांना सुद्धा शरण यायला लावणारी अशी ही नामस्मरण भक्ती आहे. संत नामदेव जेव्हा जेव्हा कीर्तन करीत असत तेव्हा, तेव्हा ध्वजा स्वर्गाहून येत असते. म्हणजेच प्रत्यक्ष पंढरीचा पांडुरंग कीर्तनात स्वत: आनंदाने नाचत असे. कीर्तन रंगे. स्वर्गातील देव खाली उतरत असे जनाबाई सांगत. हे मीच सांगते असे नाही तर देव, श्रुती यांनी पण याची ग्वाही (खात्री) दिली आहे. या नामाच्या महिमाची खात्री वेदात, देवानी स्वमुखाने सांगितली आहे.

।। पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा ।।

ही आरतातील ओळ ही आपल्याला माहिती आहेच.

(१५)

व्हावे कथेसी सादर । मन करुनियां स्थीर ।।१।।
बाबा काय झोपी जाता । झाले चौऱ्यांशीचे खाता ।।२।।
नरदेह कैसा रे मागुता । भेटी नव्हे त्या सीताकांता ।।३।।
आळस निद्रा उठाउठी । त्यजा स्वरूपी घाला मिठी ।।४।।
जनी म्हणे हरिचें नाम । मुखी म्हणा धरुनि प्रेम ।।५।।

या अभंगात जनाबाई म्हणतात नामस्मरण परमेश्वराचे अखंडपणे तर करायचेच, पण नेहमी मन त्यासाठी स्थिर असणे अत्यंत आवश्यक आहे. परमेश्वराचे गुणगान श्रद्धेने, शांत चित्ताने ऐकावे. चौऱ्यांशी योनी भोगल्यानंतर तुम्हाला हा सुंदर मानवी देह मिळाला आहे. परमेश्वराचे कीर्तन, प्रवचन, कथा ऐकताना झोपी का जाता? त्याच्या कथेतून त्याचेच गुणगाण ऐका. लक्ष देऊन श्रवणभक्ती करा. नरदेहात परमेश्वराचे नाम घेतलं नाही तर परत नरदेह कसा मिळणार? सीताकांताची, श्रीरामाची भेट कशी होणार? म्हणून आळस, निद्रेचा त्याग करा. स्वरूप जाणून घ्या. स्वत:च्या हृदयातील परमेश्वराला मिठी मारा. स्वत:ला ओळखा व मुखाने निरंतर, प्रेमाने हरीचे नाम घ्यावे.

कलियुगात नामरूपात भगवंत आहे असे म्हणतात. खरं तर तो सजीवात निर्जीवात सर्वत्र भरलेला असून दशांगुळे शिल्लकच आहे. तेव्हा नामस्मरणाने आपणही आपले स्वरूप पहाण्याचा प्रयत्न या घटकेपासूनच सुरू करू या.

श्रीमती पुष्पा नाईक
मा.जी. मु.अ.जि.प.
कन्याशाळा, ठाणे (प.)

***



संत जनाबाईंचे स्त्रीविषयक अभंग

डॉ. सौ. शैला चंद्रकांत काळकर

मराठी विभागप्रमुख म्हणून राजगुरु महाविद्यालयातून निवृत्त.
संतसाहित्याच्या अध्यापनाचा २० वर्षांचा अनुभव. श्रीसमर्थ रामदासाच्या कार्याचा प्रसार व प्रचार. उत्कृष्ट प्रवचनकार / व्याख्यात्या. वर्तमानपत्र व मासिकातून स्फुटलेखन. भरतकाम, शिवणकाम हस्तकौशल्यात प्राविण्य. योगी अरविंदाश्रम दिल्ली यांच्या नैनिताल येथील शिबिरात प्रमुख वक्त्या म्हणून कार्यरत.

स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता असते असे म्हणतात. स्त्रीमध्ये स्त्रीत्वाचा गुण अंगभूत असतोच पण त्याहीपेक्षा मातृत्वाचा, वात्सल्याचा गुण जास्ती प्रभावी असतो आणि संत एकनाथ म्हणतात त्याप्रमाणे,

देही ज्या गुणाचे प्राधान्य । तैसेची कर्म उपजे जाण ।
इंद्रिये गुणाधीन । तद्नुसार वर्तती जाण ।। नाथ भागवत

स्त्री अनेक नात्यांनी, भूमिकांनी, धाग्यांनी बांधलेली असली तरी तिचे मातृत्व जास्त प्रभावी असते, तो तिचा स्थायी असतो. संत जनाबाई तरी या नियमाला अपवाद कशा असणार त्यांच्या समग्र अभंगातील फक्त स्त्रीविषयक अभंगांचा मागोवा आपण घेणार आहोत आणि त्या दृष्टिकोनातून डोळ्यासमोर येतो तो हा अभंग,

विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपळांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।
गोरा कुंभार मांडिवरी । चोखा जीवा बरोबरी ।
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

या अभंगात वत्सलभावाने, मातृत्वभावाने सर्व संतांना अंगाखांद्यावर वागविणाऱ्या विठ्ठलाचे चित्रण तर सुंदर झालेच आहे पण त्याचबरोबर विठूमाऊलीचा सर्व संतांविषयीचा समत्वभावही यातून प्रगट झाला आहे. असे लेकुरवाळ्या विठूमाऊलीचे ध्यान म्हणजे अष्ट अपत्यांचे सौभाग्य आहे. जनाबाईसारख्या स्त्री मनालाच ही अष्ट अपत्यांची व आपल्या सौभाग्यवान विठूची कल्पना सुचणे शक्य आहे. संत जनाबाईची विठोबाला लेकुरवाळा म्हण्याची कल्पना संसारी जीवनातील स्त्रीची भावना प्रकट करणारी आहे. कारण लेकुरवाळी हा शब्द स्त्रीसाठीच योजला जातो.

महाराष्ट्राच्या सामाजिक मानसिकतेत 'समता' या मूल्याची प्रतिष्ठापना करण्याचे कार्य संतांच्या प्रयत्नातून, कार्यातून आणि काव्यधारेतून झालेले दिसते. वारकरी संप्रदायाच्या प्रेरणेतूनच अठरा पगड जातीतून संत निर्माण झाले. त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी सारस्वताची बाग फुलविली. त्याचप्रमाणे चार भिंतीत कोंडून पडलेल्या 'स्त्री'च्या भावशक्तीलाही संत चळवळीमुळे जाग येऊन नवे अंकुर फुटले. त्यातूनच मुक्ताई, महदंबा, सोयरा, निर्मळा, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यासारख्या अजोड कवयित्री निर्माण झाल्या. मुळात स्त्रीहृदय हे बहुतेकवेळा भावनाप्रधान असते. सत्कवीला आवश्यक असलेली भावनेची उत्कटता, अभिव्यक्तीतील सहजता आणि प्रसाद गुण हे तिच्या व्यक्तिमत्त्वात अंगभूतच असते. त्यातून वरील कवयित्रींच्या मनात भक्तीची एवढी उत्कट उर्मी होती की, त्या उर्मीपोटी निर्माण झालेली काव्यरचना ही एकीकडे भावपूर्ण तर आहेच पण तो भोळाभाबडा भाव नाही तर त्यांची कविता काव्यात्मकतेच्या पातळीवरही महत्त्वपूर्ण स्तर गाठते.

स्त्रियांच्या लेखनाचा सामाजिकदृष्ट्या विचार केला तर जनाबाई हे त्या काळात खालच्या सामाजिक स्तरातून वर उठून यशाची उंची पायरी गाठण्याऱ्या स्त्रीचे उदाहरण आहे. अत्यंत शूद्र जीवनातून अलौकिकाकडे झेप घेणारी जनाबाई ही पहिली शूद्र स्त्रीसंत होय. हे असामान्यत्व गाठताना जनाबाईला इतर संत कवयित्रींपेक्षा अधिक कष्ट सोसत लढा द्यावा लागला. स्त्री म्हणून उपेक्षा वाट्याला आलीच होती. समाजात सर्वच दृष्टीने तिचे खालचे स्थान, जात, कुटुंब, प्रतिष्ठा, दर्जा या सर्वच बाबतीत ती इतर संत कवयित्रींपेक्षा उणी. तिचे आयुष्य सामान्य शूद्र दासीचे. एकाकी, उपेक्षित पण सुदैवाने नामदेवांसारख्या भक्त शिरोमणीच्या सहवासात राहिल्यामुळे तिच्या जीवनाला, चंदनाच्या सहवासात राहिलेल्या बाभळीच्या झाडालाही सुगंध प्राप्त व्हावा तसा सुगंध प्राप्त झाला. नामदेवांच्या दारी वाढलेली ही वेल गगनावरी गेली. नामदेवांच्या सहवासाने तिचा आत्मोद्धार झाला. आपण दासी, शूद्र त्यामुळे आपले स्थान घराबाहेर याची रुखरुख कधी कधी तिच्या अभंगातून व्यक्त होते.

राजाई, गोणाई । अखंडित तुझे पायी ।
मज ठेवियेले द्वारी । नीच म्हणोनी बाहेरी ।।

अशी खंत ती व्यक्त करतेच पण त्याच वेळी 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास' असेही ती म्हणते. आपण नीच म्हणून आपल्याला दाराबाहेर ठेवल्याची खंत त्यांच्या अभंगातून व्यक्त होते.

स्त्री आणि भांडण असेही एक समीकरण नेहमी मांडले जाते. जनाबाईंबद्दलच्या अनेक कथा प्रचलित आहेत. एक महान विठ्ठलभक्त म्हणून तिची कीर्ती सर्वत्र पसरली होती. तिचा लौकिक ऐकून संत तुलसीदासांना तिला भेटण्याची इच्छा झाली तेव्हा ते पंढरपुरास आले आणि जनाबाईचा शोध घेत घेत 'इथे जनाबाई कुठे राहतात हो' असे म्हणत तिची चौकशी करीत होते. पण ज्यांना विचारावे ते 'कोण जनाबाई?' असे विचारीत कारण नामदेवांघरच्या दासी जनीला जनाबाई म्हणून कोण संबोधणार? तुलसीदास म्हणाले, त्या जनाबाई हो ज्या खूप मोठ्या विठ्ठलभक्त आहेत. तेव्हा ऐकणारी व्यक्ती समजली आणि म्हणाली आमची जनी होय, ती गेली शेण्या येचाया. कुठे विचारले असता डोंगरापलीकडे बोट दाखविले. तुलसीदास शोधत शोधत रानात गेले. तिथे दोन बायका भांडत होत्या. त्यांना तुलसीदास म्हणाले, जनाबाई कुठे आहेत हो? त्यावेळी एक बाई म्हणाली, जनाबाई कुठे आहे ते नंतर सांगते अगुदर आमचे भांडण सोडवा. तुलसीदास म्हणाले, बाई, मला तुमच्या भांडणात ओढू नका जनाबाई कुठे आहेत ते सांगा. तेव्हा ती बाई म्हणाली, तुम्हाला सांगितले ना जनीची गाठ घालून देते म्हणुन अगुदर आमचे भांडाण सोडवा. तुलसीदासांची काही मात्रा त्या भांडणाऱ्या बायकांपुढे चालेना.

ती बाई म्हणाली आम्ही शेण्या येचतोय ही बया म्हणाली मी तिच्या शेण्या चोरल्या. तुम्ही या ढिगातली प्रत्येक शेणी कानाला लाऊन बघा. या शेणीतून इट्ठल इट्ठल असा आवाज येईल ती फक्त माझी. बाकीच्या शेण्या तिच्या. तुलसीदासांनी एकेक शेणी कानाला लाऊन बघितली. तेव्हा कित्येक शेण्यांमधून इट्ठल इट्ठल असा आवाज ऐकू येत होता. शेण्यांमधून येणारा इट्ठल इट्ठल असा आवाज ऐकून तुलसीदास आश्चर्यचकित झाले. ती भांडणारी बाई म्हणाली मीच जनी बोला काय काम काहाडलं. तुलसीदासांच्या डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या. ते तिच्या पाया पडले. त्यांना ज्या जनाबाईला भेटायचे होते ती त्यांना केव्हाच भेटली होती.

जनाबाईंच्या मनात असा भाव होता की, प्रत्येक कामात विठूराया तिची मदत करतो. असाच एक अभंग

जनी माऊलीने वेणी । तुळशीचे बनी ।
हाती घेऊनिया लोणी । डोई चोळी चक्रपाणी ।
माझ्या जनीला नाही कोणी । म्हणोनी देव घाली पाणी ।
जनी सांगे सर्व लोका । न्हाऊ घाली माझा बाप, सखा ।

तुळशीच्या बनात आपले केस मोकळे करीत बसलेल्या जनी जवळ अचानक विठूमाऊली हातात लोणी घेऊन आली व तिच्या डोक्याला चोळू लागली. पूर्वीच्या काळी संगजिऱ्याची पावडर लोण्यात कालवून डोक्याला लावीत. त्यामुळे केस रेशमासारखे होत. माझ्या जनीला मायबाप कोणी नाही म्हणून देवच पाणी घालून न्हाऊ घालतो. न्हाऊ घाली माझा बाप, सखा हा भाव वात्सल्याचा परिपोष करणारा आहे. परमेश्वर आणि भक्त यांच्यातले नाते माय लेकरांचेआहे ते अनेक अभंगातून जनाबाईंनी व्यक्त केले आहे.

एके दिवशी न्हावयास । पाणी नव्हते विसणास ।
देव धावोनिया आले । शीतल उदक घे घे बोले ।
आपुल्या हाते विसणी । घाली जनीच्या डोयी पाणी ।
माझ्या डोईच्या केसात । न्हाणे नव्हते फार दिस ।
जेणे मुरडी केसास । म्हणे उगीच बैस ।
आपुल्या हाते वेणी घाली । जनी म्हणे माय आली ।।

वरील पहिल्या अभंगात बाप बनून तर दुसऱ्या अभंगात माय बनून साक्षात विठूरायाने जनाबाईची निगराणी केली. मायबापच विठ्ठलाच्या रूपाने जनाबाईंच्या जीवनात अवतरलेले दिसतात. तुम्ही हो माता, पिता तुम्ही हो, तुम्ही हो बंधू, सखा तुम्ही हो । हाच प्रत्यय या अभंगातून येतो.

जनाबाई कुठलेही घरातले काम करताना अखंड नामच घेत असे. अगदी दळण, कांडण करीत असतानाही नामाखेरीज ती काहीही म्हणत नसे. त्याचा दाखला अनेक प्रसिद्ध अभंगातून मिळतो.

दळीता कांडीता तुज गाईन अनंता ।
न विसंबे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ।
नित्य हाती कारभार । मुखी हरी निरंतर ।
माय बाप बंधू बहिणी । तु बा सखा चक्रपाणी ।
लक्ष लागले चरणासी । म्हणे नामयाची दासी ।।

हा किंवा

जनी नामयाची रंगली किर्तनी । तेथे चक्रपाणी धाव घेई ।।

किंवा

जनी जाय पाणीयासी । तेथे धावे ऋषीकेशी ।।

या किशोरी अमोणकरांनी गायलेल्या प्रसिद्ध अभंगातून...

किंवा

झाडलोट करी जनी । केरभरी चक्रपाणी,
जनी जाय शेणीयासी । उभा राहे तिच्या पाठी ।

या व अशा अनेक अभंगातून विठ्ठलाला इतके आपलेसे केले होते विठ्ठल आणि तिच्यातील द्वैतभाव नाहीसा होऊन अद्वैत निर्माण झाले होते. आपण केलेले प्रत्येक विठ्ठलानेच केले असा तिचा दृढ भाव होता.

या संदर्भातील एक मजेशीर गोष्ट सांगितली जाते. एकदा एक वारकरी विठूरायाच्या दर्शनाला मंदिरात गेला तर रुक्मिणीच्या शेजारी विठोबा दिसेनात. वारकरी म्हणाले माई, विठोबा कुठे आहेत? नजरे समोर बघणारी रुक्मिणी म्हणाली, म्हणजे माझ्या शेजारी उभे नाहीत. मग गेले असतील कुणाचे दळण कांडण करायला, कुणाची धुणी धुवायला, स्त्री सुलभ मत्सराचा इतका सुंदर आविष्कार यातून व्यक्त होतो.

पांडुरंगाच्या साक्षात्कारानंतर विठ्ठल जनाबाईचा सखा झाला आणि

तो तिला दैनंदिन जीवनातही मदत करू लागला. या संबंधीचे अनेक संदर्भ विविध अभंगातून आल्याचा उल्लेख वर आलाच आहे.

एकदा विठोबा जनाबाईच्या खोपटात मदतीला आले आणि दमून झोपी गेले. काम करताना किंवा झोपताना टोचले म्हणून गळ्यातले माळा पदक काढून बाजूला ठेवले ते गडबडीत पहाटे मंदिरात जाताना तिथेच विसरले. आणि स्वत:च्या शेल्याऐवजी चुकून जनीची वाकळ पांघरून मंदिरात गेले. सकाळी भक्त मंदिरात दर्शनाला आले तो विठ्ठलाचा शेला, माळापदक गायब झालेले आणि जनीची जुनी वाकळ पांडुरंगाच्या अंगावर दिसल्यावर आळ जनीवरच आला. या संदर्भातला,

पदक विठ्ठलाचे गेले । ब्राह्मण म्हणती जनीने नेले ।
अगे, शिंप्याची जनी । नेले पदक दे आणुनी ।
देवा समोर तुझे घर । तुझे येणे निरंतर ।
म्या नेले नाही जाण । सख्या विठोबाची आण ।
वाकळ झाडूनी पाहती । पडीळे पदक घेऊन जनी ।
जनी वरी आली चोरी । ब्राह्मण करिती मारामारी ।
धावियले चाळीस गडी । जनी वरती पडली उडी ।
दंडी लाविल्या काढण्या । विठोबा धाव रे धावण्या ।
चंद्रभागे रोविला सूळ । जनाबाईस आले मूळ ।
हाती टाळी वाजविली । मुखी विठ्ठल बोलती ।
विलंब लागला ते वेळी । म्हणती जनीला घारे सुळी ।
ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ।
तव सुळाचे झाले पाणी । धन्य म्हणे दासी जनी ।

अगदी सोपा साधा पण आशयघन अभंग. याच आशयाचा लोकप्रिय छोटा अभंग आजही आकाशवाणीवर ऐकायला मिळतो –

माळा पदक विठ्ठल । विसरला भक्ता घरी ।
आळ आला जनीवरी । केली पदकाची चोरी ।

चोरीच्या गुन्ह्यासाठी सुळी देण्याची शिक्षा जनाबाईला दिली. भगवंताला खरे काय ते माहिती असल्याने त्या सुळाचे पाणी झाले किंवा फुलांचा ढीग झाला असा दाखला मिळतो. इथे आजच्या काळात मंथुनी नवनिता तैसे घे अनंता । वाया व्यर्थ कथा सांडी मार्ग । हे लक्षात ठेवायला हवे. केवळ जनाबाईंच्या बाबतीतच नव्हे तर चोखामेळा, संत एकनाथांचे पणजे संत भानुदास त्यांच्याही बाबतीत विठ्ठलाच्या माळेचा चोरीचा आळ येऊन तो विठ्ठलानेच आपल्या चमत्काराच्या रूपाने दूर केल्याचे इतिहास सांगतो.

देवानेच अव्हेरले तर जायचे कुठे? ही खंत काही अभंगातून सहजपणे व्यक्त होते.

आम्ही जावे कवण्या गावा । नो बोळसी पंढरीराया ।
गंगा गेली सिंधूपासी । तेणे अव्हेरिले तिसी ।
तरी सांगावे कवणाला । ऐसे बोले बा विठ्ठला ।
जळकोपे जळचरा । माता अव्हेरी लेकुरा ।
जनी म्हणे शरण आले । जरी बा धरिलेसे मौन्य ।

विठ्ठला, मला तुझ्याशिवाय कुणी नाही रे, पांडुरंगाने आपल्याला अव्हेरू नये म्हणून जनाबाई या अभंगात विविध प्रतीकांचा वापर करते आणि तोही स्त्री-सुलभ प्रतीकांचा. गंगा सागराकडे गेली व त्याने तिचा अव्हेर केला तर तिने काय करावे? तिने कोणाला सांगावे? जळ जर जलचरांवर रागावले तर त्या जलचरांनी कुठे जावे? आणि आईनेच जर लेकरांना अव्हेरले तर त्यांनी कुठे जावे? मी तुला मनापासून शरण आले आहे. तूच जर मला दूर लोटलेस तर तुझे पतित पावन हे ब्रीद जाईल बरं! येने केन प्रकारेन विठ्ठलाने आपल्याला आपलेसे करावे म्हणून ती नाना युक्तिवाद आर्तभावाने करते.

कधी कधी मी तुझी सेवा केली नाही म्हणून स्वत:चाच धिक्कार करते. आपल्याला भगवंत दळू कांडू लागला, हरघडी मदत करीत राहिला पण आपण मात्र त्याची सेवा केली नाही याबद्दलची रुखरुख ती मोकळेपणाने व्यक्त करते. आपले सगळे जीवन नामदेवांच्या घरी दासी म्हणून कष्ट करण्यात गेले. त्यामुळे विठूमाऊलीची सेवा करायला सवड मिळाली नाही याची खंत त्या खालील अभंगात व्यक्त करतात.

नाही केली तुझी सेवा । दु:ख वाटतसे जिवा ।
नष्ट पापीण मी हीन । नाही केले तुझे ध्यान ।
जे जे दु:ख जाले मला । ते त्वा सोसिले विठ्ठला ।
रात्रंदिवस मजपाशी । दळू कांडू लागलासी ।
क्षमा करावी देवराया । दासी जनी लागे पाया ।

खरं तर परमेश्वर भक्तांच्या सेवेची कधीच वाट बघत नाही. ती गरज भक्ताची असते. एकदा त्या भगवंताने आपलेसे केले की तो भक्तांचा अव्हेर कधीच करीत नाही. सकल जिवांचा करितो सांभाळा । तुते मोकलील ऐसे नाही असे असले तरी आपल्याला खात्री वाटत नाही ना? म्हणून जनाबाई स्वत:चा धिक्कार करते. स्वत:ला दूषणे देते, आपले जीवन दासीपणात गेले. यातीहिनत्वात गेले पण पांडुरंग आपल्याला सतत मदत करीत राहिला. आपण मात्र त्याची सेवा केली नाही त्याची खंत त्यांच्या अनेक अभंगातून व्यक्त होते. सहजता आणि प्रसादगुण हा जनाबाईंच्या अभंगांचा गुण आहे.

पांडुरंगाचे दर्शन झाल्यानंतर जनाबाईंची मानसिकता बदलून जाते. तिला जो आनंद होतो तो पुढील अभंगातून व्यक्त होतो.

देहाचा पालट विठोबाचे भेटी । जळ लवा गाठी पडोन ठेली ।
धन्य मायबाप नामदेव माझा । तेणे पंढरीराजा दाखविले ।
रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पाया । चित्त ठायीचे ठायी मावळले ।
नामयाचे जनी आनंद पै जाला । भेटावया आला पांडुरंग ।

विठोबा मला भेटला नाही. नामदेवाला मात्र भेटतो म्हणून खट्टू झालेली जनाबाई नामदेवामुळेच आपल्याला विठ्ठलाचे दर्शन झाले म्हणून नामदेवाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करते. पाणी आणि मीठ यांची गाठ पडल्यावर ज्याप्रमाणे द्वैत उरत नाही तशी जनाबाई विठ्ठलमय होऊन गेली. तिला तिचे स्वतंत्र अस्तित्व उरले नाही. हा मीठ आणि पाण्याचा दृष्टांत वाचताना जनाबाईंना अडाणी तरी कसे म्हणावे असा प्रश्न पडतो.

कारण हा दृष्टांत शास्त्रातला अद्वैताचा सिद्धांत आहे.

देव शोधावया गेलो । तो देवची होवोनी ठेलो ।

ही पराभक्तीची स्थिती आहे. याची जाणीव जाणकारांना जनाबाईंच्या अभंगाच्या वाचनाने झाल्याशिवाय राहणार नाही. असे अनेक अभंग आहेत. उदा.-

जोड झाली रे शिवासी । भ्रांत फिटली रे जिवाची । किंवा
माझ्या मनी जे जे होते । ते ते दिधले अनंते ।।
देह नेऊनी विदेही केले । शांती देऊनि मीपण नेले ।।

अशा अनेक अभंगांचे दाखले देता येतील.

जनाबाई सोपे साधे अभंग तर लिहितेच पण संत सहवासामुळे जो संतसंग घडला आणि जे श्रवण घडले त्यामुळे त्यांची बैठक इतकी तयार झाली की त्यांचे काही अभंग वरवर वाचून कळत नाहीत. तसेच एकदा पांडुरंगाने आपलेसे केल्यावर त्या जगाची पर्वाही करीत नाहीत. असाच एक सुंदर अभंग,

डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ।
पंढरीच्या पेठे मांडीयले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ।
जनी म्हणे देवा मी झाले वेसवा । निघाले केशवा घर तुझे ।

पूर्वी घरंदाज स्त्रियांना डोक्यावर पदर घेऊनच वावरावे लागे. त्यांचे पाऊल घराबाहेर पडत नसे. चूल आणि मूल एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. पांडुरंगाचे दर्शन झाल्यावर एक स्त्री म्हणून असणारी मर्यादा आपण ओलांडली आहे. जगाची पर्वा करायला त्या तयार नाहीत. डोईचा पदर मर्यादा ओलांडून खांद्यावर आला आहे. मी भरल्या बाजारी निघाले आहे. मला कोण अडवणार? माझ्या भक्तीचे पाल (दुकान) मी पंढरीच्या बाजारपेठेत टाकले आहे. तुम्हाला माझ्या नावाने काय बोंबा मारायच्या त्या मारा मला त्याची पर्वा नाही. मनगटावर तेल घाला तुम्ही चा अर्थ असा आहे. आणि

मी झाले येसवा । निघाले केशवा । घर तुझे । याचा अर्थ जीवभाव तोडून त्या शिवभावाकडे निघाल्या आहेत. एका धन्याचे घर सोडून दुसऱ्या धन्याकडे जाणे हे वेश्येचे लक्षण ते जीवभावाकडून शिवभावाकडे जाताना जनाबाईंनी स्वीकारले व केशवाच्या घरी निघाल्याने त्या जगाची पर्वा करायला तयार नाहीत. इतका सखोल भावगर्भ अभंग जनाबाईंनी सहजपणे लिहिला. असे अनेक अभंग आहेत की जे वर वर कठीण वाटावेत पण अध्यात्मशास्त्रदृष्ट्या मूलगामी जावेत असे दृष्टांत देऊन जनाबाई सहजपणे अभंगरचना करतात. जनाबाई म्हणजे संतांच्या गळ्यातली तुळशीची माळ आहे असे त्यामुळेच म्हटले जाते.

डॉ. सौ. शैला चंद्रकांत काळकर
११, माऊलीकृपा कॉम्प्लेक्स,
आझादनगर, कोथरूड, पुणे ४११०३८.
मो. : ९८२२८६६४७५



संत जनाबाई : विठूरायाची प्रेमकळा

डॉ. सौ. आरती अरुण दातार

एम्.ए.पीएचडी., आबासाहेब गरवारे कॉलेज मधून मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त.
श्रीलंका-कोलंबो विद्यापीठाचे ओपन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी फॉर कॉम्लीमेंटरी मेडीसिनमध्ये 'संत आपुले जीवन' प्रबंध. आदर्श शिक्षिका, समाजकार्यासाठी रणरागिणी पुरस्कार. संत व त्यांच्या वाङ्मयाच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी ६ ठिकाणी वर्ग.

शतकानुशतकं आपली वैभवशाली, आदर्श भारतीय संस्कृती जिवापाड जपून, न्यायासाठी, मुक्तीसाठी, मोक्षासाठी अविरत झगडणाऱ्या स्त्री शक्तीत माझ्या भाविक मनाला देव भेटल्याचा साक्षात्कार होतो. दिव्यत्त्वाच्या या प्रचीतीपुढे मी सहजभावे नतमस्तक होते. अगणित गुणांचा मनोज्ञ संगम करून विधात्यानं स्त्रीमूर्ती घडविली. स्त्री म्हणजे मानवी संस्कृतीच्या अग्रभागी लिहिलेला श्रीकार! स्त्री हा समाजजीवनाचा, सांस्कृतिक जीवनाचा अगदी जिव्हाळ्याचा विषय आहे. आपली संस्कृती जपण्यात, वाढविण्यात स्त्री अग्रेसर असते. कुटुंब, समाज, संस्कृती यांचा केंद्रबिंदू म्हणजे स्त्री. स्त्रीच्या समाजातील दर्जावरून संस्कृतीच्या अंतरंगाची साक्ष पटते.

वेदकाळापासून संतकाळापर्यंत स्त्री जीवनाचा आढावा घेतला तर त्यात लक्षणीय चढउतार दिसतात. वेदकालीन स्त्रीजीवन समृद्ध होतं. स्त्री स्वयंप्रकाशी होती. वेदकाळात स्त्री-पुरुष समानता होती. रामायण, महाभारतकालीन स्त्री-जीवन पूर्वकालीन स्त्रीजीवनापेक्षा निकृष्ट झाल्यासारखं दिसतं. सीता, द्रौपदी यांच्या जीवनाची झालेली फरफट स्त्रीजीवनाची अगतिकता समजायला पुरेशी बोलकी आहे. स्त्रीची स्वतंत्र, बाणेदार वृत्ती काळानुसार कमी कमी होत गेली. स्त्री स्वातंत्र्य या शब्दाचा हळूहळू विसर पडू लागला. त्यामुळे 'नको हा स्त्रीजन्म' ही व्यथा बोलकी होऊ लागली.

या पार्श्वभूमीवर १३ व्या शतकात भागवत-धर्माचा पाया रचणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी भक्तिमार्ग सर्वसामान्यांसाठी मोकळा केला. त्यामुळे संत जनाबाईंसारख्या स्त्रियांना आध्यात्मिक लोकशाहीचा अधिकार मिळाला. संतांच्या सहवासात, गुरुकृपेमुळे कर्तृत्वानं थोर झालेली संत जनाबाई सांगते -

'स्त्री जन्म म्हणवुनि न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी ।।'

स्त्री-जन्मातलं सौंदर्य शोधणारी संत जनाबाई स्त्री-जन्माचा गौरव करते. आठशे वर्षांपूर्वीच्या काळातली दासी जनाबाई, नामयाच्या परसदारी अहोरात्र काबाडकष्ट उपासणारी जनी, विठूरायाच्या महाद्वारी जाऊन पोचली, या गोष्टींचं कौतुक व आश्चर्य वाटतं. खरंच-

धन्य ती जनाई । धन्य ती विठाई ।।

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, नामदेव महाराजांच्या मांदियाळीतल्या संत जनाबाईनं आध्यात्मिक लोकशाहीचं वैभव पाहिलं, अनुभवलं.

विठुरायाच्या कृपाप्रसादानं दमा-करूंड या विठुभक्तांच्या पोटी कन्यारत्न जन्माला आलं. नाव ठेवलं जनाई. विठुरायानं दमा-करूंड यांना सांगितलं होतं की, जनाई पाच वर्षांची झाली की तिला भक्तराज नामदेवांचे वडील दामाजी यांच्या हाती सोपवा. नामदेवांच्या भक्तिमय सहवासात तिच्या आयुष्याचं सोनं होईल. ती कुळाचा उद्धार करील. जनाई पाच वर्षांची झाली आणि ती दामाजीच्या घरी आली. आई-वडिलांचं रक्ताचं नातं संपलं, जनी पोरकी झाली. दामाजीच्या परसदारी झोपडीत राहणाऱ्या पोरक्या जनाईनं विठूरायाशी प्रेमाचं, भक्तीचं नातं जोडलं. प्रेमानं आर्त सुरात विठुरायाशी नित्य संवाद साधणारी जनाई त्याला आळवू लागली...

माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।

पोरक्या जनाईनं विठुरायाला जीव लावला आणि ती विठूची होऊन गेली. विठू हा जनीचा प्राणसखा झाला. विठुरायानं जनीचा प्रामाणिक भाव जाणला आणि विठू जनीचा झाला.

विठूरायाच्या प्रेमाबरोबरच नामदेवांच्या श्रेष्ठ भक्तीचा कधीही पुसला न जाणारा संस्कार तिला मिळाला. नामदेव म्हणजे जनाईचे गुरू. आपल्या गुरूंमुळे ती भक्तिमार्गाला लागली, असं ती अभिमानाने सांगते.

नामयाचे ठेवणे जनीस लाभले । धन सापडले विटेवर ।।

प्रेमासाठी आसुसलेल्या जनाईनं तिच्या विठूवर उत्कट प्रेम केलं. जनाईचा निर्मळ भाव ओळखून विठूरायानं तिला आपलं म्हटलं. विठूराया तिचा पालनपोषण करणारा झाला. तिचं पोरकेपण ओळखून विठूराया तिची आई झाला. विठू जनीचा झाला आणि जनी विठूची झाली. अभंगात ती म्हणते -

ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।

या विठाबाईचं म्हणजे विठूरायाचं नित्य नाम घेणं आणि त्याची अखंड कीर्ती गाण्याचा छंद जनाईला जडला. आणि ती स्वतःचं पोरकंपण विसरून गेली. 'पांडुरंग नामजप । हेचि माझे महातप ।' हा सुखी जीवनाचा मंत्र जनाबाईला मिळाला. दुःखांवर, संकटांवर मात करणारी जनाई स्वानुभवानं आपल्याला सांगते -

गाता विठोबाची कीर्ती । महा पातके जळती ।।
सर्व सुखाचा आगर । उभा असे विटेवर ।।

आठवता पाय त्याचे । मग तुम्हा भय कैंचे ।।
काया वाचा मने भाव । जनी म्हणे गावा देव ।।

भक्तराज नामदेवांच्या घरी कष्ट उपसण्यासाठी जनाई जन्माला आली. जनाईला स्वत:चा संसार नव्हता. नामदेवांचा संसार हाच तिनं तिचा संसार मानला. कष्ट हा तिचा देव. अहोरात्र कष्ट करणारी जनाई विठूरायाच्या भक्तिरसात न्हाऊन निघाली. जनाईच्या उत्कट भक्तीला देव भुलला. तो जनीचा झाला... जनी त्याची झाली. देवाला भक्त भेटला, भक्ताला देव भेटला आणि विठू-जनीचं अद्वैताचं नातं जुळून आलं. जनीच्या निरपेक्ष, उत्कट, प्रामाणिक भक्तीमुळे जगाचा कर्ता, नियंता स्वत:चं अस्तित्व विसरून परतंत्र झाला. नामयाची खीर खाणारा, चोखोबाची गुरं राखणारा, सावत्याबरोबर खुरपू लागणारा, अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करणारा भगवंत भक्तावरील प्रेमापोटी जनीच्या झोपडीत जाऊन हलकी कामं करू लागला.

भक्तराज नामदेवांच्या कुटुंबाशी एकरूप झालेली 'नामयाचि जनी' म्हणजे कष्टाची स्वामिनी. कष्टांबद्दल तिनं कधी तक्रार केली नाही. कष्ट ही तिची साधना. तिच्या कष्टमय जीवनाला श्रद्धाळू मनाच्या जनाईनं अध्यात्माची जोड दिली. तिचं प्रत्येक काम तिनं देवरूप केलं, देवकार्य केलं. विठूवर अपार भक्ती- प्रेम जडलेल्या जनाईला कष्टात तिचा विठू भेटायचा. विठूमय होऊन गेलेली जनी आपल्या अनुभवातून सहजपणे गाऊ लागली...

दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ।।

विठुराया आपल्या मदतीला येतो असं ती आपल्या अभंगातून सांगू लागली. जनाईचे भावपूर्ण, अर्थपूर्ण अभंग म्हणजे स्वानुभवाचे बोल, आनंदाचे डोल.

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।
पाटी घेऊनि डोईवरी । नेऊनिया टाकी दूरी ।।
ऐसी भक्तीसी भुलला । नीच कामे करू लागला ।।
जनी म्हणे बा विठ्ठला । काय उतराई होऊ तुला ।।

माझी विठूमाऊली मला न्हाऊ घालते असं जनाई लोकांना सांगू लागली.

तुळशीचे बनी । जनी उकळीत वेणी ।
हाती घेऊनिया लोणी । डोई चोळी चक्रपाणी ।।
माझे जनीला नाही कोणी । म्हणुनि देव पाणी घाली ।।

'दासी' हे जनाईचं सामाजिक स्थान. शूद्र जातीत जन्माला आलेल्या जनाईला कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक कुठलीही प्रतिष्ठा नव्हती. असं असूनही विठुरायावरची दृढ श्रद्धा हा तिचा कणा होता. माझ्या प्रत्येक संकटप्रसंगी माझा विठुराया माझ्याबरोबर आहे. माझं प्रत्येक दु:ख माझ्याबरोबर माझा विठुरायाही सोसतो ही जनाईची श्रद्धा. त्यामुळे जीवनाच्या खडतर प्रवासात असलेल्या विठुरायाच्या सोबतीनं ती निर्भय झाली. ती सांगते -

संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा ।।

पंढरपूर ही सगळ्या संतांची मिरास. पंढरपूरचा पांडुरंग हा त्यांचा पिता तर रखुमाई ही त्यांची माता. पुंडलिक हा भाऊ तर चंद्रभागा ही बहीण. पंढरपूर हे त्यांचं सुखाचं माहेर. या माहेरी त्यांना विठुरूपानं सगळी नाती भेटतात. विठूला माऊलीपण बहाल करणारं जनाईचं स्त्री मन, स्त्री सुलभ वात्सल्यामुळे, मातृहृदयामुळे पुरुषसंतांपेक्षा निराळं आहे. जनाईला तिचा विठू लेकुरवाळा दिसतो. सगळ्या संतमंडळीचा भार ती लेकुरवाळ्या विठूकडे देते. आणि तिचा विठू तो भार माऊलीच्या भावाने सहजी प्रेमानं उचलतो. माऊलीचं आपल्या लेकरांवर सारखंच प्रेम असतं. या विठुरायाचं आपल्या सगळ्या लेकरांवर सारखं प्रेम आहे. माझा विठूराया समभाव असलेला समचरणी आहे - अशी तिची गाढ श्रद्धा आहे. ही तिची श्रद्धा एका अभंगातून बोलकी झाली आहे.

विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी।
बंका कडियेवेरी । नामा करांगुली धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

स्त्रीत्वाचे सगळे संस्कार, सगळे शाश्वत मूल्यांचे अलंकार तिला या विठूमाऊलीत दिसतात. प्रेम, सेवा, श्रद्धा, त्याग, सोशिकपणा, समर्पणभाव, तडजोड हे सगळे संस्कार जनाई आपल्या या विठूमाऊलीकडून तर शिकली.

विठूराया हे जनाईचं विश्रांतिस्थान आहे, आनंदाचं निधान आहे. विठ्ठल या तीन अक्षरात प्रचंड ऊर्जा आहे. या विठुरायाच्या दर्शनानं सुद्धा मन निवतं. या विठूला ज्यानं आपल्या कृपेनं विटेवर उभं केलं, तो पुंडलीक म्हणजे संतांचा जीव. त्याच्या नित्य ऋणात राहाणं हा संतांचा भाव. पुंडलिक नसता तर, ही कल्पनाही त्यांना सहन होत नाही. अशा या भक्तराज पुंडलिकाबद्दलची कृतज्ञतेची भावना जनीच्या अभंगातून व्यक्त झाली आहे. ती म्हणते -

भक्त पुंडलिका । तुझ्या भावार्थाचा शिक्का ।
भले घालुनिया कोडे । परब्रह्म दारापुढे ।।
घाव घातला निशाणी । ख्याती केली त्रिभुवनी ।।
जनी म्हणे पुंडलिका । धन्य तूचि तिन्ही लोका ।।

'सर्व सुख मज आहे पांडुरंगी' हा श्रद्धाभाव जनीच्या मनात असल्यामुळे ती विठ्ठलाच्या नामाचं महत्त्व सांगते. नाम म्हणजे 'न मम।'. मनाला उलटं केलं की नाम तयार होतं. भक्त व भगवंत यांना जोडणारी वृत्ती म्हणजे नाम. नाम घेता घेता स्वत:सकट सगळ्याचा विसर पडतो. नामाच्या वाटेनं गेलो की प्रत्यक्ष विठुरायाची भेट होते. स्वानुभवातून जनी म्हणते - **नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।**

विठूचा नामजप हाच जनीचा कारभार. तुझं नाम मी क्षणभरही विसरणार नाही ही तिची प्रतिज्ञा.

दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ।
न विसंबे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ।।
नित्य हाचि कारभार । मुखी हरि निरंतर ।
माय बाप बंधू भगिनी । तू बा सखा चक्रपाणी ।।

अखंड नामस्मरणामुळे विठूमय झालेली जनाई तिच्या

विठूरायाजवळ अखंड नाम घेण्याची बुद्धी दे – अशी प्रार्थना करते.

मना लागो हाचि छंद । रामकृष्णहरि गोविंद ।
जिव्हे करू नित्य नेम । सदा विठोबाचे नाम ।।

आपल्या मनाला एकदा गोविंदाचं वेड लागलं की,

हरि बोलता कांडता । हरि बोला भांडता ।
उठता बसता । हरि बोला ।
हरि बोला एकांती । हरि बोला लोकांती ।
देह त्यागाती हरि बोला ।।

अशी आपल्या मनाची अवस्था होऊन जाते. नाम हे तारक आहे अशी तिची दृढ श्रद्धा आहे. एवढे गुणकारी नाम–

'नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट ।।'

जनीला नामाची खरीखुरी पारख असल्यामुळे ती म्हणते –

'एक नाम अवघे सार । वरकड अवघड ते सार ।'

जनाईच्या मनात विठुरायाबद्दल जसा भक्तिभाव होता, तसाच भक्तिभाव नामदेवांबद्दलही होता. 'नामयाचि जनी' ही नाममुद्रा तिनं स्वत: आनंदानं घेतली होती. आणि आयुष्यभर ती नाममुद्रा तिनं अभिमानानं मिरविली. 'नामयाचि जनी' हे तिच्या जीवनाचं रहस्य आहे. नामयाच्या दासीपणात ती कृतार्थ आहे. नामदेवांच्या सहवासात ती धन्य झाली. नामदेवांमुळे आपल्याला विठुराया भेटला ही कृतज्ञतेची भावना जनाईच्या मनात अखेरच्या श्वासापर्यंत होती. तिच्या असंख्य आठवणी नामदेवांशी निगडित आहेत. नामदेवांना तिच्या मनात, जीवनात मानाचं स्थान आहे. विठूच्या भेटीसाठी व्याकुळ होणारे नामदेव तिचे गुरू आहेत, तिचे आदर्श आहेत. जनाई नामदेवांची सहप्रवासिनी आहे. नामदेवांच्या भक्तिमार्गानं ती पुढे गेली. भक्तीतली आर्तता, प्रामाणिकपणा, निर्मळता इ. भाव ती नामदेवांकडून शिकली. तिचा स्त्रीजन्म नामदेवांच्या भक्तिमय सहवासात सत्कारणी लागला. नामदेवांबद्दल बोलताना तिचा ऊर अभिमानानं, आनंदानं भरून येतो. मुक्तकंठानं ती म्हणते,

मागे किती संत झाले । नाम्या ऐसे कोण बोले ।।

या **'नामयाने मज थोर केले ।'** असं ती मनाला सांगते.

नामदेव, पांडुरंग व पंढरपूर ही जनाईची श्रद्धास्थानं आहेत. पंढरी हे तिचं तीर्थक्षेत्र आहे. पंढरीबद्दल कुणी वाईट बोललेलं तिला सहन होत नाही. जिथं माथा टेकीन ती माझी पंढरी हा तिचा अनुभव आहे. पंढरीचा वास अखेरच्या श्वासापर्यंत मिळावा ही तिची अंतरीची तळमळ. ती तिच्या विठूला प्रेमाची विनंती करते की, पंढरपूर सोडून मला काशीला पाठवू नकोस.

पंढरी सांडोन जाती वाराणसी । काय सुख त्यांसी आहे तेथे ।।

संतसज्जनांच्या मांदियाळीत मानाचं स्थान असलेली संत जनाबाई अति नम्र आहे. तिच्या भक्तीला कृतज्ञतेची झालर आहे. त्यामुळे ज्यांच्याकडून तिला काही शिकायला मिळालं, त्यांच्याबद्दलचं प्रेम, आदर, कृतज्ञताभाव तिच्या अभंगातून सहज सुंदरपणे व्यक्त झाला आहे. 'नामयाने थोर केली जनी' या श्रद्धेमुळे नामदेवांच्या ऋणात राहाणं हा तिचा स्वर्गीय आनंद! जनीच्या भावजीवनात संत ज्ञानेश्वर व संत चोखामेळा यांना मानाचं स्थान आहे. कृतज्ञतेपोटी जनीने नामा–ज्ञाना–चोखा या महान संतांच्या आठवणी चरित्ररूपाने अमर केल्या आहेत. ज्ञानोबारायांशी तिचं खास मैत्र आहे. चोखामेळा तिला आपल्या माहेरचा वाटतो. विठूराया तिचा प्राणसखा.

जनीचे अभंग म्हणजे विठूरायाची स्तुती. विठूराया निरक्षर जनीचा 'लेखकु' झाला. जनी व विठू यांचं अद्वैताचं नातं. विठूमय होऊन जगणाऱ्या जनीच्या भक्तीत विठू विरघळला होता. जनीच्या ध्यानी–मनी–स्वप्नी तिच्या श्वासात तिचा विठू भरून राहिला होता. पोरक्या जनीवर तिच्या लेकुरवाळ्या विठूमाऊलीने अपार माया केली. जनी विठूरूप होऊन जगली. विठू नित्य जनीबरोबर असतो हे संत नामदेवांनी जाणलं होतं.

एकलीच गाता । दुजा साद उमटता ।
कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ।
खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा ।।

जनी देवरूप होऊन गेली म्हणजे ती स्वत:ला देव समजू लागली. तिनं विठूला आपल्या अंतरंगी बंदिस्त करून ठेवलं. देव व भक्त यांचं झालेलं मीलन हेच जनीचं जगणं ।

देव खाते देव पिते । देवावर मी निजते ।
देव देते देव घेते । देवा सवे व्यवहारिते ।।
देव येथे देव तेथे । देवावीण नाही रिते ।
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरले आंतर बाही ।।

विठू–जनीचं हे अनोखं नातं सर्वसामान्यांना समजणं, समजलं तरी पचवणं अवघड होतं. विठूच्या सोबतीमुळे, प्रेमामुळे जनीचा आत्मविश्वास वाढला. जननिंदेकडे लक्ष न देण्याइतकी तिची जाणीव परिपक्व झाली, ती निर्भय झाली. देव पाठीराखा असल्यावर भीती कुणाची? आत्मनिर्भर झालेली नामयाचि जनी अभंगातून व्यक्त होते.

विठ्ठलाचे पदक चोरल्याचा आळ समाज तिच्यावर घेतो. सत्य कधी लपत नाही. सत्याची सरशी होणार ही तिची श्रद्धा. श्रद्धेमुळे ती भीत नाही. विठूराया संकटसमयी आपल्यासाठी धाव घेणारच हा भाव तिला शांत ठेवतो. ज्ञानामुळे ती सहजपणे विरक्त झाली. तिचं विरक्त मन संकटप्रसंगी समाजाकडे दुर्लक्ष करतं. सुळावर चढविण्याची शिक्षा जनीला होते. ती मनोमन विठूनामाचा गजर करते आणि सुळाचं पाणी होतं. अति प्रेमामुळे ती विठूरायाला प्रसंगी बोल लावते. अन्याय मूकपणे गिळणारी जनी प्रसंगी स्फोटक झाली आहे. भयमुक्त अवस्थेमुळे ती पंढरीच्या भक्तीच्या बाजारात, विठूरायाची 'वेसवा' म्हणून जायला निघाली आहे.

विठूरायानं आपलं मन चोरलं. मग मी त्याचं मन चोरून, त्याला हृदयात कैद करून ठेवलं तर कुठं बिघडलं? त्याला माझा स्वीकार करायलाच लागेल.

धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर ।
हृदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडिला ।।

शब्दे केली जवाजुडी । विठ्ठलापायी घातली बेडी ।
सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।।
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवन सोडी मी तुला....

जनी देवरूप झाली तरी तिचा हा अनुभव व आनंद नित्य टिकणारा नाही. देव नित्य भेटत नाही - ही विरहावस्था सहन न झाल्यामुळे मनाची व्याकुळता व परखडपणा वाढत गेला. विठुरायाच्या प्रेमापोटी आलेले रागाचे कढ तिच्या अभंगातून व्यक्त झाले. ती म्हणते -

अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या करंट्या ।
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।।
तुझे गेले मढे। तुला पाहून काळ रडे ।
उभी राहुनि अंगणी । शिव्या देते दासी जनी ।।

आत्मनिर्भर झालेली जनी सभ्यपणाचे सगळे संकेत झुगारून देते. या भावावस्थेत जनी अत्यंत प्रामाणिक आहे. स्त्री-सुलभ मनाचा पूर्वी कोंडमारा झाला असला, तरी आता त्यातून ती बाहेर पडली आहे. विठूशिवाय तिचं जगात कुणी नाही. विठूवर निरपेक्ष प्रेम करणारी जनी विठूला निक्षून सांगते. तिच्या मनाची निर्द्वंद्व अवस्था विलक्षण आहे. 'देव माझ्यातच आहे' या मानसिकतेमुळे तिचा 'स्व'चा शोध थांबतो. आणि देव भेटल्याचा साक्षात्कार तिला होतो.

ये रे ये रे माझ्या रामा, मनमोहन मेघ:श्यामा ।

तिचा लाडका विठू दुडू दुडू धावत तिच्याकडे येतो, जनीत सामावतो, आणि जनी धन्य होते. तृप्त मनानं ती सांगते,

माझे मनी जे जे होते, ते ते दिधले अनंते ।।

अहंकाराला मरण आल्यामुळे जिवा-शिवाचं मीलन होतं. जनीच्या सात्त्विक, सोज्वळ, प्रामाणिक भक्तीमुळे अध्यात्मिक जीवनातील सुवर्णक्षण जनी अनुभवते.

देह नेऊनि विदेही केले, शांति देऊनि 'मी'पण नेले ।

या सिद्धावस्थेचा तिला अनुभव येतो. या क्षणी मोक्षाऐवजी ती भक्ती करण्यासाठी पुन्हा जन्म दे- अशी मागणी करते. विठूरायावरची तिची अनासक्त भक्ती अलौकिक आहे.

विठुरायावरची जनीची भक्ती विठुरायाची रुक्मिणी जाणून होती. जनी रुक्मिणीची लाडकी होती. रुक्मिणीच्या निर्व्याज हृदयीचं सगुण रूप म्हणजे भक्त जनाबाई! एकदा रुक्मिणीनं विठुरायाला मोठा मजेशीर प्रश्न विचारल्याची साक्ष लोकगीतात आहे.

'इठ्ठलाचा पाय रुख्मिणी चेपे रागे रागे ।
खरं सांगा देवा... जनी कोण लागे ।।'

खरंच जनी आणि तिच्या विठूरायाचं नातं शब्दांपलीकडचं आहे. जनी नामयाचि दासी होती तर जनीच्या उत्कट भक्तीमुळे विठुराया तिचा 'दास' होऊन गेला होता. 'जनी माझी'- 'मी तिचा' या त्यांच्यातील नात्यापलीकडच्या नात्याचा गोडवा आहे.

संत जनाबाईंची उत्कट भक्ती, प्रामाणिक भाव विठुराया जाणून होता. तिच्या पोटातला जिव्हाळा, निरपेक्ष भाव विठुरायाच्या नित्य स्मरणात होता. 'नामयाचि दासी जनी' हा तिचा आवडता भाव तिच्या विठुरायाला आवडत होता. नामा-जनी हे पारमार्थिक वाटचालीतले एकमेकांचे स्नेही होते. दोघंही पाडुरंगाचे लाडके भक्त होते. युगायुगांचे हे दोघे सहप्रवासी होते. त्यांचा आंतरिक भाव विठुराया जाणून होता. दोघांचं मन मोडणं त्यांच्या विठुरायाला आवडणारं नव्हतं.

विठुरायावर जिवापाड प्रेम करणारी जनाबाई, आयुष्यभर नामदेवांच्या भक्तिमार्गाच्या पाऊलखुणांवरून मार्गक्रमण करत राहिली. नामदेवांच्या परसदारची ही दासी या प्रवासात विठुरायाच्या गळ्यातली तुळशीमाळ झाली. गुरूची सावली होऊन जगणारी जनाबाई अखेरच्या क्षणीही त्यांची सोबत करत होती. इ.स. १३५० मध्ये आषाढ महिन्यात, कृष्णपक्षात, त्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर जनाबाईंच्या नामदेवांनी देह ठेवला. जनाबाईंच्या मनातला गुरूभाव श्रेष्ठ असल्यामुळे संत जनाबाई त्याच क्षणी तिच्या नामयाच्या पायरीवर विसावली, शांत झाली. नामयाच्या ज्योतीत तिची ज्योत सामावली. नामा-त्याची दासी जनी एकाच क्षणी, पांडुरंगाच्या साक्षीनं, पांडुरंगात विलीन झाले.

नामयाची जनी विठुरायाची जनाई,
भाविकांची संत जनाबाई, विश्वाची माऊली...
भाविकांच्या मनी...
नित्य दरवळत राहो.... नित्य दरवळत राहो...

डॉ. आरती अरुण दातार
वुडलँड अपार्टमेंटस्, सी-५१/५२, कोथरूड, पुणे ३८.
मो. ९३७२४४१३६९



संत जनाबाईंचे श्रीकृष्णावरील अभंग

डॉ. श्री. कमल बाळकृष्ण वैद्य

मराठीत 'एकनाथी भागवता'वर पी.एच.डी.
ब्रह्मलीन प.पू. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज यांचा अनुग्रह. त्यांच्या 'मानसगूढार्थ चंद्रिका- प्रस्तावना खंड'चे (१९५१) मध्ये हिंदी भाषांतर व दासबोध-गद्य रूपांतर व इतर ८/१० ग्रंथ गीताप्रेस तर्फे प्रकाशित. अनेक मासिक, त्रैमासिकांतून लेख, प्रज्ञानंद व गोस्वामी, संपूर्ण वाल्मीकी रामायणाचा मराठी अनुवाद इंटरनेटवर उपलब्ध. तुलसीदास चरित्र व प्रबंध प्रकाशित.

गोदावरीच्या तीरावर गंगाखेड येथे दमा नावाच्या भक्ताच्या पोटी जनाबाईंचा जन्म झाला. त्याला दृष्टांत झाल्यावरून त्याने आपल्या पाच वर्षाच्या मुलीला पंढरपूरला आणून दामाशेटींच्या स्वाधीन केले. तेथे नामदेवांच्या संगतीने त्यांचा उद्धार झाला. असे म्हणतात की प्रत्यक्ष नारदांनी तिला मंत्रोपदेश दिला होता. जनाबाईंचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता हे त्यांच्या काव्यावरून स्पष्ट कळून येते. जनाबाईंच्या अभंगांचे लेखक खुद्द पांडुरंग होते असे म्हणतात. त्यांचे तीनशे अभंग उपलब्ध आहेत. भाषा अगदी सोपी आणि प्रासादिक आहे. त्यांनी इ.स. १३५० मध्ये समाधि घेतली.

त्यांच्या एका अभंगात (क्रमांक २९३) त्यांनी नामयाचे मूळ संचित आणि जन्म ऐका असे म्हणून पुढील हकिगत सांगितली आहे. त्या म्हणतात, (कृतयुगात) ते हिरण्यकश्यपूच्या कुळात प्रल्हाद झाले होते आणि मी त्यांची दासी पद्मिणी होते. त्यानंतर त्यांचा दुसरा जन्म (त्रेतायुगात) अंगद म्हणून झाला आणि मी त्यावेळी जिला भरताने लाथ मारली होती ती मंथरा झाले होते. नंतर द्वापारात ते कृष्णसखा उद्धव झाले आणि मी कुब्जा झाले तेव्हा भगवन् कृष्णानी माझा उद्धार केला. आता कलियुगात तेच नामदेव झाले आहेत आणि मी त्यांची दासी जनी झाले आहे.

श्रीमद् भगवद्गीतेत भगवंतानी म्हटले आहे की,

'बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ।।' (अध्याय ४ । श्लोक ५)

'हे परन्तप अर्जुना! माझे आणि तुझे अनेक जन्म होऊन चुकले आहेत. ते मी सर्व जाणतो पण तू जाणत नाहीस' हे खरेच आहे पण काही अपवादामक व्यक्तींना काही जन्म आठवतात असेही दिसून येते. श्री तुकाराम महाराजांच्या कृपापात्र श्री. बहिणीबाई यांनाही त्यांचे पूर्वजन्म आठवत होते असे त्यांच्या काव्यावरून दिसून येते. येथे जनाबाईनी ही अगदी स्पष्ट शब्दात श्रीनामदेवांच्या आणि स्वत:च्या पूर्वजन्मांचे वर्णन केले आहे. यावरून नामदेव व जनाबाई यांची भगवान् श्रीकृष्णाशी किती जवळीक होती हे कळून येते. तरीही भगवान् आणि त्यांचे भक्तही जसे सोंग घेतात त्यास साजेसेच आचरण ते करतात (सोंगा योग्य की नटे नाचणे'- गोस्वामी तुलसीदास) पण तरी त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व प्रगट झाल्याशिवाय राहात नाही.

जनाबाईंचे काव्य वाचले की गीता, भागवत, महाभारतादि ग्रंथ त्यांना चांगले अवगत होते हे कळून येते. शिवाय ज्ञानमार्गातला, भक्ती आणि कर्ममार्गातला त्यांचा अधिकारही कळून येतो. भगवान् श्रीकृष्ण म्हणजेच विठ्ठल अशी त्यांची दृढ श्रद्धा आणि अनुभूतीही होती. इतर समकालीन संतांच्या बद्दलचा त्यांचा जिव्हाळाही त्यांच्या काव्यातून व्यक्त होतो. आता येथे आपल्याला फक्त त्यांच्या श्रीकृष्णावरील अभंगासंबंधी विचार करावयाचा आहे तेव्हा आता फक्त त्यावरच लक्ष केंद्रित करावयास हवे.

जनाबाईंच्या सुमारे तीनशे अभंगापैकी अदमासे ३० अभंग कृष्ण विषयक असून थालीपाक प्रसंगातील १३ अभंग गुच्छांत (एकूण ९४ अभंग) ही श्रीकृष्णाच्याच लीलांचे वर्णन आले आहे. काही अभंगात भगवंताच्या गोकुळ, वृंदावनातील लीलांचे वर्णन आहे तरी काही मध्ये श्रीकृष्णांच्या पांडवावरील विशेषत: द्रौपदीवरील प्रेमाला प्राधान्य दिलेले आढळते.

यशोदेच्या बाळा यशोदेच्या हरी, यशोदेच्या परमानंदा असे संबोधून भगवंतानी आपल्यावर कृपा करावी अशी प्रार्थना केली आहे. अविद्येच्या रात्री अंधारात आडकलो आहो. तेथून हे गोविंदा, तूच आम्हांला काढावे. तुझ्या सान्निध्यात अविद्येला ठावच नाही. तू पूर्ण ब्रह्म आहेस, तुझ्या संगतीने तू लोकांना पावन करतोस, अजामेळाला तूच शुद्ध केलास असे दासी जनी म्हणते.

हे सोमवंशाच्या भूषणा, तू मला बुद्धि शिकव, हे मी तुला किती वेळा सांगू? मी तुला शिकवायला जाते हाच माझा अपराध आहे. ही जनी दासी इतकी धीट झाली आहे की स्वामीलाच शिकवायला जाते असे लोक म्हणतात. तू आनंदाने दीनांचा प्रतिपाळ करतोस. 'हे अरूपाच्या रूपा, हे सांब राजाचिया बापा, ब्रह्माच्या ताता, आपण सकल गुणांचे निधि आहात, आपण माझा योग सिद्धीस न्यावा, अशी विनंती जनी पंढरीनाथास करते. देवा, एकदा तुम्ही मला पदरी घेतले आहे, आता दूर टाकू नका. लोकांमध्ये मी निंद्य होते त्या मला आपण

लोकात वंद्य केले आहे म्हणून हे रुक्मिणीच्या कुंका, ब्रह्मांड पाळका ही दासी जनी आपल्याला विनंती करत आहे, आपण कृपा करून माझी ही विनंती ऐकावी.

अभंग २५८ ते २६४ पर्यंत कृष्णाचे बाललीलांचे वर्णन आले आहे. जनाबाई म्हणतात, 'गौळण गौळणीला म्हणते की अग, यशोदेला पुत्र झाला आहे. असे म्हणून त्या गौळणी एक धावे एकीपुढे । ताटी वाटी सुंठवडे ' असे सुंठवडे वाटू लागल्या. सुर्दूणीची गलबल झाली आणि दासी जनी हेल घालू लागली असे म्हटले आहे. मग ती – नंदाजीना म्हणू लागली, 'चला पुत्रमुख पहायला.' मग तान्ह्या बाळास न्हाऊ घातले गेले. नंतर नंदानी ब्राह्मणास वस्त्रे दान दिली. मग जनाबाई म्हणतात की, 'परब्रह्म ते पाहुनी । ब्रह्मीं मिळे दासी जनी ।', अशा त्या परब्रह्मास पाहून दासी जनी त्याच्याशी एकरूप होऊन गेली! किती सुंदर वर्णन आहे, नाही का?

नंदानी आलेल्या त्या ब्राह्मणांना अपार द्रव्य दान दिले. अपार गाई म्हशींची खिल्लारे दान दिली. तेथे जणू कामधेनुच प्रगट झाली होती आणि कल्पवृक्षांची जणू तेथे दाटी झाली होती. तेथील गोकुळातील आनंद सोहळा जनी डोळ्यांनी प्रत्यक्ष पहात होती.

नंतर पूतनावधाच्या प्रसंगाचे वर्णन आले आहे, 'पूतना माऊशी स्तन पाजयला आली होती. तिच्या उरावर माझा विठू लोळतो आहे, खेळतो आहे. आणि ती 'कृष्णनाथा, मेल्ये मेल्ये, सोड रे अनंता' अशी ओरडत आहे. अशा शब्दात जनाबाईनी शब्दचित्रच उभे केले आहे. त्याच वेळी त्या म्हणतात की, या विठ्ठलाने तिचा लिंगदेह विरविरले म्हणजे तिचा कारणदेह अर्थात अज्ञान नष्ट करून तिचा उद्धार केला.

यानंतर रांगणाऱ्या बाळकृष्णाचे सुंदर वर्णन केले आहे. 'वैकुंठाचा हरी यशोदेच्या घरातील अंगणात रांगत आहे. त्याच्या माथ्यावर जावळाची वेणी घातलेली आहे. पायांत पैंजण आणि वाळे आहेत आणि हातात नवनीताचे (लोण्याचे) गोळे आहेत. ती माता यशोदा धन्य आहे. दासी जनी तिच्या पायी वंदन करीत आहे. ब्रह्मदेवसुद्धा ज्याच्या चरणी वंदन करतात त्यांची माता होण्याचे भाग्य यशोदेला लाभले आहे. साम्राज्याचेही दान जो देऊ शकतो तो यशोदकडे लोणी मागतो आहे. क्षीरसागर ज्याच्या चरणी असतो त्याला यशोदा आपल्या पायावर न्हाऊ घालते आहे. सर्व ब्रह्मांडाचा पालक जो देव, त्याची टाळू यशोदा आपल्या हाताने तेलाने माखते आहे.

शुक सनकादि योगी ज्याचे ध्यान करतात तो जनीला दळू लागतो. जनी म्हणते, 'हे गोकुळीच्या देवा, आदि अंत तुम्हालाच ठाऊक आहे. तुम्ही सुजाण आहात, तुम्हाला आदिअंत कुणाला विचारावा लागत नाही. म्हणजेच तुम्ही अनादि अनंत आहात! परब्रह्म परमात्मा आहात आणि तरी गोकुळात आपल्या मित्रांचे उष्टेही तुम्ही प्रेमाने आनंदाने खाता असे जनाबाई म्हणतात.

हा यशोदेचा हरी गोपिकावर कृपा करतो, वेणु वाजवतो, गायीच्या मागे धावतो, गोपाळांबरोबर चेंडूफळी खेळतो, तो दयेचा सागर आहे. थोरामोठ्यांची गोष्टच वेगळी! कृष्ण गोपाळात मिसळून गेला आहे. तो त्यांच्या शिदोऱ्या सोडतो आणि सोवळे ओवळे न पहाता ग्रासोग्रासी त्यांचे उच्छिष्ट खातो. ते प्रत्यक्ष ओवळेच असून तो तिकडे लक्षच देत नाही. नंतर स्वानंदाच्या डोही तो हात धुतो. सर्वांच्या हातात काठ्या आणि पायांत जोडे आहेत. दासी जनी त्यांच्या जाण्यायेण्याची वाट झाडून ठेवते असे त्या म्हणतात, सात दिवस वृष्टि झाली तेव्हा भगवान् श्रीकृष्णानीच गोकुळाचे रक्षण केले. राधा आणि मुरारी कुंजवनात क्रीडा करीत आहेत. राधा डुल्लत डुल्लत निजभवनी आली आणि राधा आणि मुरारी सुमनशेजेवर पहुडली तेव्हा दासी जनी आवडीने तेथे उभी राहून त्यांना विडे देऊ लागली असे वर्णन त्यांनी केले आहे. या सर्व वर्णनावरून जनाबाई भक्तिप्रेमात कशा रंगून जात हे स्पष्ट दिसून येते.

जनी म्हणते भक्त जे जे कर्म करतात ते कृपामूर्ती स्वत:च होतात. पण यात काहीच आश्चर्य नाही, कारण देव भक्तिभावाला भुलतात! दातात वाग्दोर धरून आपल्या चार हातांनी ते (अर्जुनाच्या रथाचे) चारी घोडे धुतात आणि हे करताना त्यांना जराही लाज (संकोच) वाटत नाही. पांडवांच्या घरी मुरारी रात्रंदिवस असतात. दु:शासन द्रौपदीला सभेत घेऊन आला तेव्हा दुर्योधनाने आज्ञा दिली की 'सुंदरीला नग्न करा.' तेव्हा द्रौपदी धावा करू लागली की, 'हे माझ्या विठ्ठल माये! कृष्णा, आता काय उपाय करू? तू धावून ये!'' दुर्जन दु:शासनाने निरी ओढण्यास सुरुवात केली तेव्हा असंख्य वस्त्रे देवांनी पुरविली. असंख्य वस्त्रे फेडली जात असता कृष्ण द्रौपदीस पाठीराखा झाला. आपल्या भक्तांचे, संतांचे ते कसे रक्षण करतात हे पाहून प्रेमामुळे, भक्तिभावामुळे जनीला हसू आले. देव कृपासिंधु असून कौरवांच्या सभेत त्यांनी पांचाळीसी वस्त्रे पुरविली! द्रौपदी खरोखर भाग्यवान आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्ण तिचे बंधू बनले आणि तिच्या भावाचे अंकित झाले.

कौरवांनी मनात दुष्ट भाव धरून (सारीपाटाचा) डाव मांडला. त्यात फांसा टाकला (असे म्हणतात की जरासंधाच्या हाडांचे फासे केले होते.) पांडव डावात हरले आणि त्यामुळे त्यांना वनवासात जावे लागले. पराक्रमी असूनही त्यांना वनवास सोसावा लागला. तेथे दिनकराने त्यांना थाळी दिली. कृष्णाबाईने पांडवाचे रक्षण केले आणि जनी म्हणते तीच कृष्णाबाई माझी आई आहे. गीतेच्या आदि अंती असे म्हटले आहे की देव दुष्टांचा मारक आणि भक्तांना तारक होतो. तो आधी शत्रूंना मारतो आणि भक्तांचे अंतरीचा भाव पाहून संकटात त्यांचे रक्षण करतो. श्रीकृष्ण दुर्योधनास मारतात तर पांडवांचे रक्षण करतात. पांडव वनवासात गेले तरी 'तया पाठी देव आहे' तो त्यांचे उणे पडू देत नाही, त्यांच्या मनातील सर्व इच्छा तो पूर्ण करतो.

भगवान् विदुराच्या घरच्या कण्या प्रीतीच्या असल्याने प्रेमाने भक्षण करतात. दुर्वासांना त्यांनी स्कंधी वाहिले तर बळी दैत्य असून ते त्याचे द्वारपाल झाले. ते भक्तांच्या अधीन असतात म्हणून त्यांच्या वचनी वर्ततात. अंबरीषास कष्टी पाहून गर्भवास त्यांनी सोसले आणि सर्व दु:ख सहन केले.

परीक्षिती सर्व श्रोत्यांचा राजा आहे अशी त्याची कीर्तिध्वजा श्रीकृष्णाच्या कृपेनेच उभारली गेली आणि परीक्षितीसारखा श्रोता एक परीक्षितीच असे, त्याच्या कीर्तीचे पवाडे जगात गर्जले जात आहेत.

'थालिपाक' हे सुंदर आख्यानक काव्य आहे. यात एकूण १४

विभाग असून ९४ अभंग आहेत. अगदी पहिल्याच अभंगात जनाबाई म्हणतात की,'थालिपाक ऐकता । हरि बारी जन्मव्यथा ।।' अशी या प्रकरणाची फलश्रुति त्यांनी सुरुवातीलाच सांगून टाकली आहे. हे सर्वच प्रकरण फारच मधुर आणि प्रासादिक आहे. ज्या काव्याचे लेखन स्वत: पांडुरंगाने केले आहे त्याचे मूल्यमापन कोण करू शकणार आहे? त्याचा आस्वाद घेऊन तृप्त व्हावे हेच बरे!

दुर्योधनाच्या घरी दुर्वासऋषि आले तेव्हा त्यांना दुर्योधनाने बहुत तोषविले. तेव्हा 'वर माग तू इच्छिला' असे दुर्वासांनी म्हटले. तेव्हा दुर्योधनाने 'शिष्यासह रानी जावे आणि (पांडवांकडे) इच्छाभोजन मागावे' अशी विनंती केली. अंतरात त्याला असे वाटते आहे, ऋषींनी त्यांना शाप द्यावा. दुर्वास शिष्यांसह वनात गेले; तेव्हा 'हर' असा मोठा शब्द झाला. वनात गलबला झाला तेव्हा सर्वांना नवल वाटले.

मध्यरात्रीस ऋषि शिष्यांसहित वनात आले तेव्हा सर्व पांडव जागे झाले आणि त्यांनी ऋषींना वंदन केले. (ऋषीनी बहुतेक इच्छाभोजन मागितले असावे.) त्यामुळे धर्मराज भीमाकडे पाहू लागले. द्रौपदीने धावा केला. तेव्हा 'देव जेवता उठिला ।' 'ऋषि तृप्त केले वनीं । म्हणे नामयाची जनी ।। असे प्रथम सांगून हे सर्व कसे घडले याचे सविस्तर वर्णन केले आहे.

जनाबाई म्हणतात – 'द्रौपदीने हातपाय धुतले आणि ती तुलसी-वृंदावनाजवळ उभी राहून हात जोडून म्हणू लागली की, 'धाव रे गोपाळा' कृष्णा पहातोस काय? अरे सत्त्वहानि होत आहे. ऋषि स्नानाला जाताना स्पष्ट सांगून गेले आहेत की दिवस उगवताच ते सर्व नित्यकर्म सारून शीघ्र गतीने येतील, तोपर्यंत पात्रावर अन्न वाढून तयार ठेवा. जर अन्न दिसले नाही तर सर्वांना भस्म करून टाकीन.' अशा संकटात टाकून ते गेले आहेत, तेव्हा "हे जगजेठी! लाज राखा! तुमच्याशिवाय निर्वाणी कोणी रक्षण करणारा नाही!"

इकडे (द्वारकेत) रुक्मिणीने ताट विस्तारिले होते आणि देव भोजनास बसले होते. तेवढ्यात अकस्मात् कानात ध्वनी उमटला. तो धावा ऐकताच कृष्णानी ताट दूर लोटले आणि ते बहिणीचे क्लेश दूर करण्यासाठी खडबडून उठले. इकडे तुलसीवृंदावनाजवळ द्रौपदी उभी होती तर तिला सावळा कृष्ण दृष्टीस पडला. मस्तकावर मुकुट, कानात कुंडले, कमरेला मेखला, गळ्यात वैजयंती माळा, हातात शंख चक्रादि आयुधे, कमरेला (कासेला) पीतांबर झळकत होता. नयनात प्रकाश कोंदला होता. असा तो कृष्ण दिसल्यावर द्रौपदी आणि जनीही आनंदली.

अभंग ३२१ मध्ये जनी म्हणते की, 'रत्नाचे मंचकी चक्रपाणी पहुडले होते. रुक्मिणी चरणांबुज चोळीत बसली होती. तेवढ्यात द्रौपदीचे बोल कानी पडताच घननीळ तातडीने उठले आणि रुक्मिणीला म्हणाले, 'एक गोष्ट ऐक! माझे तान्हे संकटी पडले आहे!' म्हणून गरुड टाकून अनवाणीच निघाले आणि जणू मायाच धावली. श्रीकृष्णचरणास वंदन करून चरणी द्रौपदीने लोटांगणच घातले. आणि म्हणाली, 'नारायणा! तूच आता माझे मन शांत कर. स्नानाला गेलेले ऋषि आश्रमास येईपर्यंतच आयुष्याचा भरवसा आहे.' हे ऐकताच देव हासले आणि म्हणाले, "आता अवकाळी अन्न कसे दिसणार? प्राप्तीचा काही उपाय दिसत नाही! त्यांचे बळ कसे असेल ते असो! पण मला दारुण क्षुधा लागली आहे; त्यामुळे माझे मन स्वस्थ नाही. ताटी मेवा विस्तारलेला असता तुझा धावा ऐकून न जेवताच आलो आहे; त्यामुळे खूप क्षुधाक्रान्त झालो आहे; तेव्हा सत्वर भोजन वाढ." हे ऐकून द्रौपदीला हसू आले. ती म्हणाली, "अरे बाबा! माझे वचन ऐक. तू अरिष्टभंजन आहेस; तुझ्याशिवाय कुणाला हाक मारणार? फक्त एक तुझ्याच चरणी भाव आहे. याशिवाय दुसरा आधार नाही.' असे म्हणून थाळीमध्ये अन्न पाहू लागली की ज्यायोगे क्षुधेचे हरण होईल! तिने देवाला थाळी दाखविली की पहा यात काही आहे का? आता तरी तुला विश्वास वाटेल ना? देवांनी कष्टाने बहुत धांडोळले तेव्हा किंचित शाखापत्र तेथे दिसून आले! ते कैवल्याचा दानी कृष्णानेच निर्माण केले होते. ते पाहून देवानी हात पसरला तेव्हा द्रौपदीने तो भाजीचा देठ त्या हातावर ठेवला. आणि सुंदर द्रौपदी म्हणाली, 'विश्वंभर पावो!' कृष्णाने तो खाऊन तृप्तीचा ढेकर दिला आणि सर्व त्रैलोक्यच अपार धाले. आणि श्रीपतीनी सर्वांना कौतुक दाखवले. उष्ण घवघवीत अन्नाचे पर्वत तेथे दिसू लागले. त्याच्या वाफा आकाशापर्यंत भिडल्या! नाना परीची दिव्यान्ने नारायणांनी डोळ्यांना दाखवली. सर्वांच्या मनी आश्चर्य वाटले असे नामयाची जनी म्हणते.

इकडे गंगातीरी श्रीहरीने कौतुक दाखवले. तेथे रत्नखचित मंडपात आनंदभूत पंगती बसल्या! आणि धर्मासहित सहाही जण ऋषिना अन्न वाढू लागली. नाना प्रकारची दिव्यान्ने द्रौपदी स्वत: वाढत होती. त्यामुळे तोंडाला मिठी पडली असे नामयाची जनी म्हणाली. जेवणारेच म्हणू लागले की, आणखी मस्तकावर तोंड असते तर उदंड अन्न भक्षण केले असते. धर्माघरचे अन्न इतके गोड आहे पण आमची पोटे लहान आहेत ना! सागरासारखी उदरे करून या धर्माच्या घरी यावयास हवे. नित्य या द्रौपदीच्या हातचे अन्न जेवून तृप्ती प्राप्त करावी. वंदन मोठे करता येत नाही. नेत्र चंद्राकडे लागले आहेत. नेत्रावर झापड येत आहे. त्यामुळे धोत्रे संभाळणेही अवघड झाले आहे. तरी जेवणाची आवड संपेना. अशाप्रकारे ऋषिमंडळी संतुष्ट होऊन तृप्तीचे ढेकर देऊ लागली आणि तरी आवड संपेना. शेवटी उठून सर्वांनी हात धुवून विडे घेतले आणि त्यांना बसवेना म्हणून अवघे 'प्रवर्तले शयनी'. अशाप्रकारे सर्वजण निद्रिस्त झालेली पाहून (धर्मासहित) ती सहाही जण गुप्त झाली. अशी ही माया भगवंतानी जशी निर्मिली तशी ती गुप्तही केली. त्यांच्या करणीचा ठाव कुणालाच लागत नाही असे नामयाची जनी म्हणते.

इकडे आश्रमात धर्म भीमास म्हणतात की, जाऊन भूदेवांना वर बोलावून आणा. तेव्हा गंगातीरी येऊन भीमांनी सर्व ऋषिजनांना नमन केले आणि त्यांना म्हटले की, 'हे ऋषिजन हो, त्वरा करा, अन्न वाढून तयार आहे!' तेव्हा ते म्हणू लागले की, 'बापा, अरे हे काय पोट आहे की काय आहे? प्रसादांनी ऋषिवृंद तृप्त झाले आणि म्हणू लागले की, त्या नष्ट दुर्जन दुर्योधनाने आम्हाला कसे धाडले पहा. अंबरीषाला कष्टी केल्यावर चक्र पाठीस लागले होते. तीच गोष्ट आता झाली आहे. तेव्हा शीघ्र पळून जाऊ. माझा धर्माला नित्य आशीर्वाद आहे. तुम्हास नित्य

कल्याणच असावे.'' असे म्हणून ऋषि तेथून निघाले. अशा प्रकारे देवांनी पांडवांचे रक्षण केले. शंख, चक्र आयुधे करात आहेत, पीतांबराने जणू कृपाछत्र धरीत आहेत आणि मस्तकावर हात ठेवून 'सुखी असा, निर्भय चित्त असा' असा आशीर्वाद देऊन सर्वांचा निरोप घेऊन देव द्वारकेस गेले.

जनाबाई म्हणतात याप्रकारे 'थालीपाक' येथे संपले. पुढे गहन असे घोषयात्रा निरूपण येईल. 'येथुनी अध्याय कळस । जनी म्हणे झाला रस।।' असा हा रस सेवन करण्याचा योग ज्यांना घडतो त्यांचे मातापिता धन्य होत; सर्व वासना ब्रह्मार्पण कराव्या, ब्रह्मभावाने भूदेवांना पूजावे असे म्हणून नम्रतेने चरणी वंदन करून जनाबाईंनी समारोप केला आहे.

याप्रमाणे श्रीसद्गुरूकृपेने यथामति येथे जनाबाईंच्या श्रीकृष्णावरील अभंगांचे रसग्रहण करण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखाच्या निमित्ताने नामयाच्या जनीचा आणि तिच्यामुळे भगवान श्रीकृष्णांच्या प्रेमाचा, कृपेचा रसास्वाद घडला आहे. 'सेवितो हा रस, वाटतो आणिका'- वाचकांनाही हा रसास्वाद लाभून ते भगवत् कृपापात्र व्हावेत हीच प्रभुचरणी विनम्र प्रार्थना! हरि: ॐ तत् सत्

डॉ. श्री. कमल बाळकृष्ण वैद्य
'हॉली माऊंट', ३५ विजयनगर,
श्री. शिल्प चिंतामणी को.ऑ. हौ. सोसायटी,
पोस्ट- वानले सवांडी, सांगली ४१६४१४
दूरध्वनी : ०२३३-२६०१२१९, मो. ९२७२२०१७८९



जनाबाईकृत संतस्तवन

सौ. मनीषा भास्कर अभ्यंकर

एम्.ए. संस्कृत (गोल्ड मेडॅलिस्ट)
ज्ञानेश्वरीचा गाढा अभ्यास, बापरखुमादेविवरू अंकात अनेक लेख प्रकाशित

इ.स. १३ वे शतक हे महाराष्ट्रात संतयुग म्हणून अवतरले होते. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई, नामदेव, विसोबा खेचर, गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा, सेना न्हावी असे अनेक संत या युगात होऊन गेले व आपल्या अभंगरचनेने त्यांनी मराठी सारस्वताचे झाड बहरून टाकले. याच काळातील मुक्ताई व जनाई या दोन संत-स्त्रिया. मुक्ताई एखाद्या तेजस्विनी विद्युल्लतेसारखी होती. वीज आकाशात क्षणात चमकून नाहीशी व्हावी तशी मुक्ताई अवघ्या सोळाव्या वर्षी परब्रह्मी लीन झाली. जनाई शांत पणतीसारखी आयुष्यभर तेवत राहिली, मंद प्रकाश देत राहिली.

संत हा शब्द संस्कृत धातू अस् म्हणजे असणे यापासून तयार झालेल्या सत् म्हणजे होणारा, असणारा या अर्थी शब्दाचे बहुवचन आहे. अखंडपणे, अविकृत रूपात असणारे ते सत्. यावरून मराठीत संत हा शब्द आला. संतांची लक्षणे सांगताना आद्य शंकराचार्य म्हणतात-

शान्ता महान्तो निवसन्ति सन्ति
वसन्तवल्लोकहितं चरन्तः ।
तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जना -
नहेतुनान्यानपि तारयन्तः ।।३९।। विवेकचूडामणि

अर्थ : वसंतऋतुप्रमाणे विश्वाचे हित करणारे, स्वतः भयंकर भवसागरातून तरून गेलेले व अन्य लोकांनाही अकारणच तारणारे, शांतचित्त संत (या पृथ्वीतलावर) आहेत.

अर्थातच संत सर्व जनांचे हित करण्यात तत्पर असतात. ते मानवतावादी असून लोकांचे चारित्र्य घडवणे, त्यांच्यातील दोष मूलतः नाहीसे करून क्षमा, दया, प्रेम रुजवणे यासाठी प्रयत्नशील असतात. मानवी मनावर संस्कार करून त्यात मूलतः बदल घडवणे गरजेचे असते. संत तेच कार्य करत असतात. म्हणून सर्वच संतांनी आपल्या अभंगातून संतांचे स्तवन केले आहे. त्यात संत जनाबाई सुद्धा मागे नाहीत. संत जनाबाईंचे सुमारे ३५० अभंग उपलब्ध आहेत. या ३५० अभंगातून विठ्ठलभक्ती, नाममाहात्म्य त्यांनी सांगितले. तसेच नामदेवांच्या घरात मोलकरीण म्हणून राबत असता नामदेवांच्या कृपेने त्यांना स्वानंद साम्राज्याचे स्वामिनीपद कसे मिळाले त्याचे चेतोहारी वर्णनही या अभंगांतून केले आहे. हे साम्राज्यपद प्राप्त करत असताना त्यांना गुरूकृपेबरोबर संतकृपाही कारणीभूत झाली असे मनापासून वाटते. कारण -

संतांचा तो संग नव्हे भलतैसा ।
पालटावी दशा तात्कालिक ।।
चंदनाचे संगे पालटती झाडे ।
दुर्बळ लाकडे देवमाथा ।।
हे कां ऐसे व्हावे संगती स्वभावे ।
आणिके न पालटावे देहालागी ।।३०२।।

संतांच्या संगतीमुळे मनोवृत्तीत तात्काळ बदल होतो. यासाठी त्यांनी चंदनाचे उदाहरण दिले आहे. चंदनाच्या सहवासाने इतर झाडेही चंदनाने सुगंधित होतात व त्यांना देवमाथ्यावर विराजण्याचे भाग्य लाभते. तसेच -

देहाचा पालट विठोबाचे भेटी ।
जळ लवणा गाठी पडोन ठेली ।
धन्य मायबाप नामदेव माझा
तेणे पंढरीराजा दाखविले
रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायी ।
चित्त ठायीचे ठायी मावळले ।
नामयाचे जनी आनंद पै झाला ।
भेटावया आला पांडुरंग ।।२१७।।

नामदेवांच्या संगतीमुळे विठ्ठलचरणी श्रद्धा बसली व पाण्यात मीठ विरघळावे तसे जनी विठ्ठलभक्तीत विरघळून गेली. चित्तवृत्तीत बदल झाला व स्वतः पंढरीनाथ भेटायला आले. नामदेवांनी तिला पंढरीनाथाची भेट घडवली म्हणून ती त्यांच्याबद्दल कृतज्ञ आहे. हा सगळा प्रभाव संतसंगतीचा आहे. म्हणून जनाबाई म्हणतात की, 'संतांचे चरणी लोळे नाचे दासी जनी'. (३०७)

भृंगीचिया अंगी कोणते हो बळ । शरीरे अनाढळ केली भाळी ।।
काय तिने तपमुद्रा धरियेली । म्हणोनिया जाली भृंगी अंगे ।।

अरे बा शहाणिया तैसा करी अप । संतयोगे पाप नाही होय ।।
नामयाची जनी पिटी तो डांगोरा । संदेह न धरा करा पूजा ।।३७१।।

भृंगीचे चिंतन करता करता अळीची भृंगी होते. तसाच नामजप करता करता भक्त विठ्ठलरूप होतो. आणि ही कला संतसंगतीने साधते. म्हणून जनाबाई संतांची पूजा करायला सांगतात. कारण त्यांचा स्वत:चाही तोच अनुभव होता.

नोवरीया संगे वऱ्हाडीचा सोहळा ।
मांडे पुरणपोळ्या मिळे अन्न ।।
परीसाचेनि संगे लोहो होय सोने ।
तयाची भूषणे श्रीमंतासी ।।
जनी म्हणे जोड जाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ।।१७५।।

नवरा-नवरी संगतीमुळे वऱ्हाडी लोकांना मांडे, पुरणपोळीचे जेवण मिळते, किंवा परिसाच्या संगतीने लोखंडाचे सोने होते. त्याप्रमाणे नामदेव जणु तिच्या जीवनात परीस म्हणून अवतरले. त्या सोन्याचे दागिने जसे श्रीमंतांना मिळावेत त्याप्रमाणे जनाबाईंना नामदेवांमुळे विठोबाची प्राप्ती झाली.

संतांची लक्षणे सांगताना जनाबाई म्हणतात की संत हे निराकाराच्या नाण्याचे सौदागर आहेत. (१५३)

अंगी ल्याला शांती । दया क्षमा सर्वांभूती ।
तेथे जाऊन पाहे देवा । ब्रह्मादिक करीत सेवा ।
आवडी असे पै कीर्तनी । लवे संतांचे चरणी
जैसी दया पुत्रावरी । तेचि पाहे चराचरी
बहु अपराध केला । म्हणे जनी तो रक्षिला ।।३७७।।

संतांच्या अंगीची शांती हे त्यांचे व्यवच्छेदक लक्षण. सर्वांभूती दया, क्षमा, नामसंकीर्तनाची आवड, सर्व संतजनांशी नम्रपणे वागणे, स्वत:च्या पुत्राप्रमाणे सर्व चराचरावर प्रेम करणे ही संतांची लक्षणे जनाबाईंनी वरील अभंगात वर्णन केली आहेत.

संतांच्या रूपाने ईश्वरच देह धारण करून पृथ्वीतलावर येतो अशी जनाबाईंची धारणा आहे. त्या विचारतात की, पाणी व मेघ, धूळ व माती, साखर व गोडी, घट्ट तूप अथवा पातळ तूप, डोळा व बुबुळ, शांती व ज्ञानकला, वदन व ओठ, आशा व लोभ, समाधान व तृप्ती, शांती व विरक्ती, रोग व व्याधी, देह आणि अंग या काय दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत काय? तसे 'देव आणि संत, संत आणि देव म्हणे जनी भाव एक ऐसा।।' (३८३, ३८१)

म्हणून त्यांचे सांगणे आहे की, संतांना देवापेक्षा भिन्न मानू नका.

संत आणि देव मानी जो वेगळे
तेणे तेथे आगळे दोष केले ।।
दिवस उगवता पाहो नये त्याने ।
जेणे हो संताने द्वेषियले ।।
तयाचा विटाळ वाहे रजस्वला ।
म्हणे जनी चांडाळा बोलू नका ।।३८२।

संतांना देवापेक्षा जो भिन्न मानतो त्या मनुष्याला जनाबाई रजस्वलेच्या विटाळा इतके अपवित्र मानतात. 'संत हे कोण, तरी देवाचे हे डोळे' असे त्यांनी म्हटले आहे. जणू काही संतांच्या डोळ्यांनी देव आपल्याकडे पहात असतो. संत हे देवाच्या प्रत्येक अवयवाच्या ठिकाणी शोभतात.

संत पुससी तरी देवाचे वदन
माझे ते वचन संत झाले ।
परादिया चारी सांडूनिया वाणी ।
संत बोले वाणी विठोबाची ।।
क्षर जे नाक्षिले अक्षर काढिले ।
नि:शब्दाचे जाले बोले संत ।।
शब्द तो उडाला नाद तो बुडाला ।
भेद तो आटला मायाभावी ।।३०३।।

मायेचा निरास करून ऐक्याची शब्दातीत अवस्था प्राप्त करून देणाऱ्या संतांना जीवेभावे ओवाळावे असे जनाबाईंना वाटते. प्रत्यक्ष विठाईमाऊलीची प्राप्ती करून देण्याचे संतांचे सामर्थ्य असल्यामुळे जनाबाई संतांना विनवणी करतात की -

माझी भेटवा जननी । संता विनवी दासी जनी ।।३०६।।

अशा या सर्व संतांची मांदियाळी पंढरपुरात जमते. तिथे त्यांचा सहवास लाभतो. तेथे संत, हरिदास कीर्तनाच्या गजरात रंगतात. तेथे प्रत्यक्ष पंढरीनाथ उपस्थित असतात. अशा संतांच्या संगतीने भक्तिभाव वाढीस लागतो. त्या भावाच्या बळावर साधक परमेश्वराची प्राप्ती करून घेतो.

पंढरीसी जावे । संतजनी भेटावे ।।३६६।।
ऐशा संता शरण जावे । जनी म्हणे त्याला ध्यावे ।।३१३।।
ते बीज भाजोनि करा ओवाळणी ।
संतांचे चरणी समूळ देह ।।३९०।।

अशा या संतजनांना शरण जाऊन त्यांच्या चरणी देह समूळ ओवाळून टाकावा असे त्यांना वाटते. संत हे ईश्वरीतत्त्वाचे वाटाडे. संत हे ईश्वराचे रूप. त्यांच्या कृपादृष्टीचा वर्षाव झाला की स्वस्वरूपी मिठी पडते, त्यांच्या वाणीतून आत्मबोध जागतो.

येरे येरे माझ्या रामा मनमोहन मेघ:श्यामा ।
संतमिसे भेटी देई देई कृपावृष्टी ।।१८७।।

संतसहवासाच्या योगे त्या भक्तवत्सल परमेश्वराचे दर्शन घेण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

सध्याचे २१ वे शतक जसे कॉम्प्युटर युग आहे तसेच संतयुग आहे. या युगात संतांचे जणू पेवच फुटले आहे. संत म्हणून काही लोक अचानक प्रसिद्धीच्या झोतात येतात, सामान्य जनांना भुलवतात. लोकांनाही दुप्पट पैसा करून देणारा, संकटे दूर करणारा तारक कोणीतरी हवाच असतो. लोकांचा नाही पण अशा संत म्हणविणाऱ्यांचा मात्र पैसा दुप्पट (करोडोपट?) झाला की त्यांचे खरे रूप उघड होते व आपण पूर्णतया नागवलो गेलो हे लोकांच्या लक्षात येते. ही मानवी प्रवृत्ती आहे.

कारण प्रत्येकजण सुखाच्या मृगजळामागे लागलेला आहे. आज ग्लोबलायझेशनमुळे अशा गोष्टी ताबडतोब सर्व लोकांच्यापर्यंत पोचतात. पण ही प्रवृत्ती या पृथ्वीवर मनुष्यजन्माला आल्यापासूनचीच आहे, तेव्हा आत्ताच्या काळात अशी फसवेगिरी आहे पूर्वी नव्हती अशातला भाग नाही. त्यासाठी मनुष्याने सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवायला हवी. या वस्तुस्थितीकडेही जनाबाईंनी लक्ष वेधले आहे.

वैष्णव तो एक इतर ती सोंगे ।
ठसे देऊनी अंगे चितारती ।।
पंचरस पात्रा कांता हे बुडविती ।
उद्धरलो म्हणती आम्ही संत ।।३०९।।

टिळे, माळा धारण करून आपण वैष्णव असल्याचा देखावा निर्माण करणारी मंडळी ही सर्व काळातच दिसून येतात.

नम्रतेवीण योग्यता मिरविती ।
ते केवि पावती ब्रह्मसुख ।।
लटिके नेत्र लाऊनि ध्यान पै करिती ।
ते केवि पावती केशवाते ।।
एक संत म्हणविती नग्न पैं हिंडती ।
अंतरीची स्थिती खडबड ।।

असा देखावा निर्माण करून लोकांना भुलविता येईल देवाला नाही. तेव्हा संतसंग करताना प्रथम संतांची पारख करणे आवश्यक आहे. संतलक्षणे खरोखर त्या व्यक्तीत आहेत की नाही ते पाहिले पाहिजे. नाहीतर आंधळ्याने आंधळ्याला मार्ग दाखविल्याप्रमाणे होईल. असा इशाराही संतस्तवन करत असताना द्यायला जनाबाई विसरल्या नाहीत.

पण जनाबाईंना मात्र निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, चोखामेळा, निर्मळा, सोयरा अशा खऱ्या संतांचा सहवास मिळाला होता. 'शांतीची भूषणे मिरविती अंगी वैष्णव आणि योगी म्हणावे ते' (३००) ही सर्व संतमंडळी शांतीची भूषणे धारण करणारी होती.

असे तो अकुळी हो का भलते याती ।
माथा वंदी प्रीती जनी त्यासी ।। (३००)

अशी शांतीची भूषणे धारण करणारी व्यक्ती कोणत्या कुळातली आहे, त्याची जात कोणती आहे या गोष्टीला काहीही किंमत नाही. ज्ञानेश्वरादि भावंडे म्हटलं तर उच्च कुळातली होती व चोखामेळा अस्पृश्य जातीतील. पण संतलक्षणांच्या कसोटीवर सर्व सारखेच. तिथे कुळ, वर्ण, स्त्री, पुरुष याला काहीही महत्त्व नाही.

अलंकापुरवासी ज्ञानदेवांची भेट जनाबाईंना नामदेवांच्या कुटुंबात रहात असल्यामुळे झाली. ज्ञानदेवादी संतांशी त्यांची झालेली भेट हा जनाबाईंच्या जीवनातील माणिकांचन योग होता. ज्ञानेश्वरांच्या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाचा, नि:संगवृत्तीचा व उपदेशाचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यांच्यामुळे जनाबाईंना नाथपंथाच्या योगमार्गाची ओळख झाली. नामदेवांकडून नाममंत्र व सगुणभक्तीचा वारसा मिळाला होताच. ज्ञानेश्वरांच्या भेटीनंतर स्वत: नामदेव जसे सगुण भक्तीकडून निर्गुणभक्तीकडे वळले त्याचप्रमाणे निर्गुणाच्या मार्गावर जनाबाई सुद्धा चालू लागल्या. नामदेवांच्या घरी दळणकांडण करणाऱ्या व गोठ्यात बसून गोवऱ्या थापणाऱ्या या अशिक्षित स्त्रीला वेदांत तत्त्वरचनाची ओळख झाली आणि हे सर्व ज्ञानदेवांमुळे घडले. म्हणून त्या ज्ञानदेवांना कधी साजणी, कधी आई तर कधी बहीण म्हणून मायेने संबोधतात. ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका केली, ब्रह्मज्ञानाशी भावअक्षराची गाठ मारली म्हणून ज्ञानदेवांना त्या ज्ञानाचा सागर म्हणतात. बोटाला धरून परलोकाचा मार्ग दाखवणारे ज्ञानदेव जणू त्यांची आईच आहेत.

मायेहुनि माय मानी ।
करी जिवाची ओवाळणी ।।
परलोकीचे तारू ।
म्हणे माझा ज्ञानेश्वरू ।।४०६।।
ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायी ।
धांवोनिया येई दुडदुडा ।।३०५ ।।

अशाप्रकारे ज्ञानेश्वर महाराजांना त्या आपली आईच मानतात; परलोकीचे तारू मानतात. निवृत्तिनाथ सदाशिवाचा अवतार, तर ज्ञानदेव विष्णूचा, सोपान ब्रह्मदेवाचा अवतार तर मुक्ताई ही साक्षात आदिशक्ती अशी त्यांची भावना आहे. (४०९)

विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरू. त्यांचे स्मरणही वैकुंठप्राप्तीस कारणीभूत होते, त्यांच्या नावाचा जप केल्यास त्रिविध तापाचे हरण होते. त्यांच्या ध्यानामुळे पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही अशा शब्दात त्यांनी आपल्या परात्पर गुरूंचे वर्णन केलेले आहे.

सर्व संतांचे माहेरघर म्हणजे पंढरपूरचा पंढरीनाथ. प्रल्हादासाठी जसा नरसिंहाचा अवतार झाला, तसा भक्त पुंडलीकासाठी पंढरीत पांडुरंगाचा अवतार झाला अशी वारकरी संप्रदायाची श्रद्धा आहे. प्रथम मातापित्यांची अवहेलना करणारा, स्त्रीलंपट असा पुंडलीक कुक्कुटस्वामींच्या भेटीमुळे आमूलाग्र बदलला व मातापित्यांचा परमभक्त बनला व पंढरपुरात त्यांची सेवा करू लागला. त्याच्या मातृ-पितृभक्तीने देव प्रसन्न झाले. पण मातापित्याच्या सेवेत खंड पडू नये म्हणून आविर्भूत झालेल्या देवांसाठी त्याने वीट फेकली व प्रत्यक्ष परब्रह्म पुंडलिकासाठी विटेवर उभे राहिले. 'देवांनी याच रूपात उभे राहून अज्ञजनांचा उद्धार करावा' असे पुंडलिकाने देवांकडे वर मागितला असा हा पांडुरंग 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' राहून भक्तजनांना संसारसागरातून पार करण्याचे काम करतो आहे ते केवळ पुंडलीकामुळे. त्यामुळे सर्वच संतजन पुंडलीकाविषयी कृतज्ञ आहेत. म्हणून जनाबाई म्हणतात-

पुंडलिक भक्तबळी विठो आणिला भूतळी ।।
अनंत अवतार केवळ उभा विटेवरी सकळ ।।१६०।।
भक्त मला पुंडलिका तुझ्या भावार्थाचा शिक्का ।।
भले घालूनिया कोडे परब्रह्म दारापुढे ।।
घात घातला निशाणी ख्याती केली त्रिभुवनी ।।
जनी म्हणे पुंडलिका धन्य तूंचि तिही लोका ।।१६१।।

पुंडलीकाने भूतळावर उभा केलेला पांडुरंग हा पुंडलीकाच्या भावार्थाचा शिक्का आहे.

पंढरीचे सुख पुंडलिकासी आले ।
तेणे हे वाढले भक्तालागी ।।
भुक्ति मुक्ति वरदान दिधले ।
तेही नाही ठेविले आपणापासी ।।
उदार चक्रवर्ती बाप पुंडलिका ।
नामे विश्वलोक उद्धरिले ।।१६२।।

पुंडलिकामुळे भक्तांना पंढरीचे सुख मिळाले. भावाचा लंपट असलेला देव पुंडलीकामुळे वैकुंठ सोडून पंढरीस आला. पुंडलीकानेच भक्तांना धन जोडून दिले. म्हणून जनाबाई भक्त पुंडलीकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात-

भक्तामाजी अग्रगणी पुंडलिक महामुनी ।।
त्याचे प्रसादे तरले साधुसंत उद्धरले ।।
तोचि प्रसाद आम्हांसी विटेवरी हृषीकेशी ।।
पुंडलिक बाप माय दासी जनी वंदी पाय ।।३०४।।

असे हे संतजनांना मार्गदर्शन करतात. विवेकाने भक्तीचा पथ कसा आक्रमावयाचा ते शिकवतात. म्हणून जनाबाई देवापाशी मागणे मागतात-

साधु आणि संत जन्म द्यावा जी कलीत ।।
मागणे ते हेचि देवा कृपा करी हो केशवा ।।
संत दयाळ परम तया साक्षी आत्माराम ।।
जनी म्हणे ऐसे साधु तयापाशी तू गोविंदु ।।

संत हे परम दयाळु असून त्यांच्यापाशी परमेश्वर नांदत असतो. म्हणून परमेश्वराने संतसज्जनांना कलियुगामध्ये जन्म घ्यावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.

विठु माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा या अभंगात त्या विठ्ठलाला संतजनांच्या सहवासातच पहातात.

जनाबाईंचे भावविश्व विठ्ठल व संतजनांच्या सहवासात बहरून गेले आहे. दळण-कांडण, शेण-गोठा करणारी नामदेवांच्या घरातली सामान्य निरक्षर मोलकरीण संतजनांच्या सहवासामुळे व गुरूकृपेमुळे निरंजनाच्या माहेरी विसावली. पण केवळ या एकाच जन्मातल्या संत्संगामुळे हे घडलेले नाही. अनंत जन्मीची साधना याला कारणीभूत आहे. आपल्या पूर्व जन्माचे वर्णन करताना त्या सांगतात की, हिरण्यकश्यपाच्या कुळात नामदेव प्रल्हाद होते तर जनाबाई पद्मिनी नावाची दासी होत्या. रामावतारात नामदेव अंगद होते तर त्या मंथरा होत्या. द्वापारयुगात नामदेव उद्धव होते तर जनाबाई कुब्जा होत्या. आता कलियुगातही नामदेवाचीच सेवा करण्यासाठी आपला जन्म आहे. (४३१)

सौ. मनीषा भास्कर अभ्यंकर
'राम-जानकी' भोकरे कॉलनी,
चंदनवाडी, मिरज ४१६४१०
फोन : (०२३३) २२११४३७, मो. ९४२२०९४२४५

***



संत जनाबाई व स्त्री शिक्षण

विद्याधर मा. ताठे

एम्.ए. (मराठी), बॅचलर ऑफ जर्नालिझम् (प्रथम वर्ग), बी.कॉम., एकता मासिकाचे संपादक. १८ ग्रंथांचे संपादन, विविध पुरस्कारांनी सन्मानित, माजी कार्यकारी संपादक साईलाला, मुंबई.

दासी जनी ते 'संत जनाबाई' हा व्यक्तिविकासाचा आलेख, भक्तिपंथाने महिलांना दिलेल्या अवकाशाचे एक दर्शन आहे. जनाबाईंनी सद्‌गुरु नामदेवाकडून लिहिण्याची विद्या प्राप्त केली व आपल्या अनुभवविश्वातील वेगळ्या चिंतनाला शब्दरूप दिले. असंख्य महिलांना भक्तीमार्ग दाखवून अविनाशी आनंदाचा ठेवा प्राप्त करून दिला. स्त्रीवर्गाला आश्वासक दिलासा देत एक नवा आत्मविश्वास निर्माण केला - संत साहित्याचे उपासक विद्याधर ताठे यांनी जनाबाईंच्या दुर्लक्षित अभंगाद्वारे स्त्रीशिक्षणाच्या प्रारंभिक पाऊलवाटेचा घेतलेला शोध.

बाई मी लिहिणे शिकले सद्‌गुरुरायापाशी ।

- संत जनाबाई

''सुमारे सात शतकापूर्वी महाराष्ट्रात एक मोठी धार्मिक, सामाजिक क्रांती झाली. या क्रांतीचे अंतिम पर्यवसान छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात केलेल्या स्वराज्य स्थापनेच्या राजकीय क्रांतीत झाले'' असे अत्यंत साक्षेपाने प्रतिपादन करून न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मराठी संतांच्या कार्याचे विशेष महत्त्व अभ्यासकांच्या लक्षात आणून दिले. त्यानंतर संतांच्या कार्याकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला व संतांच्या पारमार्थिक- सामाजिक कार्याचे अपूर्व योगदान नव्याने अधोरेखित झाले. अन्यथा संतांना 'टाळकुटे' म्हणून संबोधून त्यांच्या कार्याची उपेक्षा करण्यातच तथाकथित विद्वान धन्यता मानत होते. समाजातील आर्थिक परिवर्तने - राजकीय परिवर्तने सहजपणे लक्षात येतात कारण ती बाह्य स्वरूपाची असतात. पण पारमार्थिक परिवर्तन हे अंतरिक स्वरूपाचे असल्याने चटकन लक्षात येत नाही. संतांच्या साहित्याचा व कार्याचा जसजसा अधिकाधिक सूक्ष्म अभ्यास होईल तशी त्या कार्याची व्याप्ती - खोली आणि ठसा स्पष्ट होईल. प्रस्तुत विशेषांकातील प्रस्तुत लेखापुरते बोलायचे तर संतश्रेष्ठ नामदेव महाराजांची थोर शिष्या, की जिला सर्वजण **'दासी जनी'** या नावाने ओळखतात, त्या संत जनाबाईंच्या अभंगांचा पाहिजे एवढा अभ्यास झालेला दिसत नाही. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्या विपुल व विविधांगी वाङ्‌मयातच अधिकतर अभ्यासक बुडालेले आढळतात. त्यामानाने संत मुक्ताई, संत जनाबाई, संत सोहिराबाई, संत बहिणाबाई या महिला संतांच्या अभंग साहित्याला जे उचित स्थान व मान मिळायला हवा तो आजही मिळालेला नाही याची खंत वाटते आणि ही खंत मनी बाळगूनच आपण **'संत जनाबाई आणि स्त्री-शिक्षण'** या विषयाचा आपण यथामती विचार करणार आहोत. या विषयावर विद्वान् अभ्यासकांनी अधिकारवाणीने काही लेखन करावे व संत जनाबाईंना त्यांचे अधिकारप्राप्त स्थान व मान मिळवून द्यावा. प्रस्तुत लेख एखाद्या चौकातील दिशादर्शक फलकासारखा निमित्तमात्र ठरावा.

महिलासंत : स्थिति, गति व व्याप्ती

मराठी संतमालिकेत महिला संतांचे योगदान लक्षणीय आहे. महानुभावपंथ प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामींची शिष्या, आद्य मराठी कवयित्री **महादंबा** उर्फ **महदाइसा**, संत ज्ञानदेव भगिनी **संत मुक्ताबाई**, संत चोखोबांची पत्नी **संत सोयराबाई**, बहिण **निर्मला**, **संत कान्होपात्रा**, संत तुकाराम शिष्या **संत बहिणाबाई**, संत रामदासांची शिष्या **संत वेणाबाई**, आणि संत नामदेव शिष्या **संत जनाबाई**. या महिलासंतांचे साहित्य मराठी वाङ्‌मयाला विविधतेने संपन्न करणारे, ओजस्वी साहित्य आहे. या महिलासंतांची अमृतवाणी त्यांचे भावविश्व शब्दांकित करण्याबरोबरच त्यांच्या अंतरंग अनुभवाचे व अधिकाराचे विलोभनीय दर्शन आहे.

संत महदंबेचे **'धवळे'** २ भागात भेटतात. तिच्या नावावर सुमारे १५० भक्तिगीते आहेत. संत भागूबाईचे केवळ ६ अभंग आहेत. संत निर्मलाचे २४, संत सोयराबाईंचे ६२ तर संत कान्होपात्रेच्या नावावर २३ अभंग आहेत. संत मुक्ताबाईच्या नाममुद्रेने सकलसंतगाथेत ४२ अभंग आढळतात व त्याशिवाय 'ताटीचे अभंग' नावाचे विशेष प्रकरणही मिळते. संत जनाबाईंच्या अभंगाची संख्या सुमारे ३००-३५० च्या

जवळपास आहे व हे अभंग संत नामदेवांच्याच गाथेत समाविष्ट आहेत. पण संत तुकाराम शिष्या बहिणाबाईंची स्वतंत्र **'अभंगगाथा'** आहे. महिलासंतांमध्ये संख्येने सर्वाधिक अभंगरचना करण्याचा मान संत बहिणाबाईंकडे जातो. परंतु या साहित्यात संख्येला महत्त्व नसून अंतरंग अनुभवाच्या अधिष्ठानाचे महत्त्व मोठे आहे. संत ज्ञानदेवांच्या ओवीचा आधार घेऊन, या अभंगाबद्दल असे म्हणता येईल की,

'दीप कलिका धाकुटी ।
परि बहु तेजाते प्रगटी ।'

तेराव्या शतकातील स्त्रीवर्गाची एकूण स्थिती पाहता वारकरी संतांनी महिलांना दिलेला अवकाश विशेष लक्षणीय आहे. या महिला संत एका वर्णाच्या नाहीत तर समाजातील वेगवेगळ्या थरातून आलेल्या आहेत. संत मुक्ताई व संत बहिणाबाई व वेणाबाई या उच्च वर्गीय आहेत तर संत जनाबाई नव्या भाषेत ओबीसी वर्गातून आलेली असून संत सोयरा - निर्मला या बी.सी. वर्गातील आहेत. या प्रत्येकाची स्थिती व सुख दु:खे वेगवेगळी आहेत. पण धार्मिक अधिकाराच्या दृष्टीने त्या सर्व एक सारख्याच वंचित - उपेक्षित होत्या. अशा वेदवंचित - उपेक्षित स्त्रियांना वारकरी संतांनी दिलेला पारमार्थिक अवकाश ही एक सामाजिक क्रांतीच आहे. श्री.म.माटे सारख्या **'उपेक्षितांचे अंतरंग'** जाणणाऱ्या समाजमनस्क अभ्यासकाने मुक्त कंठाने या संतप्रणीत सामाजिक क्रांतीचे कौतुक केलेले आहे. पण आजही अनेक जण संतांना त्यांच्या कार्याचे नेमके श्रेय देण्यास टाळाटाळा करीत आहेत.

संत जनाबाईंचा अधिकार

संत मंडळींमध्ये संत नामदेवांचे स्थान, संत ज्ञानदेवांच्या बरोबरीचे आहे. 'नाम' आणि 'ज्ञान' हेच खरे तर वारकरी संप्रदायाचे अधिष्ठान आहे. **'ज्ञानदेवे रचिला पाया'** असे ज्ञानदेवांचे तर **'नामा तयाचा किंकर'** असे नामदेवांच्या कार्याचे गुणवर्णन संत बहिणाबाईंनी एका अभंगात केलेले आहेत. अशा संत नामदेवांच्या जीवनात दासी जनीचे स्थान विशेष आहे. जनाबाईंचे अवघे लहानपण नामदेवांच्याच घरात परिवारातील एक सदस्य म्हणून गेलेले आहे. नामदेव व जनाबाई एकाच कुटुंबात वाढलेले आहेत. त्यामुळे जनाबाईंनी नामदेवांची प्रापंचिक व विशेषत: पारमार्थिक प्रगती अगदी जवळून पाहिलेली आहे. सर्वसाक्षी भावाने जनाबाईने जे पाहिले ते अभंगातून मांडलेले आहे. त्यामुळे संत नामदेवाचे चरित्र व कार्य समजण्यास जनाबाईंचे अभंग हे मुख्य व अधिक विश्वसनीय साधन आहे. इतर संतांप्रमाणे जनाबाईने पंढरीमाहात्म्य, विठ्ठलमाहात्म्य, नाम महात्म्यपर अनेक अभंग लिहिलेले आहेत. पण तिने संत नामदेव, ज्ञानदेवादी भांवडे, चोखामेळा, सेना या संत सांगात्यांविषयी लिहिलेले अभंग विशेष आहेत.

जनीचा सांभाळ लहानपणापासून नामदेवांच्या वडिलांनी केलेला आहे. त्यामुळे घरात पडेल ते दळण कांडण, धुणी भांडी अशी कामे जनाबाई करते आणि ती स्वत:ला दासी म्हणवून घेते. काही कादंबरीकार - अभ्यासकांनी तिला देवदासी म्हटले आहे. पण तो जनाबाईंवर मोठा अन्याय आहे. दास्य ही पारमार्थिक क्षेत्रातील एक भावस्थिती आहे. **'रामदास'**, **'दासगणू'** ही नावे जशी दास्याची नसून दास्यभावाने भारलेल्या थोर भक्तांनी स्वत:च स्वीकारलेली नावे आहेत. असे 'दास' म्हणवून घेण्यात ते स्वत:ला कृतार्थ - धन्य समजतात. **'दास जनी'** ही अशीच स्वनामधन्य **नाममुद्रा** आहे.

प्रपंचातील धुणीभांडी - दळणकांडण अशी सारी कष्टाची - अंगमेहनतीची कामे करीत **'दासी जनी'** ते **'संत जनाबाई'** हा तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रवास १३ व्या शतकातील महिलांची स्थिती पाहता थक्क करणारा आहे. आपली सर्व प्राप्त कर्मे ईशसेवा या भावाने तिने केली. **'दळीताकांडिता तुज गायिन अनंता'** असे सर्व कामे करताना तिचे विठ्ठल अनुसंधान मात्र अखंड राहिलेले दिसते. आपल्या या विकासाचे सारे श्रेय जनाबाईंनी गुरु नामदेव, सखा ज्ञानदेव यांना नि:संकोच दिलेले आहे.

'धन्य मायबाप नामदेव माझा । तेणे पंढरीराजा दाखविले ।।';
'होते जगामध्ये निंद्य । ते त्वा जगात केले वंद्य ।'

हे जनाबाईंचे अभंग संत नामदेवांनी केलेल्या कार्याविषयीचे कृतज्ञोद्गार आहे. संतांनी तळागाळातील माणसांना पारमार्थिक प्रगतीचा कसा व केव्हढा अवकाश प्राप्त करून दिला होता, याचे संत जनी हे मूर्तरूप आहे.

संत जनाबाईंचे सकल संत गाथेमध्ये जेव्हढे अभंग आहेत तेव्हढेच अभंग अभ्यासून अनेकजण जनाबाईंबद्दल लिहितात, त्यामुळे जनाबाईंच्या अन्य सर्व अभंगांवर अभ्यासकांकडून अन्याय होतो असे आढळते. संत नामदेवांच्या गाथेत 'परिवाराचे अभंग' असा स्वतंत्र विभाग आहे. त्यात जनाबाईंचे ३०० च्यावर अभंग आहेत. **'दळिता कांडिता'**, **'विठु माझा लेकुरवाळा'** **'डोईवरचा पदर आला खांद्यावरी'** अशा ठराविक अभंगातून होणारे जनाबाईचे दर्शन हे द्वितीयेच्या चंद्रकोरीप्रमाणे अपूर्ण आहे. जनाबाईंच्या पारमार्थिक अधिकाराची-प्रचीतीची पूर्णचंद्र पौर्णिमा अनुभवायाची असेल तर आपणास त्यांच्या ३००-३५० अभंगांचा समग्र अभ्यास केला पाहिजे. मग **'स्वानंदाचे लेणे ल्याली ।'**; **'जनीचे अभंग स्वानंदाचे डोल।'** हे अनुभवास येईल.

संत मुक्ताई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मला यांचे अभंग लेखन उपलब्ध असले तरी या स्त्रिया साक्षर होत्या का? त्यांना लिहिता, वाचता येते होते का? त्यांचे अभंग त्यांनी स्वत: लिहिलेत की अन्य कोणी लेखकाने लिहून ठेवले आहेत? असे अनेक प्रश्न अभ्यासकांना पडतात. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे फारसे कष्ट न घेताच काही निष्कर्षही व्यक्त करतात. महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित **'स्त्री शिक्षणाची वाटचाल'** या पुस्तकात इतिहास काळातील राणी येसूबाई आदिंच्या शिक्षणासाठी पंतोजींची नेमणूक करण्यात आली होती वगैरे माहिती दिली असून १३ व्या शतकातील संत मुक्ताई, जनाबाई, सोयराबाई यांच्या शिक्षणाबद्दल निश्चित काही सांगता येत नाही असा अभिप्राय व्यक्त केला आहे. खरं तर संत जनाबाईंचे सर्व अभंग नीट वाचले तरी त्यांच्या

शिक्षणाविषयी माहिती प्राप्त होते. मुख्य मुद्दा महिला संतांच्या शिक्षणाचा आहे, त्याचा विचार करू -

संत जनाबाईंच्या अभंगामध्ये **'बाई मी लिहिणे शिकले सद्गुरुरायापाशी।'** याच ओळीने - चरणाने प्रारंभ होणारा एक अभंग आहे. (अभंग क्रमांक ३२४/महाराष्ट्र शासन प्रकाशित नामदेव गाथा १९७०) ही ओळ वाचल्यावर जनाबाई शिकलेल्या होत्या हे निर्विवाद स्पष्ट होते आणि त्या लिहिण्यास शिकल्या होत्या म्हणजे त्यांना वाचता येत होते हेही स्पष्ट होते. आपण कोणाकडून लिहिण्यास शिकलो तेही जनाबाईने अगदी स्पष्टपणे सांगितलेले आहे. सद्गुरुरायापाशी त्यांचे हे शिक्षण झाले. हे सद्गुरू कोण? **संत शिरोमणी नामदेव महाराज!** जनाबाईंचे गुरु संत नामदेव होते हे सर्वश्रुत आहे तरी पण कोणतीही संधिग्दता न ठेवता जनाबाई त्याच अभंगातील अखेरच्या चरणामध्ये लिहितात-

नामदेवाचे प्रताप । शिरी विठोबाचा हात ।
जनी म्हणे केली मात । पुसा ज्ञानेश्वरासी ।।१।।

हे वरील २ चरण पुरेसे स्पष्ट आहेत. विठ्ठलाची कृपा आणि गुरु नामदेवांचे प्रताप यामुळेच मी लिहिणे शिकले असे जनाबाई स्पष्टपणे म्हणतात आणि एवढेच नव्हे तर माझ्या सारख्या अक्षरशत्रू दासीला लिहिण्यास शिकवून नामदेवांनी मात केली असेही त्या म्हणतात व संत ज्ञानदेवांची साक्ष काढतात. वरील अभंगाशिवाय जनाबाईंच्या अन्य अभंगातूनही त्यांच्या शिक्षणाची बिकट वाट शोधता येते.

- **मी तो अज्ञानाची राशी । म्हणोनी आले पायापाशी ।** (१८८)
- **अविद्येच्या रात्री । अडकले हो अंधारी ।।** (१९१)
- **मतिमंद तुझी दासी । ठाव द्यावा पायापाशी ।।** (१९९)
- **तुझे सन्निधेचे पायी । ठाव नाही अविद्येसी ।।**
- **किती विनवू तूते । बुद्धि शिकवणे हे माते ।।** (१९६)

अशा अनेक अभंग चरणातून जनाबाईंची शिक्षणाविषयीची ओढ आपणास दिसते. **अज्ञानाची जाणीव हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे असे म्हणतात. ज्ञानप्राप्तीचे प्रयत्न ही पुढची पायरी.** ही अवस्था सुद्धा जनाबाईंच्या एका अभंगातून व्यक्त होते. ती म्हणते -

'स्वामी लागी धीट ऐसी ।
म्हणती शिकवी दासी जनी ।।' (१९६)

त्या स्वत: धीटपणे शिकल्या व **'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास।'** म्हणत त्यांनी असंख्य स्त्रियांना भक्तिमार्ग दाखविला. आश्वासक दिलासा दिला.

संत जनाबाई लौकिक अर्थाने दासी समजल्या गेल्या तरी भक्तीच्या क्षेत्रातील अंतरंग अधिकारी आहेत. संत ज्ञानदेव - नामदेवांसह सर्वच संतांनी त्यांच्या अधिकाराचा गौरव केलेला आहे. ही काही अभंगचरण पहा -

कोण तुझी बरोबरी । साद देतो निरंतरी ।
खूण कळलि नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा ।।

यावरून जनाबाईंची पारमार्थिक योग्यता केव्हढी होती ते स्पष्ट होते. या अधिकाराचे - प्रचीतीचे - अनुभवाचे विलक्षण दर्शन त्यांच्या अभंगातून घडते. पुढील काही अभंगचरण त्यादृष्टीने चिंतन करण्यासारखे आहेत.

- **मी तो समर्थाची दासी । करीन नामाचा उत्सव ।।**
  'शब्दांचे ब्रह्म अलौकिक दिसे।'
  'शुद्ध सत्व कागद नित्य करी शाई।'
  'नामयाचा प्रसाद । जाला जनीस आनंद ।',
  'ठाणे केले विवेकाचे ।', 'शांती देऊन मीपण नेले ।'
- **'ज्योत पहा चमकली । काय सांगू त्याची बोली ।**
  परा पश्यंती मध्यमा । वैखरी जाली सीमा ।
  चारी वाचा कुंठीत जाहली । सोहं ज्योत प्रगटली ।'
- **'ज्ञान वैराग्य विवेकबळे । ते तव आम्हासवे खेळे ।'**
- **'सुकृताचे फळ । जनी म्हणे हे केवळ ।।'**

संत ज्ञानदेवांची **'ज्ञानेश्वरी', 'हरिपाठ'** हे जनाबाईंच्या नित्य वाचनाने-पाठाचे विषय होते. ज्ञानदेवांची स्तुती करताना जनाबाई म्हणतात **'ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर।'** या ओळीत त्यांनी ज्ञानदेवासारख्या श्रेष्ठ संताला **'सखा'** म्हटले आहे, ही त्यांची ज्ञानदेव-ा विषयीची सख्यभक्ती लक्षात घेण्यासारखी आहे. ज्ञानेश्वरांना **'सखा'** म्हणण्याएवढा जिवीच्या जिव्हाळ्याचा अधिकार जनाबाईंनी मिळवलेला होता. 'ज्ञानेश्वरी'ची श्रेष्ठता संत नामदेव, संत चोखामेळा यांच्यासह अनेक संतांनी अभंगातून गायलेली आहे. संत जनाबाईंनीही 'ज्ञानेश्वरी'चे श्रेष्ठत्व आपल्या शब्दात व्यक्त केलेले आहे. ते असे-

भाव अक्षराच्या गाठी । ब्रह्मज्ञाने गोमटी ।।
ते हे माय ज्ञानेश्वरी । संतजना माहेश्वरी ।।
ज्ञानेश्वर मंगल मुनी । सेवा करी दासी जनी ।।

या एकाच अभंगावरून जनाबाईंच्या थोरवीची कल्पना येते. जनाबाई केवळ अक्षरओळख एवढ्याच साक्षर नव्हत्या तर त्यांचे स्वत:चे अनुभवविश्व आहे, चिंतन आहे. **जनाबाईंचे अभंग त्यांच्या स्वानुभवचिंतनाचे नवनीत आहे.**

त्यांच्या अभंगामध्ये एक अभंग कोणी कोणाचे अभंग लेखन केले याचाही साद्यंत उल्लेख आहे. त्यामध्ये **जनीचे अभंग लिहि पांडुरंग ।** अशी ओळ आहे. कोणतेही कार्य कृष्णार्पण करण्याच्या पारंपारिक श्रद्धेची ही ओळ द्योतक आहे. शेवटी जनाबाईंच्या कृतार्थ वचनांनी या वाग्यज्ञाचा समारोप सार्थ ठरेल.

- **माझ्या वडिलांचे दैवत तो हा पंढरीनाथ ।**
  तेणे माझा आर्त पुरविला ।। (३६०)
- **धन्य माझा जन्म । हृदयी विठोबाचे नाम ।।**

विद्याधर मा. ताठे
ओंकार अपार्टमेंट, ७३५/१४, पोस्टाजवळ, धनकवडी, पुणे ४
भ्रमणध्वनी : ९८८१९०९७७५.
ईमेल : vidyadhartathe@gmail.com



जनी, जनाई, नामयाची दासी जनी, संत जनाबाई

सौ. कल्याणी अशोक शिवले (उज्वला काळे)
एम.ए., निवृत्त बँक अधिकारी

एकदा भर दुपारी संत नामदेवांचे वडील दामाजीपंत जुनेर नेसलेल्या बारीक चणीच्या मुलीला आपल्या घरी घेऊन आले. मराठवाड्यातील गंगाखेडच्या दमा करूंड या वर्णव्यवस्थेनुसार हीन कुळातील पण वृत्तीने उच्च व पांडुरंग भक्त असणाऱ्या दाम्पत्याची ही मुलगी. नवसासायासाने आणि विठ्ठल कृपेने झालेली. पांडुरंगाच्या आज्ञेनेच दमाने हिला दामाजीपंताच्या स्वाधीन केले होते. विठ्ठलाने आपल्या या भक्ताला स्वप्नात येऊन तसे सांगितले होते आणि 'ही तुझी कन्याच तुझ्या कुळाचा उद्धार करील' असा दिलासाही दिला होता.

या मुलीला पाहून दामाजीपंताच्या पत्नीने गोणाईने आस्थेने तिला विचारले, 'नाव काय बाळ तुझं?'

'जना'. खाली मान घालून उभ्या असलेल्या या मुलीनं किंचित मान वर करून उत्तर दिले. तिचा कोवळा सात्त्विक चेहरा पाहून घरातील सर्वांनाच आपलेपणा वाटला. 'चल घरात' नामदेवाची बहीण. आऊबाई तिला म्हणाली. तिच्या पाठोपाठ नामदेवाच्या घरात शिरलेल्या या ५ वर्षाच्या चिमुकल्या 'जना'ची जनी झाली. तिचे जीवन पुढे कसे गेले तिचे काय झाले हे केवळ तिच्याच स्वानुभवाच्या अभंगातून शोधावे लागते. या पोरक्या जनीने विठुरायालाच आपले मायबाप मानले. दामाजीपंताच्या या मोठ्या कुटुंबात आपले स्थान बरोबर हेरून 'पंधरावी ती दासी जनी झाली'. एवढ्या मोठ्या कुटुंबाच्या रामरगाड्यांत सकाळी लवकर उठावं, झाडलोट करावी, दळणकांडण करावे, विहिरीवरून पाणी आणावे, धुणे धुवावे, शेण गोळा करावे, गोवऱ्या वेचाव्यात हाच तिचा दिनक्रम झाला होता. मायबापांकडून वारसाने आलेला भक्तिभाव तिच्या जीवनात ओतप्रोत भरलेला होता. अशीही जनी नामदेवांना अंगाखांद्यावर खेळवत मोठी झाली. त्या घराचा घटक बनली.

'निरंजनाचे माहेर' या यशवंत पाठकाच्या पुस्तकात जनीच्या कष्टाचे तिच्या जीवनक्रमाचे वर्णन करताना ते लिहितात... तिला आजूबाजूच्या बायाबापड्या म्हणायच्या, 'अग एवढे काबाडकष्ट करतेस तुला दमायला कसे होत नाही? दुःख कसं होत नाही? आम्हाला विठ्ठलाची आवड असूनही कामापुढं काही जमत नाही. तुला कसं जमतं बाई सगळं? तुझा संसार झाला नाही त्याचं तुला काहीच वाटत नाही का? सासर-माहेरचं चिटपाखरूही तुझ्याकडे फिरकत नाही काहीच कसं वाटत नाही गं जने तुला.' जनी हसून उत्तरायची, 'अगं बायांनो एवढंच करायचं, वेळ कामासाठी द्यायचा. कामातच विठ्ठलाची आठवण ठेवायची. कामाची आठवण काढली की दुःख होते आणि हरीस्मरणात राहिलो, त्याची आठवण काढत काम केलं की, कामही होतं आणि त्याच्यासाठी वेगळा वेळही द्यावा लागत नाही. संसाराबद्दल म्हणाल तर तो मी विठ्ठलाशी मांडला आहे. ज्ञानोबा, चोखोबा, मुक्ताई, सोपाना, नामदेव सर्व येतातच की माझ्याकडे. मग आणखी कोण पाहिजे सासर-माहेरचं.'

वरकरणी साधीसुधी दिसणारी ही स्त्री अलौकिक जीवन जगत होती. गोंदवलेकर महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे जनीचे अंतःकरण म्हणजे उत्तम काळी भुसभुशीत जमीन होती. नामासाठीच नाम हे उत्तम बीज पेरले गेल्यामुळे देवाचे सानिध्य तिला अहोरात्र लाभले होते. विठ्ठलाच्या रूपात सामावण्याचे उत्तम पीक तिच्या जीवनात फोफावले होते. 'असे हो जया अंतरी भाव जैसा। वसे हो तया अंतरी देव तैसा' या श्री समर्थ रामदासाच्या वचनानुसार तिचे सारे जीवन विठ्ठलमय झाले होते. पंढरीचा राणा तिचा संगती होता, तिचे जीवन होता. कोणतेही काम हे विठ्ठलासाठी केलेलेच काम आहे आणि तो त्यात आपल्याला मदत करतो हा तिचा स्थायीभाव होता म्हणूनच शेजारणीने उचललेल्या तिच्या शेण्या या आपल्याच आहेत हे ती ठामपणे सांगू शकत होती. जनीने वेचलेल्या शेण्या कानाला लावल्यावर 'विठ्ठल-विठ्ठल' हा जप त्यातून ध्वनित होत होता.

नामदेवांचा संग आणि विठ्ठलाची भक्ती यात हरखून गेलेल्या जनाबाईंचे कवित्व फुलत होते. बहरत होते. प्रेमभावाने भक्तिभावाने न्हाऊन निघत होते. श्री. आवटे यांच्या सकलसंत गाथेत जनाबाईंचे नावावर ३४८ अभंग आहेत. या अभंगात नाम संकीर्तनाचे महात्म्य आहे. संतस्तुती आहे, देवाजवळ मागणे आहे, देवाची करुणा आहे, अगदी देवाबरोबरचे भांडणसुद्धा आहे, हृदयाला भिडणारे. जनाबाईंचे कृष्णावरील अभंग आहेत, ज्ञानेश्वर स्तुती आहे. स्त्रियांविषयीचे अभंगही आहेत. विशेष म्हणजे आत्मस्वरूप स्थितीतील योगपर

अभंगही आहेत. या सर्व अभंगातून 'नामयाची दासी जनी' अशी नाम मुद्रा तिने वापरली आहे. यातील विविध विषयांचा परामर्श या अंकात घेण्यात आला आहे. जनाबाईंचे अवघे कवित्व भगवत् प्रेमाने, दास्य भक्तीने ओथंबलेले असल्याने त्यांचे कितीतरी अभंग भक्तिगीते म्हणून आजही प्रसिद्ध आहेत.

सुंदर माझे जाते ग । फिरे बहुतेक ।
ओव्या गाऊ कौतुके । तू येरे बा विठ्ठला ।।
जीवशीव दोन्ही खुंटेगे । प्रपंचाचे नेटे गेऽऽ ।
लावुनि पाची बोटे गे । तू येरे बा विठ्ठल ।।

या सारख्या त्याच्या ओव्या आजही ग्रामीण स्त्रिया तन्मयतेने गातात.

जनाबाईंच्या नावावर एक भारूड ही आहे. हे भारूड संत एकनाथाच्या ''भवानी आई रोडगा वाहीन तुला सत्त्वर पाव गं मला.... एका जनार्दनी सगळेच जाऊ दे अेकटीच राहू दे मला...'' या भारुडाची आठवण करून देणारे आहे. भारूड हा काव्यप्रकार सूचक असतो. मनोरंजनाबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक प्रबोधन त्यातून जास्त परिणामकारक पद्धतीने केले जाते. जनाबाईंचे भारूड हे सामान्य संसारिक स्त्रीचे आहे. या स्त्रीला खूप सासुरवास आहे. आपण कितीही चांगले वागलो तरी 'अस्से सासर द्वाड बाई कोंडूनी मारते' या भोंडल्यातील गाण्याप्रमाणे असते. सासरची सर्वच मंडळी तिचे जिणे नकोसे करतात. सासू, सासरा, दीर, जाऊ, नणंदा या सर्व सासरच्या मंडळीबरोबर भांडणातच या सासुरवाशिणीचा सारा वेळ निघून जात असतो. ही सारी भांडणे निरर्थकच असायची मग उद्वेगाने ती म्हणायची-

खंडेराया तुज करते नवसू । मरू दे रे सासू खंडेराया ।।
सासू मेल्यावरी तुटेल आसरा । मरू दे रे सासरा खंडेराया ।।
सासरा मेलिया होईल आनंद । मरू दे नणंद खंडेराया ।।
नणंद मरता होईना मोकळी । गळा घालीन झोळी भंडाराची ।।
जनी म्हणे खंडे अवघे मरू दे । एकटी राहू दे पायापाशी ।।

सकृतदर्शनी भारूड वाचले की वाटते काय बाई आहे ही! निरर्थक भांडणाना कंटाळून ही सासुरवाशीण सर्व सासरच्या मंडळींच्या मरणाचे मागणे देवाकडे मागते आहे. काय स्वार्थीपणा भरला आहे हिच्यात आणि हे सर्व जनाईने लिहावे छे...छे... भलतेच. सासरच्या माणसाचा राग करावा पण इतका? जनीतर अविवाहित तिला कुठे होते सासर. मग तिचे हे लिखाण प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे का? नाही, देवाजवळच्या या मागण्यात खूप गूढार्थ भरलेला आहे. आपल्या देहबुद्धीवरील षड्रिपूंचा नाश होण्यासाठीचे देवाला घातलेले हे साकडे आहे. क्रोध हा सासरा, लोभही सासू. मोह माया म्हणजे नणंद तर द्वेष मत्सर म्हणजे दीर-जाऊ, सासू-सासरा, नणंद, जावा, दीर सगळे गेले की आधार संपेल पण हा नको असलेला आधार आहे त्यामुळे त्याची खंत वाटण्याचे कारण नाही. हे गुण नाहीसे झाले म्हणजे आसुरी गुणांचा नाश होईल. प्रवृत्ती मिटेल. मी मोकळी होईन. निर्मळ होईन. मग हे निर्मळ मन दैवी गुण अंगी बाणण्यास समर्थ होईल, अशी जनाबाईंची भावना आहे. आसुरी गुणांतून मुक्त झाल्यावर परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग सुकर होईल हेच या भारुडाचे मर्म आहे. सामान्यजनांना त्यांच्याच जीवनातील दाखले देऊन त्यांच्या मनी जीवनाचे खरे मर्म बिंबविणे हाच या भारुडाचा हेतू आहे.

जनाबाईंचा आणखी एक रूपकात्मक अभंग आहे. काय घ्यावे आणि काय सांडावे हे सांगणारा. त्यांच्याच जीवनाचा दाखला देऊन सांगणारा...

घागर घेऊनी पाण्या गेली । मागे मागे धाव घाली ।।
घागर घेऊनिया हाती । पाणी रांजणात ओती ।।
ऐशा येरझरा केल्या । रांजण घागरी भरल्या ।।
पाणी पुरे पांडुरंगा । दासी जनीच्या अंतरंगा ।।
पाणीयाचे वाटे । विठो घाली नेटे ।।
घागर घेऊनि हातात । पाणी ओती हंडियात ।।
ऐसा येरझरा करी । भरल्या रांजण घागरी ।।
पाणी पुरे, पांडुरंगा । दासी जनींच्या अंतरंगा ।।

देह म्हणजे रांजण आणि पाणी म्हणजे जीवन असा अर्थ जनाबाईंना अभिप्रेत आहे असे वाटते. परमेश्वर आपल्याला देत असतो पण त्याने दिलेले घेण्याची आपली योग्यता नसते. खरं तर काय घ्यावे हेच आपल्याला समजत नाही असे म्हटले तर जास्त योग्य होईल. 'बहुत जन्माचा शेवट। तो हा नरदेह अवचट।' असे श्री समर्थ म्हणतात. चौऱ्यांशीलक्ष योनीचा फेरा करून जेव्हा पाप-पुण्य समसमान होते तेव्हा नरदेह प्राप्त होतो असे म्हणतात. या नरदेहाचा फायदा काय? त्याला मिळालेल्या बुद्धीचा, जाणिवेचा, विवेकाचा उपयोग काय? पुनरपि जननं पुनरपि मरणं हे चुकवायचे असेल तर नरदेह हे सुयोग्य साधन आहे. पण अज्ञानाच्या पटलाने हे आपण जाणूनच घेत नाही. श्री महाराज (गोंदवलेकर महाराज) म्हणतात मी कस्तुरीचे दुकान उघडून बसलो आहे पण तुम्ही हिंग, जिरेच मागता त्याला काय करणार? देवाची आठवण होते तीसुद्धा आपल्याला काहीतरी विषयभोग हवे असतात म्हणूनच. आपण आपल्या देहरूपी रांजणात काय भरतो? नको असलेल्या गोष्टींचा विकार वासनांचाच भरणा तेथे इतका असतो की तेथे परमेश्वर देणार असणाऱ्या पाण्याचा थेंबालाही जागा नसते. मग आपल्या जन्ममरणाच्या येरझाऱ्या चुकतच नाहीत. संत आपल्याला सतत सांगत असतात, बाबारे जागा हो. रांजण कशाने भरायचा ते ठरव. तुझ्या जीवनाचा शिल्पकार तूच आहेस. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज सांगतात, अंत:करणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर ठेवू नका. शुद्ध अंत:करणो, 'सकाम' नाम न घेता नामाकरिताच नाम घ्या - हे जमले तर भगवत्कृपा आपोआप होईल. लोहचुंबकासारखी ती खेचली जाईल. भगवंताची कृपा सर्वांवर सारखीच वर्षाव करीत असते. ज्याने ज्या प्रमाणात चित्तशुद्धी केली असेल त्या प्रमाणात त्याला फायदा होईल. संत आणि भगवंत समदृष्टी असतात. कृपेला योग्य अशी भावना तयार करणे हे आपले काम आहे. संतांनी आपल्याला नुसते सांगून भागत नाही, आपण काय करायला पाहिजे हे कळून घेऊन आपण ते स्वत: करायला पाहिजे.

वरील अभंगात म्हटल्याप्रमाणे जनाईने आपल्या देहरूपी रांजणात

देवाने घातलेले पाणी पुरेपूर भरले. त्यातला एकही थेंब वाया घालविला नाही. तिच्या येरझाऱ्या संपल्या. तिच्यासाठी देवाला येरझाऱ्या घालाव्या लागल्या ती देवाला विनवू लागली, देवा आता पाणी पुरे. पांडुरंगाने ओतलेल्या आणि तिने भरभरून घेतलेल्या 'जीवनाने' (पाण्याने) तिचे सार्थक झाले. रांजण कृतार्थ झाला. जनाईच्या जीवनाला दिव्यत्व प्राप्त झाले. आत्मसाक्षात्काराने ती स्वरूपात गेली, अंर्तबाह्य निर्मळ झाली. कधीही राउळात प्रत्यक्ष प्रवेश न करता आलेल्या जनाबाईंनी देवळातल्या विठ्ठलाशी एकरूपता साधली होती. 'तो' पांडुरंग सावलीसारखा सतत तिच्या बरोबर होता.

'जनी'ला तिच्या कामात सदैव मदत करणारा हा विठुराया एकदा तिला मदत करता करता तिच्या झोपडीतच झोपी गेला. काकड्याची वेळ झाली घंटानाद झाला म्हणून खडबडून जागा होऊन त्वरेने राउळात गेला. जाता जाता कंठीचे पदक जनीच्याच झोपडीत पडले. जनीवर चोरीचा आळ आला. तिला सुळावर चढविण्याची आज्ञा झाली. शेवटची इच्छा म्हणून जनाईने विठोबाच्या दर्शनाची मागणी केली दर्शनाला गेल्यावर म्हणू लागली,

पदक विठोबाचे गेले । ब्राह्मण म्हणती जनीने नेले ।।
नवलाखाचे पदक । हिरे जडिले अमोलिक ।।
अगे शिंपीयाचे जनी । ब्राह्मण म्हणती पदक आणी ।।
नाही नेले म्या जनीने । सख्या विठ्ठलाची आण ।।
मारू नका मजयेचे। चोर पंढरीचा नाथ ।।
दंडी लाविती काढण्या । धावे विठ्ठल धावण्या ।।
करणी करूनि लपविसी । हेतू जाण हृषिकेशी ।।
लबाडात शिरोमणी । रागेबोले दासी जनी ।।

जनीच्या बोलण्याने विठ्ठलही गहिवरतो त्याच्या अंगाला घाम सुटतो. जनीला चढवायच्या लोखंडाच्या सुळाचे पाणीपाणी होते. याचा अर्थ तिच्या विरोधात गेलेल्या समाजाचा विरोध मावळतो. असा तर नाही ना? या घटनेने जनाबाईंचा सर्वत्र जयजयकार होतो पण स्तुतिनिंदेच्या, सुख-दुःखाच्या पल्याड पोहोचलेल्या जनाई मात्र शांत होत्या.

दामाजीपंताच्या घरी जुनेरे नेसून आलेली जना बोली भाषेत जनी झाली. श्री यशवंत पाठकांनी म्हटल्याप्रमाणे जना+आई = जनाई झाली. आईच्या मायेची गोधडी त्या आपल्या कवित्वाने आजही सर्वांना पांघरवत आहेत. आपल्या दास्य भक्तीने त्या नामयाची दासी जनी झाल्या. नामयाची दासी जनी म्हणवून घेण्यात त्यांना कृतार्थता वाटली. आपल्या कवित्वाने त्या अजरामर झाल्या. ''बाई मी लिहिणे शिकले गुरूरायापाशी'' असे म्हणून त्या गुरूचरणी लीन राहिल्या. अशा जनी-जनाई-नामयाची दासी जनी-संत जनाबाई झाल्या. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना त्यांनी कोणतीही कुरकुर केली नाही. स्वतः अनुभवत असलेला 'स्वानंद' सर्वांनी अनुभवावा म्हणून सर्वांना मार्गदर्शन केले. प.पू. दासगणू महाराजांनी संताची लक्षणे सांगताना म्हटले आहे.

त्यालाच म्हणावे जगी संत । की जो समान लेखी अवघ्या प्रत ।।
उच्चनीच ही भावना नित्य । शिरे न ज्यांच्या मानसी ।।
सच्चिदानंद पदासी । संत सेविती अहर्निशी ।।
तादात्म पावती ईश्वरासी । फडशा पाडून मायेचा ।।
शब्दे परेच निष्णात । या लोकी एक संत ।।
संत असून जीवन्मुक्त । लोकस्थितीने वर्तती ।।
संत वैराग्य न सोडीती । संत लोक व्यवहारे वर्तती ।।
कर्म भक्तीला चालविती । विमल ज्ञाना सेवून ।।

ही सर्व लक्षणे जनाबाईंच्यात होती म्हणूनच त्या संत जनाबाई होत्या असे हे त्यांचे पावन जीवन.

संत नामदेवांनी देह ठेवला. ते समाधिस्थ झाले. संत जनाबाई दृढ गुरूभावामुळे त्या पाठोपाठ नामदेवाच्या पायरीवर कायमच्या विसावल्या.

माझे मनी जे जे होते । ते ते दिधले अनंते ।
देह नेऊ निदेही केले । शांती देऊनि मीपण नेले ।।
मूळ दिले हे क्रोधाचे । ठाणे केले विवेकाचे ।।
निजपदी दिला ठाव । जनी म्हणे दाता देव ।।

सौ. कल्याणी अशोक शिवले (उज्वला काळे)
१३३ ड/२ पर्वती, सिंहगड रोड, साने गुरुजी
स्मारकाशेजारी, पुणे ४११०३०. मोबाईल - ९९२२२६९४६५



माझ्या अंत:करणातील संत जनाई

सौ. सुधा श्री. सुळे

बी.एससी. (केमिस्ट्री)
पुणे येथील 'आदिमाता' मासिकात लेखन, भजन व आध्यात्मिक वाचनाची आवड.

संत जनाबाई ह्या समर्पित जीवनाच्या एक अलौकिक मूर्ती आहेत. दामाशेटने रस्त्यावरून आणलेल्या पोरक्या मुलीचे, ते आणि गोणाई मायबाप झाले आणि भक्तशिरोमणी संत नामदेवांच्या विठ्ठलभक्तीच्या अंगणात जनाई लहानाची मोठी झाली.

बहुत सुकृताची जोडी। तेणे विठ्ठली आवडी ।। ह्या उक्तीप्रमाणे नामदेव-जनीची जोडी चार युगांपासून अवतार घेत-घेत भगवंताची सेवा करते आहे असे स्वत: जनाईने खालील अभंगात वर्णन केले आहे.

ऐका हो नामयाचा जन्म मूळसंचित ।।धृ ।।
हिरण्यकश्यपकुळी नामा प्रल्हाद ।
पद्मीणी नाम माझे श्रेष्ठ दासीचे पद ।।
दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त ।
मंथरा नाम माझे भरते मारीली लाथ ।।२ ।।
द्वापारी कृष्णसेवा उद्धव जन्मला ।
कुब्जा नाम माझे देवे उद्धार केला ।।३ ।।
कलीत नामदेव विठ्ठल चिंतनी ।
त्याचीच सेवेलागी जन्मली जनी ।।४ ।।

अशी ही जनी, तिला सेवेतच समाधान आहे आणि नामयाची दासी जनी म्हणवून घेण्यातच ती जीवनाची धन्यता मानते. संत नामदेवांच्या घरात काबाडकष्ट करण्यातच तिचं अवघं आयुष्य गेलं. तरीही सर्व दु:खांचं-कष्टांचं विस्मरण तिने विठ्ठलाच्या नामस्मरणात केलं. त्यातूनच भगवंतावरील उत्कट प्रेमाचे आणि पराकोटीच्या उत्कट भक्तीभावाचे रसाळ अभंग गात-गात तिनं विठ्ठलाच्या चरणांशी स्थान प्राप्त केले.

जनाईच्या अभंगात विठ्ठलप्रेमाच्या व भक्तीच्या अनेक छटा आढळतात. भगवंताविषयी भक्तवत्सलता आहे, भावमधुरता आहे, करुणापर मागणे आहे, भेटीची तळमळ व व्याकुळता आहे आणि काही ठिकाणी प्रेमापोटीचा सात्विक संतापही आहे. सतत नामात दंग असलेली जनाई आहे.

नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।
नाम तारक हे थोर । नामे तारीले अपार ।।
अजामेळ उद्धरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ।।
नाम दळणीं कांडणी । म्हणे नामयाची जनी ।।

आधी विठोबाचे नाम घेऊनच मग पुढे पाऊल टाकावे. प्रत्येक पावलागणिक विठ्ठलाला स्मरावे. म्हणजे काय तर आपल्या रोमरोमातून नाम पाझरायला हवे. माणुस एकदा का नामात रंगला की तो सर्व सुखदु:खांच्या पल्याड जातो. ह्याची साक्ष जनाईने स्वत:च्या जीवनदर्शनातून आपल्याला घडवली आहे. कारण 'नाम' हेच सर्व वेदनांवर रामबाण औषध आहे. हा नाममहिमा गाताना जनाईने अजामेळ व चोखोबांची उदाहरणे दिली आहेत. त्यांनी नामामुळेच हा भवसागर तरून जाऊन मोक्षाचा किनारा गाठला.

जे जे दु:ख जाले मला । ते त्वां सोसिले विठ्ठला ।।
रात्रंदिवस मजपाशीं । दळू कांडू लागलासी ।।
क्षमा करावी देवराया । दासी जनी लागे पायां ।।

ह्या आणि अशा कित्येक करुणापर अभंगानी आणि तिच्या निस्सीम भक्तीला भुलून पांडुरंग तिची कामे करू लागला. तिच्या संगतीत वावरू लागला. जनाईचा जेवढा जीव विठ्ठलासाठी व्याकुळ होत असे, त्याहीपेक्षा कित्येक पटीने हा पंढरीराया आपल्या परमभक्त जनीसाठी व्याकुळ होत असे. म्हणूनच तिच्या मदतीला तो राउळातून धावत येत असे. सगुण साकार भक्तीचा हा फार सुंदर मिलाप आहे.

विठो माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।
बंका कडियेवरी । नामा करांगुली धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

वरील अभंगात जनाईने विठ्ठलाच्या माऊली रूपाची भावविभोरता रंगविली आहे. निवृत्तीला खांद्यावर घेऊन सोपानाचा हात धरला आहे. पुढे ज्ञानेश्वर तर मागे सुंदर मुक्ताई आहे. गोरा कुंभाराला मांडीवर घेतले आहे तर चोखा जीवा बरोबर आहेत. बंकाला कडेवर घेऊन आणि नामाची करंगळी धरलेला हा लेकुरवाळा विठु त्यांची

माऊली झाला आहे.

गंगा गेली सिंधुपाशी । ते 'अव्हेरिले' तिसी ।।
तरी सांगावे कवणाला । ऐसे बोले बा विठ्ठला ।।
जळ कोपे जळचरा । माता अव्हेरी लेकुरा ।।
जनी म्हणे शरण आले । अव्हेरिता ब्रीद गेले ।।

प्रस्तुत अभंगात जनी पांडुरंगाला विचारतेय, अरे पांडुरंगा, पाणीच जर जलचरांवर कोपले किंवा आईने मुलाला दूर लोटले तर त्यांनी जायचे तरी कुठे रे। शरण आलेल्या जनीवर जर तू कृपा केली नाहीस आणि तिचा अव्हेर केलास तर तुझेच ब्रीद जाईल रे बाबा!

स्मरतांची पावसी । तरी भक्तांसी लाभसी ।।
ऐसे काही न घडे देवा । वायां कोण करी सेवा ।।
न पुरतां आस । मग कोण पुसे देवांस ।।
कोठे चक्रपाणि । तुज आधीन लाहीं जनी ।।

वरील अभंगात जनाईने सर्वसाधारण सकाम भक्तांच्या मनातले भाव व्यक्त केले आहेत. अरे विठ्ठला, भक्तांच्या अडी-अडचणीला जर तू धावला नाहीस, त्यांच्या साध्यासुध्या इच्छा जर तू पुरवल्या नाहीस, तर तुझी सेवा कोण करेल रे! वरील दोन्ही अभंगातून पांडुरंगावरील उत्कट प्रेमापोटीच आलेला सात्विक संताप दिसून येतो. तरीपण शेवटी आपल्याला विठ्ठलाने प्रेमाने जवळ करावे हाच भाव त्यात दडलेला आहे. जनाई ही पांडुरंगाची निस्सीम आणि निष्काम भक्त असल्याने तिला त्याच्याकडून काहीही नको आहे. नामामध्ये जनीची जिव्हा जरी भिजलेली असली तरी ती म्हणते तू माझ्यासाठी धावू नकोस रे बाबा।

अंत किती पाहासी देवा । थोर श्रम जाला जीवा ।।
सकल जीवांच्या जीवना । म्हणे जनी नारायणा ।। किंवा
देवा केव्हा क्षेम देसी । आपली म्हणोनि जनी दासी ।।

देवा तू माझा असावास, सतत माझ्याजवळ रहावास म्हणून मी खूप यातायात केली रे! तरी तू अंत का पाहतोस माझा. पांडुरंगा तुला अनंत भक्त आहेत. पण मला मात्र तुझ्याशिवाय कोणीही नाही रे! ना मला तुझा क्षेम कळत, ना तू भेटत आणि ना तू मला आपलसं करत! मी मात्र तुझ्या भेटीची चातकासारखी वाट पहात आहे. ह्या अभंगात जनाईने भगवंताकडे करुणापर मागणे मागितले आहे. भेटीची व्याकुळता आहे आणि त्याच्या प्राप्तीचा ठाम निश्चयही आहे.

धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर ।।
हृदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडिला ।।
शब्दे केली जवाजुडी । विठ्ठलपायी घातली बेडी ।।
सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।।
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवे न सोडी मी तुला ।।

ह्या अभंगात जनी म्हणते ह्या पंढरीच्या चोराला मी माझ्या निस्सीम भक्तीच्या दोराने गळ्याला बांधले आहे. नामाची बेडी ठोकून हृदयाच्या बंदिखान्यात कोंडले आहे, नाहीतर हा खट्याळ डोळा चुकवून कधी पसार होईल याचा नेम नाही. अरे विठ्ठला! मोठ्या मिनतवारीने मी तुला मिळवले आहे, असा कसा जाऊ देईन मी. आता कितीही काकुळतीला आलास ना तरी जोपर्यंत या जीवात जीव आहे तोपर्यंत मी तुला सोडणारच नाही.

आशा तृष्णा कैशा मावळल्या दोन्ही ।
चिंता विठ्ठलचरणीं जडोनी ठेली ।।
नामयाचे जनी विश्रांति पै जाली ।
हृदयी राहिली विठ्ठलमूर्ति ।।

माझा विठ्ठल माझ्या आयुष्यात ज्या क्षणापासून आला त्या क्षणी मी माझ्या चिंता त्याच्या चरणी वाहिल्या. कासवी जशी फक्त दुरून आपल्या प्रेमळ नजरेने पिलांचे पोषण करते तद्वत् कासवीच्या नजरेने मी माझे सारे भावविश्व विठ्ठलाच्या पायी स्थिर केले आणि काय आश्चर्य माझ्या इच्छा-आकांक्षा, तृष्णा सर्व काही मावळल्या. सर्व जगताचे जे विसाव्याचे स्थान आहे त्या पांडुरंगाने मला आपली म्हटलं. मी धन्य झाले. शांतीसुखाचा सागर असलेल्या ह्या विठ्ठलाची छबी जनाईने आपल्या हृदयाच्या कोंदणात जडवली आणि ही दासी जनी त्या पांडुरंगाच्या समचरणी कायमची विसावली!

।। विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ।।
।। जय जय राम कृष्ण हरी ।।

सौ. सुधा श्री. सुळे
ए-४, सन्मान सोसायटी, सहकार बझार जवळ,
खारेगाव, पाखाडी, कळवा, ठाणे ४००६०५.
फोन : ०२२-२५४१८६१०, मो.: ९९२०५३६३५३



संत जनाबाईचे व्यक्तिमत्व

सौ. उषा जयंत कळमकर

एम.ए.बी.एड. नोकरी (मुख्याध्यापिका), निवृत्त, डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे.
११ वर्षे समर्थ विद्यापीठ प्रमुख (डोंबिवली), श्रीदासबोध मंडळ २० वर्षे सुरू. कीर्तन महाविद्यालयात विनामूल्य सेवा ८ वर्षे

तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत म्हणजे संत ज्ञानेश्वरांपासून ते समर्थ रामदासांपर्यंत महाराष्ट्रात एक फार मोठी संतपरंपरा निर्माण झाली. त्या संतांच्या मांदियाळीत संत मुक्ताबाई, सोयराबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, निर्मला, वेणास्वामी अशा अनेक स्त्रियांचाही समावेश आहे. त्यांच्या अभंगवाणीने मराठी संतसाहित्य समृद्ध केले. त्यापैकी एक संपन्न व्यक्तिमत्व म्हणजे संत जनाबाई. संत जनाबाईंच्या साक्षात्कारी आयुष्याचा, विविध विषयांनी नटलेल्या अभंगसंपदेचा, भक्तिभावाच्या संस्काराचा, त्यातून नकळत घडलेल्या समाजप्रबोधनाचा, एक स्त्री म्हणून केलेल्या त्यागाचा, आत्मगौरवाच्या शिकवणीचा असा आढावा आपण घेत आहोत.

जन्मच मुळी भाग्याचा

''जनीचे अभंग लिहित नारायण । करीत श्रवण पांडुरंग ।।
धन्य तेचि जनी, धन्य तिची भक्ती । नामदेव स्तुती करीतसे ।।

भगवद्भक्त, वारकरी वडील दमा शिंपी आणि आई करुंड यांची ही सुकन्या. साक्षात् विठ्ठलाचा प्रसाद म्हणजेच त्यांचा जन्म. गोदावरीवरील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड हे त्यांचे जन्मस्थान. दक्षिणकाशी गोदावरीची पवित्रता अंगभूतच झाली होती. भाग्याच्या पारड्यात संत नामदेव हे पारमार्थिक गुरु लाभले. पण याचसोबत दुर्दैवही त्यांच्या पाचवीला पुजले होते. न कळत्या वयातच मातृ-पितृछत्र हरपले, पोरकेपण आले, हीनता तर जन्मानेच होती. त्यातही स्त्रीचा जन्म. या लढ्याचा एक विशेष म्हणजे संत नामदेवांच्या घरी संपूर्ण काळ राहिल्यामुळे जनाबाईंनी विठ्ठलाशी अतूट नाते जोडले. देवही कृपा करताना भक्ताच्या जातीची, कुळाची चौकशी करीत नाही, तो फक्त भक्ती पाहतो. त्यांच्यातील विरक्तीची खोली पाहतो, त्यांच्या अनन्यतेची तीव्रता पाहतो. त्यापुढील प्रारब्ध सटवाईने भक्तिरसाच्या बळावरच रेखाटले होते. त्यामुळे लौकिक जीवनात सामाजिक, आर्थिक, प्रतिष्ठा शून्य असलेल्या जनाबाईंना 'दासी जनी' 'नामयाची जनी' म्हणवून घेण्यात आनंदाचा अनुभव आला. असा शालीनतेने केलेला आत्मनिर्देश त्यांचा गौरव करतो.

स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

शूद्र, पतित, हीन या जाणिवेचे दु:ख परमार्थाशी पूर्णपणे विसंगत पण या दु:खाचा अस्त अनुभवसंपन्न काव्यातून स्त्रवू लागला. विठ्ठलप्रेम लाभल्यावरच्या आनंदाचा अनुभव व्यक्त करताना जनाबाई म्हणतात,

''स्त्री जन्मा म्हणवुनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी ।।
संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा ।।'

त्यावेळच्या समाजव्यवस्थेत स्त्रीचे मग ती उच्चवर्णीय असो तिचे स्थान गौणच मानले होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या आदेशानेच त्यांचे सारे ऐहिक जीवन संपूर्ण बांधलेले होते आणि पारमार्थिक क्षेत्रात तर त्या 'पापयोनी' म्हणून संबोधल्या जात होत्या. 'अनृतं साहसं माया' ही स्त्रियांची या क्षेत्रातील बिरुदावली ठरत होती. पण अनन्यभावाने सर्वत्र विठ्ठल पाहून सेवा करणे हाच त्यांच्या परमार्थाचा सोपान होता. जनाबाईंच्या पारमार्थिक आंदोलनाचे प्रमुख उद्दिष्ट विठ्ठलाने संसाराची सुधारणा करावी हे नव्हते तर प्रपंचावर जय मिळवावा, संसारातीत व्हावे, सांसारिक सुखदु:खाच्या पलीकडील शुद्ध निरपेक्ष निरुपाधिक अवस्थेचा अनुभव घ्यावा आणि कधीही कडू-गोड आघातांनी विचलित न होणाऱ्या शांतिस्वरूप आनंदमयतेत डुंबत रहावे हे साध्य व्हावे असे होते. या दृष्टीने जनाबाई भागवत-धर्माच्या मंदिर बांधणीत सक्रिय ठरल्या. विठ्ठलपिसे लागून भक्तिभावाने त्यांचे अंत:करण गंधित झाले. संत नामदेवांच्या घरातील आणि आसमंतातील परमेश्वर, चिंतनशीलतेने जनाबाईंची वृत्ती अंतर्मुख झाली. बहुश्रुतता हे वरदान तर होतेच. पण भक्तीच्या आर्त आणि उत्कटतेतून, भावोद्गारातून जनाबाई तत्त्वज्ञान बोलू लागल्या. याचे उदा.

''दळण्याच्या मिषे । विठ्ठल सावकाशे ।।
देहबुद्धीचे वैरण । द्वैत खंडारे निसून ।।
एकलीचा माता । दुजा साद उमटता ।।
कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ।।
खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा ।।''

संत नामदेवांना सर्वाधार मानलेल्या जनाबाईंची जडणघडण

अगदी उत्तम विणलेल्या कशिद्यासारखी झाली. भगवंताचाच एक ध्यास लागलेल्या जनाबाईंनी संत नामदेवांविषयीचा कृतज्ञभाव व्यक्त केला,

''जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ।।''

हेच त्यांचे अकृत्रिम आभार प्रदर्शन वाटते. संतपण आल्यामुळेच जनाबाईंमध्ये असा क्रांतिकारक बदल झाला. संत होणे हीच जनाबाईंच्या आयुष्यातली एकमेव क्रांतिकारक घटना आहे. या वाटेनेच त्यांच्या आध्यात्मिक विकासाचा प्रागतिक पथ आदर्श ठरला. त्यातील क्रांती या शब्दाचा अर्थ संतत्वात साकार होणे असा आहे. त्यामुळेच त्या सांसारिक सुखदु:खाच्या पलीकडील अवस्थेत पोहोचल्या.

आध्यात्मिक वाटचाल

दासीपणानेच जनाबाईंची आध्यात्मिक वाटचाल सुलभ झाली. 'स्व'ला विसरून इतरांशी तद्रूप होणे सहज शक्य झाले. स्त्रीत्वामुळे त्यांचे मन पुरुषांइतके आत्मकेंद्री न होता समर्पण प्रवण झाले. तसे पाहता सर्वच संत स्त्रियांना कौटुंबिक विरोधाला तोंड देऊनच मार्गक्रमणा करावी लागली. याचे उत्तम उदाहरण संत मीराबाई, संत वेणास्वामी इ. आहेत. पण जनाबाईंच्या वाट्याला मात्र या प्रकारच्या आंतरिक संघर्षाला तसे फारसे तोंड द्यावे लागले नाही. पण एक कष्टकरी स्त्री आणि दास्यभक्तीच्या अधिकारातून साक्षात्कारी संत ठरल्या. त्यांच्या जीवनाचा हा पारमार्थिक प्रवास त्यांच्या आत्मनिवेदनपर अभंगातून उलगडतो. सत्तावीस अभंगांतून आत्मस्वरूपाची उकल सहजपणे साकारली आहे. जेव्हा पंढरीरावाची सावळी मूर्ती वत्सलभावातून त्यांच्या हृदयी बिंबली आणि कामक्रोधादि विकार मावळून, गुरुकृपेने जनाबाई ब्रह्मरूप झाल्या. सर्वाघटी ब्रह्म पाहू लागल्या.

''धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर ।।
हृदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडला ।।''

भक्तिभावाने केलेल्या जनाबाईंना लाभलेले साधनेचे फळ म्हणजे केवळ अंतर्यामीच नव्हे तर ऐहिक जीवनातही गुरूचा संग निरंतर मिळाला. तसे जनाबाईचे अंत:करणच निर्मळ होते. म्हणून परमपदापर्यंत सरळ मार्गाने जाऊन पोहोचल्या. जनाबाई विठ्ठलरूप होऊन गेल्या. ईश्वर-भक्त संबंध दृढ होत गेला. अशा प्रकारे परमार्थ लाभासाठी आवश्यक असणारी अंतर्बाह्य सिद्धता जनाबाईंनी प्राप्त केली. पांडुरंगाबद्दलचा भक्तिभाव, प्रेम, जिव्हाळा अनावर झाला. तो भाव कधी प्रार्थनेतून तर कधी विरहव्यथेच्या व्याकुळतेतून व्यक्त केला.

''आता वाट पाहू किती । देवा रुक्माईच्या पती ।।
येई येई पांडुरंगे । भेटी देई मजसंगे ।।''
''वाट पाहतसे मी डोळा । का गा न येसी विठ्ठला ।।''
''का गे निष्ठुर झालासी । मुक्या बाळाते सांडिसी ।।
तुज वाचोनिया माये । जीव माझा जावो पाहे ।।''
''धाव धाव पांडुरंगे । सखे जिवलगे । अंतरंगे ।।''

जनाबाई म्हणतात, तुझ्यावर मी सारा संसार बोळविला, तू उशीर का लावतोस? गंगा सिंधुपाशी गेली आणि सिंधूने तिला अव्हेरले तर ते कुणाला सांगावे? **''माझी न करावी सांडणी ।।''** अशी विठ्ठलाला विनवणी केली.

जनाबाई भक्तीत धुंद होऊन विठ्ठल विरहाची माळ व्याकुळतेने फिरवत होत्या. हृदयात त्याचे स्मरण, नेत्रात त्याचे ध्यान, मुखाने आर्त पुकारा करून शीघ्रपणे भेटीची आस धरत होत्या. अनेक वर्षांच्या साधनेतून त्यांचे मन त्या विठ्ठलाशी जोडले गेले. मन अनासक्त झाले. निर्लेपतेतून मनाला त्यागाने वेढले. दर्शनाने तृप्ती मिळाली. मग **''ये रे ये रे माझ्या रामा । मनमोहन मेघ:श्यामा ।।''** अशी आळवणी विठ्ठलाने ऐकली. जीवशिवाची भेट झाली. डोळ्यांनी मुक्तीचा सोहळा अनुभवला. आता तो विठ्ठल म्हणजे एकमेव सर्वव्यापी परमेश्वर, तो सत्पुरुष, सर्वाभूती दृगोचर होणारे परमतत्त्व असा अनुभवही प्राप्त झाला. हे सारे जनाबाईंनी अगदी साध्या प्रसंगातून घरगुती भाषेत मांडले. अशा प्रकारे परमार्थाची अंतिम कसोटी त्या पास झाल्या. निजवस्तू होण्याचे अलौकिक भाग्य, ईश्वरीकृपेमुळे जनाबाईच्या वाट्याला आले.

''नामयाची जनी निजवस्तु झाली ।
अवघ्यासी बुडाली परब्रह्मी ।।''

आता त्यांचे सर्व व्यवहार देवमय झाले,

''देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।
देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते ।।
देव येथे देव तेथे देवावीण नाही रीते ।।
जनी म्हणे विठाबाई । भरूनि आले अंतरबाही ।।''

देवमयतेत तल्लीन झालेल्या जनाबाईंची कल्पकता झेप घेऊ लागली. रोजच्या दैनंदिन कामकाजात देव आपला सहकारी आहे असे त्यांना वाटू लागले. अशा आभास सुखाच्या तंद्रीत त्या रममाण झाल्या. मग दळणकांडणात देव हातभार लावीत आहे, देव त्यांचे केस विंचरत आहे, विसणाला थंड पाणी आणून देत आहे अशी कितीतरी कल्पनाचित्रे त्या रंगवू लागल्या. पण अंतरंगातील सर्व चित्तवृत्ती मात्र त्या विठ्ठलाला समर्पण करू लागल्या.

जनाबाई आणि भक्ती

भक्तीची तन्मयताच जनाबाईंना संतत्व बहाल करून गेली. विठ्ठलभक्तीचे दीडशे अभंग हा त्यांचा भक्तिमय आविष्कारच म्हणावा लागतो.

''ऐसा आहे पांडुरंग । भोग भोगूनि नि:संग ।।
अविद्येने नवल केले । मिथ्या सत्यत्व दाविले ।।
अनंत लावण्याची शोभा । तो हा विटेवरी उभा ।।''

पांडुरंगाला वश करणे हीच जनाबाईंच्या दृष्टीने भक्तीची कसोटी आहे. त्यांच्या भक्तीचे उद्दिष्टही ईश्वरप्राप्ती, ईश्वरप्रीती हेच आहे. म्हणूनच समचरण विठ्ठल त्यांना 'सर्व सुखाचा केशव' वाटला.

''माझा रंग तुझिया गुणी । म्हणे नामयाची जनी ।।''

त्यांची विठ्ठलभक्ती म्हणजे वत्सलतेची वाहती गंगाच! त्यांनी वत्सलभक्तीचा पुरस्कार केला. ''भक्ती वत्साची ते गाय।'' असे त्या

मानतात. म्हणूनच विठ्ठल त्यांना लेकुरवाळा दिसला. हाच विठ्ठल संतांच्या मेळाव्यात पंढरपुरी वसतीस आला आहे. या आनंदसोहळ्याचे वर्णन करताना त्या म्हणतात,

''आले वैष्णवांचे भार । दिले हरिनाम नागर ।।
अवघी दुमदुमली पंढरी । कडकडाट गरुडापरी ।।
टाळ मृदुंग धुमाळी । रंगणी नाचे वनमाळी ।।
ऐसा आनंदसोहळा । दासी जनी पाहे डोळा ।।''

स्त्रीसहज वृत्तीतून प्रकट झालेले अति, हळूवारपणाचे हे अभंग ईश्वरविषयक उत्कंठेतून स्त्रवले आहेत. जनाबाईंच्या जाणिवांना वात्सल्याचा, सख्याचा मधुराभक्तीपेक्षाही श्रेष्ठ स्पर्श झाला आहे. याचे कारण संत नामदेवांच्या अभंगात विठ्ठल हा त्यांचा सहचर असून त्याच्याशी त्यांचे नाते सख्यभक्तीचे आहे. तेच हुबेहुब प्रतिबिंब जनाबाईंच्या आविष्कारातून उमटले आहे.

जनाबाई आणि संतभाव

जनाबाईंच्या अभंगगाथेत 'संतस्तुती' नावाचे स्वतंत्र प्रकरणच आहे. वास्तविक साधनेचा विकास आणि साधनेची सफलता होण्यासाठी सत्संगाची खूप आवश्यकता आहे. मानवी मनाचा असा स्वभाव आहे की, ज्याच्या संगात ते रहाते त्याचा रंग ढंग स्वीकारते. त्याचेच रूप होऊन जाते. जनाबाईंनाही आध्यात्मिक सहवासात आध्यात्मिक रंग गवसला. परमात्म्याच्या तत्काळ भेटीसाठी सत्संगासारखे प्रभावी साधन नाही. सत्संगाच्या लाभातून साधकाचे सर्व प्रापंचिक प्रभाव व संस्कार गळून पडतात. ते सहजपणे विठ्ठलास प्राप्त करतात. म्हणजेच संतांच्या संगतीमध्ये आपल्या अमर जीवनाच्या प्राप्तीचा विमा उतरला जातो. याचा परखड अनुभव घेतलेल्या जनाबाईंनी संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या प्रभावळीतील संत नामदेव, संत सेनान्हावी यांची शब्दचित्रे रेखाटली. त्यातूनच संतांविषयीचा सज्जनांविषयीचा आदर व्यक्त केला. एका अभंगात जनाबाईंनी आपल्या स्त्रीसुलभ व्यक्तिमत्वातून अनेक संतांना एकत्र आणले आहे.

''विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।
बंका कडेवरी । नामा करांगुली धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।''

त्याचप्रमाणे संत रोहिदास, संत कबीर, कमाल, कसाई, मुकुंद जोहरी यांचीही नावे गुंफली आहेत. ''चोखामेळा आणि ज्ञानदेवांबद्दल जनाबाईंना अमाप जिव्हाळा जाणवतो.

''चोखामेळा अनामिक । भक्तराज तोचि एक ।।
परब्रह्म त्याचे घरी । न सांगता काम करी ।।'' तर

''सखा विरळा ज्ञानेश्वर ।'' असे सांगून ज्ञानदेवांबद्दलचा आदरभाव व्यक्त केला आहे. नामयाच्या जनीला ज्ञानाबाईने सांभाळावे अशी जनाबाईंची प्रार्थना आहे.

''ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।।
मरोनिया जावे । बा माझ्या पोटा यावे ।।
ऐसे करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।
जावे ओवाळुनी । जन्मोजन्मी दासी जनी ।।''

व्यक्तिगत उमाळ्यातून आलेले हे ज्ञानदेवांबद्दलच्या निस्सीम प्रेमाचे दर्शन घडते. जनाबाईंची केवळ सलगी आणि पराकोटीचा नि:संकोचपणा ह्यात आढळतो. ज्ञानदेवांच्या सहवासातच जनाबाईंच्या व्यक्तित्वावर योगविद्येचेही संस्कार कोरले गेले. याचा प्रत्यक्ष अनुभव जनाबाईंनी घेतला. रक्तशून्य, श्वेतशून्य आणि श्यामशून्य ही तीन शून्ये पाहिल्यानंतर जनाबाईंना स्वरूपसाक्षात्कार घडविणारे नील महाशून्य पाहावयास मिळाले. अनाहत नादही ऐकण्यास मिळाला.

''शून्यावरी शून्य पाहे । तयावरी शून्य आहे ।।
प्रथम शून्य रक्तवर्ण । त्याचे नाव अध:शून्य ।।
उर्ध्वशून्य श्वेतवर्ण । मध्यशून्य श्यामवर्ण ।।
महाशून्य वर्णनील ।। त्यात स्वरूप केवळ ।
अनुहात घंटा श्रवणी ।। ऐकुनी विस्मित जाहली जनी ।।''

यानंतरच जनाबाईंनी स्वप्न, सुषुप्ती, जागृती या तीन अवस्था, सत्व, रज, तम या मायाजन्य उपाधी आणि परमात्मस्वरूपातील सत्-चित्-आनंद ही नवद्वारे ओलांडली आणि मग त्यांना परमेश्वराचे दर्शन घडले. या साक्षात्काराने त्यांच्या ठिकाणची प्रवृत्ती, निवृत्ती मावळली. चत्वार वाणीच्या सामर्थ्याची सीमा ओलांडली गेली. सोहं ज्योत प्रकाशमान झाली. जीवनात अलौकिक स्वरूपाची आनंदकळा संचारली. योग आणि भक्तीच्या मार्गाने हे साक्षात्काराचे वैभव जनाबाईंनी अनुभवले.

खरोखरच संत जनाबाईंचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व अशासाठी मानायचे की त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनव्यवहाराचे मूल्य श्रेयविषयक विचारांच्या स्पर्शातून कसे जाणले, त्याचा निदिध्यास कसा घेतला आणि मग आपल्या कर्तृत्वाने मानवी संस्कृती कशी फुलवली या दृष्टीने संत जनाबाईंचे पारमार्थिक चरित्र बोलके वाटते.

संत जनाबाई आणि संत नामदेव यांचे ऋणानुबंध

संत ज्ञानदेव आणि संत नामदेवांसारख्या ज्येष्ठ, श्रेष्ठ प्रवर्तकांच्या सहवासाचे भाग्य जनाबाईंना लाभले. विशेष म्हणजे भक्तशिरोमणी नामदेवांचा सहवास जन्मभर लाभला. म्हणून व्यावहारिकदृष्टीने दुर्दैवी ठरलेली ही स्त्री पारमार्थिकदृष्ट्या भाग्यशाली ठरते. परमार्थक्षेत्रात संत नामदेव व जनाबाईंची स्थिती समानच होती. दोहोंचीही जन्मजात ओढ परमार्थाकडेच होती. संत नामदेवांचा आध्यात्मिक विकास व उंची त्यांनी अगदी जवळून न्याहाळली होती. त्यांच्या सहवासाची, त्यांच्याशी केलेल्या संवादाची, त्यांच्या अवीट गोडीच्या कीर्तनाची भक्तीही त्यांना लाभली होती. नामदेवांच्या कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंग पुढे नाचतानाचा प्रेमसोहळा जनाबाईंनी अनुभवला होता. तसेच नामदेवांचा पारमार्थिक ठेवा कुटुंबातील अन्य कोणाशिवाय फक्त जनाबाईंनाच लॉटरीसारखा लाभला होता. नामदेवांच्या कीर्तनाला टाळाची साथ करण्याची संधीही

त्यांना मिळाली होती. जणु कीर्तन-भक्तीची डॉक्टरेट पदवी संपादन केलेल्या संत नामदेवांची, नव्हे संतकृपा जनाबाईंचे विश्वच घडवून गेली होती. संत नामदेवांच्या भावजीवनाशी त्या एकरूप झाल्या होत्या. आध्यात्मिक मार्गातील त्यांचे वाटाडे, मार्गदर्शक संत नामदेव यांचेकडून त्यांना भक्तिपंथाच्या उपासनेचे सारे रहस्य हाती आले होते. याची साक्ष देताना त्या म्हणाल्या,

''नामयाचे ठेवणे जनीस लाभले । धन सापडले विटेवरी ।।
धन्य माझा जन्म । धन्य माझा वंश ।
धन्य विष्णुदास स्वामी माझा ।।''

एकूण जनाबाईंनी नामदेवांबद्दलचा कृतज्ञभाव ठायी ठायी प्रकट केला आहे. दासी म्हणवून घेण्यातच त्यांना धन्यता वाटत्रे. वास्तविक त्या व्यावहारिक क्षेत्रात नामदेवांच्या घरची दासी असल्या तरी आध्यात्मिक क्षेत्रात या नात्याचा उच्चार करण्याचे तसे काहीच कारण नव्हते. पण विठ्ठलाला 'आई, ज्ञानदेवांना 'सरपा' म्हणणाऱ्या या स्त्रीने आध्यात्मिकतेतून स्वत:ला 'नामयाची दासी' म्हणवून घ्यावे याचे कौतुक वाटते. ह्यात 'नामयाची' म्हणण्यातला अभिमान, अपूर्व कौतुक अनमोल ठेव्याप्रमाणे त्यांनी जपली आहेत आणि आपल्या अभंगातून ही मुद्रा मिरवली आहे. संत नामदेवांचा हा त्यांचा ऋणानुबंध पूर्वजन्माशी आणि आत्ताच्या जन्माशी जोडूनच खरी गुरुपूजा साधली आहे. ऋणाईत झालेल्या जनाबाई म्हणतात,

''नोवरियासंगे वऱ्हाडिया सोहळा ।
मांडे, पुरणपोळ्या मिळे अन्न ।।
परिसाचेनि संगे । लोह होय सोने ।
तयाची भूषणे श्रीमंतासी ।।
जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ।।''

जनाबाईंचे लौकिक जीवन जरी एका कष्टकरी, कामकरी स्त्रीचे असले तरी परमार्थाशी सांगड घालण्याच्या हातोटीमुळे प्रपंचात राहूनही आध्यात्मिकता हीच त्यांची दिनचर्या ठरली. दैनंदिन उपासनेच्या वेळी त्या म्हणतात,

''दळिता कांडिता तुज गाईन अनंता ।।''

त्यामुळे सारेच कष्ट परमेश्वरमय होऊन गेले. हा त्यांचा आदर्श प्रत्येक स्त्रीने अगदी नवयुतीनेही घेण्यासारखा आहे. त्यातूनच दु:खातीत होण्याची अवस्था त्यांना सहज प्राप्त झाली. समर्पणशीलता हेच त्या साध्याचे खरे रहस्य आहे. इतर सांसारिक पाशांशी त्यांनी कधी आपला संबंधच जोडला नाही. काय ही त्यांच्या मनाची परिपक्वता!

वास्तविक तौलनिकदृष्ट्या पाहता जनाबाईंना संत मुक्ताबाई, संत मीराबाई, संत वेणास्वामी यांच्यासारखे पंथातील अधिकारीपण, मानसन्मान लाभले नाही. तशी अपेक्षाही नव्हती. त्या अलिप्तपणानेच वावरल्या. कारण लेकुरवाळ्या विठोबाच्या निवडक संततीत त्यांनी आपला अंतर्भाव करून घेतला होता. मात्र आत्मनिष्ठ जनाबाई आपल्या आयुष्यात काही कारणाने डिवचल्या तेव्हा भेदक उद्गारातून म्हणतात,

''डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ।।
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ।।
पंढरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ।।
जनी म्हणे देवा मी झाले येसवा । रिघाले केशवा घर तुझे ।।''

या सहजोद्गारातूनच जनाबाईंच्या अंत:करणातील देदिप्यमान आत्मतेजाची प्रखरता व्यक्त होते.

आत्मनिष्ठ संत जनाबाईंचे सारे बोलणे-वागणे परिस्थितीने शांत, आर्जवी, समंजस झाल्यामुळे त्यात लोभसपणा, निरागसता सहजपणे मिसळली होती. बोलण्यात कुठेही उपदेश, सहेतुकता, तत्त्वदर्शन प्रगटले नाही. तर प्रत्येक वेळी अनौपचारिकता, घरगुती जिव्हाळा, प्रांजळपणा, अनुभवाची परिपक्वताच प्रत्ययाला येते. मोजक्याच शब्दात, मोजक्याच अभंगातून सारे काही मांडले आहे. येथे जनाबाईंचे सामान्यातील असामान्यतच भावते. इतकेच नव्हे तर स्त्री या नात्याने त्यांनी गाठलेली आध्यात्मिक उंची त्यांना संतपण बहाल करून हृदयसिंहासनावर विराजमान करते आणि मराठी सारस्वतात संत जनाबाईंचे आयुष्य पर्व मानाचे मोरपीस खोवून जाते. महिला जगतात जनाबाईंचे कर्तृत्व सामाजिक शांतीचे अंग ठरते. जनाबाईंचे कोणतेही संतवचन उचलावे, कानाला लावावे, त्यात प्रवृत्तीवादाचा कर्मकर्कश आवाज ऐकू न येता त्यातून निघणाऱ्या निवृत्तीवादाच्या नादमधुर लहरी आपल्या काना-मनाला निववतात. जनाबाई म्हणजे साक्षात चालतेबोलते ज्ञानच अशा शब्दात त्यांचा गौरव यथोचित ठरतो.

आपल्या उद्धाराची सर्व जबाबदारी त्यांनी पूर्ण विश्वासाने देवावरच टाकली ही त्यांची भूमिका आजही आदर्श वाटते. आपले जीवनाचे तत्त्वज्ञान जनाबाईंनी वर्तनाच्या परिसावर घासून कर्मयोगाची शिकवण देऊन मार्ग दाखविला आहे. जीवनाचे उन्नयन करण्यासाठी जनाबाईंनी भक्ती हे एकच मूल्य प्रमाण मानले. आणखी महत्त्वाचे वाटते ते जनाबाईंच्या पारमार्थिक जीवनदृष्टीशी सुसंगत अशी त्यांची निस्पृहता, स्वरूपातही टिकून आहे. भक्तिमार्गाला अनुसरून निर्विकल्प समाधीचे सुखही त्यांनी अनुभवले आहे. त्यांच्या सर्व अभंगात पांडुरंगाला मन:पूर्वक गौरविण्याचा, चढत्या आर्ततेने आळविण्याचा एकच सूर जाणवतो. म्हणूनच त्यांचा एकेक अभंग म्हणजे एकेक सुसंघटित भावगीतच ठरले आहे. म्हणूनच ते अक्षर वाङ्मय आहे. आजही खेड्यापाड्यातील स्त्रिया जात्यावर दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. कष्टाचा आठव करून दु:ख सुसह्य करतात. अशा स्त्री संत, भूलोकी वैकुंठाची वाट दाखविणाऱ्या जनाबाई पंढरपूरक्षेत्री आषाढ कृष्ण त्रयोदशीला इ.स. १३५० मध्ये विठ्ठलचरणी विराम पावल्या. या संतश्रेष्ठीला मन:पूर्वक अभिवादन.

सौ. उषा जयंत कळमकर
२०३, जयमोरेश्वर निवास को. हौसिंग सोसायटी,
गुप्ते रोड, डोंबिवली (प.), ४२१२०२
मोबाईल : ९९२०२८४१४५

***



श्रीनामदेव आणि जनाबाई

डॉ. अशोक कामत

एम्.अे.पीएच्डी, मराठी व हिंदी, नामदेव अध्यसन प्रमुख, पुणे विद्यापीठ, २००७ मध्ये निवृत्त. मराठी संत साहित्याचे अध्यसन, अध्यापन, अनुबंध लेखन, संशोधन व शोध कार्यासाठी मार्गदर्शन. एम्फील, पीएचडीचे मार्गदर्शक ३० प्रबंध पूर्ण, ७५ संशोधन प्रकल्पांना मार्गदर्शन. वर्ध्याचा महात्मा गांधी पुरस्कार व इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

मराठी संत कवयित्रींची संख्या अन्य प्रांतातील आध्यात्मिक रचना पाहता मोठी आहे. अंत:स्फूर्तीवर आधारलेली भगवंताची प्रचीती इथे दिसते. स्त्रीसुलभ सहज आविष्कार आहे. उपदेश कमी, अनुभूतीवर भर अधिक आहे.

जनाबाई ही नामयाची दासी म्हणजे शिष्या. पारिवारिक सद्भाव सत्संगातून कसा आत्मविश्वास मिळविता येतो, त्याचे एक चांगले उदाहरण जनाबाईंच्या संपन्न भाव कवितेत पाहावे.

श्रीविठ्ठल आणि जनाबाई

श्रीनामदेवांप्रमाणेच जनाबाईंची श्रीविठ्ठलभक्ती अनन्य निष्ठेची आहे. 'गातां विठोबाची कीर्ति । महापातकें जळती' असा त्यांना ठाम विश्वास वाटतो. 'जन्मा येऊनियां' जर 'देहाचे सार्थक' करायचे असेल तर 'वाचे नाम विठ्ठलाचे घ्यावे', असा त्यांचा स्वानुभव आहे. 'नाम विठोबाचे घ्यावे' मगच पाऊल पुढे टाकावे असे त्या सांगतात. हा श्रीविठ्ठल सगुणनिर्गुणापलिकडे आहे. परब्रह्मस्वरूप आहे. वर्णानातीत आहे...

तुझ्या निजरूपाकारणें । वेडावली दरूषणे ।।
परि सोय न कळे त्यांसी । समीप असतां देवासी ।।
चारी श्रमें हो कष्टती । वेदशास्त्रें धुंडाळिती ।।
तुझी कृपा होय जरी । दासी जनी धृपद करी ।।

असा हा परब्रह्मरूप श्रीविठ्ठल 'रात्रंदिवस' जनीसह 'दळूकांडू' लागला. तिला 'जें जें दु:ख जालें । ते सोसिलें विठ्ठला ।' इतकेच नव्हे तर, 'माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला।' इतका आधार त्याने तिला दिलेला आहे. 'होतें लोकांमध्यें निंद्य । तें त्वां जगांत केलें वंद्य' असा आत्मविश्वास त्याच्यामुळेच मिळाला आहे आणि ती 'धृपद' - काव्यरचना सहजपणे करीत गेली.

हा श्रीविठ्ठल 'लेकुरवाळा' आहे. त्याच्या परिवारात सारे संतमंडळ आहे. त्याच्या खांद्यावर निवृत्तिनाथ आहेत. सोपानाचा त्याने हात धरला आहे. पुढे ज्ञानेश्वर चालले आहेत. त्यांच्या मागे मुक्ताई आहे. गोरा कुंभार मांडीवर तर 'चोखा जीवा बरोबरी' आहे. बंका कडियेवरी तर नामा करांगुळी धरून आहे हा 'भक्तांचा सोहळा' सदैव साजरा होतो आहे. 'गोपाळ विठ्ठल' जनाबाईंना कसा भेटला?.... 'जनी म्हणे जोड जाली विठोबाची । दासी नामयाची म्हणोनियां ।।'

जनाबाई नामदेवपरिवारात भक्तिमय वातावरणात नामदेव-शिष्या झाली म्हणून विठोबाची 'जोड' झाली. त्याच्याशी द्वैत राहिले नाही.

हा देव भक्तीला भुलणारा आहे. तो जीवांना मुक्ती तर देतोच पण त्याहून मोठी साथसोबत करतो. नामयाच्या 'जनीचा पालट पै जाला' कसा? तर...'भेटावया आला पांडुरंग!' म्हणून! त्या आपला देवभेटीचा स्वानुभव असा नमूद करतात...

देहाचा पालट विठोबाची भेटी । जळ लवणा गांठीं पडोन ठेली ।।
धन्य मायबाप नामदेव माझा । तेणें पंढरिराजा दाखविलें ।।
रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायीं । चित्त ठायींचे ठायीं मावळलें ।।
नामयाचे जनी आनंद पै जाला । भेटावया आला पांडुरंग ।।

हा पांडुरंग विठ्ठल नुसत्या भेटीगाठी करीत नाही. 'झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी।' किंवा 'पाटी घेऊनि डोईवरी नेऊनियां टाकी दुरी' असा तो भक्तासाठी 'नीच कामें हि' करतो. कधी 'जनी डोईनें गांजली' तेव्हा तो देव विठाबाई म्हणून 'धाविन्नला', त्याने जनाईचे 'केश मोकळे' विंचरूनी 'उवा तातडीने मारल्या. जेव्हा 'जनी बैसली न्हायाला' आणि 'पाणी नाही विसणाला' अशी गडबड उडाली, तेव्हा तो ईश्वर 'घागर घेउनि हातात' पाणी आणून देऊ लागला.

कधी जनाई 'साळी कांडायास काढी' तेव्हा 'चक्रपाणि उखळ झाडी' असा अनुभव आला. 'पायीं पैंजण हातीं कडी । कोंडा पाखडोनि काढी' मग 'हाता आला असे फोड' असेहि होऊन बसले.

पंधरावी ती जनी

स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावें उदास । साधुसंतां ऐसें केलें मज ।।

अशी जनाबाईंची दृढ श्रद्धा आहे. आपण सर्वच त्यांच्यासारखे 'संतांचे घरची दासी मी अकिली' आहोत. म्हणून 'विठोबानें दिली प्रेमकळा' असे त्या सांगतात. 'हृदयीं बिंबला पांडुरंग' म्हणून नामयाचे जनी आनंद पैं जाला' ह्याबरोबरच, 'धन्य माझा जन्म, धन्य माझा वंश'

कारण, 'धन्य विष्णुदास स्वामी माझा ।।' अशीहि कृतज्ञ नोंद त्या करतात. त्यांचा हा प्रसिद्ध अभंग पाहण्यासारखा आहे.

नामदेवाचे घरीं । चौदाजणें स्मरती हरी ।।
चौघे पुत्र चौघी सुना । नित्य स्मरती नारायणा ।।
आणिक मायबाप पाही । नामदेव राजाबाई ।।
आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी । पंधरावी ती जनी ।।

पंढरपुरात नामदेवरायांचे संयुक्त कुटुंब. नामयाचे आई-बाप, चार मुले, चार सुना, लेकी दोन, सारी मिळून चौदा माणसे. त्यापैकीच एक म्हणून पंधरावी ती जनी !

संत नामदेवांचा जीवनकाळ १२७० ते १३५०. जनाबाई या त्यांच्यापेक्षा वयाने वडील असाव्यात असे त्यांच्या अभंगांतील उल्लेखावरून म्हणता येते. त्यांची जन्मतिथी आणि निधनकाळ याविषयी फारशी माहिती मिळत नाही.

महीपति बोवांच्या 'भक्तविजय' ग्रंथात दिलेल्या चरित्राप्रमाणे, परभणी जवळच्या गंगाखेड गावच्या दमा आणि करुंड या शूद्र दांपत्याची जनी ही एकुलती एक लेक. अपत्यप्राप्तीसाठी दमा-करुंडने पंढरीच्या पांडुरंगाला साकडे घातले होते. जनीची आई वारली तेव्हा करुंडने तिला पंढरपूरला आणलं आणि तिच्या प्रतिपाळासाठी तिला दामाशेठींच्या पदरात घातले.

दामानामा परिवार विठ्ठल भक्तिमय जीवन जगणारा. त्यानं जनाबाईंना आपल्यात सामावून घेतलं.

नामयाची जनी

'नामयाची जनी' ही जनाबाईंची केवळ अभंग-मुद्रा नाही. ती त्यांची खरी ओळखही आहे. नवऱ्या मुलाबरोबर आलेल्या वऱ्हाडी मंडळींना मांडे पुरणपोळ्यांचा आस्वाद घेता येतो तसाच आपल्याला लाभ झाला... नामयाची दासी जनी म्हणून विठोबाची जोड झाली, असा त्यांचा उद्‌गार आहे. श्रीविठ्ठलाचे प्रेमभंडारी नामदेवरायांचा सत्संग लाभला आणि आपले स्त्रीत्व, कुळ, गोत्र सारे बाजूला पडले. 'दासी जनी नाहीं आतां!' 'देहभाव पूर्ण जाय तेव्हा हें धैर्य सुख होय!' असा अद्वैतानुभव सतत अनुभवता आला.

'सोहं आत्मा प्रकट जो दाखवी वाट । वरिष्ठ तोचि जाणा' अशा शब्दांत जनबाईंनी नामदेवरायांचे ऋण व्यक्त केलेले आहे.

राजाई गोणाई या नामदेवांघरच्या सासूसून, मायलेकी सारख्या त्या अखंडीत विठ्ठलाचे पायीं' राहिल्या. त्यांनीच 'ठेवियलें द्वारीं । नीच म्हणोनि बाहेरी' अशावेळी 'नारा गोंदा महादा विठा । ठेवियले अग्रवाटा' अशी नामदेवांच्या मुलांची स्थिती तर 'केव्हा क्षेम देसी । आपुली म्हणोनि जनी दासी' अशी जनाबाईंची मन:स्थिती. त्या 'दासी' म्हणजे मोलकरीण नव्हेत. त्या ईश्वराला 'दास'भावाने शरण आलेल्या आणि 'नामयाची दासी' म्हणजे शिष्या आहेत. त्यांचाहि पिंड नामदेवांसारखाच आर्त भक्ताचा आहे.

सृष्टीचे स्वरूप वर्णन करणाऱ्या एका अभंगात जनाबाई सांख्यांनी सांगितलेली तत्त्वे, पंचमहाभूते त्रिगुण, चार वाचा, जीवनाच्या चार अवस्था, पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेंद्रिये, पंचविषय असे विविध उल्लेख करतात. या अभंगाचा आरंभीचा चरण असा बोलका आहे...

'बाई मी लिहिणें शिकलें सद्‌गुरूरायापाशीं!'

नामदेवमहाराजांनी जनाबाईंचे लौकिक-पारमार्थिक शिक्षण केले असा हा उत्कट उल्लेख आहे.

संत नामदेव चरित्रातील काही महत्त्वाच्या घटना जनाबाई सहज नोंदवितात...'गोणाईने नवस केला । देवा पुत्र देई मला । ऐसा पुत्र देई भक्त । ज्याला आवडे पंढरीनाथ ।।' गोणाईचा हा शब्दभाव ध्यानी घेऊन 'पोटीं आले नामदेव!' दामाशेटी अर्थातच हरुषले 'दासी जनीने त्यांना ओवाळिले!'

गोणाई राजाई या सासूसुनेचं भरलेलं घर. दामा नामा हे बाप लेक. नारा, विठा, गोंदा, महादा हे नामदेवांचे चार सुपुत्र. लाडाई, गोडाई, येसाई, साखराई अशा चौघी सुना. सुखीसमाधानी एकत्र कुटुंब. लिंबाई, आऊबाई या बहिणींसह दासी जनी. वेडीपिशी. भोळीभाळी भक्तिभावानं सर्वांशी समरसलेली.

एकदा 'सण दिवाळीचा आला । नामा राउळासी गेला' आणि 'हातीं धरूनी देवासी' घरी घेऊन आला. देवाचे उत्तम आतिथ्य करण्यात आले. 'दासी जनीने विडे दिले'.

कधी सोसाट्याचा वारा आला. पाऊस कोसळला. घराचे छप्पर मोडले. 'द्वारीं उभें पंढरिराव!' त्यांनी मदत केली. छप्पर सावरले.

सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी । नामा वाळुवंटीं कथा करी।।
ब्रह्मादिक देव येवोनि पाहाती । आनंदें गर्जति जयजयकार ।।
जनी म्हणे त्याचें काय वर्णूं सुख । पाहाती जे मुख विठोबाचें ।।

ही नामदेवांची कीर्तनसमाधी जनाबाई नित्य अनुभवीत असत. पंढरीच्या वाळवंटात सर्वांसाठी कीर्तन करणारे नामदेवराय किती साधे होते. त्यांच्या कीर्तनरंगात श्रीविठ्ठलहि येऊन उभा राहायचा, रंगायचा आणि जनाबाई देखील!

समारोप


जनाबाई श्रीविठ्ठलमय, देवमय आयुष्य जगल्या. 'देव खाते देव पितें । देवावरी मी निजतें ।' म्हणाल्या. 'देव देते देव घेते । देवासवें व्यवहारितें' असा आनंद त्यांनी मिळविला. 'देवावीण ठाव रिता नाही' हे नामदेवांनी वारंवार म्हटले. तसेच,

देव येथें देव तेथें । देवाविणें नाहीं रितें ।।
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरलें अंतरबाहीं ।।

असा पूर्णत: देवमय जीवनाचा अनुभव त्या सांगत राहिल्या. त्यांची अभंगसंपदा आजही रसरशीत, टवटवीत वाटते. ती त्यांच्या देवाशी एकरूप अशा जगण्या-बोलण्या-वागण्यामुळे.

डॉ. अशोक कामत
शिवश्री, सहकारनगर नं. २, पुणे ४११००९.
फोन : ०२०-२४२२२४९५, २५४५२४१५

***



संत कान्होपात्रा



सरूपता मुक्ति-साक्षी कान्होपात्रा

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम.ए. बी.एड., निवृत्त शिक्षिका, पार्लेटिळक विद्यालय, मुंबई
कविता करण्याची आवड, श्यामरंग- भक्तिगीतांची ध्वनिफित (इ.स. २००४),
सेवानिवृत्तीनंतर पुण्यात कृष्णजन्माष्टीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण.

देवाचियेद्वारी नाही भेदभाव
पंकजाचा जन्म कोठे? शिरी धरी देव ।।

गाव मंगळवेढे । मांगल्याने वेढलेले
दुष्काळात दामाजीने धान्य लुटवीले
'चोखा विठ्ठल-विठ्ठल' नाद अस्थीतून बोले
प्राणकमल कान्ही विठ्ठलपायी मोक्षा गेले ।।

गणिका जातीत जन्मली । मुद्रा ठोकलेली भाळी
सौंदर्याची रूपखाणी । शोभे जैसी चंद्रावळी
नृत्यगायनी सुरम्या 'लक्ष्य' धनिकांची दृष्टी
धाडसाची पोर झाली । वारकरी वाळवंटी ।।

''महानंदा-पिंगलाही माझ्या जातीच्याच होत्या ।।
देवाद्वारी प्रिय झाल्या भाव-भक्ति-श्रद्धेने त्या ।।
मीही माझ्या विठोबाला प्रेमे घालीन साकडी ।।
नामकीर्तनी-नर्तनी-रंग भरीन आवडी ।।

''जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले
म्हणोनि देखिले विठ्ठलचरण ।।
धन्य चरण माझे या पंथी चालले
म्हणोनि देखिल विठ्ठलचरण ।।''

शब्द कोमल 'कान्ही'चे जाईजुई फुलांजैसे
सुकर अर्थ हळवे भाव गंध जणू ते चाफ्यांचे
अभंगातली आर्तता शुद्ध चित्त चंदनाचे
अतुलभक्ति-श्रद्धा-प्रीति तुळशीरोप मांगल्याचे ।।

चुकवाया बादशहाला जरी पंढरीत आली
माग काढीत काढीत फौज राऊळी पोहोचली ।

''नको देवराया, अंत आता पाहू
प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।।
मोकलोनि आस जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात ।।''

''जीवाचे जिवलग माझे कृष्णाई कान्हाई
सावळे डोळसे करुणा येऊ दे ग काही ।।''
''पतितपावन म्हणविसी आधी । तरी का उपाधि भक्तामागे ।।''
''आलियाची धणी । निवारितो चक्रपाणी''
''अगा वैकुंठीच्या राया ।.... कान्होपात्रा राखी आता ।।''


विश्वमाऊलीची कूस - जागा अन्य कोठे?
आत्मबलिदानाविना मार्ग सर्व खोटे!
विकल झाला देह, वाणीही शिणली!
'कान्होपात्रा राखी...' म्हणता चेतना विझली ।।

पाषाणाची मूर्ति नव्हे माऊली धावली
सरूपता मुक्तिलाभ । कान्ही धन्य झाली ।।
मनाचे पावित्र्य, आचार शुचिता
ईश्वरस्वरूपी लीन, मुक्त कान्होपात्रा ।।

सत्त्व स्वत्व शुचि मूल्ये, चिरंतन बळ देती,
खलत्वा पराभूत करी, धन्य धन्य ही स्त्रीशक्ती ।।

सौ. शैला सुहास पटवर्धन
डी-३, प्राजक्ता, कर्वेनगर, पुणे.
फोन ०२०-६५२१८५३१

टीप : बोल्ड केलेल्या ओळींतील रचना संत कान्होपात्रा यांच्या आहेत.



संत कान्होपात्रा - चरित्र

डॉ. संस्कृती आवलगावकर
एम.ए.,पीएच.डी.
मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ५३.
सहायक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख (मराठी याविषयाचे अध्यापन)
विविध नियतकालिकातून ललित व समीक्षाविषयक लेख प्रसिद्ध

प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या धर्मजीवनात विविध भक्तिसंप्रदायांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नाथ, महानुभाव, दत्त, समर्थ, वीरशैव हे सर्वच संप्रदाय त्या त्या काळात वैशिष्ट्यपूर्ण ठरले. त्यांनी आपली शिष्यपरंपरा निर्माण केली. वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयनिर्मितीही केली. पण काळाच्या ओघात यात सातत्य राहिले नाही. वारकरी संप्रदायाच्या संदर्भात मात्र ही धारा अखंड प्रवाही राहिली. सातशे वर्षे उलटून गेली तरी हा प्रभाव आजही टिकून आहे. या संप्रदायाची धार्मिक व सामाजिक कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या सर्व प्रवाहात स्त्रियांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यांचीही समर्थ परंपरा निर्माण झालेली दिसते. संसारावर विजय मिळवून त्यापलीकडील शुद्ध निरपेक्ष निर्भेळ आनंद परमतत्त्वाच्या अनुभवातून घेता यावा अशी पारमार्थिक दृष्टी असलेल्या संतांनी एक समृद्ध विचारधारा महाराष्ट्रात रूजली, विकसित झाली. या संदर्भात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकारामांचे आध्यात्मिक कार्य सर्वश्रुतच आहे. मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई या संत कवयित्री या तीन महान संतांच्या निकट होत्या. त्यांच्या रचनांवर, तत्त्वचिंतनावर व व्यक्तिमत्वावर या संतांच्या व्यक्तिमत्वांचा प्रभाव निश्चितच होता. याचा प्रत्यय त्यांच्या चरित्रातूनही येतो. सोयराबाई, निर्मळा, भागू आणि कान्होपात्रा यांचे व्यक्तिमत्वही या परंपरेतच विकसित झालेले दिसते. त्यांची अभंगरचना ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची स्वतंत्र ओळख होते.

ज्ञानदेव, नामदेवांच्या काळात उदयाला आलेल्या संत कवयित्री या वेगवेगळ्या जातीजमातीतून, वेगवेगळ्या व्यवसायातून आलेल्या होत्या. या सर्वच जनसामान्यांच्या प्रतिनिधी होत्या. म्हणूनच त्यांच्या कार्याला वेगळेच महत्त्व प्राप्त होते. या प्रत्येकीचा जीवनवृत्तांत हा बिकट होता. वेगवेगळ्या प्रकारचे दु:ख त्या सोसत होत्या. अनेक वाईट अनुभव त्यांच्या वाट्यास आले. उपेक्षित जीवनाचे चटके तर या सर्वांनाच सोसावे लागले. पण या स्थितीतही त्यांनी भक्तीची कास सोडली नाही. किंबहुना भक्ती व विरक्ती हेच त्यांच्या जीवनाचे सार होते. या अंधारयुगात या कालखंडाने अनेक संत कवयित्रींना लिहिते केले. मराठी संस्कृतीच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व घटना आहे. भारतीय कवितेच्या क्षेत्रातील त्यांचे हे योगदान अपूर्व आहे. त्यांच्या आंतरिक स्वातंत्र्याचा आविष्कार करण्याचे सामर्थ्य त्यांना या भक्तिसंप्रदायातून मिळाले. या संतसज्जनांच्या परंपरेतून मिळाले हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या संतकवयित्रींची जी प्रभावळ वारकरी संप्रदायात निर्माण झाली. त्यातील एक तेजस्वी ज्योत म्हणजे कान्होपात्रा होय.

संत कान्होपात्रा - चरित्र

जन्मांतरीचे सुकृत आजीं फळासी आलें ।
म्हणोनी देखिले विठ्ठलचरण ।।१ ।।

अशी धन्यतेची भावना आपल्या अभंगरचनेतून कान्होपात्राने व्यक्त केली आहे. तिच्या पोळलेल्या जीवाला विठ्ठलचरणाशीच शांतता लाभलेली दिसते. तिच्या या मनोवस्थेतूनच तिचे हे धन्यतेचे उद्‌गार उमटले असावेत. तिचा एकूणच जीवनपट अत्यंत खडतर आहे. तिच्या या खडतर वाटेवर 'विठ्ठलचरण' हाच तिचा एकमेव आधार होता.

कान्होपात्रा ही मंगळवेढ्याला राहणाऱ्या शामा नायकिणीची मुलगी. तिच्या जन्माविषयी नेमकेपणे सांगणे कठीणच आहे. या संदर्भात मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील काही संदर्भ निश्चितच महत्त्वपूर्ण ठरतात. ''तिचा काळ अंदाजे १३९०/इ.स. १४६८ म्हणजे पंधराव्या शतकाचा सांगितला जातो.''[१] असा उल्लेख डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या श्रीसकलसंतगाथेत आहे. महाराष्ट्र सारस्वत (खंड २) या ग्रंथातसुद्धा तिचा जन्मकाळ निश्चितपणे सांगितलेला नाही. महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणीत डॉ. रा. गो. तुळपुळे लिहितात - ''जिचा उल्लेख करणे अवश्य आहे अशी या कालखंडातील एक संतकवयित्री म्हणजे कान्हुपात्रा ही होय. हिच्या जन्म-मृत्यूचे शक ठाऊक नाहीत; पण ती १४ व्या शतकाचे अखेरीस होऊन गेली असावी असा समज आहे.'[२] तिच्या जन्मशका संदर्भातील संदिग्धता ही अनेक अभ्यासकांच्या विवेचनातून दिसून येते. या संदर्भात डॉ. अ. ना. देशपांडे यांची भूमिका पाहू. ते लिहितात - ''कान्होपात्रा चवदाव्या शतकाच्या अखेरीस झाली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे आणि इकडे तिचे

अभंग चाळून पहावे तर असे दिसते की,

''शिव तो निवृत्ति विष्णु ज्ञानदेव पाही ।।
सोपान तो ब्रह्मा मूळ माया मुक्ताई ।।''

या अभंगाच्या शेवटच्या चरणात,

''धन्य कान्हुपात्रा आजी झाली भाग्याची ।
भेटी झाली ज्ञानदेवाची म्हणुनिया ।।'' असे म्हणून ज्ञानदेवांची भेट झाल्याबद्दल तिने कृतार्थतापूर्वक आनंद व्यक्त केलेला आहे. ज्ञानदेवांची ही भेट कल्पनेतील समजावी काय? किंबहुना –

''आलंकापूरी पुण्यठाव । तेथ समाधी ज्ञानदेवा ।।''

या कान्होपात्रेच्या अभंगावरून ही तिची साक्षात ज्ञानदेवांची भेट नसून ज्ञानदेवांच्या समाधीची भेट आहे असा तिच्या म्हणण्याचा अर्थ लावावा काय? चोखोबांनी सुद्धा आपल्या अभंगात कान्होपात्रेचा उल्लेख केलेला आहे. त्याची वाट काय? काही असो, एवढे मात्र तिच्या अभंगावरून निश्चितपणे म्हणता येते की तिची भक्ती अनन्यसाधारण कोटीतील, भक्तीसाठी तिने प्रत्यक्ष प्राणांची आहुती दिली.'' या सर्वच संदर्भांचा आधार घेतला तरी कान्होपात्रेच्या जन्माविषयी अथवा तिच्या कालखंडाविषयी कुठलाही ठोस निष्कर्ष काढता येत नाही. चौदाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात तिचा जन्म झाला असावा असा अंदाजच फक्त येथे व्यक्त करता येतो.

कान्होपात्रा ही एका गणिकेच्या पोटी जन्माला आली होती. कान्होपात्रा या तिच्या नावातील 'पात्रा' हा शब्द 'गणिका' या अर्थाने वापरला आहे. कारण यादवकालीन मराठी भाषेत 'पात्रा' हे व्यवसायदर्शक विशेषण 'गणिका' या अर्थानेच वापरले जात होते. कान्होपात्रा ही अत्यंत सुंदर होती. तिच्या लावण्याची ख्याती सर्वत्र पसरली होती. आपल्या मुलीने एखाद्या राजाचा अथवा धनिकाचा आश्रय मिळवावा व आपले आयुष्य सुखात व्यतीत करावे असे तिच्या आईला म्हणजे शामा नायकिणीला वाटे. परंतु कान्होपात्राने हे जगणे नाकारले. गायन–नर्तन यांच्या आधारे व शरीरसौंदर्याच्या बळावर जगण्यापेक्षा ईश्वरभक्तीचा मार्ग निवडणे तिला इष्ट वाटले व हेच तिच्या चरित्राचे वैशिष्ट्य ठरले. क्षणभंगुर लौकिक सुखाचा त्याग करून ती अलौकिक असलेल्या शाश्वत सुखाच्या मागे लागली. परमेश्वरभेटीच्या अनावर ओढीने ती व्याकूळ झाली. अर्थात तिच्या या परिवर्तनाच्या मागे असलेल्या कारणांची मीमांसा पुराव्यांअभावी करणे अशक्य आहे. तिच्या अभंगरचनेतूनही याचा शोध घेणे अशक्य ठरते.

डॉ. र. रा. गोसावी यांनी कान्होपात्राच्या चरित्राचे विवेचन श्रीसकलसंतगाथेतून केले आहे. ''बेदरच्या बादशहाचे सैनिक आपल्याला न्यायला आले आहेत असे समजल्यावर कान्होपात्राने पंढरीच्या विठ्ठलाच्या पायापाशी प्राणार्पण केले.'' असा संदर्भ डॉ. विलास खोले यांच्या 'भक्तिशोभा' या पुस्तकातील 'अनंत लावण्याची शोभा' या लेखातूनही मिळतो.

मंगळवेढ्याला आलेल्या वारकरी संप्रदायाच्या भक्तांना पाहून कान्होपात्रा हरखून जाते. भजन कीर्तनात रंगलेले, टाळ–मृदुंगाच्या गजरात भक्तिरसात न्हालेले वारकरी बघून कान्होपात्रेचे भान हरपते. ''मी तुमच्या सोबत आले तर तेथील समचरण विठ्ठल माझा स्वीकार करेल का?'' असा प्रश्न कान्होपात्रा भक्तांना विचारते. ''येथे कोणताही जातिभेद नाही अथवा स्त्री–पुरुष भेदही नाही. येथे सर्व भक्त म्हणून जमतात. आमचा देव फक्त भावाचा भुकेला आहे'' असे वारकऱ्यांनी सांगताच कान्होपात्रा मंगळवेढ्याचा निरोप घेते व वारकऱ्यांच्या साथीने पंढरपुरास येते. विठ्ठलचरणी रममाण होते. डोळे भरून विठ्ठलदर्शन घेते.

''धन्य चरण माझे या पंथी चालिले ।
म्हणून देखिले विठ्ठलचरण''

ही तिची भावस्थिती तिच्या ओवीतूनही लक्षात येते.

भक्तिरसात रंगलेल्या कान्होपात्रेच्या जीवनात पुन्हा अस्थिरता निर्माण होते. तिचे असामान्य लावण्यच तिचा शत्रू बनते. तिच्या अप्रतिम सौंदर्याची कीर्ती बिदरच्या बादशहाच्या कानी पडते. तिच्या प्राप्तीसाठी बादशहाचे मन सैरभैर होते. तिला आणण्यासाठी आपल्या शिपायांना तो पंढरपूरला पाठवतो. हे वृत्त कान्होपात्राला समजताच ती मंदिरात येऊन विठ्ठलापाशी एकच आकांत मांडते. **''वर्म वैरीयाचे हाती देऊ नको श्रीपती''** अशी विनवणी ती करते. विठ्ठलाचा अविरत धावा करते.

''अगा विष्णु तू गोविंदा ।।
अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखी आता ।।''

तिच्या या अभंगातून तिची अगतिकता, प्राणांतिक वेदना काळजाला भिडते. पंढरीरायाचे दर्शन घेऊन येते असे ती शिपायांना सांगते व मंदिरात येऊन आपला प्राण विठ्ठलचरणी समर्पित करते. तिची प्राणज्योत विठ्ठलचरणी विलीन होते. बादशहाच्या पापी हातांचा स्पर्शही नको म्हणून ती देहत्याग करते. देहत्याग करताना विठुमाऊलीने आपल्याला जवळ करावे म्हणून कारुण्यपूर्ण शब्दात ती विठ्ठलाची विनवणी करते –

''पुरविली पाठ न सोडी खळ । अधम चांडाळ पापराशी ।
वरिता नायके दुष्ट दुराचार । काय करू विचार पांडुरंगे ।।
तू माय माऊली जगाची जननी । म्हणवोनी मिठी चरणी घालीतसे ।।
विनवी कान्होपात्रा जोडोनिया हात । आता देहअंतसमय आला ।।''

या तिच्या अभंगातून तिची असहाय्य स्थिती व त्यातून स्वत:ला सोडविण्यासाठी चाललेला संघर्ष स्पष्ट दिसतो. अखेर आपले स्वत्व व सत्त्व राखत ती आपल्या प्राणांची आहुती देते, ईश्वरचरणी विलीन होते. तिचा हा विदारक अंत तत्कालीन स्त्री शूद्रांवर होणाऱ्या अन्यायाचे दर्शन घडवितो. तसेच समाजाच्या अनाचाराचे स्वरूपही दर्शवितो. आपल्या काव्यरचनेतून कान्होपात्रेने विषयासक्त पुरुषांचा निषेध केला आहे –

विषयाचे संगती । नाश पावले निश्चिती ।।१ ।।
भगें पडली इंद्राला । भस्मासूर भस्म झाला ।।२ ।।
चंद्रा लागला कलंक । गुरुपत्नीस रतला देख ।।३ ।।
रावण मुकला प्राणासी । कान्होपात्रा म्हणे दासी ।।४ ।।

पुराणातील अनेक दाखले देत कान्होपात्रेने या विषयलंपट पुरुषांची अधोगती स्पष्ट केली आहे. पण अखेर याच पुरुषवृत्तीने तिचा घात केला. तिची ही शोकांतिका स्त्री–जीवनाचे प्रारब्ध दर्शविते.

बादशहाच्या वासनेचा बळी ठरलेली कान्होपात्रा जेव्हा मरणाला कवटाळते तेव्हा तिचे हे बलिदान जिवाला चटका लावून जाते.

कान्होपात्राची अभंगरचना

कान्होपात्रा ही प्रतिभावंत संत कवयित्री होती. तिच्या अकाली झालेल्या अंताने मध्ययुगीन मराठी भक्तिसाहित्याची मोठी हानी झाली. आज तिचे केवळ २७ अभंगच उपलब्ध आहेत. तिला जर दीर्घायुष्य लाभले असते तर मराठी साहित्यात लक्षणीय भर पडली असती. ''आवटे गाथेतील २३ आणि ज. र. आजगावकरांनी 'महाराष्ट्र संतकवयित्री' या पुस्तकात दिलेले ४ असे फक्त २७ च अभंग कान्होपात्रेच्या नावावर आहेत.''[१] असा उल्लेख अ. ना. देशपांडे यांनी केला आहे. तर डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या अभंगगाथेत तिच्या २३ अभंगांचीच नोंद केलेली आहे.

तिची अभंगरचना अल्प असली तरी त्यात वैविध्य आहे. मुख्य म्हणजे या अभंगातून तिच्या मनातील संमिश्र भावनांचा कल्लोळ जाणून घेता येतो. कधी लागलेला आर्त स्वर तर कधी विठ्ठलभक्तीने आनंदून गेलेले मन तिच्या अभंगांचा विषय झाले आहे. कधी हे अभंग कारुण्याने ओथंबलेले आहेत तर कधी ते नामसंकीर्तनाचे गुणगान करताहेत.

कान्होपात्रेच्या अभंगांचा वेध घेताना प्रथमत: त्यात असलेली विठ्ठलभेटीची अनावर ओढ लक्षात येते.

'माझ्या जीवींचे जीवन । तो विठ्ठल निधान' या अभंगाच्या शेवटी ती म्हणते,

''**भेटा दयेच्या सागरा । विनवितसे कान्होपात्रा ।।**'' किंवा

''**माझे माहेर पंढरी । सुखे नांदु भीमातीरी ।।१ ।।**
येथे आहे मायबाप । हरे ताप दरुशने ।।२ ।।

या तिच्या अभंगातून विठ्ठल दर्शनासाठी कासाविस झालेली कान्होपात्रा निदर्शनास येते.

विठ्ठलनामावर तिची अढळ श्रद्धा आहे. याचा प्रत्ययही तिच्या काव्यातून येतो.

''**नामे दोष जळती । नामे पापी उद्धारती ।।**'' किंवा

''**ज्याचे घेता मुखी नाम । धाकी पडे काळ यम ।।**
ऐसी नामाची थोरी । उद्धरिले दुराचारी ।।''

अशी विठ्ठलनामाची महती तिने या आपल्या काव्यविश्वातून समर्थपणे सांगितली आहे. या नामाची अनुभूतीही तिने या अभंगरचनेतून साकारली आहे. ती म्हणते –

योग याग तपें करिता भागली । तीच ही माऊली विटेवरी ।।१ ।।
न येई ध्यानीं साधिता साधनीं । भक्तासी निर्वाणी धांवतसे ।।२ ।।
चारी वेद साही शास्त्रे शिणली । कान्होपात्रा लाधली प्रेमसुखे ।।३ ।।

या विठ्ठल माऊलीच्या कृपेस आपण पात्र झालो आहोत. आपल्या भक्तांच्या मदतीला ही माऊली त्वरित येते आहे असा आपला अनुभवही ती अभंगातून व्यक्त करते आहे.

''**आपुलिया नामासाठी । धावे संकटी लवलाहे ।।**
घ्यारे घ्यारे अनुभव । कान्होपात्रेचा माधव ।।

आपल्या या माधवाची, त्याच्या नामाची अनुभूती सर्वांनी घ्यावी असा आग्रह ती करताना दिसते.

आपल्या मुक्तीची वाट हीच आहे याची खात्री कान्होपात्रेला होती म्हणून अनन्यभावाने ती विठ्ठलाला शरण गेली आहे. विठ्ठलापुढे नतमस्तक झाली आहे. गणिकेच्या कुळात जन्माला आलेल्या आपल्यासारख्या स्त्रीचा उद्धार येथेच होईल हा भाव तिच्या अभंगातून प्रकट होतो –

''**दीनपतित अन्यायी । शरण आले विठाबाई ।।१ ।।**
मी तो आहे यातीहीन । नकळे काही आचरण ।।२ ।।
मज अधिकार नाहीं । भेटी देई विठाबाई ।।३ ।।
ठाव देई चरणापाशीं । तुझी कान्होपात्रादासी ।।४ ।।

या तिच्या अभंगातून तिचा काकुळतीचा स्वर जाणवतो. तिची ही याचना कमी पडते की काय असे वाटून ती अनेक उदाहरणे देते व या सगळ्यांच्या मदतीला जर तू धावतेस तर माझ्यापण मदतीला ये अशी आर्त साद ती ईश्वराला घालते.

''**अंबऋषी साठी । जन्म घेतसे जगजेठी ।।१ ।।**
वागवी भक्तांचा आभार । ऋणी झाला निरंतर ।।२ ।।
अर्जुनाचे रथी बैसे । त्यांचे घोडे धूतसे ।।३ ।।
लाज सांडी ऋषीकेशी । कान्होपात्रा तुझी दासी ।।४ ।।

तिची ही आर्त साद ऐकून परमेश्वरही द्रवतो, तिच्या भेटीस येतो. जन्मजन्मांतराचे सुकृत फळाला येते आणि विठ्ठल भेटीची तिची आस पूर्ण होते.

''**कनवाळू कृपाळू तू माय माऊली ।**
धावुनिया भेटली विठाबाई ।।१ ।।
निवारिली विघ्ने दुरिते पळाली ।।

या अभंगातून कान्होपात्रेची बदललेली मनस्थिती स्पष्ट होते. मनावरचे मळभ क्षणात नाहीसे होते. निराशेचा, उपेक्षेचा सूर लोप पावतो व अत्यानंद तिच्या शब्दाशब्दातून पाझरू लागतो.

''**येऊनिया देहासी धन्य झाले । म्हणूनी देखिले विठ्ठलचरण ।।**
घाली गर्भवास कान्होपात्रा म्हणे ।।

तिला आलेल्या अनुभूतीचा साक्षात्काराचा उच्चांक या अभंगातून तिने यथार्थ शब्दातून व्यक्त केला आहे.

गुणसंपन्न काव्यरचना

कान्होपात्रेच्या अभंगरचनेचा वेध घेत असताना त्यातील अनेक गुणवैशिष्ट्ये लक्षात येतात. मुळातच कान्होपात्रेचा पिंड हा भावुक आहे. यामुळे एकूणच तिची कविता ही भावकविता म्हणूनच ओळखली जाते. सरळ, साधी भाषा, अर्थसुलभता ही तिच्या रचनांची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरतात. या वैशिष्ट्यांमुळे तिची अभंगरचना सामान्यांपर्यंत जाऊन पोहोचली आहे.

रचनेची सहजस्फूर्तता असल्याने ही भावकविता अत्यंत स्वाभाविक वाटते. ''माझ्या जीवींचे जीवन। तो विठ्ठल निधान'' हा विठ्ठलविषयक आपुलकीचा भाव तिने आपल्या रचनेतून अत्यंत

सहजपणे गुंफलेला दिसतो. भावनेची आर्तता या सगळ्याच रचनांमधून जाणवते. कारुण्य व आर्तता हे तिच्या काव्याचे अविभाज्य अंग आहे. ''कान्होपात्रा ही ईश्वराला सर्वभावे शरण गेलेली एक श्रेष्ठ भक्त आहे. आणि भक्ती व करुण रसांची उत्कट, जिवंत प्रतीती आपल्या वाणीतून प्रकट करू शकणारी ती एक प्रभावी कवयित्री आहे.''[३] असे उद्गार अ. ना. देशपांडे यांनीदेखील काढले आहेत. त्यांच्या उद्गारांचा प्रत्यय तिच्या या काव्यातूनही येतो –

नको देवराया अंत पाहू आता । प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ।।
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे हो जननी विठाबाई ।।
मोकलोनी आस जाहले उदास । घेई कान्होपात्रेस ह्रदयात ।।

तिचा अभंग अत्यंत ह्रदयद्रावक आहे. दु:खाची परिसीमा झालेली असताना अंत:करणाच्या गाभ्यातून उमटलेला तिचा आर्त स्वर वाचणाऱ्याच्या ह्रदयाला विदीर्ण करून टाकतो.

''जीवींचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।
सावळे डोळसे करुणा येऊदे काही ।''

ही रचना असो, किंवा **''अगा वैकुंठीच्या राया ।।''** ही रचना असो यातून तिची विकल अवस्था लक्षात येते. तिच्या अभंगातील भावसौंदर्य डॉ.विलास खोले यांनी विस्तृतपणे उलगडून दाखविले आहे. ते लिहितात – ''अतिशय सहजसुबोध, भावोत्कट रचनेचे उदाहरण म्हणून कान्होपात्रेच्या – ''अगा वैकुंठीच्या राया'चा उल्लेख करता येतो.

''अगा वैकुंठीच्या राया । अगा विठ्ठल सखया ।।
अगा नारायणा । अगा वासुदेवनंदना ।।
अगा पुंडलिकवरदा । अगा विष्णु तू गोविंदा ।।
अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखी आता ।।''

या अभंगात केवळ 'विठ्ठल सखया' नारायणा, वासुदेवनंदना, पुंडलिकवरदा अशी संबोधने एकापाठोपाठ योजून कवयित्रीने स्वत:चा विठ्ठलाशी असणारा सख्यसंबंध प्रस्थापित केला आहे. आणि त्यानंतर ''कान्होपात्रा राखी आता'' असे मागणे मागितले आहे. आपण आजवर अलक्षित राहिलो या भावनेचा प्रभाव येथे इतका की वारंवार हाका मारून कान्होपात्रा 'माधवांचे लक्ष स्वत:कडे वेधून घेत आहे. येथील प्रत्येक संबोधन हे जणू ईश्वराचे दार ठोठावते आहे. ही संबोधने माधवांच्या समर्थपणाचा ध्वनी व्यक्त करतात तर 'राखी आता' मधून निर्मन प्रार्थनेचा विनीत स्वर आळवला जातो. आकारान्त रचनेची परिणामकारकता वाढविण्याचे कार्य अभंगातील एकात्म उच्चारलयीने साधले आहे आणि अभंगाचे भावनिक अंग परिपुष्ठ करण्याचे कार्य 'अगा'ने पार पाडले आहे.''[४]

शब्दयोजनेतील लयबद्धता, आवर्तनशीलता ही या अभंगरचनेचे नादमाधुर्य वाढवितात.

''जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले ।
म्हणोनी देखिले विठ्ठलचरण ।।''

या अभंगात ''म्हणोनी देखिले विठ्ठलचरण'' या ओळींची पुनरावृत्ती होते व त्यात अत्यंत स्वाभाविकपणे नादसौंदर्य निर्माण होते. ''आमुतें पंढरीनाथे न विसरीजे'' या ओळीही तिच्या या अभंगात तीन वेळा लिहिल्या आहेत. थोडक्यात या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीमुळे तिच्या काव्यरचनेतून भावमाधुर्यासोबतच नादमाधुर्याचीही अनुभूती येते.

एकूणच तिची रचना ही तिच्या मनातील श्रद्धेची, भावनेची उत्स्फूर्त अभिव्यक्ती असून समर्पक संदर्भाचीही जोड या अभंगरचनेला लाभली आहे. अजामेळा, पुंडलिक, अंबऋषी, वाल्मिकी, इंद्र, रावण असे अनेक संदर्भ तिच्या काव्यरचनेत येताना दिसतात. ज्ञानदेव, पुंडलिक, निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई यांच्याबद्दलही कान्होपात्रा आपल्या अभंगरचनेतून आदरभाव व्यक्त करते. उदा. **धन्य धन्य धन्य निवृत्तिराया । धन्य ज्ञानदेव सोपान सखया ।।** असे गौरवपर अभंगही तिच्या रचनेत आढळतात. ''सखया'' हा शब्द ही तिची या भावंडांविषयी असलेली भावनिक जवळीक दर्शविणाराच आहे.

कान्होपात्राचे अंतरंग तिच्या भावसंपन्न रचनांतून उलगडत जाते. संख्येने कमी असले तरी तिच्या अभंगरचनेत वेगळेपणा आहे. आत्मप्रत्ययातून प्रकट झालेल्या या रचनांमधून भगवत्‌भेटीचा ध्यास, पारमार्थिक ओढ सहज प्रकट होते. या रचनांच्या माध्यमातून तत्त्वज्ञान सुसूत्रपणे मांडले गेलेले नसले तरी वारकरी संप्रदायातील अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रभाव तिच्यावर असल्याचे लक्षात येते. परंपरेने मनावर ठसलेला नामसंकीर्तनाचा महिमाही तिच्या अभंगरचनेचा सहजोद्‌गार ठरतो. **''कान्होपात्रा तुझी दासी''** या तिच्या नाममुद्रेतून तिचा विनम्रभाव लक्षात येतो. 'मी तो आहे यातीहीन' ही तिची खंत येथे व्यक्त होत असली तरी कान्होपात्रा यातून मार्ग काढत आपली पारमार्थिक उन्नती साधत जाते. आपल्या लौकिक जीवनाच्या मर्यादा ओलांडून संतकवयित्रींच्या समृद्ध परंपरेचा एक चिरंतन भाग होऊन जाते. हेच तिच्या जीवनाचे, तिच्या अभंगरचनेचे असाधारण वैशिष्ट्य ठरते.

डॉ. संस्कृती आवलगावकर
१०४, सॅण्डलवुड, डी. पी. रोड, औंध, पुणे ४११००७.
मोबाईल : ९८८१४७०३००

संदर्भग्रंथ :

१) श्रीसकलसंत गाथा, खंड पहिला, संपादक : डॉ. र. रा. गोसावी, सारथी प्रकाशन, पुणे पृ.क्र. ७९९
२) महाराष्ट्र सारस्वत – खंड १, वि. ल. भावे, पुरवणी शं. गो. तुळपुळे, पॉप्युलर प्रकाशन (मुंबई) पृ.क्र. ७६१
३) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे. पृ.क्र. १६३
४) भक्तिशोभा, डॉ. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ.क्र. १२९
५) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, अ.ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे पृ.क्र. १६४
६) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, अ.ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे पृ.क्र. १६४-१६५
७) भक्तिशोभा, डॉ. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ.क्र. १४६



संत कान्होपात्राचे अभंग

सौ. सुनंदा शाळिग्राम

एम.ए. (मराठी)

स्वामी सत्यदेवानंद यांच्या शिष्या, श्रीगीता, श्रीज्ञानेश्वरी व भागवत निरूपणसेवा, प्रवचनकार

महाराष्ट्र संतांची भूमी आहे. इथे केवळ संत सत्पुरुषच होऊन गेले असे नाही, तर संत स्त्रियाही कमी नाहीत. संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सखू अशा अनेक संत भगिनीमंडळात 'संत कान्होपात्रा' विजेसारखी चमकून गेली. तिचा ठसा अल्पकाळ जरी उमटला असला तरी सखोल होता. त्यामुळे आजही आपण तिला विसरू शकत नाही. आपल्या मोजक्याच म्हणजे तेवीस अभंगांच्या रूपाने कान्होपात्रा आजही 'परमेश्वराला आर्त हाक' घालीत आहे. विठ्ठलाला कुडी अर्पण करून आजही ती अमर झाली आहे. भगवंतानं रूपसंपन्न कुडी दिली. ती त्यालाच अर्पण करण्याचं शहाणपण कान्होपात्रेनं दाखविलं.

'त्वदीयं वस्तु गोविंद,
तुभ्यमेव समर्पयेत् ।'

मंगळवेढ्याच्या शामा गणिकेची ही मुलगी. नृत्य-गायनात निष्णात. आपल्या रूपसौंदर्यानं सर्वांना भुरळ पाडणारी! पण तिला भुरळ पडली, ती पंढरीच्या पांडुरंगाची! 'तो तुझ्यापेक्षाही सुकुमार आहे' असे वारकऱ्यांनी सांगताच तिला त्याच्या दर्शनाची ओढ वाटू लागली. एका अभंगात ती म्हणते,

''दीन पतित अन्यायी ।
शरण आल्ये विठाबाई ।।
मी तो आहे यातीहीन ।
नकळे काही आचरण ।।
मज अधिकार नाही ।
भेटी देई विठाबाई ।।
ठाव देई चरणापाशी ।
तुझी कान्होपात्रा दासी ।।''

वारकऱ्यांबरोबर कान्होपात्रा पंढरीला आली. विठ्ठलचरणांना तिनं हात लावला आणि काय आश्चर्य! माउलीच्या चरणांना खळी पडली, ती अद्यापही आहे. कान्होपात्रेची बोटे चरणांत रूतली. पांडुरंगाच्या सुकुमारपणाची साक्ष तिला पटली. धन्यतेचे उद्गार काढत ती म्हणाली,

''जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आले ।
म्हणोनि देखिले विठ्ठलचरण ।
धन्य भाग्य आजी डोळिया लाधले ।
म्हणुनि देखिले विठ्ठलचरण ।
धन्य चरण माझे या पंथी चालिले ।
म्हणुनि देखिले विठ्ठलचरण ।
येउनिया देहासी धन्य झाले ।
म्हणुनि देखिले विठ्ठलचरण ।
घाली गर्भवासा कान्होपात्रा म्हणे ।
जन्मोजन्मी देखेन विठ्ठलचरण ।।

देवाचे चरणांबुज पाहून कान्होपात्रेची अवस्था कशी झाली? ती देहभान विसरली. तिची तहानभूक हरपली. ती सांगते -

''सकळही सुरवर येथेचि लाधले ।
देवाचे देखिले चरणांबुज ।।
हरली ती भूक, तहान निमाली ।
संतांची देखिली चरणांबुजे ।।
कीर्तनाचे रंगी आनंदे नाचता ।
कान्होपात्रा चित्ता समाधान ।।''

पंढरीत तिला संतही भेटले. त्यांच्या कीर्तनात ती रंगू लागली. ती परत मंगळवेढ्याला गेलीच नाही. पंढरीतच राहिली. तिची ही अनन्यता अलौकिक होती. एकदा तिनं निश्चय केला, तो शेवटास नेला. भक्ताला आवश्यक असा 'कृतनिश्चय' तिच्यापाशी होता. आतून ती बळकट होती. कशामुळे विठ्ठलाशी प्रेमरज्जूंनी बांधल्यामुळे.

पंढरीत विसावलेली कान्होपात्रा म्हणते -

''माझे माहेर पंढरी । सुखे नांदु भीमातीरी ।
येथे आहे मायबाप । हरे ताप दरुशने ।।
निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरीची ।
कैशी विटेवरी शोभली । पाहुनी कान्होपात्रा धाली ।।

आता ती नामात रंगू लागली. स्वतः नाम घेता घेता म्हणू लागली-

''घ्यारे घ्यारे मुखी नाम । अंतरी धरोनिया प्रेम ।।

माझा आहे भोळा बाप ।
घेतो ताप हरोनी ।।
आपुलिया नामासाठी । धावे संकटी लवलाहे ।
घ्यारे अनुभव । कान्होपात्रेचा माधव ।

कान्होपात्रा आता कीर्तन करू लागली.

''ज्ञान वैराग्य भजली न तुमते ।
आमुते पंढरीनाथे न विसरीजे ।
दंभ प्रपंच भजली न तुमते ।
आमुते पंढरीनाथे न विसरिजे ।
विनवी कान्होपात्रा पंढरीरायाते ।
आमुते पंढरीनाथे न विसरिजे ।।''

कान्होपात्रा पंढरीरायाची थोरवी आता गाऊ लागली –

''सर्व सुखाचे जे निजसुखाचे सार गे माय ।
तो हा पंढरीराय विटेवरी ।।
सकल साराचे सार गे माय ।
तो हा पंढरीराय विटेवरी ।।
सर्व साधनांचे जे का निजसाधन गे माय
तो हा पंढरीराय विटेवरी ।।
जे का जीवांचे जीवन, कान्होपात्राचे निजधन गे माय ।
तो हा पंढरीराय विटेवरी ।।''

पण भक्तीत रंगलेली कान्होपात्रा समाजाला फार काळ पाहवली नाही. रूपसंपन्न गणिका आणि भक्ती करते? बिदरच्या बादशहाने तिला धरून आणण्यासाठी शिपाई पाठवले. महाद्वाराशी शिपाई येताच कान्होपात्रा गाभाऱ्यात धावली. आर्तपणे विठ्ठलाला विनवू लागली

''जीवीचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।
आला अपवाद याती संबंध लौकिक पाही ।
दीनोद्धार ऐसे वेदशास्त्रे गर्जती पाही ।
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।
शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळा पाही ।
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।''

शरणागती म्हणजे काय हे कान्होपात्रेलाच समजले. संत ज्ञानदेव विचारतात, ''मज शरण रिगिजे आणि जीवत्वे असिजे? धिग् बोली या! न लगे प्रज्ञा केवी?''

कान्होपात्रा विठ्ठलाला अशी शरण गेली की जीवत्वानंच काय, देहत्वानी राहिली नाही. ती विठ्ठलाला विचारते,

''पतित पावन म्हणविसी आधी ।
तरी का उपाधी भक्तामागे ।।
तुझे म्हणविता दुजे अंगसंग ।
उणेपणा सांग कोणाकडे ।।
सिंहाचे भातुके जंबुक पैं नेता ।
थोराचिया माथा लाज वाटे ।।
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे ।
करावा जतन ब्रीदासाठी ।।''

आता मात्र तिनं करुणार्द्र स्वरात आकांत मांडला. विठ्ठलाला तिने बजावले –

'पतित तू पावना ।
म्हणविसी नारायणा ।
तरी सांभाळी वचन ।
ब्रीद वागविसी जाण ।।'

आणि यानंतर तिनं टाहो फोडला भगवंताच्या नामाचा. त्याला आर्त हाका मारू लागली –

''अगा वैकुंठीच्या राया ।
अगा विठ्ठल सखया ।।
अगा नारायणा ।
अगा वसुदेवनंदना ।।
अगा पुंडलिकवरदा ।
अगा विष्णु तु गोविंदा ।।
अगा रखुमाईच्या कांता ।
कान्होपात्रा राखी आता ।।

द्रौपदीनेही भगवंताला अशाच हाका मारल्या होत्या. हा अभंग वाचताना त्याची आठवण होते. श्रीमद् भागवतात जशी कोंडून ठेवलेल्या ऋषिपत्नीची प्राणज्योत श्रीकृष्णात विलीन झाली. वृक्षातळी सर्वांनी ती पाहिली, तशीच कान्होपात्रेची प्राणज्योत विठ्ठलमूर्तीत विलीन झालेली बडव्यांनी पाहिली. 'धन्य, धन्य' उद्गार आले. कान्होपात्रा पांडुरंगाशी एकरूप झाली. देहाच्या मर्यादा ओलांडून मृत्यूवर मात करून भक्तिप्रेमाने भगवंताला असं भेटली की पुन्हा परतणं नाही! आजही अभंगातून तिनं फोडलेला टाहो आपलं हृदय विदीर्ण करतो. आपल्यालाही विठ्ठलाची ओढ लावतो –

''कनवाळु कृपाळू तू माय माऊली ।
धावुनिया भेटलो विठाबाई ।।
निवारिली विघ्ने दुरिते पळाली ।
जोडुनिया कर विठाई विनविली ।।
शरण कान्होपात्रा चरणी निमाली ।
धावोनिया भेटली विठाबाई ।।''

धन्य ती कान्होपात्रा!

सौ. सुनंदा शाळिग्राम
'विश्वनाथ स्मृति' फ्लॅट नं. ३,
दत्तवाडी पोलीस चौकीसमोरील लेन, पुणे ४११०३०.
फोन : २४३२४७५०



गांवदासी ? नव्हे 'देव'दासी

सौ. सुनिता नागपूरकर

एम्.ए.बी.एड., निवृत्त शिक्षिका, उदयाचल स्कूलस, विक्रोळी

६३ पुस्तके प्रकाशित, १२ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर, विविध वृत्तपत्रांतून व मासिकांतून लेखन

काही व्यक्ती जन्माला येतात त्या वैराग्याचं बोट धरून. त्यांच्यावर षडरिपुंचा अजिबात प्रभाव पडत नाही. भक्तीच्या पदपथावरून त्यांची वाटचाल सुखेनैव चालू असते. त्यांच्या मार्गात असंख्य अडचणींचे डोंगर येवोत, वाट काट्याकुट्यांनी भरलेली असो, खाचखळग्यांनी अडवलेली असो नाहीतर विखारी-वैषयिक नजरांनी घायाळ करणारी असो ते सन्मार्गाचा कोणत्याही परिस्थितीत त्याग करीत नाहीत. अशा थोर महात्म्यांपैकी एक व्यक्ती म्हणजे कान्होपात्रा.

पंढरपूरच्या कुशीत विसावलेल्या दामाजी आणि चोख्याच्या वास्तव्यानं मंगल झालेल्या मंगळवेढ्यात कान्होपात्राचा जन्म झाला. तिची आई शामा गणिका होती. शामाच्या गळ्यातला गंधार आणि लावण्याची कळा घेऊनच कान्होपात्रा जन्माला आली. चिखलात कमळ उमलावं किंवा भक्तीच्या वेलीला सुकुमार असं फूल यावं असं कान्होपात्रेच्या दर्शनानं लोकांचं मत झालं.

गणिकेला कसली आलीय प्रतिष्ठा ? तिथं वासनांनी वखवखलेली भलीबुरी माणसं, आपली शारीरिक भूक भागवण्यासाठी येत. नायकिणीचं घर म्हणजे जणू पापाचं आगरच ! शामाचं घर अशा घरांपैकी एक, समाजानं निषिद्ध मानलेलं. या वातावरणातच कान्होपात्रा वाढली. लहानाची मोठी झाली.

गणिकेची कन्या. तिला वडिलांचा आधार नसणारच. पण शामाने कान्होपात्रेला वडिलांची उणीव कधीच भासू दिली नाही. तिला प्रत्येक गोष्ट मिळालीच पाहिजे आणि ती ही अत्युत्तम यावर शामाचा कटाक्ष असे. मग तो कपडा असो, दागिना असो नाहीतर एखादी वस्तू असो. या माणसांनी भरलेल्या दुनियेत शामालाही कान्होपात्रेशिवाय कोण होतं ? म्हणून ती सारं वात्सल्य, सारी माया, सारा जिव्हाळा कान्होपात्रेवर उधळून टाकी.

शामा कान्होपात्रेवर वेड्यासारखं प्रेम करायची हे खरं असलं तरी तिच्यामधली डोळस आई सतत जागृत असायची. लहानपणापासूनच शामानं तिला नृत्य-गायनाची संथा दिली होती. शामा सुरेखच होती. तिचं गाणं अप्रतिम होतं. नृत्यही तितकंच लोभस होतं. पण शामापेक्षा कान्होपात्रा प्रत्येक बाबतीत वरचढ होती.

रूपानं कान्होपात्रा अतिशय देखणी होती. लांबसडक केशसंभार, केतकीसारखा रंग, कमनीय बांधा, चंद्राकार चेहेरा, चाफेकळीसारखं नाक, डाळिंबी पातळ ओठ, चेहऱ्यावर विलक्षण गोडवा कायमचा वस्तीला.

विलक्षण गोड गळा. भरपूर रियाजानं त्याचं जतन केलेलं गाण्याची उत्तम जाण. जोडीला नृत्याचा सराव. परमेश्वरानं सारंच ऐश्वर्य कान्होपात्रेच्या कुडीत ओतलेलं. त्यामुळे तिची ख्याती आसमंतात पसरलेली. अशी गुणसंपन्न लावण्यवती कन्या पाहाणाऱ्याला चटका लावायची.

शामाच्या दृष्टीनं सारं उत्तम होतं पण एक गोष्ट मात्र चिंताजनक होती. सर्व सद्गुणांना गालबोट लावणारी गोष्ट म्हणजे तिचं विठ्ठलवेड. तिच्याजवळ एक सुरेख कृष्णमूर्ती होती. ती त्या मूर्तीला सजवायची. हार घालायची. त्याच्यापुढे गायची. अशावेळी ती अलौकिक सुखात न्हाऊन निघायची. फुलांचा खरा उपयोग देवांसाठी व्हावा असं तिला वाटायचं. शामाला वाटायचं. आपल्या धंद्याला हे देवाचं वेड घातकच की ! कारण शामा कान्होपात्रेला म्हातारपणीची काठी समजायची. पण कान्होपात्रा वेश्येच्या कुळावर अभंगांची नाममुद्रा कोरणार होती याचे काळाला भान नव्हते ; तर बिचाऱ्या शामाला कुठून असणार ?

कान्होपात्रा वयात यायला लागली तसं तिला हळूहळू सारं कळायला लागलं. आपलं समाजातलं स्थान, भोवतालचं घाणेरडं वातावरण, ढोंगी, भ्याड, भोगलोलुप समाजाचं मलीन मन भुलविणारं सौंदर्य, फसवे हावभाव, पोटाची भूक भागविण्यासाठी करावा लागणारा देहविक्रय. ज्या समाजासाठी हे सारं करायचं त्याच समाजानं आपल्याला प्रतिष्ठित जीवन जगण्यास दिलेला नकार. सारंच ओंगळ, किळसवाणं आणि उदासवाणं !

शामाला मात्र कान्होपात्रेच्या मनामध्ये चाललेल्या घालमेलीचा पत्ताच नव्हता. ती आपल्यासारखी हा धंदा पुढे चालवणार आणि आपल्यापेक्षा जास्त यशस्वी होणार असं गृहीत धरून चाललेली होती. त्या दृष्टीने तिच्यावर मेहनत घेत होती.

यमनसारखा सारे शुद्ध स्वर असलेला ताकदीचा राग. अत्यंत

तरल, नाजुक भावनेपासून विश्वाच्या अज्ञाताची गूढता पेलणाऱ्या या रागाचे खरे मर्म ओळखण्याइतकी कान्होपात्रा तयार झाली होती. एखाद्या शांत जलाशयातून टवटवीत कमलपुष्प अचानक वर यावं तसा तिच्या कंठातून आलेला तो मध्यसप्तकातला निकोप षड्ज ऐकून शामा चकित झाली आणि तिनं ठरवलं की यापुढे आपण हिला एखाद्या संगीतशिरोमणीकडे धडे घ्यायला पाठवायची.

मनात विचार यायचा अवकाश शामाने विजापूरच्या प्रसिद्ध संगीतशिरोमणी गिरिधारीचा पुत्र मुरारी यांना मंगळवेढ्याला यायची विनंती केली होती. कान्होपात्रेच्या देवदुर्लभ आवाजाची ख्याती विजापूरपर्यंत पोहोचलेली होती. ती मुरारीच्याही कानावर पडलेली. त्यामुळे ते मंगळवेढ्याला आले आणि त्यांनी कान्होपात्रेला आपले शिष्यत्व बहाल केले. वडिलांप्रमाणे मुरारी होते कृष्णभक्त. त्यामुळे कान्होपात्रेला खूप आनंद झाला. त्यांनी आपल्या शिष्येला कृष्णभक्तीची पदे, प्रार्थना, राधा-कृष्णाच्या प्रेमाची गंधित गाणी शिकवली. कान्होपात्रेची तयारी कितपत झालीय हे पाहण्यासाठी शामानं तिचं गाणं ऐकलं. कान्होपात्रेच्या कंठातील भक्तीरसाने ओथंबलेली गाणी ऐकून ती मुरारीला म्हणाली,

''ह्या कुठल्या चिजा शिकवल्यात कान्होपात्रेला? एकतरी चीज आमच्या धंद्याला अनुकूल आहे का? अमीर-उमरावांपुढे ही पोर काय भजनं म्हणणार?''

त्यावर ताडकन् मुरारीनं उत्तर दिलं,

''धंद्यासाठी गाणं शिकवणं ही कल्पनाही मला सहन होण्यासारखी नाही. आपण दुसरीकडे हिची शिकवणी लावू शकता.''

त्याक्षणी मुरारी निघून गेले. कारण ते कान्होपात्रेला नेहमी म्हणत,

''परमेश्वराने तुला संगीताचं वरदान देऊन पाठवलंय ते फक्त मनुष्यांकरता नाही तर परमेश्वरासाठीच आहे. ही गोष्ट लक्षात ठेव.''

कान्होपात्रेचं पूर्वसंचित बलवत्तर होतं म्हणून मुरारींसारख्या गान आणि ज्ञान-तपस्वीच्या सान्निध्यात ती आली. आणि तिच्या गाण्याला उच्छृंखलतेऐवजी गंगेचं संथ-खोलपण आणि पावित्र्याचा स्पर्श झाला आणि कान्होपात्रेनं आपलं सारं जीवन त्या परमात्म्याला समर्पित करण्याचा निर्णय घेतला. कान्होपात्रा मुळातच वैराग्य घेऊन जन्माला आली होती. गावदासी होण्याऐवजी देवदासी होण्याचा दृढसंकल्प तिनं केला.

संकल्प करणं सोपं असतं पण संकल्प आणि सिद्धी यामध्ये अडथळ्यांचे असंख्य डोंगर असतात. ते पार करणं महाकठीण असतं. पहिला अडथळा होता तो खुद्द कान्होपात्रेच्या आईचा. ती आईला म्हणाली, ''मीसुद्धा समाजाच्या भोगलालसेचं साधन व्हावं असं का तुला वाटतं? ज्या समाजानं तुझ्या देहाचा उकिरडा केला, तुला पतित ठरवलं. याच दुष्टचक्राचा मी एक भाग व्हावा असं तुला वाटतं? आई, वेळ पडली तर मी प्राणार्पण करीन. पण कुणाच्या भोगलालसेला मुळीच बळी पडणार नाही. मला माहिती आहे शरीराला पोट असतं पण पोटापेक्षा मनाची भूक केव्हाही मोठी असते. माझ्या मनाला पांडुरंगाची ओढ लागलीय. मी लौकिक जीवनाचा त्याग केलाय. आता त्या कर्दमात मला पुन्हा ओढू नकोस.''

कान्होपात्रेने सोळा श्रृंगार उतरविले. हातामध्ये टाळ चिपळ्या घेतल्या आणि चोखोबाच्या दिंडीबरोबर पंढरपूरला प्रयाण केले. अंगावरले मौल्यवान अलंकार कान्होपात्रेने उतरवले असले तरी रंभा, उर्वशीला लाजवणारे अनुपम रूप ती कसे लपविणार? एवढ्या मोठ्या केशसंपदेचं काय करणार? यौवनानं मुसमुसलेल्या तारुण्याला कुठं ठेवणार? या साऱ्यामुळे तिला हौसे, गवसे आणि नवसे यांपासून भरपूर त्रास झाला. पण कान्होपात्रेने तो त्रास मुळीच मनाला लावून घेतला नाही.

वारकरी बायकांच्या घोळक्यात सामील झालेली कान्होपात्रा, तिच्या गोड गळ्यामुळे बायकांमध्ये प्रिय झाली. तिच्याजवळ नव्हतं शिक्षण, नव्हता अनुभव, होता नामस्मरणाचा आधार आणि भजनाचं सुख. चारचौघींनी तिला आपल्यात सामावून घेतलं याचं समाधान. संतमहात्म्यांच्या सहवासात रमलेल्या कान्होपात्रेच्या मुखातून आपोआप शब्द घरंगळू लागले.

'हरली भूक, तहान निमाली। संतांची देखिली चरणांबुजे।।
कीर्तनाचे रंगी आनंदे नाचता। कान्होपात्रा-चित्ता समाधान।।

मजल दरमजल करीत पालखी निघालेली. एका गावात तिचा मुक्काम पडला. दिंडीमधले वारकरी आणि गावकरी उराउरी भेटले. हातपाय धुतले. धर्मशाळेत स्वयंपाक तयार होत होता. मदतीसाठी दिंडीतल्या स्त्रिया तिथं गेल्या. त्यांनी कान्होपात्रेलाही बरोबर घेतलं. भराभर जेवणं उरकली. रात्री देवळात कीर्तन झालं. त्यानंतर कीर्तनकाराच्या साथीदाराने ज्ञानेश्वरांच्या विरहिणी आळवायला सुरुवात केली.

धनु वाजे घुणघुण, वारा वाहे रुणझुणा।
भवतारकु हा कान्हा, वेगी भेटवा का।।

हरिनामाचा उच्चार करीत वारकऱ्यांनी पथाऱ्या पसरल्या. भल्या पहाटे दिंडीचा मुक्काम हलला. आता पुढचा टप्पा होता पंढरपूरचा. कान्होपात्रेला आता ओढ लागली होती त्या सावळ्या परब्रह्माची. कृष्णमेघासमान असणाऱ्या मोरपीस धारण करणाऱ्या मकरकुंडलधारी पांडुरंगाची.

पंढरपूर दृष्टीपथात आलं तशी कान्होपात्रेला एक वेगळीच चिंता सतावू लागली. तिचं मन म्हणू लागलं, ''मी घरादाराचा त्याग केला. सगेसोयरे सोडून परमेश्वराचाच भरवसा धरून इथं आले. तो पांडुरंग मला हृदयाशी धरील का? माझ्यासारख्या गणिकेच्या मुलीला तो आपली म्हणेल का?''

प्रश्न प्रश्न आणि प्रश्न! उत्तरं नसणारे प्रश्न. मग तिनं विचार करायचा सोडून दिला. सारा भार पांडुरंगावर सोडून ती निश्चिंत झाली आणि एकाएकी तिला जणू साक्षात्कार झाला. 'दीनांचा उद्धार करणारा तो पांडुरंग, दामाजीपंतांसाठी महाराचं रूप घेणारा पांडुरंग, पतितांना पावन करणारा पांडुरंग, शुद्ध मनानं आणि नाम घेणाऱ्या मुखानं त्याला शरण जाणाऱ्याला तो नक्कीच हृदयाशी धरील.'

कान्होपात्रा पांडुरंगासमोर उभी राहिली. आपल्या विशाल नेत्रात

तिनं ते सावळं परब्रह्म साठवून घेतलं आणि डोळे मिटून तिचं अधीर मन पांडुरंगाला विनवू लागलं.

जीवीचे जिवलगे माझे कृष्णाई, कान्हाई।
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही।।
शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळा पाही।
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही।।

जरा वेळानं तिनं डोळे उघडले. अनिमिष नेत्रांनी ती परत पांडुरंगाकडे पाहू लागली. करवतकाठी धोतर, दोन्ही हात कमरेवर, गळ्यामध्ये वैजयंतीमाळ, कानात मकरकुंडले, त्या सावळ्या सगुण रूपाकडे पाहता पाहता कान्होपात्रा भान विसरली. तिनं पाहिलं, सारा गाभारा कोटी कोटी सूर्यप्रभेने तळपत होता. तेजाने न्हाऊन निघालेल्या दिव्य झोताचा आपणही एक अंश आहोत असा तिला भास झाला. तिचे डोळे आपोआप मिटले. पापण्यांच्या शिंपल्यांमधून अश्रूंचे मोती ओघळू लागले. अवघा देह पांडुरंगमय झाला आणि हेच माझं परब्रह्म, हेच माझं माहेर नि सासर. हाच माझा सखा. माझा जीवीचा जिवलग, आणि हाच माझा नातलग. सगासोयरा. सर्व काही हाच पांडुरंग! असं कान्होपात्रेला वाटलं कान्होपात्रेच्या सर्व शरीरामधून अनाहत नाद झंकारू लागला

''माझे माहेर पंढरी। सुखे नांदू भीमातीरी।।
तेथे आहे मायबाप। हरे ताप दरूशने।।
निवारीली तळमळ चिंता। गेली व्यथा अंतरीची।।
कैशी विटेवरी शोभली। पाहुनी कान्होपात्रा घाली।।

कान्होपात्रेने ठरविले, आता आपण इथेच राहायचे. देवाची दासी व्हायचे. चंद्रभागेत स्नान करायचे. पांडुरंगाला प्रिय असणाऱ्या तुळशींचा दळदार हार करायचा. देवळात चालणाऱ्या भजन, कीर्तन, प्रवचनाचा श्रवणलाभ घ्यायचा. हातानं काम आणि मुखी पांडुरंगाचं नाम असा तिचा नित्यक्रम झाला.

कितीतरी दिवस झाले ही स्त्री पांडुरंगाच्या चरणी लीन झालीय. त्याचे नाव मुखात असते. सतत त्याचा धावा करते हे देवळातल्या पुजाऱ्यांनी (बडव्यांनी) पाहिलं आणि त्यांना करुणा आली. एका मठातल्या ओसरीवर त्यांनी तिला आसरा दिला. पांडुरंगासाठी रोज एवढामोठा नैवेद्य तयार व्हायचा. कान्होपात्रेला त्यातलाच थोडासा प्रसाद पत्रावळीवर दिला जायचा. कान्होपात्रा तो प्रसाद भक्षण करी. पांडुरंगाला आपली काळजी आहे. परमेश्वरानं आपल्या राहाण्याचा आणि भोजनाचा प्रश्न सोडविला म्हणून कान्होपात्रा धन्य झाली.

म्हणतात ना माणसामागोमाग त्याची भलीबुरी, कीर्ती-अपकीर्ती सावलीसारखी येते. कान्होपात्रेचंसुद्धा असंच झालं. ती गणिकेची कन्या आहे हे पंढरपूरला कळलं आणि लोकांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. लोकांनी तिला हरप्रकारे त्रास दिला, छळ केला. पण कान्होपात्रा जराही विचलित झाली नाही. कारण तिने नामाचा वसा घेतला होता आणि ती पांडुरंगाच्या आश्रयाला आलेली. नामाची थोरवीच अशी आहे की तिने यमालाही धाक वाटावा.

कान्होपात्रेच्या छोट्याशा कुडीत एवढे कुठले बळ आले की ती समाजपुरुषाच्या प्रवाहाविरुद्ध मत मांडू शकली. निषेध नोंदविण्यासाठी ती म्हणाली,

ज्याचे घेता मुखी नाम। धाकी पडे काळ यम।।
ऐशी नामाची थोरी। उद्धरिले दुराचारी।।
नष्ट गणिका अजामेळ। वाल्मिकी झाला तो सोज्वळ।।
ऐशी नाम माळा। कान्होपात्रा त्याली गळा।।

कान्होपात्रेच्या आयुष्यात लोकनिंदेचे कृष्णमेघ आलेले त्याला तिने चोख उत्तर दिले. एकदा का पांडुरंगाला सोयरा मानला की मग सारे काही सोपे होऊन जाते.

कान्होपात्रा पंढरपूरला गेली. गेली होती तशी परत येईल. भावनेच्या भरात तिने सर्व ऐश्वर्याचा त्याग केला असला तरी तिला एक ना एक दिवस उपरती होईल असं शामाला वाटलं होतं. पण तिचं वाटणं हा फक्त भ्रम होता याची तिला प्रचीती आली.

दिंडीबरोबर पंढरपूरला गेलेली कान्होपात्रा दिंडीतल्या लोकांबरोबर परतली नाही. मग मात्र शामा हादरली. कान्होपात्रेला परत आणण्यासाठी ती स्वत: पंढरपूरला गेली. तिनं कान्होपात्रेला विनवलं, धमकावलं, प्रेमाची शपथ घातली. पण पांडुरंगमय झालेल्या कान्होपात्रेवर या सर्वांचा काहीएक परिणाम झाला नाही. शामाला हात हलवीत परत यावं लागलं. अमृताची वाटी हाती आल्यावर कुणी ताकासाठी वणवण करील काय? कान्होपात्रेला नामरूपी अमृतवाटी मिळाली होती.

कान्होपात्रेची वारकऱ्यांशी गट्टी झाली होती. ज्या चोखोबाच्या पालखीबरोबर ती सर्वस्वाचा त्याग करून पंढरपूरला आली होती त्यामध्ये मंगळवेढ्याचा सटवा आणि त्याची कारभारीण निर्मळा होती. गावकुसाबाहेर राहणारी ही दोघं. पण भक्तीरसात न्हाऊन निघालेली. सटवाने तर कान्होपात्रेला आपली बहीण मानलेली. दर वारीला ते नियमाने येत. कान्होपात्रेला आपल्या आईची खबरबात या दोघांकडूनच कळे.

एके वर्षी नेहमीप्रमाणे वारीला दोघं आली. पंढरपूरला कान्होपात्रेला भेटली. त्यावेळी सटवा म्हणाला, ''मंगळवेढ्यापासून निघालो तवाच येक ब्येत केल्ता. या वक्ताला आळंदीला जायचं. माऊलीला भेटायचं. हितून पुनं लैच लांब हाय खरं! पन त्ये गाटायचं. तितून जवळच तर हाय आळंदी गाव. तकडंच तर ऱ्यानेसर माऊली ऱ्हायाची. मरायआदी येकदातरी माऊलीची भ्येट घ्यायची.''

सटवाचं बोलणं ऐकून कान्होपात्रेला अति आनंद झाला. त्या दोघांबरोबर कान्होपात्राही निघाली. पंढरपूर ते पुणं. पुणं ते आळंदी. आणि तेवढीच परतीची वाट. तेही चालत. सोपी गोष्ट नव्हती. पण निश्चयाचं बळ असलं की सारं कसं सोपं होऊन जातं ना! तिघांनी पांडुरंगावर भार टाकला आणि जाणं निश्चित केलं आणि पुन्हा एकदा पांडुरंगाच्या अस्तित्वाची चुणूक त्यांना दिसली.

पुण्याहून एक धमनी (बैलगाडी) आली होती. त्यामध्ये निर्मळा, कान्होपात्रा यांना बसायला मिळालं. त्यामुळे पुण्यापर्यंतचा प्रवास कसा

छान झाला. इतकंच नव्हे तर त्या सद्‌गृहस्थाने त्यांना आळंदीला पोहोचवण्याचीसुद्धा व्यवस्था केली. कोण, कुठले गृहस्थ! पण ऐनवेळी देवासारखे धावून आले.

ते गृहस्थ खऱ्या अर्थानं वारकरी होते. त्यांनी गावकुसाबाहेर राहणाऱ्या सटवा आणि निर्मळाच्या जातीपातीची चौकशी केली अथवा कान्होपात्रेसारख्या गणिक कन्येची जातकुळी विचारली. माणुसकी ही त्यांची जात आणि वारकरी हा त्यांचा पंथ. अशी निर्मळ मनाची माणसंच परमेश्वराला प्रिय असतात. तो त्यांची परीक्षा जरूर घेतो पण प्रसंगी त्यांच्यावर आलेल्या संकटसमयी धावून जातो.

मंडळी अलंकापुरीला (आळंदीला) पोहोचली. त्यांनी इंद्रायणीत स्नान केलं आणि माऊलीला भेटायला गेली. देवळातला सुवर्णपिंपळ पाहिला. समाधीमध्ये निद्रिस्त असलेल्या ज्ञानेश्वर माऊलीची भेट घेतली आणि पहिल्यावहिल्या पावसाने जमीन अचानक सुगंधित व्हावी तसे कान्होपात्रेच्या मनाच्या गाभाऱ्यातून दरवळलेले अभंग बाहेर पडू लागले.

शिव तो निवृत्ती, विष्णू ज्ञानदेव पाही।
सोपान तो ब्रह्मा, मूळ माया मुक्ताबाई ।।
धन्य, धन्य, धन्य, धन्य निवृत्तीराया।
धन्य ज्ञानदेव, सोपान सखया ।।
प्रत्यक्ष पैठणी भटा दाविली प्रचिती।
रेडियाचे मुखे वदविली वेदश्रुती ।।
धन्य, धन्य कान्होपात्रा, आजी झाली भाग्याची।
भेटी झाली ज्ञानदेवाची म्हणूनिया ।।

आळंदीला येऊन त्यांना पाचसात दिवस झाले होते. ज्ञानेश्वर माऊलीचं मनसोक्त दर्शन झालेलं. इंद्रायणीच्या संथ पाण्यानं मन मोहरलं होतं. सारी आळंदी पायाखालून घातली होती. मन भरलं होतं. तेव्हा कान्होपात्रेनं निर्मळाला म्हटलं, ''बाई गं, आता इथलं वास्तव्य सरलं. पंढरीची वाट जवळ करायला हवी. माऊलीची भेट झाली. मनाचं तळं कसं तुडुंब झालं. आता परतीची वाट जवळ करायला हवी आणि एकाएकी कान्होपात्रेच्या मुखातून शब्दांचे पाट वाहायला लागले.

''अलंकापुरी पुण्यठाव
तेथ समाधी ज्ञानदेव
पांडुरंगे दिधला वर
भेटी निर्धार कृष्णपक्षी
नित्य स्नानालागी जाणा
भागीरथी दिधली ज्ञाना
सरस्वती मनकर्णिका
त्रिसंगमी वाहती देखा
तेथे स्नान करिता
वास वैकुंठी तत्वता
ऐसे देव सांगत
कान्होपात्रा आनंदत ।।''

आता पहाटे आळंदीहून निघायचं. कान्होपात्रेचं मन विलक्षण भावव्याकुळ झालं. या स्थळी आपण परत कधीच येऊ शकणार नाही हे तिच्या मनात आलं. पण नियतीपुढं कुणाचं काही चालतं का? ती रात्र कान्होपात्रेनं कूस बदलीत जागवली. झोप येणं शक्यच नव्हतं.

कोंबडा आरवताच सारीजण उठली. आवराआवरी झाली. आता धर्मशाळेतून निघायचं. कान्होपात्रा धर्मशाळेच्या पायऱ्या उतरायला लागली. तोच एक काळीभोर पाल तिच्या अंगावर पडली. हा तर मोठा अपशकुनच की! पुढे घडणाऱ्या अनिष्टाची चाहूल तर नव्हे? कान्होपात्रेच्या अंगावर सरसरून काटा आला.

खरंतर अंगावर पाल पडणं हे अशुभाचंच लक्षण! पण कान्होपात्रेसारख्या निर्मळ मनाच्या स्त्रीला आधार देणं हे आपलं कर्तव्य आहे असं समजून निर्मळा म्हणाली, ''ताई तुमी आजाबात घाबरू नका. ही धरमशाळा लैच जुनी हाय. तिनं पाली, उंदीर, घुशींची वसती असनारच की! एखाद्या पालीला उडी मारायची लहर आली तर त्यात घाबरून जान्यासारखं काय हाय? बिगीनं निघा. न्हायतर सुर्व्या वर यायचा.''

निर्मळेने कान्होपात्रेची समजूत घातली खरी, पण त्या सर्वांनाच पुढे घडणाऱ्या अशुभाची सावली जाणवली. मनात भीती बाळगत त्यांनी पंढरपूर गाठलं. चंद्रभागेमध्ये सर्वांनी स्नान केलं. चोखामेळ्याच्या समाधीचं दर्शन घेतलं. नामदेवाच्या पायरीला स्पर्श केला. विश्रांती घेऊन पंढरपूर सोडायचं आणि मंगळवेढ्याला जायचं असं निर्मळा आणि सटवा यांनी ठरवलं.

सटवा सहजच म्हणून गावात फिरायला गेला तेव्हा हाटात पसरलेली बातमी त्याच्या कानावर पडली. बेदरहून चार पलटणी पंढरपूरला येणार आहेत. कान्होपात्रेची कीर्ती बादशहाच्या कानावर गेली होती म्हणे! कान्होपात्रेचं अनुपम लावण्य, गंधर्वांनाही लाजवील असा गोड गळा, गाण्याची असलेली उत्तम जाण शिवाय ती एका गणिकेची कन्या. त्यामुळे हे रत्न आपल्या जनानखान्यातच अधिक खुलून दिसेल.

सारं ऐकून सटवा परत फिरला. त्याने आपल्या पत्नीला म्हटले, ''आटप भरभर. तुला मंगळवेढ्याला सोडून टाकोटाक मी पंढरपुरी परत यावं म्हणतोय! हाटात मोठी बातमी पसरलीय. कुणी म्हणे, बादशहा कान्होपात्रेला पकडून नेणार आहे. कुणी म्हणे कान्होपात्रा ऐकत नाही म्हणून खुद्द तिच्या आईनेच बादशहाकडे तक्रार केली आहे की कान्होपात्रा त्या काळ्याच्या मागं लागलेली आहे. तिला बेदरला घेऊन जा. खरं काय खोटं काय, तो पांडुरंगच जाणो! आपण आपलं कान्होबरोबर असायला हवं! वेळेवखत काय सांगून येतो?''

सटवा निर्मळेला सोडून टाकोटाक परत आला. तोवर राजाचे शिपाई पंढरपूरला येऊन ठेपले होते. त्यांनी राजाचा निरोप कान्होपात्रेला सांगितला. तो ऐकून तिचं अंत:करण दुभंगून गेलं. तिनं कितीही निर्मळ राहायचा प्रयत्न केला तरी बादशहाच्या पापी वासनेनं तिची पाठ सोडली नाही.

बरं, पावसानं झोडलं आणि राजानं नाडलं तर माणूस तक्रार तरी कुणाकडे करणार? आता पांडुरंगापुढेच लोटांगण घालायला हवं. त्याला

मनोभावे शरण जायला हवं. प्रत्येक संकटाच्या वेळी कुणाच्या ना कुणाच्या रूपानं तो मदतीला धावला. ह्याही वेळी तो नक्कीच धावून येईल. त्याच्यावर भार टाकून निश्चिंत राहावं हेच खरं!

निर्मळेला सोडून सटवा परत पंढरपूरला आलेला पाहून तिला आश्चर्याबरोबर धास्तीसुद्धा वाटली. काळजीपोटी ती सटवाला म्हणाली, ''अरे बाबा, तू आताच तर निरोप घेऊन गेला होतास ना? आणि लगोलग परत पण आलास? बहीण म्हणून माझी पाठराखण करतोस. मनाला संतोष वाटला. पण त्याचा तुलाच त्रास होणार आहे. ही बादशहाची माणसं माझा घात करून घास घ्यायला टपलीच आहेत. माझ्याबरोबर राहिलास तर ते तुलाही माती चारतील हे लक्षात घे.''

कान्होपात्रेचे म्हणणे सटवाला पटले. पण वेळप्रसंगी आपण कान्होपात्रेच्या आसपास असायला हवे हेही त्याला उमगत होते. दुरूनच कान्होपात्रेवर आपण लक्ष ठेवावे असा पोक्त विचार सटवाने केला.

कान्होपात्रेला बेदरला बादशहाच्या जनानखान्यात न्यायला उतावीळ झालेल्या सैनिकांना ती म्हणाली, ''बाबांनो, बादशहानेच या कान्होपात्रेला बोलावले आहे आणि त्याचे ताबेदार तुम्ही मला न्यायला आला आहात म्हणताना मी बापडी काय बोलणार? मला बादशहाच्या अधिकाराची, त्याच्या अमर्याद सत्तेची जाण आहे. म्हणूनच मी बादशहाकडे यायचं ठरवलं आहे.

पण माझी आपणाला एक विनंती आहे. वाटलं तर बहिणीचा शेवटचा हट्ट म्हणा, पण मला पांडुरंगाचं अखेरचं दर्शन घेऊ द्या. चारदोन घटका त्याच्या सान्निध्यात राहू द्या. त्याच्या भजनाचा श्रवणलाभ घेऊ द्या. मुखानं त्याचं नामस्मरण करू द्या आणि मग मला बेदरला घेऊन चला. आपल्याबरोबर मी आनंदाने येईन.''

कान्होपात्रेने कळकळीने त्यांना केलेली विनंती मान्य झाली. राजाचे शिपाई असले तरी ती काळीज असलेली माणसंच होती. सैनिकांचा प्रमुख म्हणाला, ''ठीक आहे. तू तुझ्या पांडुरंगाला भेट. भजन, कीर्तन ऐक. नामस्मरण कर. हे सारं तू लवकर आटप आणि आमच्याबरोबर चल. मात्र काही दगाफटका करायचा प्रयत्न करू नकोस. तू पळून जायचा प्रयत्न केलास तर उगाच आमचा आणि बादशहाचा राग ओढवून घेशील.''

कान्होपात्रा चंद्रभागेवर आली. घाटाच्या पायऱ्या उतरली. अमर्याद जलराशींना तिने स्पर्श केला. ओंजळीने तिने तोंड धुतले. तीर्थ म्हणून प्राशन केले. शांत चित्ताने ती देवळात प्रवेशली. तिनं आधी रुक्मिणीचं दर्शन घेतलं. राही, रुक्मिणीची सखी. तिच्या पाया पडली आणि ती सोळखांबी मंडपात आली. गरुडखांबाजवळ येऊन पोहोचली.

गरुडखांबाचं वैशिष्ट्य म्हणजे त्याचा तळाचा भाग आहे पितळेचा. मधला भाग आहे चांदीनं मढविलेला आणि अगदी वरचा भाग आहे सुवर्णाच्या पत्र्याने मढविलेला. माणसाचं ऐहिक जीवन असतं पितळेसारखं, थोडं वर गेलं तर ऐहिकाला रूप्याचा स्पर्श होतो. पण माणसाने मोह मायेचा त्याग करून वरच्या टोकाला असलेल्या हरिभक्तीच्या सुवर्णाचा मोह धरायला हवा असं मूकपणाने गरुडखांब लोकांना सांगतो.

कान्होपात्रेने गरुडखांबाला मिठी मारली आणि ती सोळखांबीतून निघाली. पांडुरंगाचं शेजघर डोळा भरून पाहिलं आणि सरळ इवल्याशा चांदीच्या दरवाजातून गर्भागार गाठलं. कान्होपात्रा पांडुरंगाच्या गाभाऱ्यात गेली आणि एक अघटित घडलं. तिच्या पाठोपाठ दरवाजा आपोआप बंद झाला.

गाभाऱ्यात होता तिचा सावळा घननीळ, पतितपावन पांडुरंग. बडव्यांनी नुकताच घातलेला घसघशीत तुळशीचा हार. वर कण्हेरीची एकेरी माळ, करवतकाठी शुभ्र धोतर नेसलेलं, कानात मकर कुंडलं, विटेवर उभ्या असलेल्या सावळ्या पांडुरंगाने कटीवर हात ठेवलेले. कान्होपात्रा त्याच्या पायावर पडली.

इकडे अचानक दरवाजा बंद झाल्यामुळे भक्त गोंधळले आणि मग त्यांचे तर्कवितर्क सुरू झाले.

''ही नटमोगरी गाभाऱ्यात गेली तेव्हाच माझ्या मनात पाल चुकचुकली होती. म्हणे पांडुरंग गणिकेचा उद्धार करणार!''

''अगदी बरोबर बोलता तुम्ही! ही गावभवानी काय करील ते काही सांगता येत नाही. अहो, तिचा आवाज फारच सुंदर आहे म्हणे. अधूनमधून अभंगही करते म्हणे!''

''ह्या गणिकेचं काही खरं नाही. हिला वाटतं, आपण रूपाच्या जोरावर पंचक्रोशीला वेड लावतो तसंच त्या पांडुरंगालासुद्धा लावू. म्हणूनच तिनं गाभाऱ्यात गेल्या गेल्या दार लावून घेतलं.''

तोंडाला येईल ते लोक बोलत होते. पण जे पांडुरंगाचे निस्सीम भक्त होते त्यांना हे बोल ऐकून धक्क्यावर धक्के बसत होते.

ही माणसं म्हणावीत की कोण? ह्यांचा पांडुरंगावर विश्वास नाही. श्रद्धा नाही. मग भक्तीची बाब तर दूरच राहिली. मग हे देवदर्शनाला येतात तरी कशाला? फॅशन म्हणून? परंपरा म्हणून? की कुचाळक्या करायला? 'मनी नाही भाव नि देवा मला पाव।'' भावाचा भुकेला, खऱ्या अर्थानं केलेल्या भक्तीला भुलणारा देव या पाखंडी लोकांना थोडाच पावणार आहे?

तेवढ्यात गाभाऱ्यातून हृदय पिळवटून टाकणारा एक कोमल तितकाच सुरेल स्वर जनसमुदायाच्या कानावर पडला. स्वर नव्हेच तो! प्राण कंठाशी आल्यावर देवाला केलेली ती एक करुण आळवणी होती. प्राणपणानं केलेला पांडुरंगाचा धावाच होता तो.

नको देवराया अंत आता पाहू
प्राण हा सर्वथा फूटो पाहे ।।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले ।
मजलागी जाहले तैसे देवा ।।
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी ।
धावे हो जननी विठाबाई ।।
मोकलीन आस जाहले मी उदास ।
घेई कान्होपात्रेस हृदयात ।।

आत कान्होपात्रा मुसमुसत होती. म्हणत होती, ''पांडुरंगा का माझा अंत पाहतो आहेस. ते यमदूत मला न्यायला तिष्ठत उभे आहेत. तू

दामाजीच्या रक्षणासाठी महाराचं रूप घेतलंस. द्रौपदीची विटंबना टाळण्यासाठी तू लुगडी घेऊन धावलास. खऱ्या भक्तासाठी तू धावून येतोस. मग माझ्यासाठी का माया पातळ करतोस? मी देह विसर्जनाचा निर्णय घेतला आहे. ही कुडी सोडायला आत्मा अधीर झाला आहे. तुला माझी करुणा येऊदे. कशासाठी हा विलंब लावला आहेस? पांडुरंगा माझे पंचप्राण आपल्या हृदयात मिसळ. माझ्या देहाची विटंबना होऊ देऊ नकोस.''

शब्द थांबले. क्षणभर गाभारा कोटी सूर्यांच्या प्रभेसमान तेजानं लखलखला असं भक्तजनांना वाटलं.

बराच वेळ झाला तरी कान्होपात्रा का येत नाही हे पाहाण्यासाठी शिपाई आला. त्याने पुजाऱ्याला दरडावले. दार उघडायला भाग पाडले. पुजाऱ्यानं दार उघडलं आणि पाहिलं तर

तर कान्होपात्रेच्या कुडीतील प्राण केव्हाच परमात्मतत्त्वात विलीन झाला होता. मागे उरलं होतं ते तिचं निष्प्राण कलेवर. भक्तगण, पुजारी आणि शिपाई चकीत झाले. आता शिपाई कुणाला बेदरला नेणार? गळ्यातून शब्दफुलांची कोण बरसात करणार? हे सारं करणारी तर पंचत्वात विलीन झालेली.

एकूण लगबगीवरून काहीतरी विपरीत घडलंय हे सटवाला उमगलं आणि त्याचा जीव काळजीनं कासावीस झाला. कान्होपात्रा गेल्याची बातमी वणव्यासारखी पसरली. ती सटवाच्या कानावर पडली आणि त्याचं काळीज शतश: विदीर्ण झालं. त्यानं कान्होपात्रेच्या देहाची मागणी केली. ताबडतोब ती पुरविण्यात आली.

सटवा आणि त्याचे भाऊबंद जमले. जिवंत असताना नव्हे तर तिच्या देहाची विटंबना होऊ नये म्हणून त्यांनी कान्होपात्रेचे कलेवर उचलले. मंदिराच्या दक्षिणभागात पुरले. तिला मूठमाती देताना सटवा धायमोकलून रडला. त्याच्या सवंगड्यांनी कशीबशी त्याची समजूत घातली.

कान्होपात्रेचे दिवस सटवाने घातले. आणि एक अघटित घडलं. कान्होपात्रा जिथे चिरविश्रांती घेत होती त्या ठिकाणी एक रोपटं उगवलं. हळूहळू त्याचा वृक्ष झाला. तोच 'तरटी'चा वृक्ष. अजूनही दक्षिण दाराजवळ कान्होपात्रेच्या समर्पणाची साक्ष देणारा तो वृक्ष पंढरपूरच्या देवळात आहे. लोक भक्तीभावाने त्या वृक्षाचे दर्शन घेतात. जिवंतपणी कान्होपात्रेला न्याय मिळाला नाही. मात्र मरणाने ती अमर झाली.

सौ. सुनिता नागपूरकर

'सुनीत' बंगला, १६/१४, युको बँक कॉलनी,
पटवर्धन बाग, एरंडवणा, पुणे ४११००४.
फोन : ०२०-२५४२२४६९, मो. ९८५०३१८६२५

संदर्भ -

१) दैनिक गांवकरी, नाशिक-सदर. चंदनस्पर्श
२) संत कान्होपात्रा चरित्र- लेखक मा. गोसावी
३) मार्गदर्शन - पंढरपूर येथील तरटीच्या दरवाज्याचे पुजारी.



संत कान्होपात्रा – एक तेजशलाका

श्रीमती मुक्ता गरसोळे–कुलकर्णी

एम.अे. (संस्कृत), बी.अे. (भूगोल), संस्कृत विशारद,
कार्यवाह, महाराष्ट्र भूगोल समिती, संस्कृत पाठ्यपुस्तक समिती.
वृत्तपत्र विद्यापदवी, माहिती तंत्रज्ञान पदविका, रेडीओ व दूरदर्शनसाठी निवेदन, लेखन व संपादन.
संत साहित्यावर लेखन

महराष्ट्राच्या पुण्यपावन भूमीत संतजनांची मांदियाळी निर्माण झाली. हा महाराष्ट्राच्या भूमीचा सुवर्णयोग! संतश्रेष्ठ ज्ञानदेवांपासून, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा, संत रामदास, नरहरी सोनार, संत सावतामाळी यासारख्या पुरुष संतांच्या नामावलीत संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यासारख्या स्त्रीसंतांचे स्थानही अत्युच्च राहिले ते त्यांच्या अभंगातील प्रचीती, कारुण्य या गुणांमुळे.

महाभारतात 'का दिक्' म्हणजे समाजाची योग्य दिशा कोणती? असा प्रश्न यक्षाने युधिष्ठिराला विचारल्यावर 'सन्तो दिक' हे त्याने उत्तर दिले होते. अर्थात थोर संतपुरुष हे समाजाला दिशादर्शक असतात.

शान्तो महन्तो निवसान्ति सन्तो
वसन्तवत् लोकहितं चरन्तः।

संतांचे कार्य वसंत ऋतूप्रमाणे समाजात मांगल्य, शांती आणि आनंद यांचा वर्षाव करणारे असते. रुचि उत्पन्न करणाऱ्या रुचिकारक आणि शुचिकारक मिठाप्रमाणे संतांचे आपल्या जीवनातले स्थान आहे.

वारकरी संप्रदायातील स्त्री संतांचा विचार करताना मुळात संतांची चरित्रे कशासाठी वाचायची, त्याचा उपयोग काय? यासारखे आधुनिक, भौतिक सुखांना चटावलेल्या मनांमध्ये स्वाभाविक प्रश्न उत्पन्न होऊ शकतो कारण प्रत्येक गोष्टीची उपयुक्तता काय? हे तपासणाऱ्या वृत्तीमुळे आत्मिक आनंद, मानसिक समाधान, ताणतणावाने भिरभिरलेल्या आणि सर्व भौतिक सुखे हात जोडून उभी असतानाही न सापडलेली स्थिरता, मनाची शांती या सर्वांसाठी संतचरित्रांचा निश्चितच उपयोग होऊ शकतो. वैयक्तिक मानसिक समाधानातून ईश्वरनिष्ठतेकडे वळवून समाजस्थैर्यालाही हातभार लागतो म्हणूनच संतचरित्रे आवर्जून अभ्यासावीत. इतरांना अभ्यासायला लावावीत आणि आपापल्या कुवतीप्रमाणे त्यातील गुण आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावे हेच इष्ट!

यासर्व पार्श्वभूमीवर स्त्रीसंतांचा विचार करता संत कान्होपात्रा यांचे व्यक्तिमत्व उठून दिसते व त्यांच्या विचारी, चिंतनशील, संवेदनशील, व्यक्तिमत्वामुळे! आणि त्यांच्या अत्यंत साध्या, सोप्या, गेय, रसाळ, कारुण्य आणि आर्ततेने ओथंबलेल्या, अनुभवांनी लिहिल्या गेलेल्या, संख्येने अत्यंत कमी पण भावगर्भ अभंगरचनांमुळे! चारचौघींसारखं सामान्य जीवन कधीच वाट्याला न आलेली तरीही आपल्या कार्यकर्तृत्वाने लोकविलक्षण आयुष्य जगून तितक्याच विलक्षण पद्धतीनं पांडुरंगाच्या चरणाशी विलीन झालेली ही वारकरी संप्रदायातली साक्षात तेजशलाका, भक्तियोगिनी! शामा नावाच्या नायकिणीच्या पोटी पंढरपूरजवळ मंगळवेढा या गावात जन्म झालेल्या कान्होपात्राचा काळ सुमारे इ.स. १४६८ म्हणजे सुमारे साडेपाचशे वर्षापूर्वीचा! परंतु तिच्या ईश्वरनिष्ठेमुळे अत्यल्प आयुष्य जगून तिने आपला पंचभौतिक देह पांडुरंगार्पण केला.

ज्याचे घेता मुखी नाम, धाकी पडे काळ यम
ऐसी नामाची थोरवी, उद्धरिले दुराचारी

अशाप्रकारे नामाचा महिमा वर्णन करणारी संत कान्होपात्रा! तिचा जन्म समाजाने उपेक्षिलेल्या गणिकेच्या घरात झाला असल्याने तिचे बालपणही इतर मुलींसारखे नव्हते. परंतु तिला नृत्य आणि गायनाचे शिक्षण घरातच मिळाले कारणाने लहानपणापासून ती कलेची आसक्त बनली. दिसायला अत्यंत सुंदर लावण्यवती असली तरी विषयभोगांकडे मात्र ती कधीही आकर्षित झाली नाही. ईश्वराच्या भक्तीची भावना मात्र लहानपणीच रूजायला लागली होती ज्यामुळे विषयसुखात गुंतलेल्या श्रेष्ठजनांचाही नाश ओढवते हे ती सांगते.

विषयाचे संगती, नाश पावले निश्चिती
भगे पडली इंद्राला, भस्मासूर भस्म झाला
चंद्रा लागला कलंक, गुरुपत्नी झाला देख
रावण मुकला प्राणासी, कान्होपात्रा म्हणे दासी।

नाचगाण्यातून रसिकांचे मन मोहवून, शरीरविक्रयाद्वारे उपजीविका करणाऱ्या शामा नावाच्या तिच्या आईला आपल्याप्रमाणेच आपल्या रूपवती मुलीने व्यवसाय करून भरपूर संपत्ती कमवावी असे वाटत होते. मात्र कान्होपात्रा त्याला अपवाद होती. नृत्य-गायनात कुशल असली तरी आपल्या सौंदर्याचा उपयोग अशा प्रकारे करून घेण्यात धन्यता मानणारी नव्हती. तिची प्रवाहाविरुद्ध पोहण्याची किंवा मनाला पटत नसणाऱ्या गोष्टींना, तत्त्वाविरुद्ध गोष्टींना विरोध करण्याच्या तिच्या या चांगल्या अर्थाने बंडखोरीला दाद द्यावीशी वाटते. कारण

अश्रूधारांचा अखंड ओघ चालू असताना कान्होपात्रा अति स्वरांनी विठ्ठलाला साकडे घालू लागले.

नको देवराया अंत आता पाहू, प्राण हा सर्वथा जाऊ पाहे।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले, मजलाही जाहले तैसे देवा।

हरणाच्या छोट्या पाडसाला वाघीणीने धरल्यावरच्या हा दृष्टान्त कान्होपात्रेच्या मन:स्थितीचे वर्णन करायला अगदी चपखल वाटतो. आर्तता आणि आळवणी, हृदयापासून ईश्वराला घातलेली करूण साद ही कान्होपात्रेच्या अभंगरचनांची वैशिष्ट्ये!

देवळाच्या बाहेर बादशहाचे सेवक घेऊन जायला उभे आणि आत गाभाऱ्यात कान्होपात्रा विठ्ठलाला अति विनवणी करते आहे या संकटातून सोडवण्याची. काय करावे काही सुचत नाही, पतितपावन दीनदयाळ अशा भक्तवत्सल विठ्ठलाला हक्काचे साकडे घालत आहे –

पतित पावन म्हणविशी आधी, तरी का उपाधी भक्तामागे
तुझे म्हणविता दुजे अंगसंग, उणेपणा सांग कोणाकडे
सिंहाचे भातुके जंबुक पै नेता, थोराचिया माथा लाज वाटे
म्हणे कान्होपात्रा देह समर्पण, करावा जतन ब्रीदासाठी।


तू जर आम्हा भक्तांची लाज राखली नाहीस तर तुझ्याच नावाला उणेपणा येईल असे साक्षात विठ्ठलाला सांगून त्याला कोंडीत पकडणारी त्याच्याशी असे प्रेमाचे भांडण करणारी, साकडे घालणारी कान्होपात्रा लक्षात रहाते ते तिच्या विठ्ठलावरील भक्तीच्या हक्कामुळे!

करूणरसाची दाट छाया जिच्या अभंगात गडदपणे जाणवते त्या कान्होपात्रेचे अभंग इतर स्त्रीसंतांच्या तुलनेत जास्त गेय आणि गायनानुकूल वाटतात. ते तिच्यावर बालपणी झालेल्या गायन आणि नृत्याच्या संस्कारांमुळे, शिक्षणामुळे!

भक्तवत्सल विठ्ठलालाही कान्होपात्रेच्या आर्त विनवणीमुळे अखेर पाझर फुटला आणि त्याने या ज्ञानयोगिनी तेजशलाकेला आपल्या चरणाशी सामावून घेतले. कान्होपात्रेचा देह विठ्ठलाच्या चरणी गाभाऱ्यातच निष्प्राण झाला. आत्मा–परमात्म्याचे एक अपूर्व मीलन पंढरपुरी विठुरायाच्या गाभाऱ्यात घडून आले. बाहेर बादशहाचे सेवक वाट पाहून कंटाळले आणि आत येऊन बघतात तर पुजाऱ्यांनी कान्होपात्रेचा निष्प्राण देहावर अंत्यसंस्कारही मंदिराच्या दक्षिणद्वारी पार पाडलेले. सेवकांचा यावर विश्वास बसेना म्हणून त्यांनी पुजाऱ्यांना पकडून बादशहाकडे नेले असे सांगतात. पुजाऱ्यांच्या म्हणण्याची सत्यता पडताळून बघण्यासाठी बादशहा पंढरीच्या मंदिरात आला आणि विठ्ठलाच्या पायी नतमस्तक झाला.

ज्ञानदेवाची भक्ती, मुक्ताबाईंचा लडिवाळपणा, जनाबाईंची आळवणी, चोखोबांच्या उपेक्षेची टोचणी आणि नामदेवांची देवालाही कोंडीत पकडण्याची हातोटी कान्होपात्रेमध्ये एकत्र जुळून आलेली दिसते.

श्रीमती मुक्ता गरसोळे–कुलकर्णी
१०/४ लक्ष्मीनारायण नगर, पटवर्धन बाग,
एरंडवणा, पुणे – ४११००४.
फोन : ०२०–२५४३३४८२, मोबाईल – ९८९०००४३२०



संत कवयित्री कान्होपात्रा

सौ. विजया प्रल्हाद प्रभुणे

बी.ए., बी.एड. (संस्कृत स्पेशल), राष्ट्रभाषा पंडीत शिक्षक
विविध मासिकांतून वैचारिक, चिंतनात्मक कौटुंबिक लेखन.
दैनिक प्रभातमध्ये संत जीवनावर अखंड लेखमाला

माम् हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय:
स्त्रियो वैश्य:तथा शूद्रा: तेऽपि यान्ति परां गतिम् ।

भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत वर्णन केल्याप्रमाणे भगवंताची नि:स्सीम भक्ती करणारे पापयोनीतले लोक सुद्धा माझ्या परमपदाला पोहचू शकतात हे त्रिवार सत्य आहे हे आपल्या लक्षात श्री संत कान्होपात्रा या जीवनावरून येते. संत कान्होपात्रा आणि तिची आई शामा ही मंगळवेढ्याला राहात असते. शामा ही एक गणिका होती. देह विक्रय करून आपला चरितार्थ चालवणे आणि आपल्या छोट्या सुकुमारकन्येचे पालनपोषण करणे हेच तिचे काम होते. लहानगी कान्होपात्रा शुद्धपक्षातील चंद्रकलेप्रमाणे दिसामासी वाढत होती. कमल नयना, लांब केस, नितळ कांती रेखीव नाकडोळे कोणाची दृष्ट लागू नये म्हणून की काय गालावर छोटा काळा तीळ! पहाणारा लोभसवाणे सौंदर्य पाहून स्तिमित होऊन पहातच राहात असे. नाच, गाणे, ढोलकीचा ताल या वातावरणात तिने गायन आणि नृत्यकला आत्मसात केली होती. बालपणाची मुकी अंगडी मागे पडली आणि कान्होपात्राने तारुण्यात प्रवेश केला. तिची आई शामा ही आपल्या लेकीचे अनुपम लावण्य बघून हर्षभरीत होत असे आणि तिच्यावरून मनोमन दृष्ट उतरून टाकत असे.

शामाला वाटे या मुलीने आपल्या सारखाच गणिका-व्यवसाय करावा. विलासी भृंगांना आपल्याकडे खेचून त्यांच्याकडून पैशाच्या राशी मिळवाव्या आणि ऐषोरामात, सुखविलासात आपले आयुष्य घालवावे. परंतु या चैनविलासाचे आकर्षण कान्होपात्राला देखील नव्हते. तिचा स्वभाव ऐहिक उपभोगासाठी उदासीन होता. विरक्ती हा तिचा स्थायीभाव होता. ती आपल्याच विचारात दंग असे.

अमोलिक जाते वय । आता तरी धरी सोय
असा काय नरदेह येईल पुन्हा वा ।

या नरजन्माचे सार्थक करावे असे तिला वाटे पण नेमके काय करायचे ते सुचत नव्हते. या विचारात दंग असताना तिच्या घराच्या दारावरून काही वारकरी मंडळी विठ्ठलनामाचा गजर करीत टाळ मृदुंगाच्या तालावर नाचत - झाडा झुडपांनो सांगा, पाखरांनो हीच वाट जाते कारे पंढरीला - असा अभंग म्हणत चालले होते. त्यांच्या मुखावरील आनंद नजरेतील शांतभाव आणि मनाची एकाग्रता पाहून कोन्होपात्रा झटकन पुढे झाली आणि त्यातील प्रमुखाला तिने विचारले - काका तुम्ही पायी पायी सारे कोठे निघालात? - त्यावर ते गृहस्थ म्हणाले -

नाद मृदुंगाचा अजूनही घुमतो

सखा पांडुरंग आम्हास बोलावितो - आम्ही पंढरीच्या वारीला पांडुरंगाच्या दर्शनाला चाललो आहोत. तिची आई यावेळी घरी नव्हती. कान्होपात्राने एक वीणा गळ्यात घातली, हातात टाळ घेतले आणि पायी अनवाणी ती त्या वारकऱ्यांबरोबर पंढरीला निघाली. तिला ना आईची माया अडवू शकली ना सुखोपभोग, कारण ती तिची मनोवृत्तीच नव्हती.

'जाते माहेराला, जाते माहेराला। विठू माऊलीला जाते भेटायला' असे म्हणत ती त्यांच्या बरोबर निघाली.

परिमलाची धाव भ्रमर ओढी, तैसी तुझी गोडी लागो मज

विठ्ठला ऽऽ - अशी आर्त साद तिने पांडुरंगाला घातली.

पतित तू पावना म्हणविसी नारायणा ।
तरी सांभाळी वचना । ब्रीद वागविसी जाण
जोकाजीवांचे जीवन । कान्होपात्राचे निजधन

तो हा पंढरीराव उभा विटेवरी

कासे कटीला पीतांबर, गळा तुळसीचे हार ।
केशराचा टीळा भाळी त्याने कैसा लाविला ।

पंढरीच्या विटेवरी हरि उभा राहिला - अशा ध्यानमग्न अवस्थेत सर्व मंडळींबरोबर ती पंढरपूरात राहू लागली.

विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।।

त्या विठ्ठलमय पंढरीत ती पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊ लागली. देहभान विसरू लागली.

भाव एक ठसता अंत:करणी
पावे जगदीश तत्क्षणी - या गोष्टीचा अनुभव तिला येणारच

होता. अशी कालक्रमणा करीत असताना तिच्या आईने बेदरच्या बादशहाला आपल्या कन्येचे रूप लावण्य व नृत्य कौशल्य याबाबत कळवले आणि ती पंढरपुरात आहे हेही सांगितले. बेदरच्या बादशहाचे सैनिक पंढरपुरी मुक्कामी येण्यास निघाले. कान्होपात्राला या सर्व घडामोडींचा पत्ताच नव्हता.

अनन्यास रक्षितसे चापपाणी
नुपेक्षी कदा देवभक्ताभिमानी ।

हा तिच्या अंत:करणी ठाम विश्वास होता.

विठोबाचे पाय राहो खंड चित्ती ।
अखंड श्रीपती हेची द्यावे । सर्व सुखाचे आगर ।
बापरखुमादेवीवर तुझे रूप चित्ती राहो मुखी तुझे नाम
पांडुरंग पांडुरंग... पांडुरंग, पांडुरंग ।

कान्होपात्रा म्हणते -

'नामे अपार तारिले । नामे जीवनमुक्त केले ।
कान्होपात्र नाम घेता पायी जडली तत्वता ।

कान्होपात्राने सुमारे ४५ अभंग रचना केल्या आहेत. परंतु या मोजक्याच रचनामध्ये मनीची आर्तता स्पष्ट प्रतीत होते.

तुझे म्हणविता दुजे ....
उणेपणा सांग सांग कोणाकडे ?

बादशहाचे सैनिक पंढरीला येऊन पोहोचले. कान्होपात्रेला ताब्यात घेतले आणि बादशहाकडे नेणार तोच मी माझ्या विठुरायाला शेवटचे डोळाभर पाहून येते. म्हणून विठोबाच्या गाभाऱ्यात येऊन तिने विठुरायाच्या चरणावर मस्तक ठेवले आणि अखेरची प्रार्थना केली.

नको देवराया अंत आता पाहू ।
प्राण हा सर्वथा जावो पाहे ।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरीयेले ।
मज लागी जाहले तैसे देवा ।
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी ।
धाव गे जननी विठाबाई ।
मोकलोनी आस जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात ।
घेई कान्होपात्रेस हृदयात ।

तिची व्याकूळ मनोवस्था विठुरायाने जाणली आणि
तिची प्राणज्योत विठ्ठल रूपात मिळून गेली.

तू मायमाऊली । जगाची जननी ।

म्हणूनी मिठी चरणी घालितसे - अशा रचना वाचल्या की खात्री पटते.

Poetry is the spontaneous
overflow of powerful feelings

हे वर्डस्वर्थचे म्हणणे सत्यच आहे. कान्होपात्रा गाभाऱ्याबाहेर अजून का येत नाही हे पहाण्यास लोक गेले. परंतु पांचभौतिक नाशिवंत देहाचा त्याग करून विठ्ठलरूपात तिने आत्मसमर्पण केले होते.

अखंड वासना तुमचे ते पाय । दिननीशी राहो हृदयात ।

हे तिचे म्हणणे तिने खरे करून दाखवले. तिची उत्तरक्रिया तेथील लोकांनी दक्षिणद्वारी केली. ठाव देई चरणापाशी । कान्होपात्रा तुझी दासी - हा अनन्य भाव तिने आचरणात आणला!


कान्होपात्रा म्हणे विठोबा जीवलगा ।
आलिंगन दे गा सुख माते ।
अनाथांचा नाथ पतितपावना ।
हे वेदवचन आहे देवा ।
म्हणोनी कीव भाकिते करुणा ।
उदारा सर्वज्ञा पांडुरंगा ।
माझे माहेर पंढरी । सुखे नांदू भीमातीरी ।
येथे आहे मायबाप । हरे ताप दरूशंने ।
सर्वभावे शरण कान्होपात्रापायी ।
आता विठाबाई दुजे नको काही ।

अशा सर्वशरणभावाने कान्होपात्रा गणिका- मुलगी असूनही विठ्ठलमय होऊन संतवाङ्मयात स्मरणीय ठरली. त्या संतकवयित्रीला माझे त्रिवार प्रणाम!

श्रीमती विजया प्रभुणे
१/१९ ब, श्रीमान सोसायटी, गजानन महाराज मठाच्या पुढे,
कर्वेनगर, पुणे ४११०५२. फोन : (०२०)२५४५७४६४



संत बहिणाबाई



संत तुकारामशिष्या : बहिणाबाई

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम.ए. बी.एड., निवृत्त शिक्षिका, पार्लेटिळक विद्यालय, मुंबई
कविता करण्याची आवड, श्यामरंग- भक्तिगीतांची ध्वनिफित (इ.स. २००४),
सेवानिवृत्तीनंतर पुण्यात कृष्णजन्माष्टीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण.

मराठवाड्यात वेरुळनजीक देवगावी जन्म बहिणाईचा
अगस्तिऋषिंचा वर 'लक्षतीर्था' - शिवानदी तीर्थ संगमाला
''पावन प्रवाही करील जो स्नान-व्रत अनुष्ठाने सफल त्याची''
आऊजी-जानकी शिव अनुष्ठानी दृष्टांत लाभला 'कन्या भाग्याची!'
कन्या बहिणाबाई - चौथ्या वर्षी लग्न -
त्याकाळी रूढीच तैशी होती।
गंगाधर बिजवर - तीस वर्षेमोठा -
कुणाला न खंत ऐशी स्थिती।
काही कारणाने माहेरी भाऊबंदकी।
सोडवि त्यातून जावई सुज्ञ।
गाव सोडूनिया चौघांची परिक्रमा।
यात्रा तीर्थाटने यांत मग्न।।
होता होता आले करवीर क्षेत्रात।
कोल्हापूरवासिनी जगदंब-स्थानी
बहिरंभटाघरी मिळाला आश्रय।
कथापुराणे कीर्तन नित्य सदनी।
बहिणाबाईला वेड कीर्तनश्रवण।
त्याविषयी तादात्म्य रात्रंदिनी
तत्कालीन स्त्रीची दोनच दैवते।
पति नि परमेश्वर श्रेष्ठ दोन्ही।।
एके दिनी कपिला घरमालका दान।
सुलक्षणी भारी ये गोदानी।।
'सुवर्णाची शिंगे रुपियाचे खूर'।
पाहताचि प्रेम बहिणाई-मनी।।
योगायोगे दृष्टांतात जे दिसले।
घरमालकाने दान दिले बहिणीस।।

गोसेवा होईल सात्विक आनंद।
बहिणाई रमली संगोपनी।।
गाईचे वासरू तेही कपिलाच।
लळा त्याला अति बहिणाईचा।।
कीर्तनास जाई बहिणाई -
तीजसवे जावे कीर्तनास नेम त्याचा।
'योगभ्रष्ट प्राणी' काही जणा प्रेम।
काहींना हा छंद टवाळीचा।
हेच वासरु घाली दंडवत।
कीर्तनकार जयराम अंतर्ज्ञानी।
बहिणाई वासरु दोघां शिरी हस्त।
जयरामस्वामींनी कृपा दिली।।
बहिणाईचा पति मुलखाचा कोपिष्ट।
बहिणाईला मारझोड केली
इतुकी झोडली इतुकी झोडली -
बहिणाई बेशुद्ध - पर्वा न त्याला।।
गायवासराने त्यागियले अन्न।
पाण्याचा थेंबही घेईनात
जयरामस्वामींनी प्रत्यक्ष येऊन।
कानउघडणी केली धीट।।
पंधरा दिवस गेले -
वत्स तळमळे शेवटचा क्षण ये समीप
जयरामस्वामींनी पाहिले बोलले -
मूकं करोति वाचालम्।.......।
वासरु उत्तरे 'यत्कृपा तमहं वन्दे'
श्लोक पूर्ण होता प्राण गेला।।

गावभरीचे लोक लोटले दाराशी।
अंत्यसेवा करण्या वासराची।।
दिंडी–पताकांनी मिरवले वत्स।
पुरोनिया वत्स गृहा गेले।।
गाय शोक करी। पुन्हा आली घरी।
इकडे बहिणाईची शुद्ध गेली।।
तीन दिन बहिणी बेशुद्धीत होती।
चौथ्या रात्री 'देव' दृष्टांत झाला।।
''ते सुख सांगता वाचे पडे मौन।
जाणता ते धन्य गुरुभक्त।।१।।
झालासे आनंद इंद्रियांचे द्वारी।
बैसले शेजारी चैतन्याचे।।२।।
घट हा बुडाला जैसा डोहाआत।
न फुटता ओतप्रोत पाणी।।३।।
बहिणी म्हणे तैसे झाले माझे मना।
तुकाराम खुणा ओळखी त्या।।४।।
''आनंदे निर्भर होऊनिया मन।
करू आले स्नान इंद्रायणी।।
घेतले दर्शन पांडुरंग मूर्ति।
तव झाली स्फूर्ति वदावया।।
बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र।
ह्रदयाकाशी इंद्र बोले वाचा।।''
कवित्वशक्ति। बहिणाईची। अभूतपूर्व म्हणती।
आत्मचरित्री। पूर्वजन्म जे। कुणी न कधी वदती
जीवनसरिता। खडकाळातुनि। वाट काढिली कशी
खेळ खेळते। दैव नाचवी। प्रपंची स्त्री दासी
संशय पतीचा छळ जाच मार
भावना सुकुमार कशि जागी व्हावी?
असंगाशी संग – प्राणाशी गाठ
रुक्षताच मनी – उपजेल दाट
तरी पतिव्रता धर्म पाळुनिया।
संसार साजिरा केला तिने।।
कवित्वाचे तेज बोल प्रासादिक।
गुरु उपदेश चैतन्य सुख।।
'रामकृष्ण हरी' मंत्र ह्रदयांतरी।
गुरुकृपे वृत्ति शांत झाली।।
मंत्र उपासने साधिले दैवत।
श्रम तोचि तेथे फळा आला।।
संतांचे सेवेनी होय आत्मज्ञान।
शांति क्षमा पूर्ण वोळंगती।।
धन्य बहिणाबाई स्वपुत्राला सांगे।
बारा जन्म नाते तुझे माझे।।
''तीन शते आणि वरुषे एकावन्न।
आयुष्य निर्माण तेरा जन्मी।।
प्रतिपदी आम्हा टाकणे शरीर।
तीर्थ आम्हा देख 'प्रणित' असे
मृत्यू हाची आहे आनंदसोहळा।
याप्रसंगी नामगजर व्हावा।।
।। पूर्वजन्मज्ञान दिव्यत्व प्रचीती,
ऐशा योगिनीप्रति प्रणिपात।।
।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

सौ. शैला सुहास पटवर्धन
डी–३, प्राजक्ता, कर्वेनगर, पुणे फोन : ०२०–६५२१८५३१

टीप – बोल्ड अक्षरांतील रचना संत बहिणाबाई यांच्या आहेत.



महायोगिनी बहिणाबाई

सौ. जयश्री नातू

एम्.अे. बीएड.

प्रथमपासून घराच्या आजूबाजूला असलेल्या झोपडपट्टीतील मुलांच्या शिकवण्या घेत. १९८९ व २००५ 'श्रीशारदा मठ'च्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिरमध्ये सेवाभावी शिक्षिका. रामकृष्णमठात कार्यरत. 'प्रज्ञावर्धिनी' उपक्रमातंर्गत १०वीच्या मुलांना इंग्रजी प्रशिक्षण. 'जीवनविकास' नागपूर मासिकात संत साहित्यावर लेखमाला. (पुनर्मुद्रण : जीवन-विकास, नोव्हेंबर २००७ यांच्या सौजन्याने...)

बहिणाबाईंचा अभ्यास म्हणजे एका निराळ्याच आध्यात्मिक चरित्राचा अभ्यास. जनाबाई व मुक्ताबाई या दोघीही अविवाहित; प्रपंचाकडे, स्वतःच्या प्रपंचासह; पाठ फिरवलेल्या आणि गुरूंचा भरपूर सहवास लाभलेल्या होत्या. परंतु संत बहिणाबाई ही विवाहिता, प्रपंच करणारी स्त्री आणि गुरूंच्या किंवा अध्यात्मिक परिवाराच्या दीर्घ सहवासाला वंचित झालेली; परंतु अध्यात्माची विलक्षण ओढ असलेली अशी एक महान साधिका होती. तिचे गुरूही लोकोत्तर पुरुष होते- श्रीसंत तुकाराम!

तुकारामाची शिष्या

अध्यात्मिक गुरू-शिष्यांच्याबाबत ते कुठे, कसे, केव्हा भेटतील हे काहीच सांगता येत नाही. त्या सर्व गोष्टी ईश्वरीय योजनेनुसार आधीच ठरलेल्या असतात. याची प्रचीती अशा चरित्रातून आपल्याला येते. संत तुकाराम महाराजांचे प्रथम दर्शन बहिणाबाईंना स्वप्नात झाले आणि या दर्शनानंतर तुकाराम महाराजांच्या भेटीसाठी बहिणाबाईंचा जीव विलक्षण तळमळू लागला. त्यांच्या अभंगांचे तिने अनेकवेळा पारायण केले. तुकाराम महाराज प्रत्यक्ष भेटण्यापूर्वी त्यांनी तिला अनेकदा कठीण प्रसंगी स्वप्नी येऊन धीर दिलेला आहे. त्यांचा प्रत्यक्ष सहवास मात्र नंतरच्या काळात बहिणाबाईंना लाभला. त्यामुळे बहिणाबाईंच्या अभंग-साहित्यावर तुकारामांचा बराच प्रभाव असला तरी त्यांचे मन घडविताना मुक्ताईवर निवृत्तिनाथांचा किंवा जनाबाईवर नामदेवांचा जसा संस्कार दिसून येतो तसा बहिणाबाईंवर दिसत नाही. कारण वयाच्या ३० वर्षांनंतर त्यांची त्यांच्या गुरूंशी भेट झाली. तोपर्यंत बहिणाबाईंची मानसिक वाढ बरीचशी पूर्ण होत आलेली होती. शिवाय विवाहित बहिणाबाई अनेक बंधनांनी जखडलेल्या होत्या. तरीही मनोमन त्यांनी तुकाराम महाराजांना प्रत्यक्ष न भेटता सुद्धा त्यांनाच आपले गुरू मानले होते. शिष्या म्हणून ज्या निष्ठा आपल्या गुरूच्या पायी वाहायला हव्यात त्या सर्व त्यांनी तुकाराम महाराजांच्या चरणी वाहिलेल्या होत्या. लहानपणापासून अत्यंत देवलसी अशा प्रकारचे बहिणाबाईंचे व्यक्तिमत्त्व होते.

बालपण व विवाह

बहिणाबाईंच्या चरित्राचा एक अतिशय मोठा विशेष म्हणजे त्यांनी स्वतःच आपले चरित्र ओवीबद्ध केले आहे. तोपर्यंत कोणत्याही संताने विशेषतः स्त्रीसंताने आत्मचरित्र लिहिलेले नाही. ज्ञानवती मुक्ताई स्वतःबद्दल मूक आहे. जनाबाई आपल्या व्यथा, वेदना सांगत असली तरी ती आत्मचरित्रकार नाही. आपल्या आयुष्यातील घटना विस्तारपूर्वक सांगणाऱ्या संत बहिणाबाई ह्या सतराव्याच काय परंतु त्याच्या मागच्या-पुढच्या शतकांमधील सुद्धा एकमेव आत्मचरित्रकार स्त्रीसंत म्हणाव्या लागतील. त्या चरित्रात दिसून येणारे आणखी एक जगावेगळे आश्चर्य म्हणजे बहिणाबाईंनी मृत्युशय्येवर असताना आपले मागचे १२ जन्म सविस्तरपणे निवेदन केलेले आहेत. साक्षात मृत्यूचा अनुभव सांगू शकणारी ही अतिमानवी स्त्री महायोगिनीच म्हटली पाहिजे.

बहिणाबाईंचा जन्म इ.स. १६२८ मध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेणी असलेल्या वेरुळ गावाजवळ झाला. देवगाव या लहानशा खेड्यात आऊजी व जानकी या दाम्पत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. ब्राह्मणकुळामध्ये शिवप्रसादाने जन्माला आलेली ही कन्या देववेडी होईल हे आऊजी कुलकर्णींना माहीत होते. तरीही प्रचलित पद्धतीप्रमाणे त्यांनी या कन्येचा वयाच्या तिसऱ्या वर्षीच विवाह करून दिला. वराचे वय मात्र ३० वर्षांचे होते. रत्नाकर पाठक हा बिजवर असून स्वभावाने अत्यंत कोपिष्ट होता. बहिणाबाईने स्वतःच त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे -

भ्रतार क्रोधाचा पुतळा सर्वही । एकान्त तो पाहे केवी साधे ?
जमदग्नीचा क्रोध ऐकियेला कानी । भ्रतार तो जनी तेची रूप ।।

रत्नाकर पाठक यांचे घराणे वेदपाठी होते. त्यांच्या घरात शक्तीची उपासना होती. त्यामुळे वारकरी संप्रदायापासून ते लांब होते. उलटपक्षी भक्तिमार्गाचा विरोध करणारे होते असे म्हटले तरी चालेल. भिक्षुकी व ज्योतिष या साधनांवर बहिणाबाईंच्या पतीची उपजीविका चालत असे. अत्यंत कर्मठपणा हा त्यांचा स्वभावविशेषच म्हटला पाहिजे. शारीरिक, मानसिक व बौद्धिक या सर्व बाबतीत या दोघा पतिपत्नीमध्ये असणारा हा काळाकुट्ट विसंवाद बहिणाबाईंच्या आयुष्यातील दारुण संघर्ष ठरला.

प्रपंच व परमार्थ

सुरवातीसच बहिणाबाई ही प्रपंच करणारी संत आहे असे म्हटले आहे. परंतु बहिणाबाई प्रपंच करत असून दोन अपत्यांची माता असूनही प्रपंचातून मुक्त झालेल्या होत्या. बहिणाबाईंचा विवाह तिसऱ्या वर्षी झाल्यामुळे विवाहितेच्या जबाबदाऱ्या व बंधने प्रथमपासूनच चिकटलेली होती. परंतु त्यांच्या स्वभावातच विरक्ती असल्यामुळे सर्वसामान्य प्रापंचिक गोष्टींत बहिणाबाईंना मुळीच रस वाटला नाही. त्यांनी आपल्या आत्मनिवेदनात म्हटले आहे,

लोकांचिया मुली खेळती बोळकी । वाटे घ्यावे मुखी मज नाम ।।
आणिक नावडे खेळ तो बालिश । नेणे तो विश्वास प्रकटला ।।
नावडे फुगडी टिपरीयाचा खेळ । असावे निश्चळ वाटे मना ।।
बहिणी म्हणे पूर्वी होते जे पदरी । तेची या संसारी प्रगटली ।।

हे जन्मजात वैराग्य बहिणाबाईंच्या अंगी असले तरी बहिणाबाईंना आपले स्त्री-जीवन विसरता आलेले नाही. मुक्ताईच्या आध्यात्मिक प्रवासात तिने आपले स्त्रीत्व सहजपणे मागे टाकल्याचे आपण पाहिले आहे. आपण स्त्री आहोत आणि त्यामुळे आपल्याला काही बंधने पडत आहेत, किंवा हे स्त्रीत्व आपल्या आध्यात्मिक साधनेच्या आड येत आहे अशी मुक्ताईने कुठेही खंत व्यक्त केलेली नाही. परंतु बहिणाबाईंच्या आत्मनिवेदनात ही खंत ठळकपणे जाणवते. उदा. -

स्त्रियेंचे शरीर पराधीन देह । न चाले उपाव विरक्तीचा ।
शरीराचे भोग वाटताती वैरी । माझी कोण करी चिंता आतां ।।
काय पाप केले पूर्वीलये जन्मी । आता पुरुषोत्तमी अंतरले ।।
लाधले नरदेह स्त्रियेंचेनि रूपे । असंख्य पापे फळा आली ।।

या ठिकाणी बहिणाबाईंमधील विरक्त मन आणि त्यांच्या वाट्याला आलेली प्रापंचिक कर्तव्ये यामध्ये त्यांची झालेली यातनामय घुसमट व्यक्त होते. प्रपंच आणि परमार्थ या दोन टोकांमध्ये त्यांची चाललेली विलक्षण कुतरओढ त्यांनी इथे मनमोकळेपणाने व्यक्त केली आहे. साधकाच्यापक्षी कौटुंबिक जीवन हे बंधनकारक आहे अशी त्यांची अनुभवामुळे झालेली धारणा; म्हणूनच की काय परमार्थाकडे धाव घेणाऱ्या त्यांच्या मनाला शारीरिक भोग किळसवाणे वाटतात. त्या म्हणतात-

बहिणी म्हणे जैसा वोकियेला वोक ।
तैसे हे माइक वाटे मना ।।

असे हे सगळे जरी असले तरी बहिणाबाईंना तो प्रपंच टाकवतही नाही; कारण त्यांच्यावर असणारे परंपरावादी संस्कार! त्यांचा पती ज्यावेळी वैराग्याच्या गोष्टी बोलू लागतो त्यावेळी त्यांचा जीव अक्षरश: कासावीस होतो. पती हा परमेश्वर असून त्याच्या छायेविना स्त्री-जीवन शून्य आहे. अशी त्यांची पक्की धारणा आहे. कारण त्या म्हणतात-

भ्रतारे वैराग्य घेतलीया वरी । जीव हा निर्धारी देईन मी ।।
भ्रताराचे तीर्थ न सापडे जरी । अन्न खाय तरी मांस आम्हा ।।
भ्रताराचे शेष न सापडे तरी । पापे माझ्या शिरी त्रैलोक्याची ।।
चित्त हे भ्रताराविण जरी जायें । तरी वास होय नरकी आम्हा ।।
भ्रतारदर्शनाविण जाय दिस । तरी तेची रास पातकांची ।।
बहिणी म्हणे मज अज्ञाची प्रमाण । ब्रह्म सनातन स्वामी माझा ।।

यावरून बहिणाबाईंचा परंपरावादी दृष्टिकोन स्पष्ट तर होतोच पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दुहेरी वीण आपल्याला स्पष्ट दिसू लागते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पदर गुरुकृपेमुळे अध्यात्माच्या रंगाने पूर्ण रंगलेला आहे. तो अनुभव वर्णन करताना त्या म्हणतात-

निशींचिया भरीं दिवस न राती । प्रकाश ना ज्योती कैसे माये ।।
हे सुख जाणती जाणते स्वभावे । पूर्णकृपा देवे केली ज्यांसी ।।
बिंबी बिंब कैसे सामावोनि गेले । स्वरूप कोंदले दशदिशा ।।
बहिणी म्हणे तेथे बोलावे ते काय । मज मीच पाहे हरपले ।।

योगाची ही पायरी बहिणाबाईंनी आपल्या मानसिक निर्धाराने गाठली आहे. हे ध्येय गाठताना त्यांनी आपला स्वधर्म मात्र सोडला नाही. आपल्या प्रारब्धाला दोष देत त्या स्वस्थही बसल्या नाहीत. त्या स्वत:च म्हणतात-

चित्ती समाधान केले असे एक । प्रारब्धे हे दु:ख आले भोगा ।।
भोगणे न चुके ब्रह्मादिका दु:ख । इतर हे रंक कोण तेथे ?
बहिणी म्हणे माझ्या देहाचे प्रारब्ध । ऐसिया गोविंद काय करी ।।

प्रापंचिक दु:ख स्वीकारताना त्यांनी एक विलक्षण समंजसपणा दाखविला आहे. आपल्या वाट्याला आलेले हे भोग हे सर्वस्वी आपल्या कर्माचे फळ असून त्याच्यापुढे प्रत्यक्ष भगवंतही जाऊ शकत नाही. दु:खाशी समझोता करण्याची त्यांची ही पद्धत हा त्यांचा तडजोडवादी विचार आहे. आणि तो त्यांनी स्वधर्म राखण्यासाठी स्वीकारलेला आहे. परंतु त्याचबरोबर त्यांच्यातील साधक अत्यंत ठाम निश्चय करून उठतो-

गांजविसी देह भ्रताराचे हाते । माझीया तो चित्ते नेम केला ।।
न सोडी भजन प्राणही गेलिया । आता देवराया दीनबंधो ।।
पडो देह परी राहतसे हेत । पहावा अनंत ज्ञानदृष्टी ।।
करावी हे भक्ती स्वधर्मे-आचारे । तुज ज्ञानद्वारे ओळखावी ।।

या विलक्षण निर्धारामुळे आणि सर्व बाजूंनी गळचेपी झाल्यामुळे अधिक जोराने त्यांच्यातील अध्यात्मउर्मी उसळी मारतात आणि सतत प्रपंचात वावरताना त्यांचा देह, चित्त मात्र सर्वस्वी आपल्या गुरूजवळ ठेवून देतात. देहूला आल्यानंतर ज्यावेळी त्यांची भेट तुकाराम महाराजांशी होत नाही त्यावेळी त्यांचे तगमगणारे मन एकांतात जाऊन ध्यानस्थ झाले आणि जप, अनुष्ठान काहीही माहिती नसताना ते विठोबाच्या मूर्तीशी तदाकार पावले.

गुरुभेट

गुरूंच्या भेटीसाठी आत्यंतिक ओढीने आसुसलेले मन विठोबाच्या चरणी ठेवताच देहू मंदिरातील आनंदओवरीत बहिणाबाई आपल्या गुरूंच्या सन्मुख उभ्या राहिल्या. त्यांचा हा स्वप्न-साक्षात्कार त्यांच्या विलक्षण तळमळीचा आणि अथक प्रयत्नांचा मोठा विजय आहे. या गुप्तरूपाने झालेल्या दर्शनात तुकाराम महाराजांनी बहिणाबाईंना स्वप्नात दिलेला षडाक्षरी मंत्र आठवला. त्यांच्या मस्तकी हात ठेवून त्यांना

कवित्वाचे वरदान दिले. त्यांची सगळी दु:खे आणि चिंता, सगळी तगमग आणि तडफड त्या दर्शनामुळे निघून गेली. त्या शांत, प्रसन्न झाल्या. आपल्या या आनंदनिर्भर स्थितीचे वर्णन त्यांनी स्वत:च केले आहे -

बहिणी म्हणे हात घातला मस्तकी ।
इंद्रियांच्या वृत्ती ओसरल्या ।।
ते सुख सांगता वाचे पडे मौन ।
जाणती ते धन्य गुरुभक्त ।।
झालासे आनंद इंद्रियांचे द्वारी ।
बैसले शेजारी चैतन्याचे ।।
घट हा बुडावा जैसा डोहां आंत ।
न फुटता पाणी ओतप्रोत ।।''

ज्ञानवती बहिणाबाई

तुकाराम महाराजांनी दिलेले कवित्वाचे वरदान हे बहिणाबाईंस बोलते करते झाले. त्याचबरोबर ब्राह्मणकन्या बहिणाबाईंचे गुरू तिच्यापेक्षा कनिष्ठ जातीतील तुकाराम हे झाल्याने बहिणाबाईंना समाजाचा रोषही पत्करावा लागला. त्यासाठी स्वत:च्या पतीपासून ते मंबाजीबाबांपर्यंत अनेकांकडून तिला छळ सोसावा लागला. त्यावेळी देहू येथे मंबाजी गोसावी ही एक असामी राहत असे. तुकाराम महाराजांच्या दर्शनार्थ देहूला बहिणाबाई व तिचे पती आले होते. पांडुरंगाच्या देवळात त्यांना तुकोबारायांचे दर्शन झाले. त्यांच्या कीर्तनसुखाचा लाभ घेण्यासाठी ही मंडळी तेथे राहिली. ह्या मंबाजीने बहिणाबाईंच्या तोंडून तुकोबाराय हे तिचे गुरू असल्याचे ऐकले आणि त्याच्या परंपरावादी कर्मठ मनाचा तिळपापड झाला. या गुरु-शिष्येविरुद्ध त्याने पुण्यापर्यंत धर्मशास्त्र्यांकडे तक्रारी नेल्या. बहिणाबाईंना देखील त्राही भगवान करून सोडले. परंतु तुकोबारायांच्या साधुत्वामुळे शेवटी मंबाजीला पश्चाताप झाला. याचवेळी काय तो बहिणाबाईंना आपल्या सद्गुरूंचा थोडाफार सहवास लाभला. यामध्येच बहिणाबाईंनी योगाची अशी पायरी गाठली की ज्याद्वारे त्या आपले मागचे १२ जन्म स्पष्टपणे पाहू शकल्या. 'निर्याणपर अभंग' या आपल्या रचनेत त्यांनी हे १२ जन्म वर्णित केलेले आहेत.

बहिणाबाईंच्या अभंगांचे सहजपणे वर्गीकरण करता येण्यासारखे आहे. त्यांनी खालील ठळक विषयांवर अभंग लिहिलेले आहेत -

ज्ञान, भक्ती, संत, सद्गुरू, नाममाहात्म्य, तुलसी-माहात्म्य, पंढरी-माहात्म्य, रूपकात्मक अभंग अशा अनेक विषयांवर अभंग लिहिलेले आहेत. तरीही या सर्व अभंगांमध्ये त्यांच्या आत्मनिवेदनामध्ये आलेले निर्याणपर अभंग हा संतसाहित्यामधील फार मोठा चमत्कार मानावा लागेल. मराठी अभंगसृष्टीमधीलच नव्हे तर एकूण भारतीय संतपरंपरेत देखील १२ जन्मांची पूर्वकथा स्वमुखे सांगण्याचे हे एक अपूर्व, विस्मयकारक आणि नाट्यपूर्ण कथन म्हणावे लागेल. या १२ जन्मांसंबंधीची अभंगगाथेत येणारी माहिती पुढीलप्रमाणे-

जन्माचा अनुक्रम	गाव	जात	नाव	वय	आई	वडील
१.	बेटावद	वैश्य	वारूणी	१३	रूपवंती	केदार
२.	फल्गुतीरी कुमचक्र	वैश्य		२८		सात्त्विक
३.	गोदातीरी ब्रह्मगिरी	वैश्य	हेमकळा उर्फ हेमवती	२४	भामिनी	वर्धमान
४.		गवळी				
५.						
६.						
७.				६६		
८.	वेरूळ	क्षत्रिय		१८		धर्मदत्त
९.		क्षत्रिय		९	'तेचि'	
१०.		ब्राह्मण		४२		कौशिक
११.	प्रवरा-संगम	ब्राह्मण	सौजिन्या	४३	सगुणा	गोकर्ण
१२.	लाखखणी	ब्राह्मण		३६	जानकी	रामचंद्र
१३.	देवगड	ब्राह्मण	बहिणाबाई	७२	जानकी	आऊदेव

हे पूर्वजन्मीच्या माहितीचे निवेदन मृत्युशय्येवर असताना बहिणाबाईंनी आपल्या पुत्राला उद्देशून केलेले आहे. त्या पुढे स्पष्ट म्हणतात-

अवघेची ते जन्म आठवती मज । अंतरेंचि गूज मृत्युवेळा ।।
आरशात जैसे दिसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसती डोळा ।।

आंत्यतिक आध्यात्मिक उन्नती पावलेल्या मनुष्यप्राण्यास त्याच्या अंतकाली एकप्रकारची दिव्यदृष्टी प्राप्त होऊन काळाच्या उदरात गडप झालेल्या अनेक गोष्टी चित्रपटाप्रमाणे स्पष्ट दिसत असाव्यात असे अनेक महात्म्यांच्या अंतकालीन उद्गारांवरून स्पष्ट दिसते. अर्थात या आशंकेचे समर्पक उत्तर केवळ तज्ज्ञ लोकच देऊ शकतील आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे विशिष्ट ज्ञानाची पात्रता असल्याशिवाय ते समजून घेता येणार नाही. या बहिणाबाईंच्या चमत्काराचा संबंध केवळ श्रद्धेशी नसून शास्त्र, योगशास्त्र, परामानसशास्त्र अशा अनेक विषयांशी आहे. अध्यात्मशास्त्रातील अधिकारीजनच हा चमत्कार स्पष्ट करू शकतील व समजू शकतील. आपल्यासारख्या जनांनी बहिणाबाईंचा अधिकार मान्य केल्यामुळे त्यांच्या या चमत्काराबद्दल आपण त्यांना महायोगिनी एवढेच म्हणू शकतो. कारण योगमार्गामध्ये 'जातिस्मरत्व' या नावाची एक सिद्धी आहे आणि त्या सिद्धीच्या योगाने पूर्वजन्म पाहता येतात असे योगशास्त्र सांगते.(संदर्भ : पातंजल-योगसूत्रे-विभूतिपाद-सूत्र १८वे) त्यामुळे संत बहिणाबाई या योगशास्त्रातील उच्चपदस्थ अधिकारी ठरतात.

या श्रेष्ठ स्त्रीसंताच्या अभंग साहित्याचा मागोवा घेतल्याशिवाय त्यांचे चरित्र पूर्ण होणार नाही.

समाजप्रबोधनपर अभंग

तुकाराम महाराजांच्या नंतर सामाजिक समता प्रस्थापित करणारा भागवतधर्म वाढविण्याचे कार्य प्रामुख्याने बहिणाबाईंनी केले. समाजातील कुठलाही भेदाभेद असो, त्याला त्यांनी कडाडून विरोध केला. त्या म्हणतात -

ब्रह्म जाणे तोचि ब्राह्मण बोलिजे । येर ते सहजे ब्रह्मबीज ।।
जेथे विकल्प तुटला । तेथे वर्ण-भेद मिथ्या बोला ।।

समाजातील उच्च-नीचत्व बहिणाबाई अजिबात मानत नव्हत्या हे सांगण्यास खरे तर दुसरा कुठलाच पुरावा नको. कारण त्या स्वत: ब्राह्मणकुळातल्या असून कनिष्ठ कुळातील तुकोबारायांना त्यांनी आपले गुरू मानले. एवढेच नव्हे तर,

तुकोबाचे ठायी आदर्श ब्राह्मण ।।

असे देखील गर्जून सांगितले. कारण त्यांचा पारमार्थिक समतावाद बहिणाबाईंच्या मनाला अत्यंत भावलेला होता. संत-समागमाला अत्यंत उत्सुक असलेल्या भक्तिपरायण मनाच्या बहिणाबाई भोंदू संत-साधूंवर मात्र कडाडून हल्ला करतात-

वरीवरी वेष संताचा । भीतरी धुमकस इंद्रियांचा ।।
ऐसे संत जाले कली । बोले बोले तो न पाळी ।।
सभा देखोनि धरी मौन । मागे भूंके जैसे श्वान ।।
कामाचे विकिले क्रोधाचे जिंकिले ।
लोभांचे अंकिले सर्वभावे ।।
आशेलागी जया आंदण दिधले ।
ममतेचे जाले सेवक ते ।।
बहेणि म्हणे तेचि ग्रासिले मायेने ।
आम्हा सोडवणे केवि होती ।।

बहिणाबाईचा परमार्थ विचार

वैराग्य घेऊनच जन्माला आलेल्या बहिणाबाई भक्तीची शिडी करून निर्धाराचा हात धरून सद्‌गुरूंच्या चरणी येऊन पोचल्या. या सगळ्या साधनांसह त्यांना ज्ञान न होते तरच नवल. ज्ञानाची महती सांगताना आणि ईश्वराचे अस्तित्व समजावताना त्या म्हणतात-

तूप असे क्षीरआत । साकर ऊसाच्या रसात ।।
परी पाहिजे हो ज्ञान । वस्तुप्राप्तीचे कारण ।।
सोनयाचे होती नग । पट सूताचे अनेक ।।
अहो काष्ठामाजी अग्नी । तिळामाजी तेल जाण ।।
बहिणी म्हणे देही देव । ज्ञानेविण सर्ववाव ।।

माया आणि ब्रह्म यांचे निरूपण करताना बहिणाबाई लिहितात -

ब्रह्मा एकले ते गमेना म्हणूनि ।
स्फूर्ति हे चिंतनी स्वसंवेद्य ।
ब्रह्मापासुनिया जाली म्हणो माया ।
उपाधी हे तया केवी घडे ?।।
माया ब्रह्मी नाही ऐसे म्हणो जरी ।
स्वतंत्रता तरी म्हणो नये ।।
ब्रह्म तो अद्वय श्रुतीचे संमते ।
वेगळी माया ते म्हणो कैसी ।।
सूत वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजे ।
ज्ञानवृष्टी वोजे पाहिलीया ।।
बहेणि म्हणे ऐसा पाहता विवेक ।
सहजचि ऐक्य मायाब्रह्म ।।

आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करताना त्या म्हणतात-

आकाशीचा सूर्य जळात बिंबला ।
तरी काय बुडाला तयामाजी ।।
तैसा या शरीरी अलिप्तचि असे ।
इंद्रियसमरसे असोनिया ।।

आत्मा म्हणजे देह नव्हे, आत्मा म्हणजे इंद्रिय नव्हे. परंतु देहांतर्गत कार्य करणारा मात्र आहे. आत्मबोध होण्यासाठी मात्र सद्‌गुरूकृपा हवी. म्हणजेच साधकाच्या साधनेला यश मिळते असा निर्वाळा बहिणाबाई ठामपणे देतात.

बहिणी म्हणे ब्रह्मांडा सगट । भरी-न मना गुरुकृपे तुझा रे घोट ।।

उपदेशपर अभंग

बहिणाबाई एक प्रापंचिक स्त्री, परंतु परमार्थामध्ये आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेणाऱ्या त्या साधिकाही होत्या. त्यांनी याबाबत स्त्री-पुरुषांना दिलेला संदेशही अत्यंत अद्भुत आणि जगावेगळा आहे. समाजातील नियमांचे पालन करणे हे संत सज्जनांचे कर्तव्य आहे. असे इतर संतांप्रमाणेच बहिणाबाई आग्रहाने सांगतात. परंतु त्या स्वत:च गृहस्थाश्रमी असल्यामुळे त्यांच्या या म्हणण्याला स्वानुभवाचा भक्कम पाया आहे. त्यामुळेच त्यांच्या उपदेशपर अभंगांना एक प्रकारचे वजन प्राप्त झाले आहे. त्या म्हणतात -

प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेची गगन झेलियेले ।।

वास्तविक ही ओवी म्हणजे बहिणाबाईंच्या संपूर्ण जीवनपटाचे सार आहे. कारण बहिणाबाईंनी स्वत:च हे 'शिवधनुष्य' पेलून दाखविले आहे. पुढे त्या म्हणतात -

काया वाचा मने पतीसी शरण । तिच्या ब्रह्मज्ञान दारी लोळे ।।

सर्वस्वी विसंगत पती लाभूनही बहिणाबाईंनी त्याच्या पायीच आपली निष्ठा ठेवली होती. या काळामध्ये कदाचित त्यांची ही निष्ठा पटण्यासारखी नसेलही परंतु ३०० वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीत बहिणाबाईंनी दाखविलेले हे कर्तृत्व म्हणजे खरे तर एका स्त्रीने केलेला हा फार मोठा पुरुषार्थ आहे. त्यामुळे -

पतीचीया मता अनुसरोनी पतिव्रता ।
अनायासे आत्महिता भेटेचि ते ।।

हे ज्ञानेश्वरांचे म्हणणे बहिणाबाईंनी तंतोतंत आचरून दाखविले. हळूहळू आपल्या पतीला आपल्या निग्रही आणि भक्तिपूर्ण स्वभावामुळे त्यांनी जिंकून घेतले. एका बाजूला प्रपंच करत असतानाच दुसऱ्या बाजूने

आपली कठोर साधना चालू ठेवली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही दुहेरी वीण त्यांच्या पारमार्थिक आणि प्रापंचिक यशापाशी येऊन थांबते. कोणत्याही परिस्थितीत कुटुंब विच्छेद होऊ द्यायचा नाही किंवा संसाराचे हित पाहायचे हा संदेश देताना त्या म्हणतात–

आपुलिया संसारा काही हित करा । सांगताहे धरा मनोभावे ।

अशा या श्रेष्ठ संत कवयित्री मृत्युशय्येवर आपले पूर्वीचे १२ जन्म आपल्या मुलाला सांगून पुढे एकच दिवसाने म्हणजे अश्विन शु. प्रतिपदा, बुधवार, इ.स. १७०० साली शिऊर येथे समाधिस्थ झाल्या. या ठिकाणी प्रणिता तीर्थावर त्यांची समाधी आहे. बहिणाबाईंनी मिळविलेले आत्मज्ञान म्हणजे गृहस्थाश्रमी स्त्रीला आपल्या प्रयत्नांच्या जोरावर मुक्ती मिळविता येते याचे एक ढळढळीत उदाहरण आहे. त्यांचे कवित्व, त्यांची ज्ञानलालसा आणि त्यांचा बौद्धिक विकास आजच्या आधुनिक स्त्रीलाही अनुकरणीय असाच आहे. 'वज्रसूची' या दुर्मिळ उपनिषदाचा अभ्यास करणाऱ्या बहिणाबाई एकट्याच स्त्री-संत होत. बहिणाबाईंचे साहित्य वाचत असताना त्यांच्या अनेक प्रतिमा आपल्या डोळ्यांपुढे तरळू लागतात.

- पतीच्या छळाला अजिबात न डगमगता आपल्या भूमिकेवर ठामपणे उभ्या राहणाऱ्या एक साधिका.
- पती हेच सर्वस्व मानून त्याच्याशी एकनिष्ठ राहणाऱ्या पतिव्रता.
- तडजोड म्हणजे शरणागती नव्हे या न्यायाने डोळे उघडे ठेवून सामोपचाराने वागणाऱ्या समंजस परंतु कणखर पत्नी.
- आपल्या पुत्रालाही अध्यात्मज्ञानाची ओळख करून देणाऱ्या वत्सल माता.
- गुरूंना शरणागत होऊन त्यांच्या कृपेला पात्र ठरलेल्या यथार्थ शिष्या.
- विलक्षण शब्दकळा, लावण्य आणि अर्थगर्भिता असलेली काव्यसृष्टी निर्माण करणाऱ्या कवयित्री.

पूर्वजन्माची उकल करत असतानाच वर्तमान जन्माचे रहस्य सहजपणे उलगडणाऱ्या एक महायोगिनी. त्यांची हीच एकमेव प्रतिमा आपल्या मनात रेंगाळत राहते आणि त्या प्रतिमेपुढेच आपण नतमस्तक होतो.

सौ. जयश्री नातू
ए-१२, अनुबंध सोसायटी, रामकृष्ण मठाजवळ,
सिंहगड रोड, पुणे - ४११ ०३०.
फोन - ०२०-२४३२१९७२, मो. ९८८१७९४०९०

संदर्भग्रंथ :

१) **संत बहेणाबाईंची गाथा**– संपादिका शालिनी जावडेकर
२) **संत कवयित्री** – लेखिका इंदुमती शेवडे
३) **प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य** – लेखिका डॉ. सुहासिनी इर्लेकर
४) **योगविद्या** – लेखक श्री. शं. खानवेलकर



संत बहिणाबाईंची गुरुपरंपरा

सौ. विजया श्रीकांत सबनीस

अेम्.अे. मराठी, शिक्षिका

पत्रद्वारा अभ्यास, अभ्यासक्रमासाठी १० वर्षे समीक्षक म्हणून काम. आत्मदर्शन व स्त्रीसंत पुस्तक प्रकाशित. स्तोत्रपठण व भगवद्गीता पठणाचे नि:शुल्क वर्ग घेतात. संत वाङ्मयावर निरूपण स्त्रीसंतावर चिंतन. नाशिक येथील अनुंबध व इतर पुरस्कारांनी सन्मानित.

मानवी जीवनात गुरूंचे महत्त्व फार मानले गेले आहे. प्राचीन काळापासून समाजव्यवस्था सुरळीत राखण्याचे काम गुरूसंस्थेने केले आहे. गुरुसंस्था ही भारतीय संस्कृतीचा कणा आहे. पृथ्वीच्या पाठीवर आजवर अनेक संस्कृती आल्या आणि पुढे त्या काळाच्या ओघात नामशेषही झाल्या. परंतु भारतीय संस्कृतीवर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आक्रमणे होऊनही ती अभंगच राहिली. याचे कारण एकच, बलवत्तर अशी आपली गुरुसंस्था.

संत बहिणाबाईंची गुरुपरंपरा जाणून घेण्याआधी त्यांचे थोडे चरित्र पाहणे सयुक्तिक ठरेल. बहिणाबाई सतराव्या शतकातील. मराठवाड्यातील देवगाव या गावी कुलकर्णी नामक सत्वसंपन्न दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म इ.स. १६२९ मध्ये झाला. विधात्याने त्यांच्या जन्मकुंडलीत त्यांचे समग्र जीवन जगावेगळे जाणार असे लिहून ठेवले असावे. कारण वयाच्या केवळ तिसऱ्या वर्षी त्यांचा विवाह एका तीस वर्षाच्या बिजवराशी झाला. इतक्या लहान वयात छोट्या बहिणाने पाठकांच्या घरी 'बहिणा रत्नाकर पाठक' बनून प्रवेश केला. तेव्हापासून ती आपलं बालपण हरवून बसली. तिच्या वडीलांवर ओढवलेल्या अवघड काळात माहेरच्या माणसांची जबाबदारी तिच्या नवऱ्याने म्हणजे रत्नाकर पाठकने घेतली. सहाजिकच आपल्या कर्मठ नवऱ्याचा मिंधेपणाही तिच्या वाट्याला आला. उपजिविकेसाठी या कुटुंबाला भिक्षापात्र हाती घेऊन फिरस्त्याचे जीवन जगावे लागले. वयाच्या ९व्या- १० व्या वर्षीच बहिणा सर्वांची सर्व कामे व्यवस्थित पार पाडू लागली. पण तरीही नवऱ्याने कोंडून ठेवणे, उपाशी ठेवणे, मारझोड करणे अशा प्रकारांना तिला मुकाट्याने सामोरे जावे लागत होते. विधात्याने हे खडतर जीवन जसे तिच्या पदरी टाकले होते तसेच उच्चप्रतीचे अध्यात्मिक जीवन जगण्याचे भाग्यही लिहिले होते. ती दिवसभरात मिळेल तो वेळ ईशचिंतनात आणि संतांच्या स्मरणात घालवत होती. मनातल्या मनात संतश्रेष्ठ जनाबाईंचा अभंग तिला दिलासा देत होता, जनाबाई त्यांच्या एका अभंगात म्हणतात,

''स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी ।
संतांचे घरीची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा ।''

झाडलोट, धुणी-भांडी, दळण कांडण करणाऱ्या जनाबाई संत पदवीला पोचल्या हा आदर्श बहिणाच्या डोळ्यापुढे होता. त्यामुळे बहिणाने कधी परिस्थितीला बोल लावला नाही की कधी नवऱ्याला दोष दिला नाही. ईश्वरनिष्ठ जीवनामुळे बहिणाबाईंच्यात प्रचंड सहनशीलता आली. या आत्मिक बळावरच होणारे सर्व आघात त्या सहजपणे पचवतात. पुढे आपले अनुभव अभंगरूपात लिहिताना त्या आपल्या लग्नाविषयी 'द्विितय संबंधी वरुषा तिसाचा । नोवरा भाग्याचा भाग्यवंत।' असं मोठ्या आदराने म्हणतात. आपल्या कर्मठ, तापट व हट्टाग्रही नवऱ्याला त्या ज्ञानवंत आणि भाग्यवंत म्हणून स्वीकारतात.

बहिणाबाई आणि त्यांचे कुटुंबीय प्रवरानगर- पंढरपूर- शिखर शिंगणापूर- रहिमतपूर असे मजल दरमजल करीत दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूरला येऊन स्थायिक झाले. तेथील मुक्कामात बहिणाबाईंना 'जयरामस्वामी वडगावकर' यांची कीर्तने आणि प्रवचने ऐकायला मिळाली. जयरामस्वामी हे दासपंचायतनापैकी एक. समर्थ रामदासांच्या काळात समर्थांच्या कार्याने प्रभावित झालेले जे पाच साधुपुरुष होऊन गेले त्यातील एक 'जयरामस्वामी' होते. सातारा जिल्ह्यातील वडगावच्या गादीचे हे मठाधिपती होते. ही गादी लिंगायत जंगमाची होती. या गादीचे अधिकारी 'कृष्णाप्पा' यांचे जयरामस्वामी अनुग्रहीत होते. त्यामुळे वडगावच्या लिंगायतपंथी गादीचे ते मठाधिपती झाले. समर्थांच्या सहवासात आल्याने समर्थांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर होताच. पंढरपुरात चवदा वर्षे राहिल्याने भागवत संप्रदायाचा प्रभावही त्यांच्यावर होता. उत्तम कीर्तनकार म्हणून ते प्रसिद्ध होते. म्हणजे जातीने ब्राह्मण, गुरुपरंपरेने लिंगायत आणि समर्थ रामदासांच्या कर्तृत्वाने आणि व्यक्तित्वाने भारावून गेल्यामुळे समर्थ सांप्रदायिक असे बहुआयामी आणि समन्वयवादी व्यक्तिमत्त्वाचे जयरामस्वामी होते. त्यांची कीर्तने अत्यंत प्रासादिक, रसाळ आणि भक्तीपूर्ण असत. बहिणाच्या लहान वयात अशा थोर साधुपुरुषाचा सहवास तिला लाभला. त्यांची कीर्तने आणि प्रवचने ती अत्यंत एकाग्रतेने व तन्मयतेने ऐकत असे. जयरामस्वामींची कीर्तने ऐकतच बहिणाचा अध्यात्मिक पिंड पोसला. स्वामी कीर्तनात निरूपणासाठी जगद्गुरू तुकाराम महाराजांचे

अभंग घेत असत. ते अभंग बहिणा रोज आळवून आळवून म्हणत असे. सतत अभंगांचं पठण, चिंतन, स्मरण यातून त्या तुकोबामय झाल्या. तुकोबांच्या अभंगातील तत्त्वज्ञान, त्यांनी गायिलेला भक्तीचा महिमा बहिणाबाईंच्या मनावर ठसला. मुक्तीवरील भक्ती ही तुकोबांची संकल्पना बहिणाबाईंच्या मनात घर करून बसली. जयरामस्वामींनी सांगितलेला तुकोबांचा अभंग त्या मनात घोळवत होत्या.

''न लगे धन, मुक्ती, संपदा । संतसंग देई सदा ।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।''

बहिणाला वाटे ''केवढा गूढ, गहन आशय भरून राहिला आहे या अभंगात. तुकोबांचे अभंग किती भावसंपन्न, हृदयाला जाऊन भिडणारे!'' जयरामस्वामींच्या विषयी त्यांच्या मनात नितांत आदर होता. त्यांच्या आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी स्वामींनीच करून घेतली होती. मात्र तरीही बहिणाबाईंनी तुकोबांना मनोमन गुरू मानले होते. त्यांच्या भेटीची ओढ त्यांना लागली होती. तुकोबांच्या भेटीचा बहिणाबाईंना ध्यास लागला. सद्‌गुरूंच्या भेटीसाठी त्या तळमळू लागल्या. तुकोबांनी त्यांचं अवघं भावविश्व व्यापून टाकलं. जणू त्यांच्याशी बहिणाबाईंचे जन्मोजन्मीचे गुरू-शिष्याचे नाते होते. त्या आपल्या एका अभंगात ही तळमळ व्यक्त करतात,

''तुकोबांची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ।।
तुकोबांचे ध्यान करूनी अंतरी । राहे त्या भीतरी देहामाजी ।।
बहिणी म्हणे तुका सद्‌गुरू सहोदर । भेटता अपार सुख आहे ।।''

सततच्या अशा ध्यासामुळे आणि आंतरीक तळमळीमुळे त्यांना खरोखरीच एक दिवस तुकोबांनी स्वप्नात दर्शन दिले. प्रत्यक्ष पित्याचे वात्सल्य त्यांनी तुकोबांच्या रूपाने स्वप्नात अनुभवले. स्वप्नातील आपल्या सद्‌गुरूंचे दर्शन हा त्यांच्या आनंदाचा विषय झाला. आपल्या सद्‌गुरूंना त्यांनी अत्यंत भक्तिभावाने स्वप्नातच वंदन केले. प्रत्यक्ष बोलणे काहीच झाले नाही. तरी 'ये हृदयीचे ते हृदयी घातले।' अशी अनुभूती त्यांना आली. मुळातच त्या अत्यंत संवेदनाशील व हळुवार होत्या. आपल्या एका अभंगात सद्‌गुरू भेटीचा अनुभव त्या सांगतात,

''तुकारामरूपे येऊन प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळिजे ।
नको करू चिंता असे मी तुजपाशी । घेई अमृताशी हातींचिया।।''

याच अभंगात त्या पुढे म्हणतात,

''ठेवोनिया कर मस्तकी बोलीला । मंत्र सांगितला कर्णरंध्री ।
कार्तिकात वद्य पंचमी रविवार । स्वप्नींचा विचार गुरुकृपा ।।''

सद्‌गुरूंच्या स्वप्नातील अनुग्रहाने बहिणाबाईंचे मन आनंदाने कोंदून गेले. त्या सतत मंत्राची आळवणी करू लागल्या. सद्‌गुरूंनी मला जणू अमृतच पाजले असे त्या आपला अनुभव सांगताना म्हणतात. स्वप्नातल्या दर्शनाने सद्‌गुरूंच्या प्रत्यक्ष भेटीची ओढ आणखीनच वाढली. अत्यंत उत्कट ओढीने त्या म्हणतात,

''न बोलवे शब्द अंतरीचा धावा । नायके तुकोबा काय की जे ।।
बहिणी म्हणे मीच असेन अपराधी । अन्याय त्रिशुद्धी काय त्यांचा।।''

तुकोबांना सद्‌गुरू मानण्यामुळे आणि बहिणाबाईंची त्यांच्यावर असलेली निष्ठा यामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनात मात्र वादळ निर्माण झाले. बहिणाबाई स्वत: आत्मतत्त्वाची उपासना करणाऱ्या होत्या. तर पती कर्मठ वेदान्ती ब्राह्मण. त्याला आपल्या पत्नीने तुकोबांना गुरू करणे अजिबात मान्य नव्हते. पण बहिणाबाईंची ती जन्मोजन्मींची ओढ होती. चैतन्य संप्रदायाशी त्यांचे जणू अतूट नाते होते. त्या आत्मसाक्षात्कारी होत्या. त्या आपल्या सद्‌गुरूंची जात पहात नव्हत्या. त्यांचं श्रेष्ठत्व त्यांच्या मनावर ठसलं होतं. पण पतीला विरोध न करता अत्यंत संयमशील वृत्तीने त्यांनी आपले विचार पतीला पटवून दिले. रत्नाकरलाही स्वप्नात एका साधू पुरुषाने 'पत्नी स्वधर्म पालन करणारी आहे. तिचे विचार जाणून घे. त्यातच तुझे कल्याण आहे' असा संदेश दिला. आणि त्यानंतर मात्र हे कुटुंब देहूत तुकारामांच्या आनंद ओवरीत येऊन राहू लागले. तुकोबांचे प्रत्यक्ष दर्शन झाले आणि आपल्याला स्वप्नात अनुग्रह दिलेले हेच ते सत्पुरुष याची बहिणाबाईंना खात्री पटली. तुकोबांचा प्रत्यक्ष सहवासही लाभला. बहिणाबाईंच्या चित्तवृत्ती उचंबळून आल्या. डोळे पुन:पुन्हा आसवांनी भरून येऊ लागले. सद्‌गुरूंच्या पायावर डोके ठेवून तिने त्यांचे चरण आपल्या अश्रूंनी धुवून काढले. तुकोबांनी सहजभावाने आशीर्वाद दिला, ''पांडुरंगाची कृपा आपल्यावर अखंड राहो.''

देहूच्या वास्तव्यात बहिणाबाईंचे जीवन आत्मप्रकाशाने उजळून निघाले. जीवनातील सारे द्वैत मावळले. अद्वैतभावाचा उदय झाला. त्या म्हणतात, ''तुकोबांची पदे अद्वैत प्रसिद्ध । त्याचा अनुवाद चित्त झुरवी।'' तुकोबांविषयींचा कृतज्ञताभाव अंत:करणात दाटून येत होता. प्रत्यक्ष ब्रह्मानुभूती घेतल्यामुळे त्या म्हणतात, ''बहीणीस भेटला तुका । महावाक्य झाले फुका''

बहिणाबाईंना आपल्या सद्‌गुरूंविषयी जसा आदर होता तसा आपल्या गुरूपरंपरेविषयी अभिमान होता. एका अभंगात त्या आपल्या गुरूपरंपरेचा गौरव करताना म्हणतात,

''गुरू परंपरा आम्हा चैतन्य बळी ।
तयाचे स्मरणे आम्ही वैकुंठबळी ।।
नमस्कार हा तया साष्टांग माझा ।
वोवाळू जीवे साधु चैतन्यराजा ।।
चैतन्य सर्वगत व्यापक सद्‌गुरू ।
प्रगटला हा 'तुकाराम' वेषे दातारु ।।
तयाचे हे ध्यान सदा माझिये अंतरी ।
अंतरीचे ध्यान 'तुका' सबाह्यभ्यंतरी ।।
नेणे स्नान, दान, जप, आसन, मुद्रा ।
सदा सर्वकाळ ध्याऊ चैतन्यपदा ।।
बहिणी म्हणे मुक्त आम्ही सद्‌गुरूंचे ध्याने ।
प्रेमे भक्तिभावे तया वोवाळू प्राणे ।।''

चैतन्य सर्वव्यापक आहे. ते मला तुकोबांच्या रूपाने मिळाले आहे असे बहिणाबाई सांगतात. तुकोबांचे स्मरण म्हणजे विश्वव्यापक चैतन्याचेच स्मरण. ज्यावेळी हे विश्वचैतन्य पिंडात असणाऱ्या चैतन्याशी एकरूप होते त्यावेळी आत्मसाक्षात्कार होतो. या संप्रदायाचे हे वैशिष्ट्य आहे. बहिणाबाईंना आत्मसाक्षात्कार झाला. एकदा आत्मसाक्षात्कार

झाला की ईश्वरप्राप्तीची इतर साधने आपोआप गळून पडतात. म्हणून त्या म्हणतात, 'नेणे स्नान, दान, तप, आसन मुद्रा । सदा सर्वकाळ धाऊ चैतन्यपदा ।' तुकोबांचे ध्यान अंत:करणात ठेवून आयुष्यभर त्या त्यांची मानसपूजा करीत राहिल्या.

तुकाराम महाराज चैतन्य संप्रदायाचे मेरूमणी होते. बहिणाबाईंच्या या गुरुपरंपरेची माहिती मुळातून व्हावी म्हणून चैतन्य संप्रदायाची ओळख करून घ्यायला हवी. कारण तो मूळ स्रोत आहे. ही गुरुपरंपरा तुकारामांचे शिष्य निळोबाराय आपल्या एका अभंगात सांगतात. ते म्हणतात,

''मुख्य महाविष्णू चैतन्याचे मूळ । संप्रदाय फळ तेथूनिया ।।
हंसरूपी ब्रह्मा उपदेशी श्रीहरी । चतु:श्लोकी चारी भागवत।।''

म्हणजे चैतन्य संप्रदायाची परंपरा प्रत्यक्ष महाविष्णूपासून सुरू होते. विष्णूंनी हंस रूपाने येऊन ब्रह्मदेवांना उपदेश केला. हा उपदेश म्हणजेच चतु:श्लोकी भागवत. या अभंगात निळोबाराय पुढे म्हणतात,

''ते गुह्य विधाता सांगे नारदासी । नारदे व्यासासी निवेदिले ।।''

म्हणजे चैतन्य संप्रदायाचे गुह्यज्ञान ब्रह्मदेवांनी नारदांना व नारदांनी व्यासांना कथन केले. या चतु:श्लोकी भागवताचा विस्तार व्यासांनी बारा स्कंदात केला. हा भागवत ग्रंथ वारकरी संप्रदायाला दीपस्तंभाप्रमाणे आहे. पुढे संप्रदायाची ही परंपरा राघव चैतन्य, केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य यांनी चालविली. या बाबाजी चैतन्यांनी तुकोबांना स्वप्नात अनुग्रह दिला. या चैतन्य परंपरेतील बहिणाबाई हे एक अनमोल रत्न आहे. गुरूपरंपरेचा हा मूळ स्रोत पाहिल्यानंतर बहिणाबाईंच्या महानतेची खूण पटते.

बहिणाबाईंनी आयुष्यभर तुकोबांच्या रूपाने चैतन्याचे ध्यान केले. अशा अखंड ध्यानाने बहिणाबाईंना मुक्तीच्या दारात आणून सोडले. भक्ती हा पाचवा पुरुषार्थ त्यांनी साधला. गुरू करताना तो ब्रह्मवेत्ता, ज्ञानी व साक्षात्कारी असावा, त्याची जात पाहू नये हा पुरोगामी विचार बहिणाबाई सर्वांना देतात.

वयाच्या ७२व्या वर्षी त्यांचे महानिर्वाण झाले. १८ दिवस आधी त्यांना आपल्या मृत्यूची सूचना मिळाली होती. त्यांनी आपल्या मुलाला तशी पूर्व कल्पनाही दिली होती. गेल्या बारा जन्मांचे स्मरण त्यांना शेवटच्या काळात झाले. मरणसमयी त्या त्यांच्या शिऊर या गावी होत्या. त्यांच्या ईश्वरीय जीवनाची सांगता होण्याची वेळ जवळ आली होती. वैकुंठाहून श्रीरंग त्यांना खुणावत होता. शेवटी त्या म्हणतात, ''सरले संचित आयुष्य देहाचे । क्रीयमाण अंतीचे रामरूप ।'' अंतकाळी त्यांची आत्मरामाची भेट झाली आणि त्या रामरूप झाल्या.

(टीप : या लेखात संदर्भासाठी घेतलेले सर्व अभंग 'सकलसंतगाथा' (संपादक- काशिनाथ अनंत जोशी) भाग १ व भाग २ मधून घेतलेले आहेत.)

सौ. विजया श्रीकांत सबनीस
'माऊली' कृष्णा कॅनॉल जवळ, जनकल्याण पतसंस्थेसमोर,
विद्यानगर- कराड- ४१५१२४ फोन : ०२१६४-२७१२५२



तिनेच गगन झेलियेले

डॉ. सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी

अेम्.अे., पीएच्.डी., प्रबंध विषय – मराठी संतांच्या विरहिणी व गौळणी.
पुस्तके – १) अमृताची अक्षरे, २) अमृतमंत्र, ३) पारमार्थिक शब्दकोश, ४) पंचतीर्थ (३ खंड), ५) स्तोत्रांच्या गाभाऱ्यात.
गीता, ज्ञानेश्वरी तसेच सार्वभाषिक संतवाङ्मयावर प्रवचने.

"शुभ मंगलऽ सावधानऽऽ" लग्नघटिका जवळ आली होती. बहेणीच्या चिमुकल्या हातांना एवढा मोठा हार पेलवत नव्हता. "ए काकू, तू धर ना हा हार..." तिने शेजारी उभ्या असलेल्या काकूला सांगितले. तर काकूने हे मोठे डोळे करून तिच्याकडे पाहिले.

तेवढ्यात काय झाले, बहेणीला कळलेच नाही. मोठमोठ्यांनी वाद्ये वाजू लागली. कोणीतरी तिला वर उचलले आणि एका मुच्छीवाल्या बुवाच्या समोर नेले. "बहेणी, हार घाल त्यांना, हार घाल." सगळेच गलका करू लागले. तसे बहेणीने झटकन त्या बुवाच्या गळ्यात हार घातला. तोच तिच्याही गळ्यात हार येऊन पडला. हारातल्या कलाबुतीने बहेणीची मान हुळहुळू लागली. नेसविलेल्या शालूचा घोळ तिला सावरता येईना. पण "बहेणेबाळा, वडील माणसे जे जे सांगतील ते ते ऐकायचं बरं का..." असं आईने तिला बजावलं होतं. त्यामुळे ती निमुटपणे भटजीकाका सांगतील ते करीत होती.

तीन वर्षाच्या बालिकेचे तीस वर्षाच्या बिजवराशी लग्न लागले होते...! ही घटना सोळाव्या शतकातली. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात देवगाव येथे आऊजी कुलकर्णी यांना नवसासायासाने कन्यारत्न झाले. कोरीव लेण्यांनी मंडित असलेल्या वेरूळ जवळचे हे गाव. जणु त्या लेण्यांमधली एक देवताच सजीव होऊन देगावी आली होती. लहानपणापासून समजुतदार असलेली बहेणा आईबाबांची लाडकी होती. पण त्या वेळच्या प्रथेप्रमाणे बहेणाला तिसरे वर्ष लागताच तिच्या आईवडिलांना तिच्या लग्नाची चिंता वाटू लागली...एक दिवस वैजापूर तालुक्यातील शिरूर या गावचा एक पाहुणा त्यांच्या घरी पाहुणा म्हणून आला. आणि गोजिरवाण्या बहेणाला पाहून त्याने लग्नाची मागणी घातली. "बहेणेसाठी स्थळ स्वत:हून चालत आले." या आनंदातच तिच्या आईवडिलांनी होकार दिला. आणि ऋण काढून त्या अजाण बालिकेचे लग्न लावून दिले...!

लग्नासाठी काढलेले ऋण काही फिटेना. तेव्हा बहेणाच्या आईवडिलांनी जावयाला बोलावून घेतले. त्या सर्वांनी खूप विचारविनिमय केला. आणि अखेरीस ऐन मध्यरात्री देवगाव सोडून ते परागंदा झाले!

मातापिता, तान्हा भाऊ आणि पती यांच्या समवेत कोवळ्या वयाची बहेणा अनवाणी रस्ता तुडवीत होती. "नवरा" नावाचा हा माणूस छोट्या छोट्या कारणांनी अंगावर वसकन् ओरडतो, हे तिला माहीत झाले होते. त्यामुळे पायात टोचलेल्या काट्याबद्दल ती काहीही बोलली नाही. गोदावरी संगमाचे पात्र वाटेत लागले. त्यावेळी नुकतेच उजाडले होते. सिद्धनाथाच्या मंदिरावर पहाटेचा सोनेरी प्रकाश पडला होता. नदीच्या शीतल जलात स्नान करताना सारा शीणभाग उतरल्यासारखे झाले.

सिद्धनाथाचे दर्शन घेताना बहेणीचे इवलेसे हृदय भक्तिभावाने भरून गेले. तनामनाला विसावा देणारे हे स्थळ सोडूच नये, असे तिला वाटले. "ए, अशी काय उभी वेंधळ्यासारखी, चलतेस का, देऊ एक रट्टा..." बहेणीचा कान पिळीत गंगाधरपंत म्हणजे बहेणीचा नवरा ओरडला. तशी पाय ओढीत बहेणी चालू लागली. "पती हाच आपला परमेश्वर ग बाई..." जानकीबाई – बहेणीच्या आई पुटपुटल्या. तशी बहेणीनेही त्यावर मान डोलाविली.

भिक्षा मागत, नाना तऱ्हेचे कष्ट सोसत ही मंडळी पंढरपूरला पोचली. **"चालता पाऊल पंढरीच्या वाटे । ब्रह्मसुख भेटे रोकडेचि।"** असे बहेणाबाईंनी आपल्या अभंगात लिहून ठेवले आहे. पंढरपूरला ही मंडळी पाचच दिवस राहिली. पण त्या पाच दिवसात विठोबाच्या नामसंकीर्तनाचा लाभ त्यांना झाला. भक्तिज्ञानाने बहेणाबाईची मनकमलिनी उमलू लागली. आपल्या प्राक्तनाला दोष न देता, वाट्याला आलेली कर्तव्यकर्मे करीत आपला जीवभाव शिवभावात समर्पित करायचा, ही जाण तिला कुमारवयातच आली.

यानंतर ही सर्व मंडळी कोल्हापुरी स्थिरावली. तेथे त्यांना हिरंभट नामक एका व्युत्पन्न ब्राह्मणाच्या घरी आश्रय मिळाला. बहेणाला तेथे रोज भागवत पुराण ऐकायला मिळाले. भागवत म्हणजे भक्तिरसात ओथंबलेल्या अध्यात्मज्ञानाची मेजवानीच. परमात्म्याबद्दलच्या अनिवार ओढीमध्ये स्वत:ला संपूर्णत: विसरायचे असते, हे बहेणाला दशमस्कंधातल्या रासपंचाध्यायीतून उमगले. व्रजगोपिकांची समर्पित वृत्ती तिच्यात जन्मताच होती.

हिरंभटाकडे चालणाऱ्या शास्त्रचर्चांमधून आत्मविद्या बहेणाच्या कानावर नित्य पडू लागली. आणि तिच्या बुद्धीच्या मूळ सुवर्णाला झळाळी प्राप्त होऊ लागली. याच सुमारास गंगाधरपंतांना एका सवत्स धेनूचे दान मिळाले. या गायवासरांचा बहेणेला खूप लळा लागला. वासरू तर बहेणाला एक पळभरही सोडेना. ती जेथे जाईल तेथे ते तिच्या मागे येई. ती कीर्तनाला गेली तरी ते तिच्याजवळ बसून तल्लीनतेने कीर्तन श्रवण करी. लोक तिचे व वासराचे कौतुक करीत.

एकदा जयरामस्वामी वडगावकर नावाचे एक साधुपुरुष कोल्हापुरास आले होते. ते दासपंचायतनातील एक होत. त्यांची कीर्तने अत्यंत रसाळ, भक्तिभावपूर्ण असत. बहेणाबाईंनीही त्या कीर्तनाचा वासरासह लाभ घेतला. कीर्तन संपल्यावर बहेणाबाईंनी बुवांच्या पायावर डोके ठेवले तसेच वासरानेही पुढच्या दोन पायांवर वाकून बुवांच्या पायावर मस्तक ठेवले. हे अद्‌भुत दृश्य पाहून सर्व लोक विस्मित झाले. पण बहेणीचे हे वासराबद्दलचे लोकविलक्षण प्रेम काही मत्सरी लोकांना पाहविले गेले नाही. त्यांनी या घटनेला विपरीत रूप देऊन गंगाधरपंतांचे कान भरले. आधीच कोपिष्ट असलेले गंगाधरपंत त्यामुळे अनावर क्रोधित होऊन, हातात सोटा घेऊनच घरी आले.

''बहेणा'' गंगाधरपंतांनी आल्या आल्या तार स्वरात हाक मारली. त्यांच्या त्या आवाजाने बहेणीसह इतर मंडळीही धसकून बाहेर आली. गंगाधरपंतांनी बहेणीचा हात ओढून तिला सोट्याने एकदम मारायलाच सुरुवात केली. बहेणीच्या आईवडीलांनी मध्ये पडायचा प्रयत्न केला. पण गंगाधरपंत त्यावेळी कोणाचेही काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.

''आपली जात काय, धर्म काय, कशाचीही चाड नाही हिला... गुराढोरांना मंदिरात नेऊन तमाशे करते...!''

बहेणीच्या पाठीवर, पोटऱ्यांवर...सर्वांगावरच सोट्याचे सपासप वार होत होते! दोन्ही हातांनी तोंड झाकून घेत ती सर्व सोसायचा प्रयत्न करीत होती. तरीही अनावर वेदनांनी तिच्या मुखातून जे चीत्कार बाहेर पडले, ते कानी पडून सभोवतालची माणसेच काय पण मुके प्राणीही विव्हल झाले! गायवासरू केविलवाणे हंबरू लागले! बहेणाच्या चीत्कारांनी तिच्या लाडक्या वासराच्या हृदयावरच वळ उठले!

मारून मारून थकल्यावर गंगाधरपंतांनी बहेणीची जणू मोट बांधून तिला माजघरात लोटून दिले. अतीव शारीरिक, मानसिक दु:खाने बहेणाची शुद्ध हरपली. त्या अवस्थेत ती तीन दिवस पडून होती!

इकडे, बहेणा दृष्टीस पडत नाही, हे पाहून गायवासरांनी चाऱ्यापाण्याला तोंड लावले नाही. बहेणाच्या दर्शनासाठी नजर लावून बसलेले वासरू मरणासन्न अवस्थेला आले! चौथ्या दिवशी जरा सावध झालेली बहेणा कशीबशी गोठ्याकडे गेली आणि वासराची अवस्था पाहून सुन्न झाली. त्याच्याजवळ जाऊन तिने त्याला कुरवाळले मात्र, वासराने आतापर्यंत तगवून ठेवलेला प्राण सोडला...!

बहेणाबाईंच्या दु:खाला पारावार राहिला नाही. त्यांच्या डोळ्यातले अश्रू आटून गेले. जगण्याची इच्छा राहिली नाही. अशा काळीज दुंभगलेल्या अवस्थेत असताना एका रात्री त्यांच्या स्वप्नात विवेकरूपी तेजस्वी ब्राह्मण आला. त्याने बहेणाबाईंना सावध केले. आध्यात्मिक साधनेसाठी साधन असणाऱ्या देहाला अति कष्टविता कामा नये, याची जाण बहेणाबाईंना आली. वासराच्या दु:खातून त्यांनी स्वत:ला सावरले.

''एक तत्त्व नाम दृढ धरी मना । हरिशी करुणा येईल तुझी ।।''

हे ज्ञानेश्वरमाऊलींचे कळकळीचे सांगणे शिरोधार्य मानून बहेणाबाई अखंड हरिनामजपात तल्लीन राहू लागल्या.

जयरामस्वामी आपल्या कीर्तन, प्रवचनातून ज्ञानेश्वर तुकारामादी संत-महात्म्यांच्या पावन चरित्राचे तसेच त्यांच्या अमृतमय साहित्याचे विवरण करीत. त्यामुळे बहेणाबाईंना संतांची, त्यांच्या अनमोल काव्याची चांगलीच ओळख झाली. त्यातही तुकाराममहाराजांची आत्मप्रत्यय देणारी प्रासादिक अभंगवाणी तर बहेणाबाईंच्या अंत:करणात अखंड वास्तव्य करू लागली.

संसारतापे तापलो मी देवा । करिता या सेवा संसाराची ।।
म्हणऊनि तुझे आठविले पाय । ये वो माझी माय पांडुरंगे ।।

अशा अभंगातून, संसारात पोळलेल्या आपल्या जिवाला, तुकोबा जणू बोट धरून विठ्ठलाला शरण जाण्यासाठी आपल्याबरोबर नेत आहेत, असे बहेणाबाईंना वाटे. म्हणूनच **''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविशी हाती धरूनिया ।''** हे तुकारामांचे बोल बहेणाबाई तुकारामांसाठीच म्हणू लागल्या. आणि त्यानंतर परमार्थमार्गाच्या वाटचालीचा निश्चय पक्का झाल्यामुळे,

फुटो हे मस्तक तुटो हे शरीर । परी नामाचा गजर सोडू नये ।।

असा निर्धार तुकोबा आपल्याकडून करवून घेत आहेत, याची अनुभूती बहेणाबाईंना आली. भगवंताच्या भेटीसाठी महाराजांना केवढी तळमळ. **''जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।।''** तुकोबांच्या मनीची ही आर्त बहेणाबाईंनाही कासावीस करून गेली.

ज्या श्रीहरीच्या दर्शनाची इतकी तीव्र आस महाराजांना लागली होती, त्या श्रीहरीचे मूळ विश्वात्मक स्वरूप जयरामस्वामींच्या प्रवचनातून बहेणाबाईंना चांगलेच परिचित झाले. हा भगवंत केवळ मूर्तीत नसून प्रत्येक भूतमात्रात, चराचरात भरलेला आहे आणि म्हणूनच जोवर विश्वाच्या कणाकणातून भगवंताचा साक्षात् प्रत्यय येत नाही तोवर त्याचे खरे दर्शन घडणे शक्य नाही, हेही बहेणाबाईंना कळून चुकले.

ऐसे भाग्य कईं लाहाता होईन । अवघे देखे जन ब्रह्मरूप ।।
मग तया सुखा अंत नाही पार । आनंदे सागर हेलावती ।।

अशा रीतीने ''भूती भगवंत'' हे तत्त्व बहेणाबाईंच्या हृदयात कोरले गेले. इतके साक्षात्कारी अक्षरवाङ्‌मय निर्मिणारी तुकाराममहाराजरूपी महान विभूती आपल्यापासून फार दूरवर नाही. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन आपणास कधी होईल? त्यांचा अनुग्रह आपणास लाभेल का? या विचाराने बहेणाबाई विलक्षण भारावल्या गेल्या. त्यांच्या ध्यानी मनी तुकारामांविषयीचा गुरूभाव कोंदून गेला. गुरूभेटीसाठी त्यांची रात्रंदिवस तगमग होऊ लागली. त्या म्हणतात,

तुकोबांचा छंद लागला मानसी । ऐकता पदांसी कथेमध्ये ।
तुकोबांची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ।।

दिवसेंदिवस गुरूभेटीचा ध्यास वाढू लागला. त्याविना त्यांना जीवनच व्यर्थ वाटू लागले. बहेणाबाई म्हणतात,

''मत्स जैसा जळावाचुनी चरपुडी । तैसी ते आवडी तुकोबाची।''

त्या अखंड आपल्या गुरूमाऊलीचे ध्यान करू लागल्या. अखेर बहेणाबाईंना तुकाराममहाराजांचा स्वप्नदृष्टांत झाला. स्वप्नात महाराजांनी बहेणाबाईंच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला.

आनंदले मन चिद्रूप कोंदले । उठोनि बैसिले चमत्कारे ।।

असे बहेणाबाई या स्वप्नदृष्टान्ताचे वर्णन करतात.

बहेणाबाई आणि गायवासरू यांच्यातले लोकविलक्षण नाते गावातल्या लोकांनी अनुभवले होते. बहेणाबाईंच्या पारमार्थिक अधिकाराची साक्ष त्यांना येऊ लागली होती. त्यातच तुकारामांच्या स्वप्नदृष्टान्तामुळे बहेणाबाईंना आलेले आध्यात्मिक तेज जनता जनार्दनापासून लपून राहिले नाही. लोक बहेणबाईंच्या दर्शनासाठी त्यांच्या घरी येऊ लागले. गंगाधरपंत वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण होते. पण त्यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नीचे माहात्म्य जनमानसात वाढत असलेले पाहून गंगाधरपंतांना ते सहन होईनासे झाले. तसेच आपण उच्चकुलीन असताही बहेणाबाईनी तुकारामांसारखा वैश्य गुरू करावा, हेही त्यांना रुचेना. अखेर त्यांनी बहेणाबाईंचा त्याग करायचे ठरविले...

बहेणाबाईंच्या जीवनातील ही मोठी सत्त्वपरिक्षा होती. गुरू की पती? काय स्वीकारावे? परंतु बहेणाबाई आता अशा तात्त्विक उंचीला पोचल्या होत्या की ब्रह्मैक्याचे आभाळ त्यांच्या शिरावरच होते.

प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेच गगन झेलियेले ।।
कर्म तेचि ब्रह्म ब्रह्म तेचि कर्म । ऐसे जिने वर्म जाणितले ।।

असे मौलिक मर्म बहेणाबाईंनी आपल्या अभंगात मांडून ठेवले आहे. तुकोबांच्या अभंगातून ज्या परब्रह्माचे दर्शन बहेणाबाईंना घडले होते, ते परब्रह्म चराचरात जसे भरले आहे तसे स्वकर्तव्यातही भरून उरले आहे, याची जाण बहेणाबाईंना होती. गुरू काय, पती काय, परब्रह्म काय, सर्व एकच असता स्वधर्माचा म्हणजेच पत्निधर्माचा त्याग करणे इष्ट नाही, हे ओळखून बहेणाबाईंनी केवळ पतिसेवाच करायची ठरविली.

पण तरीही गंगाधरपंत विरघळले नाहीत. बहेणाबाईंना सोडून ते जाऊ लागले.

बहेणाबाई त्यांना म्हणाल्या, ''आपल्याला आवडत नसेल तर मी माझा अध्यात्ममार्ग सर्वथा सोडून देते, पण आपण नका हो जाऊ...''

पण बहेणाबाईंची विनवणी न ऐकता गंगाधरपंत जाऊ लागले आणि वाटतेच ''आई ग'' म्हणत मटकन् खालीच बसले. बहेणाबाई धावतच त्यांच्या जवळ येऊन म्हणाल्या, ''स्वामी काय झाले?''

गंगाधरपंत म्हणाले, ''सगळ्या अंगाचा दाह होऊ लागलाय अचानक. काय करू? आई आई ग!''

बहिणाबाईंनी त्यांच्या अंगावर गार पाण्याच्या घड्या ठेवल्या, त्या त्यांना पदराने वारा घालू लागल्या. काही केल्या त्यांच्या अंगाचा दाह मिटत नव्हता. बहेणाबाईंचे आईवडील, हिरंभट, इतर शेजारपाजारचे सर्वांनीच गंगाधरपंतांचा अंगाचा दाह थांबावा म्हणून खूप प्रयत्न केले. वैद्यांचे उपचार झाले. पण गंगाधरपंतांना अजिबात चैन पडत नव्हते. सर्वांगाची लाही लाही होत असल्याने ते विलक्षण तळमळू लागले. गंगाधरांच्या शरीराची आग होत होती, तर ते पाहून अतीव दुःखाने बहिणाबाईच्या मनाची आग होत होती. त्या अहोरात्र पतीसमवेत बसून सुचेल तो उपाय करीत होत्या. गंगाधरपंतांना आराम पडावा म्हणून देवाचा धावा करीत होत्या.

असेच काही दिवस गेले. अंगाच्या होणाऱ्या आगीने कळस गाठला होता. अतिशय तगमगत गंगाधरपंत म्हणाले, ''कोणी धावा हो, कोणी धावा. बहेणे, तू तरी सांग, कोण सोडविल मला यातून? बहेणाबाईंकडे पाहता पाहता एकदम लक्षात येऊन ते बहेणाबाईंना म्हणाले, ''बहेणा, तुकोबा सोडवतील मला या आगीतून! होय ना?''

बहेणाबाई होकारार्थी मान डोलावीत म्हणाल्या, ''हो खरच! तुकोबा माऊली, तूच सावली धर माझ्या स्वामींवर..!''

गंगाधरपंतही मनापासून बोलू लागले, ''तुकोबाराय, माझ चुकलं, मी तुम्हाला कमी लेखलं, मला क्षमा करा. मी शरण आलो आहे तुम्हाला! ही आग थांबवा हो!...'' आणि काय आश्चर्य एकदम त्यांचा दाह थांबला... गंगाधरपंत आनंदाश्चार्याने थक्क झाले. आणि म्हणू लागले. ''तुकाराममहाराज आपला जयजयकार असो. बहेणे, बहेणे, अग तुकोबांना शरण जाताच माझ्या अंगाची आग एकदम थांबली! तुकोबांनी कृपा केली. बहेणे तू धन्य आहेस! अशा थोर पुरुषाचा तुला अनुग्रह मिळाला. खरंच, बहेणे, मी कसा उतराई होऊ तुकोबांचा?

बहिणाबाईने हर्षातिरेकाने डोळे मिटून घेतले. आणि आपल्या अंतःकरणातील गुरूमाऊलीच्या चरणांवर मनानेच लोळण घेतली. गंगाधरपंत म्हणत होते, ''चल, बहेणे, आपण महाराजांच्या दर्शनासाठी देहूला जाऊ.''

बहेणाबाईंची सात्त्विक उपासना फलद्रूप झाली. गुरुमाऊलींच्या साक्षात् दर्शनाचा योग जुळून आला. कोल्हापूरहून आपल्या गाईसकट बहेणाबाईंच्या घरची सर्व मंडळी देहूला आली. बहेणाबाईंच्या ध्यानीमनी सतत तुकाराम गुरुमाऊलीचेच चिंतन चालले होते. इंद्रायणीत स्नान करताना तोच भक्तिरस हृदयात दाटून आला होता. शुचिर्भूत होऊन सर्व देवदर्शनासाठी मंदिरात आले. आणि जणु अनंत जन्मांचे भाग्य उदयाला यावे, तसे तेथे मंदिरातच महाराजांचे दर्शन झाले. तुकोबा आरती करीत होते. डोळ्यात जमणारे भावाश्रू पुनःपुन्हा पुसत बहेणाबाई आपल्या गुरूदेवांना डोळे भरून पाहात होत्या. त्यांचे अष्टसात्त्विक भाव प्रकट झाले होते. बहेणाबाई आपल्या अभंगात वर्णन करतात,

तुकोबाचे ध्यान पूर्वी कोल्हापुरी । जे स्वप्नामाझारी देखियेले ।।
तेचि ध्यान डोळा प्रत्यक्ष देखोनी । आनंद लोचनी हेलावत ।।

साऱ्यांनी तुकोबांच्या चरणी लोटांगण घातले. तुकोबांच्या आनंद-ओवरीतच त्यांना रहायला जागा मिळाली. आपल्या नशिबाला किती धन्यवाद द्यावे, असे बहेणाबाईंना झाले. तुकोबांच्या कीर्तनप्रवचनाचा लाभ त्यांना नित्य घडू लागला. गुरुदेवांच्या साक्षात् सान्निध्यात बहेणाबाईंची परमार्थसाधना संपन्न होत होती. एकदा हरिनामस्मरण करीत

आनंदओवरीत त्या बसल्या असता त्यांची तेथे तीन दिवस अखंड समाधीच लागली. अखेर प्रत्यक्ष तुकोबांनीच बहेणाबाईंना समाधीतून जागे केले. त्यांच्या मस्तकी हात ठेवून त्यांना वरदान दिले. बहेणाबाई कृतकृत्य झाल्या. त्यांची कवित्वशक्ती बहरून आली, त्यांना अतींद्रिय, गूढ पारमर्थिक अनुभवही आले.

एकपणे होते अनेक जाले । पाहता विश्वाकार विस्तारले ।।

या बहेणाबाईंच्या आत्मानुभवाच्या अभंगात, त्या विश्वंभराशी कशा एकरूप झाल्या हे लक्षात येते. तुकारामांना ज्यांनी अतिशय त्रास दिला, त्या मंबाजीने तुकारामांना शरण गेलेल्या बहेणाबाईंच्या कुटुंबालाही त्रास दिला. त्यांची गाय चोरून तिला बेदम मारले, पण तुकोबांच्या कृपेने सर्व संकटातून हे कुटुंब बाहेर पडले.

बहेणाबाईंच्या अभंगगाथेत, त्यांचे समग्र आत्मचरित्र तर आहेच शिवाय त्यांच्या मागील बारा जन्मांचेही आत्मवृत्त आहे. आपल्या अंतकाली त्यांनी आपल्या मुलाला- विठोबाला ते सांगितले आहे. तसेच आपल्या अभंगवाणीतून त्यांनी साध्या पण रसाळ शैलीत अद्वैत तत्त्वज्ञान, खरे ब्राह्मण्य, भक्तिमाहात्म्य सुस्पष्टतेने मांडले आहे. त्यांची हिंदीतही काही पदे आहेत. भागवत धर्माच्या संतमांदियाळीत बहेणाबाईंचा समावेश होतो. भागवतमंदिराच्या कळसावरील त्या ध्वजाच ठरल्या. पुढील अभंग सुप्रसिद्धच आहे.

संतकृपा जाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचले आवार ।।
जनार्दनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत ।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहेणी फडकते ध्वजा । निरोपण केले वोजा ।।

- डॉ. सौ. अनुराधा सुधीर कुलकर्णी
२१, पूर्णायन सोसायटी, पं.दीनदयाळ पथ, डोंबिवली (प.),
मो. ९९२०२९१८२५



योगाब्जनीसरोवर बहिणाबाई

डॉ. सौ. रजनी शंकर पतकी

एम्.ए. (इंग्रजी), पीएच्.डी. (संस्कृत), प्रवचनकार व संशोधक (संस्कृत, प्राच्यविद्या, वास्तुशास्त्र) आत्तापर्यंत ८ पुस्तके व साधारणत: २००च्या आसपास लेख व ५८ शोधनिबंध झाले आहेत. उत्कृष्ट विद्यार्थिनी व ज्येष्ठ प्रवचनकार म्हणून पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

भक्तिप्रधान भागवत धर्माच्या मंदिराचा पाया संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी रचिला. त्या मंदिरावर बहिणाबाई ध्वजारूपाने फडकते आहे. ही ध्वजा अर्थातच भक्तीचे निशाण आहे. या भक्तीमध्ये जसा भाव आहे तसेच ज्ञान व योग यांचे तेजस्वी दर्शनही आहे. भक्तीमध्ये नामस्मरणाला व नाम संकीर्तनाला महत्त्वाचे स्थान आहे. संतांनी या भगवन्नामाला भगवत्स्वरूप मानले असले तरी त्या नामातून त्यांनी जी आध्यात्मिक उन्नती केली त्यात योगसाधनेचा अंतर्भाव सहजगत्या झालेला दिसतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीने भावार्थ दीपिकेत सहाव्या अध्यायात नाथपंथीचा कळीचा गाभा 'पिंडे पिंडाचा ग्रासु' हा जो योग स्पष्ट केला आहे त्याचा संदर्भ पुढे जाता योगिनी बहिणाबाईपर्यंत गणता येणाऱ्या संतांच्या मांदियाळीमधील संतवाङ्‌मयात कुठे ना कुठे तरी आलेला दिसतो. या योगाचे प्रत्ययकारी दर्शन मात्र तुकारामशिष्या योगिनी बहिणाबाईंच्या जीवनात होते.

''सिंधुजळाची भवणी । कोण करीत असे अवनी ।
तेवी योगबजनी – । सरोवर बहिणी सद्‌गुरू ।।''

(शिष्य दीनकविकृत गुरूगौरव ओवी ३५)

या ओवीद्वारा बहिणबाईंचे शिष्य दीनकवि यांनी तिचा गौरव केला आहे. यात ते तिला 'योगकमळे उमललेले सरोवर' असे मोठ्या गौरवाने म्हणत आहेत. या योगकमळयुक्त सरोवराचा थांग लागणे तसे अवघडच आहे तथापि त्याचे चिंतन करणे नक्कीच आनंददायी ठरेल. तसा प्रयत्न पुढे केला जात आहे.

'योग' शब्दाची व्याख्या

भारतीय तत्त्वज्ञानाचे आधारभूत ग्रंथ म्हणजे षड्‌दर्शन होत. हे ग्रंथ आज जगन्मान्य असून अनेक देशांमधील विद्यापीठांतून त्यांचा अभ्यास केला जातो. यातील भगवान पतञ्जलीकृत 'योगदर्शन' हा 'योग' या विषयावरील मूलग्रंथ आहे. या ग्रंथात 'योग' या शब्दाची व्याख्या ''योगस्तु चित्तवृत्तिनिरोध:।'' (समाधिपाद-२) अशी केली आहे. चित्ताच्या वृत्तींचा निरोध करून चित्तैकाग्रता साधणे व समाधीस्थिती अनुभवणे हा भाग साधारणत: यामध्ये येतो. भगवद्‌गीतेत भगवंताने ''योग: कर्मसु कौशलम्'' अशी 'योग' या शब्दाची व्याख्या केली आहे. (गीता २.५०). कर्म अशा कौशल्याने करणे की ज्यायोगे निष्कामता प्राप्त होईल; असा साधारणत: याचा अर्थ आहे. प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराजांनी दत्तमाहात्म्य या ग्रंथात 'पुत्र म्हणे दु:खसंयोग । त्याचा करी जो वियोग । परि त्याला म्हणती योग।।' (दत्त मा. २.२६) अशी 'योग' या शब्दाची सुटसुटीत व्याख्या केली आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की,

''मानवाला आत्यंतिक शांत अवस्थेची, समाधानाची, अंतिमत: जिवाशिवाची भेट घडवून देणारी अनुभूती ज्यामुळे मिळेल अशी साधना ज्या मार्गात होते; त्यास 'योग' असे म्हटले जाते.''

असा योग भक्तीच्या वाटेने जाणाऱ्या संतश्रेष्ठांना साधला होता, असे म्हणण्यास वाव आहे. त्यांच्या वाङ्‌मयातून व त्यांच्याबद्दल त्यांच्या शिष्यांनी केलेल्या निवेदनांवरून या योगसाधनेचा मागोवा घेता येतो. वर उल्लेखिलेली दीनकवींची ओवी असेच तुकाराम शिष्या बहिणाबाईंचे योगिनीरूप उघड करणारा आहे. बहिणाबाईंना आपल्या जीवनात योग साध्य झाला होता; हे जयरामस्वामींच्या वचनावरून प्रथम कळते.

योगभ्रष्ट जीवाचा जन्म

भगवद्‌गीतेमध्ये योगाभ्यासाचे विवेचन करताना भगवंताने अर्जुनास सांगितले आहे की, जर एखादा साधक पूर्णत्वास न पोहोचता म्हणजे त्याचा अभ्यास अर्धा राहिला असतानाच स्वर्गवासी झाला तर तो 'शुचीनां श्रीमतां गेहे' पुन्हा जन्म घेतो व उर्वरित अभ्यास पुढे सुरू ठेवतो. (गीता ६.४१). असेच बहिणाबाईंच्या बाबतीत प्रत्ययास येते –

१) बहिणाबाईंच्या लहानपणी विश्वेश्वर ज्योतिषी यांनी ''या कन्येमुळे तुमचे कल्याण होईल, ही मोठी भाग्याची आहे'', असे म्हटले होते. (अभंग ४ – ओवी ५.६).

२) बहिणाबाईंनी आपल्या योगभ्रष्ट जन्माविषयी असा उल्लेख केला आहे, ''तेरावा हा जन्म लाधले साधने । तया तीर्थी स्नाने जन्म नाही ।। केले वो प्रयास साधनाचे कष्ट । होते योगभ्रष्ट म्हणोनिया ।। (अभंग ८७ ओवी ४-५- निर्याणपर अभंग).

३) बहिणाबाई जेव्हा जयराम स्वामींच्या प्रवचनास जात असत

तेव्हा त्यांच्या समवेत एक वासरू जात असे. एकदा या वासरामुळे कीर्तनात गडबड झाली; हे त्यांच्या पतीस आवडले नाही. त्यांनी बहिणाबाईंवर हात टाकला. त्याचा बहिणाबाईंना खूपच त्रास झाला. तेव्हा जयरामस्वामींनी त्यांच्या पतीची समजूत घालताना बहिणाबाई या साधना करणाऱ्या योगभ्रष्ट आहेत असे त्यास सांगितले. बहिणाबाईंनी याचा उल्लेख आत्मचरित्रपर अभंगात केला आहे,

''म्हणती ब्राह्मण तू इचा भ्रतार । सांगतो निर्धार ऐक आता ।
योगभ्रष्ट इची साधने बळकट । तू इसी कष्ट करू नको ।।''

(अभंग १७, ओवी ७-८)

४) बहिणाबाईला ज्या गायवासराचा लळा लागला होता ते वासरू कीर्तनास गेल्यावर आरती झाल्यावर जमिनीवर डोके ठेवून नमस्कार करीत असे. त्यामुळे स्वामी त्यास पूर्वजन्मीचा भक्त म्हणत. ''म्हणती योगभ्रष्ट पूर्वील हरिभक्त । गोवेणे विरक्त पहा कैसे ।। (अ. १४-१९) मागील जन्मात बहिणाबाईचा व त्याचा साधक या नात्याने ऋणानुबंध होता असे म्हटले जाते. या उदाहरणांवरून बहिणाबाईंची मागील जन्मांतून काही साधना झाली होती व ती पूर्ततेला जाण्यापूर्वी त्यांचे आयुष्य सरल्यामुळे त्यांना पुन्हा जन्म घेऊन साधना पुढे चालू ठेवावी लागली असे लक्षात येते. त्यामुळे त्यांची मागील जन्मात कोणती साधना झाली होती; याची उत्सुकता वाटते. ते अर्थातच त्यांच्याच अभंगाद्वारा जाणून घ्यावे लागते.

बहिणाबाईंची सद्य जन्मापूर्वीच्या मागील जन्मांतून झालेली साधना–

बहिणाबाईंनी जन्मोजन्मी साधना केली असावी, असे यांच्या निर्याणपर अभंगांवरून समजते. आपल्या मृत्यूपूर्वी आपल्या पुत्रास त्यांनी आपले मागील बारा जन्म सांगितले होते. त्यांना स्वत:ला मृत्यूची घटका पंधरा दिवस आधी कळली होती. त्यांची सून आजारी असल्याने त्यांचा पुत्र विठ्ठल तिच्याकडे गेल्याने बहिणाबाईंजवळ नव्हता. त्यांच्या सुनेचे निधन झाल्यावर तिचे दिवस झाले तेव्हा बहिणाबाईंनी आपल्या पुत्रास ताबडतोब यायला सांगितले. त्यास त्यांनी आपली अंतिम घडी जवळ आल्याचे सांगून मागील बारा जन्मांची हकिगत त्यास सांगितली. त्या जन्मांतून त्यांनी जी साधना केली होती त्याचाही उल्लेख त्यांनी त्यावेळी केला. त्याचा विचार येथे करावयास हवा. त्यांची मागील जन्मांतील साधना थोडक्यात अशी -

१) बहिणाबाई पहिल्या जन्मात केदार व रूपवंती या माता-पित्यांची वारुणी या नावाची कन्या होत्या. आई रूपवंतीची शांभवी दीक्षा होती. पिता केदार यांनी आपल्या या कन्येला आपल्या गुरूकडून शिवमंत्राची दीक्षा दिली होती.

२) दुसऱ्या जन्मात त्या अविवाहित राहिल्या होत्या व त्यांनी भक्तिमार्ग अनुसरला होता.

३) तिसऱ्या जन्मात त्यांनी केशवाचे नामस्मरणात काल व्यतीत केला होता.

४-५-६-७) या चार जन्मात त्या योगभ्रष्ट म्हणून जन्मल्या होत्या. यात त्यांनी नामसंकीर्तन, गोसेवा केली. त्यांना सिद्ध-आत्मज्ञानी गुरू भेटले. त्यांनी विरक्ती स्वीकारून ज्ञानाचा अभ्यास केला. ज्ञानसाधना केली.

८-९) या दोन जन्मात माता-पिता एकच होते. यात त्यांनी भागवत श्रवण केले.

१०) दहाव्या जन्मात त्या अग्निहोत्री ब्राह्मणाच्या घरात जन्मल्या होत्या. यात त्यांनी हरिकथेबरोबर वेदांत श्रवण केले, देवसेवा केली. संन्यासी केशव हे त्यांना गुरू मिळाले. त्यांनी बहिणाबाईंना सर्व विद्या दिली.

११) अकराव्या जन्मात बहिणाबाईंचे सौजन्या हे नाव होते. त्या विवाहित असून त्यांचे पती योगाभ्यासी व विरक्त वृत्तीचे होते. त्यांनी पतिसेवा केली. पतीने बाईंना योगाचे आसन व खेचरी मुद्रेतील ध्यान शिकविले.

१२) बाराव्या जन्मात बहिणाबाई रामचन्द्र व जानकी या ब्राह्मण दांपत्याच्या पोटी जन्माला आल्या. त्यांचे पिता ब्रह्मज्ञानी होते. त्या मौन राहात असत. वडिलांनी त्यांना समाधी लावून दिली व ज्ञान-बोध केला.

अशी मागील बारा जन्म सातत्याने साधना केलेल्या बहिणाबाई या जन्मी साधना पुढे पूर्ण करणार हे सहज शक्य होते. त्यामुळे या जन्मातील त्यांची साधना जाणून घेणे आवश्यक आहे.

बहिणाबाईंची सद्य जन्मातील (१३व्या जन्मातील) साधना

सद्य तेराव्या जन्मात बहिणाबाईंच्या पतीकडे शक्तिउपासना होती; तर बहिणाबाईंवर जयरामस्वामींची कृपा होती. त्यांना तुकोबांचा अनुग्रह प्राप्त झाला होता. पती गावाला गेले असता आईच्या अनुमतीने त्या तीन दिवस ध्यानस्थ बसल्या होत्या. त्यावेळी तुकोबांनी त्यांना तीन सोपे मंत्र सांगितले. तुकोबांनी त्यांना मागील जन्मांची जाण दिली. 'योगपंथ पूर्वीच सिद्ध झाला आहे' असे त्यांनी सांगितले. तसेच 'हा शेवटचा जन्म असून पुन्हा तुला जन्म नाही. तुझा पुत्र व तू तेरा जन्म बरोबर आहात. त्याला पुढे पाच जन्म आहेत', असे सांगून तुकोबांनी त्यांच्या हाताचा अंगठा तिच्या भ्रूमध्यास लावला व ते अदृश्य झाले; असे बहिणाबाई लिहितात-

तीन अहोरात्री क्रमिल्या ते ठायी । आनंद तो देही थोर जाला ।।
दुसरीया दिवशी तुकारामरूपे । मंत्र तीन सोपे सांगितले ।।
तेरावा हा जन्म लाधलीस आता । पूर्वी योगपंथा सिद्ध केले ।।
आता तुज पुढे नाही जन्म योनी । पतीच्या भजनी राही सुखे ।।

(अ. ९९ - २९ ते ३३)

योगसाधना अभ्यासताना आपणास आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो तो म्हणजे योग्याची आध्यात्मिक उन्नती. यासंबंधी बहिणाबाईंच्या चरित्रातील निर्देश महत्त्वाचे आहेत; ते असे -

१) मनावर विजय - बहिणाबाईंचे मन:पर अभंग एकूण चौतीस आहेत. त्यात त्यांनी मनाशी वाद व संवाद करत मनाला कसे जिंकले याचा उल्लेख केला आहे. त्या म्हणतात,

विवेक वैराग्य सापडले मज । आता मना तुज कोण पुसे ।।
तुझाच तुजला करीन पारखी । मना तू विलोकी आपणासी ।।

बहिणी म्हणे मना यश घेता हीत । आहे तू निवांत पाहे ऐसे ।।
(अ. १२५)

२) योगाने चित्तनिरोध – मनाला जिंकल्यावर चित्ताची स्थिरता साधणे हेही आवश्यक असते. बहिणाबाईंचे चित्त निश्चल झाले होते. त्या याबाबत म्हणतात,

तेथोनिया मन करोनी सावध । स्मरणी स्वता सिद्ध चित्त केले ।।
बहिणी म्हणे देह सर्वही विकल । परि ते निश्चल चित्त माझे ।।
(अ. २०-१४-१५)

३) अनुताप – आपला देह स्त्रीचा आहे याचा त्यांना अनुताप झाला होता. त्याचे सात अभंग अनुतापपर आहेत. त्या म्हणतात,

अनुतापे तापले बहुत मानसी । न ये देवासी करुणा कैसी ।।
(६६.१)

४) नेम – योगामध्ये नेम महत्त्वाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत नेम सांभाळावा लागतो. तसा बहिणाबाईंनी नेटाने नेम केला होता. त्या म्हणतात,

न सोडी भजन प्राणही गेलीया ।। (अ.६०.१)

५) ध्यान – बहिणाबाईंना ध्यान साधले होते. त्या आनंद ओवरीत तीन रात्री ध्यानस्थ बसल्या होत्या. (अ.७४)

६) अतींन्द्रिय अनुभव – बहिणाबाईंवर जेव्हा गुरुकृपा झाली (कार्तिक वद्य पंचमी – रविवार) तेव्हा त्यांनी अमृताची चव चाखली. त्या म्हणतात–

अमृत पाजिले चवी अनारिसी । साक्ष ज्याची त्यास मनामाजी ।।
(२५.१२)

७) ब्रह्मरूपी वृत्तिनिमग्न – सोऽहं जप व प्राणायाम याने त्यांनी प्रत्याहार साधला, त्यांच्या वृत्ती मावळल्या, ज्ञानगंगेमधील स्नानाने मनाचे वपन झाले व वृत्ति ब्रह्मरूपी मिळाल्या. (अ.१०४).

८) विदेहप्राप्ती – जीवन्मुक्तता ही योगाची अंतिम प्राप्ती आहे. बहिणाबाईंनी ही स्थिती साधली होती व त्यांची योगसाधना पूर्णत्वास गेली होती. क्रियायोगाद्वारा हे त्यांना साध्य झाले; असे त्या म्हणतात–

ऐसा सिंचनविधी संपादिला येथे । पुढे मोक्षपंथ क्रियायोग ।।
(१०९.५)

बहिणाबाई अशाप्रकारे मायातीत झाल्या. त्या म्हणतात, असिपदी ऐक्य झाले ('तत्त्वमसि'ची अनुभूती). सूर्याच्या द्वादश कला, चन्द्राच्या सोळा कला त्यांनी पार केल्या (अ.११०). त्यांनी अंतरंगात दशनाद ऐकले होते. या दशनादांची अल्प माहिती अशी –

दशनाद – योगामध्ये नादानुसंधान ही चित्तलयाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत चित्तलयाद्वारा ब्रह्मात्मैक्य साधणे हे ध्येय आहे. या प्रक्रियेत चार अवस्था येतात (हठयोग प्रदीपिका प्रश्न ६९). त्या अशा–

१) **आरम्भावस्था** – यात प्रथमत: ढगांचा गडगडाट, कडकडाटा सारखे मोठे आवाज ऐकायला येतात.

२) **घटावस्था** – यामध्ये समुद्राची गाज, भेरी इत्यादि सारखे आवाज ऐकू येतात.

३) **परिचयावस्था** – यामध्ये घंटा, टाळ, पखवाज इत्यादि सारखे आवाज ऐकू येतात.

४) **निष्पत्तीअवस्था** – यामध्ये बारीक घंटा (किणकिण), बासरी, वीणा, भ्रमर गुंजारव इत्यादि सारखे आवाज ऐकू येतात. (सूतसंहिता रहस्य – भाग १, पान ११९-१२०, ले- डॉ. ज. वा. जोशी) असे नादानुसंधाना मधील दशनाद बहिणाबाईंनी ऐकलेले असावेत असे त्यांच्या अभंगातील उल्लेखावरून लक्षात येते.

बहिणाबाई अशाप्रकारे योगसाधनेद्वारा विदेहमुक्तीपर्यंत पोहोचल्या असल्या तरी त्यांनी 'गुरूसेवा' हेच साधन जास्त महत्त्वाचे मानलेले दिसते. त्या म्हणतात, 'मी सद्‌गुरूंना पूर्ण शरणागत आहे.' पुढील दोन अभंग 'गुरूसेवा' साधनेविषयी अत्यंत बोलके आहेत –

१) सद्‌गुरूंचे पाय धरीन हृदयात ।
राहीन ध्यानस्थ सर्व काळ ।।१।।
मग मना तुझे काय तेथे उरे ।
ध्यानाचे वागुरे सापडसी ।।२।।
सद्‌गुरूवचनी धरीन विश्वास ।
प्रेम अविनाश होय तेथे ।।३।।
सद्‌गुरूचा सर्वदा होईन मी दास ।
सर्वस्वी उदास होउनीया ।।४।।
देह वाचा मन समर्पीन पायी ।
सद्‌गुरू हृदयी साठवीन ।।५।।
बहिणी म्हणे मना सांडी रे मीपणा ।
जाय तू शरण सद्‌गुरुशी ।।६।।

२) सर्व साधनांच्या माथा गुरुसेवा ।
जे करी या जीवा ब्रह्मरूप ।।१।।
तयाचिया पायी जाऊनी राहेन ।
तेथे मना कोण तुज पुसे ।।२।।
शास्त्रवेद नाना दर्शना वरिष्ठ ।
सद्‌गुरू हा श्रेष्ठ सर्वांपरी ।।३।।
बहिणी म्हणे स्वामी सद्‌गुरूची कृपा ।
दाखवील सोपा मार्ग मना।।४।। (अभंग ११७ व ११८)

अशाप्रकारे जन्मानुजन्म साधना करणाऱ्या बहिणाबाई जीवन्मुक्त झाल्या. तथापि त्यांच्या या योग्यतेमुळे त्यांनी मृत्युसमयीचे जे पाच योग साधले, योग्य समय जो त्यांनी साधला त्याचीही माहिति त्यांनी दिली आहे.

बहिणाबाईंनी साधलेला सुयोग्य अंतिम काल

योगी योग्य समय पाहून आपल्या स्थूल देहाचा त्याग करतो. आत्मनिष्ठाचा देहत्याग अग्नीचे बळ असता, हृदयात ज्योत दिसत असता, दिवसा, शुक्लपक्षात व उत्तरायण चालू असता होतो; असे गीतेचा दाखला देऊन बहिणाबाई सांगतात. (अ. १०१). हा उचित समय त्यांनी देखील साधला फक्त त्यावेळी उत्तरायण नव्हते. इतर चार योग होते. परंतु या एकाच कालपरिमाणाच्या उणीवेची खंत सद्‌गुरूकृपेने

त्यांनी मानली नाही. त्या म्हणतात, प्रपंचात विन्मुख होणे म्हणजे उत्तरायण व प्रपंच सन्मुख असणे म्हणजे दक्षिणायन होय. सद्गुरूकृपेने त्या प्रपंचविन्मुख असल्याने भौगोलिक दृष्ट्या उत्तरायण नसले तरी चालेल; असे त्या आपल्या पुत्रास सांगतात. (अ. १०२)

उपसंहार

विवेक-वैराग्य, सोऽहं जप, प्राणायाम, क्रियायोग, सद्गुरुसेवा, ईशसेवा, पतिसेवा, 'विठ्ठल'नामाचे स्मरण, वेदांतज्ञान, ध्यान, श्रवण, मनन इत्यादि प्रकारची विविध कमळे फुललेले संत बहिणाबाईरूपी अथांग सरोवर मोजणे, मापणे ही खरोखरच अवघड गोष्ट आहे. विरक्तीवर जास्त भर देऊन त्यांनी ब्रह्मसायुज्यतेचे सुख अनुभवले आहे. तथापि याचे श्रेय त्या सद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व भक्तांचा सोहळा करणाऱ्या विठ्ठलास देतात. आपल्या अंगाखांद्यावर व आजुबाजूला संतरूपी लेकरे घेऊन त्यांच्या कौतुकात दंग असणारा लेकुरवाळा गोपाळ विठू हेच त्यांचे दैवत होते. म्हणूनच त्यांनी स्वत:ला भागवतधर्माच्या देवालयावर फडकणारी ध्वजा असे सार्थपणे म्हटले आहे. अशा या ब्रह्मरूपिणी योगिनी बहिणाबाईंना त्यांचे गुरूबंधु संत निळोबाराय यांच्याच शब्दात वंदन करूया-

स्त्रीवेष अग्रवर्णी बाळदशा क्रमियेली ।
जालीया पाणिग्रहण पतिव्रता आचरणी ।।१।।
जय माय बहिणाबाई मूळ ब्रह्मरूपिणी ।
आरती ओवाळिन भक्तिप्रेम अंतरी ।।धृ.।।
संचित पूर्वपुण्य तुकारामदर्शन ।
मस्तकी ठेवुनि कर सांगे भक्ति निर्विकार ।।२।।
प्रसाद लक्ष चौपन यज्ञपूर्ति करि पूर्ण ।
वर्षवी अमृतवाणी करि त्रैलोक्य पावन ।।३।।
अखंड देही स्मरण निजवृत्ति निमग्न ।
चरणी निळा जाण आला भावे शरण ।।४।।

(निळोबाकृत आरती - संत बहिणाबाईचा गाथा)

डॉ. सौ. रजनी शंकर पतकी
४०१, इंदुप्रभा अपार्टमेंटस्, प्लॉट नं. ६,
मनीषा सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२.
मो. ८८८८८१२६१०

संदर्भ ग्रंथ -

१) बहिणाबाईचा गाथा - संपादक सौ. शालिनी जावडेकर
२) बहिणाबाईचा गाथा - वरदा प्रकाशन १९९८- प्रस्तुत लेखातील अभंग क्रमांक या गाथेतील आहेत.
३) भारतीय संत कवयित्री - संपादक - श्री. ना. रा. कदम, श्री. देवीदास पोटे.
४) सूतसंहिता भाग १ - डॉ. ज. वा. जोशी
५) संत बहिणाबाई - लेखक व प्रकाशक - ज. रा. आजगावकर १९२४



तुकाराम शिष्या - संत बहिणाबाईंचे अभंग

सौ. मीरा प्रदीप लिमये

एम.ए., बी.एड्., शालेय शिक्षिका
शिवथरघळीमध्ये काम करतात. 'योगतरंग' ठाण्यातील मासिकात लेखन, दासबोध व ज्ञानेश्वरी प्रवचन.

अंतरीचा साक्षी असेल जो प्राणी । अनुमाने मनी जाणेल तो ।।

ज्याची श्रद्धा दृढ असेल, ज्याच्यावर सद्गुरूकृपा असेल, त्याची प्रगती 'कुंडलिनी शक्ती' जागृत होईपर्यंत होऊ शकते. या मिळालेल्या शक्तीचा उपयोग जे स्वत:साठी, स्वसुखासाठी न करता केवळ लोककल्याणार्थ, रंजल्यागांजल्या दीनदुबळ्यांसाठी, संकटनाशासाठी, दुर्जनांना धडा शिकविण्यासाठी करतात ते अनेकांचे मार्गदर्शक असतात. अशा संत शिरोमणी तुकाराम महाराजांनी बहिणाबाईला स्वप्नात दर्शन दिले. स्वाभाविकच बहिणाबाईंना तुकोबांच्या दर्शनाची ओढ लागली.

मत्स्य जैसा जलावाचोनि चरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची ।।
बहेणी म्हणे तुका सद्गुरू सहोदर । भेटता अपार सुख आहे ।।

केवळ स्वप्नातल्या दर्शनाने, आणि इतरांकडून कथाकीर्तनातून तुकारामांचे अभंग ऐकल्याने बहिणाबाईंनी तुकारामांना सद्गुरू मानले हे अपूर्वच आहे.

अंतरी तुकोबाचे ध्यान । दर्शनावाचोनि करितसे ।

आणि मनापासून जीवेभावे भगवंताच्या नामस्मरणात रंगून जात असे.

तुकोबाचे ध्यान करोनी अंतरी । राहे त्या भितरी गृहामाजी ।।

कोल्हापूर क्षेत्री, ब्राह्मणवेशात, स्वप्नात पाहिलेल्या तुकोबांच्या रूपात बहिणाबाईला 'विठ्ठल' दर्शनाचा साक्षात्कार झाला. ती म्हणते -

त्याची देहाकृती विठ्ठलची देखा ।
विठ्ठलासी त्यासी नाही वेगळीक ।
ऐसे माझे मन साक्ष आहे...
पांडुरंग तुका, पांडुरंग तुका ।
वेगळीक देखा केवी होय ।

तुकोबा आणि पांडुरंगाच्या अद्वैताची नि:संदिग्ध ग्वाही बहिणाबाई वरील अभंगात किती सहजपणे देते.

तुकारामांविषयी दृढश्रद्धा ती अनेक ठिकाणी सहजपणे व्यक्त करते. ती म्हणते -

तुकोबाचे हात लिहिताती जे जे । ते तो सहजे पांडुरंग ।
सर्वही व्यापार तुकोबाचे हरी । आपणाचि करी अक्षयत्वे ।।

बहिणाबाई सद्गुरू तुकोबांना विश्वव्यापक, विश्वात्मक विठ्ठल स्वरूपात पाहते - गुणगौरव करते -

बहिणी म्हणे रूपे व्यापक तुकोबा ।
ध्याना माझे चित्ता हेचि आहे ।

किंवा

बोलू ऐसे बोले जेणे, बोले विठ्ठल बोले। .... तुकारामांच्या अभंगातून प्रत्यक्ष विठ्ठलच बोलतो आहे, असे तिला वाटते.

बहिणाबाई म्हणते, सद्गुरूकृपेशिवाय आपल्या जीवनाला पूर्णता नाही. आता तर बहिणाबाईना तुकारामांच्या प्रत्यक्ष भेटीची ओढ आहे. सद्गुरू जीवनाला पूर्णता देतो म्हणजे काय करतो, तर वासनांचा क्षय करून, त्रिविध ताप हरून, संचित जाळून, जन्ममरणाचा फेरा चुकवतो. बहिणाबाई प्राण कंठाशी आणून, मोठ्या आर्ततेने आळवणी करते, पण तरीही तुकोबांची प्रत्यक्ष भेट होत नाही.

बहेणी म्हणजे माझा जाऊ पाहे प्राण ।
का बा नसे कींव तुकोबा तुज ।।

पण या आर्ततेचा उपयोग झाला, कार्तिक वद्य पंचमीला तुकोबांनी नामसंकीर्तन घोषयुक्त। तुकाराम रूपे येऊनी - स्वस्वरूपात दर्शन दिले. बहिणाबाईला खूप आनंद झाला. आनंदाने सद्गुरुचरणवंदन करण्यासाठी वाकली असता तुकोबांनी तिच्या मस्तकी वरदहस्त ठेवला. स्नेहभावाने तिच्या कानात मंत्र दिला आणि हाती गीता ग्रंथ दिला.

हा अनुभव बहिणाबाई शब्दबद्ध करतात -

बहेणी म्हणजे ऐसी कृपा सद्गुरूची।
तुकारामे साची पूर्ण केली ।
आनंदले मन चिद्रूपी कोंदल

स्वप्नातला अनुभवही खरा झाला, असे सहजपणे एका अभंगात सांगते.

तुकोबाचे ध्यान जे पूर्वी कोल्हापुरी। स्वप्नामाझारी देखियेले ।
तेचि ध्यान डोळा प्रत्यक्ष देखोनि । आनंद लोचनी हेलावत ।।

तुकोबांच्या कृपेने बहिणाबाईत परिवर्तन झालेच, मन अधिक निर्मळ झाले, शरीरही सबळ झाले आणि शारीरिक-मानसिक छळ

करणाऱ्या पतीमध्येही परिवर्तन झाले आणि पतीसह बहिणाबाई देहूला तुकोबांच्या गावी आली. आता तर बहिणाबाईला फारच आनंद झाला.

तुकोबांची वाणी वेदांतील अर्थ । पावे माझे चित्त समाधान ।

तुकोबांची त्रिकाल आरती, भजन, कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी तिला ऐकायला मिळू लागली. बहिणाबाई अगदी तृप्त झाली. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. दुष्ट अंबाजीने त्रास दिला - बहिणाबाईला देऊळवाड्यातून बाहेर पडावे लागले - बहिणाबाई काकुळतीला येऊन म्हणते -

भक्ती करी त्यासी पीडीसी अंतरी । निष्ठा नानापरी लक्षिसी तू ।
बहेणी म्हणे देव छळी नानापरी । निश्चय निर्धारी पाहतसे ।।

भगवंत भक्ताची कसोटी बघतो, पण संकटातून सोडवतोही. देऊळवाडा सोडला तरी बहिणाबाई अखंड नामस्मरण करत होती. आता तिला भजन-कीर्तन मिळत नव्हतं, पण तिचे ध्यान लागत असे, तिची कवित्वशक्तीही जागृत झाली होती. तीन दिवसांच्या सततच्या नामस्मरणाने तर तिची समाधी लागली.

त्या समाधीच्या अवस्थेचे वर्णन बहिणाबाई करतात -

जालासे आनंद इंद्रियांचे द्वारी । बैसले शेजारी चैतन्याचे ।
बहेणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशी चंद्र बोले ।।

बहिणाबाईचे एकूण ७१९ अभंग आहेत. वर उल्लेखिलेले भक्तीचे महत्त्व सांगणारे, सद्गुरू कृपा सांगणारे अनेक अभंग आहेत. त्याशिवाय एक प्रापंचिक स्त्री म्हणून प्रपंचातील अडचणींना तोंड देणारी, आपले हित कशात आहे ते पाहणारी, दुःख न रडता सहन करणारी बहिणाबाई देखील आपल्याला अनेक अभंगात दिसते. ती म्हणते -

काय म्या करावे अदृष्टा आपण । आले जे टाकून सोसी येथे ।
स्वधर्म आपुला रक्षुनिया मने । शास्त्राच्या श्रवणे देव साधु ।।

जे नशिबात आहे ते सोसले पाहिजे, तक्रार न करता सहन केले पाहिजे.

तत्कालीन रूढी, रीती, सामाजिक बंधनांचाही ती विचार करते. ती म्हणते, आम्ही स्त्रियांनी कसे असले पाहिजे -

भ्रताराची सेवा तोची आम्हा देव
भ्रतार स्वयमेव परब्रह्म ।।
भ्रतार वचनासी उल्लंघीन जरी ।
पापे माझ्या शिरी पृथिविची ।
भ्रतारसेवेत सांग हा परमार्थ ।
भ्रतारेच स्वार्थ सर्व आहे.
भ्रतारावाचोनि अन्य देव जरी ।
येईल अंतरी ब्रह्महत्या ।
बहेणी म्हणजे मज आज्ञाची प्रमाण ।
ब्रह्म सनातन स्वामी माझा ।।

खरंतर बहिणाबाईचा नवा नवरा तिचा छळ करत होता. पण अवघ्या १२ वर्षाच्या बहिणाबाईंची नवऱ्याविषयीची मते खरोखरच आजच्या स्त्रीला विचार करायला लावणारी आहेत.

पण 'स्त्री' जन्माबद्दलची तिची वेदना एका अभंगात व्यक्त झाली आहे. ती म्हणते,

स्त्रीयेचे शरीर पराधीन देह । न चाले उपाय विरक्तीचा ।।

परमार्थाच्या क्षेत्रात स्त्रीदेह आड येतो. म्हणून तिला स्त्रीजन्म हे पाप वाटते - ती म्हणते -

काय पाप केले पूर्वीचे ये जन्मी । आता पुरुषोत्तमी अंतरले ।
लाधले नरदेह स्त्रियेचेनि रूपे । असंख्यात पापे फळा आली ।।

या सगळ्या पार्श्वभूमीवर तिला असे वाटते, की आपण अगदी एकट्या आहोत, मनातले दुःख सांगायला कोणी नाही, हिताचा विचार करावा, त्यासाठी कोणाचे मार्गदर्शन नाही.

सांगती न कोणी स्वहिते विचार । नाही तो शेजार सज्जनांचा ।
एकटी एकटी पडियेली वनी । क्षुधा, तृषा मनी आठवेना ।।

एका तर अभंगात तिला 'प्राण' द्यावेत असे वाटू लागले आहे, ती म्हणते,

वाटे देह आता घालू अग्नी आत । किंवा हा करवत घालू माथा ।
तापले शरीर त्रिविध तापाने । वाटतसे मने प्राण द्यावा ।।

कधी हा प्रपंच नको, छळणारा नवरा सुद्धा नको, असेही मनात येते, पण पुन्हा भ्रतारावाचून अन्य देव जरी येईल अंतरी ब्रह्महत्या - हा ही विचार आठवतो, ती पांडुरंगाला म्हणते -

देवतीर्थ यात्रा नावडती हरी । ऐसीयांच्या घरी संग दिला ।

कधी ती स्वतःच्याच मनाची समजूत घालताना दिसते, ती म्हणते अवतार रूपात येणाऱ्या देवादिकांनाही 'भोग' लागतात, तर आपली कथा वेगळी काय असणार!

भोगणे न चुके ब्रह्मादिका दुःख । इतरही रंक कोण तेथे ।

बहिणी म्हणजे माझ्या देहाचे प्रारब्ध । ऐसिया गोविंदा काय करू?

पण बहिणाबाई प्रारब्धाला दोष देत नाही. मनाचा निर्धार करते, प्राण गेला तरी चालेल - ती म्हणते -

गांजविसी देह भ्रताराचे हाते । माझीया तो चित्ते नेम केला ।
न सोडी भजन प्राणही गेलिया । आता देवराया दीनबंधो ।
पडो देह परी राहतसे हेत । पहावा अनंत ज्ञानदृष्टी ।
करावी हे भक्ती स्वधर्मेआचारे । तुज ज्ञानदारे ओळखावे ।।

प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधणारी बहिणाबाई ऐहिक आणि आध्यात्मिक जीवनाचीही सांगड घालते. गृहस्थाश्रमी असलेल्या बहिणाबाईला 'वैराग्याचा' अर्थ समजला होता.

प्रपंच परमार्थ चालवी समान ।
तिथेच गगन झेलियेले ।।

प्रपंच आणि परमार्थ दोनही गोष्टी चालविणे फारच कठीण आहे. आकाश झेलण्याइतके कठीण आहे, असा बहिणाबाईंचा अनुभव आहे.

बहिणाबाई सर्व वर्णामध्ये ब्राह्मणवर्गाला श्रेष्ठ म्हणते. ब्राह्मणाची आदराने पूजा करावी असेही म्हणते, ती स्वतः जन्माने ब्राह्मण आहे. ब्राह्मणांच्या मंत्रपठणाने पाषाणालाही 'देवत्व' लाभते असे तिचे मत, पण ब्राह्मण म्हणजे कोण?...

ब्राह्मण कोणासी म्हणावे निश्चित ।
पहावा हा अर्थ विचारूनी ।
मग ते वंदावे भजावे सप्रेमे ।
मोक्षदानी नेमे वेदवाक्य ।।
जीव, देह, जाती, वर्ष, कर्म, धर्म ।
पहावे हे वर्म शोधुनिया ।
बहेणी म्हणे ज्ञान, पांडित्य, ब्राह्मण ।
विवेके करूनी पहा आधी ।।

बहिणाबाईंनी या विषयासंबंधी तर्कशुद्ध मीमांसा केलेली दिसते. केवळ यज्ञ, अनुष्ठानादि कर्म करणारा, शास्त्र जाणणारा, वरवर धर्म पाळणारा ब्राह्मण नाही.

ब्रह्म जाणे तोचि ब्राह्मण बोलिजे । येर ते सहज ब्रह्मबीज ।

खऱ्या ब्राह्मणाच्या मनात द्वैतभाव असता कामा नये। षड्रिपु असता कामा नयेत. खरा ब्राह्मण हा सत्यापासून जराही दूर जाता कामा नये. निर्विकल्प समाधीची ओढ ज्याला आहे तो ब्राह्मण, अशा ब्राह्मणाची आदराने पूजा करावी. तुकारामांसारख्या ब्रह्मसाक्षात्कारी महात्म्याकडे पाहूनच 'ब्राह्मणोपनिषद्' गायले आहे.

बहिणाबाईंची आणखी एक विशेष गोष्ट आहे – त्यांना आपले या अगोदरचे १२ जन्म एखाद्या चित्रपटासारखे स्पष्ट दिसतात. प्रत्येक जन्माचे स्थळ, वर्ण, नाव, आईवडील, कुळ, गोत्र सारे काही बहिणाबाईला आठवते. स्वत:च्या मुलाला ती स्वत:चे जन्म सांगते.

तेरा जन्म तुज सांगितले आज । दृश्य माझे मज सर्व होती ।
तीन शते आणि बसणे एकावन्न । आयुष्य निर्माण तेराजन्मी ।।

बहिणाबाईच्या समाधीचे, स्वानंद सोहळ्याचेही अभंग फारच उच्च प्रतीचे आहेत. संत गुलाबराव महाराज म्हणतात, बाईंचे हे वेदान्ताचे ज्ञान पाहून स्वत:च्या ज्ञानाच्या संकुचितपणाबद्दल लाज वाटते.

बहिणाबाईला मृत्यूची चाहूल लागली. तिने स्थान, तिथी निश्चित केली होती. अंतसमयाची 'कामना' पुढल्या जन्माला कारण होते म्हणून मनाला विषयांपासून विरक्त करून सर्व इंद्रिये भगवंताला समर्पित केली. मौन घेतले, ज्ञानेश्वरीचे पारायण केले.

सरले आयुष्य संचित देहाचे ।
क्रियमाण अंतीचे रामरूप ।
केला प्राणायाम सोऽहं धारणेसी ।
मिळाली ज्योतीसी ज्योती तेथे ।
उभारली गुढी मनाच्या शेवटी ।
झाली गज भेटी आत्मयासी ।
आपुले आपण देखिले मरण ।
तो झाला शकून स्वानंदेसी ।।

हा स्वानंदसोहळा, देहातील ज्योती या विश्वातल्या ज्योतीशी, चैतन्याशी एकरूप झाली. ७२ वर्षाची वृद्धा अखेरच्या क्षणापर्यंत अभंगरचना करते, गुरुबंधू निळोबा बहिणाबाईला 'ब्रह्मस्वरूपिणी' म्हणतात.

बहिणाबाईंनी समर्थ रामदासांप्रमाणे 'मनाचा बोध' अशी रचना केली आहे. त्यामुळे बहिणाबाईंवर तुकारामांप्रमाणेच समर्थांचीही छाप दिसते.

जयराम समर्थ ज्ञानाचा सागर । साक्ष ते अंतर त्याचे तया ।
मजवरी दृष्टी कृपेची वोतळी । प्रेमाची गुंतली माय जैसी ।।

त्यामुळे बहिणाबाई जेवढी वारकरी संप्रदायाची, तेवढीच समर्थ संप्रदायाचीही आहे.

बहिणाबाईंनी हिंदी रचना केल्या आहेत, त्यामध्ये इस्लामी राज्यातील मुसलमान ढोंगी साधूंना ती चांगलीच फटकारते. त्याशिवाय बहिणाबाईंनी अनेक स्त्रीगीते लिहिली आहेत. झिम्मा, विराव्या, हमामा, भारूडे... कितीतरी प्रकार. श्रोता गाणे, डफ गाणे हे ही प्रकार तिने हाताळले आहेत. यावरून बहिणाबाई 'कीर्तन' करत असावी असे वाटते.

नाथांसारखी विविध रचना करणारी, भारुडे – झिम्मा, पिंगा, सौरी गाणारी, समर्थाप्रमाणे मनाला बोध करणारी, ज्ञानेश्वरांप्रमाणे 'जोगी'च्या अभंगात आत्मानुभूती सांगणारी, आणि तुकारामांप्रमाणे 'ब्रह्मकर्म'पर अभंग रचणाऱ्या बहिणाबाईंच्या वाणीला धार येते.

अशा बहिणाबाईंना विनम्र अभिवादन.

सौ. मीरा प्रदीप लिमये
डी–१, डेबोनिय सोसायटी, चंदनवाडी, ठाणे – ४०० ६०२
फोन : ०२२–२५३९३३६९

ओव्यांवर निरूपण करू लागली. नवऱ्याला तिचा मत्सर वाटू लागला. त्याने पत्नीला देवळात जाऊन निरूपण करण्यास बंदी केली. बहिणाबाईंनी ती बंदी शांतपणे स्वीकारली. त्यावेळचा अभंग नवऱ्याबद्दल चांगले सांगणारा आहे. असे क्षमाशील, मोठे मन बाईचे असायला हवे म्हणजे संसार नीट चालेल.

रहिमतपुरी सर्व जाऊनी राहिलों । अवघीच लागलो भिक्षा करूं ।।
भ्रतार तो थोर स्नानसंध्या करी । देव तयावरी कृपावंत ।।
तेथील उपाध्य ग्रामीचा ग्रामस्थ । जावया उदीत वाराणसी ।।
ग्रामीचा व्यवहार चालावया लागीं । भ्रतार विभागी केला तेणे ।।
देखोनी नेटका ज्ञानी विद्यावंत । सर्वही गृहस्थ तया पुसे ।।
आपण काशीस जाऊनी तुम्हांसी । उपाध्या ज्योतिषी रत्नाकर ।।

पुढे बहिणाबाईंच्या प्रपंचातील घटनाक्रम म्हणजे आर्थिक अडचण, त्यामुळे वारंवार स्थलांतर, दान मिळालेल्या सवत्स धेनुबरोबरची त्यांची ममता त्यांचे प्रेम त्यासाठी सोसावा लागलेला नवऱ्याचा छळ, जयराम स्वामींनी रत्नाकरपंतांना समजविण्यासाठी त्यांच्याशी केलेला संवाद तसेच बहिणाबाईंना संत तुकारामांनी स्वप्नात येऊन दिलेले दर्शन हे सर्वश्रुत आहे. त्यांनी मनोमन संत तुकारामांना आपले गुरू मानले व त्यांच्या भेटीचा ध्यास घेतला.

नवल जनांसी वाटले म्हणोनी । येती ते धावोनी पहावया ।।
भ्रतार हा माझा देखोनी तयासी । माझिया देहासी पीडा करी ।।
न देखवे तया द्वेषी जनाप्रती । क्षणक्षणा चित्ती द्वेष वाढे ।।
म्हणे ही बाईल मरे तरी बरे । इस का पामरे भेटताती ?....
भ्रतार म्हणतसे आम्ही की ब्राह्मण । वेदांचे पठण सदा करूं ।
कैंचा शूद्र तुका स्वप्नीचे दर्शनीं । बिघडली पत्नी काय करूं ? ।
कैंचा जयराम कैंचा पांडुरंग । माझा झाला भंग आश्रमाचा ।
आम्ही काय जाणो नाम हरिकथा । भक्ति हे तत्त्वता नसे स्वप्नीं ।
कैंचे संत साधू कैंची भाव भक्ती । भिक्षुकांचे पंक्ती वसा सदा ।।
बहिणी म्हणे ऐसे चित्तात भ्रतारें । चिंतोनी निर्धारी विचारिले ।।
...विचारिलें मनी भ्रतारें आपण । आता हे त्यागोन वना जावें ।
इशीं नमस्कार करितील जन । आम्ही इसी तृण वाटो परी ।।
स्त्रियेसी बोलती अनुवाद कथेचा । आम्ही इशीं नीचापरी वाटो ।।
पुसतची येती इसी पहा जन । आम्ही कीं ब्राह्मण मूर्ख जालों ।।
इचे नांव घेता गोसावीण ऐसे । आम्हां कोण पुसे इजपुढे ।।
बहिणी म्हणे ऐसे भ्रतार मानसीं । चिंतुनी चित्तासी बोध करी ।।

नवऱ्याने डोक्यात राख घालून घर सोडण्याचा निर्णय घेतला. तेव्हा बहिणाबाई तीन महिन्यांची गरोदर होती. पण मुलासाठीही ते थांबायला तयार नव्हते. म्हाताऱ्या सासुसासऱ्यांनी आग्रह केला. तेव्हा एक दिवस थांबायला ते तयार झाले. त्याच दिवशी त्यांना फणफणून ताप भरला.

वास्तविक पाहताना नवऱ्याच्या उत्कर्षाने पत्नी आनंदित होते, पण स्वत:च्या उत्कर्षाने संकोचते. नवऱ्याचा 'अहं' संभाळण्यासाठी ती सतत स्वत:कडे लहानपण घेत असते. पण बायकोचा उत्कर्ष, तिचे श्रेष्ठत्व, तिची लोकप्रियता नवऱ्याला सहन होत नाही.

या सर्व घटनेवर बहिणाबाईंची प्रतिक्रिया काय होती ?

नवऱ्याने तर निश्चय केलेला 'न पाहे मी मुख सर्वथा इयेचे । हीनत्व आमचे कोण फेडी ?' बहिणाबाई म्हणतात,

भ्रताराची सेवा तोचि आम्हां देव । भ्रतार स्वयमेव परब्रह्म ।।
तीर्थ भ्रताराचे सर्व–तीर्थ जाणा । तया तीर्थां विणा निरर्थक ।।
भ्रतार वचनासी उल्लंघीन जरी । पापे माझ्या शिरीं पृथ्वीची ।।
धर्म अर्थ काम मोक्षासी अधिकारी । भ्रतार साचारी वेद बोले ।।
हा माझा निश्चय मनातील हेत । भ्रतारेसी चित्त लावियेले ।।
भ्रतार सेवेने सांग हा परमार्थ । भ्रतारेंच स्वार्थ सर्व आहे ।।
भ्रतारावांचोनी अन्य देव जरी । येईल अंतरीं ब्रह्महत्या ।।
सद्‌गुरू भ्रतार साधन भ्रतार । सत्य हा निर्धार अंतरीचा ।।
बहिणी म्हणे देवा भ्रताराचे मनीं । तुवां प्रवेशोनी स्थिर केले ।।
...भ्रतार गेलिया वैराग्य घेऊनी । पांडुरंगा जनीं जिणें काय ?
प्राणावीण देह काय पावे शोभा । रात्रीविण प्रभा चंद्राचिये ।
भ्रतार तो जीव देह मी आपण । भ्रतार कल्याण सर्व माझें ।।
भ्रतार जीवन मी मीन तयात । कैसेनी वाचत जीव माझा ।।
भ्रतार तो रवी मी प्रभा तयासी । वियोग हा त्यासी केवीं घडे ।।
बहिणी म्हणे माझा जीवाचा निर्धार । बोले पै विचार हरी जाणे ।।

तिने मनाशी निश्चयच केला–

भ्रतारें वैराग्य घेतलीया वरी । जीव हा निर्धारी देईन मी ।
वत्सासाठी देह अचेतन पडे । हें तंव रोकडें परब्रह्म ।।

बहिणाबाईंनी जीवेभावे भ्रताराची सेवा केली. तिची पतिनिष्ठा, तिची कळकळ पतीला कुठेतरी स्पर्शून गेली. ती 'आपण अहोरात्र तयापासीं।।' राहिली. पतीला महिनाभर त्रास झाला.

'परी तया व्यथेलागी न ये गुण । म्हणे तो मरण आले मज ।।
काय पांडुरंगा तुकोबासी निंदी । व्यथा तेचि संधी आली मज ।।
जरी तुकाराम निंदिला त्यागुणें । असेल दुखणें व्यथा मज ।।
...वृद्धसा ब्राह्मण येऊन बोलतु । म्हणे कारे मृत्यू इच्छितोसी ?
वैराग्य कां तुज आलें असे मना । स्त्रीचा त्याग कोणा गुणें केला ?
आधी इचा विचारीं अपराध अंतरी । मग कोपा करीं प्रवर्तावें ।
वाचण्याची इच्छा असचिया मानसीं । तरी तू इयेसी अंगिकारी ।।
स्वधर्मविरहित वर्तेला ही जरी । तरी तिचा करी त्याग वेड्या ।।
ही आहे विरक्त निश्चित हरिभक्त । तुवां पाही सत्य तैसे व्हावें ।।
होईल कल्याण बोलत ब्राह्मण । भ्रतारें चरण वंदियेले ।।

ब्राह्मणाच्या या बोलांनी रत्नाकरपंतांच्या मनातील द्वेष गेला. त्यांचे शरीर पुन्हा आरोग्यसंपन्न झाले व त्यांनी स्वत: पुढाकार घेतला. सासूसासरे व पत्नीला घेऊन ते देहूस आले. सोबत गायही होतीच.

यानंतर त्यांनी आपल्या पत्नीला छळले नाही. सर्वांनी तुकाराम महाराजांचे दर्शन घेतले. त्यांच्या कीर्तनाचा लाभ घेतला. दुर्दैवाने त्यांना रहावयास जागा मंबाजीच्या ओसरीवर मिळाली. त्याने दुस्वास केला. गायीला कोंडले. तीन दिवस उपाशी ठेवले. खूप मारले. वळ तुकाराम महाराजांच्या अंगावर उठले. बहिणाबाई तडफडल्या. पण मंबाजीच्या

घराला आग लागली व गाय दावे तोडून बहिणाबाईंकडे आली.

या सर्व प्रकारात पति, पत्नीच्या बरोबर उभे राहिले.

'पांडुरंग तुका पांडुरंग तुका । वेगळीक देखा होम केलीं ।।

हा प्रत्यय बहिणाबाईंना कोल्हापुरीच आला होता. आता रत्नाकर- पंतांनाही तुकाराम महाराजांचा अधिकार पटला. त्यांनीही त्यांना साष्टांग दंडवत घातले. पुढे तुकोबांच्या घरीच आनंदओवरीत ते राहू लागले. पांडुरंगाचे, विठोबाचे ध्यान करावे, अभंग, निरूपणे प्रवचने यात दोघांचाही वेळ चांगला जाई.

पुढे हे कुटुंब पुन्हा शिऊरला आले. त्यांचा प्रपंच व्यवस्थित चालला होता. देहूगावी कन्यारत्नाचा लाभ झाला. तिचे नाव काशी नंतर पुत्र लाभला. बहिणाबाईंचा विश्वास होता की, गेल्या जन्मीचे वासरूच पोटी पुत्र बनून आले. नाव विठोबा ठेवले. मध्यंतरी वडील व आई देवाघरी गेले. पतीही अचानक देवाघरी गेले. बहिणाबाईंनी धीराने भगवत् चिंतनात व तुकोबा चिंतनात वेळ घालविला.

बायका जमत. त्यांना बहिणाबाई काहीबाही सांगत. एकदा त्यांनी तुलसीमहात्म्य सांगितले.

''जेथे नाही वृंदावन । तेंचि जाणावे स्मशान ।।
राहो नये तये ठायीं । एक घडी पळ पाही ।।
जेथे असे तुळसीपान । तेथे आहे नारायण ।।
बहिणी म्हणे विष्णू नांदे । तुलसीचे ठायी मोदे ।।

ब्रह्मा विष्णू महेश वृंदावनी राहतात. सर्व तीर्थे तिथेच असतात.

'तुलसीचे पानीं । वसे राधाकृष्ण दोनी'

त्यांचा पंचतत्त्वांचा पाळणाही खूप सुंदर आहे.

जो जो रे जो जो बाळा । प्रिये घाली वेल्हाळा ।
उन्मनीं नीज लागो डोळा । हळू हळू घाली ज्ञानकळा ।।धृ.।।
प्रपंच नाशवंत याचा नाही रे भर्वसा ।
कन्यापुत्र गृहदारा हा तव भवबंधफासा ।
दृश्य हे मायाजाळ हा तव काळाचा वळसा ।
सावध होई बाळा परतोनी पाहे कसा ।।१।। इत्यादि

त्यांचे ज्ञानपर अभंग त्यांचा अधिकार दर्शविणारे आहेत. रूपकात्मक अभंगही सुंदर आहेत.

अशारीतीने बहिणाबाईंनी आपल्या आचरणांतून प्रपंच कसा करावा याचा बोध दिला आहे. बाईने सोशिक असावे. पतीला सांभाळून असावे. गृहकृत्यदक्ष असावे. पण तिने पांडुरंगाला विसरू नये. पांडुरंगाचे चिंतनी, सद्गुरूचिंतनी जे सुख आहे ते कुठेही नाही. ते प्रत्येकाने अवश्य मिळवावे. पण ते मिळविण्यासाठी भांडणतंटे, वादविवाद घालू नये. नम्रपणे, सोशिकपणे आपले म्हणणे पटेतोपर्यंत वाट पहावी.

आज तिचा सोशिकपणा बऱ्याचजणांना पटणारा नाही. नवऱ्याचा तापटपणा, अहं दुखावल्यामुळे गुरासारखे मारणे व तरीही पत्नीने 'धन्य त्रिभुवनी वंद्य पतिव्रता' म्हणत पतीच्या चरणांना धरून राहणे आज मानायला कठीण वाटते. कारण आजचा काळ वेगळा आहे. पण खोलात जाऊन विचार केला तर बहिणाबाईंच्या वागण्यामागचे तत्त्व आजही खरे आहे. 'अरे' ला 'कारे' म्हणून काही साधता येत नाही. एकाने कुणीतरी सोशिकपणे सहन करून शांतपणे परिवर्तन आणावे लागते. मुख्य म्हणजे त्याने कुटुंब अबाधित राहते. आज हा सोशिकपणा नसल्यामुळे घटस्फोटांचे प्रमाण वाढते आहे. एकटेपणा व त्यामुळे येणारे मानसिक व सामाजिक प्रश्न वाढत आहेत. एकत्र राहणे ही माणसाची मानसिक गरज आहे. त्यासाठी सहनशीलता, तडजोड ही हवीच. प्रत्येक कालाची तडजोड वेगवेगळी असू शकते.

बहिणाबाईंनी ही तडजोड केली व आपले कुटुंब राखले. नवरा डोक्यात राख घालून गेला तर त्या जिण्यात काय अर्थ आहे? हे त्यांचे म्हणणे खरे आहे. त्यांनी आपल्या कर्तव्यात कधी चूक केली नाही. म्हणून जेव्हा वृद्ध ब्राह्मणाने रत्नाकरपंतांना प्रश्न विचारला की, पत्नीधर्मात ती कुठे कमी पडली का? याचा विचार कर. तेव्हा रत्नाकरपंतांकडे या प्रश्नाला उत्तर नव्हते. कुटुंबामध्ये त्याने काय करायला हवे? यापेक्षा मी काय करायला हवे? माझे कर्तव्य काय? हा प्रत्येकाने विचार केला व तसे वागले तर वादविवाद कमी होतील. 'तो नीट वागत नाही मग मी का वागू?' या वृत्तीने प्रश्न सुटत नसतात.

बहिणाबाईंनी आईवडिलांचा, पतीचा, मुलांचा, सुनेचा, आल्या गेल्याचा आदर राखून प्रेमाने, आत्मीयतेने सांभाळ केला. घरातील बाई अशी असेल तर घर अभंग राहील. त्यांत शांती व आनंद राहील.

बहिणाबाईंनी यज्ञयाग विधी यांना महत्त्व दिले नाही. शरीराला कष्ट होतील असे उपासतापासही करू नका असे त्या सांगत. आयाबायांना गोळा करून हिताच्या गोष्टी त्या सांगत. हा सद्भाव माणसाला सुखशांती देतो. आपल्याकडून होईल तेवढे इतरांसाठी माणसाने करीत रहावे. माणसे सांभाळावीत, त्यांची मने सांभाळावीत.

आणि हे सर्व करीत त्यांनी परमार्थ साधला. भोळेपणाने नाव घेणाऱ्या त्या नव्हत्या. त्यांचे ज्ञानपर, विचारांनी भरलेले अभंग वाचले तर याची साक्ष येते. म्हणजे जळात राहूनही कमलपत्राप्रमाणे त्या राहिल्या. आपणही असेच रहायला हवे. आपल्या कर्मांप्रमाणे फळ मिळते हे जाणून सत्कर्म करावे. 'देहीं असोनिया विदेही' असावे. 'ज्याचे कर्म त्याने केलेंचि पाहिजे । न करिता सहजे दोष होती ।' स्वधर्माचे आचरण जीव ओतून करावे पण अंतरी त्यात अडकू नये. अंतरी त्या एका हरीचे स्मरण अखंड ठेवावे.

त्यामुळे त्यांच्या मते पतिव्रता कोण?

आपणा आपण ओळखिलें जिने । धन्य तेचि जाणे पतिव्रता ।।
प्रपंच परमार्थ चालवी समान। तिनेच गगन झेलियेले ।।
अखंडित ध्यास भगवंताचा चित्ता । तेचि पतिव्रता तिन्ही लोकां ।।

सुखीजीवनाचा हा मंत्र देणाऱ्या बहिणाबाईंनी स्वत: 'गगन झेलियेले'. प्रापंचिकांनी सुखी व सार्थक जीवन कसे जगावे याचा आदर्शपाठच जणू त्यांनी आपल्या जीवनाने घालून दिला!

अशा गगन झेलणाऱ्या बहिणाबाईंना शतप्रणाम!

डॉ. सौ. अंशुमती अ. दुनाखे
'विन्दांशु' प्लॉट नं. १३, तेजस सहकारी गृहरचना म.
तेजसनगर, कोथरूड, पुणे ४११०३८. फोन : २५३८५०२३



बहिणाबाईंच्या कवितेतील प्रवृत्ती आणि निवृत्ती

डॉ. ह. य. कुलकर्णी

एम्.कॉम्, पहिल्या वर्गात पहिले, पुणे विद्यापीठ १९६२, पी.एच्.डी. अर्थशास्त्र १९८०, पुणे विद्यापीठ, माजी प्राध्यापक बी.अेम्.सी.सी. पुणे, माजी शाखा व्यवस्थापक व प्रशिक्षण अधिकारी - बँक ऑफ बडोदा. प्रकाशित पुस्तके - श्रीज्ञानेश्वरी, एक अवलोकन, श्रीसमर्थ रामदास चरित्र, वाङ्मय व कार्य

प्राचीन मराठी कवयित्रींपैकी मुक्ताई, जनाबाई व कान्होपात्रा या तिघींना वैवाहिक जीवनातील संसारतापाचे चटके सोसावे लागले नाहीत याचे कारण मुक्ताई ही कौमार्यावस्थेतच जीवन्मुक्त झाली; जनाबाईचे सारे आयुष्य नामदेवाघरी दासी म्हणून गेल्यामुळे तिच्या लग्नाचा प्रश्नच उद्भवला नाही आणि तिसरी कान्होपात्रा ही बिदरच्या बादशहाची पापी नजर पडण्यापूर्वीच पांडुरंगचरणी विरून गेली. नाही म्हणावयास चवथी समर्थशिष्या वेण्णाबाई ही बालविधवा असल्यामुळे तिला थोडेफार चटके सोसावे लागले. बाजारगप्पावर विश्वास ठेवून खुद्द तिच्या मातापित्यांनीच तिला विष दिले; परंतु त्यातून तावून-सुलाखून निघून ती फार मोठ्या आध्यात्मिक उंचीवर जाऊन पोहोचली.

तुकाराम शिष्या बहिणाबाई मात्र याला अपवाद आहे. ७२ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभलेल्या या कवयित्रीने सांसारिक जीवनात जितके चटके सोसले तितके दुसऱ्या कुणीही सोसले नसावेत. तिच्या वाढत्या आध्यात्मिक अधिकारामुळे तिच्या पतीला वाटणारी असूया व त्यातून त्याने केलेला तिचा छळ पाहिला म्हणजे या स्त्रीला प्रवृत्ति आणि निवृत्ति यांचा मेळ घालण्यात किती अवघड कसरत करावी लागली असेल याची कल्पनाच करवत नाही. तथापि, तिचे लौकिक चरित्र आणि अभंगरचना यावरून तिच्या मनात चाललेल्या प्रवृत्ती आणि निवृत्ती यातील द्वंद्वाची थोडीफार कल्पना येऊ शकेल. म्हणून बहिणाबाईंचे चरित्र आणि अभंगरचना या दोहोंचा अधिक ऊहापोह करणे योग्य ठरेल.

लौकिक चरित्राचा मागोवा

मराठवाड्यातील वेरुळ जवळील देवगांव येथे इ.स. १६२८ मध्ये आवजी कुलकर्णी व त्यांची पत्नी जानकी या देशस्थ यजुर्वेदी दांपत्याच्या पोटी बहिणाबाईंचा जन्म झाला. तिच्या वयाच्या तिसऱ्या वर्षीच तिचे लग्न रत्नाकर पाठक या तिच्याहून २७ वर्षांनी मोठा असलेल्या बिजवराशी लावून देण्यात आले. ज्या वयात मुलींनी भातुकलीचा खेळ खेळावयाचा त्या वयात तिचे लग्न झाले असले तरी तिचे मन संसारात कधीच रमले नाही. बहिणाबाई म्हणते त्याप्रमाणे,

लोकांचिया मुली खेळती बोळकी
वाटे घ्यावे मुखी मज नाम
नावडे फुगडी टिपरियांचा खेळ
असावे निश्चळ वाटे मना
बहिणी म्हणे पूर्वी होते जे पदरीं
तेची या संसारी प्रगटले

तिचे चित्त लहानपणापासूनच ईश्वरभक्तीत रमले होते. लग्नानंतर लवकरच देवगांव येथील आवजीपंतांच्या वतनासंबंधी भाऊबंदकी सुरू झाल्यामुळे हे सारे कुटुंब तेथून निघून प्रवरासंगम, शिरवर, शिंगणापूर, पंढरपूर, रहिमतपूर असे स्थलांतर करीत कोल्हापूर येथे आले व हिरंभट नावाच्या कुणा एका ब्राह्मणाच्या आश्रयाने राहू लागले. त्यावेळी कोल्हापुरात रामदास पंचायतनातले एक कवि जयरामस्वामी वडगांवकर यांची कीर्तने चालू होती. ती ऐकल्यामुळे बहिणाबाईला जयरामस्वामींबद्दल अतीव आदर वाटू लागला व तिची अध्यात्मातील प्रगती झपाट्याने होऊ लागली. परंतु हे पाहून तिच्या पतीच्या मनात असूया निर्माण झाली व तो तिचा द्वेष करू लागला. माझ्यापेक्षा लोक हिलाच जास्त मान देतात हे पाहून त्याच्या अंगाचा तिळपापड झाला, व तो तिला मारहाण करू लागला. एकदा तर त्याने तिची मोट बांधून, टाकून दिली. त्या स्थितीत ती तीन दिवस पडून होती. परंतु या तीन दिवसांत तुकोबारायांनी तिला स्वप्नात दर्शन दिले. तेव्हापासून बहिणाबाईला तुकोबांचा छंद लागला व त्यांची भेटी व्हावी यासाठी ती तळमळू लागली. परंतु मुळातच जमदग्नि असलेल्या पतीच्या रागाचा पारा आणखी वर जाऊन त्याने तिचा त्याग करून वनात जाण्याचे ठरविले.

विचारिले मनीं भ्रतारे आपण
आता हे त्यागोन वना जावे
इशी नमस्कार करितील जन
आम्ही इशी तृण वाटो परी
इचे नांव घेती गोसावीण ऐसे
आम्हा कोण पुसे इजपुढे
पतिव्रता धर्म

असा त्रागा करून पती आपला त्याग करून वनांत निघून जाणार हे ऐकताच बहिणाबाईंच्या पायाखालची वाळू सरकू लागलेली दिसते. पती कितीही दुष्ट असला, त्याने कितीही छळ केला तरी पतिविरहाची कल्पनाच तिला सहन होत नाही. कारण ती एक आर्य पतिव्रता स्त्री आहे. पती निघून गेल्यावर जगून तरी काय उपयोग असा विचार ती नाना दृष्टांतांच्या सहाय्याने बोलून दाखविते,

भ्रतार गेलीया वैराग्य घेऊनी
पांडुरंगा जनीं जिणें काय
प्राणाविण देह काय पावे शोभा
रात्रीविण प्रभा चंद्राचिये
भ्रतार जीवन मीन मी तयात
कैसोनि वाचत जीव माझा
भ्रतार तो रवि मी प्रभा तयासी
वियोग हा त्यासी केवी घडे

आणि इतकेहि करून तो निघून गेलाच तर,

भ्रतारे वैराग्य घेतलिया वरी
जीव हा निर्धारी देईन मी

असे ती सांगते.

भ्रतारास उपरति

परंतु तिच्या सुदैवाने त्याच वेळी भ्रताराच्या शरीरास व्यथा होऊन त्याच्या अंगाचा दाह होऊ लागला. सात-आठ दिवस त्याने हे दु:ख भोगल्यावर एके दिवशी कोणी एक ब्राह्मण येऊन त्याची समजूत घालू लागला,

वांचण्याची इच्छा असलिया मानसी
तरी तूं इयेसी अंगिकारी
ही आहे विरक्त निश्चित हरिभक्त
तुवा पाही सत्य तैसे व्हावे
होईल कल्याण बोलला ब्राह्मण
भ्रतारे चरण वंदीयेले

आणि असे बोलून तो ब्राह्मण अदृश्य झाला. इकडे तिच्या भ्रतारास आरोग्य होऊन त्याची बुद्धी पालटली आणि तो म्हणू लागला,

तुकोबाच्या गांवी जाऊनिया राहो
मनींचा दृढावो धरुनिया
ऐसी पालटली भ्रताराची बुद्धी
स्वामी कृपानिधी अंतरसाक्ष

त्यानंतर बहिणाबाईचे कुटुंब देहूला येऊन राहू लागले. तुकोबांचे नित्य दर्शन घ्यावे, त्यांची रसाळ कीर्तने ऐकावीत यात तिचा काळ आनंदात जाऊ लागला.

धर्ममार्तंडांकडून उपद्रव

परंतु, ही ब्राह्मण स्त्री तुकारामाला, म्हणजे शूद्राला नमस्कार करते हे पाहून मंबाजी गोसावी सारख्या धर्ममार्तंडांना संताप आला व ते तिला त्रास देऊ लागले. मंबाजीने पुणे येथे राहणाऱ्या आपाजी गोसावी यास पत्रही पाठविले व हा अनर्थ थांबवावा असे सांगितले. तरीही बहिणाबाईने तुकारामभक्ती सोडली नाही. तिची योग्यता ओळखून तुकोबांनी तिच्या मस्तकावर हात ठेवून कवित्वाचे वरदान दिले,

ठेवियला हस्त मस्तकी बोलून
दिले वरदान कवित्त्वाचे
बहिणी म्हणे नेत्रे स्वप्न की जागृती
इंद्रियांच्या वृत्ति ओसरल्या

आता बहिणाईच्या सर्व मनोकामना पूर्ण झाल्या आणि ती अंतर्बाह्य आनंदात न्हाऊन निघाली. तिला कविता स्फुरू लागली आणि त्यातूनच तिची अभंगरचना आकार घेऊ लागली. तुकोबांच्या सहवासातील हा सहा-सात वर्षांचा काळ बहिणाबाईंच्या जीवनातील अत्युच्च आनंदाचा काळ म्हटला पाहिजे. तुकोबांच्या निर्याणानंतर ती सिरुर येथे स्थायिक झाली आणि आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १६२२ रोजी, म्हणजे इ.स. १७०० मध्ये, वयाच्या ७२ व्या वर्षी तिने देह ठेवला. तिला काशी नावाची मुलगी व विठोबा नावाचा मुलगा होता. आश्चर्याची गोष्ट अशी की आपला मृत्यूकाळ तिने अचूक ओळखला आणि मृत्यूपूर्वी आपल्या मुलाला स्वत:च्या मागील १२ जन्मांचा वृत्तांत सांगितला.

प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे

लहान वयात झालेले लग्न, पति-पत्नीच्या वयातील महदंतर, पतीकडून होणारी मारहाण यांनी बहिणाबाईच्या जीवनाचा फार मोठा भाग व्यापला आहे. हा शारीरिक छळ तिने पतिव्रता स्त्रीच्या नात्याने आयुष्यभर सहन केला. परंतु तिचे आंतरिक दु:ख काही वेगळेच होते; असे ती आत्मनिवेदनपर अभंगातून सांगते. स्त्री असल्यामुळे वेदाध्ययनाचा वा वेदश्रवणाचा अधिकार नाही, प्रणवाचा उच्चार करता येत नाही हे देखील तिने 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास' या जनाबाईच्या उक्तीप्रमाणे सहन केले. तिच्या दृष्टीने खेदाची गोष्ट अशी होती की, तिच्या सासरी,

नामाचा विटाळ आमुचिये घरीं
गीताशास्त्र वैरी कुळीं आम्हा
देवतीर्थ यांचा नावडती हरी
ऐसियाचे घरी संग दिला

अध्यात्म विचारांचा पूर्णपणे अभाव असल्याने तिचा जीव तळमळत असे. या अनुतापाने ती इतकी पोळली आहे की,

वाटे देह आता घालू अग्निआत
किंवा हा करवत घालू माथा

इथपर्यंत तिची मजल गेली आहे. आपले प्रारब्ध आपणच भोगले पाहिजे हे तिला मान्य आहे म्हणूनच येथून पुढे ती निवृत्तीकडे वळली आहे. त्यामुळे देहू गावात वास्तव्यास आल्यानंतर तिच्या मनातील दु:खाची जागा आनंदाने घेतलेली दिसते -

तुटके संचित जाले शुद्ध चित्त
अंतरीचा हेत ओळखिला

कृपा केली देवे इंद्रायणीतीरी
देहूग्रामी थोर 'भक्तीपंथ'

दररोज तुकोबांचे दर्शन घ्यावे, त्यांचे कीर्तन ऐकावे यात तिचा काळ आनंदात जाऊ लागला. तुकोबांचा सहवास लाभल्यामुळे जीवनाचे सार्थक झाल्याची कबुली ती देते –

ते सुख सांगता वाचे पडे मौन
जाणता ते धन्य गुरुभक्त
झालासे आनंद इंद्रियांचे द्वारी
बैसले शेजारी चैतन्याचे

मातीचा घट काठोकाठ भरून न फुटता जळात बुडावा तसे तिचे झाले आहे.

निवृत्तीचे उगमस्थान

निवृत्ती ही बहिणाबाईच्या स्वभावातच रुजलेली आहे. नव्हे, तो तिचा स्थायीभाव आहे. ते तिच्या पूर्वसंचिताचे फळ आहे. निंब कडू का व्हावा, ऊस गोड का व्हावा किंवा फुलात सुगंध का यावा हे सारे,

बिजा ऐसे फळ गोडीचा निवाडा
हा अर्थ उघडा दिसतसे
बहिणी म्हणे बीज गोड त्याचे फळ
उत्तम केवळ सेव्य सर्वा

बीज तसे फळ या नात्यानेच घडत असते. तद्वत, निवृत्तीचा हा वारसा तिच्या माहेरच्या संस्कारातूनच तिच्याकडे चालत आला आहे.

भक्ति–विरक्तीचे अभिन्नत्त्व

बहिणाबाईच्या विरक्तीचे मूळ तिने केलेल्या तुकाराम महाराजांच्या व पांडुरंगाच्या भक्तीत आहे. भक्तीमुळे चित्तशुद्धी होते, मनात वैराग्य संचारते व आत्मसुखाचा अनुभव येऊ लागतो.

चित्तशुद्धी होय भक्तीचेन योगे
होईल वाउगे दृश्यजात
वैराग्य संचरे मनामाजि जाण
जैसे हे वमन सर्व तैसे

विषयांचा संग तिला वमनासमान वाटतो. एकदा अहंकार नाहीसा झाला, विषयासक्तीचे उच्चाटण झाले म्हणजे मन उदास होऊन प्रपंचाची आस तुटते हा बहिणाबाईचा स्वानुभव विलक्षण आहे. या आत्मानंदात दंग राहूनच तिने आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १६२८ रोजी इहलोकीचा निरोप घेतला.

प्रवृत्ती–निवृत्तीचा सवतीमत्सर

बहिणाबाईच्या मनात प्रवृत्ती–निवृत्तीच्या द्वंद्वाने माजविलेली खळबळ तिच्या एका मोठ्या अभंगात व्यक्त झाली आहे. प्रवृत्ति–निवृत्ति या दोघींच्या संवादाचे रूपक साधून तिने ती व्यक्त केली आहे. मानवी मन हे देहनगरीच्या राज्याचा राजा असून त्याला प्रवृत्ति आणि निवृत्ती या दोन राण्या आहेत. त्यापैकी आवडती पट्टराणी कोण व नावडती कोण याबद्दल त्या दोघीत भांडण लागले आहे. दोघीही एकमेकींच्या वर्मावर बोट ठेवीत आहेत. प्रवृत्तीची कामगिरी अशी कि.

प्रवृत्तीने व्याप केला पुरे, पट्टणे वसविली
देश, दुर्गे नानापरी राया पाडियली भुली
पुत्रकन्याप्रजा कैसी एका एका प्रसवली
लावण्य दाविले मना प्रवृत्तीने ख्याति केली

तिने देश, पुरे, पट्टणे व प्रजा निर्माण करून राजाला भूल पाडली आणि पुत्र–कन्या प्रसवून आपले लावण्य राजासमोर मांडले. मीच पट्टराणी असा दावा करून तिने निवृत्तीला दूर हटण्यास सांगितले. तेव्हा निवृत्तीने दिलेले उत्तर फारच मार्मिक आहे. ती म्हणते, 'प्रवृत्तिबाई, अज्ञान हा तुझा पिता असून तुझे लावण्यही लटके आहे. तेव्हा, पट्टराणी असल्याचा भ्रम तू डोक्यातून काढून टाक.' यावर प्रवृत्ति म्हणते, 'निवृत्तीबाई, ब्रह्मा, सूर्य, चंद्र ही माझीच बाळे असून सनकादिक माझे नातू आहेत. तू पट्टराणी म्हणवतेस, मग रावणाने सीतेला पळवून नेले तेव्हा तू का गप्प बसलीस? तेव्हा तिला सोडवून आणण्यासाठी राजाला माझीच मदत घ्यावी लागली ना!' यावर प्रवृत्तीला उत्तर देताना निवृत्ति म्हणते, 'बाई, विदेह हा माझा पिता असून तो परम ज्ञानी आहे. त्यावेळी मी रामाजवळच अदृश्य रूपाने उभी होते; हे सत्य तुला ठाऊक असल्याचे दिसत नाही. माझे नाव उन्मनी असून मी निर्गुणाच्या संगतीत वावरत असते. मी निरंजन अशा स्थळी राहते, परमार्थ हा माझा भाऊ आहे आणि भाव व निजबोध हा क्षमाशील असा माझा पुत्र आहे. तरी तू तुझ्या माहेरचे कोण कोण आहेत ते सांग.'

यावर प्रवृत्ति म्हणते, 'अज्ञान हा माझा पिता व अहंकार हा पूर्वज आहे. काम–क्रोध–मोह–आशा हे माझे पुत्र–कन्यादिक आहेत. शेवटी निरुत्तर होऊन प्रवृत्ती भानावर आली व तिने हार मान्य केली. आपण दोघी सवती–सवती नसून बहिणी–बहिणी आहोत हे तिला पटले. त्यावर पतिसेवा करणे हाच प्रवृत्तीचा धर्म असून ती केलीस तरच तू सुखी होशील असे निवृत्तीने सांगितले. शेवटी प्रवृत्ति–निवृत्तीचे भांडण मिटून त्यांच्यात समेट झाल्यावर बहिणाबाई म्हणते,

बहिणी म्हणे प्रवृत्तीत अवघी निवृत्ति आहे
अज्ञानाचे मूळ सांडी द्वैत आपणची जाये
विकल्प हा स्वये तुटे तेथे द्वैत कैचे राहे
सवयी त्या एकरूपा मनपणी मन आहे

उपसंहार

तुकोबारायांच्या नंतर मराठी संतकवींच्या परंपरेतील नांव घेण्यासारखे शेवटचे संतकवि निळोबाराय पिंपळनेरकर हे होत. निळोबांचा जन्म तुकोबांच्या निर्याणानंतर जवळजवळ १५ वर्षांनी झाल्यामुळे त्यांना बोवांचा प्रत्यक्ष सहवास घडला नाही. तरी तुकोबांनी त्यांना स्वप्नदृष्टांत दिल्यामुळे निळोबा हे तुकोबारायांना गुरू मानीत असत. परंतु बहिणाबाई या निळोबाहून अधिक भाग्यवान होत. कारण, त्यांना स्वप्नदृष्टांत तर झालाच, परंतु त्या देहू गांवी वास्तव्यास आल्यावर त्यांना तुकोबांचा प्रत्यक्ष सहवास सहा–सात वर्षे घडला. त्यामुळे त्यांचे अवघे जीवनच उजळून गेले. पतीने केलेला छळ जितका दु:खदायक

होता त्याच्या अनेक पटींनी आनंदात त्यांचा हा उर्वरित काळ गेला. जीवनाचे सार्थक झाल्याची खूण त्यांना पटली. बहिणाबाई या प्राचीन मराठी कवितेतील शेवटच्या कवयित्री असून त्यांची कविता साधी, सोपी, सरळ व हृदयाला भिडणारी आहे. वास्तविक तिला भावकविताच म्हणावयास हवे. वामन पंडित किंवा मोरोपंत या पंडित कवींप्रमाणे यमक जुळविण्याचा अट्टाहास त्या करीत नाहीत. त्यांच्या कवितेतील भाव महत्त्वाचा आहे. वृत्त किंवा छंदशास्त्र महत्त्वाचे नाही. महदंबा, मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा, वेण्णाबाई यांच्याप्रमाणेच बहिणाबाई हा मराठी सारस्वताच्या अवकाशात तेजाने तळपणारा तारा आहे. त्यांच्या अभंग मालेतील कौस्तुभमणी शोभावा अशा अप्रतिम अभंगाकडे दृष्टिक्षेप टाकून बहिणबाईंचा निरोप घेऊ-

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले तें आवार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केले वोजा ।।

डॉ. ह. य. कुलकर्णी
डी-१४, शालिनी रेसिडेन्सी, स्पेन्सर्सच्या वर,
कर्वेनगर, पुणे ४११०५२
दूरध्वनी : ६५२३७४३४, ८८०५६२६३२१



बहिणी फडकती ध्वजा

डॉ. कल्याणी माधव नामजोशी

एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स), एम.ए. (संस्कृत), पीएच.डी. (संस्कृत वेदांत),
गरवारे महाविद्यालयात २ वर्षे प्राध्यापक.
साक्षेप समर्थांचा 'एका जनार्दनी', 'तेजाचं चांदणं' या पुस्तकाचे सहलेखन.
वैदिक वाङ्मय, उपनिषदे, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध व इतर संतवाङ्मयावर व्याख्याने व प्रवचने

भारताला थोर व्यक्तींची अक्षुण्ण परंपरा लाभली आहे. त्यात नररत्नांच्या सारखीच स्त्रीरत्नांची संख्याही विपुल आहे. साऱ्या जगात स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्थैर्य व सन्मान यासाठी दीर्घकाळ झगडा करावा लागला व आपले अस्तित्व प्रस्थापित करावे लागले. भारतीय नारीला हिन्दुधर्मानेच सन्मान, सामाजिक प्रतिष्ठेची उंची, कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रात संचार आदी अनेक प्रकाराने सर्वोच्च स्थान देऊन गौरविले आहे. धर्माचा आदर समाजात डोळसपणे राहता तर भारतीय स्त्रीजीवन आज आहे त्यापेक्षा गौरवशाली व पूजनीय राहिले असते.

प्रवृत्ती व निवृत्ती दोन्ही क्षेत्रांत स्त्रियांनी स्वकर्तृत्वाने आपला ठसा उमटविला आहे हे नि:संशय! वेदांपासून ते आधुनिक विज्ञान आणि कलाक्षेत्रापासून ते पाककलेपर्यंत सर्वक्षेत्रात स्त्रियांनी यशस्वी संचार केला आहे. ही स्वाभाविक मोकळीक आमच्या स्त्रियांना आमच्या आध्यात्मिक जीवनाने दिली आहे. सामाजिक जीवन काळाच्या ओघात वळणं घेतं पण आध्यात्मिक क्षेत्र तसे नाही.

वारकरी संप्रदायाचा पाया श्री ज्ञानदेवांनी रचला व त्याचा कळस श्री तुकाराम झाले. 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' वारकरी संप्रदायाचे काव्यात वर्णन करताना म्हटले आहे,

विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा।
निवृत्ती हा खांद्यांवरी, सोपानाचा हात धरी।
पुढे चाले ज्ञानेश्वर, मागे मुक्ताई सुंदर।

श्री ज्ञानदेवांच्या भगिनी मुक्ताबाईंना 'चित्कला' या शब्दांनी गौरवले आहे. ज्ञानदेवांचे वर्णन 'कृष्णस्तु भगवान स्वयम्' असे केले होते. त्यांच्या बरोबरच मुक्ताबाई आपल्या कर्तृत्वाने वारकरी संप्रदायाच्या विशाल वटवृक्षाला सुशोभित करतात. श्री चांगदेव व श्री नामदेवांसारखे अधिकारी पुरुष मुक्ताबाईंची बालके होऊन उपदेशाने कृतार्थ होतात. ज्ञानदेवांना 'चित्तक्रोध मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।' असा उपदेश समर्थपणे करतात. धाकटी बहीण असूनही तो त्यांचा अधिकार आहे. श्री ज्ञानदेवांनाही वाटत नाही की आपली धाकटी बहीण आपल्याला उपदेश करीत आहे. आमच्या कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांना तो सन्मान दिलेला आहे व स्त्रियांनीही आपल्या कर्तृत्वाने तो सिद्ध केला आहे.

'तुका झालासे कळस' वारकरी संप्रदायाच्या इमारतीचा कळस म्हणजे तुकाराम महाराज. श्री तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई. थोर अधिकारी आणि प्रतिभा संपन्न कवयित्री. त्यांचा गाथाही प्रसिद्ध आहे. कळसालाही ध्वजरूपाने बहिणाबाईंनी भूषविले आहे. मुक्ताबाईंच्या सारखाच त्यांचाही अधिकार थोर आहे. मुक्ताबाई वारकरी संप्रदायाच्या इमारतीचा पाया आहेत तर संत बहिणाबाई कळस आहेत. दोघींच्या व्यक्तिमत्त्वात साम्यस्थळे आढळतात.

मुक्ताबाई व बहिणाबाई दोघीही योगिनी आहेत. मुक्ताबाईंनी योगमायेने आपला देह पंचतत्त्वांत विलीन केला व ती चितकला, ईश्वराची साक्षात शक्ती, कला, माया, प्रकृती स्वस्थानाला निघून गेली. तर बहिणाबाईंनी योगमार्गाने इंद्रिये व प्राण यांचे नियमन व विसर्जन आत्मतत्वात करून चैतन्य मठाकाशात विलीन करून सद्योमुक्तीला प्राप्त झाल्या.

आश्विन शुद्धप्रतिप्रदेला देवी घटात बसते त्यादिवशी समाधी घेण्याचा निर्णय आपल्या पुत्रास सांगून त्यांनी आपली समाधी कशी सिद्ध होईल याचे काव्यात्मक वर्णन लिहून ठेवले. पूर्वजन्मांमध्ये पारमार्थिक प्रगती कशी होत गेली याचेही वर्णन पूर्वीच्या तेरा जन्मांचा साद्यंत वृत्तान्त पद्यमय स्वरूपात सांगून समाधीचा अधिकार कसा प्राप्त झाला हे रसाळ भाषेत वर्णन केले आहे. बहिणाबाई म्हणतात,

'आपले आपण देखिले मरण।
तो जाला शकुन स्वानंदेसी।।१।।
उभारिली गुढी मनाच्या शेवटी।
जाली मज भेटी आत्मारामी।।२।।
केला प्राणायाम सोऽहं धारणेसी।
मिळाली ज्योतीशी ज्योती तेणे।।

सद्‌गुरू वोवाळा वोवाळा ।
उजळुनी निज-ज्योति ज्वाळा ।।१ ।।
पिंड हरपला पिंडी ।
तेज व्यापिले ब्रह्माण्डी ।।२ ।।
शांतिसुखाचे आसन ।
अद्वय बोधाचे पूजन ।।३ ।।
चिद्‌घन चिदानंद गाभा ।
सच्चिदानंद निजप्रभा ।।४ ।।
तेज प्रकाशले लोचनी।
बहेणि हारपली चिद्‌घनी ।।५ ।।

संत मुक्ताबाई व बहिणाबाई दोघीही प्रतिभासंपन्न कवयित्री आहेत. मुक्ताबाईंचा व बहिणाबाईंचा गाथा प्रसिद्ध आहे. बहेणाबाईंच्या काव्यसंपदेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपले तेरा पूर्वजन्म काव्यरूपात कथन केले आहेत. हिंदी रचना केल्या आहेत. परखडपणे आपली मते काव्यातून मांडली आहेत. त्यावर संत तुकारामांच्या स्पष्टवक्तेपणाची छाप दिसून येते. काव्य प्रबोधनात्मक आहे. ते सामाजिक व आध्यात्मिक प्रबोधन तितक्याच समर्थपणे करते.

सच्चा साहेब तू येक मेरा काहे मुझे फिकीर।
महाल मुलुख परवा नही क्या करूँ पील पथीर ।।१ ।।
गोविंद चाकरी पकरी, पकरी पकरी तेरी ।।धृ ।।
साहेब तेरी जिकीर करते माया-परदा हुवा दूर
चारो दिल भाई पीछे रहते है बंदा हुजूर।।२ ।।
मेरा मीपण सरकर साहेब पकरे तेरे पाय ।
बहेणि कहे तुमसे गोविंद तेरे पर बलि जाय ।।३ ।।

या दोन्ही संत स्त्रियांनी कर्तव्यचरणाला अत्यंत महत्त्व दिले. स्वधर्माचे काटेकोरपणे पालन केले. भावंडात लहान असूनही मुक्ताबाईंनी अल्पवयात आपली जबाबदारी पेलली, योग्य प्रकारे निभावली. आयुष्यातील सर्व प्रतिकूलता मुक्ताबाईंनी समर्थपणे निभावली. कधी तक्रार, उद्वेग नाही. बहिणाबाईंचेही जीवन बालपणापासूनच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व्यतीत झाले. दारिद्र्य, कर्ज याचा सामना दीर्घकाळ करावा लागला. वयाच्या तिसऱ्या वर्षी तीस वर्षाच्या गंगाधरपंतांशी विवाह झाला. पति जमदग्नीचा अवतार. परंतु बहिणाबाईंनी पतिव्रताधर्माचे पालन शेवटपर्यंत केले. समाधीसमयी सद्‌गुरू स्मरणाबरोबरच पतीच्या नावाचे स्मरण करून बहिणाबाईंनी महासमाधीस प्रारंभ केला. कर्तव्याचे पालन कठोरपणे केले व कर्तव्याचरणाचा उपदेशही वारंवार आपल्या काव्यातून केला. सेवाभाव, गोसेवा, तुलसीपूजन, नामस्मरण व पतिव्रताधर्म ही त्यांच्या साधनमार्गाची पंचसूत्री होती. मुक्ताबाई जशा त्यांच्या अधिकाराने वंदनीय होत्या तशाच बहिणाबाईही आपल्या गुरुभक्ती व आध्यात्मिक अधिकाराने श्रीरामेश्वरभट व श्री निळोबाराय यांना वंदनीय होत्या. बहिणाबाईंचे शिष्य दीनकवी यांनी त्यांचा गुणगौरव केला आहे. तर संत निळोबारायांनी बहिणाबाईंची आरती रचली आहे.

संत मुक्ताबाई व संत बहिणाबाई यांच्या जीवनचरित्रात साम्य स्थळे पुष्कळ आहेत. दोघींचाही अधिकार विलक्षण आहे. अशा या दोन स्त्रिया वारकरीपंथाच्या पाया व कळसाला भूषविणाऱ्या आहेत. दोघींचेही जीवन समाजविरोधाला, निंदेला, असहकाराला तोंड देत देत व्यतीत झाले. समर्थ रामदासस्वामींच्या परंपरेशी जोडलेले श्री जयरामस्वामी यांनी बहिणाबाईंना लेकीचे प्रेम दिले पण समाजाने खूप छळले. संत मुक्ताबाईंना संन्याशांची लेकरं म्हणून वाळ पत्करावी लागली. तर पतिपत्नीतील अंतर हा बहिणाबाईंच्या बाबतीत लोकांच्या दृष्टीने चेष्टेचा विषय होता. बाहेर निंदा व घरात छळ असा दुहेरी त्रास सोसावा लागत असे. परंतु अत्यंत प्रतिकूलतेत बहिणाबाईंनी आपली साधना शांतपणे चालू ठेवली. पतिनिधनानंतर प्रपंच पार पाडला. त्याचबरोबर पारायण, प्रवचन, नामसप्ताह, उत्सवमहोत्सव आदी कार्यक्रम नेटाने चालू ठेवून स्त्रियांना शाहणे करण्याचे व्रत त्यांनी अंगीकारले व ते नेटाने चालविले. बहात्तर वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. आपल्या गावी राहून सद्‌गुरूंचे स्मरण करीत व उपासना दृढतेने चालवीत त्यांनी आपला जीवनप्रवास यशस्वीरीत्या पार पाडला. शून्यातून एवढा मोठा अधिकार मिळवणे हे सामान्य कर्तृत्व नव्हे!

भारतीय स्त्री जीवनाची मंगलता, पवित्रता यातच आहे. भारतीय स्त्री शाश्वत मूल्यांच्या अधिष्ठानावर आपले जीवन यशस्वी जगते तेही बिनतक्रार. भारतीय स्त्रीचा आत्मप्रत्यय विलक्षण म्हणावा लागेल. भारतीय स्त्रियांनी समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान द्या यासाठी कधी असंतोष प्रकट केला नाही. तर त्यांनी आपल्या आचरणाने समाजात नेहमीच पुरुषांपेक्षा श्रेष्ठ सन्मान प्राप्त करून घेतला आहे. परकीय संस्कृतीच्या आक्रमणाने कदाचित हा दृष्टिकोन कुणास विवाद्य वाटण्याची शक्यता आहे. परंतु या स्त्रियांचे कर्तृत्व व अधिकार वादातीत आहे हे निःसंशय.

महाभारत युद्धात ध्वजस्थानी कळसावर मारुतीराय होते. महाभयंकर अस्त्रांना रोखण्याचे काम मारुतीरायांनी केले. त्यामुळे ते अग्रभागी शोभले. भारतीय स्त्रियांही आपल्या अधिकाराने कीर्ती पताका फडकवीत आहेत. त्यात नामदेवांची जनी आहे, सोयराबाई आहे, नाथांच्या पत्नी आहेत तशाच तुकोबांच्या पत्नीही आहेत. अधिकार व धैर्याने कुणीच कमी नाही. संतकृपा झाली आणि इमारत फळा आली. कळस तुकोब्बाराय झाले तर इमारतीची ध्वजा स्वरूप भक्त, योगिनी, कर्तव्यनिष्ठ, गुरूकृपांकित प्रतिभासंपन्न संत बहिणाबाई फडकत राहिली.

डॉ. कल्याणी माधव नामजोशी
१०१२/४, शिवाजीनगर,
'पुष्कराज' मित्रनगर कॉलनी, पुणे ४११०१६
फोन नं. २५६५४८६६



सतराव्या शतकातील क्रांतिकारक विचारांची संत कवयित्री–
संत बहिणाबाई

श्रीमती वीणा रघुवीर गोसावी

एम.ए., एम्.फील., १६ वर्षे मालेगाव येथील कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम केले. सध्या सेवानिवृत्त. समर्थ रामदास अध्यासनाची 'विश्वस्त' म्हणून काम पहात आहे. संत वाङ्मय, विशेषत: समर्थ रामदासांच्या साहित्याचा अभ्यास, काही लेखन प्रसिद्ध आणि व्याख्याने – 'मार्कंडेय पुराण', 'विष्णुपुराण' हिंदीतून मराठी अनुवाद.

प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेच गगन झेलियेले ।।

तेराव्या शतकात ज्ञानदेव नामदेवादि संतांनी आध्यात्मिक लोकशाही निर्माण करून समाज प्रबोधनाचे मोलाचे कार्य केले. या प्रबोधन कार्यात स्त्री–संतांचाही मोलाचा वाटा आहे, आणि त्यातही संत बहिणाबाईंचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. बहिणाबाईंच्या आधी परमार्थाच्या क्षेत्रात चमकलेल्या तेजस्विनींमध्ये मुक्ताबाई आणि जनाबाई या ब्रह्मचारिणी होत्या, बहिणाबाईंनी मात्र प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही साध्य केले. मात्र प्रपंचात राहून परमार्थ साध्य करण्यासाठी त्यांना आयुष्यभर झगडावे लागले. बहिणाबाईंचे एकूण जीवनच संघर्षमय आहे. हा संघर्ष व्यक्तिगत पातळीवरील आहे. तसा बाह्य संघर्षही आहे. या संघर्षाची सारी अवस्थांतरे बहिणाबाईंनी आपल्या आत्मनिवेदनपर अभंगातून मोकळ्या मनाने प्रकट केली आहेत.

बहिणाबाईंचा जन्म मराठवाड्यातील कन्नड तालुक्यातील देवगांवचा. (शके १५५०. इ.स. १६२८) वडील आऊदेव आणि आई जानकी यांची ही मुलगी मुळातच 'देवलसी भाग्याची'. आणि 'योगभ्रष्ट' म्हणून जन्माला आलेली. तत्कालीन रूढीनुसार बहिणाबाईंचा विवाह वयाच्या तिसऱ्या वर्षी, तीस वर्षांच्या बिजवराशी– गंगाधराशी झाला. लग्नासाठी झालेले कर्ज फेडता येईना म्हणून बहिणाबाईंच्या आईवडिलांना जावयासह देवगांव सोडून परागंदा व्हावे लागले. गांवोगाव भिक्षा मागून उदरनिर्वाह करत हे कुटुंब नीरानरसिंहपूर, शिखरशिंगणापूर, पंढरपूर अशा तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत घेत– कोल्हापूरला, बहिरंभट नावाच्या व्युत्पन्न ब्राह्मणाच्या वाड्यात राहू लागले. त्याचवेळी कोल्हापुरात जयरामस्वामी वडगांवकर यांची कीर्तने, प्रवचनेही बहिणाबाईंना ऐकावयास मिळाली. बहिरंभटांना कोणी एकाने दान म्हणून दिलेली सवत्स धेनू, त्यांनी बहिणाबाईंना दिली. बहिणाबाई आणि ते वासरू यांच्यात विलक्षण प्रेमाचे नाते निर्माण झाले. ते सतत अगदी कीर्तनालाही तिच्याबरोबरच असे व तन्मयतेने कीर्तन ऐके. ही गोष्ट गंगाधरपंतांना व लोकांनाही आवडत नसे. एकदा जयराम स्वामींच्या कीर्तनप्रसंगी वासरामुळे झालेला अपमान त्यांना सहन झाला नाही. संतापलेल्या गंगाधरपंतांनी बहिणाबाईंना बेदम मारले आणि देवघरात कोंडून त्यांना बांधून ठेवले. यावेळी जयरामस्वामींनी तिच्या नवऱ्याला सांगितले –

''योगभ्रष्ट इची साधने बळकट । तू रे ईस कष्ट देऊ नको ।।
स्वधर्मेच तुझी करील ही सेवा । उद्धरील जीवा आपुलीया ।।

गायवासराने अन्नपाणी वर्ज्य केले. वासराचा अंतकाळ जवळ आला होता. बहिरंभटांनी म्हटलेल्या 'मूकं करोति वाचालम् ।' या श्लोकाचा उत्तरार्ध 'यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम्।।' असा मनुष्यवाणीने पूर्ण करून वासराने प्राण सोडला.

वासराच्या मृत्यूनंतर बहिणाबाई चार दिवस बेशुद्ध होत्या. या बेशुद्धावस्थेत जयरामस्वामींच्या कीर्तनात बहिणाबाईंनी तुकाबांचे अभंग ऐकले होते, ते त्यांच्या मनात घोळू लागले आणि 'तुकोबांचा छंद लागला मनासी । ऐकता पदासी कथेमध्ये ।।'

तुकोबांच्या भेटीची, दर्शनाची, अनिवार ओढ बहिणाबाईला लागली आणि तुकोबांकडून अनुग्रह घ्यावा असे वाटू लागले. सात दिवस त्यांना अहोरात्र तुकोबांचा ध्यास लागला आणि सातव्या दिवशी कार्तिक वद्य पंचमीस, शके १५६८ या दिवशी तुकोबांनी त्यांना स्वप्नात दृष्टांत देऊन गुरुमंत्र आणि गीतेचे पुस्तक दिले. बहिणाबाईंच्या आजवरच्या आयुष्यातील परमोच्च आनंदाचा हा क्षण होता. बहिणाबाईंच्या आलयाची काळरात्र संपली होती, सद्गुरूकृपा झाली होती.

या घटनेने बहिणाबाई धन्य झाल्या, परंतु त्यांच्या कर्मठ पतीला हे रुचले नाही. जयरामस्वामींची बहिणाबाईंवरील कृपादृष्टी, त्यांनी तिला आशीर्वाद देणे, पितृवत् प्रेम करून परमार्थमार्गात मदत करणे, या गोष्टीही रुचल्या नव्हत्याच. पण आता तुकोबांनी स्वप्नात दृष्टांत दिल्याची बातमी लोकांना कळल्यावर कोल्हापुरातील लोक त्यांच्या दर्शनाला येऊ लागले, तेव्हा गंगाधराच्या रागाचा पारा चढला. लोक आपल्यापेक्षा आपल्या पत्नीला भेटायला येतात, तिच्या पाया पडतात, हे त्या तामसी नवऱ्याला सहन होईना. तो बहिणाबाईंचा द्वेष, मत्सर करू लागला.

'म्हणे ही बाईल मरे तरी बरे । ईस का पामरे भेटताती' असे

म्हणू लागला. गंगाधर हा वेदांती ब्राह्मण, तर बहिणाबाई शुद्ध आत्मतत्त्वाची उपासना करणाऱ्या होत्या आणि हाच संघर्षाचा केंद्रबिंदू होता. 'इचे नाव घेती गोसावीण ऐसे । आम्हा कोण पुसे इजपुढे ।।' असा न्यूनगंड त्याच्या मनात निर्माण झाला. शिवाय एका उच्चवर्णीय ब्राह्मण स्त्रीने आपल्या पत्नीने हीन जातीतील गुरू करणे हेही त्याच्या कर्मठ मनाला पटणे शक्य नव्हते. तुकोबा आणि बहिणाबाई या दोघांचाही तो द्वेष करू लागला. पत्नीला मारहाण करूनही उपयोग नाही हे लक्षात आल्यावर अहंकाराने आंधळ्या झालेल्या पतीने संसाराचा त्याग करून वनात निघून जायचे ठरवले.

''न पाहे मी मुख सर्वथा इयेचे । हीनत्व आमुचे कोण फेडी ।।
भंडिम सारपून कोण राहे येथे । ऐसिया स्त्रियेते कोण पाळी ।।

नवऱ्याचा हा निर्णय ऐकून बहिणाबाई हतबुद्ध झाल्या. आपण पतिव्रता धर्माचे पालन करायचे की सद्‌गुरूंची सेवा करायची? असा प्रश्न निर्माण झाल्यावर त्यांनी पतिव्रता धर्माचे पालन करायचे ठरविले. गीतेतील तत्त्वज्ञान आणि वेदांच्या आधारे त्यांनी हा निर्णय घेतला. 'भ्रतार: स्वयमेव परब्रह्म', अशा शब्दात पतीचा गौरव करून परब्रह्मस्वरूप असलेल्या पतीची सेवा करून प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधण्याचा निर्णय घेतला.

आपला निर्णय बहिणाबाईंनी पतीला सांगितला. पण तरीही नवऱ्याच्या वृत्तीत फरक पडेना. तो आतल्या आत धुमसतच होता. अशातच त्याच्या शरीराचा दाह होऊ लागला. औषधोपचारांनी गुण येईना, बहिणाबाईही एकनिष्ठेने पतीची सेवा करतच होत्या. अखेर गंगाधराला पश्चात्ताप झाला. तुकोबांची निंदा केली म्हणून ही व्याधी जडली असेल तर 'चमत्कार' दाखवा असे सांगितल्यावर वृद्ध ब्राह्मणाने स्वप्नात येऊन 'हिचा त्याग करू नकोस' असे सांगितले. गंगाधराचा दाह हळू हळू कमी झाला आणि तुकोबांविषयी त्याच्या मनात असलेली अढी नाहीशी झाली. तुकोबांच्या आदेशावरून तो सहकुटुंब देहूला आला.

देहूगांवी बहिणाबाईंना आनंद-ओवरीत तुकारामांचा प्रत्यक्ष वरदहस्त लाभला. कवित्वाचे वरदान मिळाले. देहूलाही मंबाजी गोसावी यासारख्यांकडून त्रास सहन करावा लागला होता. ब्राह्मण असून हीन जातीतील तुकामारांना गुरू केल्याबद्दल त्याने पुण्यापर्यंत तक्रार केली. अशा वेळी बहिणाबाईंच्या हाती 'वज्रसूचिकोपनिषद्' आले. त्यावरून खरा ब्राह्मण कोण, ही शंका दूर झाली. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी त्यांना जीवन्मुक्तावस्था प्राप्त झाली. आपल्या अध्यात्म साधनेतील अनुभव त्यांनी आत्मचरित्रात दिले आहेत.

तुकोबांच्या सदेह वैकुंठगमनानंतर आयुष्याच्या उत्तरार्धात त्या सहकुटुंब शिऊरला आल्या. ऊर्वरित काळ कवित्वरचना, कीर्तने, प्रवचने, भक्तिसाधना यांत व्यतीत करून वयाच्या बहात्तराव्या वर्षी अश्विन शुद्ध प्रतिपदा, बुधवार शके १६२२ यादिवशी योगमार्गाने त्यांनी आपला देह पंचतत्त्वात विलीन केला.

अशाप्रकारे आपली संघर्षमय जीवनगाथा बहिणाबाईंनी अभंगबद्ध केली आहे. यावरून एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानात येते की, बहिणाबाईंना वारकरी संप्रदायात मानाचे स्थान सहजपणे मिळालेले नाही. त्यांचा आध्यात्मिक प्रवास म्हणजे अडथळ्यांची शर्यत आहे, संकटांची मालिका आहे. पण या अडथळ्यांनी, संकटांनी हार न मानता प्राप्त परिस्थितीतून पूर्ण संयमाने विचार करून, त्यांनी वेळोवेळी योग्य ते निर्णय घेतले आणि स्वत:चे ध्येय साध्य केले.

अध्यात्मिक प्रवासातील अडथळ्यांना दारिद्र्य, स्त्रीत्व, कौटुंबिक छळ, सामाजिक व धार्मिक संकेत असे अनेक कंगोरे आहेत. याला तोंड देण्यासाठी तत्कालीन सामाजिक पर्यावरणात त्यांच्यापाशी दोन मार्ग उपलब्ध होते. एक म्हणजे आपल्या अंतरात्म्याची ओढ आपल्या आत कोंडून प्राप्त परिस्थितीचा निमूटपणे स्वीकार करणे किंवा या अडथळ्यांवर मात करून आपले ध्येय साध्य करणे. या दोन्ही पर्यायांचा योग्य वेळी, योग्य तो उपयोग करून त्यांनी आपले ध्येय साध्य केले.

बहिणाबाईंच्या आध्यात्मिक विकासातील पहिला अडथळा म्हणजे 'स्त्री' म्हणून त्यांच्यावर असणाऱ्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या मर्यादा आणि दारिद्र्य. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे सामाजिक स्थान गौण असल्याने बहिणाबाईंना पतीकडून आणि समाजाकडूनही विलक्षण छळ सहन करावा लागला आहे. बहिणाबाईंच्या आत्मनिवेदनातून हिंदू कुटुंबातील रूढीपरंपरा, तसेच स्त्रियांकडे पहाण्याचा दृष्टिकोन किती अनुदार व रूढिग्रस्त होता, ते कळून येते. आर्थिक परिस्थिती बदलता येण्यासारखी नव्हती आणि 'स्त्री' म्हणून वाट्याला आलेली दु:खे, बंधने दूर करता येत नव्हती. या दोन्ही गोष्टींचा स्वीकार त्यांनी 'प्राक्तन' किंवा 'अदृष्ट' म्हणून केला. मध्ययुगीन समाज जीवन हे धर्मसंबद्ध होते आणि धर्माज्ञेपुढे 'असे का?' हा प्रश्न विचारता येत नव्हता. त्यामुळे दैववादाबरोबरच पुरुषप्रधान संस्कृतीचाही त्यांनी निमूटपणे स्वीकार केला आहे.

दुसरा अडथळा म्हणजे पतीकडून होणारा कौटुंबिक छळ. हा दोन पातळ्यांवरून होता. १) न्यूनगंड, २) पुरुषी अहंकार. मध्ययुगीन पुरुषप्रधान संस्कृतीत सर्व निर्णय व सर्व अधिकार पुरुषांवर अवलंबून असत. पुरुषत्व हे श्रेष्ठत्वाचे गमक मानले जात होते. त्यामुळे पौराहित्यापुरते अध्ययन केलेला, आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत असलेला बहिणाबाईंचा पती, आपली पत्नी परमार्थमार्गाने समाजात मानमान्यता प्राप्त करून घेत आहे आणि लोक तिच्या दर्शनासाठी येतात, तिच्या पाया पडतात ही गोष्ट सहन करू शकला नाही. त्याचा न्यूनगंड उफाळून आला आणि या न्यूनगंडाने पुरुषी अहंकाराची जागा घेतली.

'भ्रतार म्हणतसे आम्ही की ब्राह्मण । वेदांचे पठण करू सदा ।।
कैचा शूद्र तुका स्वप्नीचे दर्शनी । बिघडली पत्नी काय करू।।

असे तो म्हणू लागला. यावरून 'वेदांचे पठण करणारे आम्ही ब्राह्मण' हा त्याचा जातिनिष्ठ अहंकार आणि तुकोबा शूद्र म्हणून त्याज्य हा वर्णाश्रमाधिष्ठित अहंकार आणि 'बिघडली पत्नी काय करू?' अशी हाकाटी, त्रागा हा पुरुषी अहंकारातून आला आहे. शिवाय आपल्या पत्नीने घेतलेला 'इतरांचा' ध्यास, हा ही नवऱ्याला गौणत्व देणारा होता. सारांश बहिणाबाईंकडून त्याचा पुरुषी अहंकार नकळत डिवचला जात होता. त्यामुळे या कर्मठ नवऱ्याचा पुरुषी अहंकार बहिणाबाईंच्या

परमार्थमार्गातील अडथळा ठरत होता. शिवाय नवऱ्याचा हा तापट स्वभाव व अहंकार पत्नीपुरताच मर्यादित दिसतो. कारण देहूला जेव्हा मंबाजी गोसावी त्यांचा छळ करतो, तेव्हा त्याचा तापट स्वभाव उसळून येत नाही व तो प्रतिकारही करत नाही.

'वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार' न विसरणाऱ्या गंगाधराने 'नीच यातीचा गुरू' हे कारण पुढे करून बहिणाबाईंचा त्याग करून, वनात जायचे ठरवले, तेव्हा मात्र बहिणाबाईंनी पती हाच परमेश्वर मानून त्याची सेवा करायचे ठरवले. स्त्रीला पतीशिवाय अन्य गती नाही हे तत्कालीन स्त्री जीवनातले अटळ सत्य तिने स्वीकारले आणि पतीलाच परमेश्वर मानून ''घेईन अखंड सेवा सुख हेही । साक्ष या वेदही आहे मज ।। असा वेदाचा आधार घेऊन या अडथळ्यावर समंजसपणे मात केली. नवऱ्याचा आजार, स्वप्नदृष्टांत आणि बहिणाबाईंची नम्रतेची भूमिका, तडजोडीची वृत्ती, यामुळे गंगाधराचा विरोध, पर्यायाने कौटुंबिक छळ पूर्ण मावळला. याठिकाणी बहिणाबाईंनी परंपरेविरुद्ध न जाता, एक सुजाण तडजोड करून अत्यंत समंजसपणाने 'प्रपंच आणि परमार्थ' एकाचवेळी साध्य करण्याचा प्रयत्न केला.

बहिणाबाईंच्या आध्यात्मिक विकासातील तिसरा महत्त्वाचा अडथळा म्हणजे तत्कालीन सामाजिक व धार्मिक संकेत. 'नीच यातीचा गुरू करू नये' असे परमार्थमार्गात कोठेही सांगितले नसले तरी कर्मठ व अहंकारी उच्चवर्णीय समाजाचा अहंकार त्यामुळे दुखावला जात होता. अर्थातच या समाजाकडून बहिणाबाईंच्या भूमिकेला विरोध होणे स्वाभाविक होते. देहूला आल्यावर तुकोबांचा द्वेष करणारा मंबाजी गोसावी हा कर्मठ ब्राह्मण, बहिणाबाईंना आपले शिष्यत्व पत्करण्याचा आग्रह करू लागला. परंतु त्यांनी तुकोबांना गुरू केले आहे. असे कळताच-

'स्वप्नींचा अनुग्रह गुरू केला शुद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन ।
शूद्राचिया अंतरा ज्ञान कैसे । तुम्ही गुरुभक्ती नका सांगू ।।

असे चिडून म्हणू लागला. तसेच उभयतांना देहू सोडून जाण्यास सांगून त्यांचा विविध प्रकारांनी छळ करू लागला. पुढे तुकोबांचे व बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व समाजमान्य झाल्यावर त्यांचा विरोध मावळला.

बहिणाबाई या केवळ उच्चवर्णी नव्हत्या, तर त्या एक 'स्त्री' होत्या. आत्मोन्नतीसाठी गुरू करणे, दीक्षा घेणे हे धर्मसंमत होते, पण पुरुषांपुरते. स्त्रीला परमार्थाचा अधिकार नाकारलेला होता आणि पारमार्थिक अधिकार प्राप्त झाला तरी धार्मिक व सामाजिक संकेत मोडून ती शूद्रास गुरू करू शकत नव्हती. वैदिकाच्या घरात तर गीता, नामस्मरण, संतसहवास यांचे वावडे. त्यामुळे बहिणाबाईंच्या आत्मविकासात धार्मिक संकेतही अडथळा निर्माण करीत होते. हे धार्मिक संकेतही तुकोबांचे श्रेष्ठत्व समाजमान्य झाल्यावर मावळले. आजच्या काळात, एक संतकवयित्री म्हणून, योगिनी म्हणून, संत बहिणाबाई नावलौकिकास पात्र असल्या तरी त्या काळात बहिणाबाईंचे संतत्व सिद्ध होईपर्यंत तरी, सनातनी व पारंपरिक समाजाची सहानुभूती स्वाभाविकपणे बहिणाबाईंच्या नवऱ्यालाच मिळाली असणार. एक ब्राह्मण स्त्री हीन जातीतील गुरू करते, ही गोष्ट त्याकाळात असंभवनीय होती. सारांश बहिणाबाईंना आपल्या पारमार्थिक जीवनात कराव्या लागलेल्या संघर्षाला 'स्त्री' म्हणून एक पदर आणि उच्चवर्णीय कुलीन स्त्रीने असा गुरू करणे म्हणजे एक प्रकारे पापच! अशा दुहेरी संघर्षात बहिणाबाईंची मन:स्थिती किती अगतिक झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी.

अशाप्रकारे बहिणाबाईंनी प्राक्तन, अदृष्ट, सामाजिक संकेतांना सुजाणपणे ओलांडून, परंपरा न मोडता पतीलाच परमेश्वर करून त्याचा विरोध बोथट करणे असे मार्ग स्वीकारून आपल्या आत्मिक विकासातील सारे अडथळे समंजसपणे दूर केले आणि आपल्या अंतरात्म्याची ओढ, आपले श्रेयस प्राप्त करून घेतले, साक्षात्कारावस्था प्राप्त करून घेतली.

या विकासावस्थेत त्यांना उदार व सहिष्णू अशा वारकरी संप्रदायाची शिकवण, वारकरी संप्रदायातील मार्ग सर्वसमावेशकता, समत्वभाव, प्रपंचालाच परमार्थरूप करण्याचा मार्ग इत्यादी गोष्टी आत्मबळ प्राप्त करून घेण्यासाठी उपयुक्त ठरल्या. त्याचप्रमाणे तुकोबांना गुरू करायचे ठरल्यावर जयरामस्वामी वडगांवकर यांचाही तिला फार मोठा आधार मिळाला. जयरामस्वामी हे श्रीरामदास पंचायतनापैकी एक. ते रामदासांचे शिष्यही नव्हते आणि समर्थ सांप्रदायिकही नव्हते. तर समर्थांचे केवळ सुहृद होते. गुरूपरंपरेने ते शैव परंपरेतले होते, परंतु शैव आणि वैष्णव असा भेदभाव त्यांच्यापाशी नव्हता. त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाची जडणघडण वैष्णवपरंपरेत झालेली असल्यानेच ते बहिणाबाईंचे भावजीवन समृद्ध करू शकले. त्यांच्या कीर्तनातून ऐकलेल्या तुकोबांच्या अद्वैतपदांनीच बहिणाबाईंच्या आध्यात्मिक जीवनाला सुरुवात झाली. बहिणाबाईंच्या पारमार्थिक मनाचं साधकाच्या वाटेवरील भरणपोषण त्यांनीच केले. त्यांनी तिला ज्ञान देऊन, उपदेश करून, वात्सल्यभावाने काळजी घेऊन एकप्रकारे वत्सल पित्याची भूमिका बजावली. 'योगभ्रष्ट इची साधने बळकट' हे त्यांनी जाणले होते. त्यामुळेच कुटुंबात सर्वजण असूनही पोरक्या झालेल्या बहिणाबाईंना जीवनातल्या कटु अनुभवांना सामोरे जाऊन आत्मसाधनेची वाटचाल करता आली, ही गोष्ट महत्त्वाची होय. स्वामींचा पारमार्थिक अधिकार, त्यांचे सत्पुरुषत्व अनुभवाला आल्यामुळेच 'जयराम गोसावी विदेही अवस्था' 'जयराम समर्थ ज्ञानाचा सागर' अशा शब्दात बहिणाबाईंनी स्वामींचे वर्णन केले आहे.

स्वप्नात तुकोबांचा दृष्टांत झाल्यावर प्रत्यक्ष अनुग्रह घेण्यात पुन्हा एक वर्षाचा काळ गेला. तुकोबांचे अभंग, स्वप्नातील दर्शन व नंतर प्रत्यक्ष सहवास लाभल्याने खरे व आदर्श ब्राह्मणत्व तुकोबांच्या ठायीच बाणले आहे, याची प्रचीती त्यांना आली होती. त्यांचे मन उलटसुलट विचारांनी गोंधळून गेले. तुकोबांना गुरू का करायचे नाही? केवळ ब्राह्मण जातीत जन्मले नाहीत म्हणून? 'अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा' असे असताना त्यांना शूद्र म्हणायचे अणि केवळ ब्राह्मण जातीत जन्मल्याने मंबाजीसारख्या छळणाऱ्या माणसाला ब्राह्मण म्हणायचे? 'खरा ब्राह्मण कोण?' अशा वैचारिक संघर्षाच्या काळात 'वज्रसूची' सारखे जन्मसिद्ध श्रेष्ठत्वावर घणाघाती आघात करणारे उपनिषद मिळाले आणि या उपनिषदाच्या अभ्यासातून बहिणाबाईंना

त्यांच्या प्रश्नांचे उत्तर आणि निश्चयाचे बळ दोन्ही मिळाले. 'ब्रह्म जाणे तो ब्राह्मण' मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, वंशाचा अथवा वर्णाचा असो' हा विवेकनिष्ठ विचार वज्रसूचीने त्यांच्या मनात प्रस्थापित केला. या विवेकनिष्ठ विचारांच्या बळावर त्यांना मंबाजीपेक्षा तुकोबांच्या ठायी खरे ब्राह्मणत्व आढळले आणि त्यांनी तुकोबांचे गुरुत्व कायम ठेवले. त्यांच्या विवेकी मनाला जो विचार पटला, तो त्यांनी समाजाविरुद्ध जाऊन अंमलात आणला, हे त्यांचे क्रांतिकारकत्व होय. हा त्यांच्या बुद्धिनिष्ठतेचा, ज्ञानाचा, संयमाचा आणि क्रांतिकारक विचारांचा विजय होय. या विचारांचा उपयोग पुढीलांना व्हावा म्हणून 'ब्रह्मकर्म अभंग' या शीर्षकाखाली त्यांनी वज्रसूचीवर भाष्य केले आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी बहिणाबाईंच्या ब्रह्मकर्मपर अभंगांवर असलेला वज्रसूचीचा प्रभाव स्पष्टपणे दाखवून दिला आहे.

बहिणाबाईंच्या या आध्यात्मिक क्षेत्रातील क्रांतिकारक विचारांनी स्त्रियांसाठी एक नवा आदर्श घालून दिला आणि स्त्रियांना त्यांच्या 'स्त्रीत्वाची' जाणीव करून दिली. किंबहुना आजच्या नव्या काळातील स्त्रीत्वाची भूमिका, बहिणाबाईंच्या क्रांतिकारक विचारांमध्ये बीजरूपाने दिसते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. मध्ययुगीन काळात त्यांनी क्रातिकारक विचारांच्या आधारे प्रवाहविरुद्ध पोहण्याचा केलेला प्रयत्न आजच्या स्त्रियांना मार्गदर्शक ठरणारा आहे. घटस्फोटाने मार्ग सुटत नाहीत तर सामंजस्याने, विवेकाने प्रपंचातील अडचणींचे निराकरण करता येते. मात्र एखादा समाज हिताचा, कौटुंबिक हिताचा विचार जर खरोखरच योग्य असेल तर प्रसंगी विरोध पत्करूनही तो अंमलात आणण्याचे धाडस केले पाहिजे. आजच्या काळातही हे सर्व स्त्रियांना जमतेच असे नाही म्हणूनच आजही स्त्रियांवर अनेक प्रकारचे अत्याचार होताना दिसतात.

वज्रसूचीतील परखड विचार बहिणाबाईंनी नुसते अभंगात मांडले नाहीत तर प्रत्यक्ष आचरणात आणले. १७व्या शतकात बहिणाबाईंनी केलेले हे धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे.

प्रपंच साधूनही आत्मविकास करता येतो, हे बहिणाबाईंनी स्वत:च्या उदाहरणावरून दाखवून दिले. 'प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका।।' असे समर्थ रामदासांनी सांगितलेले प्रपंचाचे विज्ञान बहिणाबाईंनी मध्ययुगीन काळात प्रत्यक्ष आचरणात आणले, सार्थ केले. स्त्री ही पुरुषाच्या परमार्थ मार्गातील धोंड आहे, किंबहुना 'चूल आणि मूल' हेच तिचे क्षेत्र आहे, असे मानले जात होते, त्या काळात एका उच्चवर्णीय स्त्रीने प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साध्य करून 'गगन तोलून' धरण्यासारखी अशक्यप्राय कृती, क्रांतिकारक आचार विचारांच्या साह्याने करून दाखविली आणि,

'प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेच गगन झेलियेले ।

हे आपलेच उद्‌गार सार्थ करून दाखवले. तसेच भागवत धर्ममंदिरावर सतत फडकत राहणाऱ्या ध्वजेचे स्थानही प्राप्त करून दाखविले. ।। **जय जय रघुवीर समर्थ** ।।

श्रीमती वीणा रघुवीर गोसावी
'पार्थ सदन' फ्लॅट नं. १२, लोकमान्य सोसा., पौड रोड,
कोथरूड, पुणे ३८. फोन : २५३८४२९१, मो. : ९५५२५५८८७१



संत बहिणाबाईंचे निर्याणपर अभंग

डॉ. सौ. शोभा सुरेश घोलप

एम्.ए., एम्.फिल मध्ये विशेष प्राविण्य, पी.एच्.डी. प्रबंधास विद्यापीठ पुरस्कार.
संत वाङ्मयावर विविध नियतकालिकांमध्ये लेखन. तीन पुस्तके प्रकाशित. त्यांना उत्कृष्ट लेखनाचे पुरस्कार
मा. डॉ. विजय भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या श्रीसंत तुकाराम यांच्यावरील सी.डी., वेबसाईटमध्ये सहभाग

भारतीय संस्कृतीचा अभ्यास किंवा आढावा घ्यायचा म्हटला तर आपल्याला अगदी प्राचीन काळापर्यंत जावेच लागते. संतस्त्रियांचा अभ्यास करताना तर हे अनिवार्यच आहे. अगदी प्राचीन काळापासून पाहिले तरी असे दिसून येते की, ज्ञानदेव हे वारकरी परंपरेचे आणि चक्रधर हे महानुभाव परंपरेचे नेते ठरतात. पण या नेत्यांना उद्युक्त केले ते महदंबा आणि मुक्ताबाई यांनीच. जनाबाईने नामदेवांच्या चाळीस माणसांचे संसारचित्र उभे केले. मुक्ताबाईने ज्ञानदेवांना आणि चांगदेवांना उपदेश केला. सोयराबाईंनी गोरोबाचे चरित्र लिहिले. वेणाबाईंनी रामदासांविषयी लिहिले. आणि बहिणाबाईंनी तर संतपरंपरेची इमारतच उभी केली. (संतकृपा जाली इमारत फळाआली).

महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, निर्मला, कान्होपात्रा, वेणाबाई, बहिणाबाई या वारकरी संप्रदायातल्या कवयित्री असून त्यांनी स्वतंत्र रीतीने रचना तर केल्याच पण तत्कालीन संतमंडळावरही त्यांचा फार मोठा प्रभाव होता.

'ताटी उघडा ज्ञानेश्वरा । योगी, पावन मनाचा ।।
अपराध साहे जनांचा ।।

हे मुक्ताबाईंने म्हटले नसते तर ज्ञानदेवांनी साहित्यनिर्मिती केली असती किंवा नाही याविषयी शंका वाटते. महदंबेने प्रश्न विचारले नसते तर चक्रधरांचा 'एकांक' निर्माण झाला नसता. नामदेवांची बायको आणि आई देवाशी भांडल्या नसत्या तर नामदेवांची भावभक्ती प्रखर झाली नसती. म्हणजेच वरील सर्वच संतकवयित्रींचे संतसाहित्यात फार मोठे योगदान आहे हे निर्विवाद!

भारतीय जीवनसरणी पुरुषप्रधान असली तरी संस्कृतीत मात्र स्त्रीप्रधानता आढळते. तरल संवेदनशीलता, वृत्तिगांभीर्य, प्रौढ सामंजस्य, आत्मसमर्पण करण्याची वृत्ती, सत्वशील जीवनपद्धती, अभिजात सौंदर्यासक्ती आणि जगताजगताच जगण्यातील सुखदु:खानुभवाचे अनुभव कवितेतून मांडणे ही भारतीय स्त्री जीवनाची वैशिष्ट्ये आहेत. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सतराव्या शतकात संत तुकारामांनी स्वप्नदृष्टांतात जिला गुरूमंत्र दिला, जिला तुकारामांच्या 'आनंद ओवरीत' आश्रय मिळाला ती वारकरी संप्रदायातली अखेरची श्रेष्ठ कवयित्री म्हणजे संत बहिणाबाई!

संत तुकाराम महाराजांबद्दलची अनन्यसाधारण भक्ती हा बहिणाबाईंच्या चरित्राचा कणा आहे. विशेष म्हणजे आत्मचरित्र लिहिणाऱ्या बहिणाबाई या पहिल्या स्त्री होत. त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचा क्रमाक्रमाने सारा जीवनपटच उलगडत जातो. नवऱ्याची मारहाण सहन करीत बहिणाबाईंनी आपल्याला हव्या त्याच मार्गाने जायचे ठरवले हा काही त्यांचा फक्त भावनिक उद्रेक नव्हता. बहिणाबाई एकाच वेळी ब्राह्मण्य हरविलेल्या ब्राह्मणांविरुद्ध झगडा देतात आणि बाईपणाच्या अवमूल्यनालाही शह देतात. प्रपंच्याबद्दल त्यांची स्थिती 'खाल्ले तर बाधते, टाकले तर शापते' अशी झालेली दिसते. तुकारामांची आनंदओवरीत भेट झाली त्यावेळी 'आसन' कसे घालावे, 'ध्यान' कसे करावे हे सुद्धा त्यांना ठाऊक नव्हते. तिथंपासून 'वज्रसूचीपर अभंग', 'निर्याणपर अभंग' रचण्यापर्यंतची त्यांची झेप पाहून स्तिमित व्हायला होते आणि ही झेप त्यांनी स्वबळावर घेतली.

बहिणाबाईंचे 'निर्याणपर अभंग' म्हणजे मराठी अभंग सृष्टीतील एक अपूर्व प्रकरण आहे. त्यांना मृत्यूच्या मांडीवर असता बारा पूर्वजन्माची कथा आठवावी ही घटनाच विस्मयकारक आणि नाट्यपूर्ण आहे. पूर्वीचे आपलेच जन्म पाहाता येणे हे एक योगमार्गातील सामर्थ्य आहे. त्याला 'जातिस्मरत्वाची सिद्धी' म्हणतात. ही दिव्यदृष्टी बहिणाबाईंना प्राप्त झाली, यावरून त्या महायोगिनी होत्या हे कळून येते. हे 'निर्याणपर अभंग' म्हणजे बहिणाबाई आणि त्यांचा मुलगा विठोबा यांचा संवाद आहे. मृत्यूपूर्वी अठरा दिवस आधी बहिणाबाईंना आपला मृत्यूकाळ समजला होता. पण योगायोग असा की त्याच दिवशी त्यांची सून- विठोबाची पत्नी निवर्तली. त्याचे वियोगाचे दु:खात आणखी भर नको म्हणून आपल्या मृत्यूचा दिवस त्यांनी तेव्हा विठोबाला सांगितला नाही. पत्नीचे उत्तरकार्यासाठी विठोबा गोदातीरी शुक्ल-तीर्थाला गेला. तिथे त्याला त्यांनी आपल्या मृत्यूचे पाच दिवस आधी पत्र पाठविले. आपल्या मृत्यूचा संकल्प कळविला व रुक्मिणीचा तेरावा दिवस होताच तातडीने परत येण्यास बजावले.

तेराविया दिवशी ब्राह्मण भोजन । करोनि निघणे अति त्वरे ।।
पडेल आक्षेप वाटेसी खोळंबा । टाकोनि विठोबा त्वरे येई ।।

पण पत्र येण्याचे (पोहोचण्याचे) आदले दिवशी रात्री विठोबाला स्वप्न पडले, आपल्या आईचा अंतकाळ जवळ आला असून तिला नेण्यासाठी वैकुंठाहून विमान आले आहे. मंगलवाद्ये वाजत आहेत. लोकांची गर्दी जमली आहे; वगैरे. सकाळी पत्र मिळाले. शुक्लेश्वराजवळ आपल्या आईसाठी समाधीस्थान नक्की करूनच विठोबा तेथून निघाला. आईला वंदन करून विठोबाने सांगितले की, तुला तीर्थक्षेत्री शुक्लेश्वराला नेतो. परंतु बहिणाबाईने सांगितले की, आता तेथपर्यंत जाण्यास वेळ नाही. येथील आपले शिऊरचे 'प्रणितातीर्थ' काही लहान सहान तीर्थ नव्हे. रावणाने येथेच शंकराला प्रसन्न करून घेतले.

''प्रणितातीर्थाऐसे तीर्थ भूमंडळी ।
नाही चंद्रमौळी बोलिलासे ।।
काशी गया तीर्थ । सर्व याचि स्थळी ।।
मानूनि राकळी स्नान कीजे ।।
आमुचे मनीचा निर्धार हा खरा ।
माझिया अंतरा साक्ष जाली ।।
बहेणि म्हणे पुत्रा सांगितले मनी ।
धरुनि वचनी सिद्ध राहे ।। (जा.गा.अ.क्र. १७६)

पुढे त्या म्हणतात, मला या बाह्य तीर्थांची जरुरच काय? कारण या आत्मज्ञानरूपी तीर्थात न्हाऊन मी आधीच मुक्त झाले आहे. म्हणून शुक्लेश्वरी जाता येत नाही म्हणून वाईट वाटून घेऊ नकोस. आता तीनच दिवस राहिले आहेत. तरी तुझे मनात काही विचारावयाचे असल्यास विचार. मागील बारा जन्म आपण एकत्र आहोत. आणखी पाच जन्मांनंतर तू मुक्त होशील.

'पांचविसे जन्मी अठरा वर्षी तुज । विदेहत्व पूज्य होसी खरा।।'

आता माझे विचारशील तर - 'नाहि जन्म घेणे । उठले धरणे वासनेचे।।' हे ऐकून विठोबा विस्मयचकित झाला व म्हणाला,

'गणगोत आम्हा माय ही सद्गुरू । आशंका हे आता फेडी माझी ।।
पूर्वानुक्रमे जन्म ते सांगिजे । माते कृपा कीजे एक वेळा।।'

(जा.गा. अ.क्र. १८१)

त्यानंतर बहिणाबाईंनी आपल्या मुलाला मागील बारा जन्मांचे आत्मवृत्त सांगितले.

येथे बहिणाबाई प्रत्यक्ष मृत्यूपूर्वीच मृत्यु अनुभवताना दिसतात. बहिणाबाईंच्या या अभंगांतील मृत्यूनंतरच्या क्रियांचे आणि मृत्यूक्षणीच्या पाच योगांचे वर्णन वाचले म्हणजे त्यांच्या योगाधिकाराची कल्पना येते. त्यावेळी बहिणाबाई सिद्धासनारूढ असल्यामुळे त्यांना दिव्यदृष्टी प्राप्त झाली होती. आणि तिच्या योगाने भूतकालीन आणि भविष्यकालीन गोष्टी चित्रपटाप्रमाणे त्यांना अगदी स्पष्ट दिसत होत्या.

आरसियात जैसे दिसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसती डोळा ।।

असे म्हणून पुढे त्या म्हणतात,

'मागीलही जन्म आठवती काही । त्वरा जाली देही मृत्युवेळे ।।
यालागी राहिले सांगणे मागील । साधने प्रबळ होती खरी ।।'

बहिणाबाई विठ्ठलाला म्हणतात, मागील बारा जन्मात प्रबळ साधना झाल्यामुळे,

'विदेह अवस्था भूमिका सातवी । ते येथे अनुभवी साधियेली ।।

म्हणून मी या जन्मी जीवन्मुक्त झाले आहे. त्यांनी त्यांच्या तेरा जन्माचे (म्हणजे मागील बारा व चालू तेरावा जन्म) समालोचन पुढील अभंगात केलेले दिसते.

''तीन शते आणि वरुषे एकावन्न । आयुष्य निर्माण तेरा जन्मी ।।
घातले स्त्रीरूपे साधने हरीच्या । निमाल्या मनाच्या वृत्ती जंव ।।
आता निश्चयाने सांगेन निर्धार । जाले निर्विकार चित्त माझे ।।
बहेणि म्हणे पुढे काही नाही हेत । स्वरूपी निवांत चित्त माझे।।'

(जा. गा. अ.क्र. १९८)

एकूण तेरा जन्मांचे त्यांनी स्वतःच केलेले हे मूल्यमापन फार महत्त्वाचे वाटते. एकूण तेराही जन्मातील ३५१ वर्षांतील हे सर्व जन्म स्त्रीचेच आहेत हे विशेष महत्त्वाचे आहे. तेराही जन्मातील आई, वडील त्यांची नावे, जात, गाव, कोणत्या जन्मात किती आयुष्य लाभले हे सारे त्यांनी अतिशय तपशीलवार सांगितले आहे. तेरा जन्मांपैकी सहा जन्मात त्यांचा पुत्र विठोबा याला पुरुष जन्मच आले आहेत. बहिणाबाईंचे पहिले तीन जन्म वैश्याचे घरात, नंतरचे चार गवळ्याचे घरी म्हणजे सात जन्म वैश्य कुळात, त्यानंतरचे दोन क्षत्रिय कुळात व शेवटचे चार ब्राह्मण कुळात झाले आहेत. हे सर्व जन्म एकाच परिसरात झालेले आहेत. हे सारे त्यांनी त्यांच्या अभंगांतूनच वर्णन केले आहे. मागील बारा जन्मात बहिणाबाईंचे त्यांनी वर्णिलेले जन्म होण्यासाठी त्या त्या जन्मातील त्यांच्या मातापित्यांनाही उपासना करावी लागली आहे. तसेच प्रत्येक जन्मात क्रमाक्रमाने उपासना वृद्धिंगत झालेली दिसते. बहिणाबाईंच्या जन्मजात विरक्तीचे मूळ या मागील जन्मात असावे.

तुकाराम महाराजांप्रमाणेच बहिणाबाईंनीही आपले मरण स्वतःच पाहिले होते. त्याचे वर्णन त्या असे करतात,

'आपले आपण देखिले मरण । तो जाला शकुन स्वानंदेसी ।।
वैराग्याच्या श्रेणी लाविल्या शरीरा । ज्ञानाग्नी लाविला ब्रह्मत्वेसी ।।
जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानीचा ।।
फिरविला घट फोडिला चरणी । महावाक्य ध्वनी बोंब झाली ।।
दिली तिलांजली कुळनाम रूपासी । शरीर ज्याचे त्यासी समर्पिले ।।
बहेणि म्हणे रक्षा जाली त्रिपुरेची । तुकारामे साची कृपा केली ।।

(ज. गा. अ.क्र. २००)

बहिणाबाईंच्या मृत्यूनंतरच्या उत्तरक्रियांचे आणि मृत्यू क्षणीच पाच योगांचे वर्णन त्यांच्याच अभंगातून पुढीलप्रमाणे आले आहे-

''प्रथमादारभ्य आरंभिली क्रिया । पिंडी पिंड पहा निवेदिला ।।१।।
दुसरे दिवशी द्वैत हारपले । अद्वैत बिंबले परब्रह्मी ।।२।।
तिसरे दिवशी त्रिगुणाची शांती । पिंडाची समाप्ती याच परी ।।३।।
चवथे दिवशी चौदेहातीत । उघडा संकेत वोळखिला ।।४।।
पाचवे दिवशी केले पिंडदान । पाचही ते प्राण बोलविले ।।५।।
सहावे दिवशी षडूर्गी निमाल्या । वृत्ती स्थिरावल्या आत्मरूपी ।।६।।

सातवे दिवशी सप्तधातू – अंत । राहे अखंडत्व अद्वयत्वे ।।७।।
आठवे दिवशी नाश अष्टभावा । अद्वय अनुभवा राहे सुखे ।।८।।
नवमी नवांक भक्ति नवविधा ।
सरल्या, आत्मबोधामाजी आल्या।।९।।
दहावे दिवशी इंद्रिये दहाही । बोळवण देही केली त्यांची ।।१०।।
अश्या ते उत्तरी पंचधा विषय । ज्ञानगंगे पाहे योग त्याचा ।।११।।
अकरावे दिवशी अकरावे मानस । परब्रह्मी त्यास निवेदिले ।।१२।।
ऐसी जाण क्रिया केली या शरीरे । विवेके निर्धारे आपुलिया ।।२६।।
बहेणि म्हणे आता असो देहभाव ।
आमुचा दृढ भाव हाचि खरा ।।२७।।

अंतकाळ जवळ आला असता कोणते विधी कोणत्या क्रमाने करावे हेही बहिणाबाई वर्णन करतात. (अभंगांचा विस्तार अधिक होत असला तरी काही अभंग पूर्णपणे घेतल्याशिवाय त्याचा अर्थबोध होणार नाही.) त्या म्हणतात,

''बोलावा ब्राह्मण गंगस्नान करू । दानविधि सारू अंतकाळी ।।
धरावे प्रायश्चित्त वेदाचिया मते । आमुचे दैवत द्विज तुम्ही ।।
दशदाने देऊनि केला नमस्कार । आता कृपा फार असो द्यावी ।।
सात प्रहर शेष उरला अंतकाळ । दिंडी टाळ घोळ – कथाभारे ।।
ज्ञानेश्वरी ग्रंथ संपला पर्जन्य । करावे ब्राह्मण सिद्ध उभे ।।
वाद्याचिये ध्वनी वाजती अंबरी । दशनाद भीतरी आइकारे ।।
घालोनि आसन बैसोनि ध्यानस्थ । पाहे मी प्रशस्त गुरु–खुणे ।।
शंख चक्र गदा तुळशीच्या माळा । ब्राह्मणांच्या गळा शोभताती ।
सांगेन ते तुम्ही ऐका रे सर्वही । अंतकाळ देही जवळ आला ।।

बहिणाबाईंनी पुढे पाच योगांचे वर्णन केले आहे.

''आसनी बैसेन उत्तराभिमुख । सहजासन देख अंत:काळी ।।
सूर्योदयापूर्वी घटिका तीन जाण । आसनी बैसोनि ध्यानमुद्रे ।।
तेव्हा तुवा पुत्रा बैसोनि पाठीसी । सावध मानसी आत्मनिष्ठे ।।
बाह्य ध्वनी कानी पडती तुज काही । ध्यान ते हृदयी धरी तेथे ।।
करावा गजर नामसंकीर्तनाचा । दिवस आनंदाचा महाथोर ।।
लावीन रे हात जाण जये स्थळी । जाण तू ते मनी प्राण तेथे ।।
तीन आणि तेरा सोळा घटिका जाण । आसनी बैसोन ध्यानमुद्रे ।।
नव घटिका नाम न संडी उच्चार । चित्ताचा निर्धार सांगितला ।।
सात घटिका पुढे तयाची वाटणी । इंद्रिये गोठणी सर्व येती ।।
चार घटिका ध्वनी राहेन तटस्थ । तुवा मन स्वस्थ असो द्यावे ।।
ऐशा घटिका तेरा गेलियाने । सद्गुरू स्मरणे वदे जिव्हा ।।
तुकाराम मुखी गंगाधर स्मरण । अठरा वेळा माळ करे तेचि ।।
त्यानंतरे पुढे नासिकाग्री दृष्टी । वळोनिया पुष्टी हात दोन्ही ।।
माळ तेव्हा कंठी घालीन स्वहस्ते । करुनि प्रशस्त चित्त राहे ।।
एकाग्रता सर्व वायूंचा उपरम । उदानी संभ्रम योग त्याचा ।।
हृदयी धरोन नारायण–ध्यान । राहे समरसोन चित्त तेव्हा ।।
अखंड अद्वय हृदय व्यापक । स्मरण जे एक अद्वयाचे ।।
बहेणि म्हणे ऐसी अंतकाळ स्थिती । सांगितली गती निश्चयेसी ।।

म्हणजेच बहिणाबाईंनी निर्याणाचे दिवशी देह ठेवण्यापूर्वी सूर्योदयापूर्वी तीन घटिका व सूर्योदयानंतर तेरा घटिका ध्यानादि क्रिया केल्या. त्यानंतर त्यांनी, पतिस्मरण, सद्गुरूस्मरण व अठरा वेळा माळेचा जप केला व नंतर नासिकाग्र दृष्टी करून, जपमाळ कंठी धारण करून सर्व वायूंचा उदानात योग केला. हृदयी नारायण ध्यान करून अद्वयबोधाने सद्गुरूपूजन करून निजज्योतीने सद्गुरूंना ओवाळले, व नंतर,

'तेज प्रकाशले लोचनी । बहेणि हारपली चित्घनी ।।'

तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदाय मंदिराचा कळस उभारला, तर बहिणाबाई त्यावर फडकणारी ध्वजा आहे, असेही त्यांचे वर्णन आहे. त्यांची कविता वाचताना विविधतेचा प्रत्यय येतो. अगदी ईश्वरभेट घडावी यासाठी केलेल्या प्रार्थनेपासून ईश्वरभेटीनंतर अंगी आलेल्या सामर्थ्यापोटी केलेल्या उपदेशापर्यंतचे विविध भावतरंग त्यांच्या कवितेतून आपल्या दृष्टीस पडतात. आपली भक्तिभावना व्यक्त करताना त्यांनी विठ्ठलाची करुणा भाकली आहे. विठ्ठलाचा गौरव केला आहे. पंढरीचे महिमान गायिले आहे. संतांचा व सद्गुरूंचा गौरव केला आहे. त्याखेरीज नामपर, बोधपर, ज्ञानपर, ब्रह्मकर्मपर अशा अनेक विषयांवरही त्यांनी रचना केली आहे. एकूणच बहिणाबाईंचे चरित्र, त्यांची काव्यरचना, त्यांचे धैर्य पाहिले की आपण नतमस्तक होतो.

(सर्व अभंग– संत बहिणाबाई गाथा –सौ. शालिनी जावडेकर यातून)

डॉ. सौ. शोभा घोलप
५, दत्त अपार्टमेंटस्, ७५९/६६ प्रभात रोड,
डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.
फोन : ०२०–२५४६१०८२, मो. ९८२३०६४७३२



संत बहिणाबाईंची तेजस्वी साहित्यध्वजा

सौ. मृणाल सुहास थोरात
अेम्.अेसी. (स्टॅटीस्टीक), राष्ट्रीयकृत बँकेतून निवृत्त
लेखनाची व संत साहित्याची आवड

आपल्या भारतभूमीत अनेक संत उदयास आले. अशा या पवित्र भूमीत असेच एक अनमोल रत्न उदयास आले ते म्हणजे 'संत बहिणाबाई' की ज्याने आपल्या दिव्य देदीप्यमान प्रकाशाने साऱ्या भारतभूमीला उजळवून टाकले. संत बहेणाबाईंचा काळ १६२८ ते १७०० पर्यंत होता. संत तुकारामांसारखे श्रेष्ठ गुरू लाभलेल्या संत बहेणाबाई ह्या एकमेव शिष्या होत्या. माहेर देवगांव तर सासर शिऊरास होते. कीर्तनासारख्या मनोरंजक साधनाद्वारे त्यांनी आपल्या उत्कट काव्यातून समाजाला नीती, भक्ति, ज्ञान व अध्यात्माचा पवित्र संदेश दिला. प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा याचा आपल्या कृतीतून 'आदर्श' समाजापुढे ठेवला.

त्यावेळचे प्रसिद्ध साधू जयरामस्वामी यांच्या हरीकथांवरील कीर्तनाने बहेणाबाईंच्या अंतरंगातील भक्तिभावाची फुले उमलू लागली. कार्तिकी वद्य प्रतिपदेस एक ब्राह्मण तिच्या स्वप्नात येऊन सावध करून गेला. तिच्यातील सुप्त भक्तिभाव जागृत होऊन ऐकलेल्या हरिकथा आठवू लागला. संत तुकोबांचे अभंग कानात घुमू लागले. त्यापाठोपाठ अभंगांचे अर्थही मनात स्पष्ट उलगडू लागले. तिच्या मनाची व्याकुळता वाढीस लागून पवित्र अभंगांचे निर्मात्या संत तुकोबांच्या भेटीची तिच्या मनास तळमळ लागली.

तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ।।
बहेणि म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटता अपार सुख आहे ।।

त्याचवेळी तिने मनाने संत तुकाराम 'हेच माझे परमसद्गुरु हे निश्चित केले. त्यांची भेट हीच सुखाची परमावधी असल्याचे स्मरून

'परी अंतरी तुकोबाचे ध्यान । दर्शनावाचून करितसे ।

आपल्या गुरुमाऊलीची मूर्ती मनाने रेखाटून त्यांचे अविरत ध्यान सुरू केले.

जयाचिया पदे होतसे विश्रांती । त्याची देहाकृती विठ्ठलची ।।
विठ्ठलासी तया नाही भेदभाव । ऐसे माझे मन साक्ष आहे ।।
कलियुगी बौध्यरूप धरी हरी । तुकोबा शरीरी प्रवेशला ।।

ज्ञानरूप विठ्ठलच तुकोबांच्या रूपाने अवतरला आहे अशा त्यांच्या बद्दलच्या भावना, श्रद्धा बहेणाबाईंच्या मनात एकवटून आल्या. संचिताला दग्ध करून संसाराश्रम निवारण करणारा सद्गुरू तुकोब... अजून भेटत का नाही. या विचाराने ती उदास झाली.

बहेणि म्हणे मीच असेन अपराधी ।
अन्याय त्रिशुद्धी काय त्याचा ।।
त्रिविध तापाने तापले मी बहु ।
जाईना का जीऊ प्राण माझा ।।

तिच्या मनाची तळमळ शिगेस पोहोचली. अन् एका रात्री स्व... गुरूकृपेचा दीप उजळला. तुकोबांनी गुरूमंत्र देऊन गीतेचे पुस्तक दि... अशा रीतीने गुरूमंत्र मिळाल्यावर त्या ध्यानमग्न बसल्यावर तुको... मनोमन पुन्हा दर्शन देऊन सांगितले,

तुम्ही आता येथे नका राहो कदा ।
आत्मज्ञानबोधा न संडावे ।।
बहेणि म्हणे दिल्हे दर्शन दुसरे ।
मनाच्या व्यापारे तुकोबाचे ।।

या बातमीमुळे लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले. ही गोष्ट त्यांच्या यजमानांना न आवडून त्यांनी बहेणाबाईंचा त्याग करायचे ठरविले. प... एकाएकी त्यांच्या अंगाची होणारी आग बहेणाबाईंच्या अहोरात्र पतिसेवेने शमली. एका वृद्ध ब्राह्मणाने पति गंगाधरपंतांना पत्नीचा अंगीकार करून जगण्याचा सल्ला दिला. आपल्या यजमानांना ब्राह्म... वेषात येऊन तुकारामांनीच योग्य मार्ग दाखविल्याचे बहेणाबाईंनी मनोमनी जाणले. त्यानंतर देहूत येऊन प्रत्यक्ष तुकोबांच्या सहवास... रहाण्याचे भाग्य वाट्यास आल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेना.

देऊळात कथा सर्वकाळ होत । श्रवण करीत दिनरात्री ।।
तुकोबाची कथा वेदातील अर्थ । पावे माझे चित्त समाधान ।।
दिनरात्री निद्रा न ये तिळभरी । तुकोबा अंतरी प्रवेशला ।
बहेणि म्हणे येती सुखाचे डोलावे । जाणती अनुभवे जाणते जे ।

बहेणाबाईंचे हे सुख मंबाजी गोसाव्याला पाहवेना. तरी आप... चिंतनात, नामस्मरणात तेही दिवस बहेणाबाईंनी घालवले. पूर्वीच... तुकोबांच्या आनंदओवरीत तीन अहारोत्र बहेणाबाई ध्यानस्थ बस...

त्यांना या समाधीतून जागे करण्याकरिता प्रत्यक्ष तुकाराम महाराज तेथे आले व आपल्या टाळ चिपळ्यांचा ध्वनी करून त्यांनी बहेणाबाईंची समाधी उतरविली. त्यांनी गुरुप्रसाद म्हणून त्यांना कवित्वाचे वरदान दिले. समाधीसुखाचे वर्णन करताना बहेणाबाई म्हणतात,

जालासे आनंद इंद्रियांचे द्वारी । बैसले शेजारी चैतन्याचे ।
घट हा बुडावा जैसा डोहा–आत । न फुटता ओतप्रोत पाणी ।
बहेणि म्हणे तैसे जाले माझे मना । तुकाराम खुणा वोळखी त्या ।।

बहेणाबाईंच्या काव्यगंगेचा स्रोत जोरात वाहू लागला.

बहेणि म्हणे जैसा लोटला समुद्र ।
ऱ्हदयाकाशी चंद्र बोले वाचा ।।

तुकाराम महाराजांच्या ॐकाराच्या उपदेशाने बोध होऊन बहेणाबाईंच्या त्रितापांचे शमन झाले. पंढरीला जाऊन विठ्ठलाच्या दर्शनाची उत्कट इच्छा इतकी अनावर झाली की तहान भूक हरवून त्या विठ्ठलाचे नामस्मरणात तल्लीन झाल्या. प्राणांचा निरोध होऊन तिची इंद्रिये अंतर्मुख झाली. मूलाधार चक्रापासून एकेक चक्र उमलत जाऊन अनाहतनाद ऐकू येऊ लागले. सोऽहं ध्वनीच्या पलीकडे असलेल्या आत्मरूपी लक्ष्याकडे मन एकरूप होऊन त्यांना विठ्ठलदर्शन झाले.

बहेणि म्हणे देव विठ्ठल पाहिला । द्वैतभाव गेला हारपूनी ।।

मी, तू पणाचा विसर पडून इंद्रिये अचेतन झाली. आत्मसुखानुभवाच्या ब्रह्मानंदाने सर्व चराचरात त्यांना पंढरीच दिसू लागली. सर्वत्र विठ्ठल भरूनी राहिला अशी उत्कट भावना होऊन आपला जन्म सफल झाल्याचे समाधान झाले.

अशा रीतीने एकविसाव्या वर्षीच बहेणाबाईंना जीवन्मुक्तावस्था प्राप्त झाली. आपल्या रसाळ व ओघवती वाणीतील कीर्तनांनी लोकांना मंत्रमुग्ध केले. लोकांसमवेत पंढरीच्या वारीला जाऊन समाजाला ही भक्तिमार्गास लाविले. पण हे सर्व आपले परम सद्‌गुरू तुकाराम महाराजांमुळेच झाले याची जाण मनोमनी सुखावत होती.

तुकाराम भेटला धन्य जिणे माझे । कृतकृत्य जाले सहजचि ।।
बहेणिसी उन्मनि लागली अवस्था । भोगी त्यापरता ब्रह्मानंद ।।

गुरुकृपांकित योगसाधनांचा पुरस्कार व मार्गदर्शन बहेणाबाईंनी समाजाला दिले. संतांच्या बहुमोल कार्याची पण स्तुतिसुमने गायली.

संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।
जनार्दन येकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकाश ।
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।।

सदाचार, भूतदया, सर्वांभूति समभाव, भक्तीचा जिव्हाळा, सर्वत्र प्रेमभाव, संतांना शरणागती इत्यादि सद्‌गुणांनीच परमेश्वराची कृपा होते हे बहेणाबाई आवर्जून सांगतात. लोकमानसावर उदात्त संस्कार घडवून व्यक्तिजीवन व समाजजीवन शुद्ध, निरोगी, सकस करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. संसारात राहून स्त्री–पुरुष दोघांनाही परमार्थ कसा साधावा याचे उत्तम मार्गदर्शन करून वेदविहित कर्म, शास्त्राच्या मर्यादांचे उल्लंघन न करता आपले कार्य कसे साधावे हे सांगत. अहंकाराचा व कर्तृत्वाचा त्याग करून गीतेतील कर्मयोग कसा अंगिकारावा हे सांगत.

स्त्रियांच्या पारंपारिक कला फुगडी, पिंगा झंपा आदि खेळातूनही बहेणाबाईंनी लोकांना अलौकिक पारमार्थिक शिकवण दिली. पारमार्थिक पिंगा खेळण्याची कला सांगताना–

घाल पिंगा ऐसा सांगतसे तैसा ।
काया वाचा मने शरण रिघे जगदीश।।

स्तुती, वाद, मतभेद यांना मान न देता सर्वत्र समभाव ठेवण्याची त्या शिकवण देतात. पांडुरंगाच्या नामात रंगून जाऊन जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करून घेऊन स्वानुभवसुखाचा आनंद कसा लुटता येईल ते लोकांना बहेणाबाई सांगत,

बहेणाबाईंची वेदनिष्ठा पण अपरंपार होती.

बहेणि म्हणे वेदान्वये ज्ञान ते निखळ लाहे ।
वेदा निंदो तो चांडाळ । दुष्ट सुतकिया खळ ।।

वेदांविरुद्ध वागणाऱ्यांची कडक शब्दांत बहेणाबाई कान उघाडणी पण करत. वेदांना मानणाऱ्याला सद्‌गती मिळते. त्या सांगत,

बहेणि म्हणे जया वेद मान्य जाला ।
ब्रह्मी होऊनि ठेला तोचि एक ।।
वेदा ऐसी नाही माऊली आणीक ।
प्राणिया विवेक सांगितला ।।
वेदा ऐसा कैसा बाप या जगासी ।
कर्मेचि मोक्षासी पाववितो ।।

ब्रह्मस्वरूप असे वेद स्वप्रमाण व स्वसंवेद्य आहेत हे बहेणाबाई कळकळीने सांगतात.

बहेणि म्हणे देव ॐकार सर्वांचा । तेथेचि वेदांचा पसारा दिसे ।

बहेणाबाई सांगतात की, ॐकाराचे मूळच पांडुरंग आहे. पांडुरंगाचे सगुणरूप हे नामारूपातील निराकार, निर्विकार, सच्चिदानंद रूप हे शाश्वत चैतन्याचे प्रतीक आहे. या विश्वरूपी परमतत्त्वाला पाहण्यासाठी सत्त्वगुण मुक्त ज्ञानदृष्टी हवी. देहाहंकार नष्ट केल्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही. आत्मज्ञान झाल्याशिवाय ब्रह्मस्वरूप ओळखता येणार नाही. असे बहेणाबाई सांगत.

बहेणाबाई म्हणतात, आत्मा म्हणजे पंचतत्त्वांचा पाळणा, आत्मा म्हणजे ब्रह्म, आत्मा हे निर्विकल्प अनादी, अनंत ब्रह्मरूप आहे. सद्‌गुरूला शरण गेल्यावर या सर्वांचा साक्षात्कार होतो.

सद्‌गुरूसी जाई शरण सर्वभावे । मग तू स्वभावे ब्रह्मरूप ।।
बहेणि म्हणे एक श्रीगुरुवाचोनी । मोक्ष तो गहनी प्राप्त नव्हे ।।
ऐसे पुण्य करा मनासी या वरा । सद्‌गुरूचे धरा पाय आधी ।।

शुद्ध भक्तिभाव ठेवून कर्म केल्याने जीवन्मुक्ताचा आनंद मिळून मनुष्यजन्म सार्थकी लागतो असे बहेणाबाई म्हणत.

करावी हे भक्ति स्वधर्म आचारे । तुज ज्ञानद्वारे ओळखावे ।।

या काव्यपंक्तीत बहेणाबाईंनी भक्ति, कर्म, ज्ञान तिन्हींचा संगम

घडविला आहे. भक्तीने चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धीमुळे वैराग्य उत्पन्न होते. वैराग्यामुळे मन विरक्त होते व ईश्वरचरणी ते एकरूप होते. पण हे सर्व सद्‌गुरूकृपेनेच प्राप्त होते. जसे तृषाक्रांताला पाणी, चकोराला चंद्रामृत, चातकाला मेघ तसे आदर्श भक्ताला हरिभक्ति आवडते.

बहेणि म्हणे भाव इच्छेचा फलदानी ।
पावसी निर्वाणी मोक्षपदा ।।

भाव म्हणजे भगवंताबद्दल वाटणारे निरपेक्ष प्रेम 'अखंड वाचेशी रामराम' अखंड भक्तिभावाने केलेले नामस्मरण हे मोक्षपदी नेते हे स्वानुभवाने बहेणाबाई सांगतात.

भाव तेथे भक्ति । भक्ति तेथे ज्ञान ।
ज्ञाने समाधान । होय चित्ता ।
बहेणि म्हणे संग असावा नि:संग ।
तोचि पांडुरंग पंढरीचा ।।
धरुनी आधार निघाले बाहेरी ।
जालासी कैवारी पांडुरंगा ।।
बहेणि म्हणे भक्ता कासयाची चिंता ।
गाठीसी असता पांडुरंगा ।।

भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले बहेणाबाईंचे काव्य मनाचा ठाव घेते. सद्‌गुरू तुकाराम महाराजांच्या कृपेने त्यांना काव्यस्फूर्ती झाली व वयाच्या बहात्तराव्या वर्षी निर्वाणीचे अभंग सांगून समाप्ती झाली. एकूणच त्यांचे काव्य विचारपरिलुप्त, भारदस्त, प्रासादिक, चित्तरंजक व उद्‌बोधक आहे. खऱ्या अर्थाने त्यांच्या काव्याला आध्यात्मिक काव्य ही संज्ञा सर्वाधिक योग्य आहे.

'गुरु: साक्षात परब्रह्म' हे गुरुविषयाचे झालेले सखोल ज्ञान आपल्या अनन्यसाधारण भक्तिरसामृत युक्त काव्यातून उत्कटतेने त्यांनी व्यक्त केले आहे.

बहेणाबाईंची ही तेजस्वी साहित्य-ध्वजा केवळ भागवत धर्ममंदिराचीच नाही तर स्त्री जातीच्या महानतेचे आदर्श द्योतक म्हणून फडकत राहील यात शंका नाही. शृंगार, करुण वत्सल, अद्‌भुत हास्य, भयानक, वीर, रौद्र, भक्तिरसयुक्त त्यांच्या काव्यरचना मनाला विठ्ठलचरणी एकरूप करून टाकतात. बहेणाबाई ह्या वारकरी संप्रदायाच्या शेवटच्या संत कवियत्री आहेत.

धन्य त्या संत बहेणाबाई त्यांच्या चरणी माझे साष्टांग दंडवत!

सौ. मृणाल सुहास थोरात
४८१, पर्वती दर्शन, फुले मॅन्शन,
फ्लॅट नं. २, पुणे ४११००९
फोन : २४४२८५०९





संत वेणास्वामी



समर्थकन्या वेणाई-दर्शन

सौ. शैला सुहास पटवर्धन

एम.ए. बी.एड., निवृत्त शिक्षिका, पार्लेटिळक विद्यालय, मुंबई
कविता करण्याची आवड, श्यामरंग- भक्तिगीतांची ध्वनिफित (इ.स. २००४),
सेवानिवृत्तीनंतर पुण्यात कृष्णजन्माष्टीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण.

गुरुभक्तीच्या द्वारामधली वाट ईश्वराकडे
गुरुचरणांचा शोध सोडवी अध्यात्माचे कोडे

वय बाराचे गगन कोसळे अवचित माथ्यावरी
परिचय होण्याआधी तुटली सौभाग्यदोरी
मायबाप जरि असले वत्सल जननिंदा डाकिण
कुठे कसा खेचील पाय अन् उभे करिल मरण!

वेणा विरागी सत्त्वशील अन् सुसंस्कारी गोड
गृहकृत्यामधि दक्ष तशी तिज देवभक्तिची ओढ
वडिल माणसांसवे कीर्तनी-भजनी-नामस्मरणी
नित्य असे ती रत उद्योगी-मितभाषी सदनी!

पोथीवाचनी भागवताच्या प्रश्न मनी प्रतिदिनी
एके दिवशी सुयोग आला 'श्रीसमर्थ' - संभाषणी
प्रश्न वेणीचे उत्तर देती 'समर्थ' सर्वज्ञानी
''अनन्यप्रज्ञा दैवी देणगी होईल ही योगिनी''
अनन्यप्रज्ञा दैवी देणगी होईल ही योगिनी
कीर्तनश्रवणी दिसे मुखावर इप्सित ते नयनी
एके दिवशी महंतांसवे वेदांती चर्चा
देवालयी रंगली रात्रभर पार नसे हर्षा!

पहाट झाली! घरी परतता निंदक द्वारी उभेच
कलंकिनी ठरवून सांगती ''द्या विष ह्या घरनिघेस''
प्रेम-दया-क्षमा सर्व ठेवुनी बाजूला
जन्मदेने विषप्याला दिला वेणाईला।।

''शुद्ध असे जर हलाहलासी पचविल ही अमृता।''
कुटिल बोलले - ''बघु आहे ही मीरा की कुलटा?''
''कऱ्हाड प्रांतीचे विष दारुण - मोहरीएवढेसुद्धा घेईल प्राण!''
''कुणी समर्था विपरीत पाहील - नाही जन्मला जगती अजून''

''सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा
उडी घालितो संकटी स्वामी तैसा
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।''

निंदक-साधक दोन्ही बघे उभे होते
धावत शरण गेले समर्थापायी ते
निंदक किटाळ निष्फळ। वेणा पवित्र गंगाजळ
गुरुनिष्ठेची अपारशक्ति। भक्ति होई सुफळ।।

गुरुनिष्ठेची अपार शक्ति-मृत्यू परतविती
दिली शिष्या मायबापे समर्थांच्या हाती।।
पायरी-पायरी चढे, चढली सोपान -
अहंब्रह्म उपदेशातून 'अहं' गेले, ब्रह्म ठेले।।

'वेणास्वामी' - 'मठाधिकारी' - 'कीर्तन अधिकारी'
आजवरी ना कुणा स्त्रियेला होती ती वैखरी
भाव विलोली - विपुल लेखनी - सुंदर 'रामायणे'
'सीता-स्वयंवर', 'राम-गुहसंवाद' झुंबर नभी देखणे

''कौल' अत्त्युत्तम रामराज्य असावे कसे?
आज 'राम' हवा तरी जडो असेच पिसे -
''बहू कष्टलो पातलो जी स्वदेशा
प्रजा बोलती कौल दे राघवेशा।।
भूमीने कदा पीक सांडू नये रे
वंदे राम लक्ष्मूमणा हे लिहीरे
तुझ्या दर्शनी आडकाठी नकोरे
वंदे राम लक्ष्मूमणा हे लिही रे

।। सत्यात यावा असा राम। - भ्रातृभक्त असा लक्ष्मण।।
सद्धर्म संस्कार जगी। जीवनी चिरंजीव व्हावा।।
देवकार्याचा श्रीगणेशा-गुर्वाज्ञेने केला।।
कीर्तनाचा बहुमान, विश्वतत्त्व संकल्पना
उत्सुक स्पष्टीकरण श्रवणा-गागाभट्ट काशीचे
प्रश्नोत्तरे गागाभट्टांशी समर्थांची कृपा पाठीशी
समर्थकन्येचा अधिकार नि:संशय।। ''कर्ता करविता श्रीराम''।।

शिवराज्याभिषेक सोहाळा। सज्जनगडी समर्थशिष्यांचा मेळा
कीर्तनाची आज्ञा वेणास्वामींना। वर्णन राज्याभिषेक प्रसंग
रंग भरला कीर्तनी। जणू समाधि लागली। राम-राज्य-गायनी।
समर्थ प्रसन्न। तेज अवतीभवती। जणू जाहले 'श्रीरामरूप'।।

गुरुसेवेमाजी जनसेवा। शिष्या घडविल्या कार्य कराया।।
कितीक अबला केल्या सबला। समर्थसंप्रदाय विस्ताराया
गुरुभोजनासाठी रांधिले+वाढतां अकस्मात नवल जाहले
रामभक्त हनुमंताचे दर्शन घडले। पूर्ण सद्गुरुकृपा हीच।।
''माहेरी जावेसे वाटे - वेणास्वामी विनवी समर्थांते
संयमी विवेकी 'समर्थ'। 'कन्या माहेरी जाते' भाव जाणिते
मुहूर्त चैत्र वद्य चतुर्दशी - शिष्यांसी सूचना अंत्येष्टि तयारीसाठी

वेणा आणि दो प्रहरासी - स्वहस्ते रामप्रभूसी नैवेद्य
प्रत्यक्ष गुरू समर्थ। कीर्तन श्रवणार्थ सादर
नित्याहूनही रामरंगी। चढत गेला कीर्तनरंग
आरती होताच गुरुचरणी वीणा ठेवून
मस्तक ठेवले ते। मोक्षक्षणीचे गुरुवंदन!
आजही सज्जनगडी, समाधी वंदन तुळशीवृंदावनी वेणाईस आधी

टीप : बोल्ड केलेल्या ओळींतील रचना
संत वेणाबाई यांच्या आहेत.

शब्दांकन - **सौ. शैला सुहास पटवर्धन**
डी-३, प्राजक्ता, कर्वेनगर, पुणे.
फोन ०२०-६५२१८५३१

संदर्भग्रंथ : वेणा पावली पूर्णविराम - सुनिल चिंचोलकर (सज्जनगड)



वेण्णास्वामी एक मांगल्याची ज्योत

सौ. सुमन सदानंद जड्ये
बी.कॉम., गृहिणी
आध्यात्मिक वाचन, अभ्यास

गोपजीपंतांच्या घरी आज बारशाचा सोहळा होता. खरे तर वाड्यातच हा सोहळा होणार होता, परंतु गोपजीपंतांचा इतका लोकसंग्रह वाड्यात मावेलच कसा? म्हणूनच वाड्याबाहेरील पटांगणात छानसा मंडप बांधण्यात आला होता. मंडपाचे खांब सुगंधित फुलांच्या माळांनी सुशोभित करण्यात आले होते. पाहुण्यांना बसण्या-उठण्यासाठी छान बैठकी मांडल्या होत्या. गोपजीपंत आणि राधिकाबाई यांची पहिली दोन अपत्ये जगली नव्हती, आणि म्हणूनच या बाळावर त्यांचा जीव होता. आईसारखं गोरंपान आणि बाबांसारखं तरतरीत असं हे बाळ सगळ्यांच्याच कौतुकाचा विषय झाला होता. बाळाचं नाव ठेवण्यात आलं, 'वेणा'. एवढ्या गजबजाटात देखील वेणा शांत, प्रसन्न, पाळण्यात पहुडली होती. या बाळाच्या निरागस बाललीला बघण्यात गोपजीपंत आणि राधाबाई रंगून गेले होते.

राधीकाबाईंच्या वात्सल्यात आणि इतरांच्या प्रेमात वेणा सहा वर्षांची झाली. पण लाडानं कधी बिथरली नाही, कारण मुळातच वेणा सात्त्विक आणि सोज्वळ होती. वेणाच्या घरात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रामोपासनेचे तिच्यावर संस्कार होते. लहानपणातच तिला रामकथा ऐकायला आवडत असे. रामरक्षा, शिवमहिम्न, शंकराचार्यांची स्तोत्रं, विष्णु सहस्रनाम हे सारे केवळ श्रवणानेच तिने पाठ केले होते. नुसतेच पाठांतर नव्हे तर त्यावर तिचे प्रश्न देखील असत.

'आई, माणूस मरतो म्हणजे नेमकं काय होत गं?'

'बाबा, राम देव होता, तर मग त्याला मृत्यू कसा?'

'हनुमान भक्त होता, मग तो चिरंजीव कसा?'

'बाबा, ध्रुव ताऱ्याच्या जवळ गेलं तर ध्रुव बाळ भेटेल?'

असे कितीतरी प्रश्न विचारून वेणा आई-बाबांना भंडावून सोडत होती. पण बाबा मात्र तिचे समाधान करत असत. सगळ्या स्तोत्रांचे अर्थ त्यांनी वेणाला समजावून सांगितले. तिची ही अभ्यासूवृत्ती बघून बाबांनी तिची अक्षरओळख सुरू केली. पत्की गुरुजी घरी येऊन तिला अक्षरओळख देऊ लागले. लहान वयात वेणाने बाबांजवळ रामायण आणि महाभारत या ग्रंथांची मागणी केली.

वेणाचा आध्यात्मिक प्रवास असा लहानपणापासूनच चालू झाला. दहा वर्षांची वेणा एकदा शेजारच्या घरी मंगळागौरीचे खेळ खेळण्यासाठी गेली होती. तिचा खेळकरपणा, धीटपणा तिथे जमलेल्या सगळ्या बायका कौतुकाने पहात होत्या. त्यातच मिरजेच्या देशपांडे बाई होत्या. आपल्या दत्तात्रेयासाठी ही मुलगी अगदी योग्य आहे असे त्यांच्या मनात आले. तसे त्यांनी वेणाच्या आईला सांगितले देखील. मिरजेत या देशपांड्यांचा मोठा वाडा होता. शेती होती. घोडागाडी असलेलं श्रीमंत घर होतं ते. राधीकाबाईंनी ही गोष्ट गोपजीपंतांच्या कानावर घातली. दोघांनीही ठरवले, वेणाला देशपांडे घराण्यात द्यायचे. एवढ्या खानदानी घराण्यात आपली मुलगी खुश राहील. पोरीनं खरंच नशीब काढलं, असा त्यांनी विचार केला.

पण कर्मयोग्याचेच जणू रक्त असलेल्या वेणूचे या लौकिक गोष्टींकडे फारसे लक्ष नव्हते. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीला वेणाचे लग्न थाटात पार पडले देखील. माहेरच्या सगळ्यांचा निरोप घेऊन वेणा सासरी आली. मिरजेला वाड्यासमोर घोडागाडी थांबली आणि सगळ्यांनी या नव्या नवरीचे कौतुकाने स्वागत केले. सासूबाईंच्या हाताखाली वेणा छान दिवस काढत होती. सासूबाई देखील तिला सुखात ठेवत होत्या. वेणाचे मन जपत होत्या. तिला अध्यात्माची आवड असल्याचे कळताच सासूबाई अजून खूश झाल्या. तिला घेऊन प्रवचन, कीर्तनाला जाऊ लागल्या.

काही महिन्यांनी वेणा माहेरपणाला कोल्हापुरात आली. वेणाच्या तोंडी सासरचं भरभरून कौतुक ऐकून राधिकाबाईंना खूपच आनंद झाला. गोपजीपंत देखील समाधानाने तृप्त झाले. वेणू आनंदात माहेरपण अनुभवत होती. वेणू एके दिवशी सकाळी लवकर उठली. उठली कसली, खरं तर तिला रात्रभर चांगली झोप लागलीच नाही. कुत्र्यांचे विव्हळणे कुठेतरी ऐकू येत होते, गाय गोठ्यात हंबरत होती. वेणू गायीचं दूध काढायला गेली पण तिला गाईच्या डोळ्यात अश्रू दिसले. मुक्या जनावरांचा आक्रोश छोट्या वेणूला काय कळणार?

पण या सगळ्यामुळे गोपजीपंत मात्र बेचैन होते. इतक्यातच वाड्यासमोर घोडागाडी थांबली. गाडीवान लगबगीनं आत आला. त्याचे असे येणे बघून गोपजीपंत आणखीनच बेचैन झाले. गाडीवानाने

निरोप दिला की मिरजेला ताबडतोब बोलावले आहे. थोडीशी घरातील आवराआवर करून सर्वजण मिरजेस जाण्यास निघाले. गोपजीपंतांना मुक्या जनावरांचा आक्रोश कळला होता.

शिरगावचा फलक मागे पडला आणि गोपजीपंतांनी वेणाला जवळ बोलावले. तिच्या चेहऱ्यावरची काळजी त्यांना दिसली होती. ते वेणाला धीर देत होते. रामरायाच्या कृपेने सारं काही ठीक होईल. रामाचे नाव काढताच वेणूला सीतामाईच्या वनवासाची आठवण झाली. ज्योतिबाचा डोंगर ओलांडून गाडी पुढे आली. मिरजेतील ब्राह्मणपुरीत गाडी येऊन दाखल झाली. तेथील परिस्थिती पाहून राधिकाबाईंचे मन घाबरले. काही माणसे गुडघ्यात डोके खुपसून बसली होती. तीघंही पुढे आले. अर्धवट झाकलेल्या घमेल्याखाली पेटती पणती पाहिली अन् पाणावलेल्या डोळ्यांनी सगळ्यांनी एकच आकांत केला.

वेणा विधवा झाली होती. बाहुला बाहुली खेळण्याचं खरं तर तिचं वय, पती-पत्नी या नात्याचा अर्थही वेणूला माहीत नव्हता, आणि वेणूवर अशी दुःखाची दरड कोसळली. विहिरीत पोहायला म्हणून गेलेला दत्तात्रय तळातील चिखलात रूतून बसला आणि काळाने त्याच्यावर घाव घातला. सकाळच्या प्रसन्नवेळी टवटवीत दिसणारं फूल संध्याकाळी कोमेजावे अशी अवस्था वेणाची झाली. ज्या पायांबरोबर काही दिवसांपूर्वी वेणू सप्तपदी चालली होती, त्याच पावलांकडे बघून आज ती अश्रू गाळत होती. वेणूचे जे सुंदर केस आणि अल्लडपणा बघून तिच्या सासूबाईंनी तिला मागणी घातली होती, ते सर्व ऐश्वर्य आज गडप झाले होते. पण इथेही वेणू उच्च विचार करत होती. एवढ्या कोवळ्या वयात ती जन्ममृत्यूचा विचार करू लागली. वर्षं पुढे सरकत होती. मानवी दुःखाचा किनारा आता मागे पडला होता. वीस वर्षांची वेणू पार अध्यात्मात बुडत चालली होती. संतांचे अभंग वाचणे, धार्मिक ग्रंथ जाणून घेणे यातच ती वेळ घालवत होती. वेणू एकदा तुळशीवृंदावनाजवळ बसून एकनाथी भागवत वाचत होती. इतक्यात एक बैरागी तेथे भिक्षा मागायला आले. ''मारुतीला नैवेद्य दाखवायचा आहे, पुढल्या घरी जा.'' वेणाच्या सासूबाई आतूनच ओरडल्या. ठीक आहे, असे म्हणून ते बैरागी तेथून निघून गेले. 'जय जय रघुवीर समर्थ' वेणाच्या कानावर हे शब्द पडले आणि वेणाने त्या बैराग्याकडे चटकन पाहिले. तिला साक्षात तो बैरागी म्हणजे मारुतीचा अवतारच वाटले.

वेणूच्या आयुष्यात परमार्थाची घडी व्यवस्थित बसत चालली होती. करीत असलेली साधना शुद्ध स्वरूपाची होती, आणि याच वेळेस गुरुभेटीची वेणाला आस लागली. उपदेशाचे बीज पेरण्यासाठी अशा वेळेस सद्‌गुरू आपणहून शिष्याच्या आयुष्यात येतात. वेणाचे असेच झाले. काही दिवसांनी ते बैरागी परत भिक्षा मागण्यासाठी तेथे आले, तेव्हाही वेणा भागवत वाचत होती. ते बैरागी म्हणजेच समर्थ रामदास. समर्थांनी वेणास विचारले, ''काय वाचता?'' वेणाने उत्तर दिले, ''भागवत वाचते आहे.'' समर्थांनी पुढे विचारले, ''अर्थ कळतो?'' वेणा म्हणाली, ''फारसा नाही कळत, पण कोण सांगेल मला?'' समर्थ म्हणाले, ''जमलं तर सांगू आम्ही.'' वेणाने समर्थांपुढे प्रश्नांची यादीच टाकली. वेणाच्या प्रश्नांनी समर्थांना कौतुक वाटले. रामनामाचे स्मरण करणेस सांगून समर्थ तेथून निघून गेले. पण वेणूला मात्र त्या सत्पुरुषांची ओढ लागली. तिचे आता कशातच मन लागेना. समर्थांच्या भेटीसाठी ती आतुर झाली. तिच्यातील हा बदल तिच्या सासुबाईंच्या लक्षात आला. वेणाला थोडे दिवस माहेरी पाठवूया, म्हणजे बरे वाटेल. या विचाराने सासुबाईंनी तिला माहेरी पोहोचवले.

पण झाले वेगळेच. कोल्हापुरात आईकडे आल्यावर वेणाला कळले की, अंबाबाईच्या देवळात समर्थांची कीर्तने होणार आहेत. वेणाला खूप आनंद झाला. ती रोज कीर्तनाला जाऊ लागली. समर्थांच्या कीर्तनातून भक्तीचा झरा वेणाने अनुभवला. त्या भक्तिझऱ्यात सर्व भक्त तृप्त व्हायचे, तल्लीन व्हायचे. नरदेहाची थोरवी तिने कीर्तनातून ऐकली.

प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।।
जीतुके आपणास ठावे । ते समस्तास सांगावे ।
शहाणे करून सोडावे । सकल जन ।।
रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झाकणी करावी ते । कायेनिमित्त ।।
काहीच न करूनी प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ।।

यासारखा उपदेश वेणा ऐकत होती. समस्त श्रोते समर्थांच्या कीर्तनात तल्लीन होत असत.

वेणूच्या आयुष्यात आज भाग्याचा दिवस उगवला होता. आज समर्थ वेणाच्या घरी येणार होते. जणू काही प्रभू श्रीरामच घरी येणार असे वेणूला वाटत होते. समर्थांच्या स्वागताची सगळी तयारी वेणा स्वत: करत होती. अंगण छानपैकी सारवून त्यावर रांगोळी घातली. मोगऱ्याच्या फुलांचा जणू गालीचाच तिने घातला होता. तबकात अत्तर, फुले, गंध, नारळ, फळे... अशी तयारी करत असतानाच वेणाच्या कानावर शब्द आले,

सदा रामनामे वदा पूर्णकामे ।
कदा बाधिजेना पदा नित्यनेमे ।
मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।

गोपजीपंत, राधिकाबाई, वेणा सर्वांनीच समर्थांचे आशीर्वाद घेतले. या प्रसंगानंतर वेणा अतिशय आनंदात होती. समर्थांचे विचार त्यांच्या प्रवचनातून, कीर्तनातून ऐकावे, त्यावर चिंतन-मनन करावे हेच तिचे जीवन बनले. पण समाज मात्र तिच्याकडे वेगळ्याच दृष्टिकोनातून बघत होता. ''गोसावड्याच्या नादी लागली हो पोर.'' असे म्हणून वेणाला हिणवत होता. पण वेणाने या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले. तिचे आता एकच जीवनव्रत होते, ते म्हणजे समर्थमय होऊन जायचे. सहनशक्ती, त्याग या गोष्टीतर तिच्याकडे जन्मापासून होत्याच. सद्‌गुरुंवर आणि श्रीरामांवर वेणाची पूर्ण श्रद्धा होती. या श्रद्धेमुळेच परमार्थाच्या पायऱ्या ती भराभर चढत होती. गोपजीपंतांना याबद्दल कौतुक होते पण

राधिकाबाई मात्र काळजी करत असत, कारण जनता वेणाबद्दल आणि समर्थांबद्दल देखील काही-बाही बोलत असे. परिस्थिती गंभीर बनत गेली आणि वेणासमोर प्रश्न उभा राहिला. आईवडील की अध्यात्म, समाज की परमेश्वरप्राप्ती! - आज वेणू समर्थांना सगळं सगळं सांगणार होती. परंतु त्यादिवशीच्या कीर्तनातच समर्थांनी याचे उत्तर न विचारताच दिले, त्यांनी सांगितले,

कोणी निंदा कोणी वंदा । आमुचा स्वहिताचा धंदा ।
तुम्हा सारिखे चालावे । तरी स्वहितासी मुकावे ।।

ज्याला स्वहित साधावयाचे आहे त्याने जननिंदेकडे लक्ष देऊ नये. या कीर्तनानंतरच वेणाने समर्थांना पारमार्थिक अनेक प्रश्न विचारले, समर्थांनी देखील वेणाच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

वेणा - माया आणि ब्रह्म यातील फरक काय?

समर्थ - माया सगुण साकार आहे, म्हणून त्याला अंत आहे. ब्रह्म निर्गुण आहे, म्हणून याला अंत नाही. माया असार तर ब्रह्म सार.

वेणा - दृश्य जर मिथ्या आहे तर ते का दिसतं?

समर्थ - देखणे ते सत्य मानावे, हे ज्ञात्याचे देखणे नव्हे, मृगजळ दिसते पण ते खरे नव्हे, स्वप्न पडते पण ते खरे नव्हे, पाण्यातील चंद्राचे प्रतिबिंब दिसते पण तो खरा चंद्र नव्हे.

वेणा - गुरूदेव, धरिता साधूची संगती, किती दिवसा मिळेल मुक्ती?

समर्थ - संतांच्या वचनावर विश्वास आणि दृढ श्रद्धा हवी, प्रज्ञावंत शिष्य असल्यास, अनन्य भक्त असल्यास, मुक्ती ठरलेलीच असेल.

वेणा - निरामय म्हणजे काय? निराभास म्हणजे काय?

समर्थ - निरामय म्हणजे निरुपाधिक; निराभास म्हणजे अप्रगट, असे ते ब्रह्म.

वेणा - निरंजन म्हणजे काय? निरंतर म्हणजे काय?

समर्थ - निरंजन म्हणजे निर्विकल्प. निरंतर म्हणजे अव्याहत. निर्गुण म्हणजे गुणरहित, असे ते परब्रह्म.

वेणा - अगणित म्हणजे काय? अकर्तव्य म्हणजे काय? अक्षै म्हणजे काय?

समर्थ - अगणित म्हणजे असंख्य, अमाप. अक्षै म्हणजे क्षयचि नाही, असे ते परब्रह्म.

पहाटेचे चार वाजले, अंबाबाईच्या देवळातील सनईचे सूर कानी पडले आणि वेणा भानावर आली. गुरुआज्ञेने काकड आरती करून ती घरी गेली.

पण घरी काही वेगळेच ताट तिच्यापुढे वाढून ठेवले होते. वेणाचे सर्व निंदक आज जिद्दीलाच पेटले होते. नको नको ते बोलू लागले, त्यात तिची आत्या देखील होती. वेणूला त्या सगळ्यांचे बोल असह्य होऊ लागले. तिच्या सद्गुरूबद्दल काही बोललेलं वेणाला सहन होत नव्हतं. आपल्या निर्मळ सद्गुरूबद्दल वेणा निर्वाळा देऊ लागली. तिला खात्री होती. रामराया हे सगळं नक्की निभावून नेईल. पण आज तिचे निंदक काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. एका स्त्रीने तर विषाचा पेलाच तिच्यापुढे आणून ठेवला. वेणा म्हणाली, माझी श्रद्धा खरी असेल तर या विषाचे देखील अमृत होईल, आणि तसेच झाले. वेणाने मनातून केलेला सद्गुरुंचा धावा समर्थांपर्यंत पोहोचला. काही वेळातच समर्थ तिथे हजर झाले. यानंतर मात्र समर्थांनी वेणाला आपले सोबत यायला सांगितले; तिचे निंदक आता स्तब्ध झाले. समर्थांना ते वंदन करू लागले. पण दुसऱ्याच दिवशी वेणा सगळ्यांचा निरोप घेऊन चाफळ मठाकडे रवाना झाली.

समर्थांनी वेणाला चाफळ मठातील अक्कातांईच्या स्वाधीन केले. येथे आल्यावर वेणाचे जीवन पालटून गेले. चाफळ मठातील वेणाची दिनचर्या अशी होती, 'पहाटे चार वाजता उठावे, जवळच्या मांड नदीत अंघोळ करावी, सगळे आवरून काकड आरतीला यावे, यानंतर मंदिर स्वच्छ करावे, शेणाने सारवावे, त्यावर रांगोळी काढावी, मंदिराचे खांब पुसावेत, दोन तास जप करावा आणि नंतर पाकसिद्धीत मदत, दुपारच्या भोजनानंतर ग्रंथांचे अध्ययन, सायंकाळी करुणाष्टके, रात्री मात्र मठात भोजन नसे. ज्यांना भूक लागेल त्यांनी चणे-कुरमुरे खायचे किंवा गूळ-शेंगदाणे. वेणाताई चाफळ मठाशी अशी एकरून होऊन गेली.

समर्थांची नवनवीन रूपे वेणाला आता कळू लागली. अध्यात्माबरोबरच समर्थांचे निसर्गप्रेम तिने जवळून पाहिले. वेणाताई आता कीर्तने-प्रवचने करू लागल्या. एक स्त्री कीर्तन करणार या विचाराने सर्वत्र चर्चा होती. परंतु वेणाताईंनी आपल्या प्रखर ज्ञानाने आणि तेजस्वी वाणीने सर्वांची मने जिंकली. तिच्या कीर्तनाला लोक गर्दी करू लागले.

समर्थांनी वेणाताईंना आता एक स्वतंत्र मठ देण्याचे ठरवले. श्रावण वद्य प्रतिपदेला अधिकृत संस्कार करून वेणाताईंची मठपती म्हणून निवड करण्यात आली. वेणाताई आता वेणास्वामी झाल्या. तिचा हा मठ तिच्याच सासरी म्हणजे मिरजेला होता. या मठात राहून वेणास्वामींनी लोकोद्धाराचे प्रचंड कार्य केले. सीता-स्वयंवर हा ग्रंथ वेणास्वामींनी तिथे लिहिला, अनेक अभंग रचले. महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर देखील वेणास्वामींनी अनेक शिष्य तयार केले. मंगल रामायण, छंदो रामायण, संकेत रामायण, लवकुश रामायण, शब्द रामायण, भाषा रामायण अशी रामायणे वेणास्वामींनी लिहिली. समर्थ संप्रदायाच्या प्रमुख कार्यकर्त्या त्या बनल्या.

एवढे कार्य करून वेणा निश्चिंत झाली. वेणास्वामींना आता निर्याणाचे वेध लागले. समर्थांजवळ तसे त्यांनी बोलूनही दाखवले, पण आमच्या आज्ञेशिवाय जाऊ नये असे समर्थांनी त्यांना सांगितले. या गोष्टीला देखील आता दोन महिने झाले. एकदा सज्जनगडावर संपूर्ण समर्थ परिवार जमला असताना समर्थांनी सकाळीच जाहीर केले, की आज वेणास्वामींना आपण माहेरी पाठवणार आहोत. वेणास्वामींना अतिशय आनंद झाला. त्या धावतच समर्थचरणी आल्या. समर्थांनी विचारले, "आता पुन्हा येणे कधी?" वेणास्वामींनी उत्तर दिले, "जगाच्या कल्याणासाठी आपण जेव्हा अवतार घ्याल तेव्हा आपल्या चरणांची दासी होऊन पुन्हा येईन."

आज दुपारचा नैवेद्य स्वत: वेणास्वामींनी समर्थांना शेजघरात नेऊन दिला. सर्वांची जेवणे झाली. थोडी विश्रांतीही झाली. दुपारी चार


वाजता मठाच्या प्रांगणात संपूर्ण समर्थ परिवार जमला. शिवथरघळीत असताना समर्थांनी वेणास्वामींना मेखला म्हणून जे नऊवारी लुगडे दिले होते तेच आज वेणास्वामींनी परिधान केले. समर्थांनी वेणास्वामींना कीर्तन करण्याची आज्ञा केली. हातात झांज घेऊन वेणास्वामी अभंग म्हणू लागल्या.

बंदी विमोचन राम माझा बंदी विमोचन राम ।
सकलही ऋषीमुनी भजती जयासी । एक चित्त सुखधाम... ।।

कीर्तनाचा पूर्वरंग पार पडला. समर्थांनी स्वत: वेणास्वामींना हार अर्पण केला. उत्तररंगातील कीर्तन देखील संपले. 'जय जय रघुवीर समर्थ'च्या जयघोषात सबंध सज्जनगड परिसर दुमदुमून गेला. तिकडे सूर्य पश्चिमेला अस्त पावत होता आणि इकडे समर्थशिष्या वेणा शिवाच्या भेटीसाठी आसूसली होती. समर्थ परिवारातील हा तेजस्वी ताराच आज निखळून पडणार होता. वेणास्वामी उन्मनी अवस्थेत गेल्या आणि त्याच अवस्थेत त्यांनी समर्थचरणी देह ठेवला.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. सुमन सदानंद जड्ये
पत्ता - ७, नवराम दर्शन, अंबिका नगर,
गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व)
फोन नंबर - (०२५१) २४४४४९६
मोबाईल - ९८२०२३९६५७



मनातल्या वेणास्वामी

सौ. वृषाली विनोद देशमुख

बी. कॉम.

बृहनमुंबई महानगरपालिका येथे मुख्यलेखा परीक्षक म्हणून कार्यरत.

आध्यात्मिक वाचनाची आवड

वेणाबाई या श्री समर्थ रामदास स्वामींच्या पट्टशिष्या. समर्थांच्या मठ जीवनातील आचारधर्माचे कठोर पालन करून पंथात आपल्या योग्यतेमुळे उच्च अधिकार व प्रतिष्ठा मिळवणाऱ्या वेणास्वामी. रामायण व सीता-स्वयंवर यांसारखी दीर्घ कथाकाव्ये रचून रामरायाच्या कीर्तनात जनसमाजाला मंत्रमुग्ध करून टाकणाऱ्या वेणास्वामी.

वेणास्वामींचा जन्म कोल्हापूरमधील देशस्थ ब्राह्मण गोपाजीपंत देशपांडे यांच्या कुळात झाला. बालवयात त्यांचे लग्न मिरजेतील एका गृहस्थांशी झाले. परंतु अवघ्या अकराव्या वर्षीच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. बालविधवेने जीवंतपणाच्या साऱ्या उर्मी दाबून वैराण आयुष्य कंठीत रहायचं. मरणप्राय यातना सोसत उरलेले जीवन अध्यात्मात व्यतीत करायचं हा त्याकाळचा शिरस्ता. आईवडिलांच्या खंबीर पाठबळामुळे त्यांना जीवनाचा नवीन स्रोत गवसला. धर्मग्रंथाचे श्रवण, मनन व चिंतन यात त्या स्वतःचा वेळ व्यतीत करू लागल्या.

अचानक एक दिवस समर्थ रामदास स्वामींनी 'जय जय रघुवीर समर्थ' अशी घोषणा देत वेणास्वामींच्या अंगणात पाऊल ठेवलं. सूर्यवंशी रामरायाचे भक्त, सूर्याजीपंताचे सुपुत्र समर्थ रामदास स्वामी अवतीर्ण झाले. वेणास्वामी अनिमिष नेत्रांनी त्या तेजस्वी महापुरुषाच्या दर्शनात मग्न झाल्या. पुढे वाकून त्यांनी नमस्कार केला. कल्याणमस्तु! असा आशीर्वाद देऊन समर्थांनी भिक्षा मागितली. वेणूच्या सासुबाईंनी समर्थांना भिक्षा वाढली. समर्थांनी वेणास्वमींची भावावस्था जाणली. स्वामींच्या दर्शनाने त्यांचे डोळे पाझरू लागले. भावावेगानं हृदय धडधडू लागलं. त्यांच्या अंतरात्म्याने ग्वाही दिली की 'हेच तुझे सद्गुरू.' आज कित्येक युगे त्या ज्यांची वाट पहात होत्या ते स्वामी सद्गुरू रूपात त्यांच्यापुढे मूर्तिमंत उभे होते. रामदास स्वामींच्या चरणांना वंदन करत त्यांनी स्वामींना प्रार्थना केली, 'कन्येचा स्वीकार करा. भवपाशातून सोडवा.' रामदास स्वामींनी हात उभारून त्यांना आशीर्वाद दिला, ''चिरंजीवी भव''

त्या दिवसापासून त्यांना समर्थचरणांचा वेध लागला. त्या संसारात असून नसल्यासारख्याच झाल्या. त्यांच्या मुखातून अखंड गुरुस्तुती पाझरायची.

'सद्गुरू प्राप्तीचिया काजा । लहानथोरांची करी पूजा ।
अत्यादरे मानी द्विजा । गुरू मज माझा भेटावा ।।'

गुरुरायाच्या आगमनाची त्या अखंड वाट पहात राहायच्या. त्यांचे हे लक्षण सासरच्यांना आवडले नाही. शेवटी त्यांची रवानगी माहेरी कोल्हापुरात झाली. सुंदर, तरुण विधवा ब्रह्मचाऱ्याच्या नादी लागली म्हणून लोकोपवादाला त्यांना तोंड द्यावे लागले. परंतु वेणाबाईंनी न डगमगता समाजाला रोखठोक उत्तर दिले.

'कोणी वंदिती, कोणी निंदिती । वाट मी त्यांची पाहिन ।
हृदयी धरले गुरुचरण । प्राणांतीही विसंबेना ।।'

जननिंदेला कंटाळून घरच्यांनी त्यांना विष पाजले. परंतु त्याही अवस्थेत गुरूंचे स्मरण करत त्या शांत पडून होत्या. विष अंगात भिनताच अंगाचा दाह होऊ लागला. त्याही अवस्थेत अतीव दुःखातून त्यांच्या मुखातून शब्द उमटले -

''धावे सत्वरि गुरुराया । मरते वेणू ही वाया ।
अल्पही सेवा नच घडली । नरतनु नौका मम बुडली ।
उठले वादळ निंदेचे । कोणी न उरले मायेचे ।।

अचानक धीरगंभीर आवाजाने सर्वांच्या नजरा रोखल्या. ''जय जय रघुवीर समर्थ ।'' अशी ग्वाही देत समर्थ रामदास-स्वामींनी अंगणात पाऊल ठेवलं. समर्थांनी आपल्या निश्चेष्ट पडलेल्या शिष्येच्या देहाजवळ जाऊन त्यांच्या माथ्यावर आपला हात ठेवला. समर्थांच्या हस्तस्पर्शातून संक्रान्त होणारं संजीवक शक्तीचं स्पंदन आणि दृष्टीतून होणारं अमृतधारांच सिंचन यांनी त्यांच्या देहात नवचैतन्य आणलं. विष उतरताच वेणाबाई रामराम म्हणत उठून बसल्या. त्यांनी समर्थांचे पाय धरले. एवढ्या प्रकरणानंतर घरच्यांचा विरोध मावळला. मुलगी समर्थकृपेने वाचली. ती आता आपली राहिली नसून रामाची आहे हे त्यांना पटले. त्यांनी समर्थांबरोबर वेणाबाईंना मठात जाण्याची परवागनी दिली. त्या दिवसापासून त्यांच्या नवजीवनाला सुरुवात झाली.

मठात आगमन झाल्यावर रामदास शिष्या वेणाबाईंची मूर्ती दिवसामासानं घडवली जात होती. कीर्तनासाठी लागणाऱ्या उद्बोधक आख्यांनाचा अभ्यास, चित्तवेधक कथा, विविध विषयांचं चौफेर

वाचन, अनेक ओव्या-अभंगांचं पाठांतर अशा अनेक प्रकारच्या ज्ञानसाधनेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले जात होते. एक दिवस स्वामींनी त्यांना स्वरूपाचं ज्ञान देणारी सोपी व महत्त्वाची 'सोहम्' साधना दिली. हळूहळू साधना करता करता त्या स्वरूपसंप्रदायाच्या स्वामिनी झाल्या. ज्ञानभांडाराची गुरुकिल्ली स्वामीकृपेने हाती आली. रामदास-स्वामींनी त्यांना 'दासबोध' या सिद्ध ग्रंथाचं महत्त्व विशद केलं. जीवनात या ग्रंथाचे नीट वाचन, मनन व चिंतन हेच माझं भजनपूजन असा स्वामींनी त्यांना संदेश दिला. अशा तऱ्हेने त्या गुरूचरणी लीन झाल्या.

'सद्गुरू म्हणावे कल्पतरू। तरी हा कल्पनेतीत विचारू।
कल्पवृक्षाचा अंगिकारू। कोण करी?।
म्हणोनी सद्गुरू वर्णवेना। हे गे हे चि माझी वर्णना।
अन्तरस्थितीच्या खुणा। अन्तर्निष्ठ जाणती।।'

रामदास-स्वामींनी त्यांना आशीर्वाद दिला 'तुमचा जन्म सर्वसामान्यजनांना गुरुभक्तीचा मार्ग दाखवण्यासाठी झाला आहे. तुम्ही रामकथेचं गायन करा. ब्रम्हांडाला भेदून जाणारा रामरायाचा दिव्य महिमा वर्णन करून त्याचा भक्ति आशय लोकांच्या मनात रुजवा.' हे ऐकून त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांनी हात जोडले. अचानक त्यांच्या मुखातून काव्य पाझरू लागले.

त्रिविधतापहारक हे गुरुपाय। भवसिंधूसी तारक हे गुरुपाय।
स्वात्मसुखाचे बीज हे गुरुपाय। ज्ञानाचे निजगुज हे गुरुपाय।
सहजशांतीचे आगर हे गुरुपाय। पूर्णकृपेचे सागर हे गुरुपाय।

अशा या उत्कट गुरुभक्तीच्या बळावर त्यांनी समर्थांना आपलेसे केले. गुरुशिष्य नातेसंबंधात स्त्री-पुरुष हे देहभावाने वेगळे असले तरी बौद्धिक व मानसिक चैतन्याच्या दृष्टीने ते एकच आहेत हे समर्थांचे सांगणे होते.

''नाना पुरुषांचे जीव। नाना स्त्रियांचे जीव।
एकच परी देह स्वभाव। वेगळाले।'' (दासबोध १७.२.२०)

अशा तऱ्हेने रामदास-स्वामींसारखे अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे सद्गुरू वेणाबाईंना लाभले. गुरूकृपेने त्यांच्या आयुष्याचे सार्थक झाले. स्वामींनी त्यांना मिरजेच्या मठाच्या महंतपदाची कामगिरी सोपवली. अध्यात्माच्या ओढीने येणाऱ्या व संसारतापाने अनुताप झालेल्या जीवांना त्यांनी अनुग्रह देऊन त्यांच्या जीवनात आध्यात्मिक क्रांती घडवून आणली. वेणाबाईंनी अनेक अभंग, आरत्या व पदे यांची रचना केली. त्यांच्या स्फुट रचनांतून आध्यात्मिक ज्ञानाची व पारमार्थिक अधिकाराची कल्पना येते. त्यांच्या अंतरीचा आनंद दिव्य साक्षात्कारी शब्दांमधून निनादत असे. गुरूंनी त्यांना स्वत:ला पैलपार नेलं, ज्ञानोत्तर भक्तीने देहातलं चैतन्य जागृत केलं. आत्मसुखाच्या फुलवातीने जीवनाचा सारीपाट उजळून टाकला. तसंच हा अनुभव सर्वांना मिळावा म्हणून त्या नेहमी सांगत -

गुरुवाक्यप्रेम नौका। मायासागर तरलो देखा।
आम्ही स्वामींचे अंकित। रामनामे मुद्रांकित।।
अहं ब्रहम उपदेशिले। अहं गेले ब्रह्म ढेले।
आली अनुभवाची खूण। खूण केली रामार्पण।
वेणीस्वामी अवघा झाला। विज्ञानासी अंत आला।।

वेणास्वामींची कीर्तने ही अशीच रंगत. निरूपणात अद्वैत तत्त्वज्ञानाची कमलपुष्पे फुलवीत. सगुण साकारातून त्या निरुपणाच प्रकट चिंतन गाता गाता तत्कालीन होऊन म्हणत -

''बंद विमोचन राम। माझा बंद विमोचन राम
सकळही ऋषीमुनी भजती जयासी। एकचि तो सुखधाम।।१।।
सद्गुरूकृपा ओळखिला तो। कौसल्येचा राम।
भावभक्तीच्या सुलभसाधनी पुरवी सकळही काम।।२।।''

आणि आज अचानक त्यांचा जीवनपट त्यांच्या डोळ्यांपुढे तरळू लागला. मठाचं स्वामीपदाच्या जबाबदाऱ्या, समाजातून मिळणारे प्रेम, गुरूभगिनींचा प्रेमळ सहवास, पितृवत प्रेम करणारे रामदास-स्वामींसारखे अलौकिक सद्गुरू या सर्वांना सोडून त्यांना माहेरी रामरायाच्या घरी जावयाचे वेध लागले. जवळजवळ तीस वर्षे त्यांनी मठाची कामगिरी सांभाळली. आपल्या मनीचे भाव त्यांनी स्वामींना निवेदन केले. आपल्या प्रिय शिष्येला आशीर्वाद देताना क्षणभर स्वामींचे हृदय भरून आले. त्यांच्याकडे स्नेहार्द्र दृष्टीने पहात स्वामी म्हणाले, 'रामाई तुझे लळे अवश्य पुरवील.' आशीर्वाद मिळताच त्या पुन्हा पावन चरणांशी मोठ्या प्रेमभरात वाकल्या. डोळ्यांतून खळकन ओघळणारी आसवे मोठ्या मुश्किलीने टिपली.

थोड्याच वेळात वेणास्वामींच्या रोमरोमातून रामनामाचं स्पंदन होऊ लागलं. सीता-स्वयंवरात लिहिलेल्या शब्दांची त्यांना साक्षात् अनुभूती येऊ लागली. त्यांच्या मन:चक्षूपुढे रामरायाची व सद्गुरुंची पावन पादपद्मे दिसू लागली. त्यांचं तनमन मोहरून गेलं. सद्गुरूंच्या व रामरायांच्या पावन चरणांच्या दर्शनाने त्यांच्या मुखातून भैरवीचे सूर आळवले गेले.

'धन्य होणे सफळ जिणे, रामगुणे होते।
ध्यास पडे ज्यास, त्यास सत्य कळो येते।।'

रामनामाच्या गजरात त्या स्वामींच्या चरणावर विसावल्या. क्षणैक गुरूशिष्येची दृष्टिभेट घडली. शिष्येच्या मस्तकावर वरदहस्त ठेऊन सद्गुरुंनी सद्गदित कंठाने आशिर्वाद दिले -

''चिरंजीवी भव! चिरंजीवी भव!''

आणि दुसऱ्याच क्षणी त्या रामस्वरूपात विलीन झाल्या. पार्थिवाच्या पणतीत तेवणारी प्राणज्योत चिरंतन तेजात विलीन झाली. एक सामान्य बालविधवा परंतु कडकडीत वैराग्यानं, उदंड प्रयत्नानं आणि अखंड अभ्यासानं गुरूपदी विराजमान झाली. श्रींच्या कृपेने स्वरूपसंप्रदायाच्या स्वामिनी झाल्या.

सौ. वृषाली विनोद देशमुख
राधानगर को. ऑप. हौसिंग सोसायटी, १०१/बी-१,
अे-विंग, गावदेवी मंदिराजवळ, विशाल हॉटेलच्या मागे,
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)
फोन : ४२३८८३, मोबा. ९७६९४३१७२४



वेणास्वामींची रामभक्ती

श्रीमती नीला धुंडिराज अभ्यंकर

शिक्षण व व्यवसाय - बी.एस्सी. (फिजीओथेरपीस्ट), गृहिणी
रामायण, भागवत, दासबोध यावर प्रवचने करते. (भागवतसप्ताह करते)
साल १९९२ नागपूरला समर्थ सेवा मंडळाची सेक्रेटरी असताना सुमारे २०० जणांकडून दासबोध लिहून घेतला. एका दिवसात १ अशी ११३ पारायणे दासबोधाची ११३ भक्तांकडे केली.
दासबोध पारायण प्रती छापून विकल्या (६१८ पानी)

त्रिविधतापहारक हे गुरुपाय । भवसिंधूसी तारक हे गुरुपाय ।।
स्वात्मसुखाचे बीजहे गुरुपाय । ज्ञानाचे निजगुज हे गुरुपाय ।।
सहजशांतीचे आगर हे गुरुपाय । पूर्णकृपेचे सागर हे गुरुपाय ।।
रामदासांचे जीवन हे गुरुपाय । सकळ जीवांसी पावन हे गुरुपाय ।।

अशा या ज्ञानसंपन्न, सर्वगुणसंपन्न सद्गुरूंच्या पायावर डोके ठेवून ज्यांचे जीवन कृतार्थ झाले त्या वेणास्वामींसारख्या एका विरागी तपस्विनीची रामभक्ती आज आपण पाहणार आहोत. श्री समर्थांनी अनेक उत्तम भक्त भिक्षेतून मिळवले त्यापैकी वेणास्वामी एक होत. संत वेणाबाईंचा जन्म कोल्हापुरात सन १६२८ साली गोपाजीपंत व राधिकाबाई यांच्या पोटी झाला. एकनाथी भागवत व रामायण हे दोन ग्रंथ वेणूचे आवडते होते. जनरीतीप्रमाणे सन १६४० साली वेणूचे लग्न होऊन ती मिरजेच्या देशपांड्यांची सून झाली. दुर्दैवाने तिला लगेच वैधव्य आले. सांत्वन करायला कोणाशीच शब्द नव्हते. नियती तिचे जीवन स्वत: आखत होती, लिहीत होती. वेणू उदासीन व अंतर्मुख झाली. रामायण भागवताचे वाचन खूप वाढले. मनात खूप शंका येत होत्या. शंकांचे निरसन करणारी अधिकारी व्यक्ती तिच्या जीवनात येईना. त्यामुळे वेणूला सद्गुरूंची ओढ लागली.

सद्गुरूवीण जन्म निर्फळ। सद्गुरूवीण दु:ख सकळ। सद्गुरूवीण तळमळ । जाणार नाही ।।

१६४८ सालच्या श्रावणातील सकाळ वेणाबाईंच्या नवजीवनाची प्रभात ठरली. श्री सद्गुरू रामदास स्वामी तिच्या जीवनात आले व संपूर्ण जीवनाला कलाटणी मिळाली. तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे कोल्हापूरला कीर्तनानंतर अंबाबाईच्या देवळात दिली. चर्चा करता करता पहाट झाली. काकड आरतीनंतर वेणाबाई खुशीत घरी आली. ज्या काळात सामान्य स्त्रियांनी माजघराच्या दारात येऊन उभ राहण्याची सोय नव्हती. विधवेची सावलीही जेव्हा अपशकुनी व तिरस्करणीय ठरवली गेली होती. त्याकाळी वेणाबाईंसारख्या बालविधवेला निर्भयपणानं मठात नेणं, तिला आध्यात्मिक विद्या देऊन गुरुपदी बसवणं, मठाधिपती तिच्या सासरच्या गावी करणं या गोष्टी समर्थांच्या अद्भुत सामर्थ्याची प्रचीती देतात. रात्रभर वेणाबाई समर्थांच्या मठात राहिल्याने गावातील निंदक, कुचेष्टित तिच्या पाळतीवर होते. घरी परतल्यावर तिच्यावर सर्वांनीच तोंडसुख घेतले व शेवटी विष प्यायला दिले. रामाचे नाव घेऊन व रूप न्याहाळून वेणूने विषाचा पेला तोंडाला लावला. परावाणीतून रामाला केलेली प्रार्थना रामाने ऐकली व श्रीसमर्थांना तिच्याकडे पाठवले. वेणाबाईंचा पुनर्जन्म झाला. तिचा रामावरचा सद्गुरूंवरचा विश्वास दृढ झाला. वेणूला समर्थ चाफळला घेऊन गेले. वेणाबाईंच्या जीवनाचे नवे पर्व सुरू झाले. वेणूची वेणास्वामी झाल्या. साधकाचे जीवनाला सुरुवात झाली.

देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जिवलगांच्या तुटी। सर्वही अर्पावे शेवटी प्राण तोही वेचावा ।

त्याप्रमाणे सर्वसंगपरित्याग करून वेणास्वामींने सर्व जीवन रामाच्या सेवेत घालविले. वेणास्वामी जशा साक्षात्कारी होत्या तशा त्या प्रासादिक ग्रंथकारही होत्या. त्या चाफळच्या रामासमोर कागद, लेखणी घेऊन बसू लागल्या. त्यांच्यातील प्रतिभाशक्ती जागृत झाली. अनेक अभंग, स्फुटकाव्ये त्यांनी लिहिली. ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान या सर्वांच्या सीमारेषा त्यांनी ओलांडल्या. सीतास्वयंवर व रामायण या ग्रंथांची रचना त्यांनी केली. सीतास्वयंवर त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. एक स्त्री वरमाला घेऊन बोहोल्यावर उभी असताना स्त्रीच्या मनातले भाव स्त्रीच उत्तमपणे लिहू शकते हे सीतास्वयंवर वाचताना जाणवते. वेणास्वामींचे कुलदैवत, इष्टदैवत 'श्रीराम' तेच त्यांचे सर्वस्व. त्याला वंदन करताना त्या म्हणतात - राम गुणाचा सागरु । राम सुखाचा सुरतरु ।

राम भक्ताचे माहेरु । राम विसावा जनाचा ।
राम मनाचे मोहन । राम जिवाचे जीवन ।
राम सदा समाधान । ज्ञानियांचे ।
राम पुजावा विलासी । राम घ्यावा अहर्णेसी ।
रामा वेगळे मनासी । काही नावडे

वेणास्वामींचे हिंदी, मराठी, उर्दू भाषेवर प्रभुत्व होते. संस्कृत भाषाही त्यांना अवगत होती. वाल्मिकी रामायणाचा अभ्यास करून रामायण सीतास्वयंवर त्यांनी लिहिले. गौतमांच्या शापामुळे अहिल्या शिलावत् झाली होती. तिचा उद्धार रामाने केला. तसाच वेणास्वामींचा

उद्धार श्रीसमर्थांनी केला. तिला नवजीवन दिले. त्या लिहितात -

परेरेणुने आजि धन्य मी । म्हणोनी अहिल्या नभी ।

पदजळचे तव जगअधभंगा । नामे गंगा गौतमी ।

जडशील मी मग तू करुणाशील । करी पद त्याज्ञ ही गौतमी ।।

१४ वर्षांच्या वनवासात रामाने कोणाच्याही हातची फळे खाल्ली नाहीत. अपवाद शबरीचा होता. राम शबरीचे मंदिर शोधत शोधत गेले व तिने दिलेली उष्टी बोरे त्यांनी खाल्ली. रामप्रभू फक्त भाव व प्रेम बघतात. त्या अभंगात लिहितात -

ज्याकोबाच्या फीर च्यलावे । सो मंदिर पाऊं चलावे ।।

शबरीको भागा ।

भिलटीके बेरे झुटे सुके । रुचिर मुख सुहावे ।।

वेणास्वामींची कठोर साधना, रामभक्ती, त्यांचे त्यागमय जीवन, त्यांचा अभ्यास पाहून समर्थांनी त्यांना अनुग्रह द्यायची परवानगी दिली. समर्थांनी त्यांना उपदेश केला -

रघुनाथ स्मरोनी कार्य करावे । ते तत्काळचि सिद्धी पावे ।

कर्ता राम हे असावे । अभ्यांतरी ।।

मी कर्ता ऐसे म्हणसी । त्याने तू कष्टी होसी ।

रामकर्ता म्हणता पावसी । येश किर्ती प्रताप ।।

ही शिकवण मनात रुजवून वेणास्वामींनी अभंग लिहिला व आपल्या सर्वांना सुंदर उपदेश केला. कोणतेही लहानमोठे काम झाल्यावर ते माझ्यामुळे झाले, मी केले म्हणणे चुकीचे आहे. 'मी हे माध्यम असून कर्ता राम' आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे.

सेवकांचा साभिमानी । राम कोदंडपाणी ।

आवडी लागली माझे चित्ता रे ।

राम भक्तांचा वाड वाढविता रे ।।धृ ।।

हनुमंते द्रोणागिरी । आणिला क्षणांतरी

हे काय होईल त्याची सत्ता रे ।।२ ।।

जळी पाषाण तरणे । हे नव्हे नळाचे करणे ।

राम भक्तांसी भूषण देता रे ।।३ ।।

वेणीची प्रचीत मनी । सदेहे वर्तती जनी ।

जनी राम उपासक होता रे ।।४ ।।

चाफळच्या रामाजवळ शेजारतीनंतर वेणास्वामी रामाला आर्ततेने म्हणत असतील -

नमो रामराया । नमो रामराया । येऊ दे सदया । करुणा माझी ।।१ ।।

अखंडित मन । जडो तुझ पायी । देसी तरी देई । वर हाचि ।।२ ।।

तुजवीण क्षण । न जावा सर्वथा । हेचि गा समर्था । मागतेसि ।।३ ।।

हीनदीन वेणी । चरणी शरण । होवोनी अनन्या मागतसे ।।४ ।।

नाशिकच्या रामासमोर जशी कळकळीने समर्थांनी करुणाष्टके म्हटली अचपळ मन माझे नावरे आवरीता । तुजवीण शिण होतो धावरे धाव आता । तशाप्रकारे वेणास्वामी आपल्या अभंगात लिहितात -

रामा वियोग न साहे तुझा ।।धृ ।।

मन उदासीन न समाधान । जिवाच्या जीवना ये ।।१।।

दिन लोटेना रजनी कंठेना । तुजवीण करू काये ।।२ ।।

नयनी तीर वाहे । अवस्था दाटताहे । वेणी हृदय उलो पाहे ।।३ ।।

दुसऱ्या अभंगात त्या म्हणतात-

येई येई रघुराया । का मज उपेक्षिले सखया

सगुण रूप मजदाऊनिया । त्रिविध ताप दूर करूनिया ।।ध्रु ।।

आता का निष्ठुर झालासी । बहु अपराधी मी दासी ।

श्रमलासी तू । परिया समई येऊनिया ।

सगुण रुपे भज भेटाया ।।१ ।।

भगवंताचे दर्शन होत नाही त्यामुळे त्या खूप दु:खी होतात. रामाला आळवतात व प्रेमाने त्याला बोलावतात. अत्यंत करुणरसाने भरलेले हे अभंग आहेत. पुढे त्या म्हणतात माझी बुद्धी होत आहे, भाव कुभाव आहे. पण रामा मी तुझी आहे हे समजून तू ये -

तुझी तुझी तुझी तुझी । पावना राया ।।धृ ।।

सुष्ट व दुष्ट कनिष्ठ जरी । तरी ।।१ ।।

भावी अभावी कुभावी जरी । तरी ।।२ ।।

हीण बुद्धी अपराधी वेणी म्हणे । तुझी ।।३ ।।

भगवंत भावाचा भुकेला इतक्या प्रेमाने, आर्ततेने बोलविल्यावर तो येणार नाही का? सन १६५७ सालची गोष्ट. चाफळच्या रामनवमीच्या उत्सवाची तयारी करायचे काम वेणास्वामींवर आले. भिक्षेसाठी आक्कास्वामी बाहेरगावी गेल्या. इकडे वेणास्वामी खूप आजारी पडल्या. ताप काही जाईना. अशक्त, रोगी शरीराने उत्सवाची तयारी कशी करणार? कशाबशा चालतपडत त्या रामासमोर आल्या. धड उभेही राहता येईना. म्हणून रामा समोरच्या खांबाला त्यांनी लुगड्याने स्वत:ला बांधून घेतले. अशा अगतिक अवस्थेतले 'आक्का गावा गेली' हे पद असून ही अवस्था व नवमीसमारंभ पाहण्याची तळमळ त्यांच्या प्रत्येक शब्दातून उमटली आहे.

पतितपावना जानकीजीवन । अरविंदनयना रामराया ।।ध्रु ।।

आक्का गावा गेली मजवेथा जाली ।

दयाळा राहिली नवमी तुझी ।।१ ।।

नवमी समारंभ पाहु द्या बरवा ।

मग देह राघवा जावो राहो ।।२ ।।

आक्का गावा जाता तूच निरविले समर्था ।

ते भाक रघुनाथा साच करी ।।३ ।।

सोसवेना वेथा ऐके सीताकांता ।

वेणीचे आकांता पाव वेगी ।।४ ।।

ऐकुनी करुणा अयोध्येचा राणा ।

मूर्तीच्या नयना अश्रु आले ।।५ ।।

ऐकुनी वचना जानकी जीवन ।

कृपेचा पावन वेळीस दिल्हा ।।६ ।।

रामाराया दयाळा समर्था - वेणास्वामींनी टाहो फोडला. रामाच्या डोळ्याला धारा लागल्या. रामाने वेणास्वामींना दर्शन दिले. देव भक्ताला संकटकाळी मदत करतो या कथा नित्य वाचतो. पण भक्तासाठी राम

रडला ही जगावेगळी गोष्ट आहे. धन्य तो भक्त व धन्य त्याची भक्ती! पुढे रामाने रामाईच्या रूपात येऊन वेणास्वामींना कामात मदतही केली. जशी पैठणला श्रीखंड्याने १२ वर्षेएकनाथांना मदत केली होती.

ज्या काळात विधवा स्त्रिया गोठ्यातल्या गायींसारखे जीवन जगत होत्या. त्या काळात श्रीसमर्थांनी सभेमध्ये उभं राहून कीर्तन करण्याचा अधिकार त्यांना दिला. सन १६५५ साली मिरजेच्या मठाचे मठाधिपती समर्थांनी वेणास्वामींना केले होते. त्या लिहितात -

आम्ही स्वामींचे अंकित । रामनामे मुद्रांकित ।।धृ ।।
गुरुवाक्य प्रेमनौका । मायासागर तरलो देखा ।।१ ।।
अहंब्रह्म उपदेशिले । हं गेले ब्रह्म ठेले ।।२ ।।
आली अनुभवाची खूण । खूण केली रामार्पण ।।३ ।।
वेणीस्वामी अवघा जाला । विज्ञानासी अंत आला ।।४ ।।

वेणास्वामींचे रामावरचे अभंग अत्यंत रसाळ आहेत. त्यात गेयता आहे. त्यांच्या अभंगातून रामावरचे उत्कट प्रेम, भक्ती दिसून येते. रामा माझे मन सतत तुझ्या पायी जडू दे. सतत माझ्या मुखी तुझे नाम येऊ दे.

नमो रामराया । नमो रामराया । येऊ दे सदया । करुणा माझी ।।१।।
अखंडीत मन । जडो तुज पायी । देसी तरी देई । वर हाचि ।।२ ।।
तुजवीण क्षण । न जावा सर्वथा । हेचि गा समर्था । मागतेसी ।।३ ।।
हीन दीन वेणी । चरणी शरण । होवोनी अनन्य । मागतसे ।।४ ।।

वेणास्वामी म्हणतात, रामा तुझ्यासारखा दाता या जगात दुसरा नाही. एकदा तुला शरण गेल्यावर तू सर्वांना भरभरून देतोस. काही कमी पडू देत नाहीस.

अमोघ दाता शरण जाता काय उणे । राया राघवाचे देणे ।
मागत्याची हाव किती मागण्याची । नुरवीच दुजे पणे ।।धृ ।।
सर्व वोझे वाहे भक्तसाभिमानी । नव्हे अन्यथा वचनी ।
पडो काळवेळ तरी पालटेना । याचे लागता भजनी ।
जिवाहनी पाळी राम सेवकांसी । काय उणे वैभवासी ।
सर्वा सुखा मुकू।

या अभंगात वेणस्वामींनी लिहिल्याप्रमाणे रामाने त्यांचा सर्वातोपरी सांभाळ केला. वेणास्वामींचे द्वैत मावळले. त्यांचे अभंग सर्वतोमुखी होऊ लागले.

वेणास्वामींनी लिहिलेली रामाची शेजारती आजही सज्जनगडावर म्हटली जाते.

स्वामी चला हो निजमंदिरा । सुखशेजेसी रघुवीरा ।
सकलासी तांबुल । सकला पुष्पमाळा । भक्तांचा सोहळा पुरवितसे ।।
भक्तजन पालक । ब्रह्मांडनायक । जय रघुकुल टिळक । स्तविताती ।।
जालिया वाढ रात्री । अहो जी रघुपती । मार्ग ते सोद्विती बंदिजन ।।
उठियले जगज्जीवन । सिंव्हासनावरुन । वेणाबाई लिंबलोण उतरीतसे ।।

सन १६७८ साल उजाडले व वेणास्वामींना माहेरी जायची ओढ लागली.

मिरजेच्या मठातील समर्थ स्थापित मारोतीचे रामपंचायतनाचे साश्रु नयनाने वेणास्वामींनी निरोप घेतला व त्या समर्थांबरोबर सर्व शिष्यांसह सज्जनगडावर आल्या. मला माहेरी पाठवा म्हणून समर्थांच्या मागे लागल्या. इतर शिष्यांना 'माहेर' या शब्दाचा अर्थच कळला नाही. त्यांचे निवृत्ती हे माहेर तर प्रवृत्ती हे सासर होते. रामाकडे जायची त्यांना घाई झाली होती. 'चैत्र वद्य चतुर्दशीला' समर्थांनी वेणास्वामींना माहेरी जायची परवानगी दिली. सकाळपासून त्या आनंदात होत्या. स्वत:च्या हाताने पुरणावरणाचा स्वयंपाक करून रामाला सद्गुरूंना नैवेद्य दाखविला. दुपारी ४ वाजता वेणास्वामी कीर्तनाला उभ्या राहिल्या. स्वत: समर्थ सर्व शिष्यांसह कीर्तनाला बसले. वेणास्वामींची कीर्तनं नेहमीच रंगत असत. पण आजच्या कीर्तनाचा रंग अलौकिक होता. सगुण साकाराचं स्तवन, गुणकीर्तन आणि त्यातून प्रकट झालं आत्मनिवेदन. रामस्वरूपी लीन होण्यास उत्सुक असलेल्या वेणास्वामी आपल्या अमृतस्वराने श्रोत्यांच्या हृदयवीणेच्या तारा छेडीत, त्यांच्या मानससरोवरी भक्तिप्रेमाची कमलपुष्प फुलवीत गाऊ लागल्या -

बंदविमोचन राम । माझा बंदविमोचन राम ।।धृ ।।
सकळही ऋषीमुनी भजती जयासी । एकचि तो सुखधाम ।।१ ।।
सद्गुरुकृपया ओळखिला जो । कौसल्योचा राम ।।२ ।।
भावभक्तीच्या सुलभसाधनी । पुरवी सकळही काम ।।३ ।।
शरण ही वेणा आत्मारामा । पावली पूर्णविराम ।।४ ।।

रामनामाच्या गजराने आसमंत दुमदुमून गेला. गडावरच्या शिळेशिळेतून, कड्या कपारीतून अणुरेणुतून एकच जयघोष उमटू लागला - जयजय राम राम राम। सीताराम राम राम। त्यांनी सीतास्वयंवरात लिहिलेल्या शब्दांची साक्षात् अनुभूती येऊ लागली.

सुंदरा तू स्वानंदघना । रामा राजीवलोचना ।
मना आत बाहेरी । पाहणे दाटले बहुपरी ।
तुझिये कृपेने निवारी । पाऊले दाखवी सुंदर ।।

गाता गाता वेणास्वामींना पाऊले दिसू लागली. रामाची की सद्गुरुंची? की दोघांचीही. द्वैत संपलं अद्वैत उरलं. भैरवी गाऊ लागल्या -

धन्य होणे सकळ जिणे रामगुणे होते। ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळो येते. आरती सुरू झाली. मायेवीण माहेर विश्रांती ठाव। शब्दी अर्थलाभ बोलणी वाव।। सद्गुरू प्रसादे सुलभ उपाव। रामी रामदासा फळला सद्भाव। रामाचा सद्गुरुंचा जयजयकार करून वेणास्वामींनी समर्थांच्या पायावर डोके ठेवले. दुसऱ्याक्षणी त्या रामस्वरूपी लीन झाल्या. खऱ्या माहेरी गेल्या. रामात विलीन झाल्या.

एक सामान्य बालविधवा, कडकडीत वैराग्यानं, अखंड अभ्यासानं, उदंड प्रयत्नानं, रामाला व समर्थांना आपलं जीवन समर्पित करून रामाच्या कृपेने आपल्या स्वरूपसंप्रदायाच्या स्वामिनी झाल्या. जीवन कृतार्थ झालं. अशा या रामभक्त तपस्विनीला मी साष्टांग नमस्कार करते. ।। जय जय रघुवीर समर्थ ।।

श्रीमती नीला धुंडिराज अभ्यंकर
पत्ता - बी-१/२०३ कुमार परिसर, गांधीभवन जवळ,
कोथरूड, पुणे ३८
फोन - ०२०-२५३०५२०३, मोबा. - ९८९०७०७७५८



वेणास्वामींची गुरुभक्ती

सौ. पुष्पा विश्वनाथ प्रभुणे

एस.एस.सी. – गृहिणी

पत्राद्वारा दासबोध अभ्यास व समीक्षक म्हणून काम, सखोल दासबोध अभ्यास पूर्ण, गीताधर्म मंडळाच्या संत वाङ्मय अभ्यासक्रमाच्या परीक्षा पूर्ण.

अखण्डं मण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः ।।

असे हे सद्गुरूचे वर्णन साऱ्या चराचरात व्यापून 'असलेले सद्गुरुतत्त्व'. जीवनातील अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखवणारे सद्गुरू. नुसता ज्ञानाचा प्रकाश दाखवीत नाहीत तर तो प्रकाश आपल्या शिष्याच्या हृदयात पूर्णपणे भरून टाकतात.

शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णेसुवर्णकरिता नये ।
म्हणौनि उपमा न साहे । सद्गुरुसी परिसाची ।।१ ।४ ।१६

परिसाच्या स्पर्शामुळे लोखंडाचे सोने होऊ शकते. नुसते सुवर्ण जर लोखंडाला लावले तर त्याचे सुवर्ण होऊ शकत नाही. सद्गुरूचे मात्र तसे नसते ते आपल्या शिष्याला स्वतःच्या वागण्या-बोलण्यातून, आपल्या आचरणातून, शिकवणुकीतून, आपल्या इतकेच अधिकार संपन्न करीत असतात.

आपणासारिखे करीती तत्काळ । नाही काळवेळ तया लागी ।।

कल्पनातीत, अनंत परमात्मस्वरूप म्हणजे सद्गुरू होय. आपल्या सर्वच संतांनी सद्गुरूचा गौरव अगदी यथार्थपणे केला आहे. दासबोधातील सद्गुरू स्तवन समासात समर्थ म्हणतात, सद्गुरूला कशाचीही उपमा देता येत नाही. कारण कुठलीही उपमा दिली तरी सारी सृष्टी नाशिवंत आहे. म्हणून शेवटची ओवी समर्थ सांगतात.

म्हणौनि सद्गुरू वर्णवेना । हे गे हे चि माझी वर्णना ।
अंतरस्थितीच्या खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।।१ ।४ ।३१

वर्णन करता येत नाही, हेच त्याचे वर्णन आहे.

सद्गुरू स्वरूपाचा अनुभव ही आतील अवस्था आहे. स्वतः अंतर्यामी झालेल्या साधकालाच या खुणा कळतात. म्हणून सद्गुरूचे वर्णन फक्त अंतर्निष्ठानाच कळेल. अशा सद्गुरू स्वरूपात विलीन झालेल्या श्री समर्थांच्या एकनिष्ठ शिष्या 'वेणास्वामी'! वेणास्वामींचे चरित्र आपण जेव्हा वाचतो, ऐकतो तेव्हा त्यांची सद्गुरुवरची अनन्य भक्ती आपल्याला अनेक प्रसंगात जाणवते. त्यांची गुरुनिष्ठा अत्यंत उच्च प्रतीची होती. त्यांच्या जीवनात सद्गुरूला अनन्यसाधारण स्थान होते. एवढेच नव्हे तर त्यांचे सारे जीवनच सद्गुरू स्वरूपात व्यापून राहिले होते. सद्गुरू हाच त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव होता.

पती निधनानंतर आठ वर्षांनी त्यांची सद्गुरूंशी भेट झाली. चारशे वर्षांपूर्वीचा काळ आणि त्यात वेणाबाईंच्या पदरी आलेले वैधव्य. त्यात कुठेतरी समाधान शोधण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या. त्यांना आयुष्यात समाधान मिळण्यासाठी, दुःख हलके होण्यासाठी त्यांनी भागवत, रामायण या ग्रंथाचा आधार घेतला होता. त्या ग्रंथाच्या वाचनाने, अभ्यासाने, वेणाबाई बऱ्याच अंतर्मुख झाल्या होत्या. पण मनातील बरेच प्रश्न तसेच राहत. त्यांना वाटे कुणीतरी आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे देणारा मार्गदर्शक सत्पुरुष आपल्याला भेटावा. आपल्याला सद्गुरू लाभावा, त्यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभावे. इच्छा तेथे मार्ग म्हणतात, त्याप्रमाणे त्यांची इच्छा पूर्ण झाली. त्यांना त्यांच्या जीवनात सद्गुरू मिळाला. एकदा त्या एकनाथांचे भागवत वाचीत तुळशीवृंदावनाजवळ बसल्या होत्या आणि त्यांच्या कानी आवाज आला, ''जय जय रघुवीर समर्थ''. त्यांनी त्या महापुरुषाकडे बघितले. त्यांचे ते भव्यरूप, तेजस्वी डोळे, कणखरपणा पाहून त्या दिपून गेल्या. त्या घरात गेल्या आणि मूठभर भिक्षा घेऊन आल्या. ती मूठभर भिक्षा त्यांनी समर्थांच्या झोळीत घातली आणि त्यांची जणू जन्मजन्मीची तपश्चर्या फळाला आली. मनातील प्रश्नांचे घोंघावणारे वादळ समर्थांच्याकडून मिळणाऱ्या उत्तराने जणू शांत होत होते. पुढे त्या समर्थांच्या कीर्तनाला जाऊ लागल्या. समर्थांच्यावरील त्यांची निष्ठा, भक्ती वाढत गेली आणि एक दिवस त्यांना मंत्रदीक्षा मिळाली.

समर्थांनी त्यांना रामनामाचा त्रयोदशाक्षरी मंत्र दिला, ''श्रीराम जयराम जयजयराम'' आणि सांगितले, भगवद् भजन वाढवावे. तुमची उपासना हीच आमची गुरुदक्षिणा.

गुरुमंत्र घेतल्यावर वेणास्वामी गुरुवचनावर भाव ठेवून भगवद्भक्तीत रंगू लागल्या.

समर्थांचा सत्संग आणि त्यांच्या विचारांचे श्रवण यातून त्यांचा गुरुवचनावर विश्वास दृढ होऊ लागला. श्रद्धा घट्ट झाली आणि संपूर्ण शरणागतीचा भाव जागृत झाला. वेणाबाईला आता फक्त एक सद्गुरूचा आधार मिळाला.

सत्शिष्याच्या अंगी असणारी पुढील लक्षणे वेणाबाईंच्या ठिकाणी होती. निर्मळपणा, आचारशील विरक्त, अनुतापी, शुचिष्मंत, परमदक्ष, अलक्ष, निर्मत्सरी, जगमित्र.

या लक्षणांनी परिपूर्ण अशा वेणाबाई शीलवान होत्या. विरक्त होत्या. पण समाजात वावरत असताना लोकापवादाला त्यांनाही समोरे जावे लागले. प्रत्यक्ष जन्मदात्यांनी त्यांना विषाचा प्याला दिला. पण सद्‌गुरुकृपेने त्यांना विषाची बाधा झाली नाही. त्या घटनेनंतर समर्थांनी वेणाबाईंना भिक्षेत मागून घेतले व चाफळच्या मठात ठेवून घेतले. चाफळच्या मठात वेणाबाई आल्या आणि आपल्या गुरुभक्तीत रममाण झाल्या. गुरू उपदेशानुसार त्यांची पूजा-अर्चा सुरू झाली. त्यांचा एकनाथी भागवताचा, रामायणाचा अभ्यास होताच, त्या भगवंतावर सुंदर पदे रचू लागल्या, समर्थांचे अभंग गाऊ लागल्या आणि यातूनच पुढे कीर्तन कला त्या शिकल्या. गुरू आज्ञा म्हणून गुरुचरणाचे स्मरण करून त्या काळात त्या उत्कृष्ट कीर्तन करू लागल्या. त्यांचे 'बंध विमोचन राम' हे पद भावस्पर्शी असे आज सर्वत्र म्हटले जाते.

पहाटे उठणे, थंड पाण्याने स्नान, काकड आरती मंदिर आणि मंदिराचा सारा परिसर त्या स्वच्छ ठेवीत. देवाची उपकरणे घासून पुसून स्वच्छ करणे, जप करणे आणि त्यानंतर पाकसिद्धी आणि रामाला नैवेद्य.

कुठलेही काम त्यांना कमीपणाचे वाटत नसे. अहंकाराला त्यांच्याजवळ थाराच नव्हता.

गुरू तो चि देव । ऐसा ठेवी भाव ।
सद्‌गुरू गौरव, काय वानू ? ।।

या वचनानुसार त्यांच्या प्रत्येक कार्यातून जणु गुरुगौरव स्रवत होता. त्यांची स्मरणशक्ती खूप चांगली होती. त्यामुळे कुठलीही गोष्ट त्या विसरत नसत.

एकदा चाफळला रामनवमी उत्सवाची जबाबदारी श्री समर्थांनी त्यांच्यावर सोपवली. त्यांच्यावरील जबाबदारी त्या उत्तमरीतीने पार पाडतील ही समर्थांना खात्री होती. त्यावेळी रामरायाने त्यांची जणू सत्त्वपरीक्षा पाहिली. त्यांना खूप ताप आला. आता कसे होणार? पण सद्‌गुरूवर भक्ती आणि रामरायावर श्रद्धा यामुळे त्यांच्याकडून उत्सव व्यवस्थित पार पडला.

समर्थ सांप्रदायात वेणाबाईंचे आगमन झाले. त्यात त्या एकरूप झाल्या. त्यांच्या अंगी असलेल्या सत्त्वगुण, सद्‌भाव आणि सद्‌विद्या या तिन्ही गुणामुळे त्या वेणाबाईंच्या वेणास्वामी झाल्या. त्यांना सद्‌गुरुकृपेमुळे जगताचे मिथ्यात्व पटले आणि ईश्वरचरणाची त्यांना प्राप्ती झाली.

मिरजेला समर्थांनी त्यांना मठ बांधून दिला आणि स्वत: वापरीत असलेल्या आपल्या पायातील खडावा (पादुका) त्यांना नित्यपूजेसाठी दिल्या. त्या वेणास्वामीला मिळालेल्या पादुका मिरजेच्या मठात नित्य पूजन केल्या जातात.

समर्थ विचारांचा प्रचार जेव्हा दासनवमीच्या अगोदर गावा गावातून केला जातो. तेव्हा त्याच पादुका दौऱ्यात बरोबर असतात. घराघरातून अनेक मंदिरांतून या पादुकांचे पूजन होत असते. त्या पादुका जेव्हा घरात येतात तेव्हा जणू प्रत्यक्ष श्री समर्थ घरी आल्याचा आनंद होतो. भक्तियुक्त अंत:करणाने पूजन केले जाते. आनंदाश्रूंचा वर अभिषेक होत असतो. अष्टभाव जागृत होतात, मुखातून जयघोष होत असतो, सारे वातावरण प्रसन्न असते आणि एकच ध्वनी निनादत असतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सद्‌गुरुचरणावर कशी भक्ती असावी, कशी निष्ठा असावी हे वेणास्वामींच्या चरित्रातून आपल्याला शिकायला मिळते.

वेणास्वामींच्या वृंदावनातून चाफ्याचे झाड उगवले. पुढे समर्थांनी समाधी घेतली तेव्हा त्या चाफ्यांच्या फुलांचा अभिषेक समर्थ समाधीवर होत होता.

चाफ्याचे फूल समर्थांना आवडत असे. त्या चाफ्याचा दरवळणारा सुवास साऱ्या सज्जनगडावरील परिसरात दरवळत होता. त्या सुगंधात पसरत होता गुरुभक्तीचा संदेश. असा हा अलौकिक गुरू आणि त्यांचा हा एकनिष्ठ अलौकिक शिष्य.

समर्थकृपेने त्या गुरुभक्तीचा एक अंश तरी आपल्याला मिळावा. आपल्या हातूनही थोर अशी गुरुभक्ती घडावी. हेच मागणे श्री समर्थ चरणी मागू या. ।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. पुष्पा विश्वनाथ प्रभुणे
बी-२ बिल्डिंग फ्लॅट नं. ८०२, रुणवाल इस्टेट,
घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (पश्चिम) ४००६०७
फोन - ०२२-२५८९९०९६, मोबाईल - ९८२०१०४६६५



श्रीसमर्थशिष्या वेणाबाईंच्या कविता

ज्योती चिटगोपेकर

एमएस्सी., डी.एम.एल.टी., गृहिणी
अध्यक्ष श्रीसमर्थ रामदास स्वामी चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद, प.दा.अ. च्या उपकेंद्र संचालिका, सखोल दासबोध अभ्यासाच्या समीक्षक, समर्थ विद्यापीठाचा शिवसमर्थ पुरस्कार, एकूण १० ते १२ पुरस्कारांनी सन्मानित.

श्रीसमर्थ रामदासस्वामींसारखे महामानव या भूतलावर जन्म घेतात ते केवळ लोकोद्धारासाठीच! त्यांनी जन्मभर आपला देह, आपली वाणी व लेखणी जनोद्धार, धर्मसंस्थापना आणि सदाचारसंपन्न समाजनिर्मितीसाठी झिजविली. त्यांच्या क्रांतिकारक कार्याला अनेक पैलू असून त्यात स्त्रियांचा उद्धार हा एक महत्त्वाचा पैलू आहे. परमार्थाच्या प्रांतात त्यांना स्त्री-पुरुष भेद मान्य नव्हता. ग्रंथराज दासबोधात ते म्हणतात - **पुरुषांचे जीव । स्त्रियांची जीवी ।**

ऐसी नाही उठाठेवी ।। १६-८-२५

स्त्रीमुक्ती कार्यात स्त्रियांना परमार्थात प्रतिष्ठा मिळवून देण्याचे नेत्रदीपक कार्य त्यांनी केले. श्रीसमर्थ शिष्यांची मांदियाळी खूप मोठी होती. पुरुष शिष्यात जे कल्याणाचे स्थान होते, तसेच त्यांच्या शिष्यीणीत वेणाबाईंचा अधिकार होता. त्या उच्च कोटीच्या साधिका होत्या. तीक्ष्ण बुद्धीच्या व हुशार होत्या; सात्विक वृत्तीच्या सद्गुणी व लाघवी स्वभावाच्या होत्या. एक आदर्श सत्शिष्य या नात्याने त्यांच्यात अनेक गुणांचा समुच्चय होता. त्यांची गुरुनिष्ठा खरोखर वाखाणण्याजोगी होती. अभ्यासू, व्यासंगी असल्याने धर्मचर्चेत त्या जिज्ञासू, मुमुक्षु व्यक्तीचे योग्य शंकासमाधान करीत. अशा या वेणाबाईंवर श्रीसमर्थांची विशेष मर्जी असल्यास नवल ते काय?

समर्थकृपेने त्यांनी परमार्थात खूप उंची गाठली. साधक अवस्थेतून सिद्धावस्थेपर्यंत पोचल्या. ''गुरुकृपा काय नोहे?'' यानुसार सायुज्यमुक्ती मिळवून आत्मसाक्षात्कारी झाल्या आणि श्रीसमर्थ संप्रदायात अजरामर स्थान प्राप्त केले. सूक्ष्मात विहार करणारी तरल बुद्धी त्यांच्या ठायी असल्याने शारदादेवी प्रसन्न होती. त्या लहान वयापासूनच कविता करीत. त्यांच्या कवितेचा मागोवा घेण्याआधी थोडक्यात त्यांच्या अलौकिक चरित्राचा आढावा घेणे सयुक्तिक ठरेल. त्यावरून त्यांच्या पारमार्थिक प्रगतीचे टप्पे लक्षात येतील.

१) श्रीसमर्थांची भेट :

कोल्हापूरच्या गोपाजीपंत देशपांडे यांची मुलगी वेणा बालपणापासूनच शांत व अंतर्मुख वृत्तीची होती. आईवडिलांनी तिला लिहिण्यावाचण्यास शिकविले होते. खेळण्याबागडण्याच्या वयात ती पोथ्यापुस्तके वाचीत बसे. त्या काळच्या रीतिरिवाजाप्रमाणे वयाच्या ८ व्या वर्षीच मंगळसूत्र गळ्यात पडले. मिरजेच्या देशपांड्यांची ती सून झाली. वैवाहिक सुख काय हे कळायच्या आतच अजाणत्या वयात दुर्दैवाने वेणाबाईवर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. लग्नानंतर काही दिवसातच मंगळसूत्र सुटले व त्या विरक्त झाल्या. पण ईश्वरसूत्र निराळेच होते. त्यांच्या आयुष्याचे खऱ्या अर्थाने मंगल व्हावयाचे होते. वैवाहिक जीवनाचे रोप रुजण्यापूर्वीच उपटले गेले. प्रपंचाच्या पाशात आवळल्या जाण्यापूर्वीच तो पाश तुटून गेला. श्रीसमर्थांनी दासबोधात सांगितल्यानुसार -

जो संसार दु:खे दुखवला । त्रिविधतापे पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थासी ।।

यानुसार परमार्थाचा अधिकार त्यांना बालवयातच प्राप्त झाला असे म्हणावयास हरकत नाही. त्याकाळी विधवा स्त्रियांची स्थिती गोठ्यात बांधलेल्या मुक्या जनावरासारखी होती. स्त्रियांचे चूल आणि मूल एवढेच बंदिस्त क्षेत्र होते. शिक्षणापासून वंचित म्हणून जीवनात ज्ञानाचा प्रकाश नाही. विधवा स्त्रियांचे हाल तर भयानक होते. आयुष्य सारे काबाडकष्ट व दुसऱ्यांच्या खस्ता खाण्यात जायचे. उपेक्षा, घृणा वाट्यास येऊन आयुष्याचे जणू पोतेरे व्हावयाचे.

वेणाबाईंना योग्य वेळी व योग्य काळी श्रीसमर्थ सद्गुरु भेटले नसते तर त्यांचेही आयुष्य अंधकारमय व उपेक्षित झाले असते. परंतु लवकरच अक्षय आनंदाची वाट दाखविणारा समर्थ सद्गुरु लाभला व आयुष्याच्या पोतेऱ्याचे रूपांतर परमार्थरूपी सुवर्णधाग्यांनी विणलेल्या भरजरी वस्त्रात झाले. सद्गुरुकृपा व भक्तीचा परिसस्पर्श होताच सारे जीवनच पालटून सुवर्णासारखे लखलखायमान झाले. परंतु ज्याप्रमाणे सोन्याची शुद्धता सिद्ध होण्यास त्याला आधी अग्निदिव्य करावे लागते, मुशीतून जावे लागते तसेच वेणाबाईंच्या गुरुनिष्ठेचा कस लागण्यासाठी त्यांनाही प्राणघातक छळ सहन करावा लागला. लोकनिंदेच्या दिव्यातून जावे लागले. अक्षरश: संत मीराबाईप्रमाणे विषाचा प्याला प्राशन करावा लागला. सुमारे ३००-३५० वर्षापूर्वीचा काळ, समाजस्थिती फारच कठीण होती. समाजात सज्जन लोक मूठभर असतात तर दुर्जनांची संख्या भरपूर असते. 'ब्रह्म तेथे माया आणि बुवा तेथे बाया' या उक्तीनुसार लोक श्रीसमर्थ व तरुण, सुंदर असलेल्या वेणाबाईंच्या चारित्र्यावर शिंतोडे

उडवून वेणाबाई व तिच्या कुटुंबियांना जिणे नकोसे करून सोडले. आयुष्याच्या या अत्यंत कठीण परीक्षेतून त्या गुरुकृपेने तावून सुलाखून निघून सहीसलामत पार पडल्या. मग मात्र त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. आप्तेष्ट सारी नात्यागोत्याची बंधने सोडून देऊन त्या गुरुचरणी समर्पित झाल्या. श्रीसमर्थांचे प्रखर वैराग्य तर सर्वज्ञातच आहे. म्हणूनच

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा ।।

असा त्यांचा गौरव वामन पंडितांनी केला आहे.

वेणाबाईचे पूर्वपुण्य उदयाला आले आणि संसारातील फोलता, नश्वरता ओळखून सद्‌गुरुचरणी विसावल्या. यापुढे सद्‌गुरूंच्या सान्निध्यात त्यांनी आध्यात्मिक प्रगतीची घोडदौड सुरू केली. समर्थांचा अनुग्रह लाभला. समर्थांवरील भक्ती, कीर्तन श्रवणामुळे निस्सीम स्थितीला जाऊन पोचली. 'रामनाम मुद्रांकित' होऊन त्या कृतार्थ झाल्या. त्यांच्या दृष्टीने आता प्रवृत्ती हे सासर व निवृत्ती हेच माहेर बनले. ईश्वरदर्शनासाठी तळमळू लागल्या. काव्यातून आपली व्यथा मांडू लागल्या.

रामनामेवीण मज कंठेना ।।धृ ।।
कोणी वंदिती कोणी निंदिती । वास मी त्यांचा पाहिना ।।१ ।।
हृदयी धरले सद्‌गुरुराया । प्राणांतीहि विसंबेना ।।२ ।।
वेणीचे निजधाम रामाचे जीवन । होणार ते का सुखे होईना ।।३ ।।

चाफळ मठात वेणाबाईंना समर्थ परिवारात महत्त्वाचे स्थान मिळाले. प्रत्येक शिष्याना कामे वाटून दिली जात. आक्काबाई स्वयंपाकघर सांभाळायच्या. वेणाबाईंकडे उपाहाराची सेवा देण्यात आली. पाककलेतही त्या निष्णात होत्या. समर्थांच्या आवडीचे पदार्थ त्या स्वत: बनवून त्यांना वाढीत असत.

वेणाबाईंची आध्यात्मिक योग्यता श्रेष्ठ असल्यामुळेच त्यांच्यावर श्रीसमर्थांचा विशेष लोभ होता. आपल्या जीवीची गोष्ट ते वेणाबाईंना सांगत एवढी त्यांची महती! वेणाबाई साक्षात्कारी होत्या. समर्थांची अनन्य सेवा करिता करिता त्या सेवेचे फळ म्हणून वेणाबाईही सद्‌गुरुपदी पोचल्या होत्या. त्यांचा अनुग्रह घेऊन अनेक शिष्य कृतार्थ झाले होते. अशाच एका शिष्यावर श्रीसमर्थांच्या सांगण्यावरून त्यांनी अनुग्रह केल्याची कथा दासविश्रामधामात आलेली आहे. त्यांचे नेतृत्वगुण व हुशारी हेरून श्रीसमर्थांनी त्यांना मिरज मठाचे मठाधिपतीपद बहाल केले. एका 'स्त्री'ने मठाधिपती होणे ही त्या काळातील फार मोठी क्रांतिकारक बाब होती. परंतु स्त्रियांचे कैवारी व अंगी स्त्रीदाक्षिण्य असलेल्या श्रीसमर्थांनी ही सुद्धा क्रांती केली याची आज स्त्रीमुक्तीवाल्यांनी नोंद घ्यावी.

वेणाबाईच्या जीवनाचे सोने तर झाले होतेच, पण त्या सोन्यालाही काव्यनिर्मितीचा सुगंध होता. वेणाबाई थोर विदुषी होत्या. महाभारत, भागवत, रामायण इत्यादी ग्रंथ त्यांना चांगले अवगत होते. वेणाबाईच्या 'श्रीसीतास्वयंवर' काव्याला स.भ. श्री. शंकर श्रीकृष्ण देवांची प्रस्तावना आहे. ती विस्तृत व निबंधरूप असून त्यात त्यांनी वेणाबाईच्या काव्यरचना कर्तृत्वाबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत.

वेणाबाईंच्या कवित्वात श्रीरामभक्ती अगदी ओतप्रोत भरली आहे. सीतास्वयंवरात त्यांनी आपल्या स्वत:च्या प्रतिभेने, स्फूर्तीने वाल्मिकी रामायणात नसलेले प्रसंगही अगदी खुमासदार पद्धतीने वर्णिले आहेत. उदाहरणार्थ, जेव्हा विश्वामित्र ऋषी आपल्या यज्ञाचे राक्षसांपासून रक्षण व्हावे म्हणून श्रीरामाचे सहाय्य मिळविण्यासाठी राजा दशरथाकडे येतात तेव्हा दशरथ आपल्या प्रिय पुत्र रामाला द्यावयास नकार देऊन भरत आणि शत्रुघ्नाला त्यांच्याबरोबर पाठवितात.

विश्वामित्र बोले रामासी । तुज मानेल तो दे आम्हासी ।
याग पावे सिद्धीसी । ऐसे केले पाहिजे ।।

परंतु पुढे भरत-शत्रुघ्न राक्षसांना भिऊन दुसऱ्या वाटेने जाऊ म्हणून मुनींना विनवितात तेव्हा ही लेकरे काय कामाची? म्हणून विश्वामित्राने दशरथाला ती साभार परत आणून दिली.

वेणाबाईंची काव्यरचना पुढीलप्रमाणे मांडता येते. १) सीतास्वयंवर २) सिंहासन ३) उपदेशरहस्य ४) कौल ५) श्रीराम-गुह संवाद ६) अभंग ७) आरत्या ८) पदे.

समर्थ प्रतापाच्या ११ व्या समासात वेणाबाईंबद्दल पुढील काव्य आहे.

समर्थ देवे वेणाबाईसी वरदाने दिधली ।
सीता स्वयंवरे रामायणे वदविली ।
रामकथा ब्रह्मांड भेदून नेली । पैलीकडे समर्थे ।।
मंगल रामायणे । छंदो रामायणे ।
संकेत रामायणे । लवकुश रामायणे ।
सुंदर रामायणे । अब्द रामायणे । भाषा रामायणे वदविली ।।

यावरून वरील सर्व रामायणे श्रीसमर्थांनी वेणाबाईस वरदान देऊन तिच्याकडून लिहून घेतली. परंतु ती आजमितीस उपलब्ध नाहीत असे खेदाने म्हणावे लागेल.

''सीतास्वयंवर'' या सुप्रसिद्ध रचनेमागे वेणाबाईंची तिच्या 'जीवीचा विसावा' असलेली रामभक्ती हीच प्रेरकशक्ती आहे. या मधुर काव्यातून रामभक्तीचा सुंदर आविष्कार वाचून कुणाही रामभक्ताच्या अंत:करणातील आनंदाचा मोर नाचू लागावा असेच ते वर्णन आहे.

राम गुणाचा सागरु । राम सुखाचा सुरतरु ।
राम भक्ताचे माहेरु । राम विसावा जनाचा ।।
राम मनाचे मोहन । राम जीवाचे जीवन ।
राम सदा समाधान । ज्ञानियाचे ।।
राम पुजावा विलासी । राम घ्यावा अहिणेसी ।
रामावेगळे मानसी । काही नावडे ।।

या ओव्या वाचताना आपलेही मन रामरंगी रंगते व राममय होते. तसेच

जे जे भक्ताचे अंतकर्णी । ते ते पुरवी चापपाणी ।
या कारणे सर्वगुणी । रघुनाथजी भजावे ।।

'रघुनाथजीस भजावे' हे सीतास्वयंवर काव्याचेच सार नसून वेणाबाईंच्या सगळ्या जीवनाचे सार आहे. वेणाबाईंची रामकथेवर अपार श्रद्धा आहे. '**हे राघवाची कथा। कर्ता मी नव्हे सर्वथा।।**' म्हणून आपल्या कवितेचे श्रेय रामरायाला दिले आहे.

श्रीराम-गुह संवाद

वेणाबाईंच्या काव्यरचनेतील 'श्रीरामगुह संवाद' हे श्रीराम व गुह यांच्या परस्पर प्रीतीवर सुंदर प्रकाश टाकणारे एक सुंदर प्रकरण आहे. याचे एकूण ४४ श्लोक आहेत. श्रीराम, सीता व लक्ष्मण हे वनवासाला निघाले. गंगातीरावर आले. आपल्याला गंगा नदी पार करून पलीकडे नेऊन पोचवावे अशी रामाने गुहकाजवळ प्रार्थना केली. गुहाने रामाला विचारले की ''आपण तिघे कोण? कुठले आहात?'' तेव्हा वास्तव न सांगता श्रीराम म्हणाले

असो तापसी तीर्थवासी वनासी। तपा जातसो उत्तरी गुणरासी।
तुझी तोयतारी त्वरे आणि तीरी। परदेसीया पाववी पैलपारी।।

रामाच्या या उडवाउडवीच्या उत्तरावर गुहकाचा मुळीच विश्वास बसला नाही. तिघांच्या त्या सुंदर, सुकुमार तेजस्वी मूर्ती पाहून हे तपाला निघालेले तापसी, तीर्थवासी असावेत हे त्याच्या मनाला पटेना. त्याने आपला संशय स्पष्ट दर्शविला.

नव्हा तापसी ना नव्हा तीर्थवासी। नव्हा या जनासारिखे क्षेत्रवासी।
चहू आश्रमा वेगळी भासताहा। नमेकर्ता असे दिसताहा।।

राम, लक्ष्मण व सीता यांच्या शांत, गंभीरवृत्ती पाहून गुहाची त्यांच्यावर पूर्ण भक्ती बसली. प्रेमादराने, भावभक्तीने त्याने पुन्हा पृच्छा केली की खरोखर आपण कोण आहात ते सत्य सांगा. आपण कुणी थोर विभूती आहात असे विचारताना त्याचा कंठ दाटून आला.

वदा नाम स्वामी बहु कंठ दाटे।।११।।

रामानेही त्या प्रेमातील उत्कटता जाणली. त्याच्या निष्कपट निष्ठेची प्रतीती आली. त्यामुळे त्यांनी आपली सगळी माहिती गुहाला सांगितली. त्यावेळी गुहाने प्रेमभराने आपल्याकडून जमेल तसे त्यांचे स्वागत केले.

जुने कांबळे जे महगांदलेसे।
अती जीर्ण बैसावया घातलेसे।
बरे आणिले तोय त्या जान्हवीचे।
प्रिती क्षाळिले पाय त्या राघवाचे।।

गुहाने रानफुले आणून ती गुंफून तो हार श्रीरामाच्या गळ्यात घातला. पूजा केली. रानफळांचा नैवेद्य भावभक्तीने अर्पण केला. नंतर नौका आणून तिघांनाही परतीरास पोचविले. राम प्रसन्न होऊन गुहाला 'काही वर माग' म्हणाले. त्याने मागितले की,

पदपंकजी ठाव दीनास द्यावा। सखा आपुला मित्र ऐसा म्हणावा।।
पुन्हा मागुते याचि पंथेचि यावे। दिनानाथ सनाथ माते करावे।।
जयश्री सवे साजरी ते पहावे। असे आर्त माझे असे पुरवावे।।

श्रीरामाने 'तथास्तु' म्हटले. श्रीराम पुढे मार्ग पुसत पुसत तेथून मार्गस्थ झाले.

वेणास्वामी पंथावलोकी स्वभावे। वना दंडका कोण मार्गेण जावे।
विधी निर्मिता तो पथा पुसताहे। न जाणे महिमा कसी काय आहे।।

वास्तविक गुह हा हलक्या जातीतला असूनही त्याने सख्यत्वाचा, मित्रत्वाचा पुढे केलेला हात रामाने स्वीकारला. देव कधी जात-पात, उच्च-नीचत्व न पाहता त्या जीवाची भावभक्ती पहातो हेच यावरून सिद्ध होते.

वेणाबाईंच्या काव्याची अशी छोटी स्फुट प्रकरणे आहेत. सिंहासन व उपदेशरहस्य अशा दोन प्रकरणांचा उल्लेख दासविश्रामधामात आला आहे. पण सध्या तरी ती उपलब्ध नाहीत.

पद

वेणाबाईने फार उच्च दर्जाचा पारमार्थिक अधिकार प्राप्त केलेला होता. स्वत: कृतार्थ झालेल्या वेणाबाई आता इतरासही उपदेश करू लागल्या. सद्गुरु आज्ञेने अनुग्रह देऊ लागल्या. प्रभु रामचंद्रांची वेणाबाईवर केवढी अपार कृपा होती हे श्रीरामनवमी उत्सवाच्या एका प्रसंगाने दिसून येते. वेणा आजारी झाल्यावर उत्सवाची तयारी करावयास व वेणाबाईंची सेवा करण्यास स्वत: रामच 'रामाबाई' होऊन आले होते ही गोष्ट सर्वश्रुतच आहे.

धन्य होणे सफळ जिणे रामगुणे होते।
ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळो येते।।धृ.।।
काळ वेळ हे सफळ हित करू काही।
सर्व काळ सुख वेळ राम भजा भाई।।१।।
काय जना कोण मना मानले हे सार।
रामवीण सर्व सीण दु:ख अनिवार।।२।।
वळे पळे निमिष घडी जात लवलाही।
आणि घडे तसे हेचि उद्यालागी नाही।।३।।
सर्व सोडी राम जोडी भजनी निश्रकाम।
धन्य तुम्ही धन्य आम्ही गाऊ रामनाम।।४।।
हा ही लोक परलोक त्यास सासुरवाडी।
वेणी म्हणे भक्तजना भजने राम जोडी।।५।।

वेणास्वामींचे दुसरे एक पद हे त्यांच्या गुरुभक्तीची, ज्ञानाची, अधिकाराची, सामर्थ्याची प्रचीती देणारे असून अतीव सुंदर आहे. ते असे

पद १

गुरु नि:शब्दाची बीजे। आम्हा प्राप्त आत्मकाजे।।१।।
आम्ही अबोल अबोल। अबोले बोलू बोल।।धृ।।
आमुची माया सांज जाली। परब्रह्मी लयी गेली।।२।।
शब्द आकाशी निमाला। आत्माराम अवघा जाला।।३।।
वेणी स्वामीयाच्या संगे। आम्ही राहो आत्मरंगे।।४।।

पद २

भवस्वर्ग मनोभास। मनोभास केला नाम।
आम्ही आत्माराम रामी। रामी राम परधामी।।धृ।।
आम्ही मन मांगे केले। मनासवे अवघे गेले।।२।।
वेणी स्वामीयांच्या संग। येकसरा मनोभंग।।३।।

पद ३

आमुच्या वाटे नका जाऊ । नये ते वाटे तुम्हा लाऊ ।।१ ।।
आम्ही पारिखे पारिखे । न हो लोकीकासारखे ।।धृ ।।
अशी स्थिती जाली मोठी । पोटी ब्रह्मांडाच्या कोटी ।।२ ।।
वेणीस्वामी आत्माराम । ते चि आमुचे परंधाम ।।३ ।।

पद ४

गुरुवाक्य प्रेमनौका । मायासागर तरलो देखा ।।१ ।।
आम्ही स्वामीचे अंकित । रामनामे मुद्रांकित ।।धृ ।।
अहं ब्रह्म उपदेशले । अहं गेले ब्रह्म ठेले ।।२ ।।
आली अनुभवाची खूण । खूण केली रामार्पण ।।३ ।।
वेणीस्वामी अवघा जाला । विज्ञानासी अंत आला ।।४ ।।

पद ५

देह माझे मन माझे । सर्व नेले गुरुराजे ।।१ ।।
आम्ही गुरुनाथ पंथी । ज्ञानमुद्रा दिधली हाती ।।धृ ।।
कर्णी चढली ज्ञानमुद्रा । मुखी अगोचरी मुद्रा ।।२ ।।
कान फाडूनि जोगी जालो । संतदर्शनासी आलो ।
वेणीस्वामीचे दर्शन । माया संकेत निर्शन ।।४ ।।

वेणाबाईंच्या स्फुट कवितात 'कौल' हे काव्यही नितांत सुंदर आहे. त्यात त्यांचा कल्पनाविलास दिसून येतो.

कौल

रावणवधानंतर १४ वर्षांनी श्रीराम अयोध्येस आले. त्यांना राज्याभिषेक होऊन ते सिंहासनावर आरूढ झाल्यावर प्रजा त्यांच्याजवळ कौल (मागणे) मागावयास आली. कौल म्हणजे राजाकडून प्रजेस मिळणारे अभयपत्रच. तेव्हा प्रजेने राजापाशी कोणता कौल मागितला त्याचे वर्णन काव्यात वेणाबाईने केले आहे. प्रजेला 'तुम्हाला काय पाहिजे ते मागा' असे आश्वासन दिल्यावर ते एक एक मागणे लक्ष्मणास लिहून ठेवण्यास रामाने सांगितले आहे. असा या कवितेचा विषय आहे.

रघुराज सिंहासनी सौख्यदाता । प्रजा कौल मागावया उदिता ।
प्रभु बोलिला रे अपेक्षित मागा । नका देत ठेऊ समस्तैक सांगा ।।

रामराज्यच ते, तेव्हा सर्वांच्या इच्छा पूर्ण होणारच. प्रजेने मोकळ्या मनाने एक एक मागणे मागावयास सुरुवात केली. बाकी काही म्हणून ठेवले नाही. ते म्हणतात –

बहू कष्टलो पातलो जी स्वदेशा ।
प्रजा बोलतसी कौल दे रे राघवेशा ।।
भूमीने कदा पीक सांडू नये रे । वदे राम लक्ष्मणा हे लिही रे ।।१ ।।
समर्था कदा रोगवारे नको रे । वदे राम लक्ष्मणा हे लिही रे ।।२ ।।

याप्रमाणे प्रजेने रामापाशी धन, धान्य, गाई, बैल, गाड्या, पेवे, भाग्य, मनासारखी पुत्रकन्याकलत्रे, समृद्धी, सौख्य, तारुण्य, शक्ती, दया, चातुर्य, पुण्यवासना, अमरत्व, निष्कपटपणा, पावित्र्य इ. जे काही सुचले ते सारे सारे सांगितले तरी यापुढेही आणखी काही कमी पडले व आठवले तर ते मागावयास तुझ्या दरबारी येण्यास कुणाची आडकाठी ठेवू नकोस असेही निक्षुन सांगितले. ते सारे काही लक्ष्मणाने नोंदवून घेतले.

तुझ्या दर्शनी आडकाठी नको रे । वदे राम लक्षुमना हे लिही रे ।
यानंतर प्रजेने रामापाशी शेवटचे मागणे मागितले –
प्रभू क्लेश घेऊनी विश्रांती द्यावी । देहे तोवरी भक्ती तुझी घडावी ।
वेणीस्वामी ऐशापरी कौल दे रे । वदे राम लक्षुमणा हे लिही रे ।।२६ ।।

याप्रमाणे वेणास्वामीने लिहिलेली साहित्यरचना काही प्रकाशित झाली असून काही अद्याप अप्रकाशित आहे.

वेणास्वामींचा निजधामास जाण्याचा प्रसंगही अलौकिक असाच आहे. त्यांनी आपला नश्वर देह श्रीगुरुसंनिध सज्जनगडावर चैत्र वद्य १४ शके १६०० मध्ये ठेवला.

श्रीरामनवमी विसावे दिनी । सद्‌गुरुचरणी लीन वेणी ।
चाफळपर्यळी अधिष्ठानी । आत्मारामी निमग्ना ।।

'निजानंदाच्या' माहेरी पाठवा म्हणून श्रीसमर्थ सद्‌गुरूंपाशी त्यांनी बरेच दिवसापासून लकडा लावला होता. प्रवृत्तीरूप सासरचा त्यांना आता कंटाळा आला होता. आत्मारामात लीन होण्यासाठी वृत्ती अधीर झाल्या होत्या.

सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निधरि ।
सारासार विचारे । संतसंगे ।।

यानुसार वेणाबाईंची जीवनाबद्दलची आसक्ती दिवसेंदिवस कमी होऊन विरक्ती उदासीनता उत्तरोत्तर वाढत चालली. आयुष्यभर ध्यास घेतलेल्या श्रीरामचरणाची ओढ लागली. तिचा अंतकाळ आल्याचे श्रीसमर्थांनी ओळखून तिला कीर्तन करण्यास सांगितले. रामदासी संप्रदायात उभे राहून कीर्तन करण्याचा अधिकार फक्त वेणाबाईंनाच समर्थांनी दिला होता. त्यांच्या शेवटच्या कीर्तनाचा अभंग स्वरचित असून फारच हृदयस्पर्शी आहे. ते श्रीरामस्तवन आहे.

बंध विमोचन राम माझा बंध विमोचन राम ।।धृ ।।
सकलही ऋषीमुनी भजती जयासी । एकचि तो सुखधाम ।।१ ।।
सद्‌गुरुकृपया ओळखिला जो । कौसल्येचा राम ।।२ ।।
भावभक्तीच्या सुलभसाधनी । पुरवी सकळही काम ।।३ ।।
शरण ही वेणा आत्मारामा । पावली पूर्णविराम ।।४ ।।

कीर्तन खूप रंगले. सारेच तल्लीन झाले होते. देहभान विसरले होते. श्रीसमर्थही आता होणाऱ्या वेणाबाईच्या वियोगाने धीरगंभीर बनले. कीर्तन संपल्यावर आरती झाली. वेणाबाईने वीणा बाजूला ठेवून श्रीसमर्थ सद्‌गुरु चरणावर डोके ठेवले व तेथेच क्षणभरातच निजधामाला (परमधामाला) गेली. साऱ्या प्रपंचाच्या, मायेच्या बंधनापलीकडे गेली. श्रीरामांनी तिला मुक्त केले. सायुज्यमुक्ती दिली व अजरामर करून ठेवले.

याप्रमाणे श्रीसमर्थशिष्या वेणास्वामी निर्गुण अशा आत्मारामात विलीन झाली. पूर्णविराम पावली. **।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

सौ. ज्योती चिटगोपेकर
९३ पांडुरंग सहनिवास, समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१
फोन : (०२४०) २३३०७८२ मोबाईल : ९४०३१२५१२५



संत वेणास्वामींची नामसाधना

सौ. सीमा सुरेश रिसबुड

बी.एस्सी (नर्सिंग), डॉ. हेडगेवार रुग्णालयात नर्सिंग विभाग प्रमुख
१) सखोल दासबोध अभ्यास समीक्षक
२) रामदास स्वामी चॅरिटेबल ट्रस्टची उपाध्यक्ष
३) समर्थ रामदासांच्या विचारांच्या प्रचार-प्रसाराचे कार्य

स्त्री-शिक्षणाचा आरंभाचा विचार करताना महर्षी कर्वे, सावित्रीबाई, ज्योतिबा फुले यांच्या नावाअगोदर समर्थ रामदास स्वामींच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचे स्मरण करावे लागेल. समर्थ रामदास स्वामींच्या शिष्यांमध्ये २० ते २२ स्त्री शिष्यांची नावे आज उपलब्ध आहेत. त्यात आक्काबाईंनी समर्थांच्या पश्चात सज्जनगडचा कारभार सांभाळला. वेणास्वामी मिरज मठात मठाधिपती होत्या. कोल्हापूरच्या गोपाजीपंत गोसाव्याची ही मुलगी लहानपणी लिहायला, वाचायला शिकली. एकनाथी भागवत व भावार्थ रामायण वाचले. त्या काळातील पद्धतीप्रमाणे तिचा विवाह झाला. विवाहानंतर काही दिवसातच तिच्या पतीचे निधन झाले. वैधव्याचे रूक्ष, भकास जीवन त्यांना जगावे लागले. आधार फक्त वाचन, चिंतन याचाच होता. त्या अंतर्मुख, उदास राहू लागल्या. भागवत वाचताना त्यांना काही शंका, काही प्रश्न पडायचे. कुणाला विचारावे? असा प्रश्न होता. श्रावण महिना १६४८ साल त्यांच्या पारमार्थिक जीवनाची प्रभात ठरली. समर्थ रामदास भिक्षेसाठी त्यांच्या घरी आले. सद्‌गुरु शिष्याची भेट झाली. पण बोलणे झाले नाही. सद्‌गुरु भेटीची तळमळ त्यांनी,

''तैसी मूर्ति दृष्टी पडो । तैशा पायी वृत्ती जडो ।
रामदास दिव्य नाम । सखा ज्याचा आत्माराम ।
ऐशा सद्‌गुरुचरणा वर । किंकर लोळे दासापरी ।''

या चरणात सांगितली. त्यांना सद्‌गुरु भेटीची तळमळ होती. त्यामुळे 'नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी' या समर्थवचनाप्रमाणे १५ दिवसांनीच समर्थ परत भिक्षेसाठी आले. वेणाबाई भागवत वाचत होत्या. समर्थांना त्यांची श्रद्धा, भक्ती यांचे कौतुक वाटले. वेणाबाईंनी भागवतातले काही प्रश्न विचारले. समर्थांनी उत्तर दिले. भक्तीचा अंकुर, वेणाबाईंच्या ह्दयात रुजला. नंतर कोल्हापूरला कीर्तन ऐकण्याचा योग आला. कीर्तनानंतर आध्यात्मिक संवाद व्हावा. भक्तिरसात बुडलेल्या वेणाबाईंना लोकनिंदा सहन करावी लागली. आई-वडिलांनी दिलेले विषही प्राशन करावे लागले. इथे देहबुद्धी संपली. देहाहंकार संपला. दाह सहन करण्याची शक्ती आली व त्याचवेळी सद्‌गुरुचरणी स्थान मिळाले. चाफळ-मठात वेणास्वामी समर्थ संप्रदायात सामील झाल्या. समर्थांच्या सहवासात वेणाबाईंना समर्थांनी केलेला गृहत्याग, टाकळीची साधना, १३ कोटीचा रामनाम जप, गायत्रीचे पुरश्चरण, रामायणाचे लेखन, शास्त्रांचा अभ्यास, केलेले देशाटन, सगुण निर्गुण उपासना, चाफळ मंदिराची उभारणी हे सर्व समजले. वेणास्वामींची नामसाधना सद्‌गुरूंची साधना, अभ्यास या मार्गदर्शनाने चालू झाली.

सद्‌गुरुवीण जन्म निर्फळ :

सद्‌गुरूंवर अनन्य निष्ठा, श्रद्धा, नम्रता वेणास्वामींची होती. सद्‌गुरुकृपेने त्यांचे जीवन बदलले. आध्यात्मिक प्रगती झाली व उपासना घडली.

''रामनामे विण मज कंठेना । कोणी वंदिती कोणी निंदीती ।
वास मी त्याची पाहीना । ह्दयी धरिले सद्‌गुरुचरणा ।
प्राणांती हि विसंबेना । वेणीचे निजधन रामची जीवन ।
होणार ते का सुखे होईना''

या अभंगात वेणास्वामी सद्‌गुरुकृपेचा अनुभव व त्यांनी दिलेले नाम सर्वस्व म्हणून कसे स्वीकारले याचा अनुभव येतो.

''राम सद्‌गुरूंची कृपा। दाखवी निजस्वरूपा'' असे समर्थांना वाटले व,

''समर्थ सद्‌गुरुची कृपा। दाखवी निजस्वरूपा'' असे वेणाबाईंनी मनात धरले.

''बहुता दिसा आपुली भेट झाली। विदेहीपणे सर्व काया निवाली।'' हा अनुभव वेणाबाईंना आला.

नाम-नामी यातील भेद नष्ट झाला. या अभंगात 'निजधन' शब्द महत्त्वाचा वाटतो. निज म्हणजे आत्मस्वरूप 'समर्थ रामदासही' धन्य तो निजदास भक्त प्रेमळ 'प्रसन्न होसी निजदासा' असे देवीच्या व रामाच्या आरतीत म्हणतात. ज्याचे नाम घेतो तो 'श्रीराम, आत्माराम' मीच या भावाने वेणाबाई नाम घेत. नामसाधनेतून त्यांना अंतर्मुखता मिळाली. ''अंतनिष्ठ तितुके तरले' हे समर्थ वचन त्यांनी तंतोतंत पाळले व त्यांना आत्मस्वरूपाचे स्वत:जवळ कायम असलेले 'निजधन' प्राप्त झाले.

नामाची सुलभता :

''मने विचार करू । रामासी दृढ धरू ।
मी शूर बुद्धिमंत । रूपधनवंत ।
मी तपी योगाभ्यासी । जपा जपो नीरसि ।
बळे पावेन रामासी । घडे केवी ?''

नामासाठी योग, याग, सिद्धी, तप, ज्ञान याची गरज नाही. नामासाठी नाम घेणे यातच सुलभता आहे. ज्ञान ध्यानाच्या गोष्टी राहोत, विचारा विचाराची गाठ तुटो, वाद-वेवादाच्या वाटा मोडून नामाने वेणाबाई निजानंदात राहात. हा आनंद बाह्य गोष्टींवर अवलंबून नव्हता. परमात्मा सच्चिदानंदघन आहे व त्यातील आनंद हा विषयाचा आनंद नाही. आनंद हेच आत्म्याचे स्वरूप आहे. जसा सूर्याला अंधार कसा हे माहीत नाही तसे आत्मस्वरूपाला दु:ख माहीत नाही. वेणाबाईंनी वैखरीच्या नामाने अन्नमय कोषाचा, मध्यमेने प्राणमय कोषाचा, सद्गुरूंच्या पश्यन्तीतील नामाने मनोमय कोषाचा, परावाणीतील नामाने विज्ञानमय कोषाचा निरास केला व उन्मनीत समाधी अवस्थेपर्यंत त्या पोहोचल्या म्हणून सर्वांना ''सर्व काळ सुख वेळ राम भजा भाई। रामावीण सर्व सीण दु:ख अनिवार'' असे त्या सांगतात. नामसाधनेने-

''पाहता पाहता द्वैत सरले ।
सांगणे ऐकणे हे मनाचे ओझे आता हरले ।
वृत्ती स्फुरणाचे ओझे नुरले ।
रामदास्यत्वे रामचि झाले ।
जैसे सागरी लवण मिळाले ।
विमल पुण्य फळा आले''

ही नामसाधनेची मोक्षाची अवस्था वेणास्वामींनी गाठली.

सामान्य साधकांना,

''राम नाम, राम नाम न लागेती कष्ट,
न करणे दुर्घट, तप तीर्थ साधन न लगे ।
जड मूढ अज्ञान, ज्या नामे पावन ।
वैकुंठ भुवन वसली ठाणे ।
ते नाम उच्चार । वेणीस निरंतर''

या अभंगात हा दिलासा देतात. अजामेळ व गणिकेच्या उद्धारांचा उल्लेख करतात. नामाच्या परमोच्च अवस्थेत 'रिता ठाव हा राघवेवीण नाही' 'भरला घनदाट हरि दिसे' हा व्यापक दृष्टीचा अनुभव समर्थ व ज्ञानदेवांना आला तसे 'वैकुंठ भुवन वसली ठाणे' हा वेणाबाईंना आला.

नामसाधनेचा सगुण-निर्गुण प्रवास :

समर्थांच्या 'सगुणाचेनि आधारे, निर्गुण पाविजे निधरि' या वचनाप्रमाणे वेणास्वामींच्या नामसाधनेचा तोच प्रवास होतो. नामसाधनेची पूजा सगुण मूर्तींची उपासना ही बाह्यरंगपूजा व नामजप ही अंतरंग उपासना आहे. ''उपासनेला दृढ चालवावे'' हा समर्थांचा आग्रह आहे. वैखरी नाम हे ही सगुण व सोऽहं साधना किंवा श्वासाचा जप ही निर्गुण साधना आहे. सगुण साधनेत वेणाबाई म्हणतात,

''सगुण रूप मज दाऊनिया । त्रिविधताप दूर केले ।
सावळे रूप दावि नयना । आठव निशिदिनी या मना ।
वेणीची करुणा ऐकुनिया । सगुण रूपे मज भेटाया''

रामरूप पाहताना त्यांना रामचरित्र व रामाचा पराक्रम आठवतो.

''अहो स्वामी रघुराज कोदंड धारी ।
प्रेम रूप वानर उठवले अपार ।
सागरावरी पाट बांधला हो ।
शुद्ध क्रिया तिनी वचनासी वाटले ।
ते रूप सावळे भज मना रे ।''

असा रामाचा पराक्रम त्या वर्णन करतात.

वैखरीच्या नामाचा जप होत ते परावाणीपर्यंत पोहोचते मग शब्द रहात नाहीत. अनिर्वाच्य स्थिती होते. ही स्थिती वेणाबाई या अभंगात वर्णन करतात.

''गुरु नि:शब्दांची बीजे । आम्हा प्राप्त आत्म काजे ।''
आम्ही अबोल अबोल । अबोले बोलू बोल ।
आमुची माया वांज झाली । येर ब्रह्मीलया गेली ।
आकाशी शब्द निमाला । आत्माराम अवघ्या झाला ।
(वेणास्वामी यांच्या) संगे । आम्ही राहो आत्मरंगे''

यात वेणाबाईंच्या शिष्यांनाही त्यांनी निर्गुणाचा अनुभव दिला. या अवस्थेत हे सर्व गुरूंनी आम्हाला दिले अशी प्रांजल कबुली आहे. रामकर्ता या भावनेने 'कर्तेपण' 'देहाहंकार' हा मायेचा खेळ संपतो, शब्द संपतात व 'आहे तो फक्त जीवात्मा, शिवात्मा व विश्वात्मा' याची प्रचीती येते. जेथे शब्द नाहीत तेथे, एकांत असतो. अशा स्थितीत वेणाबाई म्हणतात,

''येकांताचा सौरस ।
हा हीन सरे वोरस ।
भजनाचा लवलेश लागेचिना ।
दृश्य, द्रष्टा, दर्शन ।
नाही जेथे संभावन-रूपाचे कारण बोलो ही नये ।
ऐसिये आतवटी ।
निज रूपांची दाटी । वेणीपण नेहटी । आडळेचिना''

नाम, नामी, रूप सर्व एक झाले की त्रिपुटीचा लय होतो. स्वत:चे रूप व रामरूप एकच आहे असा अनुभव येतो. पिंड-ब्रह्मांडाचे एकत्र अनुभवता येतात यालाच 'मौन' म्हणतात. मौनात मागचे स्मरण नसते, पुढचे चिंतन नसते. मौन ही भगवंताचीच विभूती आहे. वेणास्वामींची या काळात वृत्तिशून्य अवस्था, प्रसन्न, शांत, समाधानी होती. आत्मनिवेदन यापेक्षा वेगळे नसते.

नामातील गुप्तता – सांगता नये मज । येक माझे निजगुज ।
सखिये तू सहज । अनुभव घेयी ।
ब्रह्मानंद पुटी । होत असे मोठी ।
स्वानंदाचे पाटी । बैसलिये ।
विचारा विचार । नाही जेथे बडिवार ।
नि:शब्दांचे घर । (रिघा लिये) । साधनांचा अंतरपाट ।

नाही जेथे परिपाठ । सहजी सहज मीठी ।
अतंगले मंत्र मात्रुकायाचा । कोण धरी जेथे लेखा ।
निरऊन मज देखा । मुरडली ।

इथे नाम खोलवर सूक्ष्मात गेले की स्वानंदाच्या पाटावर साधक विराजमान होतो. ब्रह्मानंदात लीन होतो. साधनेचा अंतरपाट विचारांचा बडिवार नसतो. सहजस्थिती असते. अहेतुक कर्मफलवासनारहित सहज चालणे सहजवर्तणूक (सहज स्तुति) देहभान हरपून तन्मयतेने केलेले स्तवन यात सहजता असते. सहजसाधना भगवंताला आवडते कारण त्यात कर्तेपणाचा अभिमान नसतो. हे व्हावे, हे मिळावे, ही तळमळ असते. सुख-दु:ख ही भावना नसते.

वेणाबाईंना शांत ब्रह्म किंवा आत्माराम निर्गुण व कर्ता राम सगुण वाटला. एकाच श्रीरामाची ही दोन दर्शने आहेत. शांत आत्मारामातून श्रीराम हा नित्य शब्द प्रगटतो म्हणून समर्थ अभंगात म्हणतात, ''तो हा परब्रह्म म्हणतात'' याप्रमाणे दाशरथी राम आत्माराम व परब्रह्म याची एकरूपता वेणाबाईंच्या मनात दृढ झाली होती. त्यांची नामसाधना मूर्त-अमूर्ताला जोडणारी होती. त्यांच्या एका अभंगात,

राम गुणांचा सागरू । राम सुखाचा सुरतरु ।
राम भक्तांचे माहेरु । राम विसावा जनांचा ।
राम मनाचे मोहन । राम जीवांचे जीवन ।
राम सदा समाधान । ज्ञानियांचे ।।२ ।।
राम पुजावा विभसी ।
राम घ्यावा अहिर्णेसी रामा वेगळे मानसी । काही नावडे ।

श्रीराम हा सगुण निर्गुण भाव प्रगट करतो ही नादब्रह्माचीच अनुभूती त्यांनी घेतली कारण त्यांचे शरीर व मन नादात एकरूप झाले होते. समर्थ संप्रदाय हा 'स्वरूप संप्रदाय' आहे. तो त्यांनी स्वीकारलेला होता. त्यात 'निर्गुण' साध्य आहे. दासबोधात समर्थ 'झाले साधनाचे फळ। संसार झाला सफल। निर्गुण ब्रह्म ते निश्चळ अंतरी बिंबले' असे म्हणतात.

एका अभंगात वेणाबाई म्हणतात,

'स्वरवर्ण व्यक्ति रहित । दृश्य द्रष्टा दर्शनातीत ।
ना नव्हे चि जीवनमुक्त । संत असंत नामातीत ।।१ ।।
ऐसा हा राम सांगता वाचा धरे । क्षर अक्षर केवि उच्चारे ? ।।धृ ।।
जो अखंड समसमान । नसे अभाव स्वानंद घन ।
जो सबाह्य विराजमान । ज्याचा पूर्णत्वे वारले जन ।।२ ।।
ती प्रचीत पाहतां तुला । तो पाहता चि निभोनि गेला ।
तू अखंड अडळ भला । वेणी आहेत तो चि झाला.

शरीर क्षर व आत्मा अविनाशी म्हणून अक्षर या दोहोंच्या पलीकडे निर्गुण ब्रह्म किंवा गीतेतील 'पुरुषोत्तम' जीवन्मुक्त आहे. वेणाबाईंना सर्व ठिकाणी चैतन्य आहे. सगळीकडे परमेश्वर नटलेला आहे तो अखंड, अपार, अनंत आहे तर क्षर व अक्षरांचा उच्चार कशासाठी करायचा? या अभंगात जो क्षराचा उल्लेख आहे तो वेणास्वामींच्या इतर ग्रंथांच्या अभ्यासाचे द्योतक आहे. दासबोधाच्या पहिल्याच समासात गुरु गीता, रामगीता इ. गीतांचा उल्लेख आहे व या सर्व गीतांचा व भगवत्‌गीतेचा अभ्यास वेणाबाईंनी केल्यामुळे 'अद्वैत तत्त्वज्ञान' त्यांनी या अभंगात सांगितले असे वाटते.

वेणाबाईंना झालेला साक्षात्कार

एकदा वेणाबाईंना शीतज्वर आला. रामनवमीचा उत्सव जवळ आला होता. आता कसे होईल म्हणून रामाजवळ वेणाबाईंनी करूणा भाकली.

'ऐकुनी वेणीची प्रार्थना ।
कळवळला रामराणा ।
उडी घातली सिंहासना ।
पासूनिया रामरायांनी ।
वेणाबाईंचे मस्तक कुरवाळले ।'

ज्वर कमी झाला. 'रामाबाई' नावाची स्त्री मदतीला आली. तिने पथ्यपाणी केले. भिक्षेला गेली व उत्सवाच्या तयारीला मदत केली. आक्कास्वामी उत्सवाला आल्या. हे सर्व कोणी केले? विचारले. रामाबाईने म्हटल्यावर तिला भेटावे म्हणून सर्व ठिकाणी शोधले. रामाबाई गुप्त झाली. हे वाचताना श्रीखंड्या नाथाघरी १२ वर्षेसेवा करून गुप्त झाला त्याची आठवण होते. समर्थांना वेणाबाईंची आध्यात्मिक उंची माहीत होती म्हणून

'मनीचा जीवीची गोष्टी यथार्थ ।
भक्ति वेणीसी सांगती समर्थ ।
कां जे श्रीराम उपासकांसी गुह्यार्थ ।
आत्माराम निरोपती''

असे ते म्हणतात. वेणाबाई श्रीसमर्थांना सोडून कोठे गेल्याच नाहीत. श्रीगुरुचरणसेवा, आध्यात्मिक ग्रंथवाचन व ग्रंथरचना यात त्यांचा वेळ जात असे. संस्कृत भाषेचे त्यांना ज्ञान होते. शके १६०० च्या चैत्र वद्य १४ मध्ये वेणाबाईंनी 'माहेरी पाठवा' अशी समर्थांना विनवणी केली. कीर्तनाला उभ्या राहिल्या. कीर्तन समाप्त होताच 'जय जय रघुवीर समर्थ' म्हणत समर्थचरणी लीन झाल्या. 'समर्थ चरणी अंती उर्ध्वपंथी लीन' असे वर्णन समर्थ प्रतापात आहे. वेणास्वामींची भक्ती, त्यांचे कार्य, त्यांनी रचलेले अभंग, काव्यरचना, सीतास्वयंवर, पंचीकरण हे ग्रंथ अभ्यासावे असे आहेत. १६ व्या शतकात एका स्त्रीने केलेल्या धर्मस्थापनेचे, संघटनेचे, धर्मजागृतीच्या कार्याचे सर्वांनी स्मरण ठेवावे असे आहे.

जय जय रघुवीर समर्थ

सौ. सीमा सुरेश रिसबुड
मेट्रन डॉ. हेडगेवार रुग्णालय, गजानन मंदिर रोड,
गारखेडा, औरंगाबाद ४३१००५.
फोन : (०२४०) २४५११६७



वेणाबाईकृत – कौल रघुनाथाचा...

सुनील चिंचोलकर

बी.कॉम. प्रवचनकार, लेखक
१२ वर्षे सज्जनगड येथे व्यवस्थापन. ३२ पुस्तके प्रकाशित. शिवचरित्र, ज्ञानेश्वरी, दासबोध गीता यावर प्रवचने. समर्थ व्यासपीठ व समर्थ संस्थानचा पुरस्कार प्राप्त.

आपल्या पौराणिक ग्रंथात आणि संतवाङ्मयात प्रत्येक सत्पुरुषाबरोबर एखाद्या थोर स्त्रीसंताचे नाव घेतले जाते. रामायणात रामाएवढेच सीतेचे महत्व आहे. महर्षी वाल्मिकी म्हणतात –

कृत्स्नम् रामायणं काव्यम् । सीतायाः चरितम् महत् ।।

महाभारतात द्रौपदी हे अत्यंत तेजस्वी पात्र आहे. श्रीकृष्णाचे नाव घेताच राधा आठवते. ज्ञानदेव, मुक्ताबाई या बहिण भावात ताटीचे अभंग लिहून आपल्या भावाला उपदेश करणारी मुक्ता किती अधिकारी असेल याची आपण कल्पना देखील करू शकणार नाही. जनाबाईसारखी मोलकरीण देखील नामदेवांसारख्या सत्पुरुषाच्या घरात काम करीत करीत संतपदी पोहोचली. समर्थांच्या काळात वेणाबाई स्वामीपदी पोहोचल्या. त्यांचे माता–पिता समर्थ्यांचे अनुग्रहीत होते तर सासु–सासरे एकनाथ महाराजांचे शिष्य होते. त्यांची आध्यात्मिक यात्रा सुखद व्हावी असे अनुकूल वातावरण माहेर व सासर या दोन्हीकडून होते. समाजाचा विरोध होता. तो तत्कालीन समाजरचनेत विधवांना तुच्छ समजले जाई म्हणून. पण या सामाजिक विरोधावरती मात करण्याची हिंमत वेणास्वामींमध्ये होती.

विशेष म्हणजे वेणाबाई साक्षर होत्या. त्यांना लिहिता आणि वाचता येत होते. त्याकाळी म्हणजे १७व्या शतकात स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते, असे असताना वेणास्वामी दहा–बारा ग्रंथ लिहितात व अनेक अभंग, स्फुट प्रकरणे रचतात हे कौतुकास्पदच म्हणावे लागेल. रामभक्ती आणि गुरुभक्ती यांच्या आधाराने त्यांच्या काव्याचा वेल गगनाला गवसणी घालतो. त्या समर्थ शिष्या असल्याने त्यांच्या काव्यावर समर्थांचा प्रभाव असणे अगदी स्वाभाविक होते. समर्थ्यांच्या काव्यातील सामाजिक जाणिवांचे पडसाद आपल्याला वेणाबाईंच्या काव्यातही आढळतात. त्यांच्या पुढील रचनेत देशस्थिती आणि समाजस्थिती यांचे भान दिसून येते.

– गोब्राह्मणप्रतिपाळ –

काठीकर मार्ग सोडविती अपार । सकळा मुखी जयजयकार ।।
राऊल उठिता समय चला । सभानायका निरोप जाला ।।१ ।।
मंगळ तुरा ध्वनी दाटला गगनी । दशदिशा भेदूनि गेला ।।२ ।।
स्वस्तिवचने देती द्विजजन । ब्रीद बंदीजन वानिती ।।३ ।।
भक्तजन संत सज्जन । स्तविती गोब्राह्मण प्रतिपाळा ।।४ ।।
अनंत कोटी ब्रह्मांड भुपाळ । वेणी सोहळा पाहती ।।५ ।

वेणाबाई कोणता सोहळा पहात आहेत? हे गोब्राह्मणप्रतिपाळ करणारे कोण? ब्रह्मवृंद स्वस्तिवचन बोलून कुणाचा राज्याभिषेक करीत आहेत? माझ्या मते हे वर्णन शिवराज्याभिषेकाचे असून वेणाबाई त्या प्रसंगी हजर असाव्यात. समर्थांनी संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला दिवाकर गोसावी यांना प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. त्यानुसार शिवराज्याभिषेकाला वेणास्वामींना पाठविले असावे. समर्थांप्रमाणेच त्यांना देशकालवर्तमानाचे भान होते. म्हणून समर्थ संप्रदायात उभ्याने कीर्तन करण्याचा अधिकार फक्त वेणाबाईंना होता. अन्य स्त्री कीर्तनकारांनी बसूनच कीर्तन करावयाचे असा दंडक होता. यावरून वेणास्वामींची प्रबोधनशक्ती किती प्रभावी असेल याची कल्पना करता येते. त्यांचे काही शिष्य प्रयागला होते. वेणाबाईंच्या काही हिंदी रचनाही आहेत. या सर्व गोष्टी त्यांच्या अद्वितीय कर्तृत्वशक्तीच्या निदर्शक आहेत.

'कौल रघुनाथाचा'' हे असेच मौलिक प्रकरण वेणास्वामींचे आहे. शिवराज्याभिषेकाला उपस्थित असलेल्या वेणाबाईंनी तो भव्य सोहळा पाहून आपल्या कल्पनाशक्तीने त्या अयोध्येमध्ये गेल्या. सीता स्वयंवर व काही रामायणपर प्रकरणे लिहून त्यांनी रामप्रभूंचे गायन केलेच होते. कौल रघुनाथमध्ये त्या प्रथम रामचंद्राच्या राज्याभिषेकाचे वर्णन करतात. रामचंद्रांनी ज्या विविध देवांची रावणाच्या बंदिवासातून सुटका केली ते सगळे देव रामचंद्राच्या राज्याभिषेकाला उपस्थित होते. प्रत्यक्ष देवराज इंद्र, नाना भूपाळ, तेहतीस कोटी देव, शनी, गणपती हे सर्व रामचंद्रांना आशीर्वाद द्यायला येतात. वस्तुतः रामचंद्र म्हणजे 'मुख्य देव' किंवा 'राम हा देव देवांचा'. पण बाकीचे देव वयाने मोठे म्हणून ते प्रभूंना वात्सल्यभावाने आशीर्वाद देतात.

रामचंद्रांना त्या गरिबांचा कैवारी म्हणतात. रामांचे राज्य आल्याने लोकांची सर्वप्रकारच्या तापातून सुटका झाली. जणू रामप्रभु म्हणजे भाग्यसूर्य. त्यांचा उदयच अयोध्येचा भाग्योदय होय.

रामराज्याभिषेकाने अयोध्येत घडलेले प्राकृतिक परिवर्तन निवेदन करताना वेणाबाईंच्या प्रतिभेला बहर येतो. त्या म्हणतात – ''लाथ मारणाऱ्या गायी अक्षरश: कामधेनू झाल्या. वनातील सर्व वनस्पतींना कल्पतरूचे भाग्य व महिमान प्राप्त झाले. रस्त्यावरील साध्या खड्यांना चिंतामणीचे गुण लाभले तर मोठ मोठ्या गोट्यांना परीसाची शक्ती प्राप्त झाली. जी अयोध्या, कामधेनू, कल्पतरू, चिंतामणी व परीस या सर्वांनी नटली त्या अयोध्यानगरीचे भाग्य काय म्हणून वर्णन करावे? राज्याभिषेकानंतर रामांना भेटण्यासाठी जी प्रचंड गर्दी झाली त्यामध्ये गुरे, वासरे, लेकरे यांनी देखील दाटी होती असे त्या म्हणतात. यावरून रामचंद्रांची लोकप्रियता दिसून येते. पशुपक्षी देखील त्या प्रसंगी आनंदतात.

कौल याचा अर्थ आधार, आश्वासन किंवा संमती. राज्याभिषेकानंतर हजारो लोक प्रभू रामचंद्रांना भेटायला आले. प्रजेला राजाचा आधार असतो कारण मुलाच्या सुख-दु:खात पित्याने सामील व्हावे तद्वत राजा प्रजेच्या सुख-दु:खाचा सांगाती असतो. कौल रघुनाथाचा याचा अर्थ अयोध्येतील प्रजेला रघुनाथाचा आधार वाटतो. कौलचा आश्वासन असा अर्थ घेतल्यास भेटायला आलेली जनता आपले दु:ख दूर करण्यासाठी राजाजवळ आपल्या अडी-अडचणी सांगतात त्या दूर करण्याचे आश्वासन राजा त्यांना देतो. रघुनाथाचा कौल म्हणजे राजा झाल्यावर रामचंद्रांनी प्रजेला दिलेले आश्वासन होय. संमती या अर्थाने कौल शब्द घेतल्यास प्रजेने केलेल्या मागणीला रामचंद्रांनी दिलेली संमती म्हणजे रघुनाथाचा कौल होय. आता मागणारे लोक असंख्य आहेत. कुणी कुणी काय काय मागितले हे राजाने कसे लक्षात ठेवावे? या सर्व नोंदी राजाच्या सचिवाने ठेवायच्या असतात. लक्ष्मण हा रामचंद्रांचा सचिव आहे. तेव्हा प्रजेने मागितलेल्या गोष्टींना मंजुरी देताना रामचंद्र लक्ष्मणाला या सगळ्या मागण्यांची नोंद ठेवायला सांगतात. नोंद ठेवली म्हणजे आपण प्रजेला दिलेले आश्वासन पूर्ण केले की नाही याचा पडताळा आपला आपल्यालाच घेता येतो. अलिकडच्या मंत्र्यांना आपण प्रजेला काय आश्वासन दिले आहे हेच लक्षात राहात नाही आणि दिलेले आश्वासन पूर्णही करायचे नसते त्यामुळे नोंदी ठेवायचा प्रश्नच नसतो. अनेकदा सभास्थानी मंत्र्यांनी जनतेची स्वीकारलेली निवेदने स्टेजवरील कचरा आवरताना तिथेच सापडतात. रामचंद्र शब्दाला जागणारे आहेत. 'प्राण जाई पर बचन न जाई' अशा रघुकुळात त्यांचा जन्म झालेला आहे. म्हणून ते लक्ष्मणाला सांगतात – 'वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रे।' ओवी क्र. १५ ते ओवी क्र. २६ या सर्व १२ ओव्यांचा शेवटचा चरण 'वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रे।' असाच आहे. हाच रघुनाथाचा कौल होय. आधीच्या तीन चरणांमध्ये प्रजेने केलेल्या मागण्यांचा अंतर्भाव आहे. रामचंद्र इतके दयाळू आणि संपन्न आहेत की प्रजेच्या सगळ्या मागण्या ते मंजूर करतात. एकही मागणी ते फेटाळत नाहीत. त्यामुळे प्रजेवरही आंदोलन करण्याचा प्रसंग येत नाही.

प्रजेच्या ज्या मागण्यांची यादी वेणाबाईंनी केली आहे त्यावरून त्यांच्या प्रगल्भतेची उत्तुंगता दिसून येते. सर्वप्रथम शेतीविषयक मागण्या प्रजेला निमित्त करून वेणाबाई मागतात. वस्तुत: या मागण्या राजाच्या कक्षेतील नाहीत. उदाहरणार्थ – पाऊस वेळेवर पडावा, भूमीने भरपूर पीक द्यावे, पिकांना रोगराईचा फटका बसू नये अशा गोष्टी प्रजानन मागतात. आणि रामचंद्र तत्काळ त्या मंजूर करतात. त्याकाळात लोकांची अशी प्रामाणिक धारणा होती की राजा जर नीट वागला तर त्याच्या आचरणाच्या धाकाने प्रजादेखील व्यवस्थित आचरण करेल. जेव्हा राजा आणि प्रजा प्रकृतीच्या नियमांचे पालन करतात तेव्हा निसर्गदेखील आपल्या मर्यादेचे उल्लंघन करीत नाही. त्यामुळे दुष्काळ, रोगराई, भूकंप या सर्वांना अध्यात्मशास्त्रानुसार राजा किंवा राज्यकर्ते जबाबदार आहेत. आज परिस्थिती इतकी रसातळाला गेली आहे की लोकांना ही सर्व अंधश्रद्धा वाटू शकेल. रघुवंशात कालिदास म्हणतात – 'रामाच्या राज्यात एखादी नर्तकी जर रस्त्याच्या कडेला झाडाखाली पहुडली असेल तर वारादेखील वाहाताना ही काळजी घेईल की तिच्या अंगावरील वस्त्र बाजूला होणार नाही. रामचंद्र प्रजाजनांना तत्काळ आश्वासन देतात याचे कारण त्यांचा प्रकृतीला तेवढा धाक आहे. आता कोणाचाच कोणाला धाक राहिला नाही.

एवढेच नव्हे तर शेतात मनासारख्या बैलजोड्या असाव्यात. गायींनी कामधेनूसारखे भरपूर दूध द्यावे. शेतात डोलणारी पिके पाहून चित्त निवावे. धान्य साठविण्यासाठी प्रत्येक घराला तळघराची गरज भासावी. या मागण्याही रामराय मान्य करतात. प्रत्येक माणूस जर नियमाने वागला तर पशु-पक्षीही त्याला तशीच साथ देतील. आपल्या राज्यात कोणीही नियम मोडणार नाही याची रामांना खात्री असल्यामुळे ते नि:शंकपणे आश्वासन देतात, मनासारखे पुत्र-कन्या व्हावे, संतती कुरूप किंवा विद्रूप नसावी, वृद्धापकाळीदेखील तारुण्य टिकून राहावे, ग्रह आणि राशीचक्र अनुकूल असावे, संसारात कोणते विघ्न नसावे या मागण्याही रामचंद्र मान्य करतात. यावरून रामचंद्रांचा स्वत:च्या चारित्र्यावर असलेला विश्वास दिसून येतो. म्हणून समर्थ आपल्या रामराज्य प्रकरणात म्हणतात –

'राज्य या रघुनाथाचे । कळिकाळासि नातुडे।
बहुवृष्टि अनावृष्टी । हे कदा न घडे जनी ।।
उद्वेग पाहता नाही । चिंतामात्र नसे जनी ।।
व्याधि नाही, रोग नाही । लोक आरोग्य नांदती ।।
अद्‌भूत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळे।
अखंड दुभती धेनु । आरोग्ये वाहती जळे ।।
नद्या सरोवरे वापी । डोलती नूतने बने।
फळती फुलती झाडे । सुगंध वनवाटिका ।।

वस्तुत: या सर्व कल्पना म्हणजे आमच्या संस्कृतीची गरुड भरारी आहे. आज आमचे एवढे नैतिक पतन झाले आहे की त्यामुळे आपल्याला या सर्व कविकल्पना वाटतात किंवा अंधश्रद्धा वाटतात. आज प्लॅनेटरी हार्मनीनुसार अवकाशातील ग्रह आणि तारे यांनी कुठला नियम मोडला आहे का? ग्रहण केव्हा होणार हे खगोलशास्त्रज्ञ ५०० वर्ष आधी सांगू शकतात. याचा अर्थ ईश्वरीराज्यात नियमभंग नाही. माणसाने ताळतंत्र सोडले आहे. रामचंद्रांना खात्री आहे की आपल्या राज्यात

कुणीही नियमभंग करणार नाही. भारतीय माणूस जेव्हा परदेशात जातो तेव्हा वाहतुकीचे नियम पाळतोच ना? कारण तिथे प्रत्येक चुकीला दंड आहे, शासनाचा धाक आहे, आपल्याकडे सरकारी यंत्रणेतच नियमभंगाची स्पर्धा सुरू असते. गांधीजींनी इंग्रजांच्या विरुद्ध वापरलेले कायदेभंगाचे शस्त्र सध्या राज्यकर्ते राष्ट्राची हत्या करण्यासाठी, स्वत:साठी वापरत आहेत. रामांना आपल्या राज्यातील नागरिकांची खात्री वाटते.

नागरिक दयाशील असावेत, चतुर असावेत, धार्मिक असावेत, त्यांना सर्वत्र समबुद्धी असावी. सर्व प्रजेचे कल्याण व्हावे, दु:ख, शोक, अकालमृत्यू यातील काही नसावे. या मागण्यादेखील रामराय मान्य करतात. अशा प्रकारचा समाज घडविण्यासाठी राजाने किती कर्तव्यकठोर असायला हवे तसेच राजाचे चारित्र्य कसे शुद्ध हवे याची कल्पनाच केलेली बरी. राजाने प्रजेचे पालन मोठ्या प्रेमाने करावे हे सांगताना वेणाबाई म्हणतात. 'तुझ्या दर्शनी आडकाठी नको रे' याचा अर्थ राजा आणि प्रजा यांच्यात संपर्क आणि सुसंवाद हवा. कोणत्याही नागरिकाला राजाला भेटून आपले दु:ख सांगता यावे. आता मुख्यमंत्र्यांनाच पंतप्रधानांच्या भेटीसाठी दिल्लीत दोन-दोन, तीन-तीन दिवस तळ ठोकायला लागतो. सामान्य नागरिक आणि राज्यकर्ते यांच्यात प्रचंड दरी निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या हेच याचे एकमेव कारण नाही. कुणालाही काम करायला नको ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या रामराज्याची म्हणजेच रामासारख्या थोर राजाची आज राष्ट्राला गरज आहे.

वेणास्वामीकृत कौल रघुनाथाचा असा आहे...

।। श्रीराम ।।

कौल रघुनाथाचा (बाडांक १२४ वरुन)

दिल्ही भेटी भरतासी उत्साव गाजे। रघुराज राज्याभिषेके विराजें।
पहाव्या सुखें लोक भूपाळ आले। रघुराज आज्ञे महीपाळ गेले ।।१
नमस्कार केला सुरेंद्रें महींद्रा। प्रभूनें अनुज्ञा दिल्ही देवइंद्रा।
पुजामान पाहोन संतुष्ट जाला। सवें देव तेतीस काटी निघाला ।।२
तया रावणाच्या भये लोक गेले। सुवर्णाचळाचे दरी वास केले।
पथीं देखिलें दैन्यवाणे प्रजांसी। उभा राहिला इंद्र सांगे तयासी ।।३
प्रजा हो पळाल्यात ज्याच्या भयानें। तया रावणा मारिलें राघवानें।
सुरांच्या बळे फोडिल्या बंदीशाळा। गुढी राजराज्यी जना सौख्य वेळा ।।४
पटीं बैसला राम कल्याण राजा। दुराई फिरे रे गरीबें नवाजा।
अरे लोक हो जाहले येकछत्री। प्रभू रामराजा विराजे धरत्री ।।५
जनाची पिढा पाप संताप गेला। प्रभू राम हा भाग्यसूर्योउदेला।
खडाणा गौउ जाहल्या कामधेनू। वनें वल्ली कल्पतरु काय वानूं ।।६
खडे सूर्य चिंतामणी परीस गोटे। मला देखता थोर आश्चर्य वाटे।
प्रजा हो तुम्ही सीघ्र आतां चि जावे। समस्तांसी कल्याणराजा पहावें ।।७
तुम्ही भोगिले कष्ट आरण्यवासी। तयाची फळ श्रुती झाली त्वरेसी।
अपेक्षेंहुनी आगळें वंद्य जें जें । सुखें रामराज्ये जना सामराज्ये ।।८
मोहोत्साव उत्साव पाहोनी आलों। अयोध्येपुरीहूनी आतां निघालो।
समस्ता जना थोर आनंद जाला। सुरी मानवीं जयजयकार केला ।।९
अरे लोक हो क्लेश सोडूनी द्या रे। रघुराज पादांबुजें जा पहा रें।
स्थळा आपुल्या इंद्र सांगूनि गेला। गुरें लेकरे लोक सैरा निघाला ।।१०
प्रजा कष्टल्या चालिल्या शीण सांगो। अयोध्याधीशा राघवा कौल मागो।
गुरें वासुरे लेकुरे गर्द जाला। अयोध्येसमीपे बहू लोक आला ।।११
रघुनाथजी सांगती दूत वार्ता। प्रजालोक बाहेरी आल्या समर्था।
रघूनायकें सर्व ही आणवीलें। सभामंडपाते असंभाव्य आले ।।१२
प्रभु देखिला जयजयकार केले। नमस्कार साष्टांग घालू निघालें।
कृपासागरें पाहिलें त्या प्रजासी। उठा रे उठा राम बोले तयासी ।।१३
रघुराज सिंव्हासनी सौख्यदाता। प्रजा कौल मागावया त्या उदिता।
प्रभु बोलिला रे अपेक्षित मागा। नका हेत ठेऊ समस्तैक सांगा ।।१४
बहू कष्टलों पातलों जी स्वदेशा। प्रजा बोलती कौल दे रघवेशा।
भूमीनें कदा पीक सांडू नये रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रे ।।१५
मनासारिखे मेघवृष्टीने व्हावें। जया पाहिजे ते प्रसंगी पडावे।
समर्था कदा रोगवारे नको रे। वदे राम लक्ष्मुमणा हें लिही रें ।।१६
पिकें देखता सर्व चित्ते निवाली। असावी गृही सग्रही पेव पालीं।
बिजें बीज कोणासी मागो नये रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।१७
मनाची अपेक्षा पुरे बैल गाडे। घरी दूभतीं काम धेनू च पाडे।
रघूनाथजी भाग्य येथेष्ट दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।१८
मनासारिखी पुत्र कन्या कलत्रें। अभिवृद्धि वाढो पवित्रें विचित्रें।
सखी पारखी सायरी प्रीति दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।१९
कुरुपी विरुपी कदा हि नसावे। नको वृद्ध काया तरुणी असावे।
दिनानाथजी शक्ति उदंड दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२०
ग्रहे सर्व राशी शुभाईक व्हावे। सखे मैत्र तैसे च ते हि असावे।
समर्था कदा विघ्नवार्ता नको रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२१
सदा वासना धर्मपंथे असावी। दयाशील चातुयर्ता श्रेष्ठ द्यावी।
समर्था प्रभू पापबुद्धी नको रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२२-१
दयाशील चातुर्यता श्रेष्ठ द्यावी। समबुद्धि सर्वत्र भूती असावी।
रघूनाथजी सर्व कल्याण दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२२-२
नको दु:ख आम्हां नमो शोक आम्हां। तुझें राज्य तो मृत्य नकोचि आम्हां।
रघूनाथजी सर्व सौख्यासी दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२३
प्रीतीने प्रजा पाळी रे रामराया। नको दैन्यवाणी करी दिव्य काया।
शरीरीं कदा रोगराई नको रें। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२४
कुडें खोडी कापट्य काही नसावे। सबाह्ये शुचिष्मांत सत्ये जगावें।
तुझ्या दर्शनी आडकाठी नो रें। वदे लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२५-१
प्रपी भुलोनी तुला विसरावे।
अशी वासना दुष्ट रामा नको रे। वदे लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२५-२
प्रभू क्लेश घेऊन विश्रांति द्यावी। देहे तोवरी भक्ति तुझी घडावी।
वेणीस्वामी ऐसापरी कौल दे रे। वदे राम लक्ष्मुमणा हे लिही रें ।।२६
रघूनाथजी कौल देऊनि आम्हां। कृपाळूपणे पाळिजो श्री रामा।
म्हणे वेणी स्वामी ऐसापरी कौल दे रे। अहो रामराया ।।२७
।। श्री कौल संपूर्ण ।। श्रीरामापर्णमस्तु ।।

सुनील चिंचोलकर
अजिक्यनगर, हिंगणे खुर्द, पुणे ४११०५१
फोन : ०२०-२४३४८०७०



अभिमान माझा झणी सांडिसी हो ।।

सौ. हर्षदा जोशी

बी.एच.एस.सी., गृहिणी

श्री. सुनीलजी चिंचोलकरांबरोबर श्रीसमर्थांच्या कार्याचा प्रचार व प्रसार कार्य. श्री. चिंचोलकर यांच्या लेखनिक म्हणून कार्यरत. त्यांच्या साहित्य वाङ्मयाचे कार्य पाहतात.

समर्थ रामदासस्वामींच्या शिष्यपरंपरेमध्ये कल्याणस्वामी आणि वेणास्वामी या दोघांचे स्थान निर्विवाद सर्वोच्च आहे. बालविधवा असलेल्या वेणाबाईंच्या जीवनाला सद्गुरु रामदासस्वामींचा परिसस्पर्श झाला आणि त्यांचे जीवन कृतार्थ झाले. समर्थांनी त्यांना मिरज-मठाचे मठपती केले. समर्थांच्या आशीर्वादाने आणि रामरायाच्या कृपेने त्यांची प्रज्ञाशक्ती जागृत झाली आणि त्यांनी विविध रामायणे, स्फुट प्रकरणे, पदे, सीता स्वयंवर अशा विविध प्रकारच्या वाङ्मयाची रचना केली.

'अभिमान माझा रुणी सांडिसी हो' हे वेणाबाईंच्या काव्यप्रकारातील एकमेव करुणाष्टक आहे. आपल्यामधील दोषांची जाणीव होऊन ते दोष नाहीसे व्हावे ही तळमळ निर्माण होते. हे दोष दूर करण्याची क्षमता ज्या भगवंतामध्ये आहे त्याला आर्ततेने जी प्रार्थना केली जाते ती प्रार्थना म्हणजे करुणाष्टक होय. आपल्यातील सर्व दोष, चिंता, क्लेश, दु:ख दूर करण्याचे सामर्थ्य फक्त एक भगवंत आणि दुसरे सद्गुरु या दोघांमध्येच असते. भगवंताच्या भेटीची म्हणजेच भगवत्प्राप्तीची ओढदेखील अतिशय तळमळीने, आर्ततेने करुणाष्टकांद्वारे व्यक्त केली जाते. करुणाष्टकांची रचना अशी असते की भगवंताच्या किंवा सद्गुरूंच्या मनात आपल्याबद्दल करुणा निर्माण होऊन त्याने आपला उद्धार करावा. तात्पर्य करुणाष्टकात करुणरस भरलेला असतो.

समर्थांनी 'आनंदवनभुवनी, श्रीराम राम हे म्हणा' अशा काही अष्टाक्षरी रचना केल्या. त्यांच्या बारा अक्षरी रचनादेखील अनेक आहेत. उदाहरणार्थ 'मनाचे श्लोक', त्याचप्रमाणे 'रघुनायका काय कैसे करावे', भवाचा वीट, बाहेरगावचा मारुती, परशुरामाची प्रार्थना, समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे इ. करुणाष्टके. वेणाबाईंच्या वाङ्मयावर समर्थांच्या शैलीचा खूप प्रभाव आहे. वेणाबाईंचे हे करुणाष्टक वाचताना समर्थांच्या करुणाष्टकांची वारंवार आठवण होते. मुळात करुणाष्टक म्हणजे रामदासस्वामी हे समीकरण जनमानसात पक्के रूजले आहे. समर्थांनी हा काव्यप्रकार लोकप्रिय केला. वेणाबाईंचे हे करुणाष्टक बारा अक्षरी आहे. याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेणाबाई स्त्रीसंत असल्यामुळे या रचनेमध्ये स्त्रीलिंगी उल्लेख आहे. उदाहरणार्थ दिनाहूनी मी दीन आम्ही 'तुझी' जि। किंवा 'समर्था 'तुझी' पाळिती भाग्यवंता। किंवा 'घडेना तुझे दास्य आम्ही 'अशी' जी। किंवा 'गुणेहीन आम्ही 'तुझी' की समर्था। इत्यादी.

वेणाबाईंच्या या करुणाष्टकातील प्रत्येक ओवीचा शेवटचा चरण 'अभिमान माझा झणी सांडिसी हो' असा आहे. येथे अभिमान हा शब्द अहंकार या अर्थाने आला आहे. वेणाबाई रामरायाकडे आपल्यामधील अहंकार लवकर गळून पडावा अशी वारंवार प्रार्थना करतात. समर्थांनीदेखील 'बुद्धि दे रघुनायका', 'रघुनायका मागणे हेचि आता' 'रघुनायका काय कैसे करावे', 'तुझा दास मी वेर्थ जन्मासी आलो' अशा करुणाष्टकातून आपल्यातील दोष नाहीसे व्हावे म्हणून प्रार्थना केली आहे. वास्तविक समर्थांमध्ये किंवा वेणाबाईंमध्ये हे दोष नव्हतेच पण त्यांनी तुमच्या-आमच्या सर्वसामान्य लोकांची मन:स्थिती आपल्या अशा रचनांमधून वर्णन केली आहे. अहंकारामुळे माणसाच्या सर्व चांगल्या गुणांना ग्रहण लागते. बासुंदीत मिठाचा खडा पडल्यावर जसे व्हावे तशी माणसाची अवस्था होते. सर्व काही मिळवूनही त्याने सर्व काही गमावलेले असते. म्हणून अहंकार गळून पडावा यासाठी वेणाबाई प्रार्थना करतात.

दिनानाथ हे नाम सीतावरा जी ।
दिनाहूनी मी दीन आम्ही तुझी जि ।
उचीतासी मिळेल तैसे करा हो ।
अभिमान माझा झणी सांडिसी हो ।।१ ।।

अर्थ : सीतावराला म्हणजेच श्रीरामांना दिनानाथ असेही एक नाव आहे. मी दिनाहूनही दीन आहे तरीही तुझी आहे. माझ्यासाठी जे योग्य आहे ते तुम्ही करावे. तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाईंनी या करुणाष्टकामध्ये रामचंद्रांना वेगवेगळ्या विशेषणांनी संबोधित केले आहे. भगवती सीतेने श्रीरामांना वरले म्हणजे सीतेचे पती म्हणून त्यांना सीतावर म्हणतात. श्रीरामांना दिनानाथ म्हणतात, कारण ते दीनांचे कैवारी आहेत. त्यांचे रक्षण करणारे आहेत. शबरी एक भिल्लीण होती. गरीब होती. तिचे सद्गुरु मतंगऋषी

यांच्या निर्याणानंतर ती त्यांच्या उपदेशानुसार आश्रमात एकटी रहात होती. श्रीरामांची अखंड प्रतीक्षा करीत होती. त्यांचे चिंतन, त्यांचा जप, त्यांच्या पूजेची सिद्धता असा तिचा दिनक्रम वर्षानुवर्षे चालला होता. वनवासकाळात सीताशोध करीत असताना श्रीराम बंधु लक्ष्मणासह मुद्दाम वेगळी वाट करून शबरीला भेटले. वनवासातील सारे नियम अपवाद म्हणून बाजूला ठेवून प्रभु श्रीरामांनी शबरीची पूजा स्वीकारली आणि तिचा उद्धार केला.

वेणाबाई रामरायाला अत्यंत लीनतेने, नम्रपणे सांगतात की मी अज्ञानी आहे, दीन आहे. पण तरीही मी तुमची आहे. भगवंताला दैन्यभाव प्रिय आहे. अभिमान अहंकार या गोष्टींचा तो द्वेष करतो. महर्षी नारद यांचे नारदभक्तीसूत्रामध्ये वर्णन करताना म्हणतात – 'ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वाद् दैन्यप्रियत्वाच्च' ।।२७।। समर्थदेखील 'श्रीरामाचे उपकार' या करुणाष्टकात स्वत:बद्दल सांगताना –

'हिणाहून मी हीण जैसे भिकारी ।
दिनाहून मी दीन नाना विकारी ।'

असे म्हणतात. जो लीन आहे, नम्र आहे, शरणागत आहे त्याला परमेश्वर नेहमी जवळ करतो. वेणाबाई रामरायाकडे अशी अपेक्षा व्यक्त करतात की मी तुमची असल्यामुळे माझ्यासाठी योग्य असणाऱ्या, माझे कल्याण करणाऱ्या सर्व गोष्टी तुम्ही मला द्याव्यात.

वेणाबाई आपल्यातील अहंकार नाहीसा व्हावा अशी रामरायाकडे प्रार्थना करतात. अभिमान असावा पण अहंकार नसावा. सर्व चांगल्या गोष्टींबद्दल मनुष्याला अभिमान असला पाहिजे. मी भक्त आहे, मी भ्रष्टाचार करीत नाही, आपला देश, धर्म याबद्दलचा अभिमान असणे चांगले आहे पण त्याने अहंकारी असू नये. सर्वच संतांनी आपल्या वाङ्मयामधून अहंकारामुळे माणसाचे होणारे नुकसान, होणारे अध:पतन याबद्दल वारंवार सांगितले आहे आणि अहंकारत्यागाचा उपायही सांगितला आहे. संत नामदेव महाराज अहंकाराचा वारादेखील लागू नये अशी प्रार्थना करतात. आपल्या पसायदानामध्ये ते म्हणतात,

'अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझिया विष्णुदासा भाविकासी ।'

घडे मागणे सांगणे ते यथार्था ।
रघुनाथजी तूचि माझ्या गुजार्था ।
असो जन्मदारभ्य नेणो दुजा हो ।
अभिमान माझा झणी सांडिसी हो ।।२ ।।

अर्थ : मी तुझ्याकडे काय मागणे मागावे ते तू मला सांग. गुजार्था या शब्दाचे दोन अर्थ आहेत म्हणून या चरणाचे दोन अर्थ होऊ शकतात. १) गुजार्था = गुह्य, रहस्य. हे रघुनाथा, माझ्या मनातील रहस्य तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला कळणार? २) गुजार्था = कल्याणाचे. पहिल्या चरणाला जोडून घेतल्यास या चरणाचा अर्थ, हे रघुनाथा, जे माझ्या कल्याणाचे आहे असे मागणे तू माझ्याकडून मागवून घे. जन्मदारभ्य म्हणजे जन्मापासून. या चरणाचेदेखील दोन अर्थ होऊ शकतात. १) मी जन्मापासून तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाही जाणत नाही. २) तू मला माझ्या जन्मापासून ओळखतोस. तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाई रामरायाला लडिवाळपणे म्हणतात की रघुनाथा, मी तुझ्याकडे काय मागावे हे मला कळत नाही. त्यामुळे जे माझ्या कल्याणाचे आहे, जे माझ्यासाठी योग्य आहे असे काय मागायचे ते तूच मला सांग. तू मला तशी बुद्धी दे. समर्थदेखील आपली हीच भावना व्यक्त करताना चौपदीमध्ये म्हणतात –

'मागो नेणे दे रे राम। मज न कळे ते दे रे राम।।' आणि 'रघुनायका मागणे हेचि आता' या करुणाष्टकातही 'समर्थापुढे काय मागो कळेना' असे म्हणतात. भगवंतासमोर उभे राहिल्यावर काय मागायचे हेदेखील कळले पाहिजे. नाहीतर गोंदवलेकर महाराज म्हणतात त्याप्रमाणे – 'आम्ही दुकान काढले आहे केशर कस्तुरीचे पण गिऱ्हाईक सारे हिंगमिऱ्याचे', अशी बहुतेकांची मानसिकता असते.

एक गंमतशीर कथा आहे. येशूचा एक भक्त रोज चर्चमध्ये जात असे. येशूसमोर उभे राहून तो ५ ते ६ वेळा एबीसीडी – झेड पर्यंत म्हणत असे. दोन-तीन दिवस पाद्रीने ते पाहिले आणि त्याला त्याचे कारण विचारले. त्यावर तो भक्त म्हणाला, 'येशूला काय मागावे हे मला कळत नाही म्हणून मी ५-६ वेळा ए टू झेड म्हणतो आणि येशूला सांगतो एवढी अक्षरे मी तुला दिली आहेत. तूच आता माझ्यासाठी योग्य आणि कल्याणाची प्रार्थना तयार कर आणि त्याप्रमाणे मला सर्व गोष्टी मिळू दे.

पहिल्या अर्थानुसार वेणाबाई रामरायाला म्हणतात की मी जन्मापासून तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाही जाणत नाही. 'त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।' अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे तू माझ्यावर कृपा करून माझ्यातील सर्व दोष नाहीसे कर अशी प्रार्थना करतात. दुसऱ्या अर्थानुसार वेणाबाई रामरायाला म्हणतात की तू मला माझ्या जन्मापासून ओळखतोस. मी कशी आहे, माझ्यातील चांगल्या-वाईट गोष्टी, माझे प्रारब्ध, पाप-पुण्याचा संचय, माझे भूत-वर्तमान-भविष्य हे सारे फक्त तूच जाणतोस. माझे जीवन कसे असावे हे पूर्णपणे तुझ्या कृपेवर अवलंबून आहे. म्हणून तू माझ्यावर कृपा कर अशी त्या प्रार्थना करतात.

वेणाबाई आपल्यामधील अहंकार गळून पडावा अशी विनंती करतात. एकनाथ महाराज अहंकाराचा धोका सांगताना म्हणतात –

'मी मी म्हणता वाया गेले सर्व । पाहे तू अपूर्व नवल बापा ।
रावण नासला मी पणे गेला । रामे क्षय केला पुत्रपौत्रा ।
ऐसे ते बहुत मीपणे नासले । एका जनार्दनी भले मीपण रहित ।।'

वेणाबाईंना अहंकाराचा हा धोका ठाऊक आहे. म्हणून यापासून आपले रक्षण करावे अशी विनंती त्या करतात.

अभक्ते नव्हे भक्तवंसी मिरासी ।
परंतु हिने दुर्बळे निश्चयेसी ।
तुझी पोसणी सर्व गुणी पहा हो ।
अभिमान माझा झणी सांडिसी हो ।।३ ।।

अर्थ : मी अभक्त नाही तर भक्ताच्या वंशातील आहे. तुझी भक्ती

ही माझी मिरासी आहे. पण असे असूनही मी हीन, दुर्बळ झाले आहे आणि आपण असे आहोत हा मनाचा निश्चय दिवसेंदिवस दृढ होत चालला आहे. तू सर्वगुणसंपन्न असून सगळ्यांना सांभाळणारा आहेस. तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे.

विवेचन : तुझ्या आशीर्वादामुळे आणि माझ्या पूर्वपुण्याईमुळे मी अभक्त न होता तुझ्या भक्ताच्या वंशातील एक भक्त झाले आहे. **'बहुत सुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठली आवडी।'** हे भाग्य मला लाभले आहे. तुझी भक्ती हा माझ्याकडील सर्वात मोठा ठेवा आहे. पण असे असूनही मी स्वत:ला हीन, दुर्बल समजू लागले आहे. माझा आत्मविश्वास कमी झाला आहे. माझ्यामधील कार्यक्षमतेबद्दल मी साशंक झाले आहे. आपण असेच आहोत हा निश्चय मनामध्ये इतका ठामपणे रूजला आहे की त्यातून मी बाहेर पडू शकत नाही. वास्तविक पाहता यातील कोणतेही दोष वेणाबाईंमध्ये नाहीत. पण त्या सर्वसामान्य जनांचे प्रतिनिधित्व करीत आहेत.

काही माणसांना आत्मघृणा करण्याचा रोग जडलेला असतो. त्यामुळे ते स्वत:कडे सतत नकारात्मक दृष्टीकोनातूनच पहात असतात. आपण सामान्य आहोत, दुबळे आहोत, आपल्यामध्ये अनेक दोष आहेत असे म्हणत कर्म करण्याचे टाळतात. तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, रामदासस्वामी हे अवतारपुरुष असल्यामुळे, संत असल्यामुळे त्यांच्या हातून महान कार्य घडले. सर्वाभूती परमेश्वर त्यांना पाहता आला. आपल्याला कुठे त्यांच्यासारखे होता येणार आहे? त्यांच्या सावलीलासुद्धा स्पर्श करण्याची आपली पात्रता नाही. त्यांच्या नखाचीसुद्धा सर आपल्याला येणार नाही असा खोटा नम्रतेचा बुरखा पांघरून प्रयत्नवाद टाळतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये क्षमता असूनही ते कुठलीही गोष्ट यशस्वीपणे करू शकत नाही. ही मानसिकता म्हणजेसुद्धा एक प्रकारचा अहंकारच आहे. म्हणून वेणाबाई रामरायाला विनवितात की तू सर्वगुणसंपन्न आहेस.तु्ला तुझे भक्त प्रिय आहेत. तू त्यांचा गुण-दोषांसकट स्वीकार करून सांभाळ करतोस. तुझ्या कृपाकटाक्षामुळे त्यांचे सारे दोष नाहीसे होतात. तसे माझ्यातील दोष, दुर्बलता नष्ट कर आणि माझ्यातील अहंकार लवकर गळून पडू दे. तुकाराम महाराजदेखील अहंकारामुळे माणसाचे मन विटाळले जाते, मनाची शुद्धता, सात्विकता कमी होते असे म्हणतात. मनातील शुद्धता, पावित्र्य कमी झाले की साहजिकच त्याचा परिणाम आचारविचारांवर होतो.

पतीते दिने रंक आम्ही पहाता।
समर्था तुझी पाळिती भाग्यवंता।
सखा तुजवाचूनि नेणो दुजा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।४।।

अर्थ : आम्ही पतित, दीन, रंक आहोत. तरीही आम्ही तुझे असल्यामुळे तू आमचा सांभाळ करतोस. असे आम्ही भाग्यवंत आहोत. या जगात तुझ्याशिवाय आमचे दुसरे कुणीही नाही. तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाई रामरायाजवळ आपली भावना व्यक्त करतात की मी पतित आहे, दीन आहे, रंक आहे. पटकन लक्षात यावा असा कोणताही गुण माझ्याकडे नाही. पण तू पतितपावन आहेस आणि पतितांना पावन करून, त्यांचा उद्धार करून तू हे नाव सार्थ करतोस. तू आता माझा स्वीकार केल्यामुळे मी तुझी झाले आहे. स्वत:ला खूप भाग्यवान समजत आहे. रामरायाने जेव्हा समर्थांचा स्वीकार केला तेव्हा त्यांनी 'श्रीरामाचे उपकार' या करुणाष्टकात रामरायाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे - 'पतीतांसि रे आणि हाती धरावे। समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे।'

वेणाबाई रामरायाला म्हणतात की आता तुझ्याशिवाय आम्ही इतर कुणालाही ओळखत नाही. जाणत नाही. **'तूच माय बाप बंधू। तूच प्राणसखा।'** हीच आता माझी दृढ श्रद्धा आहे. समर्थसुद्धा 'अनुदिन अनुतापे तापलो रामराया' या करुणाष्टकामध्ये 'सकळजनसखा तू स्वामि आणीक नाही।' हाच भाव व्यक्त करतात. श्रीराम आदर्श सखा आहेत. अग्नीला साक्षी ठेवून हनुमंताने श्रीराम आणि सुग्रीव यांच्यामध्ये मैत्रीचे नाते प्रस्थापित केले. श्रीरामांनी वालीवध करून सुग्रीवाला मदत केली. त्याचे राज्य, संपत्ती, त्याची वालीने अपहरण केलेली पत्नी त्याला परत मिळवून दिली. त्याच्यासाठी इतके सारे करूनही राज्य मिळाल्यावर तो भगवती सीतेच्या शोधासाठी उशीर करू लागला. श्रीरामांनी सुग्रीवाला याची कडक शब्दात जाणीव करून दिल्यावर तो शरण आला. त्याने भगवती सीतेची शोधमोहीम यशस्वी केली. श्रीरामांनी सुग्रीवाला एकदा सखा मानल्यावर ते नाते टिकविले आणि सुग्रीवाला चुकीबद्दल क्षमा केली. आमच्याही चुकांबद्दल, दोषांबद्दल उदार अंत:करणाने क्षमा करावी असे वेणाबाई रामरायाजवळ विनवितात. 'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।' हे भगवंताने श्रीमद् भगवद्गीतेमध्ये दिलेले आश्वासन रामराय आपल्याबाबतीतही पूर्ण करीत असल्यामुळे वेणाबाई स्वत:ला अतिशय भाग्यवान समजतात. या भाग्याचे सारे श्रेय त्या रामरायाला देतात.

अहंकारामुळे मानवी जीवनाचे कसे सतत नुकसान होत असते याचे वेणाबाईंना स्मरण आहे. समर्थ मनाच्या श्लोकामध्ये ठिकठिकाणी अहंकारामुळे कशी हानी होते याची जाणीव करून देतात. उदाहरणार्थ अहंतागुणे सर्वही दु:ख होते, जुने ठेवणे मीपणे आकळेना. अहंभाव मानसीचा विरेना। तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना।' इत्यादी. हे नुकसान होऊ नये म्हणून अहंकारनिर्मूलनासाठी वेणाबाई रामरायाकडे याचना करतात.

'घडेना दास्य आम्ही अशी जी।
रघुनाथजी लोभ सांडू नका जी।
न साजे उपेक्षा तुला वीरबाहो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।५।।

अर्थ : माझ्या हातून तुझे दास्य घडत नाही, तरीही रघुनाथा, तू माझ्यावरील लोभ कमी करू नकोस. हे वीरबाहो, तू माझी उपेक्षा करणे हे तुला साजेसे होणार नाही. तुझ्या कृपेने माझा अहंकार गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाई रामरायाला अत्यंत कष्टी अंत:करणाने

म्हणतात की मी स्वत:ला तुझी भक्त म्हणविते. दास समजते पण माझ्या हातून तुझी काहीच सेवा घडत नाही. दास्य घडत नाही. पण तरीसुद्धा हे रघुनाथा, मी तुझीच भक्त असल्यामुळे तू माझ्यावरचा लोभ, स्नेह कमी करू नकोस. माझ्या या चुकीबद्दल तू मला क्षमा कर. समर्थसुद्धा 'तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलो' या करुणाष्टकामध्ये 'नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालो। तुझा दास मी वेर्थ जन्मासी आलो।। समर्था तुझे दास आम्ही निकामी। अहंता मनी शब्दज्ञाने बुडालो। देहे दु:ख होता च वेगी पळालो।' अशी खंत व्यक्त करतात.

वेणाबाई रामरायाला त्याच्या पराक्रमाची आठवण करून देतात. महाराज जनकांकडे असलेल्या भगवान शंकराच्या प्रचंड धनुष्याला प्रत्यंचा जोडण्याचा पराक्रम करून सीता स्वयंवराचा पण जिंकला आणि भगवती सीतेचे पाणीग्रहण केले. वेणाबाई म्हणतात की तुझा हा पराक्रम सर्वांना थक्क करणारा होता. तू असा वीरबाहू, महापराक्रमी आहेस आणि तुझ्यापुढे मी मात्र अतिशय हीन-दीन, दुर्बल आहे. त्यामुळे तू जर माझी उपेक्षा केलीस तर ते तुझ्या पराक्रमाला शोभणार नाही. 'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी'. तू आपल्या भक्तांची कधीही उपेक्षा करीत नाही हे मला माहिती आहे. म्हणून तू माझी उपेक्षा करू नकोस. तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे. समर्थ ग्रंथराज दासबोधामध्ये अहंकारी मनुष्याला सावधानतेचा इशारा देताना म्हणतात –

'मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी।
राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ति प्रताप।।'

वेणाबाई सावध असल्यामुळे त्या अहंकार निरासासाठी प्रार्थना करतात.

दिने सांडिता दीनबंधु विशेष।
ब्रिदे सूटती हे विचारा बरेसे।
तुझे तुज साजे समर्था करा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।६।।

अर्थ : तू दीनबंधु म्हणून विशेषत्वाने ओळखला जातोस. माझ्यासारख्या दीनाला जर तू बाजूला केलेस, माझी उपेक्षा केलीस तर तुझ्या या ब्रीदाचे काय होईल याचा योग्य विचार तू करावा. तू समर्थ आहेस. तुला शोभेल असे तू कर. तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार गळून जाऊ दे.

विवेचन : या ओवीमध्ये वेणाबाई रामरायाला दीनबंधु आणि समर्थ या दोन विशेषणांनी संबोधतात. त्या रामरायाला म्हणतात की तुझी दीनबंधु म्हणून विशेष ओळख आहे. तू दीनांचा कैवारी आणि भक्तांचा सोयरा आहेस. तुझ्याकडे वर्णावर्ण भेद नाही. गरीब-श्रीमंत असा पक्षपात नाही. आप-पर भाव नाही. भिल्लांच्या राजालासुद्धा (निषादराज गुह) तू आपला मित्र मानतोस. त्याला स्नेहभावाने मिठी मारून त्याची आस्थेने विचारपूस करतोस. एवढेच नव्हे तर राज्याभिषेक प्रसंगी त्याला आठवणीने निमंत्रण देऊन अयोध्येत त्याचे योग्य आदरातिथ्य करतोस. 'जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे', हा विश्वास तू नेहमी सार्थ ठरवितोस. असे असताना तू जर माझ्यासारख्या दीन, दुर्बळ भक्ताची उपेक्षा केलीस, माझ्याकडे लक्ष दिले नाहीस तर तुझ्या दीनबंधु म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ब्रीदाचे काय होईल? भगवंत सतत आपल्याबरोबर आहे, आपला पाठीराखा आहे हा लोकांचा तुझ्याबद्दलचा जो ठाम विश्वास आहे, श्रद्धा आहे त्याचे काय? या गोष्टीचा तू योग्य विचार कर आणि माझ्या हाकेला तुला साजेसा प्रतिसाद दे. समर्थदेखील 'रघुनायका मागणे हेचि आता' या करुणाष्टकात रामरायाला त्याच्या ब्रीदाची आठवण करून देतात.

'ब्रिदाकारणे दीन हाती धरावे।
म्हणे दास भक्तांसि रे उधरावे।
सुटो ब्रीद आम्हासि सांडूनि जाता।
रघुनायका मागणे हेचि आता।।'

आणि 'रामावर भार' या करुणाष्टकात रामरायाला प्रश्न विचारतात – 'दिनाचे उणे दीसता लाज कोण्हा। जनी दास दीसे तुझा दैन्यवाणा।' तुझा दास, तुझा भक्त म्हणून मला सगळे ओळखतात आणि तू जर माझी उपेक्षा केलीस तर माझी अवस्था पाहून तुला लोक काय म्हणतील? तुझ्या दीनबंधु या ब्रीदावरचा विश्वास उडेल.

प्रभु श्रीरामांची समर्थ म्हणून ख्याती आहे. कुमारवयातच त्यांनी महर्षी विश्वामित्रांच्या आज्ञेने त्राटिकेसारख्या महाभयंकर राक्षसिणीचा वध करून जनतेला भयमुक्त केले. सुबाहूचा वध केला, मारिचाला शासन केले आणि विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण केले. पुढे वनवासात असताना पंचवटीत (नाशिक) खर, दूषण, त्रिशीर, १४ सहस्र राक्षस यांचा वध करून जनमानसात निर्भयतेचे, शांततेचे वातावरण निर्माण केले. श्रीराम सर्वांचे रक्षण करण्यास समर्थ आहेत. म्हणून वेणाबाई रामरायाला प्रार्थना करतात की तू माझी उपेक्षा करू नकोस. तुझ्या ब्रीदाला शोभेल असे कर आणि तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार गळून जाऊ दे.

गुणी आगळा तू प्रभू भाग्यवंता।
गुणहीन आम्ही तुझी की समर्था।
तुझ्या पल्लवियासी कैसे करा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।७।।

अर्थ : पहिल्या चरणाचे दोन अर्थ होऊ शकतात. १) हे प्रभु, तू सर्व गुणांनी युक्त असल्यामुळे भाग्यवंत आहेस. २) तू भाग्यवान असल्यामुळे सर्व गुण तुझ्यामध्ये आहेत. तुझ्यासारख्या समर्थाची भक्त असूनही आम्ही तुझ्याइतके गुणवान नाही. आता, आम्ही तुझ्या चरणाशी आलो आहोत. तुझ्या कृपेने माझा अहंकार गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाईंना रामरायामध्ये असलेल्या गुणांबद्दल खूप कौतुक वाटते. म्हणून त्या म्हणतात की तुझ्यामध्ये किती गुण सामावले आहेत! तू सद्गुणांची खाण आहेस. ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान, वैराग्य अशा गुणांनी युक्त असा षड्गुणैश्वर्य आहेस. या गुणांमुळेच तुझे वेगळेपण उठून दिसते. तू एकमेवाद्वितीय आहेस. समर्थांनी मनाच्या श्लोकात 'प्रतापे बळे आगळा सर्व गुणे।' असे म्हटले आहे. तू किती भाग्यवान आहेस. तुझ्या गुणांचे वर्णन तरी कसे करणार? किती करणार? कोणकोणत्या गुणांचे वर्णन करणार? समर्थांनादेखील हाच प्रश्न पडला

म्हणून 'श्रीरामाचे उपकार' या करुणाष्टकात ते म्हणतात – 'किती काय गूणासि म्यां आठवावे ।'

तुझ्यासारख्या गुणवान समर्थाचे आम्ही भक्त मात्र तुझ्याइतके गुणवान नाही. तुझ्यापुढे आम्ही अगदी क्षुल्लक आहोत. परमेश्वराची शक्ती 'कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम्' अशी असते. प्रभु रामचंद्रांनी सेतुबंधनाचे वेळी तीन दिवस सतत समुद्राची आराधना केली. तरीही तो प्रतिसाद देत नाही असे पाहिल्यावर भात्यातील बाण काढून धनुष्याला जोडला. तेव्हा समुद्र शरण आला आणि सेतुबंधन झाले. परमप्रतापी रामचंद्रांना समुद्र घाबरतो पण त्सुनामी लाटा येतात आणि हजारो माणसे मृत्युमुखी पडतात. करोडो रुपयांची हानी होते. शेकडो संसार उद्ध्वस्त होतात. मात्र मानवीशक्ती इतकी तोकडी असते की इच्छा असूनही ती हे होणारे नुकसान टाळू शकत नाही. भगवंताची मात्र चराचरावर सत्ता आहे. चेतन-अचेतन त्याच्या सत्तेने कार्यरत होते. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचे पानदेखील हलत नाही. कळीकाळावरदेखील फक्त त्याचीच सत्ता आहे. अशा परमप्रतापी, सामर्थ्यशाली, भाग्यवंत गुणवान असलेल्या तुला आम्ही शरण आलो आहोत. तुझ्या आश्रयाला आलो आहोत. तू आमचा स्वीकार कर आणि आम्हाला योग्य तसे घडव. आम्हालादेखील गुणवान कर. समर्थांनी 'रामावर भार' या करुणाष्टकात **'अगुणी तयालागी गुणी करावे। समर्थेभवसागरी उतरावे।।'** अशी प्रार्थना केली आहे. तुझी भक्ती करण्यामध्ये जीवन सार्थकी लागावे आणि शेवटचा दीस गोड व्हावा, यासाठी तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार लवकर गळून पडू दे. सद्गुरु दिगंबरदास महाराज आपल्या वरयाचनेमध्ये **'अहंकार जळोनि जावा। वासनेचा ठावचि नुरावा। कल्पना विरमोनि उपजावा। शुद्ध भाव अंतरी।।'** अशी प्रार्थना करतात. अंत:करण शुद्ध असेल, निर्मळ असेल तरच भक्तीचा, ज्ञानाचा दिवा प्रज्वलित होऊ शकतो. शुद्ध अंत:करणासाठी त्यातील अहंकार, वासना, षड्रिपू हे सारे भगवंताच्या कृपाकटाक्षाने नाहीसे होते.

तुझी आणि चिंता असे भाग्य माझे।
दयासागरु अक्षई ब्रीद तुझे।
विरुधासी दीसोनी येते पहा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।८।।

अर्थ : मी तुझी आहे आणि तरीही चिंता करावी लागणे असे माझ्या भाग्यात आले आहे. खरे तर दयासागरू हे तुझे ब्रीद अक्षयी आहे. पण प्रत्यक्षात मात्र याच्या विरुद्ध चित्र दिसते आहे. तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार गळून जाऊ दे.

विवेचन : वेणाबाई रामरायाकडे एक गोड तक्रार करतात की तू माझ्याकडे नीट लक्ष देत नाहीस. मी तुझी भक्त आहे पण तरीही आपले कसे होणार? आपल्या भविष्याचे काय? आपण तर हीन, दीन, दुर्बल, अज्ञानी आहोत. आपली परिस्थिती, मन:स्थिती कधी बदलणार अशी चिंता करणे माझ्या वाट्याला आले आहे. हेच माझ्या भाग्यात लिहिलेले दिसते. पण तू तर दयासागर आहेस. तुझ्याकडे कोणीही, कसाही मनुष्य शरणागत भावाने आला की तू त्याच्यावर कृपा करतोस. त्याच्या झालेल्या चुकांसाठी त्याला क्षमा करतोस आणि त्याचा उद्धार करतोस. रामरायाच्या या क्षमाशील वृत्तीचे वर्णन करताना समर्थ 'श्रीरामाचे उपकार' या करुणाष्टकात म्हणतात –

'बहुसाल अन्याय कोट्यानुकोटी। रघुनायके घातले सर्व पोटी।।'

गौतमऋषींची पत्नी अहल्या हिला तिच्या हातून घडलेल्या चुकीमुळे पतीकडून शाप मिळाला. पण तिने अत्यंत शरणागत होऊन प्रभु श्रीरामांचे अखंड चिंतन, जप, नामस्मरण केले. यामुळे तिचे अंत:करण शुद्ध, पवित्र, निर्मळ झाले. प्रभु श्रीरामांनी तिला प्रत्यक्ष दर्शन देऊन तिचा उद्धार केला. पतिव्रता संबोधून तिला वंदन केले. श्रीराम अत्यंत पराक्रमी आहेत पण तरीही ते कनवाळू आहेत. समर्थ त्यांना 'तू करुणेचा जळधरु' असे म्हणतात.

रामचंद्र दयेचा सागर आहेत, हे त्यांचे ब्रीद अक्षय आहे. सत्य, त्रेता, द्वापार आणि कली या चारही युगातील अनेक घटना हा विश्वास दृढ करतात. असे असताना मात्र आता तू तुझ्या या ब्रीदाला साजेसे वागताना दिसत नाहीस. तू माझ्याकडे काळजीपूर्वक लक्ष देत नाहीस. हे तुझ्या ब्रीदाच्या विरुद्ध आहे. समर्थांनीदेखील 'बुद्धि दे रघुनायका' या करुणाष्टकामध्ये 'भक्त उदंड तुम्हाला। आम्हाला कोण पुसते। ब्रीद हे राखणे आधी।' अशी लडिवाळ तक्रार केली आहे. आणि 'श्रीरामाचे ब्रीद' या करुणाष्टकामध्ये 'चलेना कृपासिंधू कल्पांतकाळी। रघुराज हा आदरे दास पाळी।।' असे रामरायाचे वर्णन केले आहे. त्यामुळे तू तुझे ब्रीद खरे कर आणि तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार गळून पडू दे अशी प्रार्थना वेणाबाई करतात.

दिने रंक नेणो चि विधी विधाना।
अकस्मात तू जोडिलांसी निधाना।
रघुनाथजी सर्व क्लेशा हरा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो।।९।।

अर्थ : मी दीन, गरीब असल्यामुळे विधिविधानाबद्दल काही जाणत नाही. पण माझ्या सद्भाग्याने तू अचानक माझ्या आयुष्यात आलास. जणू मला मोठा ठेवा मिळाला. हे रघुनाथा, तू आता सर्व क्लेशापासून माझी सुटका कर. तुझ्या कृपेने माझा अहंकार गळून पडू दे.

विवेचन : वेणाबाई रामरायाकडे कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. त्या म्हणतात की मी दीन, गरीब, अज्ञानी आहे. मला विधिलिखित म्हणजे काय? भविष्य काय असते, कर्मकांड म्हणजे काय? शास्त्र, शास्त्रातील नियम यासंबंधी काहीही माहिती नाही. तुझ्या प्राप्तीसाठीदेखील मी काहीही प्रयत्न केले नाहीत. जप-तप, व्रते-वैकल्ये, उपासना यासारख्या कोणत्याही गोष्टी केल्या नाहीत. पण तू कृपाळू, स्नेहाळू, करुणासागर असल्यामुळे माझ्यावर कृपेचा वर्षाव केलास आणि अकस्मात मला तुझी प्राप्ती झाली. तुझ्या रूपाने मला जणू अक्षय आनंदाचा ठेवा गवसला. आता तुझ्या कृपाकटाक्षाने माझ्या सर्व चिंता, क्लेश, सर्व प्रकारचे दु:ख नाहीसे होऊ दे. समर्थ रामरायाला 'कृपासागरे सर्व चिंता हरावी' अशी विनवणी करतात. वेणाबाई म्हणतात की 'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्' या तुझ्या वचनावर माझी दृढ

श्रद्धा आहे. म्हणून तू माझे सर्व क्लेश दूर करावेस आणि तुझ्या कृपेने माझा अहंकार लवकर गळून पडू दे.

प्रीतीने दिने पाळी रे दीनबंधू।
तुझे ब्रीद याचा महिमा अगाधू।
दिनाहूनि ही दीन वेणी पहा हो।
अभिमान माझा झणी सांडिसी हो ।।१०।।

अर्थ : वेणाबाई रामरायाकडे विनवणी करतात की तू माझा प्रेमपूर्वक सांभाळ कर. तुझ्या ब्रीदाचा महिमा अतर्क्य आहे. माझ्यासारख्या दीनाहूनही दीन अशा भक्ताकडे तू लक्ष दे. तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार लवकर गळून पडू दे.

विवेचन : समर्थ 'रामावर भार' या करुणाष्टकामध्ये स्वत:बद्दल सांगताना म्हणतात –

'नसे भक्ती ना ज्ञान ना ध्यान काही।
असा दीन अज्ञान मी दास तुझा।'

वेणाबाईदेखील रामरायाकडे विनवणी करतात की मी जरी अतिशय दीन, अडाणी, अज्ञानी असले तरी तुझी भक्त आहे. काया-वाचा-मने तुला शरण आले आहे. तू दीनबंधु आहेस, दयासागर आहेस, करुणानिधी आहेस. आता तू मला निराश करू नकोस. तू प्रेमाने, काळजीपूर्वक माझा सांभाळ कर. तुझ्याशिवाय दुसरे कोण माझी योग्य रीतीने स्नेहपूर्वक काळजी घेईल? 'तुजसम कुशल कौन पतितोद्धरण मे' म्हणून मला तुझ्याबद्दल पूर्ण खात्री आहे. विश्वास आहे.

वेणाबाईंनी रामरायाला पुन:पुन्हा त्याच्या ब्रीदाची आठवण करून दिलेली दिसते. त्या म्हणतात की तुझ्या ब्रीदाचा महिमा अगम्य आहे, अतर्क्य आहे. तू तुझ्या ब्रीदाचे पालन कर. आमचा तुझ्यावरचा विश्वास सार्थ ठरू दे. आणखी दृढ होऊ दे. तू माझे 'जैसे बालक वाढवी माता। नाना यत्ने करूनी।' अशा पद्धतीने लालनपालन कर म्हणजे तुझ्या कृपेने माझ्यातील अहंकार लवकर गळून पडेल. सर्व चिंता, क्लेश, दु:ख, दैन्य नाहीसे होईल. रामरायाची भक्ती करून आपण मुक्त होऊ असा विश्वास वेणाबाईंना वाटतो. समर्थ 'रामावर भार' या करुणाष्टकात हाच भाव व्यक्त करताना म्हणतात

'रघुनायका दीन हाती धरावे। अहंभाव छेदूनिया उधरावे।
अगुणी तयालागी गुणी करावे। समर्थेभवसागरी उतरावे ।।'

किंवा

'रघुनायका जन्मजन्मांतरीचा। अहंभाव छेदूनि टाकी दिनाचा।'

अशा प्रकारे समर्थांच्या धर्तीवर वेणाबाईंनी रामरायाची करुणा या करुणाष्टकाद्वारे भाकली आहे. त्यांचे हे करुणाष्टक वेणाबाईंच्या मठपरंपरेमध्ये नित्योपासनेत अंतर्भूत व्हायला हरकत नाही.

सौ. हर्षदा जोशी
अल्मित्रा सोसायटी, फ्लॅट नं. ३, पवन ज्वेलर्सचे वर,
कर्वेनगर, पुणे ४११०५२.
मोबाईल : ९४२३५०८८६४

***



वेणास्वामींचे परमार्थविषयक पंचवीस प्रश्न - एक धावता आढावा

सौ. अपर्णा वसंत अभ्यंकर

बी.कॉ. एल.एल.बी.
दासबोध सखोल अभ्यास पूर्ण. संतवाङ्मयाचे वाचन व त्यांचा तौलनिक अभ्यासाची तीव्र इच्छा आहे. तरुणवर्गात समर्थांचे विचार पोचले पाहिजेत या विचारामुळे संधी मिळेल तेथे प्रचाराचे कार्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

।। श्रीराम समर्थ ।।

आजच्या व्यावहारिक जगाला अनभिज्ञ असाच हा विषय आहे. जिच्या मनात परमार्थ विषयासंबंधीची प्रश्नांची मालिका ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावरच निर्माण झाली. त्या वेणीला जाणल्याशिवाय तिने वेणास्वामींपर्यंत केलेल्या वाटचालीचा आढावा घेतल्याशिवाय प्रस्तुत विषयाची एकेक पाकळी उमलली जाणार नाही.

सन १६२८ मध्ये महाराष्ट्रासारख्या पुण्यप्रदेशात, त्यातूनही श्रीमहालक्ष्मीचा निवास असलेल्या करवीरक्षेत्री म्हणजेच आजचे कोल्हापूर येथे देशपांड्यांच्या कुळात वेणीचा जन्म झाला. समर्थ अनुग्रहित गोपिनाथपंत ऊर्फ गोपजीपंत देशपांडे आणि त्यांची धर्मपत्नी राधिकाबाई यांच्या पोटी एक गोंडस, गोजिरवाणे कन्यारत्न जन्मास आले. जन्मत:च शांत, समाधानी भावावरून सर्वजण तिला वेणू, वेणी म्हणूनच ओळखू लागले. प्रेमळ, सात्विक आई-वडिलांच्या मायेच्या सावलीत वेणू दिसामासांनी मोठी होत होती. पण आपल्या बरोबरीच्या मैत्रिणी, सवंगड्यांप्रमाणे तिचे मन खेळात रमत नसे. देवघरातल्या देवांना फुलांनी सजवावे, अलंकारांनी नटवावे, आरती-भजनात दंग व्हावे याकडेच तिचा लहानपणापासून ओढा होता. याचीच तिला आवड होती. आई-वडिलही भाविक वृत्तीचे. त्यामुळे त्यांनाही बालवेणीच्या छंदाचे कौतुकच होते. वेणीची भक्तिरसातली आवड ओळखून गोपजीपंतांनी लहानपणीच तिला अक्षर ओळख करू दिली. वेणीही चटकन शिकत गेली. आता तर तिला धार्मिक ग्रंथ वाचनाची गोडीच लागली. वेणीच्या अंत:करणात ईश्वरभक्तीचे पहिले बीज येथेच रुजले, मूळ धरू लागले.

वेणू दहा वर्षांची झाली. तात्कालिक रूढी-परंपरा-प्रथेनुसार वेणीच्या आई-वडिलांना वेणीच्या मंगलविवाहाचे वेध लागले. वर संशोधन चालू झाले. वयाच्या बाराव्या वर्षी कोल्हापूरची माहेरवाशीण वेणी मिरजेच्या देशपांड्यांच्या कुळात लक्ष्मीच्या पावलांनी सून म्हणून प्रवेश करती झाली. मिरजेत, ब्राह्मणपुरीत तालेवार घरात वेणीने पातीसमवेत उंबरठ्यावरचे माप ओलांडून गृहप्रवेश केला. पण पुढच्या काही दिवसातच आजची आपली लक्ष्मीची पाऊले अभद्र ठरतील या विधिलिखिताची तिला कुठे होती कल्पना! लग्न म्हणजे काय, जीवनसाथी म्हणजे काय याची पुरती ओळखही होण्याइतपत अवधी वेणीला मिळाला नाही. प्रथेनुसार विवाहानंतर पहिल्यांदाच वेणी माहेरी आली. मातापित्यांनाही आनंद होता. पण चार-सहा दिवसांतच या आनंदावर दु:खाचे सावट पडणार आहे याची त्या मातापित्यांनाही कल्पना नव्हती. चारच दिवसांनी मिरजेहून सांगावा घेऊन वेणीच्या सासरकडचा माणूस आला. वेणीला आई-वडिलांबरोबर तातडीने सासरी जाणे भागच होते. वेणीने सासरी पाऊल ठेवले मात्र! तिच्यावर आभाळच कोसळल्यासारखे झाले. पुरती ओळखही न झालेल्या आपल्या पतिचे निधन झाल्याचे कळताच वेणी कमालीची अंतर्मुख झाली. आता तर तिने एकनाथी भागवत, भावार्थ रामायण यासारख्या भक्तीपर ग्रंथांनाच आपले सोबती बनवले. त्यांच्या सोबत, त्यांच्या सहवासात वेणी आपले आयुष्य कंठू लागली. पतिनिधनाच्या वैधव्याच्या कटु प्रसंगातच वेणीच्या हृदयात रामभक्तीचे दुसरे बीज रुजले. आता वेणीचा प्रवास कधी माहेर, कधी सासर असा होऊ लागला. पण एक गोष्ट मात्र अनुकूल होती ती म्हणजे दोन्हीकडे धार्मिक वातावरण होते. त्यामुळे वेणीच्या भक्तीला कधी फारसा अडसर आला नाही.

सन १६४८, वेणी वैधव्याचे भकास जीवन आठ वर्षेअनुभवीत होती. आई-वडिलांची, सासुसासऱ्यांची मायेची नजर, सांत्वनपर शब्द वेणीचे समाधान करण्यास अपुरे ठरत होते. वेणीला आतूनच जाणीव होऊ लागली की केवळ सद्गुरुचरणच आपल्या भकास जीवनात प्राण ओततील, आपले जीवन अर्थपूर्ण करतील. वेणीने आता आपले सगळे लक्ष ग्रंथवाचन, अभ्यास, मनन, चिंतन, ईश्वरसेवा यावरच केंद्रित करायचे मनोमन ठरविले. त्याप्रमाणे तिच्याकडून ग्रंथवाचन, अभ्यास होऊ लागला. श्रद्धाभाव होताच तो वृद्धिंगत होत गेला. ग्रंथवाचनातून तिच्या मनात अनेक परमार्थविषयक शंका निर्माण होत होत्या. पण त्यांचे निरसन करणारी अधिकारी व्यक्ती तिला भेटत नव्हती. याच ठिकाणी वेणीच्या मनात सद्गुरुंबद्दलची ओढ वाढू लागली.

''सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दु:ख सकल ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाही ।।''

या विचाराने तिचे अंत:करण व्याकूळ होऊ लागले. अशाच

व्याकूळ अवस्थेत सन १६४८ मधल्या श्रावणातल्या एका सकाळी वेणी आपल्या सासरचे अंगण लोटीत असताना ''तुंबाभर दूध मिळेल का?'' हा विलक्षण गोड पण खड्या आवाजातला प्रश्न वेणीच्या कानी पडला. वेणीने आवाजाच्या दिशेने मानवर करून पाहिले आणि भिक्षेकरी स्वामींच्या रूपाने ''नवस जयाचा तोच आला स्वयें'' असा भास झाला. सासुबाईंनी देवघरातल्या हनुमंताच्या नैवेद्यासाठी ठेवलेल्या दुधातले थोडे दूध स्वामींना भिक्षा म्हणून द्यावे या विचाराने वेणी दूध आणण्यासाठी घरात गेली. पण त्यापूर्वीच वेणींच्या सासुबाईंचा नकाराचा शब्द स्वामींच्या कानावर पडला होता. वेणी दूध घेऊन येण्याआधीच भिक्षा परंपरेनुसार उंबरा ओलांडून स्वामी बाहेर पडले होते. वेणीला मनस्वी दु:ख झाले. ज्यांच्या दर्शनासाठी, भेटीसाठी जीव व्याकूळ होतो आहे तोच साक्षात हनुमंत मला अंतरतो की काय अशा विचाराने वेणीला अत्यंत दु:ख झाले. पण नुसता विश्वास नव्हे तर सर्व संशयरहित श्रद्धाभाव आजवर वेणीने जोपासला होता. तोच तिच्या कामास यावेळी आला. ती पुन्हा ग्रंथवाचन, अभ्यासात बुडून गेली. इथे वेणीच्या हृदयात दृढभक्तीचे तिसरे बीज अंकुरले.

पुढे काही दिवसांनी वेणी अंगणात नित्याप्रमाणे तुळशीवृंदावनापाशी एकनाथी भागवत ग्रंथ वाचीत होती.

''अहिल्या शिळा राघवें मुक्त केली।
पदी लागता दिव्य होऊनी गेली।
जया वर्णिता शिणली वेद वाणी।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।''

'ॐभवति भिक्षांदेही'

वेणीच्या कानावर शब्द आले. वेणीने मान वर करून पाहिले. तोच तुंबाभर दूध मागणारा भिक्षेकरी-संन्यासी पुन्हा आज भिक्षा-मधुकरी मागण्यासाठी आला आहे हे पाहताच वेणी चटकन हातातले पोथीचे पान ठेवून भिक्षा आणण्यासाठी जाऊ लागली. हा भिक्षेकरी साधासुधा नव्हता तर ज्याला प्रत्यक्ष प्रभुरामचंद्र व सीतामाईंनी रजपूत वेषात दर्शन दिले होते. आपला कृपाशीर्वाद, कृपाप्रसाद दिला होता ते समर्थ रामदास स्वामी होते, साक्षात हनुमंताचे अवतारच. वेणी दर्शनानेच धन्य झाली. तिला मनोमन जाणवले, पटले की हेच माझे सुखनिधान. सद्गुरू चरणांसाठी तळमळणारे, व्याकूळ होणारे वेणीचे मन शांत होत असल्याचे वेणीला जाणवू लागले. क्षणार्धात वेणीची समर्थांनी अंतर्बाह्य पारख केली, तिचे दु:ख, वेदना, तळमळ जाणून घेतली. पण समर्थांनाही आपली भावी शिष्या पारखून घ्यायची होती. म्हणून त्यांनी तिला विचारले, ''बाळ काय वाचतेस? त्याचा अर्थ समजतो का तुला?'' समर्थांच्या प्रश्नाने पुन्हा एकदा वेणीच्या मनात प्रश्नांची मालिका तयार झाली. ती उत्तरली, ''एकनाथांचे भागवत वाचते. भक्तिभावाने ग्रंथ वाचावा एवढेच मला ठाऊक. त्यातील ज्ञान मला कोठून असणार? अनेक प्रश्न वाचताना मनात निर्माण होतात. पण उत्तराविण ते तसेच मावळून जातात. माझे शंकानिरसन कोण करणार?'' समर्थांनी ओळखले, शिष्याची भूमि तयारीची आहे. समर्थांनी वेणीला वत्सलतेने, आश्वासकतेने विचारले, ''बाळ, कोणते प्रश्न तुला मनात येतात?'' समर्थांच्या शब्दातूनच वेणीला जाणवले की आपल्या प्रश्नांना यथार्थपणे उत्तरे देणारी अधिकारी व्यक्ती, सद्गुरू आज आपल्याला भेटले आहेत. वेणीने क्षणाचीही उसंत न घेता एकामागोमाग एक असे पंचवीस प्रश्न स्वामींना विचारले. समर्थही हाडाचे शिक्षक होते. प्रश्नातूनच समर्थांनी वेणीची बुद्धिमत्ता, श्रद्धा, तळमळ, जिज्ञासूवृत्ती जाणली आणि तेव्हढ्याच शांतपणे मोजक्या शब्दात समर्थांनी वेणीच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊन तिचे शंकानिरसन केले. भिक्षा घेतल्यानंतर क्षणभरही दारी न थांबण्याचा रिवाज पाळणारे समर्थ वेणीच्या दारी बराच वेळ वेणीच्या मनातील शंकांचे निरसन करण्यात रेंगाळले. वेणीच्या प्रत्येक प्रश्नातून त्यांना आपल्या संपद्रायाची एक उत्तम प्रचारक, आपली शिष्योत्तमा सापडत गेली. वेणीच्याच मनात या साऱ्या पारमार्थिक शंका इतक्या लहान वयात कशा निर्माण झाल्या? याचे साधे, सरळ, सोपे उत्तर म्हणजे वेणीचे पूर्वसुकृत, वेणीच्या वाडवडिलांची रामोपासना, तिचे वडील गोपजीपंत, मातामह काशिरजपंत यांना समर्थांसारख्या सद्गुरुंचा अनुग्रह आणि प्रमुखत: बालपणातच स्वत:वर झालेले प्रापंचिक आघात, त्यातून आलेली अंतर्मुखता आणि विरक्ती हेच म्हणता येईल.

''जो संसारदु:खे दु:खवला। त्रिविधतापें पोळला।
तोचि अधिकारी झाला। परमार्थासी।।''

यानुसार परमार्थाचे कोडे उलगडून घेण्याची वेणीला प्रबळ इच्छा झाली आणि त्यातूनच एका मागोगाम एक असे पंचवीस शंकात्मक प्रश्न वेणीने समर्थांना विचारले. समर्थांचे ज्ञान अनुभवसिद्धच असल्याने त्यांना वेणीचे शंकानिरसन करणे अवघड नव्हतेच. पण आपल्यासारख्या पारमार्थिक दृष्ट्या अज्ञजनांना हे प्रश्न आणि त्यांची समर्पक उत्तरेही समजून घेणे तसे अवघडच. तरीही आता पारमार्थिक वाटेकडे वळल्यानंतर समर्थांसारख्या सद्गुरुंची श्रद्धाभावाने प्रार्थना करून वेणीच्या पाठोपाठ जात प्रस्तुतच्या विषयाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे.

जीव कशाला म्हणायचे? वेणूचा पहिलाच प्रश्न. या प्रश्नाचे उत्तर समजून घेताना 'जीव' म्हणजे प्राणी. जीव म्हणजे देहात असणारे प्राणतत्व, चैतन्य असे अनेक शाब्दिक अर्थ समोर येतात. एवढाच मर्यादित अर्थ 'जीव' याला नाही. जीव म्हणजे अविद्येच्या, अज्ञानाच्या आवरणाने वेढलेले आत्मतत्व, आत्मस्वरूप. अष्ट्धाप्रकृतीने बनलेला नाशवंत देह धारण केलेला परमात्म्याचा अंश म्हणजे जीव. देहबुद्धीत अडकल्यामुळे, आसक्तीचा वेढा पडल्याने मूलत: बंधमुक्त असलेला आत्मा जीवाच्या रूपाने बंधनात अडकतो. 'मी' खरा कोण आहे. हे न कळणे आत्मज्ञान मलिन होणे हे जीवाचे बाह्यरूप म्हणजेच अज्ञान. हे अज्ञान विविध रूपात प्रकट होते. नाशवंत देहालाच खरे मानून तोच खरा 'मी' आहे असे समजणे, अंतरंगातला ईश्वर न ओळखणे, न कळणे, स्वहित न कळणे अनुभवजन्य ज्ञानाचा अभाव ही सर्व अज्ञानाचीच म्हणजेच जीवाचीच लक्षणे. यामुळेच मुळात सुखरूप, आनंदरूप असलेला आत्मा जीवाच्या रूपात सुखदु:खाचे हेलकावे खात राहतो. या

स्पष्टीकरणात्मक उत्तराने वेणीवर वैधव्याच्या रूपात झालेल्या दु:खदायक आघाताचा एक धागा ढिला पडला. जणूकाही वैधव्य ही इष्टापत्तीच आहे असे वेणीला वाटले असेल. जो अज्ञानी आहे त्यालाच जीव म्हणायचे या समर्थांच्या उत्तराने वेणीच्या मनातली प्रश्नाची एक गाठ सुटली.

'शिवाचे लक्षण कोणते?' वेणीचा पुढचा प्रश्न तयारच होता. शिव म्हणजे तमोगुणयुक्त शंकर हा 'शिव' शब्दाचा वाच्यार्थ किंवा शब्दार्थ. पण याहूनही खोलात गेल्यास ''अविद्यागुणे बोलिजे जीव। मायागुणे बोलिजे शिव।'' यानुसार अविद्येच्या म्हणजेच अज्ञानाच्या आवरणात म्हणजेच पिंडाच्या उपाधीत असणाऱ्या ज्या आत्म्याला जीव म्हणून ओळखले जाते तोच आत्मा जेव्हा विद्या आणि अविद्या (ज्ञान आणि अज्ञान) यांनी संपन्न असलेल्या मायेच्या, ब्रह्मांडाच्या उपाधीत गुरफटला जातो तेव्हा त्यास 'शिव' म्हणून ओळखले जाते हा अर्थ आकलन होतो. जाणीव, जगत्ज्योती, शिवात्मा या नावानेही शिवाची ओळख सांगता येते. शिव म्हणजेच ब्रह्मांडाला व्यापणारा ईश्वर, एकच एक आत्मतत्व. याचे ठिकाणी अज्ञानाला ज्ञानाचीही सोबत असते. सगळीकडे एकच ईश्वरीतत्व, शाश्वत आत्मतत्व भरून राहिलेले आहे असे जाणणे, अनुभवणे म्हणजेच सर्वज्ञानी असणे हे शिवरूप होणे, शिव होणे होय. 'परमात्म्याची प्राप्ती करून देणारे जे ज्ञान तेच शुद्ध ज्ञान, आत्मज्ञान आणि तेच शिव' या समर्थांच्या मुखातून आलेल्या शब्दांनी वेणीच्या विचारचक्राचा परिघ रुंदावत गेला. वेणीला आपल्यावर कोसळलेले दु:ख हलके वाटू लागले.

'आत्मा म्हणजे काय?' वेणी प्रश्नकर्ती झाली. जो विश्वाच्या आरंभी तसेच शेवटीसुद्धा राहतो तो आत्मा म्हणून आत्मा आद्य. त्याला कोणताही गुण नसतो. तो स्वयंप्रकाशी, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त असतो. आनंद हेच त्याचे रूप आणि सर्वव्यापक हाच त्याचा स्वभाव असतो. घटाकाश, मठाकाश, महदाकाश आणि चिदाकाश एकच आत्मतत्व जीवात्मा, शिवात्मा, विश्वात्मा किंवा परमात्मा आणि निर्मलात्मा या रूपाने व्यापून राहिलेले आहे. शरीराला जिवंत ठेवणारी, इंद्रियांना चेतना देणारी, मनोव्यापारांना प्रेरणा देणारी, बुद्धीला विचार करायला लावणारी आणि जीवपणाने सुखदु:खे भोगणारी, उद्वेग-चिंता-माया-ममता अनुभवणारी चित्कला, सातवी जीवनकला म्हणजेच आत्मा. तोच पिंडामध्ये 'जीव' आणि ब्रह्मांडात (सृष्टीत) 'शिव' म्हणून राहतो. याला कोणते बंधन नाही, जन्ममृत्यूचा फेरा नाही. सर्वांत असूनही साक्षीभावाने सर्व पाहणारा हा आत्मा म्हणजेच अनादि, अनंत, शाश्वत परमात्माच. यालाच अंतरात्मा किंवा महत्‌भूत म्हणून म्हणता येते. आत्म्याशिवाय सर्व प्रेतवत्‌ म्हणून आत्मानात्म-विवेकाने, नित्यानित्यविवेकाने त्याला जाणून घ्यावे. त्याच्याच उपासनेत देह झिजवावा. 'आत्माराम' म्हणतात तो हाच. त्याला संतुष्ट करणे हेच जीवनाचे ध्येय असावे. समर्थांची अधिकारवाणीतली सूचना वेणींच्या परमार्थमार्गाला स्पष्ट दिशा देऊन गेली.

''परमात्मा म्हणजे काय?'' वेणीने जिज्ञासेने विचारले. विश्वस्वरूप असणारा, विश्वाला पूर्णत्वाने व्यापून उरणारा तो परमात्मा. विश्व, ब्रह्मांड, पिंड हे सर्व अष्ट्धाप्रकृतीतून निर्माण झालेले, निर्मित म्हणून अशाश्वत. पण या सर्वांना व्यापून उरणारा, या सर्वांहून पलिकडे असणारा परमात्मा आदि, अनंत, शाश्वत असतो. तेच आपले मूळ स्थान. तेच आपले मूळ स्वरूप वासनेच्या, मायेच्या प्रभावाने आपले मूळचे परमात्मस्वरूप मलीन झाले आणि आपण घसरत खाली आलो. सारासार विवेक, नित्यानित्य-विवेक, आत्मानात्म-विवेकशक्तीच्या सहाय्याने आपण पुन्हा आपल्या मूळ स्वरूपापर्यंत जाऊ शकतो, त्याला जाणून घेऊ शकतो, परमात्मस्वरूपात आपले संपूर्ण विलिनीकरण साधू शकतो. आता ध्येय नजरेसमोर आहे. खाली, मागे वळून पाहायचे नाही. निष्ठेने, श्रद्धेने, चिकाटीने साधना-मार्गावरून वाटचाल करीत राहायची. समर्थांच्या वात्सल्यपूर्ण, आश्वासक आदेशवजा वक्तव्याने वेणीला दहा हत्तींचे बळ आल्यागत झाले. तशी वेणीला मनोमनी याच ध्येयसिद्धीची आंतरिक ओढ लागली होतीच. ती आता समर्थमुखातून झालेल्या शंकानिरसनाने जास्तच तीव्र झाली.

''अनात्मा म्हणजे काय?'' वेणीचा पुढचाच प्रश्न. अनात्मा हा अनिर्वाच्य. वाचनेही जवळ करू नये अशी अशाश्वत माया. तीच मूळ शिवस्वरूप असलेल्या जीवाला प्रपंचभोवऱ्यात अडकविते, गटांगळ्या खायला लावते. या मायाधामिणीच्या विळख्यातून सुटका करून घेता आली तरच भवसागर तरून जाता येईल. त्यासाठीच सत्संग, संत सेवा, सद्‌गुरूकृपा हवी.'' अभ्यासाला, साधनेला, रामसेवेला जेवढी गाढी गहनता देशील तेव्हढी लवकर रामरूप होऊन जाशील.'' ''वेणे, शोक करू नकोस, दु:ख वाटून घेऊ नकोस. धीराने वाटचाल कर.'' समर्थांच्या मुखातून जणू रामच बोलत होते. आत्तापर्यंतच्या मूलभूत प्रश्नोत्तरातून वेणीच्या अंत:करणातले संशयाचे पटल बरेचसे दूर झालेच होते.

वेणीने पुढचे प्रश्न एकामागून एक विचारले.

''प्रपंच म्हणजे काय? त्याचे स्वरूप कसे?'' समर्थ उत्तरले, प्रपंच खरा नाही. मायेनेच तो निर्माण केला आणि मायेनेच तो विस्कळीत झाल्याचा भास होतो. मायाच आपल्याला या प्रपंच भोवऱ्यात अडकवते.

''सृष्टि कोणी केली?'' या वेणीच्या पुढच्याच प्रश्नाचे उत्तरही समर्थांनी आधीच्या प्रश्नाच्या उत्तरातून दिलेलेच होते. सृष्टिनिर्माता परमात्मा, परब्रह्म नसून त्याची शक्ती मूळमाया, हिच्यामध्ये चळण होऊन ''एकोऽहं बहुस्याम्‌ प्रजायेय'' हा संकल्प, पहिले स्फुरण झाले आणि त्यासच ईश्वर-परमेश्वर म्हणून संबोधले गेले. ही सृष्टिनिर्मिती रजोगुणयुक्त ब्रह्मदेवाकडूनच त्याच्या कल्पनेप्रमाणे केली गेली. या सृष्टितील घडणारी प्रत्येक गोष्ट ही ईश्वरी इच्छेप्रमाणेच होत असते. ''सुखदु:खाला कारण आपण नसतो. त्यामुळे कर्तेपणाचे ओझे वाटून घेऊ नकोस.'' वेणीच्या मनातली शंकेची आणखी एक गाठ सुटली. सर्व कर्ता रामच जर आहे तर तोच मला मार्ग दाखवेल हा विश्वास वेणीच्या मनात दृढ झाला. पण अजूनही वेणु विद्या-अविद्या यांच्या तिढ्यातून पुरती सुटली नव्हती. म्हणून वेणीने पुढचाच प्रश्न समर्थांसमोर मांडला.

''विद्या म्हणजे काय?'' समर्थांनी वेणीच्या मनात दाटून आलेली जिज्ञासा जाणून त्वरित उत्तर दिले, ''इंद्रियांना चालविणाऱ्या

विषयवासनांपासून अलिप्त असते ती विद्या. इंद्रियगोचर दृश्य सृष्टीला खरे न मानून चालणे हीच विद्या. वेणीचा पुढचा प्रश्न तयारच होता.

''अविद्या म्हणजे काय?'' समर्थ क्षणभरही न थांबता बोलले, ''विषयांशी एकरूप होणे, मन-बुद्धि-चित्त विषयांनाच खरे सुखकारक मानून चिकटून राहते तीच अविद्या. तेच जीवाचे अज्ञान. तीच देहबुद्धी जी सत्‌चित् आनंद स्वरूप परमात्म्यापासून जीवाला दूर करते. विषयसंगाची बुद्धि-वृत्ति आणि त्यानुसार जीवाकडून होणारी कृतीच जीवाची अवनती घडविते.'' वेणीच्या मनातल्या शंकांच्या गाठी एकेक करून सुटत जात होत्या. तिचे मन आनंदस्वरूप, चिद्घन परमात्म्याकडे ओढ घेत होते. पण अजूनही त्या परमात्म्याचे रूप वेणीला पुरते आकळत नव्हते. म्हणून तिने पुढचा प्रश्न केला –

''परब्रह्माचे स्वरूप कसे आहे?'' समर्थ आता हळुवारपणे वेणीला समजावून देऊ लागले. परब्रह्माच्या ठिकाणी कोणतीही कल्पना स्फुरत नाही. पूर्ण निर्विकल्प हेच परब्रह्माचे स्वरूप. तेच शुद्ध ब्रह्म. कल्पनेचे साम्राज्य परब्रह्माच्या अलिकडचे, मायेच्या क्षेत्रातले. परब्रह्माच्या ठिकाणी कल्पनाच नाही. त्यामुळे परब्रह्म काही करते हे खरे नाही. करणे न करणे हा सगळा मायेचा प्रांत, मायेची लीला. लगेचच वेणीच्या मनात माया, मूळमाया, तिचे स्वरूप, तिला चाळवते कोण हे प्रश्न पाठोपाठ उभे राहिले. जिज्ञासूपणे तिने विचारले –

''माया कोणती?'' ''मूळमाया कोणती? आणि तिला चाळवते कोण?'' वेणूच्या प्रश्न विचारण्यातील आतुरता, उत्सुकता जाणून समर्थांनी स्पष्टीकरण केले की वेणू, कल्पना करीत राहणे हीच मायेची खूण. अगं, तुझ्या आयुष्यात ओढवलेल्या कठीण प्रसंगाबद्दल तुझ्या मनात ज्या ज्या कल्पना आल्या तो सगळा मायेचाच अविष्कार. त्या बऱ्या-वाईट कल्पनांमुळे प्रसंगी तुझा धीर खचतो की काय असेही तुला वाटून गेले. पण मुळातच माया ही अशाश्वत असल्याने तू त्यातूनही स्वत:ला सावरलंसच ना? तेव्हा मायेचा पडदा रामभक्तीच्या सहाय्याने बाजूला कर. मूळमाया म्हणशील तर ती परब्रह्माची अंगभूत शक्तीच. ती परब्रह्माशी नेहमीच संलग्न असते. तीच शिवाची शक्ती, तीच गणेशाची शारदा, तीच पुरुषाची प्रकृती. तिचे रूपच वायुरूप. परब्रह्माला प्रकट करण्यासाठीच तिच्यातील वायुरूप, चैतन्यच तिला चालवते आणि तीच पुढे गुणमाया, गुणक्षोभिणी होते. तिच्यातून पंचभूतात्मक, त्रिगुणात्मक सचेतन-अचेतन जड सृष्टीची निर्मिती झाली. परब्रह्माच्या अलीकडचा मूळमायेपर्यंतचा प्रांत म्हणजे सारा अशाश्वताचा पसारा. परब्रह्म होतही नाही आणि जातही नाही. उत्पत्ती-स्थिती-लय हा सगळा मूळमायेचा, ईश्वराचा लीलावतारच आहे. त्यामुळे जे खरे नाही, शाश्वत नाही त्याची चिंता करू नये. मायेचा पसारा पूर्णत: दूर सारणे हीच शून्यावस्था. ते अभावात्मकच असते. ''शून्याचे स्वरूप कोणते? कळले ना? अशाश्वत-शाश्वत यातील सीमारेषा म्हणजे शून्य. देवालयाचा सभामंडप आणि गाभारा यातील उंबरठा म्हणजेच ही सीमा रेषा. हीच ज्ञानाची अवस्था. येथपर्यंत तुला घेऊन येणारा ईश्वर-चैतन्य म्हणजे काय तर सर्वसमावेशक, सर्वव्यापक पण तरीही सर्वांपासून अलिप्त, निर्लेप, नि:संग असलेले आत्मतत्व. तोच ईश्वर, तोच परमेश्वर. आत्तापर्यंतच्या प्रश्नोत्तरातून वेणीला एक वेगळेच समाधान प्राप्त होत आहे असा भास होऊ लागला. तो भास खरा की खोटा हे जाणून घेण्याची उत्सुकता वेणीला लागली आणि तिने प्रश्न केला.

''समाधानाचे स्वरूप कसे?'' समर्थांनाही वेणूच्या चेहऱ्यावर समाधान पाहायचे होते. वेणीच्या ठिकाणची परमेश्वराबद्दलची तदाकारता दृढ करण्याच्या उद्देशाने समर्थ म्हणाले, ''अगं वेणू, समाधान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपण ईश्वराशी अनन्य होणे, त्याच्यात मिसळून जाणे हेच आहे. परमेश्वराचे स्वरूपच जर सत्‌चित् आनंद हे आहे तर त्यात स्वत:ला विलीन करून घेतलेस की अनन्यच झालीस. तुझे वेगळे अस्तित्वच कसे राहील? तू परमात्मस्वरूपच होऊन जाशील. चिरशांती, पूर्णसमाधान हेच तुझेही स्वरूप असेल.'' पुढचे प्रश्न वेणूच्या मनात होते ते तिला आत्तापर्यंतच्या समर्थांकडून झालेल्या शंकानिरसनामुळे थोडेसे गौण वाटले. परंतु तिने केवळ आपल्यासारख्या अज्ञानी जीवांसाठी ते समर्थांना विचारले असावेत.

''कोण जन्म घेतो? मृत्यू कोणाला येतो? बद्ध कोण? मुक्त कोण? या जगात ज्ञानी कोण? या जगात कोणाची सत्ता आहे? मोक्ष म्हणजे काय? सगुण आणि निर्गुण ब्रह्म म्हणजे काय?''

समर्थांनाही आपल्या सारख्या अज्ञानी जनांचे हित पाहायचे होते. म्हणून त्यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. संतसद्‌गुरुंचा भावच असा की, ''बुडते हे जन देखवेना डोळा.'' ''जन्म घेणे लागे वासनेच्या संगे'' याप्रमाणे वासनेच्या वेढ्यात अडकलेला जीव वासनापूर्तीसाठी वारंवार जन्म घेतो, देह धारण करतो. जीर्ण झालेला देह जीव टाकतो तोच मृत्यू. तो आत्मतत्वाचा नसून पांचभौतिक देहाचा मृत्यू असतो. आत्मतत्व अमरच असते. जीवाला खरा 'मी' कोण याचा विसर पडल्यानेच अज्ञानाने, अविद्येने तो स्वत:ला बांधून घेत असतो. पण ज्यावेळी त्याला मी परमात्मस्वरूपच आहे ही आठवण होते त्याचवेळी त्याला आवळणारे अविद्येचे, अज्ञानाचे बंध तुटतात आणि जीव बंधमुक्त होतो. देहात असूनही तो विदेही होतो. याच टप्प्यावर त्याचा भाव ''देह जावो अथवा राहो, पांडुरंगी सदा लीन होऊ'' हाच असतो. या जगात खरा ज्ञानी कोण तर तो एक ईश्वरच; ॐकार स्वरूप गणेशच. त्याचीच सत्ता सर्वत्र चालते. चालविणारा तो एक ईश्वरच. आपण फक्त त्याच्या इच्छेनुसार, त्याच्या कल्पनेनुसार नाचविल्या जाणाऱ्या कळसूत्री बाहुल्या. या जन्ममरणाच्या फेऱ्यातून, या संसारचक्रातून सुटका करून घ्यायची असेल तर आपल्या सर्व वृत्ती त्या शाश्वत, ज्ञानस्वरूप ईश्वरस्वरूपात विलीन करायला हव्यात. ''मी कर्ता'' याऐवजी ''रामकर्ता'' हा भाव दृढ होणे म्हणजेच मोक्ष, मुक्ती, पूर्ण समाधान, तुलाही सद्‌गुरुसेवा, प्रभुसेवेतून हा मोक्षाचा क्षण पकडता येईल. मुळात ब्रह्म निर्गुण, निराकार पण अज्ञ जीवांच्या कल्याणासाठी त्याने वेळोवेळी सगुणरूपात स्वत:ला साकार करून घेतले. सगुण-साकार परमेश्वरस्वरूपाच्या सान्निध्यातच भक्ती दृढ होते आणि भक्त परमेश्वरापासून विभक्त होत नाही. म्हणून वेणू, एक वचन दृढपणे अंत:करणात कोरून ठेव की, ''सगुणाचेनि आधारे, निर्गुण पाविजे निर्धारे'' सगुण-निर्गुण वेगळे नाहीच. ते एकच भगवंतरूप आहे. तेथपर्यंत तुला पोहचायचे आहे. त्याची प्राप्ती करून घ्यायची आहे. त्यात

स्वत:ला विलीन करून घ्यायचे आहे. बाळ वेणू, रामकृपा तुझ्यावर अखंड आहे हा विश्वास, श्रद्धाभाव मनी बाळग.''

वेणीचे मन-अंत:करण स्वच्छ झाले. तिला स्वत:चे भानही राहिले नाही. वेणूच्या सासुबाईंनी आणलेली भिक्षा समर्थांनी स्वीकारली. जाता-जाता या पंचवीस प्रश्नोत्तरांचे दोन अभंग वेणीला प्रसाद म्हणून देऊन समर्थ आले तसे मार्गस्थ झाले. वेणूच्या मनात मात्र स्वामी पुन्हा कधी दर्शन देतील, अनुग्रह देऊन शिष्य म्हणून आपला केव्हा स्वीकार करतील याची आतुरता दाटून राहिली.

वेणू पुन्हा पुन्हा समर्थांनी प्रसादरूपात हाती दिलेले दोन अभंगांचे कागद वाचू लागली. त्यावर मनन, चिंतन करू लागली. आपणही ते दोन अभंग एकवार तरी नजरेखालून घालूया.

पंचवीस प्रश्नात्मक अभंग

नमूं वागेश्वरी शारदा सुंदरी।
श्रोता प्रश्न करी वक्तयासी ।।१।।
वक्तयासी पुसे जीव हा कवण।
शिवांचे लक्षण सांगा स्वामी ।।२।।
सांगा स्वामी आत्मा कैसा तो परमात्मा।
बोलिजे अनात्मा तो कवण ।।३।।
कवण प्रपंच कोणे केला संच।
मागुता विसंच कोण करी ।।४।।
कोण ते अविद्या सांगिजे जी विद्या।
कैसे आहे आद्याचें स्वरूप ।।५।।
स्वरूप ते माया कैची मूळमाया।
ईस चाळावया कोण आहे ।।६।।
आहे कैसे शून्य कैसे ते चैतन्य।
समाधान अन्य ते कवण ।।७।।
कवण जन्माला कोण मृत्यु आला।
बध्द मुक्त जाला तो कवण ।।८।।
कवण जाणता कोणाची हे सत्ता।
मोक्ष हा तत्वता कोण सांगा ।।९।।
सांगा ब्रह्मखूण सगुण निर्गुण।
पंचवीस प्रश्न ऐसे केले ।।१०।।

उत्तरात्मक अभंग

नमूं वेदमाता नमूं त्या अनंता।
प्रश्न सांगा आता श्रोतयांचे ।।१।।
श्रोतयांचे प्रश्न जीव हा अज्ञान।
जया सर्व ज्ञान तोचि शिव ।।२।।
शिवपर आत्मा त्यापर परमात्मा।
बोलिजे अनात्मा अनुर्वाच्य ।।३।।
वाच्य हा प्रपंच माईक जाणावा।
घडा मोडि देवा पासुनिया ।।४।।
विषय अविद्या त्या लावी ते विद्या।
निर्विकल्प आद्यांचे स्वरूप ।।५।।
कल्पना हे माया तत्व हे मुळमाया।
यासी चाळावया चैतन्यचि ।।६।।
नकार ते शून्य व्यापक चैतन्य।
ईश्वर अनन्य समाधान ।।७।।
जीव हा जन्मला जीवा मृत्यू आला।
बध्द मुक्तची जाला तोचि जीव ।।८।।
ईश्वर जाणता ईश्वराची सत्ता।
मोक्ष हा तत्वता ईश्वरचि ।।९।।
ईश्वर निर्गुण चेष्टवी सगुण।
हेचि ब्रह्म खुण दास म्हणे ।।१०।।

दोन्ही अभंगांचे पारायण करीत वेणूने मनोमनी समर्थांना साष्टांग नमस्कार केला.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. अपर्णा वसंत अभ्यंकर
फ्लॅट नं. एस-३, स्वागत अपार्टमेंट,
सावरकर कॉलनी, सावरकर मार्ग, गल्ली नं. २, मु.पो.
विश्रामबाग, सांगली ४१६४१५
मोबा. ९२२६२५८९५३



श्री सीता स्वयंवर संत वेणाबाई रचित

सौ. सुषमा सूर्यकांत धांडे

गृहिणी एस.एस.पी.
कीर्तनकार – ''एकनाथाची गिरिजा'' ''आवडी तुकय्याची शिऊरची बहिणा'' ''मी राणू बोलते'' वेणाचे मनोगत'' ''होळकरांची अहिल्या'' हे सर्व चरित्र एकपात्री सांगत असताना ते पुस्तक रूपात प्रसिद्ध केले.

।। श्रीराम समर्थ ।।

''यावत् स्थास्यन्ति गिरय: सरितश्च महीतले
तावत रामकथा लोकेषु प्रचरिष्यति ।।''

जोपर्यंत पृथ्वीवर पर्वत व नद्या आहेत; तोपर्यंत या जगात रामायण कथा जिवंत राहील. ब्रह्मदेवाने वाल्मिकी ऋषीस चरित्र काव्य लिहण्यास सांगितले. त्यावेळेसच हे आश्वासन दिले होते ते आजपर्यंत खरे झालेले आहे. रामकथेतील राम हा विष्णूचा अवतार असल्यामुळे त्याची भक्ति सर्वत्र केली जाते. रामायण हे जगातील आद्य महाकाव्य असून अत्यंत लोकप्रिय आहे. अनेक भाषेतून रामायण लिहिले गेले आहे. रामाचे चरित्र आदरणीय असून त्याची प्रखर न्यायनिष्ठा व प्रजाहितदक्षता अनुकरणीय अशी आहे.

रामायणातील सर्वच व्यक्ति अद्वितीय, असामान्य अशा आहेत. सीतेचे पातिव्रत्य अलैकिक व जाज्वल असे आहे. या सीतेच्या स्वयंवराचे अतिशय मनोहरी वर्णन ज्या काव्यात आहे ते काव्य श्री समर्थ शिष्या वेणाबाईंनी लिहिले. १४ समासाचे ते महाकाव्य आहे. सीता स्वयंवर हे अतिशय गोड व रसाळ काव्य आहे. स्त्रीसुलभ भावना त्यात प्रगट झाल्या आहेत. वेणाबाईंना लहानपणापासून अध्यात्माची आवड होती. एकनाथी भागवताचे त्या नित्य वाचन करीत असत. त्या थोर विदुषी होत्या. भागवत, रामायण हे ग्रंथ त्यांनी अवगत केले होते. श्री समर्थांच्या ग्रंथाबरोबर सर्व संताच्या ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला होता. या ग्रंथातून त्यांच्या लेखनाची प्रतिभा दिसून येते. लग्न सोहळ्याचे संपूर्ण वर्णन केलेले आहे. त्यातील भक्ति प्रेम उत्कट आहे.

अंतस्थ श्रीसद्गुरू प्रेमाचा भगवत्भक्तीचा स्रोत आहे. भगवंतच लिहीत असतो ही भावना असल्यामुळे ते प्रसादरूपाने साकार झाले आहे. सीता स्वयंवर हा विषय स्त्रीसुलभ भावनेमुळे जिव्हाळ्याचा वाटतो. चौदा विद्या चौसष्ट कलांचा अधिष्ठाता असलेल्या गणेशाला वंदन केले आहे.

ॐ नमो जी गजानना । सकळ विद्येच्या सदना ।
गौरी नंदना कविजना । विद्यावैभव वोळसी ।।
सीतासैवराच्या काजा । सिद्धलाडु गणराजा ।
पूर्ण मोदक पंचखाजा । तूं वऱ्हाडी आधी ।।

लग्नाचा वऱ्हाडी म्हणून गणपतीचे पूजन केले आहे. निर्विघ्नपणे पार पडू दे अशी प्रार्थना केली आहे. सर्व देव देवतांना आवाहन केले आहे. कुलदैवत आणि इष्टदैवत राम. त्या रामाचे वर्णन करताना वेणास्वामी म्हणतात –

''राम गुणाचा सागरु । राम सुखाचा सुरतरु ।
राम भक्तांचे माहेरु । राम विसावा जनाचा ।।
राम मनाचा मोहन । राम जीवाचें जीवन ।
राम सदा समाधान । ज्ञानियाचे ।।
राम पुजावा विलासी । राम घ्यावा अहिर्णेसी
रामा वेगळे मनासी । काही नावडे ।।''

आराध्य दैवताविषयीचा उत्कट भाव प्रगट झाला आहे. सततच्या चिंतनातून भक्ति प्रेमाच्या रूपाने हे काव्य निर्माण झाले आहे. दशरथाच्या घरी चार मुलांच्या रूपाने धर्म, अर्थ, काम, मोक्ष नांदत होते. वशिष्ठ ऋषींनी त्यांचे उपनयन संस्कार केले. अध्ययन करताना समाजशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्राचा अभ्यास करून घेतला. त्याबरोबर अर्थशास्त्राचे ज्ञान ही त्यांना दिले. कुशाग्र बुद्धिमत्ता आणि चित्ताची एकाग्रता यामुळे त्यांनी ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत प्राविण्य मिळवले. वेदविद्येबरोबर धर्नुविद्येचाही अभ्यास त्यांनी केला. योग्य असे शिक्षण शीघ्रगतीने आत्मसात केल्यामुळे वशिष्ठऋषी संतुष्ट झाले. दशरथालाही आनंद झाला.

अशा आनंदसमयी दशरथ राजा, वशिष्ठ ऋषी व दरबारातील सर्व मंत्री, दरबारात बसले असताना विश्वामित्र ऋषी त्या सभेत अकस्मात आले. सर्वांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले. दशरथाने त्यांना आसनावर बसवून त्यांचे पूजन केले. आपले आगमन हा माझ्यावर अनुग्रह झाला आहे असे मला वाटते. मी धन्य झालो असून माझे कुळही धन्य झाले आहे. मी आपली कोणती सेवा करू? आपण जी आज्ञा द्याल ती मला मान्य आहे. त्यावर विश्वामित्र म्हणाले हे राजेंद्रा तुझ्या सत्काराने मी संतुष्ट

झालो आहे. माझ्या येण्याचा हेतू तुला सांगतो. सिद्धाश्रमात मी यज्ञ करतो आहे. दुष्ट राक्षस यज्ञ पूर्ण होऊ देत नाही. मला एक सहा दिवसांचा महत्त्वाचा यज्ञ करायचा आहे. राक्षस यज्ञामध्ये रक्त, मांस यांचा सडा टाकतात. यज्ञभूमी दूषित करतात. ऋषीमुनींना पळवून लावतात. त्यांना मारून टाकतात. यज्ञकर्म करणाऱ्या ऋषीने शाप देणे योग्य नाही. त्यामुळे शाप देऊ शकत नाही. या दुष्टांच्या संहाराकरता मला राम हवा आहे. तुझा ज्येष्ठ पुत्र मला दे. मी याचना करतो. ती पूर्ण कर. हे ब्रह्मर्षे, आपली मागणी ऐकून माझे हृदय विदीर्ण झाले आहे. मी स्वत: माझ्या सर्व सेनेसह तुमच्या बरोबर येतो, परंतु माझ्या रामाला तुमच्या बरोबर पाठवत नाही कारण -

''राजा म्हणे मुनीवरा। रामा सुंदरा सुकुमारा।
पायी चालता हे धरा। खुपेल की स्वामी।
रवि किरणे तेजेकरी। उष्ण बैसेल तनुवरी।
सुंदर मुर्ती श्रमेकरी। कोमेजेल मुनीवरा।''

कुठे ते भयंकर राक्षस आणि कुठे माझा चिमुकला राम. तो अजून खूप लहान आहे. सकुमार असलेल्या माझ्या रामाला तुम्ही नेऊ नका. त्याच्या मातेला विचारल्याशिवाय कसा पाठवू?

मातृदर्शनासाठी लक्ष्मणाला घेऊन राम मातेच्या महालात आले.

''नमस्कारिली निजजननी। उभा राहिला च्यापपाणी।
वदे माते ये क्षणी। आज्ञा दिली पाहिजे।।
मुख न्याहाळी सुंदरा। पंकज नयना मनोहरा।
प्राणाच्या प्राणा रघुवीरा। माझ्या कोठे जातोसी।।
सुंदर बोले सुंदर वचन। याग रक्षणा लागुन।
सभे रायासी मागोन। कौशिके आम्हा घेतले।।''

काय हे भलतेच बाई! हे ऐकून कौसल्येला फार राग आला. राज्य दान देऊन टाकावे. परंतु माझ्या रामाला कोठेही पाठवू नये. त्यावर वशिष्ठ म्हणाले -

''वशिष्ठ म्हणे राजप्रिये। राजा बोलिला हे उपाय।
धन सेना। किर्ती काय। पदार्थ मुनी न घेय।।''

राजानी वचन दिले आहे. वचन पाळण्यासाठी ज्ञानसिद्ध अशा रामाला यज्ञरक्षणासाठी पाठवणे इष्ट आहे. ते आपले भाग्य आहे. त्याबरोबरच तुला प्रिय होणारी गोष्ट पुढे घडणार आहे. ती कोणती? राजमाता कौसल्या विचारते आहे

''पुढे असे कार्य थोर। रामविवाहाचा गजर।
यश किर्ती जयजयकार। सून मांडिये घेसी।।
हे उछाहाचे दिन। राम प्रणील आजीपासून।
नव्हे अन्यथा वचन। राजकांते।।''

ह ऐकून कौसल्या मातेला खूप आनंद झाला. मुलाचा विवाह व सूनमुख हे स्त्री जीवनातील महतभाग्य असते. यज्ञरक्षणासाठी जाण्यापूर्वी वसिष्ठांनी रामाला दिव्य उपदेश केला तो योग-वासिष्ठ होय. हा संसार तरुन जाण्याची युक्ती म्हणजे योग होय. सम्यक विचार ज्याला करता येतो. तो संसार सागर तरून जातो. समर्थांनी पण तेच सांगितले आहे.

''संसार त्याग न करता। प्रंपच उपाधी न सांदिता।
जना मधे सार्थकता। विचारोनी होये।।''

जीवनात काही साध्य करायचे असेल तर काही गोष्टींचा त्याग करणे इष्ट असते. यज्ञ रक्षणासाठी राम-लक्ष्मणासह निघाला त्यावेळेस कौसल्यामातेला दु:ख झाले. कर्तव्यकर्म करण्यासाठी जातो आहे याचा आनंद आहे. त्याला जेऊ घालताना काय देऊ आणि काय नको असे झाले आहे. षडरस पक्वानाचे वर्णन वेणास्वामींनी अतिशय सुंदर केले आहे. तिन्ही मातांना वंदन करून आपले बाण भाते घेऊन राम-लक्ष्मण विश्वामित्राबरोबर निघाले. प्रजाजनांचा निरोप घेत आहे. नगरातील नारी पंचारती ओवाळीत आहे. दुंदुभि वाजू लागली. पुष्पवृष्टी झाली.

विश्वामित्रानीं दशरथाचे आभार मानून आज्ञा घेऊन राम-लक्ष्मणाला घेऊन ते निघाले. शरयू नदीच्या दक्षिण तीरावरून पुढे जात असताना संध्याकाळ झाली. तिघांनी संध्या वंदन केले. वत्सा रामचंद्रा आचमन कर. बला आणि अतिबला या विद्यांचे मंत्र मी तुला सांगतो. ते ग्रहण कर. प्रसन्न मुद्रेने रामचंद्रांनी ती विद्या ग्रहण केली. तीन तृणशय्या तयार करून यज्ञ संरक्षणाचे संभाषण करीत हे गुरूशिष्य शरयू नदीच्या वत्सल सान्निध्यात झोपी गेले. सकाळी विश्वामित्रांनी राम-लक्ष्मणांना जागे केले. स्नान करून सूर्याला अर्घ्य दिले. गायत्रीचा जप केला. नावेत बसून ते दुसऱ्या तीराला गेले.

पुढे लागले घोर वन। शाळ, ताळ निबिड वन।

विश्वामित्र म्हणाले, वत्सा रामा नरभक्षक ताटिका नावाची राक्षसी येथे राहते. ती सुंद राक्षसाची पत्नी असून तिला मारीच नावाचा महादुष्ट असा पुत्र आहे. तितक्यात आक्राळ-विक्राळ गर्जना करीत ती पुढे आली. रामा ही स्त्री आहे म्हणून दया दाखवू नको. हिचा वध करणे हाच धर्म होय. रामचंद्र म्हणाले, गुरूदवे गाईना कापणारा, ब्राह्मणांस मारणारा, समाजाला त्रास देणारा कुणीही असो स्त्री वा पुरुष त्यांना मी ठार मारीन.

धर्म स्थापका रविकुळ टिळका। ताटीका मारी रघुनाथको।
मंगल किर्तीचा घोष निका। त्रैलोकी ब्रीद गाजो रे।।

रामाच्या बाणाने त्या राक्षसी सहित ते अरण्य हालले. तिन्ही लोकांना पराभूत केल्यामुळे रावणाने जे ऐश्वर्य निर्माण केले होते ते ही हादरले. प्रसन्न होऊन विश्वामित्रांनी धर्मचक्र व कालचक्र दिले. राम धर्मपाश व कालपाश यांचा स्वीकार कर. त्याबरोबरच आग्नेयास्त्र, नारायणास्त्र, वायव्यास्त्र इ. जवळ असलेली सर्व अस्त्रे त्यांनी रामाला दिली. ती अस्त्रे परत घेण्याची विद्याही त्याला शिकवली.

''मुनी पावे सिद्धाश्रम। समागमे पूर्ण काम।
मनोरथाचा नेम। फलश्रुतीस आला।।''

आश्रमातील मुनीनी विश्वामित्राचे पूजन केले. राम-लक्ष्मणाचे आदरातिथ्य करून वरासनी बैसविले. विश्वामित्रांनी यज्ञ-दीक्षा घेतली. राम-लक्ष्मण बाण घेऊन निशाचराचे निवारण करण्याकरता सिद्ध झाले. दर्भ, समिधा, पुष्पे त्यांनी यज्ञवेदी प्रज्वलित झाली. यज्ञांचे अनुष्ठान समंत्रक यथाविधी सुरू होते. तितक्यात सुसाट्याचा वारा सुटला. रक्तयुक्त पाऊस पडू लागला. सर्वजण म्हणू लागले -

''म्हणती मरीच सुबाहु । आले आले ते पाहो ।
ब्राह्मण म्हणती वीरबाहु । रामा राखे आम्हासी ।।''

मारीच व सुबाहु हे राक्षस धावून आले. अग्नी अस्त्राने सुबाहु जळाला. वायव्यास्त्राने मरीचीला आकाशात उडवले. तो समुद्रात जाऊन पडला. यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. कौशिकमुनीसह सर्व ऋषिमुनींना अतिशय आनंद झाला. विश्वामित्रांनी रामाला ह्रदयाशी धरून कौतुक केले. पूर्णाहुती नंतर दोघांचा सत्कार केला. स्तुती केली. राम म्हणाला, मी माझे कर्तव्य केले.

गुरूदेव आपला यज्ञ पूर्ण झाला आहे. आता आपला पुढचा प्रवास कसा असणार आहे. ते सांगावे. तेवढ्यात जनक राजाकडून निमंत्रण देण्यासाठी सेवक आले. जानकी स्वयंवरासाठी आपण लवकर यावे अशी विनंती जनक राजानी केली आहे. एक प्रचंड शिवधनुष्य तेथे ठेवले आहे. तेही बघावे. त्याला प्रत्यंच्या आजपर्यंत कोणीही लाविली नाही.

''विश्वामित्र म्हणजे रामा । पाहावया योग्य सैवर तुम्हा ।
हे पुरुषार्थाचे सैवर । च्याप टाकिला आहे दुसार ।।
जानकी प्राप्तीचा विचार । धनुष्या आड राहिला ।''

असे ते धनुष्य पाहण्यासाठी रामा तुम्ही माझ्याबरोबर यावे. राम-लक्ष्मण विश्वामित्राबरोबर जात असताना एक रमणीय आश्रम लागला. तो आश्रम निर्मनुष्य होता.

''कौशिक वदे रघुनाथा । गौतम आश्रम हा समर्था ।
अहिल्या शापाची कथा । समर्था निवेदन केली ।
गौतमे शापिले अहिल्येसी । शीला होऊन पडली आश्रमासी ।
कृपा येऊनी ब्राह्मणासी । मागुता उशाप दिधला ।।''

राघवा तुला विनंती आहे. या शापित अहिल्येचा उद्धार कर. रामाने अहिल्येचा उद्धार केला. अहिल्येचा पुत्र शतानंदाने रामाला वंदन केले. गौतमऋषी ही तेथे आले. त्यांनी रामाची स्तुती केली. विश्वामित्राबरोबर राम-लक्ष्मण मिथिलेला आले. तोपर्यंत विश्वामित्र व राम-लक्ष्मण आल्याची बातमी जनकाला कळली.

''अती सत्वरे घेतली पुजा । सामोरा आला जनक राजा ।
मग आदरे पुरस्कार । पूजिला जानकीचा वर ।
मुनी सहित राजकुमार । घेऊन मंडपा चालिला ।।''
तव ते मिथिलवासी जन । राम आला आला ऐकून ।
पाहावया स्वानंद घन । गृहे गोपुरी वेधिले ।।''

जनक राजा बरोबर सर्वजण स्वयंवर मंडपात आले. सभा मंडपात अनेक राजकुमार सीतेची अभिलाषा धरून आले होते. त्याबरोबरच अनेक देशीचे राजे, नृपती, ऋषी, मुनी, तापसी हा सोहळा पाहण्यासाठी आले होते. शतानंद हा जनकाचा पुरोहित आहे. शतानंद जनकास रामाचा प्रताप सांगतो.

''रामप्रताप अद्‌भूत महिमा । बोलावया नाही सीमा ।
उपमेरहित निरोपमा । थोर आश्चर्य ऐका हो ।।
कौशिके यागरक्षणासी । घेऊन आला राजपुत्रासी ।
येकयां बाणे ताटिकेसी । मार्गी राघवे मारिले ।।
येक्या बाणे वीरबाहो । यागी मारिला सुबाहो ।
पिसोरा लागता पहा हो । मारिच आकाशी एडविला ।।
रामा गौतमवधु माझी माता । शाप शीळा पडली असता ।
रामपद रेणु लागता । उद्धार झाला येकाळी ।।''

अशा कोदंडधारी रामाला बघून सर्व सभा तटस्थ झाली. तितक्यात सीतेला घेऊन तिच्या सख्या जनकाजवळ आल्या. सर्व सभा तिच्याकडे पाहू लागली. भूमिकन्या सीतेची विश्वातील कोणत्याच रमणीशी तुलना करता येणार नाही, असे अनुपम रूप तिला लाभले होते.

राजर्षि जनक स्वयंवराबद्दल बोलायला उभे राहिले. आपण सर्वजण माझ्या निमंत्रणामुळे येथे आला आहात. धनुर्धरांनो मी आपल्या वीरवृत्तीला आवाहन करीत आहे. जो कोणी या शिवधनुष्याला चाप लावील त्याच्या गळ्यात माझी कन्या सीता वरमाला घालेल. भार्गवरामांनी या धनुष्यातून सोडलेल्या बाणानी सारे त्रिभुवन जिंकले, असे हे प्रतापी शिवधनुष्य त्याने माझ्याकडे ठेवले आहे. अनेक राजांनी प्रयत्न केला. तितक्यात लंकाधिपती रावण गर्वाने उठला. प्रतीक्षा केली. हे शिवधनुष्य मी सहज उचलून प्रत्यंचा लावीन!

''धनुष्य उचलू गेला लिला । तव ते आटोपेना बळा ।।
कापो लागला चळचळा । गुडघे मांड्या टेकिनु ।
मेटे घालूनि सावरी । तव ते आदळले उरी ।।
आर्डोनि घरेवरी । किरविल जैसा पसरला ।
रावण गर्वाचे वोडंबर । त्रिंबक धनुष्ये केला चूर ।।
म्हणे मेलो उठा वीर । काय आता पाहता ।
जानकी ते रामकांता । आणि सर्व शक्ति ते तत्वता ।।
रावणा शोभली आदिमाता । शक्ति ओढुन घेतली ।''

रावणासारख्या वीराची अशी गती झालेली बघून कोणीही पुढे येईना. नरपति, हयपति, गजपति, त्या धनुष्याजवळ येण्यास धजेनात. हे पाहून जनक राजाला वाईट वाटले. ते म्हणतात -

''तरी निवरि झाली धरा । पुरुषार्थ सरला एकसरा ।
माझे कुमरीस नोवरा । निर्मिता विधी विसरला ।।''

हे ऐकून ऋषिमंडळात बसलेला लक्ष्मण क्रोधित झाला. श्रीरामाला म्हणाला, मी तुझा दास आहे. तुझ्या आज्ञेने मी त्या धनुष्याला प्रत्यंचा लावतो.

''तव विश्वामित्र म्हणे फणिवरा । तूं बोलिलासी अर्थ खरा ।
परी धनुष्य गर्व परिहारा । तूं नव्हेसी सौमित्रा ।।''

रामाकडे वळून विश्वामित्र म्हणाले, धनुर्धर रामचंद्रा ऊठ! शिवधनुष्याला प्रत्यंचा चढव. माझा व दशरथाचा तुला आशीर्वाद आहे. रामाने विश्वामित्रांना नमस्कार केला. विश्वामित्रांनी आपला वरद हस्त रामचंद्राच्या मस्तकावर ठेवला. त्याची उग्रतपश्चर्या त्याच्या मागे उभी होती. असुरतापाने त्रस्त झालेल्या अनेक ऋषींच्या सदिच्छा त्याला होत्या. सती कौसल्यामातेची उदंड माया त्यांच्या पाठीशी होती. रामाने

धनुष्याला वंदन केले व डावा पाय पुढे करून त्या धनुष्याचे एक टोक डाव्या हाताने उचलले वाकविले आणि उजव्या हाताने प्रत्यंचा चढवू लागताच कडाड असा आवाज झाला.

ध्वनि ब्रह्मांडा झेप घाली । नादकळा निमोन गेली ।
जगी गाजे हेचि बोली । रामे धनुष्य भंगिले ।।
राया जनकाचे भाग्य थोर । गगनी दाटला जयजयकार ।
पुष्पे वरुषले सुरवर । दुंदुभी वाजू लागल्या ।।''

त्या आवाजानी आकाश पाताळ एक झाले. सूर्य रथाचे वारू उधळले. पृथ्वी डळमळली. शेषाची स्थिरता नष्ट झाली. प्रजाजनाचे संशय आणि अज्ञानी अहंकारी नृपतीचा अभिमान, जनकाचा पण जाहीर केल्याचा पश्चात्ताप, सीतेच्या मनाची हुरहुर, मुनीश्वरांची कातरता, परशुरामाचा गर्व आणि गुरुत्व हे सर्व नष्ट झाले. आकाशात दुंदुभी वाजू लागल्या. अप्सरा नृत्य करू लागल्या, गंधर्व गायनात तल्लीन झाले, मुनी आशीर्वाद देऊ लागले. प्रजाजनानी फुले उधळली. सीतेच्या सख्यांनी पंचारत्या ओवाळल्या. राजर्षि जनक सीतेला घेऊन पुढे आले. विश्वामित्राच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळू लागले. श्रीराम विजयी झाले. सीतेने रामचंद्राच्या गळ्यात वरमाला घातली.

''माझ्या भाग्याची सकळ कळा । परम सुलक्षण सुशीला ।
कन्या माझी मुनी शार्दुला । रामा दिली ये काळी ।।
थोर आनंद जनकासी । काय बोले मुनीसी ।
मुळ जावे अयोध्येसी । राये आले पाहिजे ।।''

चतुरंग सेना घेऊन श्रेष्ठ प्रधान अयोध्येस गेले –

''पत्रिका ठेविली रायापुढे । बचन बोलती जाडे जाडे ।
मिथिलेशाचे भाग्य गाढे । पाय जोडले तुमचे ।।
पत्रिका वाचिता भूपती । राम प्रताप अद्‌भूतगती ।
राया आनंद न माये चिती । थोर आश्चर्य वाटले ।।''

पत्रिका वाचून पाहिल्यावर राजा दशरथाला खूप आनंद झाला. माझ्या रामाचा पराक्रम सांगा. मी ऐकण्यास उत्सुक आहे. अहो कौशिकाच्या आश्रमात जात असतानाच ताट्किा मारली. यज्ञ भंग करण्यासाठी आलेल्या सुबाहुला जाळून टाकले व मरिच्याला लांब समुद्रात फेकून दिले. त्यामुळे यज्ञ यथासांग पूर्ण झाला. पुढे मिथिलेला जाताना

''राम चालता ऋषीमेळे । वाम चरण लागला सीळे ।
तव ते अहिल्या तेणे काळे । पूर्व देह पावली ।।''

अहिल्येसी वरदान देऊन राम-लक्ष्मण विश्वामित्रासह मिथिलेला आले.

''राये राये झाले दिन । धनुष्य मोडिले रघुनंदने ।
मिथिली राजे सन्माने। जानकी दिल्ही राघवा ।।
अपकिर्ती नेले रावणे । लज्जा भुपाळां कारणे ।
कीर्ती वारिली सीतारमणे । उछाहमूळ तुम्हासी ।।''

सर्वांगाचे कान करून ऐकण्यात दशरथ राजा तल्लीन झाला होता. त्यावेळेस वशिष्ठमुनी म्हणाले, महाराज आता आपल्याला मुहूर्त पाहून मिथिलेला निघायचे आहे. राम प्रताप कौसल्या मातेला सांगायचा आहे. तरी चलावे. तोच राणीवश्यातून भोजण्याचे बोलावणे आले.

''वशिष्टादि मुनी पाती । पाहुणे राय पंगती ।
सारून भोजने समस्ती । संभ्रमे वऱ्हाड निघाले ।।
शारदा गणपती बहुमाने । कौसल्यासहित रायाने ।
पुजुनिया भव्य वाहने । पुढे त्याच्या निघाली ।।''

अग्रपूजेचा अधिकारी असलेल्या गणपतीचे व शारदेचे पूजन उभयतांनी केले. उंदरावर आरूढ असलेल्या गणपतीला मोदक लाडूचा नैवेद्य दाखवून प्रार्थना केली. निर्विघ्नपणे कार्य सिद्धीस न्यावे. वेगवेगळ्या प्रकारची वाद्ये वाजू लागली. वशिष्ठ कुलगुरू बरोबर सर्व वऱ्हाड निघाले. वऱ्हाडी मंडळीने साधन चतुष्टाचा शृंगार केला. चार पुरुषार्थाचे अलंकार घातले होते. चतुरंगसेना त्यांच्या मागेमाग चालली होती. अष्टमहासिद्धी त्यांच्या बरोबर होत्या. त्यांच्या पाठोपाठ

''रथ चालिले घडघडाट । तया पाठीसी अचाट ।
छेत्रे पताका लखलखाट । राज संभ्रमे निघाला ।।
तया पाठीशी सिक्का । छेत्रे पताका लखाका ।
रघुवंशकुळ टिळका । माता कौसल्या निघाली ।।
सुमित्रा कैक चौदा शता । राया दशरथाच्या कांता ।
छेत्रे चामरे मंडिता । सिविका त्याच्या निघाल्या ।।''

सर्व वऱ्हाडी मंडळींना घेऊन (अयोध्येची बलुतीही) त्यांना घेऊन दशरथ राजा भरत शत्रुघ्न सह मिथिलेत वेशीजवळ आले.

जनक राजा स्वागतासाठी पुढे आल्याबरोबर दशरथ राजे रथातून उतरले.

''अयोध्यापति सन्माने । पुढे आला बहुमाने ।
प्रितिवचनानी नमने । परस्परे भेटले ।।
मिथिले नमिले वशिष्ठ ऋषी । अनुक्रमे श्रेष्ठ श्रेष्ठाशी ।
परस्परे सन्मानेसी । व्याही वऱ्हाडी बैसले ।।
ते जानकीचे जननी । कौसल्येते सन्मानुनी ।
समस्त वऱ्हाडिनी । अति संभ्रमे बैसल्या ।।''

सर्वांचे स्वागत जनकाने व राणी सुमेधाने केले. सर्व वऱ्हाड आपापल्या स्थानी विसावले. दशरथ, जनक, विश्वामित्र यांचा सुखसंवाद सुरू झाला. विश्वामित्र म्हणाले, जनका, तुझे भाग्य फार थोर आहे. तू तुझी दुसरी मुलगी लक्ष्मणाला दे. तसेच कुशध्वजाच्या दोन्ही कन्या भरत आणि शत्रुघ्नाकरता मागत आहे. हे ऐकून जनक हात जोडून म्हणाला, मुनिवर्य, आपली आज्ञा मला मान्य आहे.

लग्नसोहळा सुरू झाला.

''शतानंद म्हणे राया । रामपूजा या समया ।
करावी जी नृपवर्या । ऋषी ब्राह्मण बोलती ।
सकळ मंगळाचे मंगळ । सर्व सुखाचे हे फळ ।
राया तुझे भाग्य सफल । राम जावाई जोडला ।।''

जनकाने रामाचे पूजन केले. अवर्णनीय असा सोहळा झाला. वस्त्रअलंकार भूषणे वर्णन थक्कित करणारे आहे. केशर कस्तुरीचा टिळा कपाळावर रेखून त्यावर सुरंग अक्षता चमकू लागल्या. सुगंधित अत्तर गुलाबपाण्याने आसमंत दरवळला. सर्व अलंकार घालून त्यावर शेला पांघरला. नवरत्नाची कोंदण असलेला जोडा पायी घातला. त्यानंतर –

'वर वऱ्हाडी मानकरी । राये तार्तिम्य सकळांपरी ।
यथासांग उपचारी । पुजियेले सर्वांशी ।।'

सर्व वऱ्हाडाचा यथोचित मानसन्मान करून सीमांतपूजन झाले.

त्यानंतर –

''वसिष्ठ म्हणे राजा ये काळी । सीघ्र आणावी राजबाला ।
पूजा करूनी मैथली । फळ समर्पू मुनिवरा ।।''

सीतेला वस्त्र अलंकार देऊन भूषविले. ते सर्व वर्णनातीत असे आहे.

''मगते जनकाची नंदनी । सांग फळाते पावोनी ।
थोर सन्माने करूनी । मातृदर्शना आली ।।''

मातृदर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. सर्व जन आपापल्या स्थानी गेले.

''वऱ्हाड संभ्रमे मिरविले । रम्य जानवसार राहिले ।
सकळा तार्तम्य पावले । दिन प्रशस्त उगवला ।।''

सूर्योदयापूर्वीच केशरकस्तुरीच्या सड्यांनी अंगण दरवळले. त्यावर सुंदर रांगोळ्या घातल्या गेल्या. रामाला हळद लावण्याची घाई झाली.

''मग त्या मदनमूर्ती रघुवीरा । हळदी लाविती सुंदरा ।
नीळ तनु मनोहरा । नाना विलासी उटिती ।।
कनकपात्रे भरली किती । विस्तीर्ण जळ विसाविती ।
अष्टमहासिद्धी राबती । मंगल स्नान प्रभुचे ।।
तेचि हळदी राजकुमारी । लागली तुरांच्या गजरी ।
दोन्ही मंडपी गजरी । उछाह गाजे हळदीचा ।।
दोन्ही मंडपात मंगल स्नाने । जाली समस्ता शोभाय माने ।
मग ती वाटली वायने । ढिगे ढिग शंकरा ।।''

दोन्हीकडे देवदेवक बसविले गेले. ब्राह्मणांनी यथासांग पूजन केले. देवदेवतांना कुंकुमपत्रिका अर्पण केली. रुखवताचे पूजन झाले. त्यात अनेक मौल्यवान वस्तू, वस्त्रे, अलंकार त्याबरोबर विविध प्रकारचे लाडु, करंज्या, अनारसे, फेण्या, मांडे, गणती न करण्याइतके आंदण दिले होते. लग्नमंडपात सर्वांचे स्वागत झाले. पायघड्या घालण्यात आल्या. त्यावरून प्रभू रामचंद्रांबरोबर

''शेष भरत शत्रुघ्न । समीप बंधु शोभले ।।
अयोध्याधीश तो सन्माने । जनकराजा **बहुमाने ।**
बैसाकार दिव्यासने । अनुक्रमे सकळांसी ।।
बहुमानाची बोलणी । बहु प्रीतीची करणी ।
जनकवधु वऱ्हाडिणी । कौसल्या सवे बैसल्या ।।

मग कौसल्या आदि वनिता । राजा दशरथाच्या कांता ।
पुजूनिया रुखवता । सुमेधेने दिधले ।।''

रुखवताचे पूजन झाले. मुहूर्ताची वेळ जवळ येऊ लागली आहे. सीता गौरीहर पुजू लागली. मनात रामाचे चिंतन चालले आहे. तितक्यात कैलासाहून उमामहेश आले. त्यांना बघून रामाला आनंद झाला. त्यांचे पूजन करून त्यांना गौरीहराजवळ बसविले.

''गौरीहराची पूजा । सांग केली सलज्जा ।
अधोमुख ते जनकजा । थोर आनंद अंतरी ।।''

सख्या चेष्टा करू लागल्या. पूजेचे फळ मिळाले आहे बरं का? अगं साक्षात उमामहेश्वर आशीर्वाद द्यायला आले ना! रामासारखा पती मिळाला आहे तुला! रोमहर्षण, मार्कंडेय, पुरोहित समुदाय शुभ आशीर्वाद देण्यासाठी आले होते. मंत्रघोषाने आसमंत दणाणून गेले. सोळा घटिका पूर्ण झाल्या आहेत. सतरावी घटिका सुरू झाली आहे. जानकीला मंडपात आणा.

''उभयता राम सीता बोहल्यावर उभे राहिले.
वसिष्ठासि सप्तऋषी । धरूनी दिव्य अंतरपाटासी ।
राम उभे लग्नासी । येवरीकडे जानकी ।''

मंगलाष्टके सुरू झाली. मंगल अक्षता घेऊन सर्वजण सज्ज झाले.

''आरंभी वदती महागणपती हे शारदे सुंदरी ।
शुभे वाणी वदे सुवेळ विलसे तू मंगले माधुरी ।
रामा जानकी माळ घेऊनी करी उभी असे सुंदरी ।
तो तो सादर वैखरी शुभ वरे सीता वरं मंगल ।।१ ।।
गर्गाचार्य म्हणे विदेहतनया लक्ष्मी सीता बालिका ।
सर्वा ईश परेश हा वर इचा तुम्ही पहा नेटका ।
रत्ने मंडित साजिरी द्रुय करी माला जगन्नायका ।
आता घालिल जानकी रघुविरा सीतावरंमंगल ।।''

ॐ पुण्य गजरात जानकीने श्रीरामाच्या गळ्यात वरमाला घातली. तेज:पुंज अशा अक्षता राम–जानकीच्या मस्तकी पडल्या. पुष्पवृष्टी झाली. दुंदुभी नगारे वाजू लागले. जयजयकार झाला. ऋषी, ब्राह्मण, पुरोहितांनी आशीर्वचन दिले.

''तव ब्राह्मणाचा मंगळध्वनी । विधियुक्त देव अग्नी ।
लाज्या होम पूजली । अति संभ्रमे आणिती ।।
परमानंदे हुताशन । कनकपात्री घेऊन ।
ब्राह्मण मंत्री झाकुनी । सुवासिनी आणल्या ।।''

होमकुंडात अग्नी प्रज्वलित झाला. लाजाहोमाचा विधी सुरू झाला.

''लाज्याहोमाचे कौतुक थोर । वरदकरी जानकीवर ।
आज्ये लाज्या सुंदर । मंगल मेहुणा घालितसे ।''

मंगळ हा पृथ्वीचा पुत्र असल्यामुळे तो जानकीचा बंधु आहे. मेहुणा म्हणून तो लाह्या घालत आहे. सर्व विधी यथासांग झाल्यावर कौसल्यामातेला सूनमुख पाहण्याची घाई झाली होती. सर्व राण्यांसह

सूनमुख पाहण्याचा सोहळा संपन्न झाला. जनकाला राम जावई मिळाल्याचा आनंद आहे. त्याबरोबर आता झाल साड्याचा कार्यक्रम झाल्यावर जानकी आपल्या श्वशुरगृही अयोध्येला जाईल.

''तव वसिष्ठादि ब्राह्मण ऋषी । समस्त बोलती रायाशी ।
सादे आता जानकीसी । समर्पिले पाहिजे ।।''

अनेक प्रकारचे शालु, पैठण्या, जानकीला दिल्या. सर्वांचा यथोचित सत्कार झाला. जानकीला हाताशी धरून जनकराजा दशरथासमोर हात जोडून विनंती करतो,

''कनकपुतळी धरूनि हाती । राजानिरवी अयोध्यापती ।
ते समई गोत संपति । सभेसहित गहिवरले ।।''
जानकी गुणे हृदय कृपन । राजा निरविता उच्चारण ।
अष्टवर्ष केले म्या पाळण । आता तुम्ही करावे ।।''
माझ्या प्राणाची प्राणकळा । सुखदायका सुशीला ।
परम स्नेहे भूपाळा । ईचे पाळण करावे ।''

आता यापुढे आपण हिचे पाळण करावे. तिला सांभाळावे. जनकाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत आहेत. जानकीला हृदयाशी कवटाळून उपदेश करतात दोन्ही कुळांना भूषण हो.

''श्रेष्ठ वचन परिपाळण । तूटो नेदावे अनुसंधान ।
राम चरणी अनन्य । कदा वियोग नसावा ।।
तुज करिता जालो मान्य । तिन्ही लोकी धन्य धन्य ।
राम जावाईचे पूजन । तुझेन योगे साधले ।।
म्हणे माझी यश कीर्ती । तां वाढविली सुमती ।
रामचरणाची प्राप्ती । तुजकरिता मज जाली ।।
पतिव्रत धर्माचे पाळती । सर्वा श्रेष्ठ सुलक्षणी ।
आवो कन्ये रामचरणी । अनन्य सेवे असावे ।।''

पतीबरोबर घरातल्या सर्वांची सेवा करून सर्वांची लाडकी हो. सुमेधा मातेने तिला जवळ घेतले. डोळ्यातून अश्रू ओघळत आहे. हुंदका आवरत नाही. प्रत्येक मातेची अवस्था लाडक्या लेकीची पाठवणी करताना अशीच होते. तरी ही आई तिला तिच्या कर्तव्याची जाणीव करून दिल्याशिवाय राहत नाही.

''तेव्हा जानकीची जननी । म्हणे सुंदर विलासनी ।
कैसे असावे तुजवाचुनी । राज्य उदास जाले ग ।।
आता आम्ही उदासीन । सेविले निरंजन वन ।
तू सुबुद्धि मनमोहन । सहित राज्य करावे ।।
तुझेनि गुणे जाले मान्य । आमुचा वंश केला धन्य ।
आता रामपदी अनन्य । सेवे तत्पर असावे ।।''

पोरी तुझ्या जाण्याने राज्य उदास झाले आहे गं! कन्या हे परक्याचे धन असते ना? तू तुझ्या घरी सुखाने आनंदाने जा. सुखाने संसार कर. तुझ्यामुळे आमचा वंश धन्य धन्य झाला आहे. पत्नीधर्माचे पालन कर. एवढेच मी सांगू शकते. आजूबाजूच्या सर्वांनाच गहिवरून आले.

''जो जो समईचा प्रसंग । तो तो झाला यथासांग ।
तो राज आज्ञाते अभंग । सभ्रमे निघाले वऱ्हाड ।।
तव अयोध्येचा नृपवर । उभा राहिला राजभार ।
मिथिलेशासी उपचार । वचन बोलता जाता ।।''

आता आपण थांबावे. आम्हाला निघण्याची आज्ञा द्यावी. आपल्या या संबंधानी आम्ही धन्य झालो आहोत. आपल्या कन्या आता आमच्या झाल्या आहेत. काळजी नसावी! वऱ्हाड निघाले त्यांना अयोध्या नगरीला पोहोचण्याचे वेध लागले. तितक्यात वल्कलधारी मोकळ्या जटा असलेला हातात धनुष्यबाण घेतलेला भार्गव समोर येऊन उभा राहिला. दशरथाने हात जोडून प्रार्थना केली. आमची अर्घ्यपूजा स्वीकारावी. पण काहीच स्वीकारण्याच्या मनस्थितीत तो भार्गव नव्हता. दरडावून तो रामाला म्हणाला, 'ताटिका मारून तू काय पुरुषार्थ केलास? अरे मी मातेच्या वचनासाठी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली आहे. जुने शिवधनुष्य भंग केलेस त्यात काय एवढे! ते तर कोणीही करू शकेल. माझ्या या धनुष्यास चाप लावून दाखव. रामाने त्याच्या हातातून धनुष्य झिडकारून घेतले. त्यास बाण लावून आकर्ण ओढला व भार्गवास विचारले, हा बाण कोठे सोडू? ते बघून भार्गव चकित झाला. त्यावर म्हणाला, माझा त्रैलोक्याचा जो गगनमार्ग आहे तो बंद करून टाक. त्याच क्षणी टणत्कार झाला. बाण जाऊन आपले कार्य करून राम भात्यात परत आला. भार्गवाच्या गर्वाचा परिहार झाला. देवांनी जयजयकार केला. रामप्रताप पाहून ऋषी, ब्राह्मणांना संतोष वाटला. कौसल्यामाता, दशरथ राजा धन्य धन्य झाले. सर्व वऱ्हाडी आनंदित झाले. रामआज्ञा घेऊन लज्जित झालेला भार्गव स्वस्थानी गेला. वऱ्हाड अयोध्यानगरीकडे निघाले. अयोध्यानगरीत स्वागताची तयारी झाली.

''तव दिसे अयोध्यापुर । नेणो वैकुंठनगर ।
ध्वजा पताका अपार । कनकमय झळकती ।।
वऱ्हाडेसी राजभार । पुरी प्रवेशिला सीतावर ।
वेणास्वामी सुंदर । निजधामी राहिले ।।''

सर्व वऱ्हाड सीतेसह अयोध्यापुरीत प्रवेश करते झाले. निंबलोण उतरले. गृहलक्ष्मीने गृहप्रवेश केला.

''भक्ति करिता याचे पठण । अथवा करिता श्रवण ।
त्याचे मनोरथ पूर्ण । कर्ता राम समर्थ ।।''

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. सुषमा सूर्यकांत धांडे
'गणेश आर्केड' वरद गणेश मंदिर रोड,
समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१
फोन - ०२४०-२३२४५९०, मोबा. : ८८८८२२२५४०७


***

ओंकार ट्रस्ट

कल्याणी २०१२

महाराष्ट्रातील स्त्रीसंत पंचक विशेषांक

(संत - मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई व वेणास्वामी)





नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥